अहवाल क्रमांक : १५५

# पंचायती राज समिती

## (२०१७-२०१८)

## (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

**नागपूर जिल्हा परिषदेच्या सन २०१२-२०१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात**

# अकरावा अहवाल

सत्यमेव जयते

**(सदर अहवाल दिनांक मार्च, २०१८ रोजी विधानसभेस/विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)**

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
विधान भवन, मुंबई
२०१८

# पंचायती राज समिती

(२०१७-२०१८)

**(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)**

**नागपूर जिल्हा परिषदेच्या सन २०१२-२०१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात**

# अकरावा अहवाल

# पंचायती राज समिति

## (सन २०१७-२०१८)

**समिति प्रमुख**

१. श्री. सुधीर पारवे, वि.स.स.

**सदस्य**

२. श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.
३. श्री. चरण वाघमारे, वि.स.स.
४. श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.
५. ॲड. राहुल कुल, वि.स.स.
६. श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.
७. डॉ. देवराव होळी, वि.स.स.
८. डॉ. सुरेश खाडे, वि.स.स.
९. डॉ. सुधाकर भालेराव, वि.स.स.
१०. श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.
११. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
१२. श्री. किशोर पाटील, वि.स.स.
१३. श्री. राजेश क्षीरसागर, वि.स.स.
१४. श्री. तुकाराम काते, वि.स.स.
१५. श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.
१६. श्री. भारत भालके, वि.स.स.
१७. प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
१८. श्री. दिलीप सोपल, वि.स.स.
१९. श्री. राहुल मोटे, वि.स.स.
२०. श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.
२१. श्री. प्रविण दरेकर, वि.प.स.
२२. प्रा. डॉ. तानाजी सावंत, वि.प.स.
२३. श्री. विक्रम काळे, वि.प.स.
२४. श्री. सतीश चव्हाण, वि.प.स.
२५. श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**विशेष निमंत्रित सदस्य :**

२६. श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.
२७. श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.
२८. श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री. विलास आठवले, उप सचिव
(३) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव
(४) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी
(५) श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी

## पंचायती राज समिती

## (सन २०१५-२०१६)

**कार्यकारी समिती प्रमुख**

१. *श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स.

**सदस्य**

२. श्री. अनिल गोटे, वि.स.स.
३. श्री. विकास कुंभारे, वि.स.स.
४. श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.
५. श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.
६. श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.
७. श्री. समीर कुणावार, वि.स.स.
८. श्री. राजेंद्र नजरधने, वि.स.स.
९. श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.
१०. श्री. अनिल बाबर, वि.स.स.
११. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
१२. श्री. हेमंत पाटील, वि.स.स.
१३. श्री. राजाभाऊ वाजे वि.स.स.
१४. ॲड. के. सी. पाडवी, वि.स.स.
१५. श्री. बसवराज पाटील, वि.स.स.
१६. श्री. अमित झनक, वि.स.स.
१७. श्री. राहुल मोटे, वि.स.स.
१८. श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.
१९. श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.
२०. श्री. अनिल तटकरे, वि.प.स.
२१. श्री. संदीप बाजोरिया, वि.प.स.
२२. श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.
२३. श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.
२४. ** रिक्त
२५. ** रिक्त

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री.विलास आठवले, उप सचिव
(३) श्री.सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

*सन २०१५-२०१६या वर्षासाठी गठित करण्यात आलेल्या महाराष्ट्र विधानमंडळाच्या पंचायती राज समितीवर मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक १५ ऑक्टोबर, २०१६ रोजीपासून श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स. यांची “कार्यकारी समिती प्रमुख” म्हणून नामनियुक्ती केली आहे.

** सन्माननीय समिती प्रमुख श्री.संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स. व श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांचा दिनांक ८ जुलै, २०१६ रोजी मंत्री परिषदेत समावेश झाल्यामुळे रिक्त.

## पंचायती राज समिती

## (सन २०१५-२०१६)

**समिती प्रमुख**

१. श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स.

**सदस्य**

२. श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स.
३. श्री. अनिल गोटे, वि.स.स.
४. श्री. विकास कुंभारे, वि.स.स.
५. श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.
६. श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.
७. श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.
८. श्री. समीर कुणावार, वि.स.स.
९. श्री. राजेंद्र नजरधाने, वि.स.स.
१०. श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.
११. श्री. अनिल बाबर, वि.स.स.
१२. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
१३. श्री. हेमंत पाटील, वि.स.स.
१४. श्री. राजाभाऊ वाजे, वि.स.स.
१५. ॲड. के. सी. पाडवी, वि.स.स.
१६. श्री. बसवराज पाटील, वि.स.स.
१७. श्री. अमित झनक, वि.स.स.
१८. श्री. राहुल मोटे, वि.स.स.
१९. श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.
२०. श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.
२१. श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स.
२२. श्री. अनिल तटकरे, वि.प.स.
२३. श्री. संदीप बाजोरिया, वि.प.स.
२४. श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.
२५. श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री. विलास आठवले, उप सचिव
(३) श्री. प्रदीप मयेकर, अवर सचिव (समिती)
(४) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

**प्रस्तावना**

मी, पंचायती राज समितीचा 'समिती प्रमुख' या नात्याने समितीने अधिकार दिल्यावरुन पंचायती राज समितीचा अकरावा अहवाल सादर करीत आहे.

सन २०१७-२०१८ करिता समिती दिनांक ८ सप्टेंबर, २०१७ रोजी गठीत झाली. महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम २४० अन्वये विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या जिल्हा परिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवालाची तसेच महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुर्नविलोकन अहवाल व एकत्रित वित्तीय महसुली लेखे यांच्या परीक्षणाची कामे प्रामुख्याने या समितीकडे सोपविण्यात आलेली आहेत.

शासनाच्या विविध कामकाजाचा वाढलेला व्याप (Enormous range and complexity) लक्षात घेता विधानमंडळाला उपलब्ध वेळेत आपली कर्तव्ये पुरेशा क्षमतेने बजावता येणे अशक्य झाले आहे. शासन यंत्रणेकडे उक्त किचकट प्रशासकीय कामासाठी सक्षम व तज्ञ प्रशासक यंत्रणा उपलब्ध असते. संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीतेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, संपूर्ण, प्रभावी व अर्थपूर्ण असे (effective meaningful) नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे आणि म्हणूनच कार्यकारी प्रशासन (Executive) राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी, त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी (Tone of administration) मा.सभापती, विधानपरिषद व मा.अध्यक्ष, विधानसभा यांनी दोन्ही सभागृहाच्या निवडक सदस्यांचा समावेश असलेल्या पंचायती राज समितीचे गठन दिनांक ८ सप्टेंबर २०१७ रोजी केले. समिती पद्धतीचे वैशिष्ट असे की, सभागृहात पक्षीय ध्येयधोरणांचा सदस्यांवर प्रभाव पडतो. त्या उलट संसदीय लोकशाही पद्धतीमध्ये विधानमंडळाची ही समिती फार मोठ्या मोलाचे कार्य पार पाडीत आहे. ही समिती विधानमंडळाची निर्मिती असून ती सहाजिकच विधानमंडळास दुय्यम आहे. या समितीला सर्व अधिकार विधानमंडळापासूनच प्राप्त झालेले आहेत. (They derive authority from the Legislature) या समितीला "Mini Legislature" सभागृहाची छोटी प्रतिकृती संबोधली जाते. शासनाने राबविलेल्या योजनांच्या अंमलबजावणीला पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी व प्रशासनावर सातत्याने नियंत्रण व प्रभावीपणे पहारा ठेवण्याचे महत्वाचे काम विधानमंडळाच्या या समितीद्वारे केले जाते. समितीचे कामकाज पक्षविरहीत तत्त्वावर (irrespective of party affiliation) चालत असल्यामुळे समिती समोरील बाबी पक्षीय अभिनिवेशरहीत पद्धतीने (Non-Party Basis) विचारात घेण्यात येतात त्यामुळे एखाद्या विषयाचा अभ्यास अत्यंत निःपक्षपातीपणे व तपशिलात जाऊन केला जातो परिणामी त्यास पूर्ण न्याय मिळतो. शासनाचे एखादे धोरण वा योजना याची आखणी कशी करावी याबाबत समिती सल्ला देऊ शकणार नाही, तथापि शासनाने अंमलात आणलेल्या धोरणांची वा योजनेची फलश्रुती अपेक्षेप्रमाणे होत नसेल वा होणार नसेल तर ही बाब संबंधित समिती सभागृहाच्या नजरेस आणून त्या धोरणात वा योजनेत बदल करण्यासंबंधी शासनास सुचविण्याचे काम करते. समिती पद्धतीचा हा एक विशेष फायदा आहे.

विधिमंडळाप्रती शासनाची जबाबदारी ही मर्यादित स्वरूपाची आहे. संसदीय लोकशाहीमध्ये शासन हे प्रत्येक बाबतीत विधानमंडळाला सर्वतोपरी जबाबदार असते आणि शासनाच्या संपूर्ण प्रशासनावर विधीमंडळाचे नियंत्रण हा संसदीय लोकशाहीचा आत्मा आहे.

समितीचे अधिकार, कार्यकक्षा, प्रशासनावर ठेवावयाचे नियंत्रण, शासनाचे समितीप्रती व विधानमंडळाप्रती असलेले उत्तरदायित्व या सर्वांचा साकल्याने विचार केल्यास समितीचे अधिकार निश्चित व निर्विवादपणे सर्वश्रेष्ठ आहेत. परंतु, योजना राबविण्यापूर्वी वा एखादे धोरण आखण्यापूर्वी प्रशासन यंत्रणेने मंत्रिमंडळाला दिलेल्या सल्ल्याची तपासणी करणे निश्चितच समितीच्या कार्यकक्षेबाहेरील होईल. मात्र योजना अस्तित्वात आल्यानंतर व त्यावर आर्थिक तरतूद करण्यात आल्यानंतर समिती या प्रकरणी संपूर्णपणे व तपशीलवार छाननी करण्यास समर्थ ठरेल. ही योजना अगदी अनावश्यक आहे काय, त्यावर अपेक्षेपेक्षा जास्त खर्च करण्यात आला आहे काय ? योजनेची उद्दीष्टे साध्य झाली आहेत काय ? योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे किंवा कसे, इतकेच काय एखादी योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्यास ती बंद करण्यात यावी व त्याऐवजी दुसरी एखादी योजना आखण्यात यावी या मर्यादेपर्यंत सुद्धा समिती शिफारस करू शकते व त्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व माहिती समितीला मागविण्याचा अधिकार आहे.

समित्यांचे कामकाज अधिक परिणामकारक करण्यासाठी मा. सदस्यांनी समितीच्या कामात जास्तीत जास्त सहभाग घेणे जरुरीचे आहे. या अहवालात नमूद बाबीसंदर्भात समितीने एक एक प्रश्न हाती घेऊन त्या प्रत्येक प्रश्नावर समाधानकारकरितीने साक्षीपुरावा गोळा केला, तसेच मा. समिती सदस्यांनी आळीपाळीने प्रश्न विचारुन संबंधित अधिका-यांकडून माहिती मिळविण्याच्या विनिर्दिष्ट पद्धतीचे पालनसुद्धा भेटीच्या वेळी केलेले आहे. एका सदस्यांनी त्यांचा मुद्दा पूर्ण केल्यानंतरच दुस-या सदस्यांनी माहिती विचारण्याची पद्धत जोपासली आहे. या पद्धतीने समितीचे कामकाज सुव्यवस्थित पद्धतीने चालविण्याचा या समितीने प्रयत्न केलेला आहे.

समितीला तिच्याकडे सोपविण्यात आलेल्या विषयावरील मुद्दे तयार करून आणि त्यांच्या विनिर्दिष्ट क्रमाने त्यांचे परिक्षण करून विषयाशी संबंधित नियम किंवा कार्यपद्धतीमधील त्रुटी आणि उणिवा शोधून काढतेवेळी समितीचा दृष्टीकोन वस्तुनिष्ठ व विधायक होता. केलेल्या चुका सुधारण्यासाठी किंवा प्रशासकीय पद्धतीत सुधारणा घडविण्याच्यादृष्टीने समितीने अनेक बाबतीत सुधारणात्मक उपाय सुचविलेले आहेत, चुकांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी देखील समितीने उपाययोजना सुचविलेल्या आहेत. शासनाच्या प्रतिनिधीप्रती सदस्यांचे वर्तन संयमी आणि सौजन्यशील

ठेऊन कोणताही साक्षीदार काही वस्तुस्थिती लपवित असल्याबद्दल दोषी असल्याचे किंवा असहकार दर्शवित असल्याचे आढळून आल्यानंतर समितीने संबंधितांविरुद्ध कारवाईदेखील सुचविली आहे. समितीची बैठक बोलविणे आणि साक्षीदारांना साक्षीसाठी बोलविणे यासंबंधीच्या इतर किरकोळ मुद्दयांच्या बाबतीत साक्षीदारांना पुरेसा वेळ देऊन व नोटीस देऊन बोलविण्यात आलेले आहे. थोडक्यात, समिती पद्धती ही अत्यंत उपयुक्त व परिणामकारक असून संसदीय कामकाज प्रणालीमध्ये या पद्धतीचे स्थान व महत्व अनन्यसाधारण असेच आहे. संसदीय शासन प्रणाली अधिकाधिक वृद्धिंगत करण्याच्या दृष्टीने या महत्त्वपूर्ण अशा संसदीय समितीच्या कामकाजाचा स्तर उत्तरोत्तर उंचावत नेणे ही आपणा सर्वांची जबाबदारी आहे.

राज्यात समिती जिल्हा परिषदांना भेटी देत असताना समितीला अनेक चांगल्या संकल्पना व राबविलेल्या योजना आढळून आल्या आहेत. त्याचप्रमाणे काही बाबतीत प्रचंड अनियमितता व गैरव्यवहाराची प्रकरणेदेखील आढळून आली आहेत. समितीने चांगल्या बाबींना समर्थन देऊन संबंधितांना प्रोत्साहन दिले. तद्वतच काही अनियमितता किंवा गैरव्यवहाराच्या प्रकरणात समितीने कठोरपणे निर्णयदेखील घेतले आहेत. असे करीत असताना दोषारोपित व्यक्तीवर कारवाई करताना नैसर्गिक न्यायाची पायमल्ली होऊ नये अशा प्रकारच्या सूचनादेखील प्रशासनास केल्या आहेत. लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून न देणे अशी असंख्य प्रकरणे समितीला आढळून आली. अशा प्रकरणी समितीने कोणताही मुलाहिजा न ठेवता संबंधितांवर मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियमातील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाईदेखील प्रस्तावित केली आहे. या माध्यमातून शासनखाती दंडाची रक्कम जमा होत असताना संबंधित कर्मचा-यांना जरबदेखील बसविण्याचे काम समितीने केले आहे.

या समितीने ज्या ज्या जिल्ह्यांना भेटी दिल्या आहेत त्या त्या जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांना भेटी देऊन उक्त पंचायत समित्यांच्या प्रशासनिक अहवालावर सखोल चर्चा करून ज्या बाबतीत दोष आहेत त्या सुधारुन घेण्याबाबत त्यांना उपयुक्त सूचना केल्या आहेत. तसेच पंचायत समित्यांच्या क्षेत्रातील विविध कामांना भेटी देऊन त्याची पाहणी करणे, शालेय पोषण आहार, पुरक पोषण आहार, सार्वजनिक आरोग्य केंद्रे/उपकेंद्रे, पशु वैद्यकीय दवाखाने, रस्ते, जलसिंचनाची कामे, पाणी पुरवठ्याची कामे इत्यादींना भेटी देऊन त्याबाबतही चुकांचे निरसन करून काही चांगल्या बाबींचे समर्थन करून संबंधितांना प्रोत्साहितदेखील केले आहे. या अहवालात अशा अनेक बाबींचा उहापोह केला आहे.

सन २००८-२००९ व २०११-२०१२ या वर्षाच्या लेखा परिक्षा पुर्नविलोकन व सन २०१२-१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात सन २०१५-२०१६ साठी गठीत झालेल्या समितीने नागपूर जिल्हा परिषदेची सखोल तपासणी केली. समितीने नागपूर जिल्हा परिषदेस दिनांक २९, ३० सप्टेंबर व १ ऑक्टोबर, २०१५ रोजी भेट देऊन श्री. शिवाजी जोंधळे, मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली.

सन २०१७-२०१८ करिता गठीत झालेल्या समितीने नागपूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या तसेच साक्षीच्या वेळी संबंधित अधिका-यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्यांबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने दिनांक १० व ११ ऑक्टोबर, २०१७ रोजी जिल्हा परिषद, नागपूर संदर्भात मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या/प्रतिनिधींच्या साक्षी घेतल्या.

मंत्रालयीन विभागीय सचिवांचे साक्षीचे वेळी श्री. श्यामलाल गोयल, अपर मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, डॉ. प्रदिप व्यास, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, श्री. विजय कुमार, प्रधान सचिव, कृषी व पणन विभाग, श्री. असिमकुमार गुप्ता, सचिव, ग्रामविकास विभाग, श्रीमती विनिता वेद सिंगल, सचिव, महिला व बालविकास विभाग, श्री. चंद्रशेखर जोशी, सचिव (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग, श्री. विवेक नाईक, सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, ग्रामविकास विभाग, श्री. दिनेश वाघमारे, सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, श्री. विकास देशमुख, सचिव, पशुसंवर्धन विभाग, डॉ.सुवर्णा खरात, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री. र. प्र. आटे, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री. र. अ. नागरगोजे, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री. ना. भा. रिंगणे, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री. संजय बनकर, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.प्रकाश वळवी, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.गिरीश भालेराव, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री. सुग्रिव धपाटे, उप सचिव, कृषी विभाग, श्री. कमलाकर फंड, आयुक्त, आय. सी. डी. एस., मुंबई, श्री. अशोक करंजकर, एस. आर. डी. सी. श्री. संतोष कुमार, सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण तसेच श्री. प्रताप मोहिते, संचालक, स्थानिक लेखा निधी संचालनालय, नवी मुंबईयांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीच्या कामकाजात केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे. तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांनी साक्षीच्या वेळी समितीला माहिती पुरवून केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांचीही आभारी आहे.

समितीने कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्टामध्ये दिले आहे.

वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात समितीने भेटी दिलेल्या नागपूर जिल्हा परिषदेच्या कामकाजाची तपासणी करीत असताना समितीला आढळून आलेल्या काही मुद्यांबाबत समितीचे अभिप्राय व शिफारशी अहवालात देण्यात आल्या आहेत.

सन २०१७-२०१८ साठी नव्याने गठीत झालेल्या समितीने दिनांक २२ मार्च, २०१८ रोजीच्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेऊन संमत केला.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : २२ मार्च, २०१८.

**सुधीर पारवे**,
समिती प्रमुख,
पंचायती राज समिती.

**अनुक्रमणिका**


| अ.क्र. | प्रकरण क्रमांक | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| (१) | एक | सन २०१२-१३ मध्ये खरेदी केलेले कल्टीव्हेटर्स नादुरुस्त असून ते अद्याप त्याच अवस्थेत असल्याबाबत. | १ |
| (२) | दोन | नागपूर जिल्ह्यातील १२४ लघुसिंचन व २१४ माल गुजारी तलावांबाबत | १३ |
| (३) | तीन | समदाबाबने पाणीपुरवठा करण्याबाबत | १६ |
| (४) | चार | जिल्ह्यातील अंगणवाड्यांच्या इमारती संदर्भात शासनाकडे प्रस्ताव पाठविण्याबाबत | १९ |
| (५) | पाच | शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी असलेला धान्यसाठा सुस्थितीत नसल्याचे आढळून आल्याबाबत (पंचायत समिती, उमरेड). | २३ |
| (६) | सहा | राज्यातील शाळांमधील गुणवत्ता व पटसंख्या वाढविण्याबाबत | २८ |
| (७) | सात | समितीच्या नागपूर विधानमंडळ सदस्य व जिल्हा परिषद पदाधिका-यांसमवेत झालेल्या अनौपचारिक चर्चेदरम्यान उपस्थित झालेल्या मुद्यांबाबत | ३० |
| (८) | आठ | पंचायत समिती, कामठी अंतर्गत सन २०१२-१३ साठी केलेली तरतुद विलंबाने खर्च झालेली असल्याबाबत. | ४० |
| (९) | नऊ | विभाग प्रमुखांनी पंचायत समितीस द्यावयाच्या भेटी व मासिक सभेस उपस्थित राहण्याबाबत | ४४ |
| (१०) | दहा | येरखेडा, ता. कामठी पंचायत समिती अंतर्गत दलित वस्तीसुधार योजने अंतर्गत सिमेंट नाला/ बांधकामाच्या संदर्भात चुकीचे मोजमाप घेऊन काम पूर्ण असल्याचे दाखवून देयक काढल्याबाबत | ४६ |
| (११) | अकरा | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नागपूर यांच्या असमाधानकारक उत्तराबाबत | ४९ |
| (१२) | बारा | ग्रामसेवकांनी केलेल्या अपहाराच्या ३२ प्रलंबित प्रकरणाबाबत | ५० |
| (१३) | तेरा | ग्रामसेवक व शिक्षक मुख्यालयी राहत नसल्याबाबत | ५१ |


**परिशिष्ट**


शासनाचे आदेश व परिपत्रके आणि

समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त

प्रकरण एक

## जिल्हा परिषद, नागपूर (प्रशासन)

### सन २०१२-१३ मध्ये खरेदी केलेले कल्टीव्हेटर्स नादुरुस्त असून ते अद्याप त्याच अवस्थेत असल्याबाबत

समितीने दिनांक २९, ३० सप्टेंबर व ०१ ऑक्टोबर, २०१५ या कालावधीत नागपूर जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी सन २०१२-१३ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान समितीला सन २०१२-१३ मध्ये खरेदी केलेले कल्टीव्हेटर्स नादुरुस्त असून ते अद्याप त्याच अवस्थेत असल्याबाबतच्या नागपूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने अशी विचारणा केली की, चुकीच्या पद्धतीने कल्टीव्हेटर घेण्यास कोण जबाबदार आहेत, या प्रकरणी संबंधितांविरुद्ध कारवाई करून दंड केला आहे का, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, सन २०१२-१३ मध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून कल्टीव्हेटर खरेदी करण्यात आले होते. ते नादुरुस्त निघाल्यामुळे पुन्हा घेऊन जाण्याबाबत सन २०१३ पासून महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे वारंवार पत्रव्यवहार करण्यात आला. परंतु त्यांनी ते कल्टीव्हेटर नेले नाहीत किंवा दुरुस्तही करून दिले नाहीत. त्याचबरोबर कृषि विकास अधिकारी यांनी समितीस विदित केले की, सन २०१२-१३ मध्ये खरेदी करण्यात आली होती. त्यानुसार डिसेंबर, २०१२ मध्ये कल्टीव्हेटरचा पुरवठा करण्यात आला होता. ७ पंचायत समित्यांमध्ये मागणीनुसार कल्टीव्हेटरचा पुरवठा करण्यात आला होता. ३ फाळांचे कल्टीव्हेटर २४ इंचाच्या पट्टयात चालले पाहिजे, अशा पद्धतीने ते डिझाईन केले आहे. महाराष्ट्र कृषी उद्योग महामंडळाने अवजारांबाबत सी.आर.आय.डी.ए (क्रीडा), हैद्राबाद व सी.आय.ए.ई, भोपाळ या केंद्रीय संस्थांशी करार केला आहे, त्यानुसार ही खरेदी करण्यात आली. कल्टीव्हेटरच्या ३ फाळांपैकी बाजूचे २ फाळ जमिनीत घुसतात, परंतु मधला फाळ जमिनीमध्ये ८ इंचापर्यंत जात नसल्यामुळे जमिनीची योग्य प्रकारे मशागत होत नसल्यामुळे ते पडून आहेत. साहित्य प्राप्त झाल्यानंतर माहे मार्च, २०१३ मध्ये कृषी महाविद्यालयाच्या क्षेत्रात यासंबंधी तांत्रिक अडचण असल्याची बाब संबंधित संस्थेला प्रात्यक्षिक करून दाखविली. त्यावेळी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे अभियंता देखील उपस्थित होते. तांत्रिक बिघाड असलेले कल्टीव्हेटर दुरुस्त करून किंवा बदलून देण्याबाबत विभागीय व्यवस्थापक, महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ यांच्याकडे सातत्याने पत्रव्यवहार करण्यात आला आहे. परंतु अद्याप याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही.

समितीने पुढे विचारणा केली की, या संदर्भात पुरवठादार कोण आहेत, देयक कोणाच्या नावे काढण्यात आले, यावर कृषि विकास अधिकारी यांनी समितीस विदित केले की, वरुड इंडस्ट्रीज, पुणे पुरवठादार आहेत. देयक महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या नावे काढण्यात आले आहे. यावर समितीने विचारणा केली की, या संदर्भात वरुड इंडस्ट्रीजवर कारवाई करणे आवश्यक आहे. त्यांनी सदर कल्टीव्हेटर परत घेऊन जावे. तसेच त्यांच्याकडून दंड वसूल करणे आवश्यक आहे. इतक्या मोठ्या प्रमाणावर कल्टीव्हेटरची खरेदी करण्यापूर्वी प्रात्यक्षिक पाहून खरेदी करणे आवश्यक होते. यावर कृषि विकास अधिकारी यांनी समितीस विदित केले की, तांत्रिकदृष्ट्या कल्टीव्हेटर योग्य असल्याबाबत व ते आय.एस.आय मार्क असल्याबाबत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अभियंत्याचे प्रमाणपत्र देण्यात आले आहे. प्रात्यक्षिक पाहिल्यानंतर कल्टीव्हेटरची खरेदी करण्यात आली होती.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, प्रात्यक्षिकाच्या वेळी एक आणि प्रत्यक्षात पुरवठा करीत असताना दुस-याच मालाचा पुरवठा केल्याबद्दल त्यांच्याविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करता येऊ शकतो. सन २०१२-१३ पासून सदर कल्टीव्हेटर तसेच पडून आहेत. सदर कल्टीव्हेटर कसे स्वीकारले, या विषयाच्या संदर्भात जबाबदारी निश्चित करून पुरवठादाराला नुकसानीसाठी जबाबदार धरले पाहिजे. योग्य खरेदी करून वस्तू देणार म्हणून शासन जिल्हा परिषदेकडे पैसे देते, त्यामुळे या संदर्भातील जबाबदारी जिल्हा परिषदेची आहे. जिल्हा परिषदेने कल्टीव्हेटरचे प्रात्यक्षिक पाहिले पाहिजे होते. २ फाळे जमिनीत घुसतात, मात्र मधला फाळा जमिनीत घुसत नाही, असे असेल तर जिल्हा परिषदेने ते स्वीकारलेच कसे, सन २०१२-१३ मधील प्रत्येक तालुक्यातील गोदामामध्ये साहित्य पडून आहे. याप्रकरणी संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी. शासनाने ५० टक्के रक्कम दिली, मात्र साहित्य पडून आहे. शासनाला त्याचा उपयोग नाही. जिल्हा परिषदेने शासनाच्या पैशाचा किती अपव्यय केला ५० टक्के रक्कम पडून राहिली, ती खर्ची टाकता येत नाही, ५० टक्के रक्कम दिली ती परतही आणता येत नाहीत, दिलेले सामान वापरता येत नाही. आलेला माल तपासणी करून मागितला होता तोच आहे की नाही ही पाहिले पाहिजे. मागणी केल्यानुसार माल नसेल तर तो परत पाठविला पाहिजे. शेतक-याने सांगितल्यावर सर्व गोष्टी घडल्या हे लज्जास्पद आहे. शेतक-यांना या तांत्रिक गोष्टी समजत नाहीत म्हणून शासनाने कृषी विकास अधिका-यांना नेमले आहे. अपहार, अनियमितता घडते तेव्हा ग्रामसेवकांसारख्या कनिष्ठ स्तरावरील कर्मचा-यांवर, अधिका-यांवर कारवाई केली जाते. सन २००६ चा शासन निर्णय आहे, त्यामध्ये उल्लेख केला आहे की, केवळ ग्रामसेवक, सरपंच यांनाच नव्हे तर यांच्या व्यतिरिक्त जबाबदार असलेल्या विस्तार अधिकारी, कनिष्ठ अभियंता, शाखा अभियंता, कृषी अधिकारी, गट विकास अधिकारी तसेच विभाग प्रमुख यांनाही जबाबदार धरण्यात यावे, परंतु, याबाबत कोणतीही माहिती समितीस प्राप्त झाली नाही. त्यावेळी जे संबंधित अधिकारी कार्यरत असतील त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करून फौजदारी गुन्हे दाखल करावेत. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, सदर प्रकरणी चौकशी करण्यात येईल आणि

समितीला १ महिन्याच्या आत अहवाल सादर करण्यात येईल. प्रसंगी आवश्यकता भासल्यास, फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला देयक अदा केले आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अधिका-यांवर देखील कारवाई केली जाईल. यावर समितीने अशी विचारणा केली की, प्रमाणपत्र देणारे अधिकारी असतात, त्यांच्यावर वसुलीची कार्यवाही करावी, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, तांत्रिक प्रमाणपत्र कृषी विभागाचे अधिकारी, संचालक, कृषी व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ हे प्रमाणित (स्पेसिफाय) करून देतात. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस आश्वासित केले की, १ महिन्याच्या आत कार्यवाही करून अहवाल समितीला सादर करण्यात येईल.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, गैरव्यवहाराची प्रकरणे देखील आहेत. मुख्य कार्यकारी अधिकारी अशा प्रकरणांमध्ये कोणत्या प्रकारची कारवाई करणार, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस असे आश्वासित केले की, जिल्हा परिषदेची फसवणूक झाली आहे म्हणून त्वरित संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची कारवाई केली जाईल. समितीने पुढे अशी विचारणा केली की, कल्टिव्हेटरमध्ये दोष आहे असे कोणत्या तारखेला समजले, जिल्हा परिषदेला हे समजल्यावर संबंधितांबरोबर पत्रव्यवहार केला का, यावर कृषि विकास अधिकारी यांनी समितीस विदित केले की, संबंधितांस २२ पत्रे दिलेली आहेत. यावर समितीने असे निदेश दिले की, या संदर्भातील अहवाल तयार करावा आणि समितीला पाठवावा.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

सन २०१२-१३ मध्ये खरेदी केलेले कल्टीव्हेटर्स नादुरुस्त असून ते अद्याप त्याच अवस्थेत असल्याप्रकरणी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे अधिकारी तसेच सन २००६ च्या शासन निर्णयानुसार वरील दोषी अधिका-यांवर केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला देण्यात यावी.

**समितीस जिल्हा परिषदेकडून उपरोक्त मुद्यांची खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.**

केंद्र पुरस्कृत गळीत धान्य व कडधान्य विकास कार्यक्रमांतर्गत कल्टीव्हेटर खरेदीबाबत खालीलप्रमाणे वस्तुस्थिती अहवाल.

केंद्र पुरस्कृत आयसोपाम योजने अंतर्गत गळीत धान्य विकास कार्यक्रमांतर्गत सन २०१२-१३ मध्ये ४९२ कल्टीव्हेटरचा पुरवठा ७ पंचायत समित्यांना करण्यात आला होता.

(१) कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांनी पत्र क्र. ११८३/दिनांक ९ एप्रिल २०१३ अन्वये पुरवठा केलेल्या कल्टीव्हेटर मध्ये तांत्रिक दोष असल्याचे एम.ए.आय.डी.सी ला कळविले होते व सदर साहित्य दुरुस्त करून अथवा बदलून देण्याबाबत कळविले होते.

(२) त्यानंतर दिनांक ६ ऑगस्ट २०१३ रोजी कृषी विकास अधिकारी यांनी कृषी महाविद्यालय, नागपूर येथील प्रक्षेत्रावर सदरच्या औजाराची चाचणी घेतली. त्या समयी कृषी विकास अधिकारी यांचे व्यतिरिक्त श्री.जे.डी.कौटकर, कृषी अधिकारी, पंचायत समिती, काटोल, श्री.गोरटे, कृषी अधिकारी, पंचायत समिती, नरखेड, श्री.राठोड, विस्तार अधिकारी (कृषी), पंचायत समिती, नागपूर, श्री.सी.ए.वानखेडे, कृषी अधिकारी व एम.ए.आय.डी.सी.मर्यादित नागपूरचे कृषी अभियंता श्री.वटकर उपस्थित होते. तसेच कृषी महाविद्यालयातील डॉ.श्री.ए.व्ही.कुबडे, सहायक प्राध्यापक, कृषी अभियांत्रिकी विभाग, डॉ.श्री.आर.एम.देशपांडे, सहायक प्राध्यापक, कृषी वित्त विभाग व श्री.पपलु, कामगार/मजूर कृषी अभियांत्रिकी विभाग हे उपस्थित होते.

(३) त्यावेळी प्रत्येक ८ इंच अंतरावर असलेल्या ३ फाळापैकी मधल्या फाळाची लांबी कमी असल्याने फक्त दोन्ही बाजुचे ८-८ इंच असे एकूण १६ इंच मशागत होत होती व मधील ८ इंचामध्ये फाळा जमिनीला न टेकल्यामुळे मशागत होत नव्हती असे निदर्शनास आले.

(४) सदरची तांत्रिक दोष निवारण्यासाठी जिल्हा परिषद स्तरावरुन-१२, शेतकरी स्तरावरुन-१ व पंचायत समिती स्तरावरुन-९ असे एकूण-२२ पत्राद्वारे यासंदर्भाने महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मर्यादित नागपूर यांना कळविण्यात आलेले आहे.

(५) महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मर्यादित नागपूर यांनी सुद्धा दिनांक २२ सप्टेंबर २०१५ रोजी पत्र क्र. १६६६ अन्वये सदरची औजारे १ महिन्याचे कालावधीत दुरुस्त करून देण्याचे जिल्हा परिषद, नागपूरला कळविले आहे. तसेच विभागीय कृषी सहसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांनी महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मर्या. नागपूर दिनांक १ ऑक्टोबर २०१५ रोजी त्यांचे कार्यालयाचे पत्र क्र. ६६४५ अन्वये औजाराचे तांत्रिक दोष निवारण्यासाठी कळविले आहे. आयुक्त, कृषी यांनी दिनांक ११ सप्टेंबर २०१५ रोजी विभागीय व्यवस्थापक, महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मर्यादित, नागपूर यांचेशी समक्ष बोलून त्वरीत कार्यवाही करण्याबाबत कळविलेले होते.

तरी वरील नमुद संपूर्ण पत्र व्यवहाराचा अभ्यासपूर्व विचार करता महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ मर्यादित, नागपूर यंत्रणेकडून औजाराचा तांत्रिक दोष निवारण करण्यासाठी न केलेले प्रयत्न, त्यामुळे पुरवठा होऊनही साहित्य शिल्लक राहणे व शेतकरी लाभापासून वंचित राहणे या प्रकारासाठी सर्वस्वी महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मर्यादित, नागपूरची यंत्रणा, औजार निर्मिती व पुरवठा क्षेत्राशी संबंधित असल्याने जबाबदार आहे.

पंचायत राज समितीने जिल्हा परिषद व तालुका स्तरावर आढावा घेतला. त्यानुसार पंचायत समितीला कल्टीव्हेटर शिल्लक असल्याचे आढळून आहे. परंतु कल्टीव्हेटर तांत्रिक दृष्ट्या सदोष असल्याने शिल्लक होते. महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मर्यादित, नागपूर यांना कारणे दाखवा नोटीस बजावून तात्काळ असलेला दोष दुरुस्त करून देण्यात यावे किंवा बदलवून देण्यात यावे असे कळविले. त्यानुसार त्यांनी कल्टीव्हेटर शिल्लक असलेल्या पंचायत समितीत जाऊन दिनांक १४ ऑक्टोबर २०१५ ते १५ ऑक्टोबर २०१५ या कालावधीत दुरुस्त करून दिले. रब्बी हंगामाचे मशागतीचे कार्य सुरू असल्याने व सदरचे औजार उपयुक्त असल्याने दोष निवारण होताच सातही (०७) पंचायत समित्यामधील एकूण ४१७ कल्टीव्हेटर एक आठवडयाचे कालावधीत शेतक-यांना उचल करून त्याचा वापर सुरू केला आहे. त्याबाबत ७ ही पंचायत समितीचे गट विकास अधिकारी यांचे पत्र सोबत जोडले आहे. तसेच लाभार्थी हिश्श्याची रक्कम पंचायत समिती स्तरावर जमा असून त्यामधुन रक्कम रु.६९,७१५/- वसूल करण्यात आली आहे.

वस्तुस्थिती अहवालावरुन असे दिसून येते की, कृषी विभाग जिल्हा परिषद, नागपूर यांनी वारंवार एम.ए.आय.डी.सी. या शासकीय अंगिकृत पुरवठादार संस्थेस औजारातील दोष निवारणाबाबत पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. तसेच दोष निवारण होताच संपूर्ण औजाराचे शेतक-यांना वाटपही झालेले आहे. सदरची तांत्रिक दोष निवारण्यासाठी जिल्हा परिषद स्तरावरुन १२, शेतकरी स्तरावरुन १ व पंचायत समिती स्तरावरुन ९ असे एकूण २२ पत्रांद्वारे महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मर्यादित, नागपुर यांना कळविण्यात आलेले आहे. शेतक-यांना संपूर्ण ४९२ कल्टीव्हेटरचे वाटप करण्यात आलेले असून शेतकरी त्याचा उपयोग घेत आहेत.

दीर्घ कालावधीपासून दुरुस्तीविना पडलेले सदोष कल्टीव्हेटरला योग्य उंचीचा नवीन फाळ एम.ए.आय.डी.सी. नागपूरचे कारागिरामार्फत दुरुस्त होताच त्याची उपयुक्तता असल्याने अल्प कालावधीत शेतक-याद्वारे उचल होऊन वापर झालेले आहे. त्यामुळे पुरवठा आदेश देणारे यंत्रणेचा यात दोष नसून सदोष साहित्य पुरवठा करून सातत्याने त्याचे अनुषंगाने यंत्रणेद्वारे झालेल्या पत्रव्यवहाराकडे दुर्लक्ष करणारे पुरवठादार यंत्रणेचे संबंधित अधिकारी जबाबदार आहे.

तरी एम.ए.आय.डी.सी. मर्यादित, नागपूर संबंधित अधिका-यांवर योग्य ती कार्यवाही करण्याबाबत या कार्यालयाचे पत्र क्र.१९०/अ. ३ फेब्रुवारी २०१६ अन्वये महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मर्यादित, मुंबई-२५ यांना कारवाई प्रस्तावित केलेली आहे.

सदर प्रकरणी उप सचिव, महाराष्ट्र शासन, कृषी व पदुम विभागाचे पत्र क्र.पंरास-४११६/प्र.क्र.५९/४-अे दिनांक १० एप्रिल २०१७ अन्वये प्रकरणी सखोल चौकशी करून कार्यवाही करण्याबाबत निर्देशित केलेले होते.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांचे कार्यालयीन आदेश क्र.जिपना/ कृषी/कल्टी/परासं/१२ जुलै २०१७, दिनांक २० एप्रिल २०१४ अन्वये प्रकरणाची चौकशी करण्याकरिता त्रिस्तरीय समिती नेमण्यात आल्या. समितीने प्रकरणाची चौकशी करून अहवाल सादर केलेला आहे. सदरहू अहवाल आयुक्त (कृषी), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना कार्यालयीन पत्र क्र.जिपना/कृषी/कल्टी/ परासं/१२२१/२०१७, दिनांक २१ एप्रिल २०१४ अन्वये सादर करण्यात आलेला आहे. प्रकरणी कृषी अधिकारी, पंचायत समिती, नागपूर, हिंगणा, कळमेश्वर, सावनेर, नरखेड, काटोल व भिवापूर यांना सक्त ताकिद देण्यात आलेली आहे.

उक्त प्रमाणे सादर केलेले अहवाल विसंगत असल्यास प्रधान सचिव (कृषी) यांनी निर्देशित केलेले आहे.

सदर प्रकरणी जिल्हा परिषद, नागपूर स्तरावरील नेमण्यात आलेल्या त्रिस्तरीय समितीने सादर केलेल्या अहवालातील निष्कर्ष उपलब्ध दस्तावेज, घेण्यात आलेली साक्ष यावरुन सादर करण्यात आलेला चौकशी अहवाल स्विकृत करण्याची विनंती कार्यालयीन पत्र क्र.जिपना/कृषी/ कल्टी/परासं/१२२१/२०१७, दिनांक २५ सप्टेंबर २०१७ अन्वये उप सचिव, महाराष्ट्र शासन, कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई यांना करण्यात आलेली आहे.

**समितीस कृषी व पदुम (कृषी) विभागाकडून उपरोक्त मुद्दांची खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.**

महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाने सादर केलेल्या माहिती नुसार, महामंडळाने स्पेसिफिकेशननुसार कल्टीव्हेटरचा पुरवठा केलेला आहे. कल्टीव्हेटर योग्य दर्जाचे असल्याने जिल्हापरिषदेने मालाचा पुरवठा सुद्धा घेतलेला आहे. मात्र, जिल्हा परिषदेने असे कळविले होते की, कल्टीव्हेटरच्या मधल्या फाळाची लांबी कमी असल्याची, शेतक-यांची तोंडी तक्रार असल्याने शेतक-यांनी कल्टीव्हेटर्स घेतलेले नाहीत.

एम.ए.आय.डी.सी व जिल्हा परिषद यांनी दिलेल्या अभिप्रायाची शहानिशा करण्यासाठी, जिल्हा परिषद, नागपूर यांच्याकडून लाभार्थ्यांची यादी उपलब्ध करून घेऊन काही डिझाईनचे मशिन व काही दुरुस्त केलेले मशिनचे निरिक्षण, जिल्हा परिषद, नागपूरचे प्रतिनिधी, विद्यापीठाचे कृषी उद्योग विकास महामंडळाचे प्रतिनिधी यांचे समक्ष करून अहवाल सादर करण्याबाबत या विभागाच्या दिनांक २० जानेवारी, २०१७ च्या पत्रान्वये विभागीय कृषी सह संचालक, नागपूर यांना कळविण्यात आले होते, त्यानुसार (१) श्री. विजय घावटे, विभागीय कृषी सह संचालक, नागपूर विभाग, नागपूर

(२) डॉ. अशोक मस्के, विभाग प्रमुख, कृषी अभियांत्रिकी विभाग, कृषी महाविद्यालय, नागपूर

(३) श्री. दिपक के. बांदे, कृषि अभियंता, महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ, नागपूर (४) श्री. सुबोध मोहरील, कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर व (५) श्री. अजय राऊत, विभागीय कृषी सह संचालक कार्यालय, नागपूर अशी समिती गठीत करून याप्रकरणी तपासणी करण्यात आला.

सदर समितीने दिनांक २ मार्च, २०१७ रोजी अहवाल सादर केलेला आहे. समितीच्या अहवालानुसार एम.ए.आय.डी.सी. ने पुरविलेले कल्टिव्हेटर्स हे उचित दर्जाचे होते, सदर साहित्य प्रथमच नागपूर जिल्ह्यामध्ये पुरविण्यात आले होते. कल्टिव्हेटर्स प्रथम पुरविण्यात येत असल्याने शेतक-यांना या अवजाराचा पुरवठा जोडणी करून देऊन त्यांच्या वापराबाबतचे प्रशिक्षण देणे आवश्यक होते तथापि, पुरवठादार संस्थेने शेतक-यांना सदर कल्टिव्हेटर्सची जोडणी करून न देता सुटे भाग पुरविण्यात आले. शेतक-यांना जोडणी नीट करता आली नाही आणि त्यामुळे कल्टिव्हेटर्सचा वापर व्यवस्थित होऊ शकला नाही.

मात्र दिनांक ६ ऑगस्ट, २०१३ रोजी सदर अवजारांची चाचणी कृषी महाविद्यालय, नागपूर प्रक्षेत्रावर एम.ए.आय.डी.सी. चे कृषी अभियंता, कृषी महाविद्यालायातील सहायक प्राध्यापक यांचे समक्ष जिल्हा कृषी विकास अधिकारी, नागपूर यांनी घेतली. सदर चाचणी मध्ये सुद्धा कल्टिव्हेटर्स दोषपुर्ण असल्याचा निष्कर्ष काढण्यात आला होता. विभागीय कृषी सह संचालक, नागपूर समितीने केलेल्या तपासणीप्रमाणे जर त्याच वेळेस कल्टिव्हेटर्सची व्यवस्थित तपासणी करण्यात आली असती व कल्टिव्हेटर्सचा पुरवठा जोडणी करून देऊन शेतक-यांना वापराबाबतचे प्रशिक्षण देण्यात आले असते तर ४१७ कल्टिव्हेटर्स माहे जानेवारी, २०१३ ते ऑक्टोबर, २०१५ म्हणजे सुमारे पावणे तीन वर्ष पडून राहिले नसते. सदर अवजारांचा उपयोग शेतक-यांना करता आला असता ही बाब विचारात घेता या प्रकरणाकडे जिल्हा परिषदेचे अधिकारी, महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाचे अधिकारी यांनी याबाबत गांभीर्याने कोणतीही तांत्रिक तपासणी करून त्याबाबतचे योग्य ते मार्गदर्शन शेतक-यांना करण्याची काळजी घेतली नाही. एकंदरीत प्रकरण अत्यंत निष्काळजीपणे हाताळण्यात आलेले दिसून येते, ही वस्तुस्थिती व्यवस्थापकीय व संचालक, महाराष्ट्र राज्य कृषी उद्योग विकास महामंडळ, मुंबई व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांना कळवून संबंधित अधिका-यांविरुद्ध कठोर कार्यवाही करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास सादर करण्याबाबत दिनांक १० एप्रिल, २०१७ च्या पत्रान्वये कळविण्यात आले होते.

त्यानुसार, श्री.सुबोध मोहरील, कृषी विकास अधिकारी जिल्हा परिषद, नागपूर यांच्या विरुद्ध महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील नियम ५ (१) नुसार कार्यवाही करण्याचा प्रस्तावाच्या पत्रावर दिनांक २१ एप्रिल २०१७ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांनी स्वाक्षरी केल्याचे दिसून येते. तथापि, सदरचे पत्र जिल्हा परिषद कार्यालयाकडून प्रत्यक्षात निर्गमित झाल्याचे दिसून येत नाही. पत्र न पाठविण्यासाठी जबाबदार असणा-या सर्व संबंधितांची चौकशी करून त्यांच्याविरुद्ध केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास सादर करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांना कळविण्यात आले आहे.

श्री. मोहरील यांच्या आधी कार्यरत असलेले तत्कालीन कृषि विकास अधिकारी, श्री.व्ही.ओ.कोलते हे सुद्धा विहित कार्यपद्धतीचा अवलंब न करण्यासाठी जबाबदार आहेत. त्यांना सेवानिवृत्त होऊन केवळ दोन वर्षाचा कालावधी झाला असून त्यांच्याविरुद्ध सुद्धा कार्यवाही प्रस्तावित करता आली असती. तथापि, ते सेवानिवृत्त झाल्याने त्यांच्या विरुद्ध कोणतीही कार्यवाही प्रस्तावित नाही असा अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिला आहे. याबाबत सुद्धा, त्यांच्याकडून खुलासा मागविण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्य कृषी उद्योग विकास महामंडळाने विभागीय कार्यालय, नागपूर येथील तत्कालीन अधिका-यांकडून तसेच गुणवत्ता नियंत्रणाची जबाबदारी असलेले अभियंता यांच्याकडून खुलासा मागविला होता. सदर खुलासा असमाधानकारक वाटल्याने खालील अधिका-यांविरुद्ध विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे.

(१) महेंद्र व्हटकर, सहायक कृषी अधिकारी व (२) श्री. अजय काळे, उप व्यवस्थापक (कृती अधिकारी)

**चौकशी अहवाल**

**केंद्रपुरस्कृत गळीत धान्य व कडधान्य विकास कार्यक्रमांतर्गत कल्टीव्हेटर खरेदीबाबत.**

**स्पष्टीकरण समितीचा अभिप्राय :- आपण या संदर्भातील पत्रव्यवहार करुनही दाद दिली नसेल तर संबधितांवर जरुर कारवाई केली पाहिजे.**

**इतिवृत्तानुसार अभिप्राय खालील प्रमाणे**

पंचायत राज सन २०१२-२०१३ वार्षिक प्रशासन अहवालामध्ये घेण्यात आलेल्या आक्षेपाचे अनुषंगाने खालील प्रमाणे अभिप्राय नोंदविण्यात येत आहे.

(१) पंचायत राज सन २०१२-२०१३ वार्षिक प्रशासन अहवालामध्ये पत्र व्यवहार करुनही दाद दिली नसेल तर संबधितांवर जरुर कारवाई केली पाहिजे. सदर विषय विभागीय सचिवांचे साक्षीसाठी घेण्यात यावा. संबधित एजन्सीला विचारणा करण्यात येईल व उद्योग विभाग यांच्या सचिवांना साक्षीसाठी बोलविण्यात येईल असे निर्देश आहे. त्यानुसार संबधितांना पत्र व्यवहार करण्यात आलेला आहे.

**वस्तुस्थिती अहवाल**

**केंद्र पुरस्कृत गळीत धान्य व कडधान्य विकास कार्यक्रमांतर्गत कल्टीव्हेटर खरेदीबाबत. खालील प्रमाणे वस्तुस्थिती अहवाल सादर करण्यात येत आहे.**

(१) केंद्र पुरस्कृत आयसोपॉम योजने अंतर्गत गळीत धान्य विकास कार्यक्रमाअंतर्गत सन २०१२-१३ मध्ये ४९२ कल्टीव्हेटरचा पुरवठा ७ पंचायत समित्यांना करण्यात आला होता.

(२) कृषि विकास अधिकारी, जि.प.नागपूर यांनी पत्र क्र. ११८३/दि.९.४.२०१३ अन्वये पुरवठा केलेल्या कल्टीव्हेटरमध्ये तांत्रिक दोष असल्याचे कळविले होते व सदर साहित्य दुरुस्त करून किंवा बदलवुन देण्याबाबत कळविले होते.

(३) त्यानंतर दि.६/८/२०१३ रोजी कृषि विकास अधिकारी यांनी कृषि महाविद्यालय, नागपूर येथील प्रक्षेत्रावर सदरच्या औजाराची चाचणी घेतली. त्यासमयी कृषि विकास अधिकारी यांचे व्यतिरिक्त श्री.जे.डी.कौटकर, कृषि अधिकारी, पंचायत समिती, काटोल, श्री.गोरटे, कृषि अधिकारी, पंचायत समिती, नरखेड, श्री.राठोड, विस्तार अधिकारी (कृषि), पंचायत समिती, नागपूर, श्री.सी.ए.वानखेडे, कृषि अधिकारी व महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ मर्या. नागपूर कार्यालयातील कृषि अभियंता, श्री.वटकर उपस्थित होते. तसेच कृषि महाविद्यालयातील डॉ.श्री.ए.व्ही.कुबडे, सहायक प्राध्यापक, कृषि अभियांत्रिकी विभाग, डॉ.श्री.आर.एम.देशपांडे, सहायक प्राध्यापक, कृषि विद्या विभाग व श्री.पपलु, कामगार/मजुर, कृषि अभियांत्रिकी विभाग हे उपस्थित होते.

(४) त्यावेळी प्रत्येकी ८ इंच अंतरावर असलेल्या ३ फाळांपैकी मधल्या फाळाची लांबी कमी असल्याने फक्त दोन्ही बाजुचे ८-८ इंच असे एकूण १६ इंच मशागत होत होती व मधील ८ इंचामध्ये फाळ जमिनीला न टेकल्यामुळे मशागत होत नव्हती असे निर्दशनास आले.

(५) सदरची तांत्रिक दोष निवारण्यासाठी जि.प.स्तरावरुन-१२, शेतकरी स्तरावरुन-१ व पंचायत समिती स्तरावरुन -९ असे एकूण -२२ पत्रे या संदर्भाने महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ मर्या. नागपूर यांना कळविण्यात आलेले आहे.

(६) महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ मर्या. नागपूर यांनी सुद्धा दि.२२/९/२०१५ रोजी पत्र क्र.१६६६ अन्वये सदरची औजारे १ महिन्याचे कालावधीत दुरुस्त करून देण्याचे कळविले आहे. तसेच विभागीय कृषि सहसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांनी महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ मर्या. नागपूर दिनांक १/१०/२०१५ रोजी त्यांचे कार्यालयाचे पत्र क्र. ६६४५ अन्वये औजाराचे तांत्रिक दोष निवारण्याबाबत कळविले आहे. आयुक्त कृषि यांनी दिनांक ११/९/२०१५ रोजी महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ मर्या. नागपूर समक्ष बोलुन त्वरीत कार्यवाही करण्याचे कळविलेले होते.

तरी वरील नमुद संपूर्ण पत्रव्यवहाराचा अभ्यासपूर्व विचार करता महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ मर्या. नागपूर यंत्रणेकडुन औजाराचा तांत्रिक दोष निवारण करण्यासाठी न केलेले प्रयत्न, त्यामुळे पुरवठा होऊनही साहित्य शिल्लक राहणे व शेतकरी लाभापासून वंचित राहणे या प्रकारासाठी सर्वस्वी एम.ए.आय.डी.सी. यंत्रणा, औजार निर्मिती व पुरवठा क्षेत्राशी संबंधीत असल्याने जबाबदार आहे.

पंचायत राज समितीने जिल्हा परिषद व तालुका स्तरावर आढावा घेतला. त्यानुसार पंचायत समितीला कल्टीव्हेटर शिल्लक असल्याचे आढळून आले. परंतु कल्टीव्हेटर तांत्रिकदृष्टया सदोष असल्याने शिल्लक होते. महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ मर्या. नागपूर यांना कारणे दाखवा नोटीस बजावुन तात्काळ असलेला दोष दुरुस्त करून देण्यात यावे किंवा बदलवुन देण्यात यावे असे कळविले. त्यानुसार त्यांनी कल्टीव्हेटर शिल्लक असलेल्या पंचायत समितीत जाऊन त्यांनी दिनांक १४/१०/२०१५ ते १५/१०/२०१५ या कालावधीत दुरुस्त करून दिले व सध्या संपूर्ण वाटप सुद्धा झालेले आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

समितीने नागपूर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्दयावर अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक १० ऑक्टोबर, २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, सन २०१२-१३ मध्ये खरेदी केलेले कल्टीव्हेटर्स नादुरुस्त असून ते अद्यापपर्यंत त्याच स्थितीत असून महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या संबंधित दोषी अधिका-यांविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली आहे. कल्टीव्हेटर्स हा विषय शेतक-यांशी निगडित असून विभागाने कारवाई केली असली तरी ती करण्यास फार दिरंगाई झाली आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने पुरविलेले कल्टीव्हेटर्स उचित दर्जाचे होते असे जिल्हा परिषदेने नमूद केलेले आहे. तथापि, शेतक-यांना त्याचा उपयोग झालेला नाही. जवळ जवळ ४१७ कल्टीव्हेटर्स ३ वर्षे पडून राहिलेत, हा अत्यंत महत्वाचा असा विषय आहे. या प्रकरणी कारवाई केली असली तरी शेतक-यांवर फार मोठा अन्याय झालेला आहे. तसेच विहित कालावधीत चाचणी देखील केलेली नाही. यावर सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीस विदित केले की, हा फार गंभीर विषय आहे, अशा घटना पुन्हा घडणार नाही यासंबंधी विभागाने काळजी घेतली आहे. आता विभाग डीबीटी करणार आहे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, असे जरी असले तरी शेतक-यांवर अवकृपा झाली आहे. विभाग शेतक-यांना वेळीच लाभ देऊ शकलेला नाही. शेतक-यांचे जीवनमान उंचविण्यासाठी शासन कोटी रुपये निधी खर्च करीत असते, असे असताना देखील शेतक-यांना शासनाकडून सहकार्य मिळत नाही. ज्यांनी या प्रकरणात अनियमितता केली त्यांच्याविरुद्ध तात्काळ कारवाई करायला पाहिजे होती ती केलेली नाही. संबंधितांविरुद्ध कारवाई करण्यास विलंब झालेला आहे. तेव्हा संबंधितांवर विभागाने कारवाई का केलेली नाही, महामंडळ आणि कंत्राटदार यांचे हितसंबंध असल्याचे निदर्शनास आलेले आहे. तीन वर्ष ४१७ कल्टीव्हेटर्स पडून होते. त्याची किंमत काय होती, संबंधित कंत्राटदार कोण होते, संबंधित जबाबदार अधिकारी/कर्मचारी कोण होते, त्यांच्यावर नेमकी काय कारवाई करण्यात आली आहे, श्री.व्हटकर, सहायक कृषी अभियंता, श्री.अजय काळे, उप व्यवस्थापक या दोघांविरुद्ध विभागीय चौकशीची शिफारस करण्यात आली आहे. ही कल्टीव्हेटर्स जिल्हा परिषदेने खरेदी केलेली आहेत. विषय समितीसमोर हे प्रकरण ठेवण्यात आले होते का, शेतक-यांना प्रात्याक्षिक देण्यात आले होते काय, कल्टीव्हेटरचे सॅम्पल स्टोअर मध्ये होते काय, तपासणीसाठी माल पाठविला होता काय, तपासणी अहवाल येण्याच्या अगोदरच लाभार्थीना लाभ देण्यात आला आहे काय, या चौकशीतून जिल्हा कृषी अधिका-यांना वगळण्यात आले असून त्यांच्यावर कोणताही आरोप लावण्यात आलेला नाही, ज्यांनी कल्टीव्हेटर्स खरेदी केली आहेत त्यांनाच चौकशीतून वगळण्यात आले आहे. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, कृषी अधिका-यांविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित केली आहे.

समितीने पुढे विचारणा केली की, विभागाने संबंधितांविरुद्ध कठोर कारवाई का केली नाही, समितीने विचारणा केल्याप्रमाणे विभागाने कारवाई केली पाहिजे. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, समितीने दोन प्रश्न विचारले आहेत एक म्हणजे तपासणी अहवाल कोणी मान्य केला आहे, त्यावेळी तांत्रिक अधिकारी कोण होते, तसेच ज्यावेळी पहिला माल आला त्यावेळी सॅम्पल स्पेसिफिकेशन विषय समितीपुढे ठेवण्यात आले होते काय, ४१७ कल्टीव्हेटर्स खरेदी करण्यात आले होते. त्याचे स्पेसिफिकेशन मॉडेल अगोदर सादर केले होते काय, त्याचप्रमाणे ४१७ कल्टीव्हेटर्सचा पुरवठा करण्यात आला त्यावेळेस या प्रकरणात असेंब्लींगच्या वेळी तांत्रिक अडचण आली होती काय.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, कल्टीव्हेटर्सची किंमत काय होती असा पहिला प्रश्न विचारला आहे. विषय समितीपुढे खरेदीचा प्रस्ताव कोणत्या तारखेस मंजुर करून घेतला, तसेच विषय समितीपुढे एक विशिष्ट प्रकारचा ठराविक नमुना ठेवण्यात आला होता का, कल्टीव्हेटरचे प्रात्यक्षिक देण्यात आले होते काय, यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, कल्टीव्हेटर्सची किंमत रुपये २१३०.०० होती. त्यातील ५० टक्के हिस्सा लाभार्थीचा, तर ५० टक्के हिस्सा विभागाचा होता. समितीने पुढे अशी विचारणा केली की, सदर योजना ही केंद्र शासनाची होती तर या योजनेसाठी आलेला निधी जिल्हा परिषदेच्या कोणत्या खात्यामध्ये जमा झाला होता. निधी जमा झाल्यानंतर तो कशा प्रकारे खर्च करण्यात आला आहे. ७३ व्या घटना दुरुस्तीनुसार स्वायत्त संस्थांना/जिल्हापरिषदांना अधिकार देण्यात आलेले आहेत. सदरहू केंद्र सरकार किंवा राज्य सरकारची योजना आहे म्हणून खाते प्रमुखांनी परस्पर पैसे कपात करण्यात यावेत असे जिल्हापरिषदेच्या कोणत्या कायद्यामध्ये आहे. समितीने जे मुद्दे उपस्थित केले ते चौकशी अहवालात कुठेही आलेले नाहीत. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, केंद्र सरकारची योजना असेल आणि त्यामध्ये जिल्हापरिषदेचा हिस्सा नसेल तर कोणती पद्धत पाठपुरावा करून कार्यवाही करावी लागते. तसेच काही वेळा वेगवेगळया फंडातून पैसे येतात. अशावेळी त्या फंड ऑथॉरिटीने मंजुरी दिली असेल तर ती प्रक्रिया राबविताना कोणत्या प्रकारे लाभ द्यायला पाहिजे किंवा कसे याची माहिती देण्यात येईल.

समितीने असे मत व्यक्त केले की, पहिल्यांदाच ही योजना राबवित आहोत असे नाही. राज्यात विविध प्रकारच्या योजना राबविल्या जात आहेत. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, ही नवीन योजना आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, सर्वसाधारणपणे राबविण्यात येणा-या योजनांची नियमावली सारखीच असते. प्रशासकीय मान्यता कोणी दिली, या समितीच्या प्रश्नावर सचिव,

ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, पंचायत समितीमध्ये ठराव झाला की गट विकास अधिकारी यांच्या पातळीवर निर्णय झाला याची माहिती घेतल्याशिवाय समितीला काही सांगू शकत नाही. या ठिकाणी कल्टीव्हेटर्सचा प्रश्न उपस्थित झाला होता. कल्टीव्हेटर्स नादुरुस्त असल्यामुळे त्याचे वाटप झाले नाही. कल्टीव्हेटर्स तीन वर्षापासून पडून आहेत ही बाब विभागाच्या लक्षात आल्यानंतर कल्टीव्हेटर्स दुरुस्त करून त्याचे वाटप केले. लाभार्थ्यांची निवड कोणी केली हा मुद्दा उपस्थित झाला नव्हता म्हणून त्या संदर्भातील माहिती घेतली नाही. लाभार्थी निवडीचा ठराव पंचायत समितीमध्ये झाला होता की गट विकास अधिकारी यांच्या पातळीवर झाला याची माहिती आता उपलब्ध नाही. लाभार्थ्यांची निवड कोणी व कोणत्या पद्धतीने केली याची माहिती समितीला लेखी कळविण्यात येईल.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, जर ते यंत्र नादुरुस्त होते तर ते स्वीकारले कसे, ज्याने ही डिलेव्हरी घेतली त्यांनी या गोष्टी पाहिल्या नाहीत काय, कोणत्या कंपनीने हा माल पुरविला होता, विषय समितीची मान्यता घेतली होती काय, यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून माल घेण्यात आला. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ ही शासनाची एजन्सी आहे. ८ ते १० लाख रुपयांची खरेदी होती. या कार्यवाहीसंबंधी लेखापरिक्षणामध्ये कोणताही आक्षेप आलेला नाही. कल्टीव्हेटर्सचे वाटप का झाले नाही, ते नादुरुस्त होते काय, दोषींवर काय कारवाई केली, मंजुरीपेक्षा जास्त किंमत दिली अशाप्रकारचे लेखापरिक्षणाचे आक्षेप आलेले नाहीत. कल्टीव्हेटर्सच्या सुटे भागाचे इन्स्पेक्शन झाले होते. ते क्वॉलिटीप्रमाणे होते. कल्टीव्हेटर्स नटबोल्टने असेंबल करावयाचे होते. त्यामध्ये काही तांत्रिक अडचणी किंवा तक्रारी आल्या काय हे शोधण्यास सांगितले होते. फक्त एकच तक्रार आली होती. हा माल शेवटच्या लाभार्थ्यापर्यंत पोहोचला पाहिजे याकडे लक्ष दिले. पात्र लाभार्थ्यांपर्यंत माल पोहोचलेला आहे. तसेच या प्रकरणात जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर कारवाई प्रस्तावित केलेली आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून माल विकत घेतला. प्रशासकीय मान्यता कोणी दिली व इतर बाबी संदर्भातील माहिती समितीला नंतर सादर करण्यात येईल.

यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, ४१७ कल्टीव्हेटर्स एकाच वेळी प्राप्त झाले की टप्याटप्याने प्राप्त झाले, यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, दिनांक १० ते १८ डिसेंबर, २०१२ या कालावधीत कल्टीव्हेटर्स प्राप्त झाले. या संदर्भातील पुरवठा आदेश दिनांक १७ ऑक्टोबर, २०१२ रोजी झाला. कल्टीव्हेटर्सची किंमत रुपये २१३० होती. त्यापैकी लाभार्थ्यांचे अनुदान रुपये १०६५ होते. एकूण ४९२ नग होते. ७५ कल्टीव्हेटर्सचे वाटप झाले होते. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, टप्याटप्याने कल्टीव्हेटर्स पाठविण्यात आले. कृषी अधिका-यांनी अभिप्राय दिलेले आहेत की, सदर यंत्रे सुस्थितीत आहेत असे असताना तीन वर्षे त्यांचे वाटप का झाले नाही, कृषी अधिका-यांनी चुकीचा अहवाल दिला काय, जर त्यांनी चुकीचा अहवाल दिला असेल तर त्यांच्यावर कारवाई का झाली नाही, यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, मालाचा पुरवठा सुट्ट्या भागात झालेला आहे. प्रत्येक सुट्टा भाग तांत्रिकदृष्टया बरोबर होता. फक्त तो जोडणी करताना मधला संच सैल लागल्यामुळे तांत्रिक अडचण निर्माण झाली होती. पण सुट्ट्या भागाच्या गुणवत्तेमध्ये कोणत्याही प्रकारची चूक नव्हती असा अहवाल आहे. एकूण ७७ कल्टीव्हेटर्सचे वाटप झाले त्यापैकी दोन लाभार्थ्यांनी ते परत केले. परंतु त्यांनी परत करताना कोणतीही तक्रार केली नाही. त्यांना स्वतःचे अनुदान द्यायचे नसेल किंवा कसे हे माहित नाही. पुरवठा करण्यापूर्वी लाभार्थ्यांची यादी असावयास पाहिजे होती. या संदर्भातील पहिली तक्रार एक वर्षानंतर आली. पंचायत समिती नरखेड आणि हिंगणा यांचेकडून तक्रार प्राप्त झाली होती. वित्त विभागास पुरवठा देयक दिनांक २४ डिसेंबर, २०१२ ला सादर झाले, दिनांक ३१ डिसेंबर, २०१२ रोजी वित्त विभागाकडून देयक अदा करण्यात आले. पुरवठा पूर्व तपासणी रिपोर्ट दिनांक १ डिसेंबर, २०१२ रोजी आला होता. दिनांक १० डिसेंबर पासून पुरवठा सुरू झाला.

समितीने अशी विचारणा केली की, मालाचा पुरवठा झाला त्यावेळी दोष आढळून आले नाहीत काय, यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, दिनांक १ डिसेंबर रोजी पूर्व पुरवठा तपासणी झाली. त्यानंतर दिनांक १० ते १८ डिसेंबर, २०१२ पर्यंत पुरवठा झाला. यावर समितीने अशी विचारणा केली की, असेंबल कोणी केले, यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, हे सुटे भाग होते. पुरवठा झाला त्यावेळी प्रत्येक सुट्ट्या भागाची तपासणी झाली. त्याबाबत काहीही इश्यू नव्हता. यावर समितीने अशी विचारणा केली की, असेंबलमध्ये चूक झाली काय, यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, असेंबल करून पुरवठा करण्यात आला. एकूण ७७ कल्टीव्हेटर्सचे वाटप करण्यात आले त्यापैकी कोणाकडूनही तक्रार आली नव्हती. फक्त एका शेतक-याने आणि नंतर पंचायत समितीकडून तक्रार आली. यावर समितीने अशी विचारणा केली की, विभागाने या प्रकरणी विलंबाने कारवाई केलेली आहे. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, पुरवठा आदेश दिल्यानंतर चौकशी केली. पुरवठा आदेश देण्यापूर्वी जी प्रोसेस करावयास पाहिजे ती फॉलो केली किंवा नाही तसेच असे करताना कोणत्या ॲक्टचा भंग झाला किंवा कसे याबाबत वेगळी चौकशी करण्यात येईल. हा मुद्दा लेखापरिक्षणास नसल्यामुळे त्याबाबत माहिती घेतली नाही.

समितीने पुढे विचारणा केली की, जिल्हा परिषदेने केलेल्या खुलाशामध्ये नमूद केलेले आहे की, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांचे कार्यालयीन आदेश क्रमांक जिपना/कृषी/कल्टी/परास/१२०७/२०१७ दिनांक २० एप्रिल, २०१४ अन्वये प्रकरणाची चौकशी करण्याकरिता त्रिस्तरीय समिती नेमण्यात आली, त्या समितीने प्रकरणाची चौकशी करून अहवाल सादर केलेला आहे. सदरहू अहवाल आयुक्त (कृषी) कृषी आयुक्तालय, पुणे, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक २१ एप्रिल, २०१४ रोजी सादर करण्यात आला या प्रकरणी कृषी अधिकारी, पंचायत समिती,

नागपूर, हिंगणा, कळमेश्वर, सावनेर, नरखेड, काटोल व भिवापूर यांना सक्त ताकीद देण्यात आलेली आहे. उक्त प्रमाणे सादर केलेला अहवाल विसंगत असल्यास प्रधान सचिव (कृषी) यांनी निर्देशित केलेले आहे. दिनांक २१ एप्रिल, २०१४ रोजी सादर करण्यात आलेल्या अहवालावर विभागाने कोणती कारवाई केली, मंत्रालयाने दिलेल्या अभिप्रायामध्ये नमूद केलेले आहे की, श्री. सुबोध मोहरील, कृषी विकास अधिकारी यांच्या विरुद्ध महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील नियम ५ (१) नुसार कारवाई करण्याच्या प्रस्तावाच्या पत्रावर दिनांक २१ एप्रिल, २०१७ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर, यांनी स्वाक्षरी केल्याचे दिसून येते. तथापि, सदरचे पत्र जिल्हा परिषद कार्यालयाकडून प्रत्यक्ष निर्गमित झाल्याचे दिसून येत नाही हा काय प्रकार आहे. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पुर्ण कालक्रम सांगितल्यानंतर समितीच्या सर्व लक्षात येईल. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांनी समितीस विदित केले की, या साहित्याचा पुरवठा आदेश दिनांक १७ ऑक्टोबर, २०१२ साली देण्यात आला होता. त्याचा पुरवठा दिनांक १० ते १८ डिसेंबर, २०१२ दरम्यान झालेला आहे. पुरवठा आदेश हा दिनांक २२ नोव्हेंबर, २०११ च्या शासन निर्णयाप्रमाणे देण्यात आला होता. त्यामध्ये महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाचा पुरवठा संस्था म्हणुन समावेश करण्यात आलेला आहे. स्पेसिफिकेशन रिपोर्ट दिनांक २१ डिसेंबर, २०१२ रोजी जिल्हा परिषदेला प्राप्त झाले होते व त्यानंतर देयके प्रदान करण्यात आली. गटविकास अधिकारी, नरखेड यांची याबाबत पहिली तक्रार दिनांक १४ मार्च, २०१३ रोजी प्राप्त झाली. त्यानंतर लगेच म्हणजे दिनांक ९ एप्रिल, २०१३ रोजी साहित्याच्या दुरुस्तीबाबत किंवा रिप्लेसमेंटबाबत एम.ए.आय.डी.सी.ला पत्र देण्यात आले. जिल्हा परिषदेमार्फत १२ व पंचायत समिती स्तरावर ०९ असे एकूण २१ वेळा पत्रे देण्यात आली. दिनांक १८ ऑक्टोबर, २०१३ रोजी शेतक-याची तक्रार प्राप्त झाली त्यावेळी दिनांक ६ ऑगस्ट, २०१३ रोजी एक चाचणी करण्यात आली होती. ही चाचणी कृषी विकास अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे कृषी अभियंता व कृषी महाविद्यालयाचे सहायक प्राध्यापक यांनी केली व यामध्ये असे निदर्शनास आले की, साहित्याचा मधला फाळ जमिनीला लागत नसल्यामुळे साहित्य जिल्हा परिषदेमध्ये पडून राहिले होते. एम.ए.आय.डी.सी.ने देखील दिनांक २२ सप्टेंबर, २०१५ रोजी जिल्हा परिषदेला असे कळविले की, साहित्याची दुरुस्ती करून देण्यात येत आहे व त्याप्रमाणे दिनांक १४ ऑक्टोबर, २०१५ नंतर दुरुस्ती करून दिली. त्यानंतर सर्व साहित्याचे वाटप करण्यात आले व तशी कृषी अधिकारी यांच्यामार्फत खात्री देखील करून घेतली आहे. या साहित्याचा वापर देखील होत आहे. दिनांक १० एप्रिल, २०१७ रोजी असे निर्देश प्राप्त झाले की, या प्रकरणी सखोल चौकशी करण्यात यावी. त्या अनुषंगाने त्रिसदस्यीय समिती गठीत करण्यात आली होती. समितीच्या असे निदर्शनास आले की, कृषी विकास अधिकारी व कृषी अधिकारी यांनी पाठपुरावा न केल्याने हे साहित्य पडून राहिले होते. त्या अनुषंगाने कृषी विकास अधिकारी यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे. तसेच सर्व कृषी अधिकारी यांना सक्त ताकीद देण्यात आली आहे.

समितीने पुढे विचारणा केली की, या प्रकरणी चौकशी करण्यासाठी सन २०१४ मध्ये समिती स्थापन झाली व आपले कारवाई बाबतचे पत्र सन २०१७ मधील आहे. म्हणजे तब्बल तीन वर्षे हे प्रकरण प्रलंबित आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांनी समितीस विदित केले की, पृष्ठ क्रमांक ५ वर दिनांक २१ एप्रिल, २०१४ अशी तारीख चुकीने लिहिण्यात आली असून ती दिनांक २१ एप्रिल, २०१७ वाचण्यात यावी. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, दिनांक २१ एप्रिल, २०१७ रोजी सादर करण्यात आलेल्या अहवालावर काय कार्यवाही करण्यात आली, यामध्ये विषय समितीचा ठराव घेतलेला नाही, प्रशासकीय मान्यता कोणी दिली हे सांगता आले नाही. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, या प्रकरणी पुरवठा आदेशापर्यंतची सविस्तर माहिती समितीस देण्यात येईल. यावर समितीने पुढे विचारणा केली की, यामध्ये पुरवठा आदेश कोणी दिले होते. जिल्हा परिषदेमधील पुरवठा आदेश देणा-या सक्षम प्राधिका-याचे नाव समितीला सांगण्यात यावे. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, जिल्हा परिषदेमार्फत पुरवठा आदेश देण्यात आले होते. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी हे सक्षम प्राधिकारी आहेत. यावर समितीने विचारणा केली की, या प्रकरणाची चौकशी कोणामार्फत करण्यात आली, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांनी समितीस विदित केले की, याबाबतची चौकशी त्रिसदस्यीय समितीमार्फत करण्यात आली होती. त्यामध्ये अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, आहरण व संवितरण अधिकारी व उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांचा समावेश होता. यावर समितीने पुढे असे मत व्यक्त केले की, यामध्ये असे दिसून येते की, ज्याने पुरवठा आदेश दिले तोच चौकशी करीत आहे. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, हे प्रकरण पुरवठा आदेश चुकीचा दिला असे नव्हते तर झालेला पुरवठा व त्याचा दर्जा योग्य नसल्यासंदर्भात होते. त्यामुळे पुरवठा आदेशाबाबत चौकशी न करता झालेल्या पुरवठ्यातील मालाच्या प्रतीबाबत चौकशी करण्यासाठी समितीची नियुक्ती करण्यात आली होती. यावर समितीने अशी विचारणा केली की, विभागाने या प्रकरणी पुरवठा आदेश काढणा-या अधिका-यालाच चौकशी समितीमध्ये नियुक्त करीत आहात का, जिल्हा परिषदेची तपासणी करण्याबाबतचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेदेखील नाहीत. सरपंचाची चौकशी देखील मुख्य कार्यकारी अधिकारी करु शकत नाहीत, प्रथम असे प्रकरण आयुक्तांकडे जाते. आयुक्त आदेश देतात तेव्हाच मुख्य कार्यकारी अधिकारी चौकशी करतात. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस पुन्हा विदित केले की, चौकशीचा मुद्दा पुरवठा आदेश चुकीचा दिलेला आहे असा नव्हता त्यामुळे त्यांची नियुक्ती करण्यात आली होती. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, यामधील तांत्रिक मुद्दयांबाबत शासनाने

ठरवून दिलेल्या नियमानुसारच काम झाले पाहिजे. यामध्ये अनियमितता दिसत आहे. याबाबत अनेक उप प्रश्न उपस्थित होत आहेत. संपूर्ण राज्यासाठी धोरण ठरलेले असतानाही त्याची योग्य प्रकारे अंमलबजावणी होत नाही. सचिवांची ही जबाबदारी आहे. या प्रकरणी तांत्रिकदोष आहे व तो उत्पादकाकडून झालेला होता. पुरवठादार एजन्सी ही शासकीय असून ती स्वतः प्रॉडक्शन करीत नाही. शासन निर्णयामध्ये एम.ए.आय.डी.सी.कडूनच साहित्य घ्यावे किंवा कसे याबाबत नमूद केलेले आहे का, की खुल्या निविदा काढून साहित्य घेण्याबाबत तरतूद आहे, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी शासन निर्णयामध्ये हे साहित्य एम.ए.आय.डी.सी कडूनच घेण्याबाबत म्हटले आहे का, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांनी झालेल्या चुका व केलेल्या दुरस्त्या याबाबत माहिती दिली आहे, हे मान्य आहे. यापोटी पुरवठादाराला काही दंड केला का किंवा त्या बदल्यात काही रक्कम वसूल केली का, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांनी समितीस विदित केले की, मुद्दा क्रमांक २ मध्ये नमूद केलेले आहे की, सन २०११-१२ करिता कृषी अवजारे पुरवठ्यासाठी महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य लघुउद्योग विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ व राज्यातील चारही कृषी विद्यापिठांचा पुरवठा संस्था म्हणून समावेश करण्यात आला आहे. यावर समितीने विचारणा केली की, पुरवठा संस्था म्हणून समावेश करण्यात आला आहे, परंतु, त्यांच्याकडूनच साहित्य घ्यावे असे नमूद आहे का, एम.ए.आय.डी.सी. सोबत करार करताना जर खुल्या मार्केटपेक्षा जास्त दर असतील तर एम.ए.आय.डी.सी. कडून खरेदी करणे बंधनकारक राहणार नाही, असा देखील उल्लेख करण्यात आलेला आहे. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीला विदित केले की, एम.ए.आय.डी.सी. कडून साहित्य न घेता खाजगी पुरवठादाराकडून घेतले असते तर शासकीय पुरवठादाराकडून साहित्य घेणे शक्य असतानाही का घेतले नाही असा प्रश्न विभागाला उपस्थित केला असता यावर समितीने पुढे विचारणा केली की, अनेक वर्षापासून अशा प्रकारचे साहित्य शासकीय महामंडळाकडूनच खरेदी करण्याची प्रथा आहे. या प्रकरणी पुरवठादार असलेल्या एम.ए.आय.डी.सी.चा खरा दोष आहे. दिनांक ६ ऑगस्ट २०१३ रोजीचा पृष्ठ क्रमांक तीन वर शासनाचा जो अहवाल आहे त्यानुसार नागपूर येथे या साहित्याची चाचणी झाली. त्या चाचणीमध्ये देखील हे कल्टीव्हेटर दोषपूर्ण आढळून आले. पुन्हा एकदा सखोल चौकशी असे चालले आहे. शेवटची चौकशी दिनांक २१ एप्रिल, २०१७ रोजी करण्यात आली आहे. या चौकशा पूर्ण होईपर्यंत एम.ए.आय.डी.सी. मधील देखील जबाबदार लोक सेवानिवृत्त होतील. यामध्ये पुरवठादार दोषी असू शकतो. त्याच्यावर काहीही कारवाई नाही, केवळ चौकशा आहेत. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांनी समितीस असे विदित केले की, यामध्ये असे आढळून आले होते की, दिनांक २१ एप्रिल २०१७ रोजी सदर नस्तीस मंजुरी दिली होती, परंतु, पत्र पाठविण्यात आले नाही. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, समितीच्या माहितीप्रमाणे यामध्ये जे कोणी दोषी आहे त्याच्याजवळच ती नस्ती आहे. जिल्हापरिषदेने एकदा तपासून घ्यावे. प्रस्तुत प्रकरणी प्रधान सचिव, कृषी विभाग यांच्याकडून उत्तर अपेक्षित आहे. ते कोणतेही उत्तर देत नाहीत. यावर प्रधान सचिव, कृषी व पणन विभाग यांनी समितीस विदित केले की, सदर प्रकरणी चौकशी समितीचे एम.ए.आय.डी.सी. विभागातील अधिका-यांवरील जबाबदारी निश्चित करण्याबाबत आदेश होते व त्याचवेळी जबाबदारी निश्चित करणे म्हणजे त्यांची चूक आरोपपत्रामध्ये दाखवावयाची होती. विभागाने जिल्हा परिषदेला विचारणा केली की, व्हेरीफिकेशन करताना कोणता निकष तपासला व कोणाशी तुलना केली, तसेच पुरवठा करताना, पुरवठादाराकडून घेताना व वितरित करताना कोणता निकष पाहिला याबाबतही विचारणा केली. तेव्हा बी.आय.एस. हे स्टँडर्ड मंजूर करून देण्यात आले होते. त्याची प्रत काढली व दोघांचीही विचारणा केली. जिल्हा परिषदेने कोणतेही मानक तपासून पुरवठा घेतलेला नव्हता. पुरवठादाराकडून प्रि-डिलिव्हरी कोणतेही व्हेरिफिकेशन केलेले नव्हते. हे स्टँडर्ड कोणीही तपासले नव्हते व तशी कागदपत्रेही त्यांच्याकडे नव्हती. त्यामुळे तक्रार कोणाची होती, वस्तुस्थिती काय होती हे जाणून घेण्यासाठी मी तक्रारीची प्रत मागुन घेतली त्यावरून समजले की, एकच तक्रार प्राप्त झाली होती. ही चौकशी डिसेंबर, २०१६ मध्ये केली होती त्यावेळी ७२ ठिकाणी पुरवठा झाले होते व फक्त एक तक्रार प्राप्त झाली होती. ज्याची दुरुस्ती करून घेतली त्याच्या ब्लेडस्ची लांबी वाढविण्यात आली यामध्ये ५ नमुने आणायला सांगितले. त्यामध्ये बदलून दिलेले व न दिलेले असे दोन्ही प्रकारचे नमुने मागितले तीन-चारशे लोकांनी नंतर घेतले व कुठलीही तक्रार केलेली नाही. हे तपासताना पाहिले की, पूर्वी देण्यात आलेले नग व नंतर हे दिलेले हे थोडेसे वेगळे होते. याबाबत कृषी अभियंता यांना देखील बोलविले व नागपूर येथील महाविद्यालयामध्ये १० नग मागवून तपासणी केली. यामध्ये मुख्य अडचण कुठे होती तर पुरवठादाराकडे विक्री केल्यानंतरसुद्धा सेवा देण्याची व्यवस्था असते. परंतु वितरक नसतात. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच वितरक म्हणून काम करते. प्रत्येक वेळी वेगवेगळा पुरवठा देणे पुरवठादारांना परवडणार नाही. त्यामुळे ते साठा करून ठेवतात. त्याचे सुटे भाग पोत्यात असतात अपेक्षा आहे की, ते जोडणी करून सेटल करून दाखवावेत व त्याच्या वापराबाबत प्रशिक्षण द्यावे परंतु तसे होत नाही. लाभार्थ्यांना ते पोत्यातच दिले जाते. फरक येथेच पडतो. जोडणी करण्याचे मार्गदर्शन न केल्यामुळे प्रत्येकाने वेगवेगळ्या पद्धतीने जोडणी केले. जोडणी केलेल्या नगाचे फोटो पाहिले असता लक्षात आले की, जोडणी बरोबर न केल्यामुळे ते व्यवस्थित चालत नाहीत. विभागाने जिल्हा परिषदेला प्रश्न विचारला की, काहीही न तपासता जिल्हा परिषद पुरवठादाराला पैसे देता व जेव्हा नमुने चुकीचे किंवा दोषी असल्याबाबत सांगितले जाते ते देखील जिल्हापरिषद मान्य करते, विद्यापीठ अभियंता यांना पूर्वीच्या सदोष असल्याबाबतच्या तत्कालीन अधिका-यांनी दिलेल्या अहवालाबाबत विचारणा केली तेव्हा त्यांनी सांगितले की, तत्कालीन अभियंता हे सेवानिवृत्त झाले आहेत व त्यांच्या माहितीप्रमाणे फाईडिंग बी.आय.एस. स्टॅण्डर्डप्रमाणे बरोबर आहे. तसेच जोंडणी केल्यानंतर चालते. परंतु पुरवठादार व खरेदीदार यांच्यामध्ये जे संबंध निर्माण झाले त्यामुळे महाराष्ट्रामध्ये असे साहित्य मोठ्या प्रमाणावर पडून आहे. त्यामुळे शासनाने डी.बी.टी. चा निर्णय घेतला. समितीस चौकशीबाबत माहिती देण्यात येते की, एप्रिल महिन्यामध्ये

आलेल्या जिल्हा परिषदेच्या अहवालामध्ये ताकीद देण्यात आली होती. एम.ए.आय.डी.सी चे म्हणणे होते की आम्ही बरोबर दिले होते परंतु, सक्तीने बदलायला लावले यावर आमची भूमिका ही राहील की, तुम्ही पुरवठा बरोबर केला परंतु, तुमच्याकडे प्रीडिलिव्हरी सर्टिफिकेशन रिपोर्ट नाही. तुम्ही निष्काळजीपणे कोणताही पुरवठा घेता व तुम्हाला शेतक-यांना द्यावयाच्या साहित्याबाबत काळजी दिसून येत नाही. तुम्ही नमुने तपासत नाहीत. तुमचा माल दोषी असल्याबाबत सांगितल्यानंतरही तुम्ही मान्य करता याबाबत जबाबदारी निश्चित करा. तुमचा माल बरोबर होता किंवा कसे यापेक्षा तुमची अंतर्गत कंट्रोल सिस्टीम फेल झालेली आहे. शेतक-यांची केवळ एक तक्रार होती असे सांगू शकत नाही. विभागाने याबाबत सर्वांना एकच प्रश्न विचारला की आपण आपल्या मुलांसाठी ज्यावेळी सायकल खरेदी करण्यासाठी जातो त्यावेळी दुकानदाराने फक्त डब्बा दिला तर तो आपण जोडणी करू शकतो का, त्याचप्रमाणेच शेतकरी हे कसे करतील, याबाबत दोघांनीही जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे. आता परिस्थिती अशी आहे की, एम.ए.आय.डी.सी ने हे ॲडव्हान्स स्टेजवर आणले आहे. त्यांच्या मंडळावर असल्यामुळे मी योग्य जबाबदारी निश्चित होण्याबाबत पाहणार आहे. येथेदेखील जिल्हा परिषदेकडून पत्र आले तर त्यालादेखील राज्य स्तरावर आम्ही योग्य न्याय देवू. **कारण शेवटी शेतक-यांचे असे संपूर्ण महाराष्ट्रात सुमारे ७ कोटी रुपयांची उपकरणे पडून आहेत.** त्यामुळे हा प्रश्न गंभीरपणे घेण्याची गरज आहे.

समितीने अशी विचारणा केलीकी, सदर प्रकरणाची सखोल चौकशी करून विभाग किती दिवसांमध्ये अहवाल समितीस सादर करणार आहे. या विषयाच्या संदर्भात सचिवांनी सविस्तर माहिती दिलेली आहे. तसेच महाराष्ट्र राज्यात जवळपास ७ कोटी रुपयांचे शेतीतील साहित्य पडुन असल्याचे सचिवांनी मान्य केलेले आहे. सदर प्रकरणाची योग्य चौकशी करून दोषी अधिका-यांवर तात्काळ कारवाई करावी. तसेच सदर प्रकरणामध्ये अनियमितता झालेली आहे असे विभागीय सचिवांनी मान्य केले आहे. या प्रकरणातील सखोल चौकशी करून दोषी अधिका-यांवर कारवाईचा अहवाल पुढील एक महिन्याच्या आत पंचायती राज समितीस सादर करावा. यावर प्रधान सचिव, कृषी व पणन विभाग यांनी समितीस विदित केले की, कोणत्या जिल्हा परिषदेकडे किती रक्कम जमा आहे, या संदर्भातील जिल्हानिहाय माहिती सचिवांकडे उपलब्ध आहे. जिल्हा परिषदेकडे दोन प्रकारचे निधी आहेत. एक लोकवाटा व अनुदान निधी यांच्या प्रथाप्रमाणे पुरवठा झालेला आहे. लोकवाटा झाला व लाभार्थ्यांना निधी मिळालेला आहे की नाही या विषयी माहिती नाही. ५० टक्के शासकीय निधीचे अनुदान पुरवठादारास देय आहे. उर्वरित ५० टक्के रक्कम काहीना काही तरी कारणाने दिली जात नाही. जेव्हा लोकवाटा जमा झाल्यानंतर काही व्यक्तींच्या खात्यामध्ये सदर निधी जमा झालेला नाही, असे निदर्शनास आलेले आहे. या दोन्ही प्रकारची चौकशी करून सदर अहवाल एक महिन्यांच्या आत समितीस सादर केला जाईल. यावर समितीने अशी विचारणा केली की, सदर निधीचा लाभार्थ्यांना पुरवठा झाल्यानंतर तो निधी त्यांच्या खात्यामध्ये जमा का झालेला नाही, विभागाने या प्रकरणातील चौकशीच्या अहवालामध्ये समितीने विचारलेल्या प्रश्नांचा खुलासा सविस्तर विशद करावा व तो अहवाल समितीस लवकरात लवकर सादर करावा. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस आश्वासित केले की, पुरवठ्यापूर्वीचा सदर चौकशीचा अहवाल एक महिन्याच्या आत दिला जाईल. महाराष्ट्रातील कोणत्या व किती जिल्हा परिषदेत किती माल खरेदी केला व तो किती माल वितरीत केला किंवा यातील खरेदी केलेला किती माल जिल्हा परिषदेत पडून आहे, यासंदर्भातील सदर माहिती एक महिन्याच्या आत समितीस दिली जाईल. दिनांक ३ डिसेंबर २०१६ पासून सदर माल खरेदी करण्याचे बंद केलेले आहे.

समितीने पुढे विचारणा केली की, सदर प्रकरणात दोषी आढळून आलेल्या अधिका-यांवर कारवाई किती दिवसांत करणार आहात, यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, कोणत्याही प्रकारचा खरेदी केलेल्या मालाचे लाभार्थ्यांना वाटप न करता जिल्हा परिषदेमध्ये पडून आहे का, जर सदर माल वाटप न करता पडून असेल तर तो माल पुढील तीन महिन्यांच्या आत वाटप केला जाईल. तसेच दुसरी गोष्ट म्हणजे सदर माल लाभार्थ्यांना वाटप का केला नाही, या संदर्भात चौकशी करून यात दोषी असलेल्या अधिका-यांवर कारवाई केली जाईल.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायती राज समितीने नागपूर जिल्हा परिषदेला भेट देऊन वार्षिक प्रशासन अहवालावर मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिका-यांची साक्ष घेतली असता समितीच्या निदर्शनास आले की, नागपूर जिल्हा परिषदेने सन २०१२-१३ या वर्षात खरेदी केलेल्या ४९२ कल्टीव्हेटर पैकी ४१७ कल्टीव्हेटर विविध पंचायत समित्यांच्या गोदामात वाटपाविना पडून राहीले आहेत. समितीच्या समोर सादर झालेल्या कागदपत्रांवरून आणि साक्षीवरून समितीच्या निदर्शनास आले की, सदरची योजना जिल्हा परिषद सेस फंडातून राबविण्यात आलेली नाही तर ती केंद्र पुरस्कृत आयसोपॉम (ISOPAM) (Integrated Scheme of Oil Seeds, Pulses, Oil palm and maize) या योनजेतून राबविण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ च्या कलम १२३ अन्वये राज्य व केंद्र शासनाच्या विविध योजना जिल्हा परिषदा अभिकरण तत्वावर राबवितात. त्या अनुषंगाने सन २०१२-१३ मध्ये राष्ट्रीय गळित धान्य विकास कार्यक्रमांतर्गत ५०% अनुदानावर ४९२ नग, तीन दाती कल्टीव्हेटर वाटपाचा लक्षांक आयसोपॉम अंतर्गत कृषी आयुक्तालयाने नागपूर जिल्हा परिषदेला दिलेला होता आणि त्यांच्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे नागपूर जिल्हा परिषदेने सदरहू योजना राबविली. सदर योजना राबविताना नागपूर जिल्हा परिषदेने कृषी विभागाचा शासन निर्णय दिनांक २२ नोव्हेंबर २०११ **(परिशिष्ट क्र. १.१)** नुसार आणि त्यातील प्रपत्र क्र.१ नुसार कृषी औजारांचा निश्चित केलेल्या किमान दराने महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मर्यादीत यांच्याकडे दिनांक ७ ऑक्टोबर २०१२ रोजी ४९२ कल्टीव्हेटरचा पुरवठा आदेश दिला. आदेशाच्या

दिनांकापासून ६० दिवसांत पुरवठा होणे आवश्यक होते. सदरहू योनजेंतर्गत अनुदानाची रक्कम ५,२३,९८० व लाभार्थी हिस्सा ५,२३,९८० अशी एकूण १०,४७,९६० रुपयांची खरेदी होती. पुरवठा आदेशाप्रमाणे औजारांच्या गुणवत्तेवर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी पुरवठादाराची असून तांत्रिक मापदंडा प्रमाणे १००% टक्के तपासणी पुरवठा संस्थेने करणे, एक वर्षाच्या हमी कालावधीत औजारात तांत्रिकदृष्ट्या दोष आढळल्यास त्याची मोफत दुरुस्ती करून देणे, बदलून देणे पुरवठादार संस्थेवर बंधनकारक होते.

पुरवठा आदेशास अनुसरून महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ यांनी दिनांक १ नोव्हेंबर २०११ रोजी सर्व कल्टीव्हेटर्सचा पुरवठा जिल्हा परिषदेला केला. पंचायती राज समितीच्या नागपूर जिल्हा परिषद भेटीपर्यंत ३४ महिने होऊनही केवळ ७७ शेतक-यांनी सदर साहित्याची उचल केलेली होती उर्वरीत साहित्य गोदामात पडून होते. सावनेरच्या एका शेतक-याने सदर कल्टीव्हेटर सदोष असल्याची तक्रार केली होती तर इतर शेतक-यांनी पंचायत समितीमध्ये येऊन औजाराबाबत तोंडी मत व्यक्त केले. तर काही शेतक-यांनी जवळच्या वेल्डींगवाल्याकडून कल्टीव्हेटरमध्ये योग्य तो बदल/जुगाड करून कल्टीव्हेटर वापरली आहेत. संबंधित गटविकास अधिकारी आणि कृषि विकास अधिकारी यांनी महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ यांच्याकडे पत्रव्यवहार सुरू केला. सदर ३४ महिन्यांत सातत्याने २२ वेळा पत्रव्यवहार करूनही महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ यांनी जिल्हा परिषद प्रशासनाला दाद दिलेली नव्हती.

पंचायती राज समितीने आपल्या साक्षीत विचारणा केल्यावर महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळावर फौजदारी खटला दाखल करण्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आश्वासित केले व त्यानुसार त्यांस कळविल्याबरोबर दिनांक १४ व १५ ऑक्टोबर २०१५ या दोन दिवसांच्या कालवधीत महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ व कंपनीच्या लोकांनी औजारामध्ये आवश्यक दुरुस्ती करून दिली आणि पुढील आठ दिवसांत सर्व ४९२ औजारे शेतक-यांनी उचल केली व शेतीच्या मशागतीमध्ये वापरायलाही सुरुवात केली.

आवश्यक ती दुरुस्ती केल्यानंतर आपला लाभार्थी हिस्सा भरून शेतक-यांनी औजारे उचलली आणि शेतीची मशागत सुरू केली. येवढ्यावर हे प्रकरण संपत नाही. ही औजारे ३४ महिने नागपूर जिल्हा परिषदेच्या गोदामांमध्ये पडून होती. समितीची भेट झाली नसती तर ती आणखी किती काळ तशीच पडून राहीली असती याचा अंदाज करवत नाही. कारण कृषी विभागाच्या सचिवांनी उल्लेख केल्याप्रमाणे राज्यात ७ कोटी रुपयांपेक्षा अधिक किमतीचे साहित्य वाटपाअभावी गोदामात पडून आहे. त्याचा लाभ ना गरजू शेतक-यांना होतोय न ते उत्पादन करणा-या उद्योजकांना वर्षानुवर्षे गोदामात पडून औजारे आणि साहित्य गंजून जाऊन निकामी झाले असल्याची समितीला भिती आहे.

देशातील गळीत धान्ये, मका, कडधान्यांचे उत्पादन वाढविण्याकरिता विविध एकात्मिक उपाययोजना राबविण्यास आयसोपॉम या अभियानाची १९८६ मध्ये सुरुवात झाली. महाराष्ट्रासह इतर १४ राज्यांत सदर योजना राबविली जाते. कोट्यवधी रुपये खर्च होऊनही राज्यातील गळीत धान्याचे उत्पादन वाढताना दिसून येत नाही. केंद्र पुरस्कृत गळीत धान्य व कडधान्य विकास कार्यक्रमांतर्गत सुधारीत कृषी औजार खरेदी करण्याबाबत मार्गदर्शक सुचनांप्रमाणे राज्य शासनाच्या कृषी विभागाने निर्णय घेतला. सदर औजारांची न्यूनतम किंमत किती असावी, योजना कशी राबवावी यासाठी दिनांक २२ नोव्हेंबर २०११ रोजी शासन निर्णयही निर्गमित करण्यात आला. तद्नंतर योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार कृषी आयुक्तालयाने राज्यातील कृषी विभाग आणि जिल्हा परिषदांना अंमलबजावणी संदर्भात लक्षांक नेमून दिले आणि कृषी औजारे महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ, महाराष्ट्र लघुउद्योग उद्योग विकास महामंडळ तसेच चार कृषी विद्यापीठे यांच्या औजारांची किंमतीसह यादी निर्गमित केली.

प्रस्तुत प्रकरणातील औजारे देण्याचे काम महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ यांना देण्याची शिफारस करण्यात आलेली होती. महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाची सन १९६५ साली स्थापना झालेली आहे तीच मुळी कृषी क्षेत्राच्या आधुनिकीकरणास यांत्रिक प्रक्रीयेतून चालना देण्यासाठी, शेतीसाठी लागणारी यंत्रे उत्पादीत करणे व वितरीत करणे हे यांचे लक्ष्य व उद्दिष्ट आहे. मंडळाच्या संचालक मंडळावर कृषी मंत्री, राज्यमंत्री, प्रधान सचिव, आयुक्त (कृषी), व्यवस्थापकीय संचालक, केंद्र शासनाच्या कृषी विभागाचे वरिष्ठ अधिकारी यांचा समावेश होतो. समितीच्या साक्षीच्या वेळी स्वतः कृषी सचिवांनी समितीसमोर आपण स्वतः मंडळाच्या संचालक मंडळावर असल्याचे विदीत केलेले आहे. अभियांत्रिकी, कृषी, जैवतंत्रज्ञान, इत्यादी नानाविध तंज्ज्ञांचा समावेश असलेल्या मंडळाकडून शेतीच्या विकासासाठी भरीव योगदान देणे अपेक्षीत होते. सुधारीत कृषी औजारे हे बी.एस.आय. मानकांप्रमाणे तसेच मंडळाने सामंजस्य करार केलेल्या केंद्र शासनाच्या सी.आर.आय.डी.ए. (क्रीडा), हैद्राबाद, सी.आय.ए.ई., भोपाळ आणि हिस्सार येथील अत्युच्च संशोधनाअंती मापदंड ठरवून दिल्याप्रमाणे पुरवठा होणे आवश्यक होते. सदर पुरवठा हा मानकांप्रमाणे होतो किंवा नाही हे पहाण्याची सर्वस्वी जबाबदारी मंडळाची होती ही बाब दिनांक २२ नोव्हेंबर २०११ चा शासन निर्णय, पुरवठा आदेश, कृषी आयुक्तालयाच्या मार्गदर्शक सुचनांमध्ये स्पष्टपणे नमूद केलेली आहे.

महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाकडे कृषी अभियांत्रिकी विभाग कार्यरत असून पुरवठा झाल्यानंतर दिनांक १ डिसेंबर, २०१२ रोजी मंडळाच्या गुण नियंत्रण कक्ष, पुणे यांनी सर्व औजारे योग्य त्या गुणवत्तेची आणि तांत्रिक मापदंडाप्रमाणे असल्याचे प्रमाणित केलेल होते. त्यानुसार जिल्हा परिषदेने मंडळाचे उर्वरीत देयक अदा केले. ज्या शेतक-यांनी मंडळाची सुधारीत कृषी औजारे उचलली त्याचा वापर करून त्यांना शेतीची नीट मशागत करता येईना. या औजाराला तीन फाळे होती त्यापैकी मधले फाळे लांबी कमी असल्यामुळे मशागतीचे काम करीत नव्हते. जिल्हा

परिषदेमधील अधिका-यांनी कृषी महाविद्यालयाच्या प्रक्षेत्रावर महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाच्या कृषी अभियांत्रिकीच्या तंज्ञासमक्ष औजारांची चाचणी घेतली असता औजाराच्या मध्यल्या फाळाची लांबी कमी पडत असल्योच निदर्शनास आले. महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाचे अधिका-यांचे उपस्थितीमध्ये चाचणी करून देखील मंडळाने औजार बदलून/दुरुस्त करून देणे यापैकी कोणतीही कार्यवाही केली नाही. पंचायती राज समितीने फौजदारी कारवाईची भाषा केल्याबरोबर २ दिवसात सर्व औजारे दुरुस्त करून घेण्यात आली, परंतु त्याला तब्बल ३४ महिन्यांचा उशीर झालेला होता.

एवढेच नव्हेतर कृषी आयुक्तालयाकडून देखील अंमलबजावणी दरम्यान हेळसांड झालेली आहे. गुणवत्ता व नियंत्रणाकरिता आयुक्तालयाच्या गुणनियंत्रण - ५ शाखेकडून गुणवत्ता व नियंत्रणाचे काम योग्यरितीने झालेले नाही, कृषी आयुक्तालयाने योजनेचा मासिक प्रगती अहवाल (MPR) घेणे बंधनकारक होते तरीही ३४ महिने औजारे पडून असल्यामुळे राज्याच्या कृषी आयुक्तालयाची भूमिका समितीला संशयास्पद वाटते. औजारांच्या पुरवठापूर्व व पुरवठापश्चात तपासणी करण्याकरिता क्षेत्रीय अधिका-यांना औजारांचे मापदंड जसे उंची, लांबी, जाडी इत्यादी माहितीच दिलेली नसल्यास क्षेत्रीय अधिका-यांनी तपासणी कशाच्या आधारावर करावी असा प्रश्न समितीसमोर आहे.

महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ, कृषी आयुक्तालयानंतर जबाबदारी येते ती अंमलबजावणी यंत्रणेची अर्थात जिल्हा परिषदेची रुपये १००० पेक्षा कमी किंमतीच्या औजारांची २.५ टक्के यदृच्छिक (Random) तपासणी करणे ही जबाबदारी कृषी विकास अधिका-याची होती ती त्यांनी केली नाही. पुरवठ्या दरम्यान विधानमंडळाचे नागपूर येथे अधिवेशन भरले किंवा बी.डी.एस. प्रणालीवर अनुदान आले म्हणून लवकर खर्च करणे किंवा औजारांची तपासणी न करणे किंवा महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाचे ६९,७१६ रुपये रोखून ठेवणे, संबंधित कृषी अधिका-याने अक्षम्य विलंब करून सुमारे ३४ महिन्यापेक्षा अधिक काळ शेतकरी सुधारीत औजारांपासून वंचित राहिले. एवढेच नव्हे तर स्वतःवरील शिस्तभंग विषयक प्रस्ताव निर्गमित होऊ नये म्हणून २१ एप्रिल २०१६ ते ५ जून २०१७ पर्यंत नस्ती गहाळ करणे अशा अनेकविध त्रुट्या कृषी विकास अधिका-यांकडून घडल्याचेही समितीच्या निदर्शनास आले आहे.

प्रस्तुत प्रकरणात झालेला सर्व सव्य-अपसव्य पाहाता कल्याणकारी राज्य या संकल्पनेत व्यापक लोकहीत साध्य करण्यासाठी एखादी योजना राबविताना ती लाभार्थी केंद्रीत किंवा लाभार्थ्यांच्या व्यवसाय जसे शेती केंद्रीत ठेवून ती राबविणे अत्यंत आवश्यक असल्याचे समितीचे मत आहे. केंद्रशासन, राज्यशासन, राज्यातील कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ, राज्यातील कृषी विद्यापीठे, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायती यांनी आपसामध्ये ताळमेळ ठेवून लाभार्थ्यापर्यंत योजना पोचविण्यासाठी सर्वोतपरी प्रयत्न करणे आवश्यक असते. नागपूर जिल्हा परिषद कार्यालय ते महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ चे नागपूर क्षेत्रीय कार्यालय यामध्ये ३४ महिन्यांच्या कालावधीत एकतर्फी म्हणजेच जिल्हा परिषदेकडून मंडळाकडे पत्राद्वारे पाठपुरावा होत होता. परंतु, मंडळाकडून त्याची दखल घेतली जात नव्हती. प्रस्तुत प्रकरणात शेतक-यांना सुधारीत कृषी अवजाराचे सुटे भाग देण्यात आले, या सुट्या भागांमधून कल्टीव्हेटर जोडणी करण्याचे ज्ञान शेतक-याकडे निश्चितच नव्हते. मुलाकरिता सायकल खरेदी करायला गेलो तर दुकानदाराने फक्त डबा दिला तर आपण सायकल जोडणी करू शकत नाही. तद्वतच शेतकरी देखील अशा सुधारीत कल्टीव्हेटर जोडणी करू शकणार नाही ही साधी बाब अंमलबजावणी करणा-या यंत्रणेला कळू शकत नाही किंवा ते जाणून घेण्याची त्यांची इच्छा नाही ही बाब अत्यंत गंभीर आहे. **अतः यापुढील काळामध्ये कृषी विभागात राबविण्यात येणा-या वैयक्तिक लाभाच्या किंवा इतर कोणत्याही योजनेच्या अंमलबजावणीमध्ये शासनाच्या विविध विभागांमधील ताळमेळ अथवा समन्वय योग्य रितीने राहण्याबाबत व योजना राबविण्याच्या संदर्भात वेळीच दक्षता घेऊन त्याचा लाभ संबंधितांपर्यंत शासनाने निश्चित केलेल्या वेळापत्रकाप्रमाणे आखून ते तडीस नेण्याबाबत पुनश्चः कठोर स्वरुपाचे परिपत्रक निर्गमित करून क्षेत्रीयस्तरावर तसेच विभागीयस्तरावर त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यासंदर्भात सूचना निर्गमित कराव्यात.**

**त्याचप्रमाणे, प्रस्तुत प्रकरणी राज्य शासनाच्या कृषी आयुक्तालयातील संबंधित अधिकारी, महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळातील अधिकारी यांचेविरूद्ध कडक स्वरुपाची कारवाई करावी तसेच नागपूर जिल्हा परिषदेचे तत्कालिन संबंधित कृषी विकास अधिकारी यांची शासनस्तरावर सुरू असलेली विभागीय चौकशी विहित कालमर्यादेत पूर्ण करावी व केलेल्या कारवाईची माहिती समितीला कळविण्यात यावी अशीही समितीची शिफारस आहे.**

**प्रस्तुत प्रकरणातील साक्षीचे दरम्यान प्रधान सचिव, कृषी यांनी राज्यातील लाभार्थी शेतक-यांना वाटप करावयाची ७ कोटी रुपयांची उपकरणे अशाच कारणांमुळे पडून असल्याची माहिती समितीला दिली, त्यावर कोणत्या जिल्ह्यात किती माल खरेदी केला, किती वितरीत केला व किती माल पडून आहे या माहितीसह ही सर्व उपकरणे/साहित्य तातडीने वाटप करण्याचे आश्वासित केल्याप्रमाणे ते ३ महिन्यांत वाटप करून त्याबाबतचा अहवाल समितीस सादर करावा अशीही समितीची शिफारस आहे.**

## प्रकरण दोन

## जिल्हा परिषद, नागपूर (प्रशासन)

## नागपूर जिल्ह्यातील १२४ लघुसिंचन व २१४ मालगुजारी तलावांबाबत

समितीने दिनांक २९, ३० सप्टेंबर व ०१ ऑक्टोबर, २०१५ या कालावधीत नागपूर जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी सन २०१२-१३ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान समितीला नागपूर जिल्ह्यातील १२४ लघुसिंचन व २१४ मालगुजारी तलावांबाबत नागपूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने अशी विचारणा केली की, जिल्हा परिषदेला तलावांचे वार्षिक उत्पन्न किती आहे, प्रति हेक्टर ४५० रुपये महिन्याचे की वर्षाचे आहेत, असे एका हेक्टरचे तलाव किती असू शकतात, प्रति हेक्टर ४५० रुपये वार्षिक हे योग्य आहे का, तलावाचे वार्षिक उत्पन्न वाढले पाहिजेत. यावर कार्यकारी अभियंता (लघुसिंचन) यांनी समितीस विदित केले की, नागपूर जिल्ह्यात १२४ लघुसिंचन तलाव आहेत, २१४ मालगुजारी तलाव आहेत. शासन नियमाप्रमाणे तलावाचा प्रति हेक्टर ४५० रूपयांप्रमाणे लिलाव करण्यात येतो. प्रति हेक्टर ४५० रुपये वार्षिक आहेत. जिल्हा परिषदेकडे विविध हेक्टर्सचे तलाव आहेत. यावर समितीने पुढे विचारणा केली की, जिल्हा परिषदेला उत्पन्न वाढविण्याकरिता मार्ग आहे. एका हेक्टरमध्ये किती मासे मिळू शकतात याचा अंदाज बांधला पाहिजे. बाजारात साध्यातील साधे मासे २०० रुपये किलो भावाने मिळतात. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस खुलासा केला की, जिल्हा परिषद ४५० रुपये प्रति हेक्टर या दराने भाडे घेते. स्थानिक मच्छिमार सहकारी संस्थेला ठेका देण्यात यावा असा निर्णय असल्यामुळे खुली स्पर्धा होत नाही. नागपूर शहरामध्ये तलाव मोठ्या प्रमाणावर आहेत आणि मासे देखील चांगले आहेत. समितीला विनंती आहे की, या संदर्भात लिलावाची खुली स्पर्धा ठेवली तर स्पर्धा होऊन जिल्हापरिषदेला चांगले उत्पन्न मिळू शकेल. तसेच या संदर्भात जे दर आहेत ते रिव्हाईज करावेत. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, या ठिकाणी गोड्या पाण्यातील माशांचा जास्त वापर होतो. हॉटेलमध्ये एक फिश डिश १५० ते २०० रुपयांना मिळते आणि ठेकेदाराकडून वर्षाला फक्त ४५० रुपये भाडे घेतो. जिल्हा परिषदेने किती दर घ्यावा अशी अपेक्षा आहे, एका वर्षात माशांची किती पैदास होते, माशांची किती पैदास होते याची माहिती जिल्हा परिषदेस असणे आवश्यक आहे. यावर कार्यकारी अभियंता (लघुसिंचन) यांनी समितीस विदित केले की, किमान २ हजार रुपये वाढ झाली पाहिजे. सन २०१५-२०१६ या वर्षात ५ लाख ११ हजार ४२८ इतके उत्पन्न आले. पाच वर्षांसाठी तलाव भाडेतत्वावर देतो. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस आश्वासित केले की, मासेमारी तलावाच्या ठेक्यामध्ये वाढ करण्याचा प्रस्ताव पाठविण्यात येईल. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, जर खुल्या पद्धतीने लिलाव झाला तर जिल्हा परिषदेला जास्त उत्पन्न मिळू शकतो. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, समितीने जे मत व्यक्त केले ते योग्य आहे. खुल्या पद्धतीने लिलाव झाला तर जिल्हा परिषदेला जास्त उत्पन्न मिळू शकते. यावर पुढे समितीने अशी विचारणा केली की, या तलावांमध्ये वर्षातून किती मासे सोडले जातात. एका तलावातून वर्षातून दोन पिके मिळाली पाहिजेत. जिल्हा परिषद ठेकेदाराकडून वर्षाचे भाडे घेते. या प्रकरणाबाबत समितीने असे निदेश दिले की, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मासेमारी तलावाच्या ठेक्याच्या रकमेत वाढ करण्याबाबचा अहवाल समितीला सादर करावा.

**समितीने साक्षीच्या वेळी कृषि, पदुम व मत्सव्यवसाय (मत्सव्यवसाय) विभागाकडून खालील माहिती मागविली.**

नागपूर जिल्ह्यातील १२४ लघुसिंचन व २१४ माल गुजारी तलावांचा मासेमारीचा प्रति हेक्टरी रुपये ४५० असा सध्या तलावाचा भाव आहे. मासेमारी व मच्छिला सध्या बाजारपेठेत मिळणारा भाव विचारात घेता त्यात वाढ करण्याबाबतचा अहवाल अद्याप समितीस सादर करण्यात आला नाही. याबाबत शासनाची नेमकी काय भूमिका आहे ?

**समितीस जिल्हा परिषदेकडून उपरोक्त मुद्दांची खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.**

महाराष्ट्र शासन कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन निर्णय क्र. मत्स्यवि १२०१/ प्र.क्र २२४/पदुम १३, दिनांक ०४ जानेवारी २००२ नुसार तलाव ठेका धोरण निश्चित करण्यात आलेले होते, या शासन निर्णयानुसार ० ते २० हेक्टर क्षेत्राच्या जलाशयासाठी रु.३०० प्रति हेक्टर प्रतिवर्ष दर निश्चित करण्यात आला होता.

सन २०१३-१४ मध्ये २७ ल.सि.तलाव, ६१ माजी मालगुजारी तलाव, ८ पाझर तलाव, ३ गाव तलाव असे एकूण ९९ तलाव रु.३०० प्रति हेक्टरी प्रतिवर्ष दराने मत्स्यव्यवसायाकरिता लिलाव करण्यात आलेले आहेत. त्याची एकूण रक्कम रुपये ८,३५,५५० आहे.

सन २०१४-१५ मध्ये १३ ल.सि.तलाव, ११ माजी मालगुजारी तलाव, ५ पाझर तलाव,

२ गाव तलाव असे एकूण ३१ तलाव रु. ३०० प्रति हेक्टरी प्रतिवर्ष दराने मत्स्यव्यवसायाकरिता लिलाव करण्यात आलेले आहेत. त्याची एकूण रक्कम रुपये ४,१४,९७५ आहे.

सन २०१५-१६ मध्ये ३ ल.सि.तलाव, १५ माजी मालगुजारी तलाव, २ पाझर तलाव असे एकूण २० तलाव रु. ४५०/- प्रति हेक्टरी प्रतिवर्ष दराने मत्स्यव्यवसायाकरिता लिलाव करण्यात आलेले आहेत. त्याची एकूण रक्कम रुपये ३,१२,८९०/- आहे.

सन २०१६-१७ मध्ये १२ ल.सि.तलाव, ७ माजी मालगुजारी तलाव, ६ पाझर तलाव असे एकणू २५ तलाव रु.३००/- प्रति हेक्टरी प्रतिवर्ष दराने मत्स्यव्यवसायाकरिता लिलाव करण्यात आलेले आहेत. त्याची एकूण रक्कम रुपये ४,५७,४५०/- आहे.

महाराष्ट्र शासन कृषि पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन निर्णय क्र. मत्स्यवि २०१४/ प्र.क्र.९/पदुम १३, दिनांक २६ जून, २०१४ **(परिशिष्ट क्र.२.१)** अन्वये सुधारित तलाव ठेका धोरण निश्चित करण्यात आले होते. या शासन निर्णयानुसार ० ते २० हेक्टर क्षेत्राच्या जलाशयासाठी रु.४५० प्रति हेक्टर प्रतिवर्ष इतका दर निश्चित करण्यात आला होता, या शासन निर्णयास शासन पत्र क्र. मत्स्यवि १२१४/प्र.क्र.१०१/पदुम १३, दिनांक १६ मे २०१६ अन्वये स्थगिती देण्यात आली होती.

महाराष्ट्र शासन कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन निर्णय क्र.मत्स्यवि २०१६/ प्र.क्र.१७१/पदुम १३, दिनांक ३० जून, २०१७ **(परिशिष्ट क्र.२.२)** अन्वये सुधारित तलाव ठेका धोरण निश्चित करण्यात आलेले असून या शासन निर्णयानुसार ० ते २० हेक्टर क्षेत्राच्या जलाशयासाठी रु.१८००/- प्रति हेक्टर प्रतिवर्ष इतका सुधारित दर निश्चित करण्यात आलेला आहे. या सुधारित दरानुसार नागपूर जिल्हा परिषद अंतर्गत असलेल्या तलावांचा लिलाव दि.०१-७-२०१७ ते ३०-०६-२०२२ या पाच वर्षांच्या कालावधीकरिता रु.१८०० प्रतिवर्ष प्रति हेक्टर या दराने सद्दस्थितीत ४५ लघु सिंचन तलाव व ५६ माजी मालगुजारी तलाव, १३ पाझर तलाव व ७ गाव तलाव असे एकूण १२१ तलावांचा मत्स्यव्यवसायाकरिता लिलाव करण्यात आलेला आहे. त्याची एकूण रक्कम रुपये ३२,४१,४५५ आहे.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय :-**

ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे (जलसंधारण विभाग) अभिप्राय :-

जिल्हा परिषद नागपूर यांचे अभिप्रायाशी सहमत.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने नागपूर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १० ऑक्टोबर २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. उक्त साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, नागपूर जिल्ह्यातील १२४ लघुसिंचन व २१४ माल गुजारी तलावांचा मासेमारीचा प्रति हेक्टरी रुपये ४५० असा सध्या तलावाचा भाव आहे. मासेमारी व मच्छिला सध्या बाजारपेठेत मिळणारा भाव विचारात घेता त्यात वाढ करण्याबाबतचा अहवाल अद्याप समितीस सादर करण्यात आला नाही. याबाबत शासनाची नेमकी काय भूमिका आहे, यावर उप सचिव, कृषी विभाग यांनी समितीस विदित केले की, या विषयाच्या संदर्भात अशी माहिती आहे की, जिल्हापरिषदांच्या तलावांबाबत शासनाचे धोरण बंधनकारक नाही. मासेमारीसाठी सन २०१४ मध्ये राज्य सरकारने एक धोरण निश्चित केले होते. त्यात प्रति हेक्टरी ४५० रुपये भाव देण्यात आला होता. त्यानंतर पुन्हा यासंदर्भात एक नवीन धोरण निश्चित केले होते. माननीय मुख्यमंत्री यांनी या नवीन धोरणास स्थगिती दिलेली होती. याबाबत सदर प्रकरण माननीय उच्च न्यायालयामध्ये गेले. त्यावेळी उच्च न्यायालयाने असे सूचित केले की, राज्य शासनाने मासेमारी संदर्भात एक सर्वकष धोरण निश्चित करावे. माननीय उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे राज्य शासनाने दिनांक ३० जून २०१७ रोजी सर्वंकष धोरण जाहीर केले आहे. सदर धोरणामध्ये असे नमूद केले आहे की, २० हेक्टरपर्यंतच्या तलावास प्रति हेक्टर १८०० रुपये दर निश्चित केलेला आहे. या नवीन धोरणाची अंमलबजावणी सुरू आहे. या संदर्भात मुंबई व नागपूर येथील माननीय उच्च न्यायालयामध्ये प्रत्येकी दोन रीट पिटीशन दाखल केलेले आहे. या संदर्भातील सुनावणीची तारीख १३ सप्टेंबर २०१७ रोजी होती पण काही कारणास्तव ही तारीख पुढे ढकलण्यात आली आहे. या विषयाच्या संदर्भात प्रश्न असा निर्माण होतो की, जे जिल्हा परिषदेचे तलाव आहेत ते पाटबंधारे विभागाकडून मत्स्यव्यवसाय विभागाकडे वर्ग करण्याइतकेच हे धोरण लागू आहे. जिल्हा परिषदेनी चालू भावाप्रमाणे लिलाव केले तर पशुसंवर्धन विभागाची तक्रार नाही. त्यांना जर त्यांच्या दरासंदर्भात स्वतःचे धोरण निश्चित करावयाचे असेल तर ते करू शकतात. अशा प्रकारची सदर माहिती कृषी विभागाकडून वेळोवेळी ग्रामविकास विभागास दिलेली आहे. त्याचे कारण असे की, पाटबंधारे विभागानी मत्स्यव्यवसाय विभागाकडे वर्ग केलेल्या तलावांची संख्या २,५७९ अशी आहे. जिल्हा परिषदेच्या तलावाची संख्या २०,०१८ अशी आहे.

समितीने ग्रामविकास विभागास विचारणा केली की, कृषी विभागाने दिलेल्या माहितीच्या संदर्भात ग्रामविकास विभागाचे मत काय आहे, यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, जिल्हा परिषद ही एक स्वायत्त संस्था असल्यामुळे या संदर्भातील निर्णय घेण्याचे अधिकार जिल्हा परिषदेस आहेत. सर्व विभाग शासकीय धोरणानुसारच सदर योजनेची अंमलबजावणी करीत असतात. यामधील दर कमी जास्त करण्याचे अधिकार जिल्हा परिषदेस आहेत. शासनाच्या धोरणानुसारच अंमलबजावणी करावी अशा प्रकारच्या सूचना ग्रामविकास विभागाच्या स्तरावरुन जिल्हा परिषदेस देणार नाही. या संदर्भातील निर्णय जिल्हा परिषदेनीच घ्यावा. अशा प्रकारचा निर्णय घेण्याचा अधिकार जिल्हा परिषदेस

आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, या संदर्भात शासनाने जिल्हा परिषदेस काही निकष ठरवून दिलेले आहेत, त्या निकषानुसारच जिल्हा परिषदेस काम करावे लागते. शासनाने आखून दिलेल्या निकषाबाहेर जिल्हा परिषद जाऊ शकत नाही. जर यामध्ये काही बदल करावे लागत असेल तर जिल्हा परिषदेस शासनाची परवानगी घेणे आवश्यक आहे. शासनाच्या निकषाप्रमाणेच प्रति हेक्टरी ४५० रुपयांपेक्षा जास्त भाव वाढवता येईल अन्यथा या संदर्भात शासनाने धोरण निश्चित करून जिल्हा परिषदेवर निर्बंध घालावे लागतील. या संदर्भात जिल्हा परिषदेने स्वतःचे धोरण ठरविलेले आहे का, यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, सर्व जिल्हा परिषदा शासनाच्या व पशुसंवर्धन विभागाच्या धोरणानुसारच काम करीत आहे. महसुलात वाढ करण्याच्या दृष्टिने या संदर्भातील कोणताही अहवाल समितीस सादर केलेला नाही. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, नागपूर जिल्ह्यातील सर्व तलावांचे लिलाव झालेले आहेत का, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांनी समितीस विदित केले की, नागपूर जिल्ह्यातील लघुसिंचन तलावांची संख्या १२४ आहे. माल गुजारी तलावांची संख्या २१४ आहे. दिनांक ०४ जानेवारी २००२ च्या शासन निर्णयानुसार सन २०१३-१४ मध्ये एकूण ९९ तलावांचा लिलाव झालेला होता. त्या अनुषंगाने ८ लाख ३२ हजार ५५० रुपयांचे उत्पन्न होते. सन २०१४ मध्ये दिनांक २६ जून, २०१४ चा शासन निर्णय झाला नसल्यामुळे सन २००२ च्या शासन निर्णयाप्रमाणे त्या तलावांचा लिलाव करण्यात आलेला आहे एकूण ३१ तलावांचा लिलाव होता. यासाठी ४ लाख १४ हजार ९७५ रुपये निश्चित केली होती. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, या तलावांची सद्यःस्थिती काय आहे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांनी समितीस विदित केले की, दिनांक ३ जून २०१७ च्या शासन निर्णयाप्रमाणे १२१ तलावांचा लिलाव झालेला आहे. यासाठी ३२ लाख ४१ हजार ४५५ रुपये निश्चित केलेले आहेत.

## अभिप्राय व शिफारशी

समितीने नागपूर जिल्हा परिषदेला दिनांक २९, ३० सप्टेंबर व ०१ ऑक्टोबर २०१५ या कालावधीत भेट देऊन मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिका-यांची सन २०१२-१३ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील प्रश्नावली क्रमांक १ व २ संबंधात साक्ष घेतली. साक्षीदरम्यान जिल्हा परिषदेच्या उत्पन्नाच्या स्त्रोतांबाबत समितीने विचारणा केली असता नागपूर जिल्ह्यात १२४ लघुसिंचन तलाव व २१४ माजी मालगुजारी तलाव असून त्यामध्ये मासेमारी करण्याकरिता प्रति हेक्टरी ३०० रुपये दराने ठेका दिला जात असल्याची समितीला माहिती मिळाली. समितीच्या मते ३०० रुपये प्रति हेक्टरी दर हे मासळी बाजारातील किमतींच्या तुलनेने खुपच कमी असून त्यामध्ये वाढ होणे आवश्यक आहे. सन २०१५-२०१६ या वर्षात ५ लाख ११ हजार ४२८ इतके उत्पन्न आले. सदर उत्पन्न अत्यंत अल्प प्रमाणात असल्यामुळे मासेमारीच्या ठेक्यांच्या प्रती हेक्टरी दरामध्ये वाढ करण्याच्या अनुषंगाने समितीने विभागीय सचिवांची साक्ष घेतली.

नागपूर जिल्ह्यातील लघुसिंचन, मालगुजारी व गाव तलावांच्या मासेमारीसाठी तलावांच्या ठेक्याचा दर वाढविण्याबाबत कोणती कार्यवाही केली याबाबत समितीने कृषी, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्सव्यवसाय विभागाच्या सचिवांना विचारणा केली असता विभागाच्या सचिवांनी समितीच्या प्रश्नाच्या अनुषंगाने ठेक्याच्या दरात केलेल्या वाढीसंदर्भात माहिती दिली. शासनाच्या दिनांक ४ जानेवारी २००२ च्या शासन निर्णयानुसार प्रति हेक्टरी ३०० रुपये दर निश्चित करण्यात आला होता. तद्नंतर दिनांक २६ जून २०१४ च्या शासन निर्णयान्वये तो दर प्रति हेक्टरी ४५० रुपये असा वाढविण्यात आला. समितीने जिल्हा परिषदेस भेट दिली त्यावेळी तो दर ४५० रुपये प्रति हेक्टरी होता. अहवाल वर्षात जिल्हा परिषदेला त्यातून ७,२६,०४४ रुपये उत्पन्न प्राप्त झाले. **त्यानंतर शासनाने दिनांक ३ जून २०१७ रोजी शासन निर्णय निर्गमित करून प्रति हेक्टरी १८००/- रुपये इतका सुधारित दर निश्चित केला असल्याची माहिती समितीस प्राप्त झाली.**

नागपूर जिल्हा परिषदेला समितीने भेट दिली त्या सन २०१५-२०१६ या वर्षातील तलावांच्या ठेक्यातून मिळणारे उत्पन्न हे नाममात्र म्हणजेच रुपये ५,११,४२५ एवढे होते. **परंतु विभागाने समितीच्या विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी उपस्थित होताना शासन निर्णयाद्वारे प्रति हेक्टरी रुपये १८०० एवढी घसघशीत वाढ केली. त्यामुळे नागपूर जिल्हा परिषदेचे उत्पन्न रुपये ३२,४१,४५५ एवढे वाढले आहे. विभागाने सकरात्मक निर्णय घेतल्यामुळे नागपूर जिल्हा परिषदेचे उत्पन्न वाढले आहे. राज्यात इतरही अशाच प्रकारे समितीला या तलावांच्या ठेक्यांमध्ये अत्यंत कमी रक्कम कंत्राटातून मिळत असल्याचे समितीच्या निदर्शनास आले व त्याचा जिल्हा परिषदांच्या उत्पन्नावर परिणाम होत असल्यामुळे दिनांक ३ जून २०१७ रोजीच्या शासन निर्णयामुळे राज्यातील सर्वच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या ताब्यातील तलावांच्या ठेक्यामुळे मिळणारे उत्पन्न वाढल्यामुळे जिल्हा परिषदांच्या उत्पन्नात वाढ होत झाल्याबाबत समिती समाधान व्यक्त करते.**

## प्रकरण तीन

## जिल्हा परिषद, नागपूर (प्रशासन)

### समदाबाने पाणीपुरवठा करण्याबाबत

समितीने दिनांक २९, ३० सप्टेंबर व ०१ ऑक्टोबर २०१५ या कालावधीत नागपूर जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी समितीला कळमेश्वर येथे पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता यांनी पाणी पुरवठ्याच्या बाबतीत एक व्हॉल्व्ह बसविल्यास सर्व गावाला सम प्रमाणात सम दाबाने पाणी पुरवठा करता येत असल्याबाबत अतिशय चांगल्या प्रकारचा प्रयोग करून दाखविला. समितीच्या मते हा पॅटर्न यशस्वी झाल्यास तो संपूर्ण महाराष्ट्रात नागपूर पॅटर्न नावाने राबविता येऊ शकेल. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, सम प्रमाणात २४ तास पाणीपुरवठा करण्यासाठी एक गावाची निवड केली. तेथे २४ तास पाणी असल्यामुळे कोणीही पाण्याचा साठा करून ठेवत नाही. यावर समितीने असे निदेश दिले की, हा प्रयोग यशस्वी झाल्यास नागपूर पॅटर्न म्हणून सदर योजना राबविण्याबाबत समितीमार्फत शिफारस केली जाईल. यावर कार्यकारी अभियंता (ग्रामीण पाणीपुरवठा) यांनी समितीस विदित केले की, सद्यःस्थितीत गावांमध्ये विविध नळ पाणी पुरवठा योजनांद्वारे पाणी पुरवठा केला जात आहे. पाण्याच्या टाकीतून वितरण व्यवस्थेद्वारे पाणी पुरवठा करताना व्हॉल्व्ह सुरू केल्यानंतर टाकी जवळील भागात किंवा उतारावरील भागातील नळांना जास्त प्रमाणात व जास्त वेळ पाणीपुरवठा होतो. या उलट टाकीपासून दूर असलेल्या व उंच भागांमध्ये असलेल्या नळांना कमी प्रमाणात पाणीपुरवठा होतो. ही असमानता दूर करण्यासाठी नळाजवळ एलबो (elbow) ऐवजी फेरुल बसवून फेरुलद्वारे प्रत्येक नळाचा प्रवाह १० ते १२ लीटरर्स प्रति मिनिट एवढा सेट केल्यास सर्व ग्राहकांना कमीत कमी एक तास समप्रमाणात व समदाबाने पाणीपुरवठा होऊ शकेल. ही योजना राबविल्यानंतर पाणी टंचाईच्या काळात सर्वांना आवश्यक व समान प्रमाणात पाणी मिळू शकेल. तसेच नळ पाणीपुरवठा योजना कार्यान्वित केल्यानंतर वाढीव लेआऊटला नळ जोडण्या देताना जुन्या नळ जोडण्यांचा प्रवाह कमी होतो. ही बाब विचारात घेता, नवीन नळ जोडण्या व जुन्या नळ जोडण्या याचे फेरुल पुन्हा सेट केल्यास सर्व ग्राहकांना समप्रमाणात व समदाबाने पाणी मिळू शकेल. यामुळे गावांमध्ये व्हॉल्व्हद्वारे झोनिंग करण्याची गरज पडणार नाही.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

जिल्हा परिषदेमध्ये डास निर्मुलनासाठी तसेच पाणी पुरवठ्याच्या संदर्भात समदाबाने पाणीपुरवठा करण्यासंदर्भात तसेच साक्षीच्या वेळी विशद केलेला नागपूर पॅटर्न इतर जिल्हा परिषदांमध्ये राबविण्याबाबत शासनाची काय भूमिका आहे. सदरची योजना उपयुक्त/फायदेशीर असल्यास ती इतर जिल्हा परिषदांमध्ये राबविण्यासंदर्भात विभागाचे काय मत आहे ?

**समितीस जिल्हा परिषदेकडून उपरोक्त मुद्यांची खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.**

सद्यःस्थितीत गावांमध्ये विविध पाणीपुरवठा योजनांद्वारे पाणीपुरवठा करण्यात येतो. पाण्याच्या टाकीमधून वितरण व्यवस्थेद्वारे पाणीपुरवठा करतांना टाकी जवळील भागात किंवा उतारावरील भागातील नळांना जास्त प्रमाणात व जास्त वेळ पाणी पुरवठा होतो. तसेच टाकीपासून दुर असलेल्या नळांना व उंच भागात कमी प्रमाणात पाणीपुरवठा होतो. सदर असमानता दुर करण्यासाठी नळाजवळील एलबो (elbow) ऐवजी फेरुल बसवून फेरुल द्वारे प्रत्येक नळाचा प्रवाह १० ते १२ लिटर्स प्रति मिनिट एवढा सेट केल्यास सर्व ग्राहकांना समप्रमाणात व समदाबाने पाणी मिळेल व कमीत कमी टंचाई कालावधीत अर्धी टाकी भरल्यास सर्वांना आवश्यक व समान पाणी मिळते. तसेच नळ योजना कार्यान्वीत केल्यांनतर वाढीव लेआउटला नळ जोडण्या देताना जुन्या नळ जोडण्याचा प्रवाह कमी होतो. तेव्हा नवीन नळ जोडण्या व जुन्या नळ जोडण्या यांचे फेरुल पुन्हा सेट करून ग्राहकांना सम प्रमाणात पाणी मिळते व गावात वॉल्वद्वारे झोनिंग करण्याची गरज भासत नाही.

**पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे अभिप्राय :—**

समदाबाने पाणी पुरवठा करण्याकरिता नवीन नळ पाणी पुरवठा योजनांचे आराखडे तयार करताना/नवीन नळ पाणी पुरवठा योजना राबवितांना नागपूर पॅटर्न सर्व जिल्हा परिषदांमध्ये राबविण्याबाबत या विभागाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

(अ) ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनांचे नियोजन व संकल्पन ४० लिटर प्रतिदिनी दर दिवशी प्रमाणे आवश्यक असणारे पाणी ६ ते ८ तासांच्या कालावधीमध्ये पुरविण्याच्या दृष्टीने करण्यात येते. नळाचा प्रवाह १० ते १२ लिटर्स प्रति मिनीट एवढा सेट केल्यास, एका कुटुंबासाठी ४० लिटर प्रतिदिनी दरदिवशी प्रमाणे पुरवावयाचे पाण्याचा (साधारणतः २०० लिटर) फक्त २० मिनीटांमध्ये पुरवठा होईल त्यामुळे सर्वांना पुरेसा पाणी पुरवठा होणार नाही.

(आ) पाणी पुरवठा योजना चालविणा-या यंत्रणेने सेट केलेले फेरुल ग्राहकांकडून पूर्वस्थितीत आणले जाऊ शकतात. त्यामुळे या पद्धतीमध्ये पाणी पुरवठ्यावर नियंत्रण राहू शकत नाही.

(इ) १०० टक्के ग्राहाकांचे फेरुल सेट केलेल्या स्थितीत कायमस्वरुपी न राहील्यास, ही व्यवस्था कार्यक्षमपणे काम करु शकणार नाही.

(ई) फेरुल ऐवजी फलो कंटोल वॉल्व लावणे हा एक पर्याय आहे, ज्यामुळे ठराविक परिमाणाने/दाबाने पाणी पुरवठा करणे शक्य आहे व या पद्धतीमध्ये अनधिकृतपणे फेरबदल करणे शक्य नाही. तसेच पंप लावुनसुद्धा जास्त दराने पाणी ओढता येत नाही. तथापि या यंत्राचे सुद्धा प्रात्यक्षिक बघणे आवश्यक आहे, यानंतरच प्रत्यक्ष अंमलबजावणी व कार्य यांच्या तपासणीनंतरच याबाबत ठोस निर्णय घेणे शक्य होईल.

उपरोक्त बाबी लक्षात घेता, पुरेशा अभ्यासशिवाय नागपूर पॅटर्न सर्व राज्यामध्ये राबविणे योग्य होणार नाही. याबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अंतिम अभिप्राय शासनास प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल. तथापि, सर्व प्रकारच्या योजनांकरीता जलमापकासह १०० टक्के नळ जोडण्या देणे ही जास्त खात्रीशीर उपाययोजना आहे.

## चौकशी अहवाल

## "फेरुल" द्वारे प्रवाह नियंत्रण करणे व वितरण व्यवस्थेचा दाब वाढविणे

सद्यःस्थितीत गावांमध्ये विविध पाणी पुरवठा योजनांद्वारे पाणी पुरवठा करण्यात येतो. पाण्याच्या टाकीमधुन वितरण व्यवस्थेद्वारे पाणी पुरवठा करताना टाकी जवळील भागात किंवा उतारावरील भागातील नळांना जास्त प्रमाणात व जास्त वेळ पाणी पुरवठा होतो. तसेच टाकी पासून दुर असलेल्या नळांना व उंच भागात कमी प्रमाणात पाणी पुरवठा होतो. सदर असमानता दूरकरण्याकरिता नळाजवळील **एलबो (elbow)** ऐवजी **फेरुल** बसवून फेरुलद्वारे प्रत्येक नळाचा **प्रवाह १० ते १२ लीटर्स प्रति मिनिट एवढा** सेट केल्यास सर्व ग्राहकांना समप्रमाणात व समदाबाने पाणी मिळेल तसेच कमीत कमी एक तास पाणी पुरवठा होवू शकेल.

सदर उपाययोजना राबविल्यानंतर टंचाई कालावधीत अर्धी टाकी भरल्यास सर्वांना आवश्यक व समान पाणी मिळते. तसेच नळ योजनाकार्यान्वित केल्यानंतर वाढीव लेआऊटला नळजोडण्या देतांना जुन्या नळजोडण्यांचा प्रवाह कमी होतो. तेव्हा नविन नळजोडण्या व जुन्या नळजोडण्या यांचे फेरुल पुन्हासेट करून सर्व ग्राहकांना समप्रमाणात पाणी मिळेल व गावात व्हॉल्व द्वारे झोनींग करण्याची गरज भासणार नाही.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने नागपूर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १० ऑक्टोबर, २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. उक्त साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, समदाबाने पाणीपुरवठा करण्यासंदर्भात तसेच साक्षीच्यावेळी विशद केलेला नागपूर पॅटर्न इतर जिल्हा परिषदांमध्ये राबविण्याबाबत शासनाची काय भूमिका आहे. सदरची योजना उपयुक्त/फायदेशीर असल्यास ती इतर जिल्हा परिषदांमध्ये राबविण्यासंदर्भात विभागाचे काय मत आहे, यावर अप्पर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी समितीस विदित केले की, नळ पाणी पुरवठा योजना राबविताना व वैयक्तिक नळ जोडणी देताना सर्व घरांना समप्रमाण व समदाबाने पाणी पुरवठा करण्याच्या दृष्टिने नागपूर येथे जी पाणी पुरवठा योजना राबविण्यात येत आहे ती सर्व राज्यात राबविण्यासाठी आणखी अभ्यास करण्याची गरज आहे. सद्यःस्थितीत केंद्र शासनाकडून नॅशनल प्रोग्राम राबविण्यात येत आहे. त्या अंतर्गत पाण्याचे कनेक्शन देताना मीटर पद्धत लागू करण्याचे धोरण आहे. सन २०१६ या वर्षात महाराष्ट्रामध्ये मुख्यमंत्री पेयजल योजना सुरू केली असून वैयक्तिक नळ योजनेसाठी मीटर बसविण्यात येणार आहे. या दोन्ही योजनांचा अभ्यास व तांत्रिक तपासणी करण्यासाठी समिती नियुक्त करण्यात आली आहे. लोकांना समप्रमाणात व समदाबाने पाणी पुरवठा मिळायला पाहिजे त्यामुळे व्हॉल्व बसविणे आवश्यक आहे किंवा कसे याबाबत तज्ञ समिती अभ्यास करीत आहे. त्याचप्रमाणे मीटर बसविले तर व्हॉल्व बसविण्याची गरज नाही. यासंदर्भात समितीने सविस्तर अभ्यास करून अहवाल दिल्यानंतर निर्णय घ्यावा लागणार आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, नियुक्त केलेल्या समितीचा अहवाल केव्हा येणार आहे, नागपूर जिल्हा परिषदेकडून ही योजना नागपूर शहरात राबविण्यात येत असताना ती १०० टक्के यशस्वी झालेली आहे किंवा नाही, यावर अप्पर मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांनी समितीस विदित केले की, एका महिन्यात अहवाल द्यावा असे समितीला सांगण्यात आले आहे. यावर अप्पर मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांनी समितीस विदित केले की, नागपूर जिल्ह्यात योजना राबवित असताना अभ्यास करण्यात येत आहे. व्हॉल्व बसविण्यासाठी खर्च येणार आहे. सन २०१६ मध्ये राज्य शासनाने मुख्यमंत्री ग्रामीण पाणी पुरवठा योजना सुरू केली आहे. या योजनेनुसार वैयक्तिक कनेक्शन देताना मीटर लावण्यात येणार आहे. मीटर लावले तर व्हॉल्व लावण्याची आवश्यकता नाही. मीटर लावल्यावर पाण्याचा वापर लोक काटकसरीने करतात. मीटर लावल्यावर युनिटप्रमाणे देयके येतात. व्हॉल्व लावले तर मीटर लावण्याची आवश्यकता नाही. सन २०१६ मध्ये मुख्यमंत्री ग्रामीण पाणी पुरवठा योजना सुरू झालेली असल्यामुळे त्या योजनेनुसार पाण्याचे मीटर लावण्यात येतात. त्यामुळे व्हॉल्व किंवा मीटर बसवावे यासंदर्भात तांत्रिक समितीची नियुक्ती करण्यात आली आहे. मीटरने पाणी देताना ते मोजून देण्यात येते. त्यामुळे पाणी वापरावर थोडे निर्बंध येऊ शकतात.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, पाणी पुरवठा योजनेला मीटर लावावे की व्हॉल्व लावावा हा विषय नाही. मीटर लावले तर व्हॉल्व लावावे लागणार नाही. मीटर व व्हॉल्वच्या कनेक्शनबाबत काही संबंध येत नाही. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, मीटर लावले तर पाण्याचा वापर मोजून होतो. त्याचे पेमेंट मीटरप्रमाणे द्यावे लागते. मीटर लावले तर पाण्याचे वाटप सारखे होईल. सर्वांना सारखे पाणी मिळाले पाहिजे हा महत्वाचा मुद्दा आहे. मीटर लावले तर पाण्याचा वापर काटकसरीने केला जातो. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, पाण्याचे वाटप करताना व्हॉल्वची आवश्यकता आहे काय, समप्रमाणात व समदाबाने पाणी सर्वांना मिळाले पाहिजे. व्हॉल्वची आवश्यकता आहे की मीटर बसविण्याची आवश्यकता आहे. यासंदर्भातील विभागाचा निर्णय झालेला आहे काय, त्यामुळे हा पॅटर्न महाराष्ट्रात राबवावा किंवा नाही हा महत्वाचा विषय आहे. यावर अप्पर मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांनी समितीस विदित केले की, नागपूर पॅटर्न राबवावा किंवा कसे याबाबत अभ्यास समिती नियुक्त करण्यात आली आहे. समितीचा अहवाल आलेला नाही.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर मीटर बसवावे किंवा व्हॉल्व बसवावा याचा निर्णय घेण्यात यावा. ही योजना राज्यभर राबविण्यासाठी समितीचा अहवाल प्राप्त झाल्यावर या संदर्भातील योग्य तो निर्णय घेण्यात यावा. सन २०१५ मध्ये पंचायती राज समितीने हा पॅटर्न राज्यात राबवावा असे सूचित केले होते. आता सन २०१७ वर्षे सुरू आहे. यामध्ये दोन गोष्टींचा अभ्यास करण्यात येत आहे. या दोन बाबींचा अभ्यास दोन वर्षात देखील झालेला नाही. या विषयाचा अभ्यास करण्यासाठी आता समिती नियुक्त करण्यात आली आहे. यावर अप्पर मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांनी समितीस विदित केले की, मागच्या वर्षी सन २०१६ मध्ये मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल योजना सुरू झाली आहे. योजना मीटरप्रमाणे राबविण्यात येत असल्यामुळे व्हॉल्व लावावा किंवा कसे याचा अभ्यास करण्यासाठी समिती नियुक्त करण्यात आली आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, ही योजना महाराष्ट्रभर राबविण्याबाबत विभागाचे काय मत आहे. यासंदर्भात विभागाचे अद्याप अंतिम मत झालेले नाही. त्यांनी समिती नियुक्त केलेली आहे. त्यानंतर त्यांचे अंतिम मत ठरणार आहे. यावर अप्पर मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांनी समितीस विदित केले की, तांत्रिक समितीची नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यांना एक महिन्याची मुदत दिली आहे. समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर सदर योजनेबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, नागपूर शहरात २४ × ७ पाणी पुरवठा योजना राबविण्याच्या पॅटर्नचा विषय आहे. मीटर बसविले तर ज्याप्रमाणे वीज वापर करताना युनिट वाढले तर त्यांचा दर वाढतो तसेच पाण्याच्या मीटर पद्धतीचे आहे. त्यामुळे या योजनेची सविस्तर तपासणी करण्यासाठी तज्ञांचे मत मागविण्यात आले आहे. सन २०१५ मध्ये पंचायती राज समितीने सूचित केले असले तरी हा संपूर्ण राज्याचा विषय आहे. त्यामुळे तांत्रिक बाबींची तपासणी करून समितीला एक महिन्याच्या आत अहवाल सादर करावा असे समितीने निदेशित केल्यावर अप्पर मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांनी समितीस होकारार्थी आश्वासित केले.

## अभिप्राय व शिफारशी

समितीने नागपूर जिल्हा परिषदेला दिनांक २९, ३० सप्टेंबर व ०१ ऑक्टोबर, २०१५ या कालावधीत भेट देऊन मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिका-यांची सन २०१२-१३ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील प्रश्नावली संबंधात साक्ष घेतली. साक्षीच्या दरम्यान कळमेश्वर येथे पाणी पुरवठा विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांनी प्रत्येक नळाला एक विशेष वॉल ज्याचे नाव फेरुल असे आहे ते बसविल्यानंतर संपूर्ण गावामध्ये समप्रमाणात आणि समदाबाने पाणी पुरवठा करता येत असल्याबाबतचा एक चांगला प्रयोग समितीला करून दाखविला आहे. समितीच्या मते ही पद्धत यशस्वी होत असेल तर ती संपूर्ण राज्याकरीता राबविता येऊ शकते त्यामुळे समितीने यासंदर्भात विभागीय सचिवांची साक्ष घेतली.

विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी सचिवांनी समितीस यासंदर्भात फेरुलद्वारे सर्वांना पुरेसा पाणी पुरवठा होणार नसल्याचे तसेच ग्राहकांकडून फेरुलची सेटींग काढली जाण्याची शक्यता लक्षात घेता सदर पद्धत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अंतिम अभिप्राय शासनास प्राप्त झाल्याशिवाय तसेच उक्त क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींचा अभिप्राय प्राप्त झाल्याशिवाय याबाबत अंतिम निर्णयाप्रत येऊ नये असे समितीचे मत आहे.

**समितीने विभागीय सचिवांना यासंदर्भात अभिप्राय विचारले असता विभागाने जीवन प्राधिकरणाचे अंतिम अभिप्राय घेऊनच समितीसमोर उपस्थित होणे आवश्यक होते. परंतू विभागाने यासंदर्भात अभ्यास करण्यासाठी समितीची नियुक्ती केलेली आहे. सन २०१६ मध्ये राज्यात मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल योजना सुरू झाली असून त्यामध्ये मीटर बसविण्यात येत आहेत. प्रत्येक नळाला मीटर लावले जात असताना त्यासोबत फेरुल बसवावे किंवा कसे याचा अभ्यास करण्यासाठी विभागाने समिती नियुक्त केली आहे. विभागीय सचिवांनी आश्वासित केल्याप्रमाणे समितीचा अहवाल उक्त क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींकडून शिफारशींसह प्राप्त करून घ्यावा व अशा अभिप्रायासह प्राप्त झालेल्या अहवालानंतर पिण्याच्या पाण्याच्या नळांना फेरुल पद्धती राज्यात अनिवार्य करण्यात यावी किंवा कसे याबाबतचा अंतिम निर्णय घेण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.**

## प्रकरण चार

## जिल्हा परिषद, नागपूर (प्रशासन)

### जिल्ह्यातील अंगणवाड्यांच्या इमारती संदर्भात शासनाकडे प्रस्ताव पाठविण्याबाबत

समितीने दिनांक २९, ३० सप्टेंबर व ०१ ऑक्टोबर, २०१५ या कालावधीत नागपूर जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी सन २०१२-१३ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान समितीला जिल्ह्यातील अंगणवाड्यांच्या इमारती संदर्भात शासनाकडे प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत माहिती प्राप्त झाली. त्यावर समितीने अंगणवाड्यांच्या संदर्भात कार्यवाही करून समितीला तत्संदर्भातील अहवाल सादर करावा. जिल्हा परिषदेने एक महिन्याचा कार्यक्रम ठरवून जिल्ह्यातील अंगणवाड्यांच्या इमारती मजबूत कराव्यात, अंगणवाड्यांना लागणा-या सोयीसुविधांच्या संदर्भात कार्यवाही करावी, शिक्षकांसाठी प्रशिक्षण शिबिरे आयोजित करावीत तसेच अंगणवाड्यांतील मुलांना कोणते शिक्षण दिले पाहिजे या संदर्भातील अहवाल एका महिन्याच्या आत समितीला सादर करावा. सदर बाबतीत एक महिन्यात निर्णय घ्यावा. अंगणवाड्यांच्या इमारतींची कमतरता असेल तर प्रस्ताव तयार करून समितीकडे पाठवावा असे समितीने निदेश दिले. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, अंगणवाडी इमारतीसाठी ६ लाख रूपयांची मर्यादा आहे. नाशिक, अहमदनगर या भागात प्रि-फॅब्रिकेशन स्ट्रक्चर वापरले जाते. त्यामुळे त्या इमारती अत्यंत सुबक व दर्जेदार दिसतात. सदर इमारतींची कामे १५ दिवसांत पूर्ण होतात. येथे स्लॅबच्या इमारती होतात. त्या बरोबर होत नाहीत. प्रि-फॅब्रिकेशन स्ट्रक्चरच्या इमारती केल्या पाहिजेत. फार चांगल्या इमारती होतात. यावर समितीने निदेश दिले की, नाशिकचे व नागपूरचे हवामान यामध्ये फरक आहे. त्यामध्ये मुलांना गरम होते की नाही ते पाहून घ्यावे.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

जिल्ह्यातील अंगणवाड्यांच्या इमारती संदर्भात शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे काय, शासनाने त्यावर काय कार्यवाही केली, सदर अंगणवाड्या सक्षम करण्याबाबत त्याचप्रमाणे आवश्यक त्या सोयी-सुविधा पुरविण्याबाबत व शिक्षकांसाठी प्रशिक्षण शिबीर घेण्याबाबत अंगणवाडीतील मुलांना सोयी सुविधा देणे इत्यादी बाबतचा प्रस्ताव तयार करून तो शासनाकडे पाठविण्यात आला आहे काय, असल्यास त्याचे स्वरुप काय आहे, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली ?

**समितीस जिल्हा परिषदेकडून उपरोक्त मुद्दयांची खालील प्रमाणे माहिती प्राप्त झाली.**

जिल्हा परिषद, नागपूर अंतर्गत ग्रामीण व आदिवासी प्रकल्पात एकूण २१६१ अंगणवाडी केंद्र कार्यरत आहे. त्यापैकी ११५६ अंगणवाडींना स्वतंत्र इमारत उपलब्ध आहे. ६४ इमारती पूर्ण झालेल्या आहेत. अंगणवाड्यांच्या इमारती संदर्भात प्रस्ताव शासन सादर करण्यात आला आहे. जिल्ह्यात १९८ इमारतींची बांधकामे प्रगती पथावर आहेत व २५४ अंगणवाडी इमारतींची बांधकामे मंजूर असून त्यांची कामे सुरू झालेली आहेत.

सर्वसाधारण जिल्हा वार्षिक प्रारुप योजना सन २०१६-१७ करीता अंगणवाडी इमारत बांधकामासाठी रु.१५.०० कोटी निधी प्रस्तावित करण्यात आला असून यातून २५० नवीन कामे हाती घेण्यात येतील व उर्वरीत बांधकामे सन २०१७-१८ च्या योजनेतून पूर्ण करण्यात येतील असे नियोजन जिल्हा स्तरावर करण्यात आलेले आहे व तसे शासनास कळविण्यात आले आहे.

अंगणवाडी केंद्रांना आवश्यक सोईसुविधा उपलब्ध करून देणेबाबत संबंधित ग्राम पंचायतीच्या १० टक्के महिला व बालकल्याण निधीमधून आवश्यक तरतूद करण्यास तसेच अंगणवाडींना आवश्यक सोई सुविधा उदा. विद्युत व्यवस्था इ. करीता खर्च करण्यास कळविण्यात आलेले आहे. अंगणवाडीतील विद्युत व्यवस्थेचे मासिक बिल भरण्यासाठी आवश्यक तरतूद एकात्मिक बालविकास विकास सेवा योजना अंतर्गत उपलब्ध होत नाही. अशी तरतूद उपलब्ध झाल्यास अंगणवाडीत विद्युत व्यवस्था करता येईल. या संदर्भात प्रत्येक अंगणवाडी केंद्रासाठी सौर पॅनल वर आधारीत विद्युत व्यवस्था उभारणेसाठी या कार्यालयाचे पत्र क्र. १६०७ दिनांक ५ डिसेंबर २०१५ नुसार प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग यांना प्रस्ताव सादर केलेला आहे. तसेच या संदर्भात हिवाळी अधिवेशन, २०१५ मध्ये मा.ऊर्जामंत्री तथा पालकमंत्री महाराष्ट्र राज्य यांची मा.मंत्री महिला व बालविकास विभाग यांचेशी प्राथमिक चर्चा झालेली आहे.

स्वतंत्र तसेच सार्वजनिक अंगणवाडी इमारतीच्या देखभाल व दुरुस्तीसाठी प्रतीकेंद्र रुपये २०००/- निधी एकात्मिक बालविकास सेवा योजना बळकटीकरण व पुर्नरचना अंतर्गत नव्याने मंजूर झालेला आहे. तसेच महिला व बालकल्याण समिती योजनेत रु.४०.०० लक्ष ची तरतूद खेळणी साहित्य पुरविण्याकरीता उपलब्ध असून खरेदी प्रक्रिया सुरू आहे. पुर्व प्राथमिक शिक्षणात नाविण्यपुर्ण उपक्रम राबविणा-या अंगणवाडी सेविका/ पर्यवेक्षिका यांचेसाठी प्रोत्साहनपर पुरस्कार योजना देखील राबविण्यात येत आहे. अंगणवाडींना सोई सुविधा पुरविण्याबाबत प्रस्ताव आयुक्त, एकात्मिक बालविकास सेवा योजना, नवी मुंबई यांना सादर करण्यात आला आहे. तसेच मुलांना कोणते शिक्षण देण्यात यावे याबाबत समितीला कळविण्यात आले आहे.

अंगणवाडीतील मुलांना आधुनिक तंत्रज्ञानावर आधारीत शिक्षण पुरविणेसाठी प्रायोगिक तत्वावर Stepping Stones Project अंतर्गत अंगणवाडी सेविका यांचे क्षमता वर्धन करण्यासाठी तसेच अंगणवाडीतील मुलांची उपस्थिती वाढविण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. या अंतर्गत हिंगणा प्रकल्पातील ११ अंगणवाडी केंद्र निवडण्यात आलेली आहेत. या अंतर्गत अंगणवाडी केंद्र आणि खाजगी नर्सरी स्कुल यांच्यामध्ये समन्वय साधून प्रशिक्षण देण्यात येत आहे.

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत अंगणवाडी सेविका प्रशिक्षण केंद्रामार्फत अंगणवाडी सेविकांना पायाभूत प्रशिक्षण तसेच दर दोन वर्षात उजळणी प्रशिक्षण देण्यात येत आहे. तसेच तालुका स्तरावर दरमहा आढावा बैठक आयोजित करण्यात येवून आवश्यक सुचना सुद्धा देण्यात येतात. एकात्मिक बालविकास सेवा योजना अंतर्गत पुर्व बाल्यावस्थेतील संगोपन व शिक्षण (ECCE) यावर आधारीत "आकार" अभ्यासक्रम केंद्र शासनामार्फत तयार करण्यात आला असून यासंबंधीचे प्रशिक्षण लवकरच आयोजित करण्यास्तव पत्र क्र. १६१५ दिनांक ९ डिसेंबर २०१५ अन्वये विनंती करण्यात आली आहे. अंगणवाडी केंद्रामध्ये ३ वर्ष ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना हसत खेळत शिक्षण या संकल्पनेवर आधारीत पुर्व शालेय शिक्षण देण्यात येते. अनौपचारीक पुर्व शालेय शिक्षण दर्जेदार व मनोरंजक व्हावे यासाठी एकात्मिक बालविकास सेवा योजना बळकटीकरण व पुनर्रचना अंतर्गत प्रती अंगणवाडी रु.२५००/- या प्रमाणे PSE किटकरीता तरतूद उपलब्ध झालेली आहे. यातून खरेदी करण्याची कार्यवाही सुरू आहे.

अंगणवाडीतील मुलांना दिले जाणा-या शिक्षणात कालानुरुप आवश्यक बदल व्हावा या उद्देशाने नुकताच महाराष्ट्रात "आकार" हा पाठ्यक्रम तयार करण्यात आला आहे. एकात्मिक बालविकास सेवा योजना, युनिसेफ, महाराष्ट्र राज्य शिक्षण प्रशिक्षण संशोधन मंडळ, पुणे तसेच पुर्व शालेय शिक्षण तज्ञ यांनी एकत्रितरित्या हा पाठ्यक्रम तयार केला आहे. पुर्व शालेय शिक्षणांतर्गत पाठ्यक्रमाचे हे धोरण मान्यतेसाठी शासनाकडे सादर करण्यात आलेले असून पुढील वर्षापासून या पाठ्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

याबाबतचे राज्यस्तरावरील प्रशिक्षण पुर्ण करण्यात आले असून लवकरच पर्यवेक्षिका स्तरावरील प्रशिक्षणास सुरुवात होणार आहे. पर्यवेक्षिका हे प्रशिक्षण अंगणवाडी ताईला देणार असून त्यांचेमार्फत अंगणवाडी केंद्रात हा पाठ्यक्रम राबविला जाणार आहे.

**महिला व बालविकास विभागाचा अभिप्राय :-**

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत विद्युत बिलाकरीता स्वतंत्र निधी उपलब्ध करून दिला जात नाही. अंगणवाडी केंद्र इमारत भाड्या मधूनच संबंधित इमारत मालकाने विद्युत देयक अदा करणे अभिप्रेत आहे.

केंद्र शासनाच्या मनरेगा योजनेअंतर्गत नियोजन विभाग, शासन निर्णय दिनांक २१ सप्टेंबर, २०१५ **(परिशिष्ट क्र.४.१)** मध्ये प्रत्येक अंगणवाडी केंद्रास सोलर पॅनल बसविण्यात येतील यावर किमान एक पंखा व एक ट्यूब लाईट चालेल एवढी क्षमता असावी. किचन गार्डन व सोलर पॅनल यावरील संपूर्ण खर्च महिला व बाल विकास विभागाकडून भागविण्यात येईल अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात माहे १५ जानेवारी, २०१६ रोजी अंगणवाडी केंद्रांची देखभाल याकरीता रुपये २०००/- प्रति अंगणवाडी केंद्र याप्रमाणे एकूण ३९९२९ अंगणवाडी केंद्रांना ७,९८,५८,०००/- एवढी रक्कम आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांच्या स्तरावरुन वितरीत करण्यात आले आहेत.

अंगणवाडी केंद्र इमारत बांधकामाकरीता विविध योजनेअंतर्गत निधी उपलब्ध करण्यात येतो. तथापि कोणत्याही योजनेमध्ये अंगणवाडींना वॉल कंपाऊंड बांधण्याबाबतची बाब समाविष्ट नाही.

सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात प्रति अंगणवाडी रु.२५००/- याप्रमाणे अंगणवाडी शैक्षणिक साहित्य खरेदी करण्याकरीता आयुक्तालय स्तरावरुन नागपूर जिल्ह्याकरीता २१५९ अंगणवाडी केंद्रांना दिनांक २० जानेवारी, २०१६ रोजी तरतूद वितरीत करण्यात आलेली आहे.

केंद्र शासनाच्या मनरेगा योजनेअंतर्गत नियोजन विभाग, शासन निर्णय दिनांक २१ सप्टेंबर, २०१५ मध्ये अंगणवाडी केंद्राचे आवारात किचन गार्डनसाठी प्रयोजन करण्यात यावे. साधारणतः ज्या अंगणवाडी केंद्राकरीता किचन गार्डनसाठी (परसबागसाठी) पुरेशी जागा उपलब्ध असेल अशा केंद्राकरीता स्वतंत्र तरतूद अंगणवाडी केंद्र इमारतीचे बांधकामाचे अंदाजपत्रकात दर्शविण्यात यावी. परसबागेसाठी संपूर्ण खर्च महिला व बाल विकास विभागाकडून भागविण्यात येईल अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

सद्यःस्थितीत अंगणवाडी केंद्रांना महिला मंडळ व बचत गटांमार्फत तयार करून गरम ताजा आहार पुरविण्यात येतो. तसेच बंद पाकिटातून THR एक महिना लाभार्थ्यांना पुरेल एवढा साठा अंगणवाडी केंद्रावर वितरीत करण्यात येतो व दुस-याच दिवशी तो लाभार्थ्यांना घरी बंद पाकीटातून वितरीत करण्यात येतो. त्यामुळे धान्य साठविण्याकरीता लोखंडी कोठीची आवश्यकता भासत नाही.

पुर्व बाल्यावस्थेतील संगोपन व शिक्षण ECCE अंतर्गत आकार या अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण महाराष्ट्र राज्य शिक्षण संशोधन प्रशिक्षण संस्था, पुणे यांचेमार्फत जिल्हानिहाय मास्टर ट्रेनर तयार करणेबाबतचे प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. आतापर्यंत यवतमाळ, पुणे, रायगड, कोल्हापूर, जळगांव या जिल्ह्यांना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. नागपूर जिल्ह्याच्या प्रशिक्षणाबाबत संबंधित संस्थेला विनंती करण्यात आलेली आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने नागपूर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक ११ ऑक्टोबर, २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. उक्त साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, जिल्ह्यातील अंगणवाड्यांच्या इमारती संदर्भात शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे काय, शासनाने त्यावर काय कार्यवाही केली, सदर अंगणवाड्या सक्षम करण्याबाबत त्याचप्रमाणे आवश्यक त्या सोयी-सुविधा पुरविण्याबाबत व शिक्षकांसाठी प्रशिक्षण शिबीर घेण्याबाबत अंगणवाडीतील मुलांना सोयी सुविधा देणे इत्यादी बाबतचा प्रस्ताव तयार करून तो शासनाकडे पाठविण्यात आला आहे काय, असल्यास त्याचे स्वरुप काय आहे, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली, यावर सचिव, महिला व बालविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, जिल्हा परिषद, नागपूर अंतर्गत ग्रामीण व आदिवासी प्रकल्पात एकूण २१६१ अंगणवाडी केंद्र कार्यरत आहे. पैकी ११५६ अंगणवाडींना स्वतंत्र इमारत उपलब्ध आहे. ६४ इमारती पूर्ण झालेल्या आहेत. अंगणवाडयांच्या इमारती संदर्भात प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे. जिल्ह्यात १९८ इमारतींची बांधकामे प्रगतीपथावर आहेत व २५४ अंगणवाडी इमारतींची बांधकामे मंजूर असून त्यांची कामे सुरू झालेली आहेत. सर्वसाधारण जिल्हा वार्षिक प्रारुप योजना सन २०१६-१७ करिता अंगणवाडी इमारत बांधकामासाठी रुपये १५.०० कोटी निधी प्रस्तावित करण्यात आला असून यातून २५० नवीन कामे हाती घेण्यात येतील. उर्वरित बांधकामे सन २०१७-१८ च्या योजनेतुन पुर्ण करण्यात येतील असे नियोजन जिल्हा स्तरावर करण्यात आलेले आहे. अंगणवाडी केंद्रांना आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करून देणेबाबत संबंधित ग्राम पंचायतीच्या १० टक्के महिला व बाल कल्याण निधीमधून आवश्यक तरतूद करण्यास तसेच अंगणवाडीना आवश्यक सोयी सुविधा उदा. विद्युत व्यवस्था करिता खर्च करण्यास कळविण्यात आलेले आहे. अंगणवाडी भाड्याच्या इमारतीमध्ये चालविण्याकरीता ही तरतूद उपलब्ध आहे. भाड्याच्या इमारतीमध्ये अंगणवाडी चालविण्याकरिता भाड्याच्या दरामध्ये बदल केलेला आहे. नागपूर जिल्हापरिषदे अंतर्गत प्रशिक्षणाचीही तरतूद व व्यवस्था उपलब्ध आहे. अंगणवाडी सेविका यांच्याकरिता प्रशिक्षणाचीही सोय उपलब्ध आहे. रोटेशन पद्धतीने इसीसी-ई प्रशिक्षण उपलब्ध करून देण्याच्या स्पष्ट सूचना आहेत. या प्रशिक्षणाकरिता आकार फाऊंडेशनचा पाठ्यक्रम निश्चित करण्यात आलेला आहे. अंगणवाडी मदतनीस करिता टीओटीला मास्टर ट्रेनिंगची तरतूद उपलब्ध आहे. आकार फाऊंडेशनचा पाठ्यक्रम, मटेरियल, पुस्तिका ही सुपरव्हायजर, मास्टर ट्रेनिंग युनिसेफ, यशदा यांच्या माध्यमातूनही शासनाने उपलब्ध करून दिलेला आहे.

समितीने विचारणा केली की, अंगणवाडयांमध्ये सोलार पॅनेल बसविण्यात आलेले आहेत का, यावर सचिव, महिला व बालविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, सोलार पॅनेल्स बसविणे प्रस्तावित आहे. यावर समितीने अशी विचारणा केली की, जिल्हा परिषद नागपूर अंतर्गत किती अंगणवाड्या सक्षम करण्याकरिता सोयी सवलती उपलब्ध करण्यात आल्या आहेत, केंद्र शासनाच्या मनरेगा अंतर्गत सोलार पॅनेल्स कसा लावता येतील याची माहिती समितीस देण्यात यावी. सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षात १५ जानेवारी, २०१६ रोजी अंगणवाड्यांची देखभाल याकरिता २००० रुपये याप्रमाणे आठ कोटी रुपये आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना यांना वितरित करण्यात आलेल्या आहेत. सन २०१५-२०१६ मध्ये हा निधी प्राप्त झाला होता. सन २०१६-२०१७ मध्ये सदरचा निधी १०० टक्के खर्च झाला. नियोजन विभागाचा शासन निर्णय दिनांक २१ सप्टेंबर, २०१५ नुसार प्रत्येक अंगणवाडी केंद्रामध्ये पॅनल बसविण्यात येईल असे सांगण्यात आले होते. यावर सचिव, महिला व बालविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, केंद्र शासनाने राज्य शासनाला सूचना दिलेल्या आहेत. मनरेगा अंतर्गत अंगणवाडी बांधकाम करता येते. ग्रामपंचायत आपल्या आराखड्यामध्ये अंगणवाडी बांधकाम मान्य करून घेऊ शकते. अकुशल मनरेगा अंतर्गत हे अंगणवाडीचे बांधकाम करता येते. याकरिता शासनाकडून ४.५ लाख रुपये मिळतात. यामध्ये सोलार पॅनल अंगणवाडीमध्ये बसविता येतात. अंगणवाडीमधून या योजनेला प्रतिसाद मिळालेला नाही.

समितीने आणखी अशी विचारणा केली की, शासनाने दिलेल्या ४.५ लाख रुपयांमध्ये अंगणवाडी बांधुन होत नाही. अंगणवाडी केंद्राच्या ठिकाणी ठेकेदार बांधकामाकरिता येत नाही. मनेरगाच्या माध्यमातून अंगणवाडी बांधकाम होणे अशक्य आहे. दिनांक २१ सप्टेंबर, २०१६ च्या शासन निर्णयानुसार अंगणवाडयांमध्ये सोलार पॅनेल शासन मनेरगाच्या माध्यमातुन बसविणार आहे. यावर सचिव, महिला व बालविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, काही कामे महिला व बालविकास विभागाच्या निधीच्या माध्यमातुन ६,२५,३०८८ रुपये अंगणवाडी बांधकामाकरिता दिला जातो. जास्तीचा निधी म्हणजे १५,००० रुपये सोलार पॅनलकरिता दिला जाणार आहे. यावर समितीने अशी विचारणा केली की, आठ कोटी रुपयांचा निधी जिल्हापरिषदेच्या खात्यामध्ये आलेला आहे. त्यापैकी किती याकरिता खर्च केला जातो. यावर सचिव, महिला व बालविकास विभाग

यांनी समितीस विदित केले की, जिल्हास्तरावर याकरिता २,००० कोटी रुपये वितरीत करण्यात आलेले आहेत. सोलार युनिट १२,००० आहेत. यावर समितीने पुढे विचारणा केली की, समितीच्या निदर्शनास असे आले आहे की, या अंगणवाडीमध्ये शिकणा-या मुलांची संख्या दिवसेंदिवस घटत चालली आहे. यावर सचिव, महिला व बालविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, काही गावांमध्येही इंग्रजी माध्यमाच्या आधुनिक शाळा सुरू झालेल्या आहेत. परंतु अंगणवाडीमध्येही मुलांची उपस्थिती काही ठिकाणी चांगली आहे. काही ठिकाणी अंगणवाडयांसारखे बाल प्रशिक्षण केंद्र सुरू झाले आहेत. तरीही या आधुनिक शाळांना दिनांक १ जानेवारी, २०१८ पासून अंगणवाड्यांचा लाभ द्यावयाचा की नाही हा केंद्र व राज्य शासनाचा प्रश्न आहे. याबाबत शासनाने निर्णय घेणे अभिप्रेत आहे.

समितीने असे मत व्यक्त केले की, अंगणवाडीच्या माध्यमातून मुलांना जे शिजलेले अन्न दिले जाते, ते खाण्यालायक नसते, राज्यातील ग्रामीण भागामध्ये चांगल्या इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरू झालेल्या आहेत, त्यामध्ये नाविन्यपूर्ण अभ्यासक्रम घेऊन मुलांचा सर्वांगीण विकास केला जातो. अंगणवाडीमध्ये देखील मुलांच्या सर्वांगीण विकासाकरिता नाविन्यपूर्ण अभ्यासक्रम लागू करण्याकरिता पर्यवेक्षिका, मदतनीस, सेविका यांना प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. जळगांव, नागपूर, रायगड, यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये हे प्रशिक्षण अपेक्षित आहे. काही जिल्हा परिषदांतर्गत या प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध आहे. पर्यवेक्षिका, मदतनीस, अंगणवाडी सेविका यांना योग्य व आवश्यक प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. यावर सचिव, महिला व बालविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, केंद्र शासनाच्या एनसीव्हीटीच्या अभ्यासक्रमानुसार हा अभ्यासक्रम नियोजित आहे.

समितीने असे मत व्यक्त केले की, अभ्यासक्रमासवमेत क्रीडा व इतर उपक्रम मुलांच्या सर्वांगीण विकासाकरिता आवश्यक आहे. ११५६ अंगणवाडयांची बांधकामे झालेली आहेत. या अंगणवाडयांमध्ये शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही. ११५६ अंगणवाड्यांची पिण्याच्या पाण्यासंदर्भात काय स्थिती आहे, यावर सचिव, महिला व बालविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, माहे ऑक्टोबर, २०१२ मध्ये अंगणवाडी बांधकामाची तरतूद नव्हती. अंगणवाड्या सोयीप्रमाणे कोणत्याही ठिकाणी सुरू होत्या. या अंगणवाड्यांच्या अंदाजपत्रकाकरिता ग्रामविकास विभागाला विनंती केली होती. पिण्याचे पाणी, वीज व इतर मूलभूत फर्निचर सुविधेच्या तरतूदींचाही विचार करण्यात आला होता. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, विजेच्या जोडणीसंदर्भात अंगणवाडीमध्ये दोन लाईट, एक पंखा व एक प्लगपॉईंट देण्यात यावा, याकरिता आग्रही भूमिका घेऊन लवकरात लवकर ही सुविधा करणे आवश्यक आहे. यावर समितीने असे निदेश दिले की, अंगणवाड्यांची कामे ही धोरणाप्रमाणे केली गेली पाहिजेत. नागपूर जिल्ह्यात वेगवेगळया उपक्रमांतर्गत अंगणवाड्या सक्षम करण्याकरिता कार्यक्रम आयोजित केले जात आहेत. राज्याच्या अंगणवाडी सक्षमीकरण धोरणानुसार सगळीकडे अंमलबजावणी होऊन अंगणवाड्या सक्षम होणे आवश्यक आहे.

## अभिप्राय व शिफारशी

समितीने नागपूर जिल्हा परिषदेला दिनांक २९, ३० सप्टेंबर व ०१ ऑक्टोबर, २०१५ या कालावधीत भेट देऊन मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिका-यांची सन २०१२-१३ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील प्रश्नावली संबंधात साक्ष घेतली. साक्षीदरम्यान समितीच्या निदर्शनास आले की, जिल्ह्यातील अनेक अंगणवाड्यांना अद्याप स्वतःची इमारत नाही, इतर आवश्यक सोयी-सुविधा जसे अंगणवाडी सेविकेचे प्रशिक्षण, मुलांसाठी शिक्षण क्रम आखण्यात आलेला नाही. त्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याबाबत समितीने निदेश दिले होते. अंगणवाड्यांच्या संदर्भात समितीने विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीदरम्यान जिल्ह्यातील २१६१ पैकी केवळ ११५६ अंगणवाड्यांना स्वतंत्र इमारत असल्याची माहिती समितीस प्राप्त झाली. विभागीय सचिवांचे साक्षीपर्यंत जवळपास १००० अंणवाड्या झाडाखाली, भाड्याच्या जागेत, मंदिरात, चावडीवर इत्यादी ठिकाणी भरविल्या जातात. विभागीय सचिवांनी सन २०१७-१८ च्या योजनेतून जिल्ह्यातील सर्व अंगणवाड्यांना इमारती उपलब्ध करून देण्याचे नियोजन असल्याचे सांगितले आहे. **त्याचबरोबर अंगणवाड्यांना इमारतीच्या देखभाल दुरुस्तीसाठी प्रति केंद्र २०००/- व शैक्षणिक साहित्य खरेदीसाठी २५००/- रुपयांचा निधी उपलब्ध करून दिल्याबाबत समिती समाधान व्यक्त करते. त्याचबरोबर समितीस आश्वासित केल्याप्रमाणे सन २०१७-१८ च्या अंगणवाडीसाठी इमारत या योजनेतून जिल्हा स्तरावर करण्यात आलेल्या नियोजनानुसार नागपूर जिल्ह्यातील काही अंगणवाड्यांना टप्याटप्याने सर्व सोयी सुविधायुक्त स्वतंत्र इमारत उपलब्ध करून देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

अंगणवाड्यांना विजेचे बील भरण्यासाठी एकात्मिक बालविकास सेवा योजनेअंतर्गत तरतूद उपलब्ध होत नाही. प्रत्येक अंगणवाडीला २ लाईट, १ पंखा व १ प्लग पॉईंटची आवश्यकता असते. शासनाने दिनांक २१ सप्टेंबर, २०१५ रोजी शासन निर्णय निर्गमित करून अंगणवाडीला किचन गार्डन व सोलर पॅनल उपलब्ध करून देण्यासाठी मान्यता दिलेली आहे. महिला व बालविकास विभागाच्या योजनेशी अभिसरण करून महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत अंगणवाडी केंद्र इमारतीचे बांधकाम करण्याबाबत मान्यता देण्यात आलेली आहे. **सदरहू योजनेअंतर्गत ४० टक्के रोजगार हमी योजना व ६० टक्के महिला व बालविकास विभागाने वाटा उचलायचा आहे. अतः प्रत्येक अंगणवाडी केंद्रासमोर सौरऊर्जेवर आधारीत विद्युत व्यवस्था निर्माण करणे तसेच किचन गार्डन तयार करण्यासाठीच्या योजनेची प्रभावी अंमलबजावणी विभागाने करावी व त्याबाबतचा अनुपालन अहवाल समितीला दोन महिन्यात सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण पाच

## जिल्हा परिषद, नागपूर (प्रशासन)

## शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी असलेला धान्य साठा सुस्थितीत नसल्याचे आढळून आल्याबाबत

## (पंचायत समिती, उमरेड)

समितीने दिनांक २९, ३० सप्टेंबर व ०१ ऑक्टोबर, २०१५ या कालावधीत नागपूर जिल्हा परिषदेस भेट दिली. नागपूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या प्रश्नावली क्रमांक २ वरील लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, सन २०१२-१३ मध्ये पंचायत समितीच्या गोदामातील वस्तुंची नोंदवह्यामधील नोंदीशी पडताळणी करण्यात आली काय, असल्यास, केव्हा आणि पडताळणीच्या वेळी आढळून आलेल्या त्रुटींचे स्वरूप काय होते व त्या त्रुटींचे निराकरण कसे करण्यात आले तसेच सद्यःस्थितीत गोदामात किती व कोणकोणता माल शिल्लक आहे, धान्य कोठी - ३५ शिल्लक असण्याची कारणे काय आहेत, यावर गट विकास अधिकारी, उमरेड यांनी समितीस विदित केले की, त्याचे वाटप झालेले आहे. लाभार्थ्यांची यादी होती परंतु त्या यादीस मंजुरी मिळाली नव्हती. यावर पुढे समितीने निदेश दिले की, धान्य शिल्लक राहते हे योग्य नाही. त्या संबंधित अधिका-यांवर दिरंगाईचा ठपका ठेवण्यात यावा. सदर प्रकरणात ज्या अधिका-यांनी दिरंगाई केली त्याच्यावर कारवाई करावी.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, पंचायत समिती क्षेत्रात शालेय पोषण आहार, तसेच पुरक पोषण आहार योजना राबविली जाते काय, असल्यास, कोणत्या शाळांना कोणकोणत्या महिन्यात किती प्रमाणात शालेय पोषण आहार वितरित करण्यात आला त्याची विगतवारी द्यावी. यावर गट विकास अधिकारी, उमरेड यांनी समितीस विदित केले की, विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार दिला जातो. पूरक आहारामध्ये केळी, बिस्कीटे दिली जातात. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, शालेय पोषण आहार योजनेंतर्गत पुरविण्यात आलेल्या पदार्थांची तपासणी कोणामार्फत करण्यात आली, त्यात कोणकोणत्या त्रुटी आढळून आल्या, यावर गट विकास अधिकारी यांनी समितीस विदित केले की, शालेय पोषण आहार योजनांतर्गत पुरविण्यात आलेल्या पदार्थांची तपासणी प्रादेशिक सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा, छिंदवाडा रोड, नागपूर यांचेमार्फत करण्यात येते. काही शाळांमध्ये आहार साठा सुस्थितीमध्ये ठेवण्यात आलेला नव्हता तसेच धान्य साठा साफ केलेला नव्हता. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, धान्यसाठा साफ ठेवला पाहिजे अन्यथा धान्य खराब होईल. यासाठी अधिका-यांनी वेळोवेळी भेटी देणे गरजेचे आहे. यावर समितीने निदेश दिले की, ही गंभीर बाब आहे. धान्य साठा साफ न ठेवल्यास आणि तो तसाच खाऊ दिला तर विद्यार्थ्यांच्या जीविताला अपाय होऊ शकतो.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

समितीने पंचायत समिती, नागपूर अंतर्गत असलेल्या शाळांना भेटी दिल्या त्यावेळी त्या शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी असलेला धान्य साठा सुस्थितीत नसल्याचे आढळून आले, त्याप्रकरणी चौकशी करून संबंधितांवर कोणती कार्यवाही केली याची माहिती समितीला देण्यात यावी ?

**समितीस जिल्हा परिषदेकडून उपरोक्त मुद्दयांची खालील प्रमाणे माहिती प्राप्त झाली.**

जिल्हा परिषद हायस्कूल, पाचगांव येथे दिनांक २७ ऑक्टोबर २०१५ ला भेट देऊन सदर बाबी संबंधित चौकशी करण्यात आली, चौकशीच्या वेळी धान्यसाठा सुस्थितीत ठेवण्यात आल्याचे आढळून आले नाही. त्यामुळे शाळेचे मुख्याध्यापक यांना पत्र.क्र.११५५, दि. ३० ऑक्टोबर, २०१६ अन्वये सक्त ताकिद दिली. तसेच या कार्यालयाचे पत्र क्र.जिपना/शि/स्था-२/९४६/२०१६, दिनांक १९ फेब्रुवारी, २०१६ अन्वये मुख्याध्यापकाची एक वेतनवाढ रोखण्यात आली आहे.

शालेय पोषण आहाराचा धान्य साठा सुस्थितीत ठेवण्याकरीता माहे मार्च, २०१६ ला ग्रामीण भागातील सर्व शाळांना एकूण २०२२ धान्य साठवणुकीसाठी कोठ्या उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. या कार्यालयाचे परिपत्रक क्र.९५६३, दि. १७ नोव्हेंबर २०१५ अन्वये धान्यसाठा सुस्थितीत ठेवण्याबाबत व दिनांक २० फेब्रुवारी, २०१६ च्या परिपत्रकाअन्वये शालेय पोषण आहार अंतर्गत घ्यावयाची दक्षता व करावयाच्या उपाययोजना याबाबत तसेच दि. १७ नोव्हेंबर, २०१५ च्या परिपत्रकान्वये सर्व पंचायत समिती गटशिक्षणाधिकारी, अधिक्षक (शालेय पोषण आहार) यांना स्पष्ट सुचना देण्यात आल्या.

**शालेय शिक्षण विभागाचा अभिप्राय :-**

जिल्हा परिषद, नागपूर यांच्या अभिप्रायाशी सहमत आहे.

## चौकशी अहवाल

जिल्हा परिषद हायस्कुल, पाचगाव या शाळेला दिनांक २७ ऑक्टोबर २०१५ ला भेट देऊन शालेय पोषण आहारामध्ये पंचायती राज समितीने घेतलेल्या आक्षेपाच्या संदर्भात बरीचशी अनियमितता आढळून आल्यामुळे सखोल चौकशी करण्यात आली. त्यामध्ये शालेय पोषण आहार योजनेमध्ये खालील प्रमाणे अनियमितता आढळून आल्या.

१) जमाखर्च नोंदवही दाखविण्यात आली नाही.

२) नमुना नोंदवही क्र.१ (साठा नोंदवही) मध्ये बरीचशी खोडतोड (overwritting) केलेली आढळून आली.

३) मेनु नुसार शालेय पोषण आहार शिजविण्यात येत नाही.

४) धान्य व धान्यादी साठा सुस्थितीत ठेवण्यात आला नाही.

उपरोक्त १ ते ४ च्या उणिवाबाबत मुख्याध्यापकांना अवगत करण्यात आले. त्यामध्ये धान्य व धान्यादी साठा सुस्थितीत ठेवण्यात आला नाही. ही गंभीर बाब असल्याचे मुख्याध्यापकांचे निदर्शनास आणून देण्यात आले व याबाबत शालेय पोषण आहार योजनेत कोणतीही अनियमितता राहणार नाही याची सक्त ताकीद देण्यात आली.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने नागपूर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक ११ ऑक्टोबर, २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. उक्त साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, समितीने पंचायत समिती, नागपूर अंतर्गत असलेल्या शाळांना भेटी दिल्या, त्यावेळी त्या शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी असलेला धान्य साठा सुस्थितीत नसल्याचे आढळून आले, त्याप्रकरणी चौकशी करून संबंधितांवर कोणती कार्यवाही केली याची माहिती समितीला देण्यात यावी, यावर सहसचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीस विदित केले की, मुख्य कार्यकारी अधिकारी, शिक्षणाधिकारी यांची यामध्ये महत्वाची भूमिका आहे. मुलांना मध्यान्ह भोजनानंतर किंवा भोजनासमवेत पूरक पोषण आहारांतर्गत, केळी, बिस्किट्स, मासांहार देण्यासंदर्भातील नोंदवही स्वतंत्र ठेवण्यात आलेली आहे. यावर समितीने पुढे विचारणा केली की, मध्यान्ह भोजनानंतर पूरक पोषण आहाराअंतर्गत जे जिन्नस मुलांना देणे आवश्यक असते, त्याकरिता निधी दिला जात नाही, तसेच यासंदर्भातील नोंदवह्यामध्ये याची नोंद घेतलेली आढळून आलेली नाही. यावर सह सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीस विदित केले की, पूरक पोषण आहारांतर्गत निधी दिला जातो काही ठिकाणी विलंब झाला असेल, मुख्याध्यापक शाळेतील मुलांना देण्यात येणा-या पूरक पोषण आहाराबाबतची नोंद घेत असतात. पूरक पोषण आहारासंदर्भात स्वतंत्र नोंद शालेय स्तरावर उपलब्ध होते. सन २०१३ पासून या नोंदी शालेय स्तरावर नोंदविल्या जात आहेत. शालेय पोषण आहार दैनंदिनी नोंदवही, अन्नधान्य नोंदवही, मुलांचे वजन, उंची व इतर संदर्भात एक नोंदवही असते. या सर्व संबंधित उपक्रमाच्या नोंदी ठेवल्या जातात. यावर समितीने विचारणा केली की, मुलांना आर्यन, कॅल्शियम दिले की नाही, यासंबंधीची नोंदवहीमध्ये नोंद ठेवली जाते का, यावर सह सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीस विदित केले की, मुलांना आर्यन कॅल्शियमच्या गोळ्या दिल्यासंबंधीची नोंद शालेय स्तरावरील नोंदवहीमध्ये ठेवलेली असते.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, नोंदवही ही या योजनेचे महत्वाचे दस्तऐवज आहे. शालेय पोषण आहार समितीमध्ये यासंबंधीचा अहवाल सादर केला होता का, शाळेतील या शालेय पोषण आहार समितीला अन्नधान्याच्या साठ्याचा पुरवठा होतो, हे माहिती नसते, मग नोंदवहीमध्ये अन्नधान्य बघून तपासणी केली जाते का हे माहिती नसते. प्रत्येक महिन्याची प्रत्येक महिन्यात सही घेतली जात नाही, एकाच वेळी बारा महिन्याच्या सह्या संबंधित नोंदवहीवर घेतल्या जातात. याचा गैरफायदा घेतला जातो. नोंदवही हिशेब किंवा लेखापरिक्षणाकरिता उपलब्ध होत नाही. नोंदवही उपलब्ध झाली तरीही त्या अपूर्ण असतात. यामुळे ही योजना योग्य रितीने राबविलेली जात नाही अशी समितीची शंका आहे, शालेय स्तरावरील नोंदवह्या दर तीन महिन्यांनी सक्षम प्राधिका-यापुढे तपासणीकरिता ठेवणे आवश्यक आहे, जिल्हापरिषदेच्या विभागापुढे तसेच शासनाच्या प्रतिनिधीपुढे ही नोंदवही वेळच्या वेळी मंजूर करून घेणे आवश्यक आहे. नोंदवह्या लेखापरिक्षणाच्या वेळेस देखील सादर केलेल्या नाहीत. करारनाम्याची प्रत मुख्याध्यापकांकडे असते काय, यावर सह सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीस विदित केले की, तालुका स्तरावर सदर प्रत उपलब्ध असते.

समितीने पुढे विचारणा केली की, करार हा राज्यस्तरावर होत असतो. तालुका स्तरावर करारनाम्याची प्रत उपलब्ध नसते. शाळेमध्ये सॅम्पलचे नमुने ठेवण्यात येतात काय, २० दिवसापूर्वी माल प्राप्त झाला पाहिजे. करारनाम्यामध्ये कोणत्या अटी आणि शर्ती समाविष्ट असतात हे ब-याच वेळेस मुख्याध्यापकांना माहितीच नसते. शालेय पोषण आहारामध्ये अधीक्षक, गटविकास अधिकारी देखील दोषी असतो. परंतु कारवाई ही मुख्याध्यापकांवर होत असते. करारनाम्याची प्रत मुख्याध्यापकांना दिली जाते काय, करारनाम्यामध्ये कोणत्या गोष्टी असावयास पाहिजे, याबाबतची माहिती मुख्याध्यापकास नसते. तसेच मुख्याध्यापकांनी ज्या धान्यांची मागणी केली असेल, त्या धान्याचा पुरवठा होत नाही. पुरवठादार ज्या बाबींची

मागणी करतो तेच धान्य शाळेला पुरविले जाते. शाळेमध्ये जो माल येत असतो तो विहित वजनाचा येत नाही. कोणत्याही धान्याचे ५० कि.ग्रॅ वजनाचे पोते असेल तर त्याचे वजन ४५ कि.ग्रॅ. पर्यंतच भरते, तसेच पुरवठा करण्यात माल हा जशाच्या तसा शाळेला स्वीकारावा लागतो, जरी तो ४५ कि.ग्रॅ. असेल तरी तो ५० कि.ग्रॅ. म्हणूनच स्वीकारावा लागतो, तसेच प्राप्त झालेला माल चांगल्या दर्जाचा असतोच असे नाही. कोणत्या प्रकारचे धान्य किंवा माल आला पाहिजे, याबाबत मुख्याध्यापकास काही माहिती नसते. कंत्राटदार हा मुख्याध्यापकाकडून माल दिल्याची पावती घेऊन जातो. तसेच धान्य किंवा माल बदलुन देण्याचे धाडस सुद्धा कंत्राटदार करीत असतात. त्याचप्रमाणे शाळेसाठी जे तेल देण्यात येते त्या तेलाचा दर्जा अत्यंत निकृष्ट असतो. केवळ नागपूर जिल्ह्यातच असे होते असे नाही, संपूर्ण राज्यभरामध्ये असे प्रकार होत असतात. त्यामुळे याबाबत राज्याच्या दृष्टीने निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. करारनाम्यामध्ये स्पष्ट उल्लेख आहे की, जर धान्य चांगल्या दर्जाचे नसेल तर ताबडतोब ते धान्य परत करावे आणि धान्य किंवा माल हा खुल्या बाजारामधून खरेदी करावा. खरेदी केलेल्या मालाचे देयके पुरवठादाराच्या देयकामधून वसूल करावे अशा प्रकारचा उल्लेख आहे. तसेच माल मिळाल्यानंतर त्याची तपासणी करावी लागते. जोपर्यंत तपासणी होत नाही, तो पर्यंत तो माल वापरता येत नाही, अशी देखील करारनाम्यामध्ये तरतूद आहे. जर मुख्याध्यापकांना करारनामा माहित असेल तर तो माल घेणार नाही. परंतु इतक्या वर्षाच्या कालखंडामध्ये सातत्याने याबाबत अनियमितता चालू आहे. तसेच लेखापरिक्षणा संदर्भात जर मुख्याध्यापक नोंदी ठेवत नसेल तर ही बाब गंभीर आहे. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, यामध्ये दोन मुद्दे उपस्थित करण्यात आलेले आहेत, पहिला मुद्दा असा आहे की, मुख्याध्यापक हतबल असतात किंवा त्यांच्यावर वरिष्ठ अधिका-यांचा दबाव असल्यामुळे ते अशा प्रकारचा माल स्वीकारतात. मुख्याध्यापकांकडे पुरवठा केलेला माल आहे त्या स्थितीत स्वीकारण्यावाचून पर्याय नसतो, तसेच दुसरा मुद्दा उपस्थित करण्यात आला की, मुख्याध्यापकांना करारनाम्यातील अटी व शर्तीची माहिती नसते. पहिल्या मुद्यासंबंधी मुध्याध्यापकांवरील अशा प्रकारचा दबाव किंवा वरिष्ठ अधिकारी शाळेची किंवा त्यांची चौकशी करेल, अशा प्रकारची भिती त्यांच्या मनामधून काढून टाकावी लागेल. त्यासाठी काहीतरी ठोस यंत्रणा निर्माण केली पाहिजे की, जरी माल कमी आला तरी तो परत पाठवू शकता किंवा जेवढा आलेला असेल तेवढ्याच मालाची नोंद करू शकता. मुख्याध्यापक हे भितीपोटी किंवा दबावामुळे धान्य कमी असले तरी स्वीकारत असतील. परंतु जर मुख्याध्यापकांनी सांगितले की, सदरचा माल ५० कि.ग्रॅ. आहे. तर वरच्या अधिका-यांना ती गोष्ट मान्य करावी लागेल. त्यामुळे त्यांनी त्यांची जबाबदारी व्यवस्थितपणे पार पाडली तरच असे प्रकार होणार नाहीत. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, मुख्याध्यापकांच्या वर शिक्षण अधिकारी, गट शिक्षण अधिकारी, गटविकास अधिकारी, संचालक, उप संचालक असतात, मुख्याध्यापकांवर भरपूर जबाबदारी आहे. ती जबाबदारी कमी केली तर निश्चितपणे ते चांगले काम करू शकतील. जर मुख्याध्यापकांनी अचूक अभिप्राय दिले तर गट शिक्षण अधिकारी, शिक्षण अधिकारी मुख्याध्यापकांची चौकशी करतात किंवा त्यांच्यावर दबाव टाकत असतात. शालेय पोषण आहाराबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे आणि केंद्र शासनाच्या निर्देशानुसार मुख्याध्यापकांना दाबून टाकण्याचा प्रयत्न झालेला आहे. धान्याचे किंवा मालाचे पोते ५० कि.ग्रॅ. पेक्षा कमी वजनाचे भरले तर कंत्राटदारावर जबाबदारी निश्चित करून कारवाई केली पाहिजे. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, मुख्याध्यापक माझी चौकशी होईल, किंवा दुसरे काही तरी करतील, या भितीपोटी ते खरा अहवाल देत नाहीत. जर मुख्याध्यापकांनी ५० कि.ग्रॅ. च्या ऐवजी ४५ कि.ग्रॅ. माल घेऊन स्वाक्षरी करून जर त्यांच्यावर कारवाई केली असेल तर कंत्राटदार यामधून निर्दोष सुटला जातो. कारण त्यांच्याकडे ५० कि.ग्रॅ. माल मिळाल्याची मुख्याध्यापकांची पोच असते. कंत्राटदार यामध्ये म्हणू शकतो की, मी ५० कि.ग्रॅ. माल पुरविलेला आहे आणि त्याची माझ्याकडे पोच आहे. जर तो माल विहित वजनाचा नसेल तर त्यांनी लगेच पाच किलोचा अपहार झाल्याबाबत सांगितले पाहिजे. याबाबत कंत्राटदारावर कारवाई होईलच. त्यामुळे याबाबत स्पष्ट भूमिका करण्याची आवश्यकता आहे. त्यांच्यावर लक्ष ठेवण्यासाठी एखादी समिती असली पाहिजे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे या करारनाम्याची माहिती जिल्हापरिषदेला सुद्धा नसते. जिल्हा परिषदेच्या सभागृहात याबाबत माहिती होत नाही. शालेय पोषण आहारावर प्रत्येक महिन्याला किती खर्च होतो, त्याची देखील माहिती दिली जात नाही. पंचायत समिती, शालेय पोषण आहार समिती हया जिल्हा विकासाचे अंग आहेत. त्यांना देखील याबाबत माहिती नाही. शालेय पोषण आहार समिती आणि मुख्याध्यापकांचे संयुक्त खाते आहे. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, मुख्याध्यापकांना पाठिंब्याची आवश्यकता आहे.

समितीने असे निदेश दिले की, राज्याच्या दृष्टीकोनातून करारनामा ही अतिशय गंभीर बाब आहे. शासन निर्णयामध्ये सर्व अटी, शर्ती, नियम नमूद केलेले आहेत. या निर्णयामध्ये मालाच्या संदर्भात, पुरवठादाराच्या संदर्भात त्यांनी करावयाच्या कारवाई संदर्भात जे काही नमूद केले असेल त्या सर्व निर्णयांची अंमलबजावणी काटेकोरपणे केली पाहिजे. या निर्णयाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीकोनातून विभागाच्या स्तरावरून संबंधितांना निदेश दिले पाहिजेत. त्या निदेशांची अंमलबजावणी केली पाहिजे आणि चांगल्या दर्जाचा माल खरेदी केला पाहिजे. या सर्व निर्णयांची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी. करारनाम्यामधील अटी व शर्ती ह्या शाळेच्या दर्शनी भागावर लावल्या पाहिजेत. कोणत्याही शाळेमध्ये अशा प्रकारे दर्शनी भागावर माहिती लावली जात नाही. शाळेला पुरवठा करण्यात आलेला माल देखील व्यवस्थित ठेवला पाहिजे, त्यासाठी जागा असली पाहिजे त्या ठिकाणी सर्व यंत्रणा आहे. शिक्षक, कर्मचारी, मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत. त्यांनी त्या ठिकाणी जाऊन प्रत्यक्ष भेटी दिल्या पाहिजेत. त्यामुळे असे प्रकार होणार नाहीत, सर्व यंत्रणा अद्ययावत होईल, या दृष्टीने कारवाई केली पाहिजे. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस

विदित केले की, ही जी यंत्रणा आहे ती, त्यामध्ये ग्रामपंचायतीचा अंतर्भाव केला पाहिजे. ग्रामपंचायतीचा प्रतिनिधी शाळा व्यवस्थापन समितीमध्ये असतो. तरी सुद्धा मुख्याध्यापकारवरच कारवाई का करण्यात येते की, यंत्रणा ही ग्रामपंचायतीवर जबाबदारी टाकू शकत नाही. यावर समितीने असे निर्देश दिले की, याबाबत नियमानुसार तात्काळ कार्यवाही करावी.

**अभिप्राय व शिफारशी**

समितीने दिनांक २९, ३० सप्टेंबर व १ ऑक्टोबर, २०१५ या कालावधीत नागपूर जिल्हा परिषदेला भेट दिली. भेटी दरम्यान समितीने जिल्हा परिषद हायस्कुल, पाचगांव येथे भेट देऊन शाळेची तपासणी केली असता शालेय पोषण आहारासंबंधी समितीला काही अनियमितता आढळून आल्या, जसे जमा खर्चाची नोंदवही ठेवण्यात आलेली नव्हती, साठा नोंदवहीमध्ये काही ठिकाणी उपरी लेखन (overwritting) केलेले आढळले. सर्वात महत्त्वाचे म्हणजे धान्य व धान्यादी माल व्यवस्थित ठेवण्यात आलेला नव्हता. यासंदर्भात समितीने चौकशी करून कारवाई करण्याचे निदेश दिले होते. समितीच्या निदेशानुसार दोष आढळलेल्या मुख्याध्यापकांना ताकीद देण्याची कारवाई प्रशासनाने केलेली आहे.

वस्तुतः धान्य व धान्यादी माल स्वच्छ सुरक्षित ठेवणे ही एकट्या मुख्याध्यापकाची जबाबदारी असू शकत नाही, शाळा व्यवस्थापन समितीच्या सदस्यांचीही तेवढीच जबाबदारी आहे. शालेय पोषण आहार योजनेच्या संदर्भात विभागीय सचिवांच्या साक्षीमध्ये संपूर्ण योजनेच्या प्रभावी अंमलबजावणी मध्ये येत असलेल्या अडचणी तसेच समितीने प्रत्यक्ष शाळांना भेटी दिल्यानंतर समितीच्या समोर प्रत्यक्षात येत असलेली वस्तुस्थिती यांचा उहापोह करण्यात आला. शालेय शिक्षण विभागाने दिनांक १) २२ नोव्हेंबर, १९९५, २) १६ मे, २००२, ३) ३१ मार्च, २००५, (४) १ जून, २००९, (५) १८ जून, २००९, (६) २६ फेब्रुवारी, २०१०, (७) २ फेब्रुवारी, २०११ व (८) २२ जुलै, २०१३ या शासन निर्णय, परिपत्रक व पत्रान्वये शालेय पोषण आहार या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी विस्तृत मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत. **(परिशिष्ट क्र.५.१ ते ५.९)** परंतु या सूचनांप्रमाणे प्रत्यक्षात क्षेत्रिय स्तरावर कार्यवाही होताना दिसून येत नाही.

शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत राज्यातील सर्व शाळांना तांदळाची व धान्यादी मालाची वाहतूक शाळास्तरापर्यंत करण्याकरीता शासनाने जिल्हानिहाय ई-निविदा प्रक्रिया राबवून पुरवठादाराची निवड केली. समितीने अनेक वेळा आग्रह धरलेला असुनही या पुरवठादाराबरोबर राज्य शासनाने केलेल्या करारनाम्याची प्रत शाळा स्तरापर्यंत मुख्याध्यापक किंवा यथास्थिती शाळा व्यवस्थापन समिती यांच्यापर्यंत उपलब्ध नसल्याची वस्तुस्थिती समितीला आढळून आली. प्रस्तुत प्रकरणात तांदुळ व धान्यादी माल स्वच्छ व सुरक्षितरित्या ठेवला नसल्याच्या पार्श्वभुमीवर शाळांमध्ये दोन महिने पुरेल एवढा धान्यसाठा सुरक्षितरित्या ठेवावा अशा जागा उपलब्ध नसतात. तांदळासोबत मुगदाळ, मसुरडाळ, तुरडाळ, हरभरा, चवळी, मटकी, मुग, वाटाणा, मिरची पावडर, हळद पावडर, मीठ, जिरे, मोहरी, लाल तिखट मसाला, गरम मसाला आणि तेलाच्या एक लिटरच्या पिशव्या, तसेच पालेभाज्या, फळभाज्या इत्यादी नाशवंत पदार्थांसोबत जळाऊ लाकडे, कोळसा, मुलांच्या थाळ्या, अन्न शिजवावयाची भांडी, पाण्याचे पिंप, असल्यास गॅस सिलेंडर व शेगडी या सर्वांसाठी शासनाने दिलेल्या मार्गदर्शनानुसार जागाच उपलब्ध नसल्याचे व त्यानुसार राज्यातील बहुतांश शाळांमध्ये कार्यवाही होत नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. शासनाच्या मार्गदर्शक सूचना दिनांक ३१ ऑगस्ट २०१६ रोजीच्या प्राथमिक शिक्षण संचालनालयाच्या पत्राद्वारे निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये पुरवठादाराकडून प्राप्त झालेला माल मुख्याध्यापकांच्या उपस्थितीत वजन करून ताब्यात घ्यावा असे नमूद केलेले आहे. परंतु ग्रामविकास विभागाच्या सचिवांनी समितीस आश्वासित केल्याप्रमाणे पुरवठादाराकडून माल उतरून घेते वेळी मुख्याध्यापक व शाळाव्यवस्थापन समिती सदस्यांच्या उपस्थितीत वजन करून घेणे आवश्यक आहे. **याबाबत कार्यवाही होत नसल्याचे तसेच अनेक शाळांमध्ये करारनाम्यामध्ये नमूद वजनाचे पोते व धान्यादी मालाचा पुरवठा होत नाही. याबाबत विभागाने कठोर उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता असून गैर प्रकारांना आळा घालण्यासाठी कठोर कारवाई करून सुनियोजन करावे अशी समितीची शिफारस आहे.**

तांदूळ व धान्यादी मालाचा दर्जा खराब असल्याचे जाणवल्यास माल ताब्यात घेऊ नये अशा सूचना देण्यात आल्या आहेत. इथे अत्यंत महत्त्वाची बाब अशी की पुरवठादाराबरोबर शासनाने करार केलेला आहे आणि त्या करारातील अटी शर्तीमधील मुद्दा क्रमांक ३६ मध्ये निविदा प्रक्रियेमध्ये सादर करण्यात आलेले धान्यादी मालाचे नमुने ज्या दर्जाचे होते त्याच दर्जाच्या मालाचा पुरवठा करणे पुरवठादारावर बंधनकारक करण्यात आले आहे. पुरवठादाराने निविदा प्रक्रियेमध्ये धान्यादी मालाचा कोणता नमुना शासनाकडे सादर केला तो नमुना राज्यातील सर्व शाळा, केंद्रीय स्वयंपाकगृह, शाळा व्यवस्थापन समितीकडे नसतो ही बाब देखील समितीच्या भेटीच्या वेळी निदर्शनास आलेली आहे. निविदा प्रक्रियेवेळी सादर केलेले नमुने शाळांमध्ये असल्याशिवाय मार्गदर्शक सुचनांप्रमाणे मालाचा दर्जा मुख्याध्यापक तपासतील तरी कसे ही साधी बाब दिनांक ३१ ऑगस्ट, २०१६ रोजीच्या आदेशात स्पष्ट केलेली नाही. धान्यादी मालाचे तालुकानिहाय नमुने शासकीय प्रयोगशाळेत पाठविणे करारनाम्याप्रमाणे बंधनकारक आहे व प्रयोगशाळेकडून समाधानकारक अहवाल प्राप्त झाल्यानंतर मालाची देयके अदा केली जातात. प्राथमिक शिक्षण संचालनालयाकडून देखील धान्यादी मालाची गुणवत्ता तपासण्याकरीता यादृच्छीक नमुने तपासणीकरीता घेतले जातात. अशा यादृच्छीक नमुने तपासणीकरीता तालुकानिहाय नमुने घ्यावयाचे झाल्यास किती टक्के नमुने घेतले जातात व घेतलेले नमुने आणि पुरवठादाराने निविदा प्रक्रियेवेळी सादर केलेल्या नमुन्यांशी मिळते जुळते असतात काय, याची तपासणी होणे आवश्यक आहे. तसेच बरेचवेळा असे प्रयोगशाळेचे अहवाल पुरवठादार स्वतः घेऊन येतात, यावर

देखील सनियंत्रण असणे गरजेचे आहे. प्रयोगशाळेकडून आलेला अहवाल हा त्यातील धान्य खाण्यास योग्य किंवा अयोग्य या एका निकषावर न तपासता इयत्ता १ ली ते ५ वी व इयत्ता ६ ते ८ वीतील मुलांना आवश्यक कॅलरीज आणि प्रथिने त्यातून मिळतात किंवा कसे याचा देखील त्या चाचणीमध्ये समावेश होणे आवश्यक आहे. धान्य व धान्यादी माल हवाबंद कोठ्यामध्ये लाकडाच्या फळीवर जमिनीपासून उंचीवर ठेवण्याचे आदेश आहेत. परंतू अशा प्रकराच्या कोठ्या शाळांना उपलब्ध करून देण्यात आलेल्या नाहीत. स्वयंपाकी व मदतनीस हे वैयक्तिक स्वच्छतेकडे दुर्लक्ष करतात. दर सहा महिन्यांनी त्यांची नियमाप्रमाणे आरोग्य तपासणी केली जात नाही. जेवणापूर्वी मुलांनी साबण लावून हात धुणे अपेक्षित आहे, परंतू पिण्याच्या पाण्याचीच व्यवस्था नसते तेथे हात धुणे ही दुरापास्त गोष्ट आहे. फळे, पालेभाज्या/फळेभाज्या इत्यादी झिरो एनर्जी कुल चेंबरमध्ये साठविण्याचे आदेश आहेत. परंतू असे चेंबर बहुतांश शाळांमध्ये उपलब्ध करून दिले नाहीत. **एकूणच या योजनेच्या अंमलबजावणीमध्ये प्रशासनाची अक्षम्य हेळसांड, दुर्लक्ष, उदासिनता समितीला आढळून आलेली आहे. प्रशासनाकडून सदर योजना राबविण्यात वेळीच उपाययोजना केली नाही तर ज्या ध्येयाने सदर योजना शासनाने सुरू केली आहे त्याची फलनिष्पत्ती होणार नाही असे समितीला वाटते. म्हणून, विभागाने सदर योजना अंमलबजावणीतील असलेले विविध दोष तातडीने दूर करण्यासंदर्भात पावले उचलावीत, ही योजना संबंधित मुलांच्या पालकांच्या देखरेखी खाली कशी कार्यान्वीत होईल याची शाश्वती देऊन तशा प्रकारचे नियोजन करण्यासंदर्भात शासनाने भूमिका घ्यावी अशी समितीची शिफारस आहे.**

समितीने शाळांना भेटी दिल्यानंतर शालेय पोषण आहार स्वयंपाकगृह धान्य व धान्यादी मालाची साठवणूक करण्यात येत असलेली ठिकाणे इत्यादींची पाहणी केली असता अनेकदा तांदळाचे पोते कमी वजनाचे आढळून आले आहे. यासंदर्भात अनेक शाळांमध्ये पुरवठादाराने धान्य व धान्यादी मालाचा पुरवठा केला त्यावेळी माल उतरुन घेतेवेळी त्याचे वजन करून घेण्यासाठी शाळेकडे वजन काटा उपलब्ध नसतो, तर अनेकवेळा पुरवठादाराच्या वाहनात उपलब्ध असलेल्या वजन काट्यावर अवलंबून रहावे लागते. पुरवठादाराचा वजनकाटा कितपत विश्वासार्ह मानावा याबाबत देखील समिती शंका व्यक्त करीत आहे. पुरवठादाराबरोबर केलेल्या करारनाम्यात तांदळाची उचल ही फुड कॉर्पोरेशन ऑफ इंडियाच्या गोदामातून उचल करताना पुरवठादाराने तांदळाच्या वजनाची आणि दर्जाची खात्री करून घेऊन कोणत्याही परिस्थितीत ५० किलो वजनाचे तांदळाचे पोते त्यावरील भारतीय अन्न महामंडळाचे सील न काढता शाळांमध्ये पुरविणे आवश्यक असताना असे होताना समितीला आढळून येत नाही. त्यामुळे तांदळाचे नियतन आदेश निर्गमित झाल्यानंतर पुरवठादार भारतीय अन्न महामंडळाच्या गोदामात तांदळाची उचल करण्यास गेल्यानंतर पुरवठादाराच्या प्रतिनिधी समवेत शिक्षण विभागाच्या प्रतिनिधींनी देखील उपस्थित राहणे आवश्यक आहे असे समितीचे मत आहे. **यात पुरवठादारांवर कठोर कारवाई होणे अभिप्रेत असतांना तशी होताना दिसून येत नाही. त्यामुळे जनमानसांत या योजनेच्या अंमलबजावणी बाबत विविध शंका निर्माण होताना दिसून येतात, त्या दुर करण्यासाठी यापुढील काळात यासंदर्भात कठोर कारवाई करावी अशीही समितीची शिफारस आहे.**

प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करून विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची शाळेतील उपस्थिती वाढविणे, शाळाबाह्य मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासोबतच मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार विद्यार्थ्यांना वर्षातून किमान २०० दिवस कॅलरीज आणि प्रोटिनयुक्त आहार देण्याकरीता राज्यात राबविण्यात येणा-या शालेय पोषण आहार योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीमध्ये आध्यापनाचे प्रमुख काम असणा-या शिक्षक वृदांवर विशेषतः मुख्याध्यापकांवर सर्वस्वी जबाबदारी टाकणे समितीला उचित वाटत नाही. **अतः आहाराच्या संदर्भात त्याची गुणवत्ता, स्वच्छता, चव, धान्यादी मालाच्या पुरवठ्याच्यावेळी उपस्थित राहून त्याचा दर्जा तपासणे इत्यादीसाठी मुख्याध्यापकांच्या बरोबर शाळा व्यवस्थापन समितीच्या सदस्यांचा अथवा पाल्यांच्या पालकांचा समावेश करून घ्यावा व त्यासंबंधातील स्वयंस्पष्ट आदेश विभागाने ३ महिन्यांच्या आत निर्गमित करावेत अशी समितीची शिफारस आहे.**

धान्यादी माल उतरवून घेतेवेळी करारनाम्याच्या वेळी पुरवठादाराने शासनाला दिलेल्या व शासनाने मान्य केलेला नमुना शाळांमध्ये असणे आवश्यक आहे. जेणेकरुन पुरवठादार योग्य दर्जाचा माल पुरवितो आहे किंवा कसे याची तपासणी त्याचवेळी करता येईल. **सबब, यापुढील काळात ज्या शाळा, केंद्रीय स्वयंपाक गृहे, वस्तीशाळा, महात्मा फुले शिक्षण हमी योजनेअंतर्गत शैक्षणिक केंद्र, अनुदानित अपंग शाळा अशा सर्व शालेय पोषण आहार योजनेत मालाचा पुरवठा करण्यात येणार आहे अशा ठिकाणी निविदा प्रक्रियेचे वेळी शासनाने मान्य केलेले नमुनेच उपलब्ध करून देण्यात यावेत अशी समितीची शिफारस आहे.**

**शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत जिल्हानिहाय पुरवठादारासमवेत शासनाने केलेल्या करारनाम्याची प्रत ही प्रत्येक शाळांमध्ये मुख्याध्यापक आणि शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य यांच्याकडे उपलब्ध असणे आवश्यक आहे, जेणेकरुन करारनाम्यातील अटी व शर्तीप्रमाणे पुरवठादार धान्य आणि धान्यादी मालाचा पुरवठा करतो किंवा नाही याकडे क्षेत्रिय स्तरावरील अधिका-यांना व सदस्यांना लक्ष्य देणे शक्य होईल. अतः राज्यातील शालेय पोषण आहार दिला जाणा-या सर्व ठिकाणी सदर करारनाम्याच्या प्रती दर्शनी भागात ठळकपणे लावण्यात याव्यात तसेच गावांत त्याचा प्रसार, प्रचार व प्रसिद्धी दवंडीद्वारे करण्यात यावी अशीही समितीची शिफारस आहे.**

## प्रकरण सहा

## जिल्हा परिषद, नागपूर (प्रशासन)

## राज्यातील शाळांमधील गुणवत्ता व पटसंख्या वाढविण्याबाबत

समितीने दिनांक २९, ३० सप्टेंबर व ०१ ऑक्टोबर, २०१५ या कालावधीत नागपूर जिल्हा परिषदेस भेट दिली. नागपूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीला अशी माहिती देण्यात आली की, सीएसआरच्या माध्यमातून रोटरी क्लब तयार करून दरवर्षी २५० शाळा दत्तक घेण्यासंबंधी एमओयु केला आहे. त्यानुसार यावर्षी २५० शाळा दत्तक घेतल्या आहेत. रोटरी क्लबमार्फत सर्व शाळांना संपूर्ण इन्फ्रास्ट्रक्चर, कॉम्प्युटर, टॉयलेट इत्यादी सुविधा दिल्या जाणार आहेत. २-३ वर्षांत जिल्हा परिषदेच्या सर्व शाळांना इंग्रजी शिकविण्याकरिता ब्रिटीश कौन्सिलसमवेत टायप केलेले आहे. सर्व शिक्षकांना ब्रिटीश कौन्सिल मार्फत प्रशिक्षण देणे सुरू आहे. इंग्रजी माध्यमाकडे पालकांचा कल असल्यामुळे मराठी शाळांमधील पटसंख्या कमी होत आहे. ही बाब विचारात घेता पहिल्या वर्गापासून सर्व शाळा सेमी इंग्रजी करण्यासंबंधी निर्णय घेतला आहे. सर्व शिक्षा अभियानाअंतर्गत शिक्षकांना मोठ्या प्रमाणावर प्रशिक्षण दिले जाते. या उलट इंग्रजी माध्यमाच्या शाळांमधील शिक्षकांचा विचार केल्यास तेथे बारावी झालेल्या मुली २ ते ३ हजार रुपये पगार घेऊन मुलांना शिकविण्याचे काम करीत असतात. तेथील मुलांना शालेय पोषण आहार, शिष्यवृत्ती किंवा गणवेश दिला जात नाही.

यावर समितीने अशी विचारणा केली की, इंग्रजी शाळांमधील शिक्षकांना कोणत्याही प्रकारचे प्रशिक्षण नसताना किंवा २ ते ३ हजार रुपयांमध्ये बारावी झालेल्या मुली तेथे शिकवत असताना सुद्धा तेथील गुणवत्ता वाढलेली दिसते. याउलट जिल्हा परिषद शाळांमधील परिस्थिती उलट आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, जिल्हा परिषद शाळांमधील गुणवत्ता वाढविण्याचा जिल्हा परिषदेचा प्रयत्न आहे. रोटरी क्लबच्या माध्यमातून दर महिन्याला परिसंवाद घेऊन तज्ज्ञ लोकांकडून शिक्षकांना चांगल्या पद्धतीने शिक्षण देण्यासंबंधी मार्गदर्शन केले जाते. यावर समितीने पुढे विचारणा केली की, राज्य शासनाने शिक्षकांच्या संदर्भात ठोस धोरण स्वीकारुन त्यांना राज्य स्तरावर प्रशिक्षण देण्याची गरज आहे. पुणे येथे इंग्रजी माध्यमाच्या शाळा आहेत. मात्र इंग्रजी माध्यमाच्या शाळांपेक्षा जिल्हा परिषदेच्या अंगणवाड्यांमध्ये पटसंख्या जास्त आहे. तेथे कॉन्व्हेंटची मुले देखील येतात. इंग्रजी माध्यमातील मुले अंगणवाडीमध्ये आली पाहिजे. अंगणवाडी इंग्रजीमध्ये करा. मराठी माध्यमातून शाळा चालवायच्या असतील तर पुणे जिल्हा परिषदेचा पॅटर्न चांगला आहे. मराठीत माध्यमातून सुद्धा प्रगती होऊ शकते. इंग्रजी माध्यमाकडे गेले पाहिजे असे काही नाही. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, शास्त्र व गणित हे विषय इंग्रजी मध्येच आहेत, बाकीचे विषय मराठीत आहेत. त्याला सेमी इंग्रजी म्हणतात. यावर समितीने असे निदर्शनास आणून दिले की, आठवी, नववी इयत्तेच्या मुलांना शिवाजी महाराजांचा जन्म दिनांक १९ फेब्रुवारी, १६३० मध्ये झाला हे सांगता येत नसेल तर ते बरोबर नाही आणि त्याही पलीकडे शिक्षकांना त्या संदर्भात सांगता येत नसेल तर शोकांतिकाच आहे. घटनेचे शिल्पकार कोण होते, देश स्वतंत्र कधी झाला, देशाचे राष्ट्रपती, पंतप्रधान कोण आहेत, राज्याचे राज्यपाल, मुख्यमंत्री कोण आहेत या बाबी प्रत्येक शाळेतील मुलांना माहीत असावे म्हणून लिहायला सांगितले जाते. शाळांतील विद्यार्थ्यांची प्रगती अशी असेल तर ते काही योग्य नाही, शिक्षण क्षेत्रात खर्च करण्यात येणारे कोटी रुपये निष्फळ जात आहेत. महापुरूषांचा इतिहास याचा अभ्यास केला पाहिजे, या संदर्भात कार्यवाही करावी.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

राज्यातील शाळांमधील गुणवत्ता व पटसंख्या वाढविण्यासाठी शाळांमध्ये इंग्रजी विषय सक्तीने शिकविण्यासाठी घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने शासनाची काय भूमिका आहे ?

**समितीस जिल्हा परिषदेकडून उपरोक्त मुद्यांची खालील प्रमाणे माहिती प्राप्त झाली.**

सद्यःस्थितीमध्ये इंग्रजी भाषेची आवश्यकता आणि पालकांचा इंग्रजी माध्यमांच्या शाळांकडे वाढलेला कल लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाने सन २००० पासून पहिल्या वर्गापासून इंग्रजी विषय सक्तीचा केला आहे.

इयत्ता १ ली पासून इंग्रजी विषय शिकवितांना मुलांचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने परिसरातील बाबींचा त्यामध्ये अंतर्भाव करून अगदी सोप्या शब्दामध्ये त्याबाबतचा पाठ्यक्रम विकसित केला गेला आहे.

इयत्ता १ ली पासून इंग्रजी विषय शिकविण्यात येत असल्यामुळे आणि इंग्रजी विषयाचे अध्यापन करतांना जिल्हा परिषद नागपूर अंतर्गत सर्व शिक्षा अभियानामार्फत सदर विषयाच्या अध्यापनाचे तंत्र समजावे म्हणून ब्रिटीश कौन्सीलमार्फत सन २०१२-१३ आणि सन २०१३-१४ मध्ये प्रति वर्षी एकूण १५६६ शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात आले.

गुणवत्तापूर्ण अध्यापनाद्वारे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी इंग्रजी विषय सक्तीचा करण्यात आला आहे.

**शालेय शिक्षण विभागाचा अभिप्राय :-**

जिल्हा परिषद नागपूर, यांच्या अभिप्रायाशी सहमत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने नागपूर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक ११ ऑक्टोबर,२०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. यावर सह सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीस विदित केले की, सद्य:स्थितीमध्ये इंग्रजी भाषेची आवश्यकता आणि पालकांचा इंग्रजी माध्यमांच्या शाळांकडे वाढलेला कल लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाने सन २००० पासून १ ल्या वर्गापासून इंग्रजी विषय सक्तीचा केला आहे. इयत्ता १ ली पासून इंग्रजी विषय शिकवितांना मुलांचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने परिसरातील बाबींचा त्यामध्ये अंतर्भाव करून अगदी सोप्या शब्दामध्ये त्याबाबतचा पाठ्यक्रम विकसित केला गेला आहे. इयत्ता १ ली पासून इंग्रजी विषय शिकविण्यात येत असल्यामुळे आणि इंग्रजी विषयाचे अध्यापन करतांना जिल्हा परिषद, नागपूर अंतर्गत सर्व शिक्षा अभियानामार्फत सदर विषयाच्या अध्यापनाचे तंत्र समजावे म्हणून ब्रिटीश कौन्सीलमार्फत सन २०१२-१३ आणि सन २०१३-१४ मध्ये प्रति वर्षी एकूण १५६६ शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात आले. गुणवत्तापूर्ण अध्यापनाद्वारे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी इंग्रजी विषय सक्तीचा करण्यात आला आहे.

**अभिप्राय व शिफारशी**

कॉर्पोरेट सोशल रिरिस्पॉन्सीबीलीटी (सीएसआर) अंतर्गत नागपूर जिल्हा परिषद आणि रोटरी क्लब यांनी एम.ओ.यु. अर्थात करार करून जिल्ह्यातील २५० शाळांमधील पायाभूत सोयी जसे शौचालय, संगणक पुरविण्यात येऊन ब्रिटीश कौन्सीलच्या लायब्ररीमार्फत दरवर्षी १५६६ शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात आले. समितीला ही बाब निश्चितच उल्लेखनिय वाटते. महाराष्ट्र शासनाने सन २००० पासून इयत्ता पहिली पासून इंग्रजी विषय शिकविणे अनिवार्य केलेले आहे. सदर निर्णयामागील शासनाचे उद्दीष्ट साध्य झाले किंवा कसे याकडे देखील लक्ष देणे आवश्यक आहे असे समितीला वाटते.

**सध्याच्या स्पर्धेच्या काळात जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये शिकणारी विशेषतः ग्रामीण भागातील मुले टिकून रहावीत याकरीता नागपूर जिल्हा परिषदेने रोटरीसारख्या अशासकीय सामाजिक संस्थेबरोबर भागीदारी करून सी.एस.आर. च्या निधीतून अशा प्रकारची नाविन्यपूर्ण योजना राबविली असल्यास विभागाने याचा अभ्यास करून संपूर्ण राज्यात अशी योजना राबविण्याबाबत निर्णय घ्यावा, घेतलेल्या निर्णयाबाबत समितीस अवगत करावे अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण सात

## जिल्हा परिषद, नागपूर (प्रशासन)

### समितीच्या विधानमंडळ सदस्य व जिल्हा परिषद पदाधिका-यांसमवेत झालेल्या अनौपचारिक चर्चेदरम्यान उपस्थित झालेल्या मुद्यांबाबत

समितीने दिनांक २९, ३० सप्टेंबर व १ ऑक्टोबर २०१५ या कालावधीत नागपूर जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी समितीने नागपूर जिल्ह्यातील स्थानिक लोकप्रतिनिधी, जिल्हा परिषदेचे पदाधिका-यांना पंचायती राज समितीच्या वतीने अनौपचारिक बैठकीस निमंत्रित केले असता स्थानिक लोकप्रतिनिधींनी समितीस विदित केले की, लोकसभा, विधानसभा, जिल्हा परिषदा व पंचायत समितीमधील कार्यक्षेत्राकरिता डी-लिमिटेशन मान्य झाले आहे, परंतु त्या संदर्भात योग्य ती अंमलबजावणी झालेली नाही. एका विधानसभा क्षेत्रात २-३ डेप्युटी इंजिनिअरचे कार्यक्षेत्र असल्यामुळे कामकाज करीत असताना अनेक अडचणी येतात. डी-लिमिटेशनची योग्य प्रकारे अंमलबजावणी केल्यास लोकप्रतिनिधीना कामकाज करणे सुकर होईल. या संदर्भात माननीय पालकमंत्र्यांनी एक वर्षापूर्वी बैठक आयोजित केली होती. परंतु त्यानंतर पुढे कोणतीही कार्यवाही झाली नाही. या संदर्भात तातडीने कार्यवाही व्हावी.

समितीने नागपूर पाटबंधारे विभागाचा सखोल आढावा घेऊन यासंबंधात एक शासन निर्णय निर्गमित केल्यास हा प्रश्न सुटू शकतो त्याचप्रमाणे रि-ऑर्गनायझेशन व रि-ज्युरिडीक्शन निश्चित करणे गरजेचे आहे. शासन निर्णयानुसार ३ लाख रुपयांपेक्षा जास्त रकमेच्या कामाकरिता ई-टेंडरिंग करावे लागते. ही बाब विचारात घेता ग्रामपंचायतींना जास्त रकमेची कामे करण्याकरिता परवानगी देणे आवश्यक आहे, याबाबत जिल्हा परिषद पदाधिका-यांनी समितीस विनंती केली आहे. यावर सह सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांनी या संदर्भात समितीस माहिती दिली की, नवीन शासन निर्णयानुसार १४ व्या वित्तीय आयोगाचा सर्व निधी ग्रामपंचायतीकडे वर्ग होत असल्यामुळे ग्रामपंचायतीने स्वतः कामे करावयाची आहेत. लोकसंख्येनुसार एका ग्रामपंचायतीला ५० लाख रुपयांचा निधी देण्यात येतो, यासंबंधी रेशो ठरला आहे. सन्माननीय लोकप्रतिनिधींनी उपस्थित केलेल्या डी-लिमिटेशनच्या संदर्भात शासन स्तरावर पुढील कार्यवाही सुरू आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस सांगितले की, एकाच विधानसभा क्षेत्रात २-३ डेप्युटी इंजिनिअरचे कार्यक्षेत्र येत असल्यामुळे या संदर्भात जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेचा ठराव घेऊन व त्या अनुषंगाने प्रस्ताव तयार करून तो पुढील कार्यवाहीसाठी शासनाकडे पाठविला आहे. या संबंधीच्या प्रस्तावावर शासन स्तरावर कार्यवाही सुरू आहे.

शासनाने दिनांक २ मे, २०१२ ला शिक्षकांच्या नियुक्तीला ना हरकत प्रमाणपत्र देण्यास बंदी घातली होती. ब-याच शाळांत शिक्षक नाहीत, शाळा शिक्षकांअभावी रिकाम्या आहेत, त्यांना शिक्षकांच्या नियुक्तीच्या संदर्भात ना हरकत प्रमाणपत्र मिळालेले नाही. काही शाळांनी ना हरकत प्रमाणपत्र घेतले नाही तरीही तेथे पैसे घेऊन शिक्षकांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. काही शाळांमध्ये शिक्षकांची भरती झाल्याचे कागदपत्रांवर आहे मात्र त्यांना नियुक्त्या दिलेल्याच नाहीत. श्री. सोमेश्वर नैताम शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी अशाप्रकारे २७ शाळांत ६९ शिक्षकांना नियुक्त्या दिल्या आहेत. श्री. सोमेश्वर नैताम शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना सेवानिवृत्तीच्याच दिवशी घरावर धाड टाकून ४९ लाख रूपयांसह पकडले. श्री. सोमेश्वर नैताम शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी दिलेल्या मान्यता बोगस आहेत आणि त्यामुळे त्या रद्द कराव्यात यासाठी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांची ७ वेळा तर उप शिक्षणाधिकारी यांची २१ वेळा भेट घेतली.

जिल्हा परिषदेकडून शासकीय योजना राबविल्या जात नाहीत. शासनाची विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके देण्याची योजना आहे. शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके वितरित केली जातील असे शासनाकडून घोषित करण्यात आले आहे. परंतु एकही शैक्षणिक वर्ष असे नाही की ज्या शैक्षणिक वर्षात पहिल्याच दिवशी किंवा पहिल्या महिन्यात विद्यार्थ्यांना सर्व विषयांची पाठ्यपुस्तके वाटप केली किंवा गणवेश दिला गेला. त्यामुळे जिल्हा परिषदेकडून शासकीय योजना राबविल्या जात नसल्यामुळे जनतेमध्ये असंतोष आहे.

यानंतर नागपूर जिल्ह्यातील पदाधिका-यांसोबत अनौपचारिक चर्चा करीत असताना उपाध्यक्ष नागपूर यांनी समितीच्या निदर्शनास आणून दिले की, मजूर सोसायट्यांना कामे दिली जातात परंतु त्यांच्याकडून निकृष्ट दर्जाची कामे होतात. मजूर सहकारी संस्था कामाच्या निविदा घेतात पण ते स्वतः काम न करता दुस-या संस्थांना काम देतात. त्यामुळे कामाचा दर्जा चांगला राहत नाही. मजूर सहकारी सोसायट्यांना काम मिळावे हा उद्देश आहे. पण तो सफल होत नाही. अनेक कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकण्यासंबंधी पत्रे दिलेली आहेत. यावर समितीने सांगितले की, काम सबलेट करण्याचा क्लॉज असल्यामुळे सब कॉन्ट्रॅक्ट देता येते. अधिकारी आणि कंत्राटदार एकमेकांशी संगनमत करीत असल्यामुळे या सर्व बाबी घडतात. या संदर्भात अधिकारी किंवा लोकप्रतिनिधी असो, दोषी आढळून आल्यास त्यांच्याविरुद्ध कारवाई होणे गरजेचे आहे.

सभापती शिक्षण विभाग, नागपूर यांनी समितीस विदित केले की, कृषी विभागाला राज्याचे अधिकार देणे आवश्यक आहे. कृषी विभागामार्फत फक्त ताडपत्र्या आणि पाईपचे वाटप केले जाते. कृषीचे ३-३ विभाग आहेत. यावर सदस्य, जिल्हा परिषद, नागपूर, यांनी समितीस विदित केले की, १३ व्या वित्त आयोगामध्ये जिल्हा परिषद सदस्यांना काही अधिकार होते. परंतु १४ व्या वित्त आयोगामध्ये जिल्हा परिषद सदस्यांचे सर्व अधिकार संपुष्टात आले आहेत. जिल्हा परिषद सदस्यांना अधिकार मिळण्याकरिता समितीने शासनाला शिफारस केल्यास न्याय मिळू शकेल. जिल्हा परिषद तसेच पंचायत समिती सदस्यांची कामे करण्याची इच्छा आहे, परंतु जिल्हा नियोजन समितीतून जास्त निधी मिळू शकत नाही. सर्व अधिकार समितीला आहेत. जिल्हा परिषद सदस्यांना कामे सुचविण्याचे अधिकार मिळाले पाहिजेत.

सभापती, पंचायत समिती (काटोल) यांनी समितीच्या निदर्शनास आणून दिले की, दर महिन्याला अनेक ठराव संमत केले जातात. परंतु ते पुढील कार्यवाही करिता विभागाकडे पाठविल्यानंतर त्या संदर्भात उत्तर सुद्धा दिले जात नाही. वार्षिक गोपनीय अहवाल लिहिण्याचे अधिकार दिल्यास अधिका-यांवर वचक ठेवता येऊ शकतो. या संदर्भात समितीने शासनाला शिफारस करणे गरजेचे आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी रजेवर असताना त्यांच्या जागी आलेल्या दुस-या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ग्रामसेवकाकडून झालेल्या अफरातफरीच्या प्रकरणाच्या संदर्भातील निलंबन प्रस्ताव तहसिलदारांना बदलण्यास सांगितला. संबंधितांमध्ये काही तरी अनियमितता झाली असे वाटते, गट विकास अधिका-यांनी एका दिवसात पत्र तयार केले आणि ग्रामसेवकाला कारणे दाखवा नोटीस बजावली. २८ तारखेलाच सर्व कामे टप्प्याटप्प्याने झाली. याचा अर्थ काय घ्यायचा, मुलांची आवश्यक पटसंख्या असेल तर मिनी अंगणवाडीचे रूपांतर अंगणवाडीत करण्याच्या संदर्भातील ठराव देखील शासनाकडे पाठविला आहे परंतु, तत्संदर्भात देखील शासनाकडून कोणतीही माहिती आलेली नाही. एकात्मिक बालविकास विभागाचे १३ प्रकल्प असून तेथे बसण्यासाठीही जागा नाही. त्या संदर्भात माननीय ग्रामविकास मंत्री, श्रीमती पंकजा मुंडे यांना देखील पत्र लिहिलेले आहे. जागा मिळाली तर त्यांना चांगल्या रितीने काम करता येईल. साहित्य ठेवण्यासाठी जागा नाही. यावर समितीने असे निदेश दिले की, तसा प्रस्ताव सादर करावा.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांनी समितीस विदित केले की, प्रत्येक अपंगाला एक झेरॉक्स मशिन देण्याचा ठराव झाला होता. त्यांना २० हजार रुपये दिले जातात. परंतु मशिनची किंमत ५० हजार रुपये आहे. मार्च महिन्यात आयुक्तांकडे प्रस्ताव पाठविलेला आहे. यावर समितीने अशी विचारणा केली की, जर जी.बी.ची मान्यता असेल तर यास काही अडचण नाही.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

समितीने नागपूर जिल्हा परिषदेला भेट दिली असता समितीने नागपूर जिल्ह्यातील विधीमंडळ सदस्य व जिल्हा परिषदेच्या पदाधिका-यांसोबत केलेल्या अनौपचारिक चर्चेच्या वेळी समितीच्या निदर्शनास खालील बाबी आल्या.

(१) एका विधानसभा क्षेत्रात २/३ डेप्युटी इंजिनिअरचे कार्यक्षेत्र असल्यामुळे लोकप्रतिनिधींना कामकाज करताना येणा-या अडचणी सोडविण्यासाठी शासन स्तरावर काय कार्यवाही केली त्याची माहिती समितीला देण्यात यावी.

(२) श्री. सोमेश्वर नैताम, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी २७ जिल्हा परिषद शाळामध्ये ६९ शिक्षकांना नियमबाहय नियुक्ता दिलेल्या आहेत. सदर नियुक्त्या दिनांक २ मे, २०१२ रोजीच्या शासन निर्णयानुसार न करता जिल्हापरिषदेमधील अतिरिक्त शिक्षकांमधून भरती करावयाची असताना त्यांनी या शासन निर्णयाची दखल न घेता मागील दिनांकानुसार केलेल्या आहेत. याप्रकरणी त्यांच्या निवृत्तीच्या दिवशीच त्यांच्या घरावर धाड टाकून त्यांना ४९ लाख रुपयांसह पकडल्यानंतर त्यांनी दिलेल्या मान्यता बोगस असल्याने रद्द कराव्यात या मागणीसाठी मा.लोकप्रतिनिधींनी मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच उप शिक्षणाधिकारी यांना २१ वेळा भेटूनही आवश्यक कार्यवाही झालेली नाही, याबाबत खुलासा करावा.

(३) जिल्हा परिषद शासकीय योजना राबवित नाही, दरवर्षी जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांना वेळेवर गणवेश व पुस्तके दिली जात नाहीत, शिक्षकांचे वेतन प्रदान वेळेवर होत नाही याबाबत लोकप्रतिनिधींनी प्रशासनाकडे सुमारे १५ निवेदने देऊनही कार्यवाही होत नसल्याबाबत खुलासा करावा.

(४) जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्थांना दिलेली कामे त्या संस्थेद्वारा दुस-या संस्थेला दिली जातात त्यामुळे कामाचा दर्जा घसरतो. कामाचा दर्जा कायम राखण्याबाबत तसेच संबंधित संस्थांनी दिलेली कामे त्यांनीच करण्याबाबत शासन स्तरावर काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(५) जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्यांचे अधिकार १४ व्या वित्त आयोगाच्या अंमलबजावणीनंतर काढून घेण्यात आलेले होते. त्यांना पुन्हा देण्याबाबत शासनाची काय भूमिका आहे, तसेच जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्यांना लोकसभा व विधानसभा सदस्यांप्रमाणे मतदार संघ विकास निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनस्तरावरून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला देण्यात यावी.

(६) श्री. संदीप सरोदे, सभापती, पं. स. काटोल यांनी दिलेल्या माहितीनुसार प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ग्रामसेवकाकडून झालेल्या अफरातफरीच्या प्रकरणासंदर्भातील निलंबनाचा प्रस्ताव तहसिलदारांना बदलण्यास सांगितला हे खरे आहे काय, याबाबत समितीला माहिती देण्यात यावी.

(७) मिनी अंगणवाडीचे रुपांतर अंगणवाडीत करावयाच्या ठरावाची सद्य:स्थिती व एकात्मिक बालविकास विभागाचे १३ प्रकल्प असूनही तेथे बसण्यासाठी जागा नाही. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस देण्यात यावी.

(८) प्रत्येक अपंगाला झेरॉक्स मशिन देण्याबाबत माहे मार्च, २०१५ मध्ये पाठविलेल्या प्रस्तावाची सद्य:स्थिती तसेच प्रत्येक जिल्हा परिषदेमध्ये प्रत्येक पंचायत समितीमध्ये अधिका-यांची रिक्त पदे भरण्याबाबत सद्य:स्थिती काय आहे.

**यासंदर्भात समितीस जिल्हा परिषदेकडून उपरोक्त मुद्यांची खालील प्रमाणे माहिती प्राप्त झाली.**

(१) नागपूर जिल्ह्यात १३ तालुके असून ६ विधानसभा मतदार संघ आहे. १३ तालुक्याचा बांधकाम विषयक विकास कामाची अंमलबजावणी करणेसाठी १ बांधकाम विभाग व ८ बांधकाम उपविभाग आहेत. बांधकाम विषयक विकास कामांची प्रभावी अंमलबजावणी तसेच लोकप्रतिनिधींना कामकाज करतांना येणा-या अडचणी दूर करणेसाठी जिल्हा परिषद बांधकाम उपविभागाचे कार्यक्षेत्र विधानसभा निर्वाचन क्षेत्र निहाय करणे आवश्यक आहे. त्यानुसार जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा दि. २८ जानेवारी, २०१५ चे विषय क्र.५(२७), ठराव क्र.३० अन्वये जि.प.बांधकाम उपविभागाचे कार्यक्षेत्र विधानसभा निर्वाचन क्षेत्र निहाय करणेसाठी ठराव मंजूर करण्यात येऊन प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना पत्र क्र.१४३२, दि. २७ फेब्रुवारी, २०१५ अन्वये प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

(२) श्री. सोमेश्वर नैताम, सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नागपूर यांनी दिनांक २ मे, २०१२ नंतर दिलेल्या वैयक्तिक मान्यते संबंधाने मा. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे स्तरावरून सर्व नस्त्यांची चौकशी व तपासणी केलेली असून त्यासंबंधीच्या तपासणी अहवालानुसार श्री.सोमेश्वर नैताम, सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी (प्राथ) जिल्हा परिषद, नागपूर यांनी लोकसेवक पदाचा भ्रष्ट व वाममार्गाने अवलंब करून स्वतःच्या फायद्यासाठी दुरुपयोग केल्याचे प्रथमदर्शनी दिसून आल्यामुळे शासनाचे दिनांक ९ सप्टेंबर, २०१६ च्या पत्रान्वये त्यांची विभागीय चौकशी करण्यास मंजुरी दिली असून शासनाचे दि. १२ सप्टेंबर, २०१६ च्या ज्ञापनाद्वारे त्यांच्याविरुद्ध दोषारोप पत्र बजावण्यात आलेले आहे. म्हणजेच शासनाकडून विभागीय चौकशीची कारवाई शासनस्तरावरुन सुरू करण्यात आलेली आहे.

दिनांक २९ मार्च, २०१४ रोजी लाचलुचपत विभागाने मा.विशेष न्यायालय (ला.प्र.का.) नागपूर कलम ९३ सीआरपीसी अन्वये सर्च वारंट प्राप्त करून श्री. सोमेश्वर नैताम, सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नागपूर यांचे वास्तव्याच्या ठिकाणी झडती घेतली असता नगदी रोकड ४७,१२,१००/- इतकी रक्कम जप्त करण्यात आलेली आहे. सदर प्रकरणी त्यांचेविरुद्ध दि. १ एप्रिल, २०१४ ला दु. ४.३० वाजता पोलीस स्टेशन कोराडी, नागपूर शहर येथे अपराध क्र.३०३७/१४ कलम १३ (१) (ई), सहकलम १३ (२) ला.प्र.का.१९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सद्य:स्थितीत प्रकरण खटला क्रमांक ३/२०१६ अन्वये मा.विशेष न्यायालय (ला.प्र.का.) नागपूर येथे न्यायप्रविष्ठ आहे. सदर प्रकरणावर पहिली सुनावणी दि. ७ एप्रिल, २०१६ ला झालेली असुन आतापर्यंत एकूण सुनावण्या झालेल्या आहेत. पुढील सुनवणीची तारीख दि. ३ ऑक्टोबर, २०१७ ही आहे.

तथापी यासंदर्भाने श्री.सोमेश्वर नैताम, तत्कालीन शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नागपूर यांनी दिनांक २ मे, २०१२ रोजीच्या शासन निर्णयानुसार बंदी असतांना खाजगी प्राथमिक शाळेतील नियुक्त शिक्षकांना दिलेल्या मान्यतेसंबंधी सर्व नस्त्यांची चौकशी व तपासणी मा. शिक्षण उप संचालक नागपूर विभाग, नागपूर यांनी केलेली असुन, तपासणी अहवालानुसार एकूण २६ शाळांमधील ६९ शिक्षक नसून ४९ आहेत. त्या ४९ शिक्षकांबाबत तपासणी करण्यात आली. आणि त्यापैकी २८ शिक्षकांच्या वैयक्तिक मान्यता ह्या विहीत नियम व कार्यपद्धती नुसार नसल्याने या कार्यालयाचे स्तरावर रद्द करण्यात आल्या. व सदर रद्द केलेल्या मान्यता संबंधाने मा.उच्च न्यायालय खंडपीठ, नागपूर यांनी दिलेल्या आदेशान्वये १२ शिक्षकांच्या मान्यते संदर्भात मा.उच्च न्यायालयाने सुनावण्या घेऊन निर्णय घेण्याचे आदेशित केल्यानुसार ७ शिक्षकांच्या मान्यता या स्तरावरुन रद्द करण्यात आल्या आहेत.

(३) जिल्हा परिषद नागपूर अंतर्गत शासकीय योजना राबविल्या जातात. दरवर्षी शालेय विद्यार्थ्यांना गणवेश व मोफत पाठ्यपुस्तकांचे वितरण केल्या जाते. सन २०१२-१३ मध्ये एकूण ७७,७३९ विद्यार्थ्यांसाठी दिनांक २४ ऑगस्ट, २०१२ ला अनुदान वितरित केले आहे. तसेच सन २०१३-१४ मध्ये एकूण ८०,४७३ विद्यार्थ्यांसाठी दिनांक ६ जून, २०१३ ला अनुदान वितरित केले आहे. सन २०१४-१५ मध्ये महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई द्वारे अनुदान अप्राप्त असल्याने व गणवेषाचे वितरण नियोजित वेळात होण्यासाठी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांचे सहसंचालक (प्र.शा) यांचे पत्र जा.क्र.मप्राशिप/सशिम/गणवेष/काअ/२०१४-१५/२२३९, दिनांक १२ जून, २०१४ अन्वये दिनांक २० जून, २०१४ ला सर्व शिक्षा अभियान उपक्रमाच्या शिल्लक अनुदानातून १७,५०० विद्यार्थ्यांना तालुका स्तरावरून गणवेषाकरीता अनुदान वितरीत करण्यात आले आहे. तसेच दुस-या टप्प्यात दिनांक ७ ऑक्टोबर, २०१४ ला ६४,४०७ विद्यार्थ्यांना अनुदान वितरीत करण्यात आले आहे, याप्रमाणे सन २०१४-१५ ला एकूण ८१,९०७ विद्यार्थ्यांना गणवेषाचा लाभ देण्यात आलेला आहे. सन २०१६-१७ ला दिनांक ८ जून, २०१६ ला ७५,२३७ विद्यार्थ्यांना गणवेषाचा लाभ देण्यात आलेला आहे.

सर्व शिक्षा अभियान मोफत पाठ्यपुस्तक योजनेंअंतर्गत सन २०१२-१३ ला दि. ७ जून, २०१२ ला पाठ्यपुस्तकांचे तालुका स्तरावर वितरण करण्यात आले. अभ्यासक्रम बदलल्यामुळे इयत्ता २ री ची पुस्तके बालभारतीकडुन उशिरा प्राप्त झाली. सन २०१३-१४ ला दि. २५ मे, २०१३ ला पाठ्यपुस्तकांचे तालुका स्तरावर वितरण करण्यात आले. अभ्यासक्रम बदल्यामुळे इयत्ता तिसरीची काही पुस्तके दि. १६.७.२०१३ ला वितरित करण्यात आली. सन २०१४-१५ ला दि. २५ मे, २०१४ ला पाठ्यपुस्तकांचे तालुका स्तरावर वितरण करण्यात आले. सन २०१५-१६ ला दि. २२ मे, २०१५ ला पाठ्यपुस्तकांचे तालुका स्तरावर वितरण करण्यात आले. परिसर अभ्यास इ. ३ री, बालभारती व सुलभ भारती इ. ७ वी ही पुस्तके दि. १६ जुलै, २०१५ ला वितरीत करण्यात आली. सन २०१६-१७ ला दि. १२ मे, २०१६ ला पाठ्यपुस्तकांचे तालुका स्तरावर वितरण करण्यात आले. दि. १६ जुलै, २०१६ ला तालुकास्तरावर इतिहास व नागरिक शास्त्र, सामान्य विज्ञान, गणित, बालभारती, भूगोल या विषयांच्या स्वाध्याय पुस्तिका वितरीत करण्यात आल्या.

शिक्षकांचे वेतन शालार्थ वेतनप्रणालीनुसार करण्यात येत असल्याने नियमित वेतन वेळेवर होत आहे. सदर प्रणालीत तांत्रिक बाबीमुळे सुरुवातीचे काही महिने वेळेवर वेतन देता आले नाही. तथापि, सद्य:स्थितीत शालार्थ प्रणालीत नियमित व वेळेवर वेतन अदा करण्यात येत आहे. माहे मे देय जून २०१७ चे वेतन दिनांक २ जून २०१७ ला, माहे जून देय जुलै चे वेतन १ जुलै २०१७ माहे जुलै देय ऑगस्ट २०१७ चे वेतन १ ऑगस्ट २०१७ माहे ऑगस्ट देय सप्टेंबरचे वेतन दिनांक ७ सप्टेंबर २०१७ ला अदा करण्यात आलेले आहे.

(४) जिल्हापरिषद बांधकाममार्फत शासन निर्णय ग्रामविकास विभाग क्र. झेडपी २००८/ प्र.क्र.४७२/वित्त-९(३३), दि. ९ फेब्रुवारी २००९ मधील तरतुदी नुसार ग्राम पंचायतीने कामे करण्यास असमर्थता दर्शविल्यास सदरची कामे शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१०/२७८/प्र.क्र.१७२/पं.रा.-७ दि. १९ ऑक्टोबर २०११ नुसार ३३:३३:३४ या प्रमाणात मजूर सहकारी संस्था, सुशिक्षित बेरोजगार अभियंता व पात्र नोंदणीकृत नियमित कंत्राटदार यामध्ये वाटप करण्यात येतात. मधील अटी व शर्ती नुसार मजुर सहकारी संस्थांना देण्यात येत असल्याने संबंधित संस्थांकडे दिलेली कामे त्यांनीच करणे अपेक्षित आहे. सदर कामे संबंधित मजूर संस्थेकडूनच करणेत येत असल्याची खातरजमा कार्यकारी अभियंता/उप अभियंता यांचेकडुन करणेत येते. सदरील कामे वरील शासन निर्णय क्र.२०१०/२७५ प्र.क्र.१७२/पं.रा.-७, दि. १९ ऑक्टोबर २०११ मधील अटी व शर्तीनुसार मजूर सहकारी संस्थांना देण्यात येत असल्याने संबंधित संस्थाकडे एखाद्या मजूर सहकारी संस्थेने अटी व शर्ती नुसार काम न केल्याचे आढळल्यास संबंधित मजूर सहकारी संस्थावर कारवाई करण्यात येते. अद्यापपर्यंत एखाद्या मजूर संस्थेस दिलेले काम त्या संस्थेने दुस-या संस्थेकडून करून घेतल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(५) केंद्र पुरस्कृत १३ वा वित्त आयोगाअंतर्गत प्राप्त अनुदानापैकी १० टक्के निधी जिल्हा परिषद, २० टक्के निधी पंचायत समिती व ७० टक्के निधी ग्रामपंचायत स्तरावर वितरीत करण्यात येत होता. त्याच प्रमाणे १४ वा वित्त आयोगा अंतर्गत प्राप्त निधी तिन्ही स्तरावर वितरित करण्याबाबत दि. १७ ऑक्टोबर २०१५ च्या जि. प. सर्वसाधारण सभेने दिलेल्या निर्देशानुसार, शासनास या कार्यालयाचे पत्र क्र. जिपना/पंचा/१४ वि.आ./स्था-१०/४९५९/१५, दिनांक-०९ डिसेंबर २०१५ अन्वये पुढील कार्यवाहीस्तव कळविण्यात आलेले आहे.

(६) हे खरे नाही. प्रस्तुत प्रकरणाची वस्तुस्थिती थोडक्यात खालील प्रमाणे आहे :–

जिल्हा परिषद स्तरावरून याप्रकरणी चौकशी करण्याकरिता उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.), जिल्हा परिषद, नागपूर यांचे आदेश क्रमांक पिंपना/पंचा/स्थापना-५/सीआर-३१०/ ४३६/२०१५, दिनांक ८ फेब्रुवारी २०१६ अन्वये चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. चौकशी अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.), जिल्हा परिषद नागपूर यांनी सदर प्रकरणाची चौकशी करून दिनांक १० फेब्रुवारी २०१६ रोजी खालील प्रमाणे चौकशी अहवाल सादर केलेला आहे. श्री. गोरे, ग्रामसेवक यांनी ग्रामपंचायत, चंदनपार्डी येथील दिनांक २५ मार्च २०१५ रोजी संबंधित उपस्थित १७ ग्रामस्थांसमक्ष प्रत्यक्षरित्या संयुक्तपणे नुकसानीबाबत, तलाठी कृषी सहायक व ग्रामसेवक यांनी उपस्थित ग्रामस्थ यांचे समक्ष पंचनामा केला. या पंचनाम्यावर उपस्थित सर्वांची स्वाक्षरी असलेली पंचनाम्याची प्रत दाखविली. यामध्ये सर्वेक्षणानुसार गहू, हरभरा व इतर पिक नुकसानीबाबत दर्शविले होते परंतु संत्रा पिक नुकसानीबाबत क्षेत्र सर्वेक्षणात दर्शविले नाही व श्री. गोरे, ग्रामसेवक यांनी ग्रामपंचायत, मुर्ती येथील दिनांक २६ मार्च २०१५ रोजी संबंधित सरपंच/उप सरपंच/ग्रामपंचायत सदस्य/ग्रामस्थ असे एकूण १२ व्यक्तीचे समक्ष प्रत्यक्षरित्या संयुक्तपणे नुकसानीबाबत तलाठी, कृषी सहायक व ग्रामसेवक यांनी पंचनामा केला. या पंचनाम्यावर उपस्थित सर्वांची स्वाक्षरी असलेली पंचनाम्याची प्रत दाखविली. यामध्ये सर्वेक्षणानुसार गहू, हरभरा पिक नुकसानीबाबत दर्शविले होते परंतु संत्रा पिक नुकसानीबाबत क्षेत्र सर्वेक्षणात दर्शविले नाही. वरील प्रमाणे ग्रामसेवक व कृषी सहायक यांनी सर्वेक्षण अहवाल संयुक्त स्वाक्षरी करून तलाठी यांचेकडे तहसील कार्यालयास सादर करण्यास सुपूर्द केले. तथापि, तलाठी यांनी सर्वेक्षण अहवाल सादर करताना प्रथम पृष्ठ बदलवून त्यामध्ये नुकसानीबाबत गहू, हरभरा व इतर क्षेत्र कमी करून संत्रा फळ पिक नुकसानीचे क्षेत्र समाविष्ट केले व प्रथम पृष्ठावर कोणाचीही सही नसलेले व ग्रामसेवक व कृषी सहायक यांचे सही असलेले शेवटच्या पृष्ठावर तलाठी सर्वस्वी दोषी असल्याचे आढळून येते. प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या प्रकरणात तहसीलदार यांना निलंबनाचा प्रस्ताव बदलविण्याबाबत सांगितल्याची बाब खरी नाही.

(७) जिल्हा परिषद, नागपूर अंतर्गत २१६१ अंगणवाडी केंद्र मंजूर असून २१६१ अंगणवाडी केंद्र कार्यरत आहेत. मा.उप आयुक्त (संनि.), एबांविसेयो, नवी मुंबई यांचे पत्र क्र.२०८०, दि. ११ ऑक्टोबर २००७ नुसार नवीन अंगणवाडी/मिनी केंद्र प्रस्तावित करण्याबाबत निकष दिलेले असुन ४०० ते ८०० लोकसंख्येकरीता १ अंगणवाडी केंद्र, ८०० ते १६०० लोकसंख्या असलेल्या गांवात २ अंगणवाडी केंद्र, १६०० ते २४०० लोकसंख्या असलेल्या गांवात ३ अंगणवाडी केंद्र तसेच १५० ते ३०० लोकसंख्येकरीता १ मिनी अंगणवाडी केंद्र मंजूर करता येते. या कार्यालयाचे पत्र क्र.२९, दिनांक ६ जानेवारी २०१४ नुसार नवीन अतिरीक्त अंगणवाडी केंद्रासाठी प्रस्ताव मा. आयुक्त कार्यालयाला सादर करण्यात आलेला आहे. या प्रस्तावामध्ये १२ मिनी अंगणवाडीचे रुपांतर अंगणवाडीमध्ये करण्याचे प्रस्तावित आहे. अंगणवाडी केंद्र मंजूर करण्याची प्रक्रीया केंद्र शासनाकडून होत असल्याने नविन केंद्र होवू शकले नाही. जिल्हा पातळीवर मंजूर अंगणवाडी केंद्र पुर्णपणे कार्यरत नसल्यास व मिनी अंगणवाडीतील लाभार्थ्यांची संख्या वाढल्यास त्याचे रुपांतर मंजुर अंगणवाडीमधूनच अंगणवाडी केंद्रामध्ये करता येते. परंतु नागपूर जिल्हा परिषद अंतर्गत सर्व मंजुर केंद्र कार्यरत असल्याने केंद्र शासनाकडून नवीन अंगणवाडी केंद्र मंजूर झाल्याशिवाय सदर मिनी अंगणवाडीचे रुपांतर अंगणवाडीमध्ये करता येणार नाही. केंद्र शासनाकडून नविन अतिरिक्त अंगणवाडी केंद्र मंजूर झाल्यास मिनी अंगणवाडीचे रुपांतर अंगणवाडी केंद्रामध्ये करता येईल. नागपूर जिल्हा परिषदेमध्ये एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत १३ प्रकल्प कार्यरत आहेत. सदर प्रकल्पांना स्वतंत्र इमारत उपलब्ध नाही. तथापि, पंचायत समिती कार्यालयाकरीता नवीन प्रशासकीय इमारतींची बांधकामे करण्यात आली असल्याने जिल्हा परिषदेच्या इतर इमारती उपलब्ध करून दिलेल्या आहेत.

(८) समितीने नागपूर जिल्हा परिषदेस भेट देऊन अनौपचारिक चर्चा केली असता अपंग लाभार्थ्यांना झेरॉक्स मशिन देण्याबाबतचा प्रस्ताव मा. आयुक्त (अपंग) यांच्या मान्यतेसाठी या कार्यालयाचे पत्र क्र. १६७, दि. ८ सप्टेंबर, २०१४ ला पाठविण्यात आला. सदरच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने आयुक्त, अपंग कल्याण यांनी ग्रामविकास विभाग यांना त्यांचे पत्र क्र. १९२८, दि. १२ डिसेंबर २०१४ नुसार सचिव, ग्रामविकास यांना मंजुरीसाठी सादर केला.

ग्राम विकास विभागाचा शासन निर्णय दि. २४ नोव्हेंबर २०१५ नुसार अपंगांच्या सर्व योजनेस मान्यता प्रदान झाली आहे.

जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावर वर्ग-१ चे ९ व वर्ग-२ ची ६० अशी एकूण ६९ पदे रिक्त आहेत.सदर पदे भरण्याच्या अनुषंगाने संबंधित प्रशासकीय विभागाकडे जिल्हा परिषद, नागपूर स्तरावरून पाठपुरावा सुरू आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाचा शासन निर्णय दि. २६ ऑक्टोबर २०१६ अन्वये वैद्यकीय अधिकारी गट-अ ची रिक्त पदे मुलाखतीद्वारे भरण्याबाबत कार्यवाही सुरू आहे.

| अ.क्र. | विभाग | पदनाम | वर्ग | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | | (७) |
| १ | वित्त विभाग | मुख्य लेखा तथा वित्त अधिकरी | वर्ग-१ | १ | १ | ० | |
| | | उप मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी | वर्ग-१ | १ | १ | ० | |
| | | लेखा अधिकारी | वर्ग-२ | २ | २ | ० | |
| २ | सिंचाई विभाग | कार्यकारी अभियंता | वर्ग-१ | १ | १ | ० | |
| | | उप अभियंता/उप विभागीय अभियंता | वर्ग-२ | ७ | ६ | १ | उप अभियंता कळमेश्वर |
| ३ | ग्रामिण पाणी पुरवठा विभाग | कार्यकारी अभियंता | वर्ग-१ | १ | १ | ० | |
| | | सहाय्यक कार्यकारी अभियंता | वर्ग-२ | १ | ० | १ | |
| | | उप विभागीय अभियंता/उप अभियंता | वर्ग-२ | ८ | ५ | ३ | उप विभाग मौदा/उपअभियंता (यां) उप विभागीय अभियंता (देखभाल दुरुस्ती) नागपूर |
| ४ | बांधकाम विभाग | कार्यकारी अभियंता | वर्ग-१ | १ | १ | ० | |
| | | उप अभियंता/उप विभागीय अभियंता | वर्ग-२ | ९ | ९ | ० | |
| ५ | समाजकल्याण विभाग | जिल्हा समाजकल्याण अधिकारी | वर्ग-१ | १ | ० | १ | |
| ६ | पशुसंवर्धन विभाग | जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी | वर्ग-१ | १ | १ | ० | |
| | | पशुधन विकास अधिकारी | वर्ग-१ | ५७ | ५२ | ५ | |
| ७ | आरोग्य विभाग | जिल्हा आरोग्य अधिकारी | वर्ग-१ | १ | १ | ० | |
| | | माता बाल संगोपन अधिकारी | वर्ग-१ | १ | ० | १ | नागपूर मुख्यालय |
| | | अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी | वर्ग-१ | २ | ० | २ | नागपूर मुख्यालय |
| | | वैद्यकीय अधिकारी, गट-अ | वर्ग-२ | ११२ | ९१ | २१ | |
| | | वैद्यकीय अधिकारी, गट-ब | वर्ग-२ | ६९ | ६३ | ६ | वै.अ.(साथरोग+प्रशिक्षण पथक सह) |
| | | प्रशासकिय +सांख्यिकी अधिकारी | वर्ग-२ | २ | १ | १ | प्र.अ.पद रिक्त |
| ८ | शिक्षण विभाग (प्रा) | शिक्षणाधिकारी (प्राथमिक) | वर्ग-१ | १ | १ | ० | |
| | | उप शिक्षणाधिकारी | वर्ग-२ | २ | १ | १ | |
| | | गटशिक्षणाधिकारी | वर्ग-२ | १३ | ७ | ६ | |
| | | मुख्याध्यापक | वर्ग-२ | ५ | ० | ५ | |
| | | अधिक्षक (शा.पो.आ.) | वर्ग-२ | १५ | ११ | ४ | |
| ९ | शिक्षण विभाग (मा) | शिक्षणाधिकारी (माध्यमिक) | वर्ग-१ | १ | १ | ० | |
| | | अधिक्षक | वर्ग-२ | १ | १ | ० | |
| १० | कृषी विभाग | कृषी विकास अधिकारी | वर्ग-१ | १ | १ | ० | |
| | | जिल्हा कृषी अधिकारी (सा/विघयो) | वर्ग-२ | २ | २ | ० | |
| | | मोहिम अधिकारी | वर्ग-२ | १ | ० | १ | |
| ११ | महिला बालविकास विभाग | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (मु.बा.क.) | वर्ग-१ | १ | १ | ० | |
| | | बालविकास प्रकल्प अधिकारी | वर्ग-२ | १३ | ५ | ८ | भिवापूर/हिंगणा/कळमेश्वर/रामटेक/सावनेर वगळून इतर रिक्त. |
| | दिनांक | एकूण | | ३३८ | २६९ | ६९ | |

२५ सप्टेंबर २०१७

**ग्राम विकास विभागाचे अभिप्राय :-**

(१) ग्रामविकास व जलसंधारण विभागात संरचना निश्चित करण्यात आलेली असून जिल्हा स्तरावर जिल्हा परिषद आणि तालुका स्तरावर पंचायत समिती अशी रचना प्रशासकीय कामकाजाच्या दृष्टीने सोयीचे व्हावे यासाठी करण्यात आलेली आहे. पंचायत समिती स्तरावर प्रशासकीय कामकाजावर नियंत्रण ठेवण्यासाठी गट विकास अधिकारी असून त्यांचेकडून त्यांच्या समिती अंतर्गत होणा-या सर्व बांधकामावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी आहे. त्यामुळे विधानसभा क्षेत्रनिहाय जिल्हा परिषद बांधकाम उप विभागाचे कार्यक्षेत्र केल्यास मोठ्या प्रमाणात प्रशासकीय दृष्ट्या गैरसोयीचे होणार आहे.

(२) शासनाच्या विविध योजनांतर्गत विकासाच्या दृष्टीने पंचायत समिती स्तरावर गावातील अंतर्गत रस्ते, घरकुल, गटारे, प्राथमिक शाळा/प्राथमिक आरोग्य केंद्र इत्यादींच्या इमारतीचे बांधकाम अशा विविध बांधकामाच्या योजनेवर पंचायत समिती स्तरावरून नियंत्रण ठेवण्यात येते.

(३) सबब, नागपूर जिल्ह्यातील (१) पारशिवनी व (२) कळमेश्वर हे तालुके सद्य:स्थितीत अनुक्रमे सावनेर आणि हिंगणा बांधकाम उप विभागांतर्गत कार्यरत आहेत. त्यामुळे जिल्हा परिषद बांधकाम, उप विभाग रामटेक अंतर्गत पारशिवनी तालुका तसेच सावनेर उप विभागात कळमेश्वर तालुका कार्यक्षत्रात बदल करण्याचे कोणतेही प्रयोजन दिसून येत नाही.

(४) जिल्हा परिषद सर्वसाधरण सभा ठराव क्र.३०, दि.२८ जानेवारी २०१५ नुसार विधानसभा निर्वाचन क्षेत्र निहाय जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे कार्यक्षेत्र करण्याबाबतचा प्रस्ताव मान्य करणे योग्य होणार नाही. वरील प्रमाणे मा.मंत्री (ग्रामविकास) यांचे प्रस्ताव मान्यतेस्तव सादर करण्यात आला आहे.

(२) **शालेय शिक्षण विभागाचे अभिप्राय :-** श्री. सोमेश्वर नैताम, सेवानिवृत्त निम्म शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नागपूर यांच्याविरुद्ध शासन ज्ञापन क्र. विचौअ-२०१६ (प्र.क्र.९२/२०१६), दि. १२ सप्टेंबर २०१६ अन्वये दोषारोप बजावून विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे.

(३) **शालेय शिक्षण विभागाचे अभिप्राय :-** जिल्हा परिषद, नागपूर यांच्या अभिप्रायाशी सहमत आहे.

(४) **ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-** जिल्हा परिषद, नागपूर यांच्या अभिप्रायाशी सहमत आहे.

(५) **ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-**केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार केंद्र शासनाकडून स्थानिक स्वराज्य संस्थांकरीता राज्यांना सहायक अनुदान (Grant-in-Aid) प्राप्त होते. प्राप्त अनुदानाबाबत केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशींच्या आधारे केंद्र शासनाने ठरवून दिलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार निधी वितरणाचे निकष व वितरीत निधी खर्च करण्यासंदर्भातील धोरणात्मक निर्णय शासनाकडून घेण्यात येतो.

यासंदर्भात चौदाव्या केंद्रीय वित्त आयोगांतर्गत केंद्र शासनाकडून ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांकरीता राज्याला अनुदान उपलब्ध करून देताना त्याच्या विनियोगाबाबत केंद्र शासनाकडून देण्यात येणा-या मार्गदर्शक सुचनांनुसार संपूर्ण निधी केवळ ग्रामपंचायत स्तरावर उपलब्ध करावयाचा आहे. त्यानुसार राज्य स्तरावर अंमलबजावणी होणे आवश्यक असून केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन चौदाव्या वित्त आयोगांतर्गत ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांकरीता प्राप्त होणारे संपूर्ण अनुदान ग्रामपंचायत स्तरावर वितरीत करण्याबाबतचा धोरणात्मक निर्णय शासनाच्या ग्राम विकास विभागाने दिनांक १६ जुलै २०१५,दिनांक २१ डिसेंबर २०१५ व दिनांक २८ एप्रिल २०१६ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.

१४ व्या वित्त आयोगांतर्गत प्राप्त होणारा विकास निधी थेट ग्रामपंचायत स्तरावर वितरीत करण्याबाबत शासनाने धोरणात्मक निर्णय घेतला असल्याने जिल्हा परिषद सदस्य वा पंचायत समिती सदस्य स्तरावर वित्त आयोगाचा निधी उपलब्ध करून देता येणार नाही.

(६) **ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-** मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अभिप्रायाशी सहमत आहे.

(७) **महिला व बालविकास विभागाचे अभिप्राय :-** सर्वेक्षणाच्या आधारावर लोकसंख्या ८०० पेक्षा जास्त असल्यास मिनी अंगणवाडीचे रुपांतर अंगणवाडी केंद्रामध्ये करता येऊ शकते. परंतु अशा केंद्रांचे रुपांतर करतेवेळी त्या प्रकल्पाकडे मंजूर अंणवाडी केंद्र उपलब्ध असणे आवश्यक आहे. जेणेकरुन असे मंजूर केंद्र मिनी अंगणवाडी केंद्राच्या ठिकाणी सुरू करता येऊ शकेल. तसेच त्या मिनी अंगणवाडी केंद्रातील अंगणवाडी सेविकेची शैक्षणिक पात्रता (इयत्ता १० वी पास असल्यास) तिची त्या अंगणवाडी केंद्रात अंगणवाडी सेविका म्हणून नेमणूक करता येईल व शैक्षणिक पात्रता कमी असल्यास मदतनीस म्हणून नेमणूक करता येईल.

(८) **ग्राम विकास विभागाचे अभिप्राय :-**ग्रामविकास विभाग शासन निर्णय दिनांक २५ जून २०१४ अधिक्रमित करून शासन निर्णय क्र.अपंग २०१५/प्र.क्र.१३७/वित्त-३, दिनांक २४ नाव्हेंबर, २०१५ अन्वये अपंगांना वैयक्तिक लाभाच्या योजना, झेरॉक्स मशिन याकरीता अर्थसहाय्य देणेबाबत नव्याने मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

महाराष्ट्र विकास सेवा गट-अ मधील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरू आहे.

**चौकशी अहवाल**

**विषय : दिनांक १५ व १६ मार्च रोजी झालेल्या गारपिटीमुळे शेतपिकाचे व फळपिकाचे नुकसानीचे सर्व्हेक्षण श्री.बी.बी.गोरे सचिव ग्रामपंचायत चंदनपार्डी व श्री.एम.पी.गोटे, सचिव, ग्रामपंचायत मूर्ती, पंचायत समिती, काटोल यांनी चुकीचे केल्याबाबत त्यांचेवर प्रशासकीय कार्यवाही करण्याबाबत.**

तालुका काटोल अंतर्गत गारपिटीमुळे शेतपिकांचे व फळपिकांचे नुकसानीचा सर्वे दिनांक १५ व १६ मार्च २०१५ रोजी संयुक्त सर्व्हेक्षण ग्रामसेवक, कृषी सहायक व तलाठी यांनी केलेले असून त्या सर्वेक्षणामध्ये ज्या शेतक-यांचे गहु, चना, संत्रा इत्यादी पिकाचे नुकसान झाले त्यांचे शेतात जाऊन प्रत्यक्ष पाहणी करून वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर करावयाचा होता, त्यानुसार श्री. एन. पी. गोट व श्री. बी. बी. गोरे ग्रामसेवक, तलाठी श्री. गायकवाड व कृषी सहायक यांनी संयुक्त रितीने पिक नुकसानीचे सर्वेक्षण केले त्यानुसार अहवाल तयार करण्यात आला. तहसिलदार यांचेकडे सादर केलेल्या सर्वेक्षण अहवालात ज्यांचे नुकसान झाले नाही त्या शेतक-यांचे शेतपिकाचे व फळपिकाचे नुकसान झाल्याबाबत अहवाल सादर केला अशी तक्रार महसुल विभागास प्राप्त झाली, त्यानुसार तहसीलदार यांनी चौकशी समिती नेमली. चौकशी समितीने अहवाल सादर केला, त्यामध्ये चुकीचे सर्व्हेक्षण करून अहवाल सादर केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार महसूल विभागाने श्री. गायकवाड, तलाठी यांना निलंबित करून ग्रामसेवक व कृषी सहायक यांचेवर कार्यवाही करण्याबाबत प्रस्ताव संबंधित विभागाला सादर केला. त्यानुसार गटविकास अधिकारी, काटोल, तहसीलदार यांनी सादर केलेल्या अहवालानुसार पुढील कार्यवाहीस्तव प्रस्ताव या कार्यालयास सादर केला.

प्रस्तुत प्रकरणाची जिल्हा परिषद स्तरावरून चौकशी करण्याकरीता उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) जिल्हा परिषद, नागपूर यांची आदेश क्रमांक/जिपना/पंचा/स्थापना-५/सीआर-३१०/४३६/२०१५, दिनांक ८ फेब्रुवारी २०१६ अन्वये चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. चौकशी अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.), जिल्हा परिषद, नागपूर यांनी सदर प्रकरणाची चौकशी करून दिनांक १० फेब्रुवारी, २०१६ रोजी खालील प्रमाणे चौकशी अहवाल सादर केलेला आहे.

दिनांक १५ व १६ मार्च रोजी ग्रामपंचायत चंदनपार्डी व मूर्ती, पंचायत समिती, काटोल येथे झालेल्या गारपिटीमुळे शेतपिकाचे व फळपिकाचे नुकसानीचे सर्व्हेक्षण करण्याकरिता ग्रामसेवक, तलाठी व कृषी सहायक यांची संयुक्त सर्व्हेक्षण समिती तहसिलदारमार्फत नेमण्यात आली त्यानुसार त्यांनी संयुक्तपणे नुकसान झालेल्या शेतक-यांचे शेतातील पिक तथा इतर नुकसानीबाबत ग्रामपंचायत चंदनपार्डी येथील दिनांक २५ मार्च, २०१५ रोजी उपस्थित १७ ग्रामस्थ व ग्रामपंचायत मुर्ती येथील दिनांक २६ मार्च २०१५ रोजी संबंधित सरपंच/उप सरपंच/ग्रामपंचायत सदस्य/ग्रामस्थ असे एकूण १२ व्यक्तींचे ह्यांचे समक्ष पंचनामा केलेला होता. ह्या पंचनाम्यावरून त्यांनी सर्व्हेक्षण यादी तयार केली. प्रत्येक पानावर ग्रामसेवक व कृषी सहायक यांनी स्वाक्षरी अहवाल सादर करताना जी यादी ग्रामसेवक व कृषी सहायक यांनी दिली त्या यादीमध्ये फेरबदल करून चुकीचा सर्व्हेक्षण अहवाल सादर करताना जी यादी ग्रामसेवक व कृषी सहायक यांनी दिली त्या यादीमध्ये फेरबदल करून चुकीचा सर्वेक्षण अहवाल तहसील कार्यालयास सादर केला.

श्री. गोरे ग्रामसेवक यांनी ग्रामपंचायत चंदनपार्डी येथील दिनांक २५ मार्च २०१५ रोजी संबंधित उपस्थित १७ ग्रामस्थ समक्ष प्रत्यक्षरित्या संयुक्तपणे नुकसानीबाबत तलाठी, कृषि सहायक व ग्रामसेवक यांनी उपस्थित ग्रामस्थ ह्यांचे समक्ष पंचनामा केला ह्या पंचनाम्यावर उपस्थित सर्वांची स्वाक्षरी असलेली पंचनाम्याची प्रत दाखविली. यामध्ये सर्वेक्षणानुसार गहू, हरबरा व इतर पिक नुकसानीबाबत दर्शविले होते परंतु संत्रा पिक नुकसानीबाबत क्षेत्र सर्व्हेक्षणात दर्शविलेले नाही व श्री. गोट ग्रामसेवक यांनी ग्रामपंचायत मुर्ती येथील दिनांक २६ मार्च २०१५ रोजी संबंधित सरपंच/ उप सरपंच/ग्रामपंचायत सदस्य/ग्रामस्थ असे एकूण १२ व्यक्तींचे समक्ष प्रत्यक्षरित्या संयुक्तपणे नुकसानीबाबत तलाठी, कृषि सहायक व ग्रामसेवक यांनी पंचनामा केला. ह्या पंचनाम्यावर उपस्थित सर्वाची स्वाक्षरी असलेली पंचनाम्याची प्रत दाखविली. यामध्ये सर्व्हेक्षणानुसार गहु, हरबरा पिक नुकसानीबाबत दशविले होते परंतु संत्रा पीक नुकसानीबाबत क्षेत्र सर्व्हेक्षणात दर्शविलेले नाही. वरील प्रमाणे ग्रामसेवक व कृषि सहायक यांनी सर्व्हेक्षण अहवाल संयुक्त स्वाक्षरी करून तलाठी ह्यांचेकडे तहसिल कार्यालयास सादर करण्यास सुपुर्द केले तथापि तलाठी यांनी सर्व्हेक्षण अहवाल सादर करतांना प्रथम पृष्ठ बदलवून त्यामध्ये नुकसानीबाबत गहु, हरबरा व इतर क्षेत्र कमी करून संत्रा फळ पिक नुकसानीचे क्षेत्र समाविष्ट केले व प्रथम पृष्ठावर कोणाचीही सही नसलेले व ग्रामसेवक व कृषि सहायक यांचे सही असलेल्या शेवटच्या पृष्ठावर तलाठी यांनी सही करून बनावट सर्व्हेक्षण अहवाल सादर केलेले दिसून येतो, त्यामुळे यात तलाठी सर्वस्वी दोषी असल्याचे आढळुन येते.

**निष्कर्ष** :- सदर प्रकरणात ग्रामसेवक व कृषी सहायक हे पीक नुकसानीचे अहवालात फेरबदल करण्यासंबधाने दोषी असल्याचे चौकशीअंती तसेच उपलब्ध दस्ताऐवजावरून दिसून येत नाही, त्यामुळे त्यांचेविरुद्ध कार्यवाहीची आवश्यकता नाही.

**अभिप्राय** :- चौकशी अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.), जिल्हा परिषद, नागपूर यांनी प्रकरणी दिलेल्या चौकशी अहलवालाशी मी पूर्णतः सहमत आहे.

**अभिप्राय व शिफारशी**

समितीने नागपूर जिल्हा परिषदेला भेट दिली असता समितीने नागपूर जिल्ह्यातील विधीमंडळ सदस्य व जिल्हा परिषदेच्या पदाधिका-यांसोबत केलेल्या अनौपचारिक चर्चेच्या वेळी समितीच्या निदर्शनास आले की, एका विधानसभा क्षेत्रात २/३ उप अभियंत्यांचे कार्यक्षेत्र असल्यामुळे लोकप्रतिनिधींना कामकाज करताना येणा-या अडचणी येत आहेत. यासंदर्भात समितीने सदर अडचणी सोडविण्यासाठी शासन स्तरावर काय कार्यवाही केली याबाबत विभागीय सचिवांची साक्ष आयोजित करून माहिती घेतली. नागपूर जिल्ह्यात १३ तालुके असून ६ विधानसभा मतदारसंघ आहेत. १३ तालुक्याचा बांधकाम विषयक विकास कामाची अंमलबजावणी करणेसाठी १ बांधकाम विभाग व ८ बांधकाम उप विभाग जिल्ह्यात कार्यरत आहेत. बांधकाम विषयक विकास कामांची प्रभावी अंमलबजावणी तसेच लोकप्रतिनिधींना कामकाज करताना येणा-या अडचणी दुर करणेसाठी जिल्हा परिषद बांधकाम उप विभागाचे कार्यक्षेत्र विधानसभा निर्वाचन क्षेत्र निहाय करणे आवश्यक आहे. त्यानुसार जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेने जिल्हा परिषद बांधकाम उप विभागाचे कार्यक्षेत्र विधानसभा निर्वाचन क्षेत्र निहाय करणेसाठी ठराव मंजूर करून शासनाकडे प्रस्ताव सादर केला आहे.

विभागीय सचिवांच्या म्हणण्यानुसार ग्रामविकास व जलसंधारण विभागात संरचना निश्चित करण्यात आलेली असून जिल्हा स्तरावर जिल्हा परिषद आणि तालुका स्तरावर पंचायत समिती अशी रचना प्रशासकीय कामकाजाच्या दृष्टीने सोयीचे व्हावे यासाठी करण्यात आलेली आहे. पंचायत समिती स्तरावर प्रशासकीय कामकाजावर नियंत्रण ठेवण्यासाठी गट विकास अधिकारी असून त्यांचेकडून त्यांच्या समिती अंतर्गत होणा-या सर्व बांधकामावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी आहे. **ग्रामविकास विभागाच्या म्हणण्यानुसार विधानसभा क्षेत्रनिहाय जिल्हा परिषद बांधकाम उप विभागाचे कार्यक्षेत्र केल्यास मोठ्या प्रमाणात प्रशासकीय दृष्ट्या गैरसोयीचे होणार असले तरी जिल्हा परिषदेच्या पदाधिका-यांची मागणी आणि जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेने मान्य केलेल्या ठरावावर शासनाने या बाबींवर अधिकचा निधी खर्च होत नसल्यास साकल्याने विचार करून सकारात्मक निर्णय घ्यावा अशी समितीची शिफारस आहे.**

श्री. सोमेश्वर नैताम, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी २७ जिल्हा परिषद शाळांमध्ये ६९ शिक्षकांना नियमबाहय नियुक्त्या दिलेल्या आहेत. सदर नियुक्त्या दिनांक २ मे २०१२ रोजीच्या शासन निर्णयानुसार न करता जिल्हापरिषदेमधील अतिरिक्त शिक्षकांमधून भरती करावयाची असताना त्यांनी या शासन निर्णयाची दखल न घेता मागील दिनांकानुसार केलेल्या आहेत. याप्रकरणी त्यांच्या निवृत्तीच्या दिवशीच त्यांच्या घरावर धाड टाकून त्यांना ४९ लाख रुपयांसह पकडल्यानंतर त्यांनी दिलेल्या मान्यता बोगस असल्याने रद्द कराव्यात या मागणीसाठी लोकप्रतिनिधींनी मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच उप शिक्षणाधिकारी यांना २१ वेळा भेटूनही आवश्यक कार्यवाही झालेली नाही, याबाबत समितीने विभागीय सचिवांची साक्ष आयोजित केली. **साक्षीदरम्यान समितीच्या निदर्शनास आले की, श्री. सोमेश्वर नैताम, सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नागपूर यांनी दिनांक २ मे, २०१२ नंतर दिलेल्या वैयक्तिक मान्यतेसंबंधाने आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे स्तरावरून सर्व नस्त्यांची चौकशी व तपासणी केलेली असून त्यासंबंधीच्या तपासणी अहवालानुसार श्री. सोमेश्वर नैताम, सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी (प्राथ.) जिल्हा परिषद, नागपूर यांनी पदाचा दुरुपयोग करून स्वतःच्या फायद्यासाठी दुरुपयोग केल्याचे प्रथमदर्शनी दिसून आल्यामुळे शासनाने त्यांची विभागीय चौकशी सुरू केली असून सदर चौकशी विहित कालमर्यादेत पूर्ण करून त्यानुसार केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यांच्या आत पाठवावी अशी समितीची शिफारस आहे.**

जिल्हा परिषद कोणतीही शासकीय योजना राबवित नाही. दरवर्षी जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांना वेळेवर गणवेश व पुस्तके दिली जात नाहीत, शिक्षकांचे वेतन प्रदान वेळेवर होत नाही याबाबत लोकप्रतिनिधींनी प्रशासनाकडे सुमारे १५ निवेदने देऊनही कार्यवाही होत नसल्याबाबत समितीकडे जिल्हा परिषद पदाधिका-यांच्या तक्रारी प्राप्त झाल्याच्या अनुषंगाने समितीने विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीदरम्यान समितीच्या निदर्शनास आले की, जिल्हा परिषद, नागपूर अंतर्गत दरवर्षी शालेय विद्यार्थ्यांना गणवेश व मोफत पाठ्यपुस्तकांचे वितरण केले जाते. परंतु सन २०१२-१३ मध्ये दिनांक २४ ऑगस्ट २०१२ एवढ्या विलंबाने अनुदान प्राप्त झाले होते, तर सन २०१४-१५ चे अनुदान शैक्षणिक वर्षात मिळाले नसल्यामुळे विद्यार्थ्यांना वेळेवर गणवेशाचा लाभ देता आला नाही. समितीच्या मते सदर बाब गंभीर आहे. तसेच इयत्ता २ री ची पुस्तके बालभारती कडूनच उशिरा प्राप्त झाली तर इयत्ता ३ री चा अभ्यासक्रम बदलल्यामुळे तीही पुस्तके उशिरा प्राप्त झाली एवढेच नव्हेतर स्वाध्याय पुस्तिका देखील विलंबाने प्राप्त झाल्यामुळे त्या विद्यार्थ्यांना उशिरा पुस्तके वितरित केल्याचे निदर्शनास आले आहे. **विद्यार्थ्यांना गणवेश व पुस्तके विलंबाने वितरित केल्यामुळे त्यांचे शैक्षणिक नुकसान झालेले आहे व ते कदापि भरून येणारे नाही. त्यामुळे यापुढील काळात शैक्षणिक वर्षाच्या**

**पहिल्या आठवड्यात विद्यार्थ्यांना पुस्तके व गणवेशाचे वाटप होईल याच्या अनुषंगाने विभागाने नियोजन करावे व योजनेची अंमलबजावणी करावी आणि केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

जिल्ह्यातील शिक्षकांना वेळेवर वेतन अदा केले जात नसल्याच्या तक्रारीबाबत संगणक प्रणालीतील त्रुटीचे कारण समितीला मान्य होऊ शकत नाही. राज्यातील सर्व शासकीय कर्मचा-यांचे वेतन सेवार्थ या प्रणालीद्वारे अदा केले जाते. तर शिक्षकांचे अनुदान हे शालार्थ या प्रणालीद्वारे वितरित केले जाते. शासकीय कर्मचा-यांचे वेतन हे राज्याच्या एकत्रित निधीतून वेतन व भत्ते या शीर्षाखाली सेवार्थ प्रणालीद्वारे दिले जात असताना केवळ शिक्षकांना अनुदाने या शीर्षाखाली निधी वितरित करून त्याकरीता स्वतंत्र शालार्थ प्रणालीद्वारे वेतन अदा करणे हे समितीला अनाकलनीय वाटते. **त्यामुळे राज्यात शिक्षकांच्या वेतनाबाबतच्या अनेक तक्रारी शासनाकडे करण्यात आल्या असून सदरहू विषय विधानसभागृहामध्ये देखील चर्चिला गेला आहे. त्यामुळे शिक्षक या संवर्गाचे वेतन नियमित व वेळेवर अदा करण्याच्या संदर्भात यापुढील काळात विभागाने दक्षता घ्यावी अशीही समितीची शिफारस आहे.**

जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्यांचे अधिकार १४ व्या वित्त आयोगाच्या अंमलबजावणीनंतर काढून घेण्यात आले असल्याची सार्वत्रिक तक्रार समितीकडे केली जाते. तसेच जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्यांना लोकसभा व विधानसभा सदस्यांप्रमाणे मतदारसंघ विकास निधी उपलब्ध करून देण्याबाबत देखील वारंवार मागणी केली जाते. यासंदर्भात शासन स्तरावरून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे याबाबत समितीने विभागीय सचिवांची साक्ष घेतली. १३ व्या वित्त आयोगामार्फत प्राप्त अनुदानापैकी १० टक्के निधी जिल्हा परिषद २० टक्के निधी पंचायत समिती व ७० टक्के निधी ग्रामपंचायत स्तरावर वितरित करण्यात येत असे. त्याच प्रमाणे १४ वा वित्त आयोगाअंतर्गत प्राप्त झालेला निधी तिन्ही स्तरावर वितरीत करण्यात येत नाही. नागपूर जिल्हा परिषदेच्या सर्व साधारण सभेने १४ व्या वित्त आयोगाचे अनुदान देखील १३ व्या वित्त आयोगाच्या पद्धतीने वितरीत करण्याबाबत ठराव संमत करून शासनाकडे प्रस्ताव पाठविला आहे. परंतु ग्रामविकास विभागाच्या अभिप्रायानुसार केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार केंद्र शासनाकडून स्थानिक स्वराज्य संस्थांकरीता राज्यांना सहायक अनुदान (Grant-in-Aid) प्राप्त होते. प्राप्त अनुदानाबाबत केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशींच्या आधारे केंद्र शासनाने ठरवून दिलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार निधी वितरणाचे निकष व वितरित निधी खर्च करण्यासंदर्भातील धोरणात्मक निर्णय शासनाकडून घेण्यात येतो. त्यानुसार १४ व्या वित्त आयोगाचे अनुदान पूर्णपणे ग्रामपंचायत स्तरावर वितरित करण्यात येत आहे. **समितीच्या मते १४ व्या वित्त आयोगाचे अनुदान जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावर काही प्रमाणात तरी देणे आवश्यक आहे. अन्यथा या संस्थांच्या अस्तित्वाला काही अर्थ उरणार नाही. अतः सदरहू बाब शासनाची धोरणात्मक बाब असल्यामुळे समितीच्या या अभिप्रायावर विचार करून शासनाने यथायोग्य निर्णय घ्यावा अशी समितीची शिफारस आहे.**

नागपूर जिल्ह्यातील मिनी अंगणवाडीचे रूपांतर अंगणवाडीत करावयाचा ठराव मंजूर करण्यात येऊनही अद्याप त्यावर अंमलबजावणी झालेली नाही. तसेच एकात्मिक बालविकास विभागाचे १३ प्रकल्प असून तेथे बसण्यासाठी जागा नाही या तक्रारीच्या अनुषंगाने समितीने विभागीय सचिवांची साक्ष घेतली. नागपूर जिल्हा परिषदेअंतर्गत २९९ मिनी अंगणवाड्या कार्यरत आहेत. लोकसंख्येच्या प्रमाणात अंगणवाडी आणि मिनी अंगणवाडी मंजूर केली जाते. **जिल्ह्यातील १२ मिनी अंगणवाड्या अंगणवाडीत रूपांतर करण्याबाबतचा प्रस्ताव आयुक्तालयाकडे प्रलंबित असून त्याबाबत सर्व आवश्यक ती कारवाई तातडीने पूर्ण करून त्यांचे अंगणवाडीमध्ये रूपांतर करण्यात यावे व त्याबाबतचा अहवाल समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांनी त्यांच्या स्वःउत्पन्नाच्या ३% निधीतून अपंग कल्याणासाठी योजना राबविणे आवश्यक आहे. परंतु अशा योजना राबविताना त्यामध्ये अपंगांना झेरॉक्स मशिन देता येत नव्हती. त्याअनुषंगाने नागपूर जिल्हा परिषदेने प्रत्येक अपंगाला झेरॉक्स मशिन देण्याबाबत माहे मार्च, २०१५ मध्ये प्रस्ताव पाठवून शासनाची मान्यता मागविली होती. समितीने सदर प्रस्तावाची सद्यःस्थिती जाणून घेण्यासाठी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. **विभागीय सचिवांनी यासंदर्भात दिनांक २४ नोव्हेंबर २०१५ रोजीचा शासन निर्णय निर्गमित करून (परिशिष्ट क्र.७.१) अपंगांना वैयक्तिक लाभाच्या योजना राबविताना त्यामध्ये झेरॉक्स मशिनचा समावेश केला असल्याची बाब समितीच्या निदर्शनास आणली. विभागाने तत्परतेने नागपूर जिल्हा परिषदेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने व समितीच्या प्रश्नावलीच्या अनुषंगाने तातडीने शासन निर्णय निर्गमित केल्याबाबत समिती समाधान व्यक्त करते.**

नागपूर जिल्हा परिषदेअंतर्गत वर्ग १ व वर्ग २ ची सुमारे ६९ पदे रिक्त आहेत. परिणामी जिल्हा परिषदेतील विविध विकास कामे व शासनाच्या कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी प्रभावीत होत आहे. **यासंदर्भात विभागीय सचिवांनी महाराष्ट्र विकास सेवा गट अ मधील रिक्त पदे भरण्याची कारवाई सुरू असल्याबाबत आपल्या लेखी माहितीत नमूद केले आहे. त्या अनुषंगाने सदर कारवाई तातडीने पूर्ण करून ही सर्व पदे तातडीने भरण्यात यावीत अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण आठ

## जिल्हा परिषद, नागपूर (प्रशासन)

### पंचायत समिती, कामठी अंतर्गत सन २०१२-१३ साठी केलेली तरतूद विलंबाने खर्च झालेली असल्याबाबत

समितीने दिनांक २९, ३० सप्टेंबर व १ ऑक्टोबर २०१५ या कालावधीत नागपूर जिल्हा परिषदेस भेट दिली. दिनांक ३० सप्टेंबर २०१५ रोजी समितीने कामठी पंचायत समिती येथे भेट देऊन गटविकास अधिकारी व इतर संबंधित अधिका-यांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, पंचायत समितीने स्वःउत्पन्नातून सन २०१२-१३ मध्ये किती व कोणकोणती कामे/योजना हाती घेतल्या होत्या, ही कामे किंवा योजना किती कालावधीपर्यंत पूर्ण होणे आवश्यक होते व ती कामे त्या कालावधीपर्यंत पूर्ण न होण्याची कारणे काय आहेत, दिनांक ३१ मार्च २०१४ रोजी किती कामे विहित कालावधीपेक्षा जास्त काळ अपूर्ण अवस्थेत आहेत, त्याची कारणे काय आहेत, ही कामे केव्हा पूर्ण करण्यात येतील, उक्त कामांपैकी किती कामे ग्रामपंचायतीमार्फत करण्यात आली होती, यामध्ये खरीप व रब्बी कार्यक्रम प्रचार व प्रसिद्धी यासाठी तरतुदीच्या मर्यादेत योजना कार्यान्वित करणे अशक्य झाल्याने, ९० टक्के अनुदानावर मागासवर्गीय महिलांना शिलाई मशिन वाटप यासाठी दर करारानुसार पुरवठा आदेश दिल्याप्रमाणे पुरवठाधारकाने पुरवठा न केल्यामुळे अशी कारणे दिली आहेत आणि खर्च निरंक झाल्याचे दाखविले आहे. यावर प्रभारी गटविकास अधिकारी यांनी समितीस विदित केले की, खरीप व रब्बी कार्यक्रम प्रचार व प्रसिद्धीसाठी रूपये २,००० तरतूद केली होती, तरतूद केल्यानंतर प्रत्यक्ष योजना कार्यान्वित करण्यासाठी मेळावा आयोजित करण्याच्या संदर्भात चर्चा झाली. रूपये २००० च्या मर्यादेत कृषीबाबतचा मेळावा होणे शक्य नव्हते. पुढील वर्षी ही योजना पूर्ण करण्यात आली आहे.

समितीने पुढे विचारणा केली की, ९० टक्के अनुदानावर मागासवर्गीय महिलांना शिलाई मशिन वाटप योजना आहे, त्यासाठी रूपये १,२१,३६० तरतूद केली. परंतु खर्च निरंक आहे. यावर प्रभारी गट विकास अधिकारी यांनी समितीस विदित केले की, ९० टक्के अनुदानावर पिको फॉल मशिन खरेदी करण्याची योजना हाती घेतली होती. पूर्वी साधी मशिन असायची आणि सध्या मल्टीपरपज मशिन येऊ लागली आहे, ती विजेवर सुद्धा चालते आणि त्यामध्ये पिको फॉलचेही काम होते. लाभार्थ्यांना फायदा व्हावा म्हणून अशा मशिन देत आहोत.

समितीने पुढे विचारणा केली की, दरकरारानुसार पुरवठा आदेश दिल्याप्रमाणे पुरवठादाराने पुरवठा न केल्यामुळे कामे अपूर्ण स्थितीत राहिली का, यावर प्रभारी गटविकास अधिकारी यांनी समितीस विदित केले की, दरकराराप्रमाणे प्रशासकीय व तांत्रिक मान्यता दिल्यानंतर दिनांक १८ मार्च २०१३ ला सोलापूर येथील एका पुरवठादाराला पुरवठा आदेश देण्यात आला, त्यांनी ३० मार्चपर्यंत पुरवठा केला नाही, त्यामुळे ही योजना राबविण्यात आली नाही असे कारण दिले आहे. मात्र नंतरच्या वर्षात ही योजना राबविली आहे. सन २०१३-१४ मध्ये निविदा काढून खरेदी करण्यात आली आणि मे. अशोक एन्टरप्रायझेस, नागपूर यांच्याकडे काम दिले.

समितीने अशी विचारणा केली की, पूर्वीचे व आताचे दर सांगावेत. यावर प्रभारी गटविकास अधिकारी यांनी समितीस विदित केले की, मे. अशोक एन्टरप्रायझेस, नागपूर यांचे एका शिलाई मशिनचे दर रूपये ५,९९७ होते तसेच पूर्वीच्या वर्षाचे दर किती होते, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांनी समितीस विदित केले की, सन २०१२-१३ ला ज्या दराने मशिन घेण्याचे ठरविले, त्यांनंतर सन २०१३-१४ सदरहू मशिनच्या दरामध्ये बदल झाला. अगोदरच्या वर्षी शिलाई मशिन होती, नंतरच्या वर्षी पिको फॉल मशिन घेतली आणि त्याची किंमत रुपये ५,९९७ होती. यावर समितीने अशी विचारणा केली की, मागच्या वर्षी मशिनची किंमत काय होती. यावर प्रभारी गट विकास अधिकारी यांनी समितीस विदित केले की सन २०१२-१३ मध्ये असलेल्या मशिनचा दर रुपये ५,४२० होता आणि सन २०१३-१४ मध्ये असलेल्या मशिनचा दर रुपये ५,९९७ होता. यावर समितीने पुढे विचारणा केली की, म्हणजे जवळपास रुपये ५७७ चा फरक पडला आहे. या मशिन अगोदर न घेण्याची जबाबदारी कोणावर टाकायची, पुरवठादाराने पुरवठा केला नाही तर त्याला काळ्या यादीत टाकले पाहिजे होते. यासंबंधी कोणतीच कार्यवाही केली नाही. त्या पुरवठादारावर जबाबदारी निश्चित करणे आवश्यक होते. संबंधित अधिका-यांवर प्रशासकीय कारवाई करावी आणि त्यांच्या पगारातून व्याजासहित वसुली करावी व सबंधितांकडून वसुली केल्याचा अहवाल समितीला सादर करण्यात यावा, असे समितीने निदेश दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

पंचायत समिती, कामठी अंतर्गत सन २०१२-१३ साठी केलेली तरतूद सन २०१३-१४ मध्ये, पुरवठादाराने मालाचा पुरवठा दिनांक ३१ मार्च २०१३ पुर्वी न केल्यामुळे विलंबाने खर्च झाली. याप्रकरणी सदर पुरवठादारावर केलेल्या दंडात्मक कारवाईची माहिती समितीस देण्यात यावी.

**समितीस जिल्हा परिषदेकडून उपरोक्त मुद्दयांची खालील प्रमाणे माहिती प्राप्त झाली.**

सन २०१२-१३ मध्ये पुरवठाधारक मेसर्स सुत्रवे इंजिनिअरिंग वर्क्स प्रा.लि. सोलापूर यांना शासनाच्या दर करारानुसार पंचायत समिती सेसफंड योजनेअंतर्गत शिलाई (पिको-फॉल) मशिन पुरवठा करण्याबाबत कार्यालयाचे पत्र क्र.९३६ दिनांक १८/०३/२०१३ अन्वये साहित्य पुरवठा करण्याबाबत आदेश दिले होते. तथापि सदर वर्षात पुरवठादाराने पुरवठा आदेशाच्या अनुषंगाने साहित्याचा पुरवठा विहीत मुदतीत केलेला नसल्याने या कार्यालयाचे (१) पत्र क्र.पसका/पंचा/ ३९०८/१५, दि.१८/१२/२०१५ (२) पत्र क्र./पसका/पंचा/१४२७/१६, दि.२४/०५/२०१६ तसेच (३) पत्र क्र./पसका/पंचा/पंरास/१४३४/१६, दि.२५/०५/२०१६ अन्वये उद्योग सहसंचालक (उद्योग) मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालय समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सन २०१२-१३ मध्ये दर कराराप्रमाणे साहित्याचा पुरवठा न करणा-या मेसर्स सुत्रवे इंजिनिअरींग वर्क्स प्रा.लि., सोलापूर यांचे नाव काळ्या यादीत समाविष्ट करणेबाबत कळविण्यात आले होते. त्या अनुषंगाने उद्योग सहसंचालक (उद्योग) मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालय समोर, मुंबई ४०० ०३२ यांनी मेसर्स सुत्रवे इंजिनिअरींग वर्क्स प्रा.लि., सोलापूर यांना खुलासा मागविलेला आहे तसेच सन २०१३-१४ मध्ये शिलाई (पिको फॉल) मशिन खरेदीकरीता भुगतान केलेली जादाची रक्कम रु.९२३२ मेसर्स सुत्रवे इंजिनिअरींग वर्क्स प्रा.लि., सोलापूर यांचेकडून वसूल करून पंचायत समिती सेस फंड खात्यात जमा करण्यात आलेली आहे.

**ग्रामविकास विभागाचा अभिप्राय :-**

पंचायत समिती, नागपूर अंतर्गत सन २०१२-१३ मध्ये पुरवठादाराने पुरवठा आदेशाच्या अनुषंगाने साहित्याचा पुरवठा विहीत मुदतीत केला नसल्याने त्याचे नाव काळ्या यादीत टाकणेबाबत संचालक (औद्योगिक), प्रशासकीय भवन, मुंबई यांना कळविण्यात आले आहे.

सन २०१३-१४ मध्ये शिलाई मशिन खरेदीसाठी दरपत्रक मागविले असता, पुर्वीच्या खरेदी दरापेक्षा रु.५७७/— इतक्या जादा दराचे दरपत्रक प्राप्त झाल्याने, मेसर्स सुत्रवे इंजिनिअरींग वर्क्स प्रा.लि., सोलापूर यांसकडून रु.५७७ x १६ (शिलाई मशिन) याप्रमाणे एकूण रक्कम रु.९२३२/– पुरवठादाराकडून वसूल करण्यात आली आहे.

**चौकशी अहवाल**

**सन २०१२-२०१३ या आर्थिक वर्षाचे पंचायत समिती कामठी यांचे पंचायत समिती सेस फंडाचे अंदाजपत्रक**

सन २०१२-२०१३ या आर्थिक वर्षाचे पंचायत समिती कामठी यांचे पंचायत समितीस फंडाचे अंदाजपत्रक सन २०१२-२०१३ चे सुधारित अंदाजपत्रकास पंचायत समिती, कामठी विशेष सभा दि.१३/०२/२०१३ रोजी विषय क्रमांक १ ठराव क्र. १ अन्वये मंजुरी प्रदान करण्यात आली. त्यामध्ये २० टक्के मागासावर्गीयांच्या कल्याणाकरीता निधी रु. १,२१,३६०/- ची तरतूद करण्यात आली.

**योजनेस पंचायत समिती सभागृहाची मंजुरी**

२० टक्के मागासवर्गीयांच्या कल्याणाकरीता रु. १,२१,३६०/- ची अंदाजपत्रकीय तरतुदीस मंजुरी प्रदान केल्यानुसार ९० टक्के अनुदानावर मागासवर्गीय महिलांना शिलाई (पिको फॉल) मशिन पुरवठा करणे योजनेस पंचायत समिती, कामठीची विशेष सभा दि. १३/०२/२०१३ रोजी विषय क्रमांक १ ठराव क्र.१ अन्वये मंजुरी प्रदान करण्यात आली.

**योजना राबविण्यास्तव अवलंबविलेली प्रक्रिया**

गट विकास अधिकारी यांचे कार्यालयीन आदेश क्र. ९३०, दि. १८/३/२०१३ अन्वये पंचायत समिती सेस फंड सन २०१२-१३ अंतर्गत मागासवर्गीय महिलांना ९० टक्के अनुदानावर शिलाई (पिको फॉल) मशिन पुरवठा करणे योजनेस उपलब्ध तरतुदीच्या अधिन राहुन प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी प्रदान करण्यात आली.

गट विकास अधिकारी यांनी पुरवठा आदेश क्र./पंसका/पंचा/पं.स.सेस/९३६/१३, दि. १८/३/२०१३ अन्वये सहसंचालक, औद्योगिक विकास महामंडळ यांचे दर करार क्र./ एसपीसी/ आरसीटी/हाऊसहोल्ड झिगझॅग शिलाई मशिन /४२/बी-३१८०/२०१२-१३, संचालक (औद्योगिक), नविन प्रशासकीय भवन, मंत्रालय समोर, मुंबई, दि. ४ मार्च २०१३ अन्वये मेसर्स सुत्रवे इंजिनिअरिंग वर्क्स प्रा.लि., सोलापूर यांना TYPE-II Foot operated zigzag sewing machine with stand and table with drawer विवरणानुसार एकूण २४ नग प्रतीच्या रु. ५४२०/— प्रमाणे शिलाई (पिको फॉल) मशिनचा पुरवठा दि. ३०/३/२०१३ पावेतो करण्याच्या सुचनेसह पुरवठा आदेश दिलेला आहे.

**लाभार्थी निवड**

मागासवर्गीय महिलांना ९० टक्के अनुदानावर शिलाई (पिको फॉल) मशिन पुरवठा करणे या योजनाकरीता पंचायत समिती, कामठी सभागृहाची मासिक सभा दि. १४/३/२०१३ विषय क्र. १४ ठराव क्र. ३ अन्वये एकूण २४ लाभार्थ्यांची निवड करण्यात आली.

**साहित्य पुरवठा**

गट विकास अधिकारी, पंचायत समिती कामठी यांचे कार्यालयीन आदेश क्र. पंसका/पंचा/पं.स.सेस/९३६/१३, दि. १८/३/२०१३ अन्वये दर कराराप्रमाणे दिलेल्यास पुरवठा आदेशानुसार मेसर्स सुत्रवे इंजिनिअरींग वर्क्स प्रा.लि., सोलापूर यांनी विहित मुदतीत कार्यालयास साहित्याचा पुरवठा केलेला नाही. तसेच पुरवठादाराचे नाव काळ्या यादीत समाविष्ट करण्याबाबत कार्यवाही केलेली नाही.

**सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षाचे पंचायत समिती कामठी यांचे पंचायत समिती सेस फंडाचे अंदाजपत्रक**

सन २०१३-२०१४ चे सुधारीत अंदाजपत्रकास पंचायत समिती कामठीची विशेष सभा

दि. १४/०२/२०१४ रोजी विषय क्रमांक १ ठराव क्र. १ अन्वये मंजुरी प्रदान करण्यात आली. त्यामध्ये २० टक्के मागासवर्गीयांच्या कल्याणाकरीता सन २०१२-१३ मधील रु. १,२१,३६०/— ची तरतूद करण्यात आली.

**योजनेस पंचायत समिती सभागृहाची मंजुरी**

२० टक्के मागासवर्गीयांच्या कल्याणकारी रु. १,२१,३६०/- ची अंदाजपत्रकी तरतुदीस मंजूरी प्राप्त केल्यानुसार ९०% अनुदानावर मागासवर्गीय महिलांना शिलाई (पिको फॉल) मशिन पुरवठा करणे योजनेस पंचायत समिती कामठीची विशेष सभा दि. १३/०२/२०१३ रोजी विषय क्रमांक १ ठराव क्र. १ अन्वये मंजूरी प्रदान करण्यात आली. रु. १,२२,३६० तरतुदी मधून ९० टक्के अनुदानावर मागासवर्गीय शालेय विद्यार्थ्यांना दोन चारचाकी सायकलचा पुरवठा करणे ही योजना तसेच (२) रु. १,००,०००/- तरतुदीमधून ९० टक्के अनुदानावर मागासवर्गीय महिलांना शिलाई (पिको फॉल) मशिनचा पुरवठा करणे ही योजना राबविण्यास्तव मंजुरी प्रदान करण्यात आली.

**योजना राबविण्यास्तव अवलंबविलेली प्रक्रिया**

गट विकास अधिकारी, पंचायत समिती कामठी यांचे कार्यालयीन आदेश क्र. ६१४, दि. २५/२/२०१४ अन्वये ९० टक्के अनुदानावर मागासवर्गीय शालेय विद्यार्थ्यांना दोन चारचाकी सायकलचा पुरवठा करणे योजनेस तसेच मागासवर्गीय महिलांना ९० टक्के अनुदानावर शिलाई (पिको फॉल) मशिन पुरवठा करणे योजनेस प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी करण्यात आली.

गट विकास अधिकारी यांचे कार्यालयीन पत्र क्र. पंसका/पंचा/पं.स.सेस/६१५/१४, दि. २५/०२/२०१४ अन्वये सन २०१३-२०१४ मध्ये शिलाई (पिको फॉल) मशिन बाबत शासनाशी कोणतीही दरकरार झालेला नसल्याने खुल्या बाजारातून निविदा मागविण्याबाबत नोटीस प्रसिद्ध करण्यात आली. त्यानुसार (१) मेसर्स अशोक एंटरप्रायजेस, नागपूर (२) मेसर्स बाहेती ब्रदर्स, नागपूर तसेच (३) मेसर्स अलायंन्स क्रिऐशन, नागपूर यांचेमार्फत प्राप्त झालेल्या निविदा दि. ५/३/२०१४ रोजी उघडण्यात आल्या, त्यात मेसर्स अशोक एंटरप्रायजेस, नागपूर यांची रु. ५९९७/-(ISI पिको फॉल मशिन, सोबत स्टॅण्ड, टेबल, टुल बॉक्स, मशिन मोटर इत्यादी) सर्वात कमी दराची निविदा मंजूर करून गट विकास अधिकारी यांचे पुरवठा आदेश क्र./पंसका/पंचा/७६८/१४, दि. ५/३/२०१४ अन्वये एकूण १६ नग शिलाई मशिन पुरवठा करणेबाबत आदेश देण्यात आले.

**लाभार्थी निवड**

पंचायत समिती कामठी सभागृहाची मासिक सभा दि. १७/२/२०१४ विषय क्र. १४ अन्वये मागासवर्गीय महिलांना ९० टक्के अनुदानावर शिलाई (पिको फॉल) मशिन पुरवठा करणे या योजनाकरिता एकूण १६ लाभार्थ्यांची निवड करण्यात आली.

**साहित्य पुरवठा**

मेसर्स अशोक एंटरप्रायजेस, नागपूर यांनी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कामठी यांचे पुरवठा आदेश क्र.पंसका/पंचा/पं.स.सेस/७६८/१४, दि.५/३/२०१४ अन्वये निविदेतील साहित्याचे विवरणानुसार एकूण १६ नग शिलाई (पिको फॉल) मशिनचा पुरवठा २७/३/२०१४ रोजी पंचायत समिती कामठी कार्यालयास केला.

**अभिप्राय :-**

सन २०१२-१३ मध्ये पुरवठाधारक मेसर्स सुत्रवे इंजिनिअरींग वर्क्स, प्रा.लि, सोलापूर यांना पुरवठा आदेश देऊन सुद्धा पुरवठा केला नाही किंवा त्यांनी त्याबाबत पंचायत समिती कामठी कार्यालयास काहीही कळविले नाही. त्यामुळे गट विकास अधिकारी, पंचायत समिती कामठी यांनी त्यांचे कार्यालयीन पत्र क्र. पंसका/पंचा/३९०८/१५, दि. १८/१२/२०१५ अन्वये सदर एजन्सीला काळ्या यादीत टाकणेबाबत संचालक (औद्योगिक), नविन प्रशासकीय भवन, मंत्रालय समोर, मुंबई यांना कळविले आहे. सन २०१३-१४ मध्ये वरील प्रमाणे खरेदीसाठी दरपत्रक मागविण्यात येऊन मेसर्स अशोक एंटरप्रायजेस, नागपूर यांचेकडून साहित्य खरेदी करण्यात आले, ही खरेदी पुर्वीच्या दरापेक्षा रु. ५७७/- या जादा दराने करण्यात आल्याने गट विकास अधिकारी यांनी झालेल्या आर्थिक नुकसानाबाबत सन २०१२-१३ मध्ये साहित्याचा पुरवठा न करणा-या पुरवठा धारकाकडून रु. ५७७/-x १६ = ९२३२ रकमेची वसुली करून पंचायत समिती सेस फंड खात्यात जमा केली आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

समितीने नागपूर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक १० ऑक्टोबर २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, पंचायत समिती, कामठी अंतर्गत सन २०१२-१३ साठी केलेली तरतूद सन २०१३-१४ मध्ये, पुरवठादाराने मालाचा पुरवठा दिनांक ३१ मार्च २०१३ पुर्वी न केल्यामुळे विलंबाने खर्च झाली. याप्रकरणी सदर पुरवठादारावर केलेल्या दंडात्मक कारवाईची माहिती समितीस देण्यात यावी, यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, यासंदर्भात संबंधितांनी पुरवठा केला होता, ज्यांनी पुरवठा केला नाही त्यांचा समावेश काळया यादीत करण्यास सांगितलेले आहे. दुस-या व्यक्तीस पुरवठा केलेला आहे, त्याची वसुली केलेली आहे. या उत्तरावर समितीने समाधान व्यक्त केले.

## अभिप्राय व शिफारशी

समितीने नागपूर जिल्हा परिषदेला भेट दिली असता पंचायत समिती, कामठी यांनी अहवाल वर्ष सन २०१२-२०१३ मध्ये २० टक्के मागासवर्गीयांच्या कल्याणकारी योजनेवर खर्च करताना ९० टक्के अनुदानावर मागासवर्गीय महिलांना शिलाई (पिको फॉल) मशिन पुरवठा करण्याची योजना राबविण्याचा निर्णय घेतला. त्या अनुषंगाने त्यावेळी उपलब्ध असलेल्या दर करारातून मे.सुत्रवे इंजिनिअरिंग वर्क्स प्रा.लि.,सोलापूर यांना पुरवठा आदेश दिलेला होता. परंतु पुरवठादाराने विहीत मुदतीत पुरवठा केला नाही व त्यामुळे पंचायत समितीला अहवाल वर्षात योजना राबविता आली नाही. **परिणामी, अहवाल वर्षात मागासवर्गीय महिला सदर कल्याणकारी योजनेच्या लाभापासून वंचित राहिल्या. यास जबाबदार असणा-या पुरवठादारास काळया यादीत टाकण्याबाबत जिल्हा परिषद प्रशासनाने प्रस्तावित करूनही संचालक, (औद्योगिक) विकास महामंडळ यांच्या कार्यालयाने अद्यापि पुरवठादार संस्थेस काळया यादीत टाकले नसल्याबाबत समिती सखेद आश्चर्य व तीव्र नाराजी व्यक्त करते.**

सदर योजना अहवाल वर्षानंतर दुस-या वर्षी राबविताना शासनाचा दरकरार नसल्यामुळे खुल्या बाजारातून निविदा मागवून राबविण्यात आली. याचाच अर्थ **औद्योगिक विकास महामंडळाकडून केले जाणारे दरकरार व त्यातील पुरवठादार मनमानी करत असल्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांना असे दरकरार अनेकवेळा अडचणीचे ठरत असल्याची बाब समितीच्या निदर्शनास आलेली आहे. सबब, संबंधित पुरवठादारास अद्याप काळया यादीत टाकलेले नसल्यामुळे विभागाने त्याबाबत तातडीने निर्णय घेऊन केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला विनाविलंब अवगत करावी, अशी समितीची शिफारस आहे.**

## प्रकरण नऊ

## जिल्हा परिषद, नागपूर (प्रशासन)

### विभाग प्रमुखांनी पंचायत समितीस द्यावयाच्या भेटी व मासिक सभेस उपस्थित राहण्याबाबत

समितीने दिनांक २९, ३० सप्टेंबर व ०१ ऑक्टोबर, २०१५ या कालावधीत नागपूर जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी सन २०१२-१३ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालासंदर्भात नागपूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, सन २०१२-१३ मध्ये जिल्हा परिषदेतील कोणकोणत्या विभाग प्रमुखांनी पंचायत समितीला किती वेळा भेटी दिल्या तसेच किती विभाग प्रमुख पंचायत समितीच्या मासिक सभेत उपस्थित राहिले, भेटी कमी दिल्या असल्यास, त्याची कारणे काय आहेत, पंचायत समिती क्षेत्रात आरोग्य केंद्रे/उपकेंद्रे आहेत, त्यापैकी किती केंद्रांना जिल्हा आरोग्य अधिका-यांनी सन २०१२-१३ मध्ये भेटी दिल्या, भेटीच्या वेळी त्यांना तेथे कोणत्या त्रुटी आढळून आल्या, त्यांचे निराकरण कशाप्रकारे केले, सन २०१२-१३ मध्ये उक्त केंद्रावरील औषधांच्या साठ्याची किती वेळा तपासणी करण्यात आली, भेटी कमी का दिल्या याबाबत काही कारण देता येईल का, यावर प्रभारी गट विकास अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती उपलब्ध होऊ शकली नाही.

समितीने पुढे विचारणा केली की, प्रत्येक मासिक सभेस एका विभाग प्रमुखाने उपस्थित राहणे आवश्यक आहे. परंतु बहुतांश पंचायत समितीच्या मासिक सभेकरिता उपस्थित राहण्यासंबंधी पत्राद्वारे कळविण्यात येऊनही ते उपस्थित राहात नाहीत सदरहू विभाग प्रमुखांना पत्र दिल्यानंतरही जे उपस्थित राहिले नाहीत, त्या संदर्भात आढावा घेऊन बैठकीस उपस्थित नसणा-या विभाग प्रमुखांच्या सेवापुस्तिकेत नोंद करावी तसेच त्यांची एक वेतनवाढ थांबविण्यात यावी. भविष्यात विभाग प्रमुखांनी भेटी दिल्या पाहिजेत हा विषय अनिवार्य करावा, जिल्हा आरोग्य अधिका-यांनी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था योग्य नाही, बाहयरुग्ण विभाग (ओपीडी) उशिरा सुरू होते, जिल्हा परिषद आरोग्य समिती नियामक मंडळचे फलक प्राथमिक आरोग्य केंद्रात लावण्यात आले नाही, रुग्णालयात असलेली अस्वच्छता, आरोग्य सहायक, औषध निरीक्षक अधिकारी गैरहजर आहेत, टेलिफोनची व्यवस्था वैद्यकीय अधिकारी कक्षात नाही अशा त्रुटी लिहिल्या आहेत. त्रुटीच्या मानाने केलेली कार्यवाही पुरेशी नाही. आरोग्य सहायक, औषध निरीक्षक अधिकारी गैरहजर असल्याबाबत त्यांना पत्र देऊन स्पष्टीकरण मागविण्यात आले व समज देण्यात आली असे सांगितले आहे. पत्र देणे, खुलासा मागविणे ही कारवाई नाही. भेटीच्या वेळी गैरहजर होते. मात्र जिल्हा आरोग्य अधिका-यांनी कोणतीही कारवाई केलेली नाही. यावर तालुका आरोग्य अधिकारी यांनी समितीस विदित केले की, काही प्रमाणात कारवाई केली आहे, त्यांचा घरभाडे भत्ता बंद केला आहे. कनिष्ठ वैद्यकीय अधिकारी मुख्यालयी राहत नाहीत, त्यामुळे त्यांचा एनपीए व घरभाडे बंद केला आहे.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

(१) सन २०११-१२ मध्ये ज्या विभाग प्रमुखांनी पंचायत समितीस भेटी दिल्या नाहीत. त्याचा खुलासा मागवावा तसेच नियमानुसार त्यांचेवर कारवाई करावी व त्याबाबत संबंधित विभाग प्रमुखांच्या सेवापुस्तिकांमध्ये नोंद घेण्यात यावी असे निर्देश समितीने दिलेले आहे. त्यानुसार कोणती कारवाई करण्यात आलेली आहे?

(२) जिल्हा परिषदेच्या किमान एका विभागप्रमुखाने व ग्रामसेवकाने मासिक भेटीस उपस्थित राहणे आवश्यक आहे. या प्रकरणी नागपूर जिल्हा परिषदेतील विभाग प्रमुखांनी जिल्ह्यातील सर्व संबंधित पंचायत समित्यांना भेटी देणे आवश्यक असताना देखील त्या न दिल्याप्रकरणी समितीने अशा विभाग प्रमुखांविरुद्ध कारवाई करण्याचे निर्देश दिले होते. या संदर्भात काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय?

**समितीस जिल्हा परिषदेकडून उपरोक्त मुद्दयांची खालील प्रमाणे माहिती प्राप्त झाली.**

सन २०११-१२ मध्ये ज्या विभाग प्रमुखांनी पंचायत समितीस भेट दिली नाही, तसेच पंचायत समितीच्या मासिक सभेस उपस्थित राहिलेले नाहीत अशा विभाग प्रमुखांचा खुलासा मागवावा असे सन्मा. समितीचे निर्देश आहेत. समितीच्या निर्देशान्वये सन २०११-१२ मध्ये जिल्हा परिषद, नागपूरच्या वार्षिक प्रशासन अहवालानुसार एकूण १३ खात्याचे १७ खाते प्रमुख कार्यरत होते. (बदलीने रिक्त झालेल्या जागेवर संबंधित प्रभार दुस-या अधिका-याने सांभाळल्यामुळे) सदर १७ खाते प्रमुखांपैकी ८ खातेप्रमुख सेवानिवृत्त झालेले असून उर्वरित ९ खाते प्रमुखांकडून खुलासे मागविण्यात आले. प्राप्त खुलास्यान्वये ३ खातेप्रमुखांनी पंचायत समिती कामठीला भेटी दिलेल्या आहेत. उर्वरित विभाग प्रमुखांनी पंचायत समितीला भेटी दिल्या नाहीत पण त्या क्षेत्रातील विकास कामांना भेटी दिलेल्या आहेत.

सद्य:स्थितीत सन्माननीय पंचायती राज समितीच्या निर्देशान्वये व शासन परिपत्रक दिनांक १० मार्च २००८ अन्वये जिल्हा परिषद खाते प्रमुखांना पंचायत समितीला भेटी संदर्भात प्रपत्र तयार केलेले असून त्यानुसार विभाग प्रमुख कार्यवाही करीत आहेत.

**ग्रामविकास विभागाचा अभिप्राय :-**

शासन परिपत्रक दिनांक १० मार्च, २००८ अन्वये जिल्हा परिषदेतील खाते प्रमुखांनी संबंधित पंचायत समितींना भेटी दिल्याचे दिसून येत नाही. याबाबत सदरचे दिनांक १० मार्च, २००८ चे परिपत्रक पुनःश्च सर्व जिल्हा परिषदांच्या निदर्शनास आणून देवून परिपत्रकातील सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत कळविण्यात येत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

समितीने नागपूर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्दयावर अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक १० ऑक्टोबर, २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, जिल्हा परिषदेच्या किमान एका विभागप्रमुखाने व ग्रामसेवकाने मासिक भेटीस उपस्थित राहणे आवश्यक आहे. या प्रकरणी नागपूर जिल्हा परिषदेतील विभाग प्रमुखांनी जिल्ह्यातील सर्व संबंधित पंचायत समित्यांना भेटी देणे आवश्यक असताना देखील त्या न दिल्याप्रकरणी समितीने अशा विभाग प्रमुखांविरुद्ध कारवाई करण्याचे निर्देश दिले होते. या संदर्भात काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय, यावर समितीने असे निर्देश दिले की, ब-याच वेळा हा मुद्दा उपस्थित केला जातो. पंचायत समितीचा कारभार गतिमान करावयाचा असेल तर वरिष्ठ अधिका-यांनी काम वेळेवर पार पाडले पाहिजे, त्या कामासंदर्भात कोणत्याही कामात कमीपणा न मानता त्याची चालढकल करणे अपेक्षित नाही. अशा प्रकारची चालढकल चांगल्या कामांमध्ये अडथळा निर्माण करू शकते. याबाबत वरिष्ठ अधिका-यांनी आवश्यक ती दक्षता घेणे आवश्यक आहे असे निदेश समितीने दिले.

## अभिप्राय व शिफारशी

महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१ च्या कलम १४२ अन्वये महाराष्ट्र विधानमंडळाला सादर झालेल्या जिल्हा परिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील प्रश्नावली क्रमांक १ व २ च्या अनुषंगाने समिती मुख्य कार्यकारी अधिकारी आणि इतर संबंधित अधिका-यांची साक्ष घेते. प्रश्नावली क्रमांक २ वर संबंधित गटविकास अधिका-यांची साक्ष घेतेवेळी समिती प्रामुख्याने जिल्हा परिषदेच्या विविध विभाग प्रमुखांनी जसे मुख्य लेखा व वित्त अधिकारी इत्यादींनी पंचायत समितीला कितीवेळा भेटी दिल्या, किती विभाग प्रमुख पंचायत समितीच्या मासिक सभेस उपस्थित राहिले याविषयी माहिती प्राप्त करून घेते. मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी वेळोवेळी पंचायत समितीला भेट देऊन तपासणी करून पंचायत समितीच्या वार्षिक अंदाजपत्रक व कार्यक्रम अंदाजपत्रक तयार करण्याबाबत मार्गदर्शन करणे अपेक्षित असते. जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी पंचायत समितीच्या अंतर्गत येणा-या प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रांची तपासणी करणे आवश्यक असते. शिक्षण अधिका-यांनी शाळांना भेटी देऊन तपासणी करणे आवश्यक असते. पंचायती राज समितीच्याच शिफारशीवरुन विभागाने दिनांक २ मे १९६८, दिनांक ७ जून २००५, दिनांक ५ ऑगस्ट २००५, दिनांक १७ ऑक्टोबर २००६ व दिनांक १० मार्च २००८ वेळोवेळी यासंदर्भात परिपत्रके निर्गमित केलेली आहेत. **(परिशिष्ट क्र.९.१ ते ९.६)** असे असूनही जिल्हा परिषदांमध्ये विभाग प्रमुख शासनाच्या परिपत्रकाकडे दुर्लक्ष करताना दिसून येतात.

वस्तुतः पंचायत समित्यांना त्यांच्या कामामध्ये मार्गदर्शन करण्याकरिता पर्यवेक्षकिय जबाबदारी पार पाडणा-या उक्त विभाग प्रमुखांनी हजर राहिल्यास तालुक्यातील विकास कामांना गती येऊन ग्रामीण भागातील नागरिकांचे प्रश्न सुटण्यास मदतच होते. त्यामुळे सदर अधिका-यांनी पंचायत समित्यांना वारंवार भेटी देऊन व तिच्या मासिक सभांना उपस्थित राहून मार्गदर्शन करणे आवश्यक असते. परंतु वरील सुचनांचे पालन होत नसल्यामुळे शासनाच्या विविध योजनांची परिणामकारक अंमलबजावणी होत नाही. तसेच पदाधिकारी व अधिकारी यांच्यामध्ये समन्वय राहात नाही. पंचायत समित्यांचा अर्थसंकल्प वेळेवर मांडणे व तो नियमानुसार खर्च करणे, महिला व मागासवर्गीयांसाठीचा निधी खर्च करणे, वैयक्तिक लाभार्थ्यांना शासनाच्या विविध योजनांचे लाभ देणे, पंचायत समिती अंतर्गत शाळांच्या तपासणी, प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या तपासणी, अंगणवाड्याची तपासणी इत्यादी सर्व सामान्य जनतेला दिल्या जाणा-या सोयी-सुविधांच्या, योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीकडे दुर्लक्ष केले जाते. विभाग प्रमुख पंचायत समितीच्या सभांना उपस्थित राहात नसल्यामुळे तसेच भेटी देत नसल्यामुळे त्याचा कामाकाजावर विपरीत परिणाम होऊन सार्वजनिक हित जोपासले जात नाही. यासंदर्भात शासनाने वेळोवेळी दिलेल्या आदेशांचे पालन न करणा-या कसुरदार अधिका-यांविरुद्ध प्रशासकीय कारवाई करण्याचे आदेश असूनही राज्यात अद्यापपर्यंत अशा प्रकारे एकाही अधिका-यावर शासनाने प्रशासकीय कारवाई केल्याचे दिसून येत नाही. **तरी विभागाने विभाग प्रमुखांनी द्यावयाच्या भेटी व उपस्थित राहावयाच्या मासिक सभा यासंदर्भात स्वयंस्पष्ट शासन निर्णय निर्गमित करावा व त्यात पंचायत समितीच्या मासिक सभांना अनुपस्थित राहणा-या अधिका-यांवर कठोर कारवाई करण्याबाबत नमुद करून संबंधित अधिका-यांची उपस्थिती अनिवार्य करावी अशी समितीची शिफारस आहे व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस पाठविण्यात यावी.**

**प्रकरण दहा**

## जिल्हा परिषद, नागपूर (प्रशासन)

### येरखेडा, ता.कामठी पंचायत समिती अंतर्गत दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत सिमेंट नाला/बांधकामाच्या संदर्भात चुकीचे मोजमाप घेऊन काम पूर्ण असल्याचे दाखवून देयक काढल्याबाबत

समितीने दिनांक २९, ३० सप्टेंबर व ०१ ऑक्टोबर, २०१५ या कालावधीत नागपूर जिल्हा परिषदेस भेट दिली. येरखेडा, ता.कामठी पंचायत समिती अंतर्गत दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत सिमेंट नाला/बांधकामाच्या संदर्भात चुकीचे मोजमाप घेऊन काम पूर्ण असल्याचे दाखवून देयक काढल्याबाबतची माहिती समितीस प्राप्त झाली. सदर गावाची लोकसंख्या १५,७५० एवढी असून पाणीपट्टी वसुलीचे प्रमाण ४.५६ टक्के इतके अत्यल्प आहे. त्यावेळी पाणीपट्टी वसुली वाढविण्याचे निदेश देण्यात आले. ग्रामपंचायतीच्या कामकाजाबाबत विचारणा केली असता असे समजले की, दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत सिमेंट नाला बांधकामाच्या संदर्भात चुकीचे मोजमाप घेऊन काम पूर्ण नसताना पूर्ण असल्याचे दाखवून देयक काढण्यात आले. तेव्हा समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना असे निदेश दिले की, संबंधित दोषींवर त्यांच्या स्तरावर कडक कारवाई करावी, संबंधितांना निलंबित करावे आणि आवश्यकता भासल्यास संबंधितांच्या निलंबनाचा प्रस्ताव शासन स्तरावर पाठविण्यात यावा. तसेच सरपंचांच्या संदर्भात देखील योग्य ती कारवाई करावी.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

येरखेडा, ता.कामठी पंचायत समिती अंतर्गत दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत सिमेंट नाला/बांधकामाच्या संदर्भात चुकीचे मोजमाप घेऊन काम पूर्ण असल्याचे दाखवून देयक काढल्याप्रकरणी समितीच्या बैठकीत आश्वासित केल्यानुसार दोषींवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**समितीस जिल्हा परिषदेकडून उपरोक्त मुद्दयांची खालील प्रमाणे माहिती प्राप्त झाली.**

ग्रामपंचायत, येरखेडा येथील दलित वस्ती सुधार योनजेअंतर्गत सिमेंट नाला बांधकामाच्या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांचे आदेश क्र.जिपना/पंचा/विचौ/स्था-५/सीआर-३४४/३८०५/२०१५, दिनांक १८/०९/२०१५ अन्वये कु.स्मिता रासेकर तत्कालीन शाखा अभियंता (बांधकाम), पंचायत समिती, कामठी यांना सेवेतून निलंबित करण्यात आले असून कार्यालयाचे पत्र क्र.जिपना/पंचा/स्था-५/२०६२, दि. २२/४/२०१६ अन्वये विभागीय चौकशीचा प्रस्ताव सादर करण्यात आला असून चौकशी व सुनावणी मा.विभागीय आयुक्त, नागपूर यांचेकडे सुरू आहे. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांचे आदेश क्र.जिपना/पंचा/ विचौ/स्था-५/सीआर-३४४/३८०६/२०१५, दिनांक १८/०९/२०१५ अन्वये सौ.किर्ती बोंदरे, तत्कालीन ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, येरखेडा यांना सेवेतून निलंबित करण्यात आले असून कार्यालयाचे पत्र क्र.जिपना/पंचा/स्था-५/२०६३, दि.२२/४/२०१६ अन्वये विभागीय चौकशीचा प्रस्ताव सादर करण्यात आला असून चौकशी व सुनावणी मा.विभागीय आयुक्त, नागपूर यांचेकडे सुरू आहे. तसेच सरपंच, श्री. मनिष कारेमोरे यांचे विरुद्ध महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम ३९ (१) नुसार कार्यवाही प्रस्तावित केलेली आहे. मा. विभागीय आयुक्त, नागपूर यांचेकडे चौकशी व सुनावणी सुरू आहे. सदर प्रकरणी संबंधितांविरुद्ध पोलीस स्टेशन, कामठी येथे दिनांक ०३/१०/२०१५ रोजी भांदवि कलम ४६५, ४७१, ४७७ (अ), ४२० नुसार गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे.

**ग्रामविकास विभागाचा अभिप्राय :-**

मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अभिप्रायाशी सहमत आहे.

**चौकशी अहवाल**

**पंचायती राज समितीच्या दिनांक ३०/९/२०१५ रोजी पंचायत समिती, कामठी अंतर्गत ग्रामपंचायत येरखेडा येथे झालेल्या बैठकीतील निर्देशानुसार ग्रामपंचायत येरखेडा येथील दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत नाली बांधकामाच्या संदर्भात चुकीचे मोजमाप घेवुन काम पूर्ण नसताना पूर्ण असल्याचे दाखवून देयक काढल्याबाबत चौकशी अहवाल.**

उपरोक्त विषयांकित प्रकरणी चौकशी करण्यात आली असून चौकशी अहवाल खालील प्रमाणे :—

ग्रामपंचायत येरखेडा, वार्ड नं.६, रविदास नगर येथे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.नागपूर यांचे आदेश क्र.सकवि/जिपना/दवसु/प्रशासकीय मंजूर कामे/योजनांतर्गत/२०१४-१५/ १६७६, दिनांक ९/९/२०१४ अन्वये अनुसूचित जाती नवबौद्ध घटाकांच्या वस्तीचा विकास करणे, सन २०१४-१५ अंतर्गत सिमेंट काँक्रीट नालीचे बांधकामकरिता रुपये ५.०० लक्ष मंजुर करण्यात आले. सदर काम पुर्ण न करता

बांधकामाचे मुल्यांकन करण्यात आल्यामुळे मोका चौकशी करून संबंधितांवर कार्यवाही करण्यात यावी अशा आशयाच्या तक्रारीच्या अनुषंगाने गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कामठी यांनी मोका चौकशी करून पत्र क्र.पंसका/पंचा/२७९६/१५, दि. २८/८/२०१५ अन्वये सादर केला आहे.

सदर कामास तांत्रिक मंजुरी क्र. TS/WSDM/८७/ANGVK/२०१४ प्राप्त आहे. सदर कामाकरीता २५% प्रथम हप्ता रक्कम रुपये १,२५,००० दिनांक १/१२/२०१४ रोजी ग्रामपंचायत, येरखेडा कार्यालयास वितरित केले आहे.

सदर सिमेंट काँक्रीट नालीचे प्रत्यक्षात ९३.५ मीटर बांधकाम झाले असतांना कनिष्ठ अभियंता, कु.स्मिता रासेकर यांनी १२६ मीटर नाली बांधकामाचे मुल्यांकन रुपये ५,०१,४४४ (मुल्यांकन रजि.पान नं.३४ ते ३६) केले व पुर्णत्वाचा दाखला तयार करून त्यावर स्वतःची स्वाक्षरी केली. उर्वरित बांधकाम सुरू असल्याचे दिसुन आले. प्राकलनानुसार १२२ मीटरचे बांधकाम करणे आवश्यक होते.

नियमानुसार जेवढे बांधकाम झाले तेवढ्याच कामाचे मुल्यांकन करणे आवश्यक असतांना व बांधकाम न होता काम पूर्ण झाल्याबाबत नियमबाह्यरित्या मुल्यांकन केल्यामुळे व पुर्णत्वाचे प्रमाणपत्र तयार करून स्वतःची स्वाक्षरी केली, मात्र या पुर्णत्वाचे प्रमाणपत्रावर सचिव, उप अभियंता यांची स्वाक्षरी नसल्याचे दिसून येते. त्यामुळे कु. स्मिता रासेकर, कनिष्ठ अभियंता या दोषी असल्याचे आढळून आले. यानुसार त्यानी आपले नियत कर्तव्यात कसूर केली असून शिस्तभंगाची कार्यवाही प्रस्तावित केली आहे.

तसेच पुढील निधीचा हप्ता मागणीकरिता ग्रामपंचायतला प्राप्त झालेल्या निधीच्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र सचिव, ग्रामपंचायत, येरखेडा मार्फत उपयोगिता प्रमाणपत्र सादर केले. तथापि उपयोगिता प्रमाणपत्रामध्ये रक्कम न दर्शविता काम पूर्ण झाल्याबाबत सरपंच/सचिव यांनी स्वतःचे स्वाक्षरीनिशी नियमबाह्य उपयोगिता प्रमाणपत्र सादर केले असल्याने सदर प्रकरणी सरपंच/सचिव दोषी असल्याचे आढळून आले. सचिव यांनी आपले कर्तव्यात कसुर केलेला असुन त्यांना आदेश क्र./जिपना/पंचा/विचौ/स्था-५/सीआर-३४४/३८०६ दि. १८/९/२०१५ अन्वये निलंबित करण्यात आले आहे. तसेच सरपंच, ग्रामपंचायत, येरखेडा यांचे विरुद्ध महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ चे कलम ३९ (१) नुसार कार्यवाही प्रस्तावित केली आहे.

**अभिप्राय :—**

ग्रामपंचायत, येरखेडा, रविदासनगर येथील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीचा विकास करणे सन २०१४-१५ अंतर्गत मंजुर सिमेंट काँक्रीट नालीचे बांधकाम पुर्ण न करता प्रत्यक्ष ९३.५ मीटर नालीचे बांधकाम झाले असतांना १२६ मीटर नालीचे नियमबाह्यरित्या मुल्यांकन रुपये ५,०१,४४४ करण्यात आले. यास कु.स्मिता रासेकर, कनिष्ठ अभियंता, पंचायत समिती, कामठी या दोषी असल्याने त्यांना आदेश क्र./ जिपना/ पंचा/ विचौ/ स्था-५/ सीआर-३४४/ ३८०५ दिनांक १८/९/२०१५, अन्वये निलंबित करण्यात आले आहे. निधी मागणीकरीता सरपंच/ सचिव यांनी स्वतःचे स्वाक्षरीनिशी काम पूर्ण झाल्याचे दर्शवून नियमबाह्यरित्या उपयोगिता प्रमाणपत्र सादर केले असल्यामुळे सचिव दोषी असल्याने त्यांना आदेश क्र./जिपना/पंचा/विचौ/स्था-५/सीआर-३४४/३८०५, दि. १८/९/२०१५ अन्वये निलंबित करण्यात आले आहे. निधी मागणी करिता सरपंच/सचिव यांनी स्वतःचे स्वाक्षरीनिशी काम पुर्ण झाल्याचे दर्शवून नियमबाह्यरित्या उपयोगिता प्रमाणपत्र सादर केले असल्यामुळे सचिव दोषी असल्याने त्यांना आदेश क्र./जिपना/पंचा/विचौ/स्था-५/सीआर-३४४/३८०६ दि. १८/९/२०१५ अन्वये निलंबित करण्यात आले आहे. तसेच सरपंच यांचेविरुद्ध महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ चे कलम ३९ (१) नुसार कार्यवाही प्रस्तावित केली आहे. सदर प्रकरणी दोषी विरुद्ध पोलीस स्टेशन कामठी येथे पं.ख.क.१२१/१५, दि. ३/१०/२०१५ रोजी भा.दं.वि. कलम ४६५, ४६८, ४७१, ४७७, गुन्हा दाखल केला आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

समितीने नागपूर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्दयावर अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक १० ऑक्टोबर, २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, येरखेडा, ता.कामठी, पंचायत समिती अंतर्गत दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत सिमेंट नाला/बांधकामाच्या संदर्भात चुकीचे मोजमाप घेऊन काम पूर्ण झाल्याचे दाखवून देयक काढल्याप्रकरणी समितीच्या बैठकीत आश्वासित केल्यानुसार दोषींवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय, यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, यासंदर्भात योग्य ती कार्यवाही केली आहे. याबाबत समितीने समाधान व्यक्त केले.

## अभिप्राय व शिफारशी

समितीने नागपूर जिल्हा परिषदेला भेट दिली असता मौजे येरखेडा, ता.कामठी या गावात दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत सिमेंट नाल्याच्या बांधकामात अनियमितता झाल्याची माहिती समितीस प्राप्त झाली. समितीने यासंदर्भात चौकशी करून कारवाई करण्याचे निदेश दिले असता

ग्रामपंचायत, येरखेडा येथील दलित वस्ती सुधार योनजेअंतर्गत सिमेंट नाला बांधकामाच्या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांनी कु. स्मिता रासेकर, तत्कालीन शाखा अभियंता (बांधकाम), पंचायत समिती, कामठी यांना सेवेतून निलंबित केले असून विभागीय चौकशीचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, नागपूर यांचेकडे प्रलंबित असल्याची माहिती समितीस प्राप्त झाली.

**तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांनी तत्कालीन ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, येरखेडा यांना सेवेतून निलंबित केले असून त्यांच्याही विभागीय चौकशीचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, नागपूर यांचेकडे प्रलंबित असल्याची माहिती समितीस प्राप्त झाली. प्रस्तुत प्रकरणातील सरपंच, यांचे विरुद्ध महाराष्ट्र ग्राम पंचायत अधिनियम, १९५८ चे कलम ३९ (१) नुसार कार्यवाही प्रस्तावित केलेली असून विभागीय आयुक्त, नागपूर यांचेकडे चौकशी व सुनावणी सुरू आहे. तसेच सदर प्रकरणी संबंधितांविरुद्ध पोलीस स्टेशन, कामठी येथे गुन्हा नोंदविण्यात आला असल्याबाबत समिती समाधान व्यक्त करते. तद्वतच ज्या अधिकारी/कर्मचारी यांचेविरुद्ध विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली ती त्वरेने निकाली काढून त्यानुसार कारवाई करावी अशी समितीची शिफारस आहे.**

## प्रकरण अकरा

## जिल्हा परिषद, नागपूर (प्रशासन)

### गट विकास अधिकारी पंचायत समिती नागपूर यांच्या असमाधानकारक उत्तराबाबत

समितीने दिनांक २९, ३० सप्टेंबर व ०१ ऑक्टोबर २०१५ या कालावधीत नागपूर जिल्हा परिषदेस भेट दिली. सन २०१२-१३ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान समितीला गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नागपूर यांनी समितीस पंचायत समितीच्या खर्चाबाबत असमाधानकारक उत्तरे दिली, यासंबंधात समितीने असमाधान व्यक्त केले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

गट विकास अधिकारी पंचायत समिती, नागपूर यांनी भेटीच्या वेळी समितीस पंचायत समितीच्या खर्चाबाबत असमाधानकारक उत्तरे दिल्याबाबत त्यांच्यावर केलेल्या कारवाईची माहिती समितीला देण्यात यावी ?

**समितीस जिल्हा परिषदेकडून उपरोक्त मुद्दयांची खालील प्रमाणे माहिती प्राप्त झाली.**

प्रस्तुत प्रकरणी श्री.आर.डी.बागडे, तत्कालीन गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नागपूर यांनी पंचायत समितीच्या खर्चाबाबत असमाधानकारक उत्तरे दिल्यामुळे सन्माननीय समिती प्रमुखांचे निर्देशानुसार त्यांचेवर जबाबदारी निश्चित करण्याच्या अनुषंगाने दोषारोपासह प्रस्ताव प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना पत्र क्र/जिपना/साप्रवि/स्था-३/६४२/१६, दिनांक १० फेब्रुवारी २०१६ अन्वये सादर करण्यात आले आहे.

**ग्रामविकास विभागाचा अभिप्राय :—**

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांच्या दिनांक १० फेब्रुवारी २०१६ रोजी च्या पत्रान्वये श्री.आर.डी.बागडे, तत्कालीन गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नागपूर यांचे विरुद्ध विभागीय चौकशीचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला.

त्याअनुषंगाने शासन पत्र दिनांक २२ फेब्रुवारी २०१६, १८ मार्च २०१६ च्या पत्रान्वये श्री. बागडे यांचेविरुद्ध विभागीय चौकशीचा प्रस्ताव स्वयंस्पष्ट अभिप्रायासह सादर करण्याबाबत विभागीय आयुक्त, नागपूर यांना कळविण्यात आले. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडून दिनांक १० फेब्रुवारी २०१६ रोजी प्राप्त झालेल्या प्रस्तावातील नमुद दोषारोपांमध्ये असलेल्या त्रुटींची पुर्तता करण्याबाबत विभागीय आयुक्त, नागपूर यांना दिनांक २१ सप्टेंबर २०१६ रोजी कळविण्यात आले होते. सदर त्रुटींची पुर्तता विभागीय आयुक्त, नागपूर यांचेकडून दिनांक १६ डिसेंबर २०१६ च्या पत्रान्वये करण्यात आली आहे. त्यास अनुसरुन श्री.बागडे यांचेविरुद्ध विभागीय चौकशीचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

### अभिप्राय व शिफारशी

समिती राज्यातील जिल्हा परिषदांना भेटी देऊन वार्षिक प्रशासन अहवाल आणि जिल्हा परिषदांच्या वार्षिक लेखा पुनर्विलोकन अहवालावर मुख्य कार्यकारी अधिकारी आणि इतर संबंधित अधिकारी यांची साक्ष घेते. पंचायती राज समिती ही संविधानिक समिती असून तिला योग्य ती माहिती देण्याबाबत शासनाने वेळोवेळी विविध परिपत्रके व शासन निर्णय यांच्याद्वारे आदेशित केलेले आहेत.

समितीने नागपूर पंचायत समितीला भेट दिली असता संबंधित गट विकास अधिकारी, श्री. आर. डी. बागडे यांनी समितीला असमाधानकारक माहिती दिल्याबाबत जिल्हा परिषद प्रशासनाने त्यांच्याविरुद्ध दिनांक १० फेब्रुवारी २०१६ रोजी शासनाकडे कारवाई करण्याबाबतचा प्रस्ताव पाठविलेला आहे. दोन वर्षापासून शासनाकडे संबंधित गट विकास अधिका-यांवरील कारवाईचा प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत समिती आश्चर्य व्यक्त करते. **सबब, संबंधित अधिका-यांबाबत शासनाकडे प्रलंबित असलेल्या प्रस्तावावर शासनाने विहीत मुदतीत निर्णय घ्यावा व त्याबाबत समितीस अवगत करावे अशी समितीची शिफारस आहे.**

## प्रकरण बारा

## जिल्हा परिषद, नागपूर (प्रशासन)

### ग्रामसेवकांनी केलेल्या अपहाराच्या ३२ प्रलंबित प्रकरणाबाबत

समितीने दिनांक २९, ३० सप्टेंबर व ०१ ऑक्टोबर २०१५ या कालावधीत नागपूर जिल्हा परिषदेस भेट दिली. नागपूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ०१ ऑक्टोबर २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, ८९ प्रकरणांत रुपये १३,३८,५९०/- रक्कम गुंतली असून रुपये ११,३७,३८०/- वसूल केली आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांनी समितीस विदित केले की, ८९ प्रकरणांत रुपये १३,३८,५९०/- गुंतली होती, त्यापैकी रुपये ११,९१,०००/- वसूल केली आहे. फक्त १० प्रकरणात रुपये १,४७,०००/- वसूल करणे बाकी आहे. संबंधितांची विभागीय चौकशी सुरू आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, संबंधितांकडून वसुली झालेली नाही. अपहार केल्याचा गुन्हा सिद्ध झाला आहे. त्यांच्यावर प्रशासकीय कारवाई करण्यात आली नाही. संबंधितांविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल केला पाहिजे. ३२ प्रकरणांमधील २७ प्रकरणांमध्ये कागदपत्रांच्या संदर्भातील अनियमितता आहे. मूळ ५ प्रकरणे असून त्यांपैकी दोन प्रकरणात वसुली सुरू आहे. सदर ग्रामपंचायतीमध्ये पहिल्या ग्रामसेवकाने अपहार केला म्हणून दुस-या ग्रामसेवकाची नेमणूक केली. मात्र त्यानेही अपहार केला, ही गंभीर बाब आहे. पहिल्या ग्रामसेवकाने ८४ हजार रूपयांची अफरातफर केली आणि दुस-या ग्रामसेवकाने ४१ हजार रूपयांची अफरातफर केली असल्यामुळे त्यांच्यावर कडक कारवाई करावी. या प्रकरणात २७ लोकांनी अनियमितता केली आहे, त्यांनी अनियमित कारभार केल्याने ते दंडास पात्र आहेत. परंतू ३२ लोकांनीच अफरातफर केली आहे असे दाखविले आहे. त्यामुळे सदर प्रकरणी योग्य ती चौकशी करून खुलासा करावा, तसेच केलेल्या कार्यवाहीसंदर्भातील सविस्तर अहवाल समितीला सादर करावा असे समितीने निदेश दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

ग्रामसेवकांनी केलेल्या अपहाराच्या ३२ प्रलंबित प्रकरणे आहेत या प्रकरणी अधिक चौकशी करून त्यांच्याकडून अपहार केलेली रक्कम व्याजासह वसुल करून त्यांच्यावर केलेल्या कारवाईची माहिती समितीस देण्यात यावी ?

**समितीस जिल्हा परिषदेकडून उपरोक्त मुद्दयांची खालील प्रमाणे माहिती प्राप्त झाली.**

पंचायत समिती, कुही येथे सन २०१२ व २०१३ पुर्वी उघडकीस आलेली अपहाराची ३२ प्रलंबित प्रकरणे आहेत. यातील मा.पंचायती राज समिती यांचे दिनांक ३० सप्टेंबर २०१५ रोजीचे भेटी पूर्वी २७ प्रकरणे निकाली निघालेली आहेत. यातील २४ प्रकरणात संबंधितांकडून वसुली करण्यात आलेली असून ३ प्रकरणात अफरातफर रक्कम सिद्ध झालेली नाही. उर्वरित ५ प्रकरणात वसुली रक्कम रुपये २५,२४४/- अधिक व्याज रुपये ३,०३०/- संबंधित ग्राम विकास अधिकारी (श्री.बी.डी.उमाठे, सेवा निवृत्त ग्राम विकास अधिकारी व श्री.बी.जे.भांगे, सेवा निवृत्त ग्रामविकास अधिकारी) यांचेकडून व्याजासह वसुल करण्यात आलेली आहे. याबाबतची नोंद संबंधितांच्या सेवापुस्तकात घेण्यात आलेली आहे.

**ग्रामविकास विभागाचा अभिप्राय :-**

मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अभिप्रायाशी सहमत आहे.

### अभिप्राय व शिफारशी

समितीने पंचायत समिती, कुही येथे भेट देऊन वार्षिक प्रशासन अहवाल सन २०१२-१३ व त्यापूर्वीच्या कालावधीतील विविध ग्रामनिधी, जवाहर रोजगार योजना इत्यादी ८९ प्रकरणांमधील गैरव्यवहारात गुंतलेली रक्कम रुपये १३,३८,५९०/- तातडीने वसुल करून प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्याबाबत समितीने निदेशित केलेले होते.

**समितीने निदेश दिल्यानुसार जिल्हा परिषद प्रशासनाने सन २०१२-२०१३ पुर्वी उघडकीस आलेली अपहाराची ३२ प्रलंबित प्रकरणे यांपैकी २७ प्रकरणे निकाली काढलेली असून यातील २४ प्रकरणात संबंधितांकडून वसुली करण्यात आलेली असल्याबाबत समितीस माहिती प्राप्त झाली. तीन प्रकरणात अफरातफर रक्कम सिद्ध झालेली नाही. उर्वरित ५ प्रकरणात वसुली रक्कम रु.२५,२४४/- अधिक रु.३,०३०/- संबंधित ग्रामविकास अधिकारी व सेवा निवृत्त ग्रामविकास अधिकारी यांचेकडून व्याजासह वसुल करण्यात येऊन याबाबतची नोंद संबंधितांच्या सेवापुस्तकात घेण्यात आल्याबाबत समिती समाधान व्यक्त करते.**

## प्रकरण तेरा

## जिल्हा परिषद, नागपूर (प्रशासन)

### ग्रामसेवक व शिक्षक मुख्यालयी राहत नसल्याबाबत

समितीने दिनांक २९, ३० सप्टेंबर व ०१ ऑक्टोबर २०१५ या कालावधीत नागपूर जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी सन २०१२-१३ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील नागपूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ०१ ऑक्टोबर २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, एका ग्रामसेवकाकडे जास्तीतजास्त किती ग्रामपंचायतींचा कार्यभार देण्यात यावा अशी नियमात तरतूद आहे, किती ग्रामसेवकांकडे एकापेक्षा अधिक ग्रामपंचायतींचा कार्यभार आहे, एकापेक्षा अधिक ग्रामपंचायतींचा कार्यभार देण्याची कारणे काय आहेत, किती ग्रामसेवक मुख्यालयी राहत नाहीत व ते मुख्यालयात न राहण्याची कारणे काय आहेत, अशा ग्रामसेवकांवर काय कारवाई करण्यात आली, किती ग्रामपंचायतीच्या ग्रामसभा झालेल्या नाहीत, ग्रामसभा न घेतलेल्या किती सरपंच व उप सरपंच/ग्रामसेवक यांच्यावर कारवाई करण्यात आली व त्या कारवाईचे स्वरुप काय आहे, सर्व ग्रामसेवक मुख्यालयी, कार्यक्षेत्रात राहत असल्यामुळे त्यांच्यावर कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही हे उत्तर बरोबर आहे का, वस्तुस्थिती अशी आहे की, ग्रामसेवकांना पंचायत समितीच्या कामाच्या ठिकाणी वास्तव्य करणे बंधनकारक करूनही ते राहत नाहीत. यावर गट विकास अधिकारी यांनी समितीस विदित केले की, ग्रामसेवकांनी स्व-प्रमाणपत्र लिहून दिले आहे. यावर समितीने असे मत मांडले की, ग्रामसेवक, डॉक्टर, नर्सेस, शिक्षक यांनी मुख्यालयी राहिलेच पाहिजे. मुख्यालयी राहत नाहीत म्हणून तक्रारी नसतात तर नेमक्या सेवेच्या वेळी गैरहजर राहतात म्हणून तक्रारी वाढतात. त्यांना मुख्यालयी राहण्यास नेमक्या अडचणी काय आहेत, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीच्या निदर्शनास आणून दिले की, एकही ग्रामसेवक मुख्यालयी राहत नाही. शहरी भागात राहणारे असतात. शहरी भागात कर्मचा-यांनी घरे बांधली आहेत, त्यांची मुले जिल्हा परिषद शाळेत नसतात तर खाजगी शाळेत शिकत असतात. जवळपास ८० कि.मी. जा-ये केले जाते. शिक्षकांच्या बाबतीत असा आग्रह नसावा. कारण त्यांचे ठरलेले तास असतात. त्यावेळी ते शाळेत जात असतात. मात्र ग्रामसेवक गरजेचा असतो. गावात पाणी सोडायचे असेल आणि ग्रामसेवक नसेल तर सरपंचाला गावात फिरावे लागते. ग्रामसेवकाला गावात राहणे गरजेचे आहे, हे योग्य आहे. कारण तो गावाचा सेवक आहे. रात्री-अपरात्री मोटार बिघडली आणि गावात ग्रामसेवक नसेल तर सर्व गोष्टी सरपंचाला कराव्या लागतात, हे बरोबर नाही. पालकमंत्र्यांनी कडक कारवाई केली आहे. परंतु तरी सुद्धा ९५ टक्के ग्रामसेवक मुख्यालयी राहत नाहीत. यावर समितीने सूचित केले की, त्यामुळेच या संदर्भात कडक कारवाई केली पाहिजे.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

ग्रामसेवक व शिक्षक मुख्यालयी राहत नसल्याबाबत अशी किती प्रकरणे जिल्हा परिषदेच्या निदर्शनास आली आहेत, त्यांच्यावर आवश्यक ती कारवाई करून भविष्यात असे प्रकार घडू नयेत यासाठी शासनस्तरावर कोणती कारवाई करण्यात येत आहे ?

**समितीस जिल्हा परिषदेकडून उपरोक्त मुद्दयांचीखालील प्रमाणे माहिती प्राप्त झाली.**

या कार्यालयाचे पत्र क्र.२२६८/१५ दिनांक ०२/०६/२०१५ अन्वये सर्व ग्रामपंचायत सचिव यांनी मुख्यालयी राहणे बंधनकारक असल्याबाबत निर्देश दिलेले आहेत. खालील ठिकाणी ग्रामपंचायत सचिव यांनी मुख्यालयी राहत नसल्याचे निदर्शनास आले आहे. तद्संबंधीची पंचायत समिती निहाय माहितीखालील प्रमाणे आहे.

| | एकूण | | | मुख्यालयी राहत असलेले | | मुख्यालयी राहत नसलेले | | मुख्यालयी राहत नसलेल्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | पंचायत समितीचे नाव | ग्रामविकास अधिकारी | ग्रामसेवक | ग्रामविकास अधिकारी | ग्रामसेवक | ग्रामविकास अधिकारी | ग्रामसेवक | ग्रामविकास अधिकारी ग्रामविकास अधिकारी/ ग्रामसेवक यांच्या घरभाडे भत्ता बंद केल्याचा महिना |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| १. | कुही | ५ | ३२ | ० | ० | ५ | ३२ | माहे नोव्हेंबर, २०१६ पासून घरभाडे भत्ता थांबविण्यात आलेला आहे. |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २. | रामटेक | १७ | २६ | ० | ० | १७ | २६ | १) माहे नोव्हेंबर, २०१६ पासून घरभाडे भत्ता थांबविण्यात आलेला आहे.<br>२) आदेशक्र.पंचा/स्था२/४६०/१७ दि.२.२.२०१७ नुसारताकीद देण्यात आलेली आहे. |
| ३. | कळमेश्वर | ५ | २९ | ० | १ | ५ | २८ | माहे जाने, २०१७ पासुन घरभाडे भत्ता रोखण्यात आलेला आहे. |
| ४. | नरखेड | ६ | ४४ | ० | ० | ६ | ४४ | माहे जानेवारी, २०१७ पासुन घरभाडे भत्ता रोखण्यात आला. |
| ५. | सावनेर | १२ | ४० | ६ | २९ | ६ | ११ | माहे जानेवारी, २०१७ पासुन घरभाडे भत्ता रोखण्यात आला. |
| ६. | पारशिवनी | ४ | ३४ | ० | ० | ४ | ३४ | माहे जानेवारी, २०१७ पासुन घरभाडे भत्ता रोखण्यात आला. |
| ७. | कामठी | ५ | २४ | ० | ० | ५ | २४ | माहे एप्रिल, २०१७ पासुन घरभाडे भत्ता रोखण्यात आला. |
| ८. | मौदा | ६ | २१ | ० | ० | ६ | २१ | माहे मे, २०१७ पासुन घरभाडे भत्ता रोखण्यात आला. |
| ९. | उमरेड | ६ | २८ | ० | ० | ६ | २८ | १) घरभाडे भत्ता माहे ऑगस्ट, २०१७ पासुन बंद करण्यात आलेला आहे.<br>२) आदेशक्र.पसउ/पंचा/स्था२/२९१७/२०१७ दि.९.८.२०१७ नुसारताकीद देण्यात आली आहे. |
| १०. | हिंगणा | १० | ३५ | ० | ० | १० | ३५ | १) पत्रक.पसहि/४२४२/२०१६ दि.२७.१२.२०१६ अन्वये कारणे दाखवा नोटीस देण्यात आले आहे. |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | २) मुख्यालयी राहत नसल्यामुळेग्रामविकास अधिकारी ग्रामसेवक यांचे घरभाडे भत्ता माहे सप्टेंबर, २०१७ पासून रोखण्यात आले आहे. |
| ११. | काटोल | ४ | ४५ | ० | ० | ४ | ४५ | सप्टेंबर, २०१७ पासून रोखण्यात आलेला आहे. |
| १२. | नागपूर | १० | ४१ | ० | ० | १० | ४१ | १) पत्रक. पसना/ पंचा/ स्था२/१८८/२०१७ दि.१६.१.२०१७ अन्वये कारणे दाखवा नोटीस देण्यात आले आहे.<br>२) मुख्यालयी राहत नसल्यामुळे ग्रामविकास अधिकारी ग्रामसेवक यांचे घरभाडे भत्ता सप्टेंबर, २०१७ पासून बंद करण्यात आलेला आहे. |
| १३. | भिवापूर | २ | ३१ | ० | ५ | २ | २६ | १) आदेश क्र.पसभि/ पंचा/२७३/२०१७ दि.२.१.२०१७ अन्वये ग्राविय व ग्रामसेवक यांना नोटीस बजावण्यात आली आहे.<br>२) कारणे दाखवा नोटीसच्या अनुषंगाने माहे सप्टेंबर, २०१७ पेडइन ऑक्टोबर, २०१७ चे घरभाडे भत्ता थांबविण्यात आला आहे. |
| | एकूण | ९२ | ४३० | ०६ | ३५ | ८६ | ३९५ | |

महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभागाचे परिपत्रक दिनांक २९/०६/१९८९ च्या अनुषंगाने शिक्षकांना मुख्यालयी राहण्याबाबत परिपत्रकाद्वारे सुचना देण्यात आलेल्या आहेत. जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा पाटणसावंगी माईन्स पंचायत समिती, सावनेर येथील ७ शिक्षकांचे माहे फेब्रुवारी, २०१३ ते जुन, २०१३ या कालावधीतील घरभाडे भत्याची रक्कम रुपये ७१,४००/- वसुल करण्यात आलेली आहे. तथापि, मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाने रिट याचिका क्रमांक ५८२२/२०१४ मध्ये दिनांक २९/१०/२०१४ रोजी दिलेल्या निर्णयानुसार शिक्षकांचे घरभाडे भत्ता बाबत निर्देश दिलेले आहेत. नागपूर जिल्ह्यातील मुख्यालयी राहणा-या शिक्षकांची सद्यःस्थिती पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | तालुका | शिक्षक संख्या | मुख्यालयी राहणारे | मुख्यालयी न राहणारे | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| १) | नागपूर (ग्रा) | ४७६ | १० | ४६६ | |
| २) | कामठी | २८३ | ० | २८३ | |
| ३) | हिंगणा | ४७९ | ४९ | ४३० | |
| ४) | कळमेश्वर | २६६ | १३ | २५३ | |
| ५) | काटोल | ३८८ | १० | ३७८ | |
| ६) | नरखेड | ३७० | ५२ | ३१८ | |
| ७) | सावनेर | ३८७ | २४ | ३६३ | |
| ८) | पारशिवनी | २९७ | १२ | २८५ | |
| ९) | रामटेक | ४०२ | ८६ | ३१६ | |
| १०) | मौदा | ४०२ | २६० | १४२ | |
| ११) | कुही | ४३५ | ११० | ३२५ | |
| १२) | उमरेड | ३७२ | १८७ | १८५ | |
| १३) | भिवापूर | ३१० | ५६ | २५४ | |
| | एकूण | ४८६७ | ८६९ | ३९९८ | |

वरील प्रमाणे मुख्यालयी न राहणा-या शिक्षकांचे वित्त विभागाचे शासन निर्णय दिनांक ०७/१०/२०१६ अन्वये घर भाडे रोखण्याबाबत व शिस्तभंगविषयक कारवाई करण्याबाबतचे निर्देश या कार्यालयाचे पत्र क्र.८४६९ दिनांक १७/११/२०१६ व पत्र क.६८४४/२०१७, दिनांक २०/०९/२०१७ अन्वये गटशिक्षणाधिकारी यांना देण्यात आले आहेत.

**ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे अभिप्राय :—**

घरभाडे भत्याच्या पात्रतेसाठी ग्रामीण भागातील कर्मचा-यांना कामाच्या ठकाणी वास्तव्य करणे अनिवार्य करण्यात आलेले आहे. याबाबतचा शासन निर्णय वित्त विभागाने दिनांक ७ ऑक्टोबर, २०१६ रोजी निर्गमित केलेला आहे. या शासन निर्णयाप्रमाणे मुख्यकार्यकारी अधिकारी यांनी कार्यवाही करणे आवश्यक आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

समितीने नागपूर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक ११ ऑक्टोबर २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, ग्रामसेवक व शिक्षक मुख्यालयी राहत नसल्याबाबत अशी किती प्रकरणे जिल्हा परिषदेच्या निदर्शनास आली आहेत, त्यांच्यावर आवश्यक ती कारवाई करून भविष्यात असे प्रकार घडू नयेत या संदर्भात घरभाडे भत्ते रोखण्याची कारवाई ही अतिशय चांगली झालेली आहे. यामुळे गावातील लोकांना न्याय मिळाला का, मुख्यालयी राहून प्रामाणिकपणे सेवा करणे या अंतर्गत अपेक्षित आहे. जे संबंधित कर्मचारी मुख्यालयी राहत नाही, त्यांचे केवळ घरभाडे भत्ता रोखणे महत्त्वाचे नाही, तर त्यांनी तेथे राहून प्रामाणिकपणे सेवा करणे अतिशय महत्त्वाचे आहे. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, घरभाडे भत्ता बंद करण्याच्या कार्यवाहीबाबत संबंधित कर्मचारी घरभाडे भत्ता बंद करण्यावरून उच्च न्यायालयात गेले, याबाबतीत वित्त विभागाचा शासन निर्णय होता, त्यामध्ये तेथे राहणे गरजेचे आहे असे लिहिले होते, घरभाडे भत्ता बंद करणे हा काही उपाय नाही, याची विभागाला कल्पना आहे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी या सर्वांचे क्लब इन्स्पेक्शन किंवा भरारी पथक पाठवून सरप्राईज भेट दिली तर वस्तुस्थिती निदर्शनास येईल. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांनी समितीला होकारार्थी आश्वासित केले.

## अभिप्राय व शिफारशी

समितीने दिनांक २९, ३० सप्टेंबर व ०१ ऑक्टोबर २०१५ या कालावधीत नागपूर जिल्हा परिषदेस भेट दिली. सन २०१२-१३ या वार्षिक प्रशासन अहवालाच्या चर्चेदरम्यान जिल्ह्यातील शिक्षण आणि ग्रामसेवक मुख्यालयी राहत नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले. त्यांच्यावर आवश्यक ती कारवाई करून भविष्यात असे प्रकार घडू नयेत यासाठी शासन स्तरावर कोणती कारवाई करण्यात येत आहे याबाबत समितीने विभागीय सचिवांची साक्ष घेतली.

विभागीय सचिवांचे साक्षीचे वेळी जिल्हा परिषदेने प्राथमिक शाळा पाटण सावंगी, माइल्स, पंचायत समिती, सावनेर येथील ६ शिक्षकांचे घरभाडे भत्त्याची रक्कम वसूल केल्याची माहिती समितीस प्राप्त झाली. परंतू मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिनांक २९ ऑक्टोबर २०१५ रोजी दिलेल्या निर्णयानुसार शिक्षकांचे घरभाडे भत्ता कपात करू नये असे निर्देश दिल्याची माहिती समितीस प्राप्त झाली. जिल्ह्यात एकूण ४२५ ग्रामसेवक व ९३ ग्राम विकास अधिकारी कार्यरत असून त्यापैकी मुख्यालयी राहत नसलेल्या ८१ ग्राम विकास अधिकारी व ३३५ ग्रामसेवकांचा घरभाडे भत्ता जिल्हा परिषद प्रशासनाने बंद केलेला आहे. समितीच्या मते यासंदर्भात घरभाडे भत्ता बंद करून शासनाचा उद्देश सफल होणार नाही. ग्रामसेवक गावात राहत नसल्यास शासनाच्या कल्याणकारी योजना ग्रामीण भागातील शेवटच्या व्यक्तींपर्यंत पोहचणार नाहीत. जिल्हा परिषदेने मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपिठाच्या निवाड्याचा आधार घेऊन मुख्यालयी न राहणा-या शिक्षकांचा घरभाडे भत्ता पुन्हा सुरू केला आहे.

वस्तुतः ग्रामीण भागात राहणा-या शासकीय कर्मचा-यांना घरभाडे भत्ता हा अनुज्ञेय नव्हता. दिनांक २० सप्टेंबर १९८४ रोजीच्या वित्त विभागाच्या शासन निर्णयान्वये खेडे पातळीवर काम करणा-या शासकीय कर्मचा-यांना येथील लोकवस्ती विचारात न घेता तालुका मुख्यालयाच्या ठिकाणी अनुज्ञेय असलेल्या दराने घरभाडे भत्ता दिनांक १ सप्टेंबर १९८४ पासून मंजूर करण्यात आला **"मात्र त्यात शर्त अशी होती की संबंधित कर्मचारी हे कामाच्या ठिकाणीच राहात असले पाहिजेत"** दरम्यानच्या काळात दिनांक २५ एप्रिल १९८८ व दिनांक ५ फेब्रुवारी १९९० च्या वित्त विभागाच्या शासन निर्णयामध्ये ही शर्त काढून टाकण्यात आली. शासनाच्या कल्याणकारी योजनेचा लाभ ग्रामीण भागातील शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहचविणे तसेच जिल्हा परिषदेच्या शाळांतील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा उंचाविण्याकरिता पंचायती राज समिती सुरुवाती पासून ग्रामीण भागातील कर्मचा-यांनी मुख्यालयी राहणेकरिता आग्रही राहिलेली आहे आणि म्हणूनच पंचायती राज समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने ग्रामविकास विभागाने दिनांक ५ जुलै २००८ व दिनांक ३ नोव्हेंबर २००८ रोजीच्या परिपत्रकान्वये मुख्यालयी न राहणा-या कर्मचा-यांविरुद्ध घरभाडे भत्ता रोखणे व वेतनवाढ रोखणेबाबत आदेशित केलेले होते. परंतु दिनांक २५ एप्रिल १९८८ व दिनांक ५ फेब्रुवारी १९९० च्या वित्त विभागाच्या शासन निर्णयान्वये मुख्यालयी राहण्याची अट काढून टाकली होती आणि त्यामुळे वरील दोन्ही परिपत्रके व शासन निर्णयातील तरतुदी एकमेकांच्या विरुद्ध असल्यामुळे शिक्षक संघटनांनी परिपत्रकाच्या वैधतेस आव्हान दिले व न्यायालयाने शिक्षक संघटनांच्या बाजूने निवाडा दिलेला होता. **(परिशिष्ट क्र. १३.१ ते १३.८ सर्व शा. निर्णय)**

मा.उच्च न्यायालयाच्या निवाड्याच्या पार्श्वभुमीवर घरभाडे भत्त्याच्या पात्रतेसाठी ग्रामीण भागातील कर्मचा-यांना कामाच्या ठिकाणी वास्तव्य करणे अनिवार्य करणेबाबत वित्त विभागाने दिनांक ७ ऑक्टोबर २०१६ रोजी नव्याने शासन निर्णय निर्गमित करून पुन्हा दिनांक २० सप्टेंबर १९८४ रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे ग्रामीण भागातील कर्मचा-यांना घरभाडे भत्ता अनुज्ञेय होण्याकरिता मुख्यालयी राहणे बंधनकारक केले आहे. याबाबत समिती समाधान व्यक्त करते.

दिनांक ७ ऑक्टोबर २०१६ रोजी शासनाने घरभाडे अनुज्ञेय होण्यासाठी ग्रामीण भागातील कर्मचा-यांना मुख्यालयी राहणे बंधनकारक केलेले असले तरी राज्यातील ग्रामीण भागातील ग्रामसेवक, शिक्षक, तलाठी, कृषी सहायक, आरोग्य सेविका, वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्रातील सर्व कर्मचारी, पशुवैद्यकीय दवाखान्यातील अधिकारी/कर्मचारी इत्यादी कर्मचारी बहुतांश करून ग्रामीण भागात राहात नाहीत. शहरातून दररोज गावात जाणे येणे केल्यामुळे या गावातील विकासाच्या योजना, पाणी पुरवठ्याच्या योजना, शेतीच्या संदर्भातील तज्ज्ञांच्या शिफारशी व मार्गदर्शन, दुधाळ जनावरे व शेती उपयोगी पशुंच्या वेळेवर औषधोपचार तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये आपाताकालीन रुग्णांना प्रथमोपचार इत्यादी अनेक सोयी-सुविधांपासून वंचित राहावे लागते. बहुतांश ग्रामसेवक हे सरपंचाचा दाखला सादर करून त्याद्वारे प्रमाणित करतात की ते मुख्यालयी राहतात हे कोणत्याही नियमात नमूद नसताना सर्रास या बाबीचा वापर केला जातो. सरपंच असे प्रमाणित करीत असल्यामुळे गट विकास अधिकारी त्यांची कोणतीही खातर जमा न करता त्यांना घरभाडे भत्ता अदा करतात. ग्रामसेवक मुख्यालयी राहण्याचे प्रमाणपत्र हे तो त्या ठिकाणी वास्तव्य करतो या आधारेच होणे आवश्यक आहे, असे समितीचे मत आहे. त्यानुसार **उपरोक्त शासन निर्णयाच्या प्रभावी अंमलबजावणीकरिता शासनाने ग्रामिण भागातील तसेच तालुका स्तरावरील प्रत्येक "ब" "क" व "ड" संवर्गातील कर्मचा-यांचे मुख्यालय कोणते व तो मुख्यालयी राहात असल्याबाबत कोण कोणते पुरावे ग्राह्य धरावेत तसेच तो कर्मचारी मुख्यालयी न राहता घरभाडे भत्ता घेत असल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विस्तार अधिकारी, गट विकास अधिकारी आणि आहरण व संवितरण अधिका-यावर निश्चित करून तद्नुषंगाने स्वयंस्पष्ट आदेश शासनाने निर्गमित करावे व त्याबाबतची माहिती ३ महिन्यांच्या आत समितीला सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.**

## **परिशिष्ट “ अ ”**

शासनाचे आदेश व परिपत्रक

# परिशिष्ट क्र. १.१

कृषि विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध केंद्र/राज्य पुरस्कृत योजनांतर्गत अनुदानावर पुरवठा करावयाच्या कृषि औजारे, पीक संरक्षण औजारे, विद्युत/डिझेल/पेट्रोकेरोसीन पंपसंच, एचडीपीई पाईप यांचे सन २०११-१२ करिता दर निश्चित करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
शासन निर्णय क्र. सुकृऔ २०११/प्र.क्र.३१/११-अे
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
**दिनांक- २२ नोव्हेंबर,२०११**

**वाचा -** १.शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग क्र.सीपीएस-१०९८/१०९९७/प्र.क्र.२५/७-अे, दि.१२.१०.१९९९
२.शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग क्र.सीपीएस-१०९९/पीक संरक्षण औजारे/प्र.क्र.९४/७-अे, दि.२.३.२०००
३.कृषि आयुक्तालयाचे पत्र क्र. सीपीएस/सुकृऔ/दरनि२०११-१२/१६४/गु.नि-५, दि.२१.५.२०११
४.कृषि आयुक्तालयाचे पत्र क्र. सीपीएस/सुकृऔ/दरनि२०११-१२/३०३/गु.नि-५, दि.१९.९.२०११
५.कृषि आयुक्तालयाचे पत्र क्र. सीपीएस/सुकृऔ/दरनि२०११-१२/३१९/गु.नि-५, दि.२९.९.२०११
६.शासन पृष्ठांकन, कृषि व पदुम विभाग क्र. सुकृऔ २०११/प्र.क्र.३१/११-अे, दि.२१.११.२०११

**प्रस्तावना -**

कृषि विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध केंद्र/राज्य पुरस्कृत योजनांतर्गत शेतकऱ्यांना अनुदानावर पुरविण्यात येणाऱ्या कृषि औजारे, पीक संरक्षण औजारे, विद्युत/डिझेल/पेट्रोकेरोसीन पंपसंच, एचडीपीई पाईप यांचे दर निश्चित करण्यासाठी उपरोक्त दिनांक १२ ऑक्टोबर, १९९९ च्या शासन निर्णयाद्वारे मा. मंत्री, कृषि यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय दर निश्चिती समिती गठीत करण्यात आली आहे. सन २०११-१२ साठी दर निश्चित करण्याकरिता सदर समितीची बैठक दि.२२ सप्टेंबर, २०११ रोजी मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. कृषि औजारांच्या पुरवठ्याबाबतचे पुर्वानुभव तसेच राज्यस्तरीय तांत्रिक समितीच्या शिफारशी विचारात घेवून सन २०११-१२ करिता कृषि औजारे/उपकरणांचे दर निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय -**

राज्यात कृषि विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्र/राज्य शासन पुरस्कृत विविध योजनांतर्गत कृषि औजारे, पीक संरक्षण औजारे, विद्युत/डिझेल/पेट्रोकेरोसीन पंपसंच, एचडीपीई पाईप्स शेतकऱ्यांना अनुदानावर पुरविण्यात येतात. राज्यस्तरीय तांत्रिक समितीने कृषि औजारांचे प्रकार, उत्पादक/पुरवठादार व दर यांची शिफारस केली असून त्यास राज्यस्तरीय दर निश्चिती समितीने सहमती दर्शविली आहे. त्यास अनुसरून सन २०११-१२ करिता कृषि औजारांचे दर निश्चित करण्यात येत असून त्यांचे दर, वजन/स्पेसिफिकेशन्स, पुरवठा संस्थांची नावे व उत्पादक यांचा तपशिल या शासन निर्णयासोबतच्या **प्रपत्र-१** मध्ये दर्शविण्यात आला आहे व मार्गदर्शक सूचना **प्रपत्र-२** मध्ये नमूद करण्यात आल्या आहेत.

**२.** सन २०११-१२ करिता कृषि औजारे पुरवठ्यासाठी महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य लघु उद्योग विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ व राज्यातील चारही कृषि विद्यापीठे यांचा पुरवठा संस्था म्हणून समावेश करण्यात आला आहे.

**३.** भारतीय मानक संस्था (बीआयएस) यांनी प्रमाणित केलेल्या, केंद्रीय तपासणी संस्थांचे व कृषि विद्यापीठांचे परिपूर्ण तपासणी अहवाल सादर केलेल्या, राज्यातील कृषि विद्यापीठांनी विकसित व उत्पादित केलेल्या, महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळाने हैद्राबाद येथील क्रिडा व भोपाळ येथील सीआयएई या केंद्रीय संस्था तसेच डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांच्याशी केलेल्या सामंजस्य करारातील औजारांच्या गुणवत्तेची जबाबदारी संबंधित पुरवठा संस्था व संशोधक संस्थांची राहील या अटीवर सामंजस्य करारातील सर्व कृषि औजारांचा शासकीय योजनांतर्गत पुरवठ्यासाठी समावेश करण्यात आलेला आहे.

४. केंद्र शासनाने दि. ८ एप्रिल, २००९ च्या मार्गदर्शक सुचनानुसार कृषि औजारांच्या निवडीसाठी निकष निर्धारित केले होते. तथापि, केंद्र शासनाने दि. १४ सप्टेंबर, २०१० च्या पत्रासोबतच्या यादीतील २५ औजारांकरिता यापुढे केंद्रीय तपासणी संस्थांमध्ये व २३ औजारांकरिता केंद्रीय तपासणी संस्था किंवा कृषि विद्यापीठांमध्ये तपासणी करणे बंधनकारक केले आहे. पत्रासोबत कृषि औजारांच्या तपासणीसाठी मान्यता दिलेल्या २१ संस्थांची यादी कळविली आहे. ज्या कृषि औजारांचे परिपूर्ण तपासणी अहवाल प्राप्त झाले आहेत व ज्यांची राज्यस्तरीय तांत्रिक समितीने शिफारस केली आहे केवळ अशाच औजारांचा शासकीय योजनांतर्गत अनुदानावर पुरवठ्यासाठी समावेश करण्यांत आलेला आहे.

५. केंद्र शासनाच्या कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान विभागाने दि. २१ मे, २०१० च्या पत्राद्वारे अनुदानासाठी ज्या पॉवर टिलर्सच्या मॉडेल्सची शिफारस केली आहे व पुरवठा संस्थांनी ज्या पॉवर टिलर्सच्या मॉडेल्सचे केंद्रीय तपासणी संस्थांचे तपासणी अहवाल सादर केले आहेत अशा सर्व पॉवर टिलर्सच्या मॉडेल्सचा पुरवठा यादीत समावेश करण्यात आलेला आहे. आयातीत व इतर पॉवर टिलर्सच्या विक्री-पश्चात सेवा-सुविधा पुरविण्याची अट मान्य असल्याचे लेखी हमीपत्र पुरवठादारांकडून घेणे पुरवठा संस्थांना बंधनकारक राहील. जे पुरवठादार असे लेखी हमी पत्र देणार नाहीत त्यांचेकडून कोणत्याही परिस्थितीत पॉवर टिलर्स खरेदी करण्यात येवू नयेत.

६. गुणवत्तापूर्ण औजारे पुरविण्याची जबाबदारी पूर्णत: संबंधित पुरवठा संस्थांची राहील. त्यासाठी औजारांच्या पुरवठा-पूर्व गुणवत्ता तपासणीसाठी पुरवठा संस्थांनी स्वत:ची गुणवत्ता नियंत्रण यंत्रणा निर्माण करणे बंधनकारक राहील.

७. शासनाने निश्चित केलेल्या दराने शेतकऱ्यांच्या पसंतीनुसार काही पुरवठादार योजनांतर्गत पुरवठा करीत नसल्याची बाब विविध पातळीवरून शासनाच्या निदर्शनास आणण्यात आली आहे. त्याअनुषंगाने राज्यस्तरीय तांत्रिक समितीने शिफारस केलेले उत्पादक/पुरवठादार **या शासन निर्णयाद्वारे निश्चित केलेल्या दराने योजनांतर्गत पुरवठ्यास तयार असल्याचे लेखी हमी पत्र उत्पादक/पुरवठादार यांच्याकडून पुरवठा संस्थांनी घ्यावे व त्यांचे स्तरावरून पुरवठादारांची यादी तातडीने जाहीर करावी**.

८. याबाबत पुरवठा संस्थांना आवश्यकतेनुसार शासनाने निश्चित केलेल्या किमान दराव्यतिरिक्त वेगळे दर (L2) योजनांतर्गत पुरवठ्यासाठी त्यांचे स्तरावरून शासनाच्या पुर्वमान्यतेने जाहीर करता येतील. सदरच्या जादा दरांची कारणमिमांसा लेखी स्वरूपात स्पष्ट करावी.

९. शेतकऱ्यांना त्यांच्या स्थानिक गरजेनुसार व पसंतीनुसार औजारे खरेदीची मुभा राहील. यादी व्यतिरिक्त औजारे खरेदी करिता जिल्हास्तरीय तज्ञ समितीची शिफारस आवश्यक राहील व अशा औजारांचे दरही समितीने शिफारस करावे लागतील. अशा औजारांची उपयुक्तता राज्यस्तरीय तज्ञ समितीस शिफारस करावी लागेल.

१०. तीनही संस्थांनी दरांचा तुलनात्मक अभ्यास करून एकाच पुरवठादाराचे दर जे कमी/जास्त असल्यास किमान दर तीनही ठिकाणी ठेवून एकाच पुरवठादारा सोबत करार करावा. अन्यथा तालुकास्तरावर वितरण करून विक्रीच्या लोकवाट्याच्या रकमेत फरक पडू शकेल. या दराने कोणाही एका पुरवठादाराकडे दरकरार करण्याचे स्वातंत्र्य उत्पाकदास राहील.

११. राज्यातील उत्पादकांचे हित जोपासणे आवश्यक आहे. करिता प्रथम प्राधान्याने राज्यांतर्गत उत्पादकांकडून खरेदी करावी. राज्यांतर्गत उत्पादकाने असमर्थता दर्शविल्यास परराज्यातील उत्पादकांकडून खरेदी करण्याची मुभा राहील.

१२. या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आलेल्या दरावरच अनुदान अनुज्ञेय राहील. त्यापेक्षा पेक्षा जादा दराची औजारे खरेदी केल्यास फरकाची रक्कम शेतकऱ्यांना स्वत: अदा करावी लागेल.

१३. राज्याबाहेरील उत्पादकांकडील औजारांबाबत विक्री-पश्चात सेवा-सुविधा पुरविण्याची संपूर्ण जबाबदारी पुरवठा संस्थांची राहील तसेच राज्याबाहेरील उत्पादकांकडील औजारांची मागणी नोंदविण्यापूर्वी त्यांची विक्री-पश्चात सेवा-सुविधा केंद्रे संबंधित जिल्ह्यात उपलब्ध असल्याची खात्री करण्याची जबाबदारी मागणी नोंदविण्याऱ्या संबंधित

अधिकाऱ्यांची राहील. त्यांनी विक्री-पश्चात सेवा-सुविधा केंद्रांची पुरवठा संस्थानिहाय यादी तात्काळ जाहीर करणे बंधनकारक राहील.

**१४.** शासनाने निश्चित केलेल्या औजारांचे दर हे केवळ कृषि विभागामार्फत/जिल्हा परिषदांमार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध केंद्र/राज्य पुरस्कृत योजनांसाठीच लागू राहतील.

**१५.** सदर शासन निर्णयाद्वारे कृषि विभागासाठी निश्चित केलेल्या दराने शासनाच्या इतर विभागांनी कृषि औजारांची खरेदी/पुरवठा केल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विभागांची राहील तसेच जिल्हा परिषदांनी त्यांच्या सेसफंडातून औजारे खरेदी केल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी त्यांचीच राहील,

**१६.** सन २०११-१२ करिता निश्चित केलेल्या दरापेक्षा जादा दराने औजारांची विक्री केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित पुरवठा संस्थेकडून जादा दराची रक्कम वसुल करण्यात येईल व अशा पुरवठा संस्थेकडून प्रत्येक प्रकरणी दंडात्मक कारवाई म्हणून रूपये १०.०० लाख वसूल करण्यात येतील.

**१७.** सदर शासन निर्णयाद्वारे निश्चित करण्यात आलेले दर हे तालुकास्तरापर्यंत पुरवठ्यासाठीचे असून ते दिनांक ३१ मार्च, २०१३ पर्यंत लागू राहतील.

राज्यामध्ये उपलब्ध असलेला जलसाठा विचारात घेऊन भूजलाशयीन क्षेत्रामाध्ये मोठया प्रमाणावर मासेमारी करण्यास वाव आहे. तसेच ग्रामिण भागामध्ये रोजगार निर्मिती क्षमता आहे. या दृष्टीने भूजलाशयीन जलक्षेत्रामध्ये मुलभुत सुविधा उपलब्ध व्हाव्यात व मच्छिमार सहकारी संस्थानी त्यामध्ये भाग घेवून त्यांच्यामध्ये व्यावसायीक वृत्ती वाढवून मत्स्योत्पादनात वाढ करणे आवश्यक आहे. त्यासाठी भूजलाशयीन क्षेत्रामध्ये मासेमारी करण्यासाठी जलाशय ठेक्याने देण्याचा कालावधी फक्त पाच वर्ष असल्याने त्याचा लाभ मत्स्योत्पादनात वाढ करण्यास किंवा मुलभुत सुविधा उभारण्यासाठी झालेला नाही. भूजलाशयीन क्षेत्रामध्ये जास्तीत जास्त गुंतवणूक व्हावी व मत्स्योत्पादनांत वाढ व्हावी तसेच केंद्र शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा फायदा हा स्थानिक मच्छिमारांना होण्याच्या दृष्टीने २०० हेक्टर खालील व वरील तलाव/ जलाशयामध्ये मत्स्यव्यवसायाकरीता राबविण्यात येणाऱ्या तलाव ठेका धोरणामध्ये जलक्षेत्र विकास व पारंपारीक मच्छिमारांचे हित लक्षात घेऊन सुधारीत तलाव ठेका धोरण राबविण्याचे शासनाच्या विचाराधीन होते. त्यानुसार दि. २२/१०/२०१३ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आले आहे. तद्नंतर सदर शासन निर्णयामध्ये काही सुधारणा करुन दि. ५/१२/२०१३ अन्वये शासन शुध्दीपत्रक निर्गमित करण्यात आले आहे. तसेच, लोकप्रतिनिधी / मच्छिमार

संघटना यांनी सदर धोरणामध्ये काही सुधारणा करण्याबाबत निवेदने दिलेली आहेत. सदर म विचारात घेवून त्याप्रमाणे काही सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. यासह त ठेका धोरणात सुसुत्रता व एकवाक्यता आणण्याकरीता उक्त दोन्ही क्र.३ व ४ येथील शासन नि शासन शुध्दीपत्रक समायोजित करुन एक सर्व समावेशक व र्सवकष सुधारीत शासन निर्णय नि करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय

सुधारीत तलाव ठेका धोरणामध्ये मत्स्यव्यवसाय विभागांतर्गत येणाऱ्या जलशयाचे त क्षेत्रफळानुसार म्हणजे २०० हेक्टरपर्यंत, २००.०१ ते १००० हेक्टर, १०००.०१ ते २००० हेव २०००.०१ हेक्टरवरील याप्रमाणे चार गट करण्यात आलेले आहेत. या क्षेत्रफळानुसार जल विभागाने निर्मित केलेल्या व मत्स्यव्यवसाय विभागाकडे हस्तांतरीत केलेल्या जलाशयामध्ये ख प्रमाणे जलाशय/ तलावात मासेमारी करण्याकरिता ठेक्याने देण्याबाबत या शासन निर्णयाद्वारे म देण्यात येत आहे.

२. सदरील शासन निर्णय हा आदिवासी क्षेत्रातील अनुसुचित केलेल्या गावांमधील ग्रामपं अंतर्गत येणा-या १०० हेक्टर खालील जलाशय/गाव तलावांमध्ये मासेमारी करण्यासाठी लागू नाही.

३. २०० <u>हेक्टरपर्यंतचे तलाव मासेमारी करण्याकरिता देण्याची पध्दत.</u>

३.१ २०० हे. पर्यतचे तलावावर जर एक प्राथमिक मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था नोंदणी झाली तर त्या संस्थेस न्यूनतम ठेका रककमेवर तो तलाव ठेक्याने देण्यात येईल.

३.२ २०० हेक्टरपर्यंतच्या तलावावर जर ऐकापेक्षा जास्त मच्छिमार सहकारी संस्थांची नोंदणी असल्यास, अशा ठिकाणी नोंदणी झालेल्या संस्थांमध्ये बोली लावून लिलाव घेण्यात येऽ अधिकची बोली / रक्कम बोलणाऱ्या (देणाऱ्या) मच्छिमार सहकारी संस्थेस ठेका देण्यात ये

३.३ २०० हेक्टरपर्यतच्या तलावावर नोंदणी झालेल्या संस्थांनी तलावाचा ठेका न घेतल्यास सदर जाहीर निविदेद्वारे मासेमारीसाठी ठेक्याने देण्यात येईल.

३.४ यापुढे मासेमारीचे कार्यक्षेत्र हे संबंधित संस्था, ज्या तलावावर नोंदणी झालेली आहे त्या तलावा मर्यादित राहिल.

३.५ २०० हेक्टरपर्यंतचे तलावाचा ठेका कालावधी हा पाच वर्ष इतका राहील.

३.६ बारमाही तलावाचे जलक्षेत्र ५० हेक्टर पेक्षा जास्त असल्यास ५० हेक्टर एकक मानून ४ प्रा संस्थाची नोंदणी करता येईल.

३.७ २०० हेक्टर पर्यंतचे तलावाचा ठेका कालावधी हा ५ वर्ष इतका राहील परंतू या ५ व

कालावधीत जर सदरील संस्थेने/ठेकेदाराने कमीत कमी रू.१५ लक्ष इतकी भांडवली गुंतवणूक केल्यास त्यांना जाहीर बोली न करता ठेका कालावधीस पुढील ५ वर्षासाठी मुदतवाढ देण्यात येईल. त्याप्रमाणे पुढील मुदतवाढीच्या ५ वर्षाच्या कालावधीत पुन्हा रू.१५ लक्ष इतकी भांडवली गुंतवणूक केल्यास आणखी ५ वर्ष जाहीर बोली न करता मुदतवाढ देण्यात येईल. अशी मुदतवाढ जास्तीत जास्त १५ वर्षे देय राहील.

३.८ परिच्छेद क्र. ३.७ मध्ये नमूद केलेल्या मुदतवाढीचा लाभ हा तलाव मासेमारी ठेक्याने घेणाऱ्या मच्छिमार सहकारी संस्थेला/ठेकेदाराला लागू राहिल.

३.९ २०० हेक्टरपर्यंतचे तलाव मासेमारी करण्यासाठी ठेक्याने घेण्यात येणाऱ्या मच्छिमार संस्था/ठेकेदाराला त्या जलाशयावर नोंदणी झालेल्या इतर अन्य संस्थेच्या सभासदांना मासेमारी करु देणे बंधनकारक राहिल.

३.१० २०० हेक्टरपर्यंतच्या तलावात भांडवली गुंतवणुकीच्या आधारवर मुतदवाढ देण्याचा अधिकार जिल्हास्तरीय तलाव ठेका समितीकडे राहिल.

३.११ २०० हेक्टरपर्यंतच्या तलावाचा ठेका कालावधी पुढील मुदतवाढ देताना मागील ५ वर्षाकरीता निश्चित केलेल्या ठेका रकमेमध्ये १०% वाढ करुन देण्यात येईल.

४. २००.०१ <u>हेक्टर ते १००० हेक्टरपर्यतचे जलाशय मासेमारी करण्याकरिता देण्याची पध्दत</u>

४.१ २००.०१ हेक्टर ते १००० हेक्टर क्षेत्र विचारात घेवून प्रथम २०० हेक्टर क्षेत्रासाठी ५० हेक्टर हे एकक धरुन चार संस्था स्थापीत कराव्यात . सदर २०० हेक्टर क्षेत्र वजा जाता पूढील क्षेत्रासाठी २०० हेक्टर हे एकक धरुन चार संस्था नोंदणी करता येतील. अशा प्रकारे १००० हेक्टर पर्यत जास्तीत जास्त ८ संस्था नोंदणी करता येतील. या पूर्वी ८ पेक्षा जास्त मच्छिमार सहकारी संस्थाची नोंदणी झाली असल्यास, अशा सर्व संस्थांचे अस्तित्व ग्राहय धरण्यात येईल. मात्र अशा तलावावर जर एकच प्राथमिक सहकारी संस्था पंजीबध्द झालेली असेल तर जाहीर लिलावाने ठेका देण्यात येईल.

४.२ अशा नोंदणी झालेल्या संस्थांमध्ये लिलाव पध्दतीने ठेका देण्यात येईल. यासाठी जाहीर बोली पध्दतीने उपस्थित संस्थांच्या समक्ष प्रादेशिक स्तरीय तलाव ठेका समितीने उच्चत्तम प्राप्त बोली नुसार ठेक्याची निश्चिती करावी व उच्चत्तम बोलीधारक मच्छिमार सहकारी संस्थेस ठेका देण्यात यावा.

४.३ जर जलाशयावर नोंदणी झालेल्या संस्थांनी मासेमारी ठेका घेतला नाही तर, २००.०१ हेक्टर ते १००० पर्यंतचे जलाशय जाहीर निविदेने ठेक्याने देण्यात येतील.

४.४ २००.०१ ते १००० हेक्टर पर्यंतचे जलाशयाचा ठेका कालावधी हा ५ वर्ष इतका राहील परंतू या ५ वर्ष ठेका कालावधीत जर सदरील संस्थेने/ठेकेदाराने कमीत कमी रू.२५ लक्ष इतकी भांडवली गुंतवणूक केल्यास त्यांना निविदा न काढता ठेका कालावधीस पुढील ५ वर्षासाठी मुदतवाढ देण्यात येईल. त्याप्रमाणे पुढील मुदतवाढीच्या ५ वर्षाच्या कालावधीत पुन्हा रू.२५ लक्ष इतकी भांडवली गुंतवणूक केल्यास आणखी ५ वर्ष निविदा न काढता मुदतवाढ देण्यात येईल. अशी मुदतवाढ जास्तीत जास्त १५ वर्षे देय राहील.

४.५ परिच्छेद क्र.४.४ मध्ये नमूद केलेल्या मुदतवाढीचा लाभ हा जलाशय मासेमारी ठेक्याने घेणाऱ्या मच्छिमार सहकारी संस्थेला/ठेकेदाराला लागू राहील.

४.६ २००.०१ ते १००० हेक्टर पर्यतचे जलाशयावर मासेमारी करण्यासाठी ठेक्याने घेण्यात येणाऱ्या मच्छिमार सहकारी संस्थेला/ठेकेदाराला त्या जलाशयावर नोंदणी झालेल्या इतर अन्य संस्थेच्या सभासदांना मासेमारी करु देणे बंधनकारक राहील.

४.७ २००.०१ ते १००० हेक्टर पर्यंतच्या जलाशयास भांडवली गुंतवणूकीच्या आधारावर मुदतवाढ देण्याचे अधिकार हे प्रादेशिक स्तरावरील तलावठेका समितीस राहील.

४.८ २००.०१ ते १००० हेक्टर पर्यतचे जलाशय ठेका कालावधीस पुढील मुदतवाढ देताना मागील ५ वर्षाकरिता निश्चित केलेल्या ठेका रक्कमेमध्ये १०% वाढ करून मुदतवाढ देण्यात यावी.

५. **१०००.०१ हेक्टर ते २००० हेक्टरपर्यतचे जलाशय मासेमारी करण्याकरिता देण्याची पध्दत.**

५.१ १०००.०१ हेक्टर ते २००० हेक्टरपर्यंतच्या जलाशयामध्ये अधिक मत्स्योत्पादनासाठी जास्त प्रमाणात आर्थिक गुंतवणूक व मुलभुत सोई-सुविधांची निर्मिती करणे आवश्यक आहे. या पुढे असे सर्व जलाशय फक्त जाहीर निविदेने मच्छिमार संस्थांना/मच्छिमार संघ /खाजगी उद्योजक यांना देण्यात येतील.

५.२ १०००.०१ हेक्टर ते २००० हेक्टर क्षेत्र विचारात घेऊन प्रथम २०० हेक्टर क्षेत्रासाठी ५० हेक्टर हे एकक धरुन ४ संस्था स्थापीत कराव्यात. सदर २०० हेक्टर क्षेत्र वजा जाता उर्वरीत क्षेत्रासाठी २०० हेक्टर हे एकक धरुन जास्तीत जास्त ९ संस्था नोंदणी करता येतील. अशा प्रकारे २००० हेक्टर पर्यंत जास्तीत जास्त १३ संस्था नोंदणी करता येतील. यापूर्वी १३ पेक्षा जास्त मच्छिमारी संस्थांची नोंदणी झाली असल्यास अशा सर्व संस्थाचे अस्तित्व ग्राहय धरण्यात येईल.

५.३ १०००.०१ हेक्टर ते २००० हेक्टरपर्यंतच्या जलाशयावर यापुढे मच्छिमार सहकारी संघाची नोंदणी करता येईल. मच्छिमार संघ तयार करण्याकरिता किमान पाच मच्छिमार सहकारी संस्थांची सभासद म्हणून नोंदणी आवश्यक राहील. एका जलाशयावर एकाच मच्छिमार संघांची नोंदणी करता येईल.

५.४ १०००.०१ हेक्टर ते २००० हेक्टरपर्यंतच्या! जलाशयावर नोंदणी झालेल्या मच्छिमार सहकारी संघ हा सर्व सभासद मच्छिमार सहकारी संस्थामध्ये समन्वय विषयक कार्य करेल. नोंदणी झालेल्या संघाला मासळी सुरक्षण, वाहतूक व पणन तसेच इतर अनुषंगीक बाबींचे कार्य करणे आवश्यक राहील.

५.५ १०००.०१ हेक्टर ते २००० हेक्टरपर्यंतच्या जलाशयाचा विकास करण्यासाठी मच्छिमार संस्था/मच्छिमार संघ/ खाजगी उद्योजक यांचा ठेका कालावधी हा किमान पाच वर्ष इतका राहील. सदरील ५ वर्ष ठेका कालावधीत मच्छिमार संस्था/मच्छिमार संघ/ खाजगी उद्योजक यांनी जर कमीत कमी रू.४० लक्ष इतकी भांडवली गुंतवणूक केल्यास, त्यांच्या ठेका कालावधीमध्ये ५ वर्ष पुढील मुदतवाढ निविदा न काढता देण्यात येईल. त्याच प्रमाणे मुदतवाढ कालावधीत मच्छिमार संस्था/ मच्छिमार संघ / खाजगी उद्योजक यांनी पुन्हा रु. ४० लक्ष इतकी भाडवली गुतंवणुक केल्यास आणखी पाच वर्ष पूढील मुदतवाढ निविदा न काढता देण्यात येईल अशी मुदतवाढ जास्तीत जास्त १५ वर्षे देय राहील.

५.६ परिच्छेद क्रमांक ५.५ मध्ये नमूद केलेल्या मुदतवाढीचा लाभ हा जलाशय मासेमारी ठेक्याने घेणाऱ्या मच्छिमार संस्था/मच्छिमार संघ/खाजगी उद्योजक यांना लागू राहील.

५.७ १०००.०१ हेक्टर ते २००० हेक्टरपर्यंतच्या जलाशयावर मासेमारी करण्यासाठी ठेक्याने घेण्यात येणाऱ्या मच्छिमार संस्था/मच्छिमार संघ/ खाजगी उद्योजक यांना जलाशयावर नोंदणी झालेल्या इतर अन्य संस्थेच्या सभासदांना मासेमारी करु देणे बंधनकारक राहील.

५.८ १०००.०१ हेक्टर ते २००० हेक्टरपर्यंतच्या जलाशयाचे भांडवली गुतंवणुकीच्या आधारावर मुदतवाढ देण्याचे अधिकार हे आयुक्त मत्स्यव्यवसाय यांच्या स्तरावरील तलावठेका समितीस राहतील.

५.९ १०००.०१ हेक्टर ते २००० हेक्टरपर्यंतच्या जलाशयांस ठेका कालावधीत पुढील मुदतवाढ देताना मागील ५ वर्षाकरिता निश्चित केलेल्या ठेका रक्कमेमध्ये १०% वाढ करून मुदत वाढ देण्यात येईल.

६. २०००.०१ <u>हेक्टर वरील जलाशय मासेमारी करण्याकरिता देण्याची पध्दत.</u>

६.१ २०००.०१ हेक्टर वरील जलाशयामध्ये अधिक मत्स्योत्पादनासाठी जास्त प्रमाणात आर्थिक गुंतवणूक व मुलभुत सोई सुविधांची निर्मिती करणे आवश्यक आहे. या पुढे सर्व जलाशय फक्त जाहीर निविदेने मच्छिमार संस्था/मच्छिमार संघ/खाजगी उद्योजक यांना देण्यात येतील.

कालावधी आजपासून २ वर्षापेक्षा अधिक शिल्लक आहे, अशा संस्था/ खाजगी ठेकेदार यांनी त्यांच्या उर्वरीत कालावधीमध्ये परिच्छेद क्र .३.७,४.४ ५.५ व ६.५ यामध्ये नमूद केल्याप्रमाणे निश्चित केलेल्या बाबींवर भांडवली गुंतवणुक केल्याचे सिध्द केल्यास अशा सर्व संस्था/ ठेकेदार हेसुध्दा या नवीन जलाशय/ तलाव ठेका धोरणाचा लाभ घेण्यास पात्र राहतील.अशा मच्छिमार संस्था/मच्छिमार संघ/ खाजगी उद्योजक यांनी वरीलप्रमाणे गुंतवणुक केल्यास या शासन निर्णयापासून ठेका कालावधीत एकूण मुदतवाढ जास्तीत जास्त १५ वर्षे देय राहील. सध्या ज्या संस्था/संघ यांच्याकडे जलाशय/ तलाव आजपासून दोन वर्षापेक्षा कमी ठेका कालावधी शिल्लक आहे, अशा सर्व संस्था/संघ/खाजगी ठेकेदार यांना, ठेका कालावधी संपुष्टात आल्यानंतर सुधारीत सदर धोरणानुसार ठेका प्रक्रीयेची कार्यवाही करण्यात येईल.

८. परिच्छेद क्र. ३.७, ४.४,५.५ व ६.५ मध्ये नमूद भांडवली गुंतवणुक ही खालील बाबींवर करणे आवश्यक राहील. सदरील भांडवली गुंतवणूक मच्छिमार संस्था/मच्छिमार संघ/ खाजगी उद्योजक यांनी स्वनिधीतूनच केल्यास ते ठेका कालावधीमध्ये मुदवाढ देण्यास पात्र राहतील. तसेच केलेली भांडवली गुंतवणूक ही जलाशयाच्या कार्यक्षेत्रामध्ये अथवा खाजगी अथवा शासकीय जमिनीवर केलेली गुंतवणूक असल्यास ती मुदतवाढीसाठी ग्राहय धरण्यात येईल.

८.१ मत्स्यबोटुकली संचयनासाठी स्थानिक परिस्थितीनुसार मत्स्यबीज निर्मीतीकरीता हॅचरी बांधकाम, संवर्धन तलाव बांधकाम, संवर्धन तलाव बांधकाम करणे.

८.२ पिंजरा पदधतीने मत्स्यबिज संवर्धनाच्या सुविधा निर्माण करणे.

८.३ मासेमारी करीता नौका, जाळी इत्यादी सुविधा.

८.४ मासळी उतरविणेसाठी संकलन केंद्र.

८.५ बर्फ कारखाना, शितगृह.

८.६ मासळी वाहतुक सुविधा.

८.७ जलसंपदा विभागाने जलक्षेत्राकरीता भुसंपादीत केलेल्या जमिनीपैकी जी जमीन जलग्रहण क्षेत्राच्या बाहेर राहते, अशा संपादीत केलेल्या जमिनीवर बर्फ कारखाना, शितगृह, मासळी खरेदी-विक्री केंद्र, मत्स्यबीज केंद्र, मत्स्यसंवर्धन तळी इ. मुलभुत सुविधा उभारण्यासाठी अशी जमीन आवश्यक असल्यास ती जलसंपदा विभागाने संबधित जिल्हाधिकारी यांचेकडे वर्ग करावी.

८.८ जलाशय मासेमारीकरीता देण्यात आलेल्या मच्छिमार संस्था/मचछीमार संघ/खाजगी उद्योजक यांनी मुलभुत सुविधा उभारण्यासाठी अशा जमिनीची मागणी केल्यास सदरची जमीन संबंधित जिल्हाधिकारी यांच्याकडून मत्स्यव्यवसाय विभागाकडे भाडेपट्टी करारावर उपलब्ध करुन द्यावी.

६.२ २०००.०१हे.वरील जलाशयामध्ये यापुढे २००हे. हे एकक धरून जास्तीत जास्त फक्त १५ मच्छिमार सहकारी संस्थाची नोंदणी करता येईल. परंतु यापूर्वी १५ पेक्षा जास्त मच्छिमार संस्थांची नोंदणी झाली असल्यास अशा सर्व संस्थेचे अस्तित्व ग्राहय धरण्यात येईल.

६.३ २०००.०१ हे. वरील जलाशयावर यापुढे मच्छिमार सहकारी संघाची नोंदणी करता येईल. मच्छिमार सहकारी संघ तयार करण्याकरिता किमान पाच सभासद सहकारी संस्थांची नोंदणी आवश्यक राहील. एका जलाशयावर फक्त एकच मच्छिमार सहकारी संघाची नोंदणीकरता येईल.

६.४ २०००.०१ हे. वरील जलाशयावर नोंदणी झालेल्या मच्छिमार सहकारी संघ हा सर्वसभासद मच्छिमार सहकारी संस्थामध्ये समन्वय विषयक कार्य करेल. नोंदणी झालेल्या संघाला मासळी सुरक्षण वाहतूक व पणन तसेच इतर अनुषंगीक बाबींचे कार्य करणे आवश्यक राहील.

६.५ २०००.०१ हेक्टर वरील जलाशयाचा विकास करण्यासाठी मच्छिमार संस्था/मच्छिमार संघ/खाजगी उद्योजक यांचा ठेका कालावधी हा किमान पाच वर्ष इतका राहील. सदरील ५ वर्ष ठेका कालावधीत मच्छिमार संस्था/ मच्छिमार संघ /खाजगी उद्योजक यांनी जर कमीत कमी रू.७५ लक्ष इतकी भांडवली गुंतवणुक केल्यास, त्यांच्या ठेका कालावधी मध्ये ५ वर्ष पुढील मुदतवाढ निविदा न काढता देता येईल. त्याचप्रमाणे मुदतवाढ कालावधीत मच्छिमार संस्था/मच्छिमार संघ/खाजगी उद्योजक यांनी पुन्हा रू.७५ लक्ष गुंतवणुक केल्यास आणखी पाच वर्ष पुढील मुदतवाढ निविदा न काढता देण्यात येईल. अशी मुदतवाढ जास्तीत जास्त १५ वर्षे देय राहील.

६.६ परिच्छेद क्र.६.५ मध्ये नमूद केलेल्या मुदतवाढीचा लाभ हा जलाशय मासेमारी ठेक्याने घेणाऱ्या मच्छिमार संस्था/मच्छिमार संघ/खाजगी उद्योजक यांना लागु राहील.

६.७ २०००.०१ हेक्टर वरील जलाशयावर मासेमारी करण्यासाठी ठेक्याने घेण्यात येणाऱ्या मच्छिमार संस्था/मच्छिमार संघ/ खाजगी उद्योजक यांना जलाशयावर नोंदणी झालेल्या इतर अन्य संस्थेच्या सभासदांना मासेमारी करु देणे बंधनकारक राहील.

६.८ २०००.०१ हेक्टर वरील जलाशयाचे भांडवली गुंतवणुकीच्या आधारावर मुदतवाढ देण्याचे अधिकार हे आयुक्त मत्स्यव्यवसाय यांच्या स्तरावरील तलावठेका समितीस राहतील.

६.९ २०००.०१ हेक्टर वरील जलाशयास ठेका कालावधीत पुढील मुदतवाढ देताना मागील ५ वर्षाकरिता निश्चित केलेल्या ठेका रक्कमेमध्ये १०% वाढ करून मुदतवाढ देण्यात यावी.

७. सदरहु जलाशय/ तलाव ठेका धोरण लागू होण्यापूर्वी जे जलाशय/ तलाव ठेका पध्दतीने सहकारी संस्था/खाजगी ठेकेदार यांचेकडे मासेमारी हक्कासाठी देण्यात आले आहेत व ज्यांचा ठेका

८.९ जलाशय ठेकेदाराने मुलभुत सुविधा उभारण्यासाठी बिगरशेती परवाना मिळण्याबाबत मत्स्यव्यवसाय विभागाकडे विनंती केल्यास संबधित जिल्हाधिकारी यांच्याकडुन मत्स्यव्यवसाय विभागाच्या नावे बिगरशेती परवाना उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करावी व याप्रमाणे उपलब्ध झालेल्या जमिनीबाबत मत्स्यव्यवसाय विभाग व संबधित जलाशयावरिल ठेकेधारक यांच्यामध्ये करार करुन जमिन मुलभुत सुविधा उभारण्यासाठी उपलब्ध करुन घ्यावी.

८.१० मच्छीमार संस्था/मच्छीमार संघ/खाजगी उद्योजक यांनी जलाशयाच्या ठेका कालावधीमध्ये शासकीय अनुदानातून उभारलेल्या मुलभुत सुविधांची मालकी ठेका कालावधी समाप्तीनंतर मत्स्यव्यवसाय विभागाची राहील व अशा उभारण्यात आलेल्या मुलभुत सुविधा या चांगल्या व कार्यान्वीत स्थितीत मत्स्यव्यवसाय विभागाकडे हस्तांतरीत करणे बंधनकारक राहील.

८.११. ज्यामच्छीमार संस्था/मच्छीमार संघ/खाजगी उद्योजक यांना मुदतवाढ आवश्यक आहे, अशी मुदतवाढ मागणीची कार्यवाही किमान चार महिने अगोदर भांडवली गुंतवणुकीच्या तपशिलासह सक्षम तलाव समितीच्या सदस्य सचिवाकडे सादर करणे आवश्यक राहील अन्यथा ते मुदतवाढ लाभास पात्र राहणार नाही. संबंधित तलाव ठेका समितीच्या सदस्य सचिवाने ठेका कालावधी संपण्यापुर्वी मच्छीमार संस्था/मच्छीमार संघ/खाजगी उद्योजक यांच्याकडून दोन महिने अगोदर अटींची पूर्तता करुन घ्यावी. मच्छीमार संस्था/मच्छीमार संघ/खाजगी उद्योजक हे मुदतवाढीस पात्र/अपात्र आहेत, त्याबाबत ठेका कालावधी संपण्याच्या किमान एक महिना अगोदर प्रस्ताव सक्षम समितीपुढे ठेवून याबाबत सक्षम समितीने निर्णय घेऊन संबंधितांना लेखी कळविणे आवश्यक राहील.

८.१२. ८.१ ते ८.६ प्रकरणी गुंतवणुकीची प्रमाणके व बाबनिहाय मर्यादाबाबत आयुक्त मत्स्यव्यवसाय स्वतंत्र पणे मार्गदर्शक सूचना निर्गमित करतील.

**९. २०० हेक्टर वरील सर्व जलाशयामध्ये संस्था/ संघ/खाजगी उद्योजक यांनी ठेका मिळविण्यापुर्वी व ठेका कालावधीत करावयाची कार्यवाही.**

९.१ निर्माणाधिन जलक्षेत्रामध्ये किनाऱ्यावर मासळी उतरविण्यासाठी, बंदिस्त पिंजऱ्यातील मत्स्यसंवर्धन इ. मुलभुत सुविधा निर्माण करावयाच्या झाल्यास त्याकरिता आवश्यक असलेले ना-हरकत प्रमाणपत्र किंवा परवानगी संबंधित कार्यालयाकडून प्राप्त करून घेण्याची जबाबदारी ही संबंधित मच्छीमार संस्था/मच्छीमार संघ/खाजगी उद्योजक यांची राहील.

९.२ वर नमूद केलेल्या भांडवली गुंतवणुकीसह मच्छीमार संस्था/मच्छीमार संघ/खाजगी उद्योजक यांना जलाशयात क्षमतेनुसार मत्स्यबोटुकली संचयन करणे व अपेक्षित मत्स्योत्पादन साध्य करणे आवश्यक राहील. मच्छिमार संस्था/मच्छिमार संघ/ खाजगी उद्योजक हे मुलभुत सुविधा निर्माण

करण्याकरिता शासनाच्या विविध अर्थसहाय्याच्या योजनांचा लाभ नियमानुसार घेण्यास पात्र असतील. अशा निर्माण केलेल्या मुलभुत सुविधांचा लाभ प्राधान्याने जलाशयाच्या मत्स्योत्पादनासाठी करून घेणे बंधनकारक राहील. तसेच त्यांनी भांडवली गुंतवणुक, वार्षिक संचयन, मत्स्योत्पादन, उपलब्ध करून दिलेला रोजगार त्याचा स्वतंत्र तपशिल ठेवावा व तो संबंधित जिल्हयाचे सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांना सादर करणे आवश्क राहील.

९.३ मच्छिमार संस्था/मच्छिमार संघ/खाजगी उद्योजक यांनी ठेका कालावधीत केलेली गुंतवणूक ही लेखापरीक्षण, दैनंदिन बॅक व्यवहार, ताळेबंद यामध्ये समाविष्ठ असणे यापुढे बंधनकारक राहील. सदरची सर्व कागदपत्रे ही प्रमाणित लेखापाल अथवा सनदी लेखापालाकडून प्रमाणित केलेली असावीत. तसेच सहकारी मच्छिमार संस्था /मच्छिमार संघ यांनी अद्यावत लेखापरिक्षण करणे बंधनकारक राहिल. ठेका देण्यापुर्वी मच्छिमार संस्था/ मच्छिमार संघ /खाजगी उद्योजक यांनी आपले ताळेबंद संबंधित जलाशय/ तलाव ठेका समितीस सादर करणे बंधनकारक राहील. याची पडताळणी करूनच संबंधित जलाशय/ तलाव ठेकां समितीने पुढील कार्यवाही करणे बंधनकारक राहील.

९.४ शास्त्रोक्त दृष्टीने मत्स्योत्पादन घेणेस्तव २०० हेक्टर व त्यावरील जलाशयामध्ये प्रकल्प राबवितांना मत्स्यव्यवसाय पदवी (BFSc) अथवा पदव्युत्तर पदवीधारक (MSc Fisheries /MFSc ) तसेच प्राणी शास्त्र पदवीधारक / पदव्युत्तर पदवी अर्हता धारकास सदर प्रकल्पावर व्यवस्थापक म्हणून नेमणे बंधनकारक राहील.

९.५ जलाशय/तलाव एका वेळी फक्त ५ वर्षाकरिता ठेक्याने देण्यात यावे. त्यासाठी विहीत करारपत्र करून देणे मच्छिमार संस्था /मच्छिमार संघ/खाजगी उद्योजक यांना बंधनकारक राहतील. ठेका कालावधीत मत्स्यबोटुकली संचयन योग्य रितीने करित नसेल किंवा मत्स्योत्पादनाचे अहवाल नियमितपणे संबंधित सक्षम अधिकाऱ्याकडे सादर करीत नसतील, तसेच करारपत्रातील अटीचा भंग केल्याचा आढळून आल्यास ठेका रद्द करण्याचे अधिकार संबंधित सक्षम तलाव ठेका समितीस राहतील व अशा संबंधित मच्छिमार संस्था/ मच्छिमार संघ/खाजगी उद्योजक यांना पुढील सहा वर्षाकरिता काळया यादीत टाकण्यात येईल.

९.६ मच्छिमार सहकारी संस्था/मच्छिमार संघ / खाजगी उद्योजक यांनी मच्छिमार संस्थांच्या सभासदांमार्फत केलेल्या मासेमारीबाबत आवश्यक ते सर्व अभिलेख ठेवणे बंधनकारक राहील

९.७ ठेका कालावधीमध्ये जलाशय/ तलावामध्ये मत्स्यबीज संचयन केलेली आकडेवारी व त्यापासून निर्धारित केलेल्या अपेक्षित मत्स्यउत्पादन व उत्पादीत मासळीची विक्री व्यवहार याचा ताळमेळ असणे आवश्यक आहे.

१०. सदर जलाशय/तलाव ठेका धोरणातील तरतुदी या महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळाकडे हस्तातरीत केलेल्या जलाशयासाठी सुध्दा लागु राहतील. महामंडळास खाजगी, सार्वजनिक सहभागाने प्रकल्प राबवयाचा झाल्यास अशा प्रकल्पांना शासनाची पुर्व परवानगी घेणे बंधनकारक राहील.

११. जलाशय/तलाव ठेका निर्धारित रक्कम प्रतिवर्षी आकारण्याची पध्दत खालील नमूद केल्याप्रमाणे परिगणना करून आकारण्यात येईल.

| अ.क्र | तलावाचे सरासरी जलक्षेत्र (हेक्टर) | अपेक्षित इष्टतम बोटुकली साठवणूक | अपेक्षित मत्स्योत्पादन (कि..ग्र.) | तलाव ठेका रक्कम आकारावयाची सुधारीतपध्दत (प्रतिवर्षे) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | ० ते २० | ५००० | १५०० | ४५० प्रतिहेक्टर |
| २ | २०.०१ ते ६० | १००००० + २० हे. पुढील प्रत्येक हेक्टरसाठी २००० | ३०००० + २० हेक्टर पुढील प्रत्येक हेक्टरसाठी ६०० | रु.९००० + २० हे. पुढील प्रत्येक हे. करिता रु. १८० |
| ३ | ६०.०१ ते २०० | १८०००० + ६० हे. पुढील प्रत्येक हेक्टरसाठी १००० | ५४००० + ६० हेक्टर पुढील प्रत्येक हेक्टरसाठी ३०० | रु.१६२००+६० हे.पुढील प्रत्येक हे.करिता रु ९० |
| ४ | २००.०१ ते१००० | ३२०००० + २०० हे. पुढील प्रत्येक हेक्टरसाठी ५०० | ९६००० + २०० हेक्टर पुढील प्रत्येक हेक्टरसाठी १५० | रु. २८८०० + २०० हे. पुढील प्रत्येक हे. करिता रु. ४५. |
| ५ | १०००.०१ते२००० | ७२०००० + १००० हे. पुढील प्रत्येक हेक्टरसाठी ५०० | २१६००० + १००० हेक्टर पुढील प्रत्येक हेक्टरसाठी ७५ | रु.६४८०० + १००० हे पुढील प्रत्येक हे. करिता रु. २२.५ |
| ६ | २००० वरील | १२००००० + २००० हे. पुढील प्रत्येक हेक्टरसाठी ५०० | २९१००० + २००० हेक्टर पुढील प्रत्येक हेक्टरसाठी ७५ | रु. ८७३०० + २००० हे. पुढील प्रत्येक हे. करिता रु. २२.५ |

१८. मच्छिमार संस्था/ मच्छिमार संघ/खाजगी उद्योजक यांनी प्रतिवर्षी लेखापरिक्षण करून संबंधित जिल्हयाचे सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांना दरवर्षी ३० जूनपर्यंत लेखापरिक्षण अहवाल सादर करणे बंधनकारक राहील.

**१९. जलाशय/तलाव** ठेका देताना, संस्था/संघ/ खाजगी उद्योजक यांच्या पात्रतेचे निकष खालीलप्रमाणे राहतील.

अ. **संस्था** ही भुजलाशयीन मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था म्हणून नोंदणी झालेली असावी.

ब. संस्था / संघ तलाव ठेक्याने देण्याच्या वेळी बंद अथवा अवसायनात नसावे.

क. संस्था/संघ/उद्योजक शासनाचे कसल्याही प्रकारचे थकबाकीदार नसावे.

ड. संस्थेचे अद्ययावत लेखापरिक्षण झालेले असावे.

इ. संस्था/संघ/उद्योजक यांच्याकडे तलाव ठेका रक्कम,तलाव ठेका अनामत रक्कम अशी मिळून होणाऱ्या संस्थेची रक्कम ही संस्थेच्या/ठेकेदाराच्या जमा खाती असावी त्याप्रमाणे संस्थेच्या/ठेकेदाराच्या आर्थिक पत्रकात ती निर्देशित असली पाहीजे.

फ. एखादी नियोजित संस्था अर्जदार असेल तर अशा संस्थांची मागणी विचारात घेण्यांत येणार नाही.

ग. मच्छिमार सहकारी संस्था/खाजगी व्यक्ती ही शासनाच्या कोणत्याही प्रकारची थकबाकीदार,नादार नसावी.

घ. मच्छिमार संस्था/ मच्छिमार संघ/खाजगी उद्योजक यांनी निविदेसोबत सनदी लेखापालाच्या स्वाक्षरीचे गत तीन वर्षाचे लेखापरिक्षण जोडणे बंधनकारक राहील.

२०. जलाशय/ तलावात मासेमारी करण्यासाठी जलाशय उपलब्ध करणे, ठेक्याने देणे व निविदा प्रक्रीया अवलंबिण्यासाठी खालीलप्रमाणे समित्या कार्यरत राहतील.

२०.१ जलाशयाच्या निर्मितीनंतर मासेमारी हक्काकरीता मत्स्यव्यवसाय विभागाकडे हस्तांतरीत केल्यानंतर बऱ्याचवेळा स्थानिक प्रशासनामार्फत मासेमारी करण्यास प्रतिबंध करण्यात येतो. यापुढे असे प्रतिबंध होऊ नये यास्तव,खाली नमूद केलेल्या राज्यस्तरीय समितीच्या पुर्वपरवानगी शिवाय अशी कार्यवाही करता येणार नाही.

| | |
|---|---|
| १. अपर मुख्य सचिव (महसूल) | अध्यक्ष |
| २. प्रधान सचिव (वित्त) | सदस्य |
| ३. प्रधान सचिव (वने) | सदस्य |
| ४. प्रधान सचिव (ग्रामविकास) | सदस्य |
| ५. प्रधान सचिव (आदिवासी विकास) | सदस्य |
| ६. प्रधान सचिव (सामाजिक न्याय) | सदस्य |

१०. सदर जलाशय/तलाव ठेका धोरणातील तरतुदी या महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळाकडे हस्तातरीत केलेल्या जलाशयासाठी सुध्दा लागु राहतील. महामंडळास खाजगी, सार्वजनिक सहभागाने प्रकल्प राबवयाचा झाल्यास अशा प्रकल्पांना शासनाची पुर्व परवानगी घेणे बंधनकारक राहील.

११. जलाशय/तलाव ठेका निर्धारित रक्कम प्रतिवर्षी आकारण्याची पध्दत खालील नमूद केल्याप्रमाणे परिगणना करून आकारण्यात येईल.

| अ.क्र | तलावाचे सरासरी जलक्षेत्र (हेक्टर ) | अपेक्षित इष्टतम बोटुकली साठवणूक | अपेक्षित मत्स्योत्पादन (कि..ग्र.) | तलाव ठेका रक्कम आकारावयाची सुधारीतपध्दत (प्रतिवर्ष) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | ० ते २० | ५००० | १५०० | ४५० प्रतिहेक्टर |
| २ | २०.०१ ते ६० | १००००० + २० हे. पुढील प्रत्येक हेक्टरसाठी २००० | ३०००० + २० हेक्टर पुढील प्रत्येक हेक्टरसाठी ६०० | रु.९००० + २० हे. पुढील प्रत्येक हे. करिता रु. १८० |
| ३ | ६०.०१ ते २०० | १८०००० + ६० हे. पुढील प्रत्येक हेक्टरसाठी १००० | ५४००० + ६० हेक्टर पुढील प्रत्येक हेक्टरसाठी ३०० | रु.१६२००+६० हे.पुढील प्रत्येक हे.करिता रु ९० |
| ४ | २००.०१ ते१००० | ३२०००० + २०० हे. पुढील प्रत्येक हेक्टरसाठी ५०० | ९६००० + २०० हेक्टर पुढील प्रत्येक हेक्टरसाठी १५० | रु. २८८०० + २०० हे. पुढील प्रत्येक हे. करिता रु. ४५. |
| ५ | १०००.०१ते२००० | ७२०००० + १००० हे. पुढील प्रत्येक हेक्टरसाठी ५०० | २१६००० + १००० हेक्टर पुढील प्रत्येक हेक्टरसाठी ७५ | रु.६४८०० + १००० हे पुढील प्रत्येक हे. करिता रु. २२.५ |
| ६ | २००० वरील | १२००००० + २००० हे. पुढील प्रत्येक हेक्टरसाठी ५०० | २९१००० + २००० हेक्टर पुढील प्रत्येक हेक्टरसाठी ७५ | रु. ८७३०० + २००० हे. पुढील प्रत्येक हे. करिता रु. २२.५ |

वरील तक्यात नमूद केलेली जलयाशय/तलावाची ठेका रक्कमेची गणना करण्याकरीता अपेक्षित मत्स्योत्पादनाच्या आधारावर आधारभुत १% इतकी रक्कम निश्चित करून प्रति किलो मासळीचा दर सरासरी रू.३०/- ग्राहय धरून पुढील सुत्रामध्ये नमूद केल्यानुसार येणाऱ्या ठेका रक्कमेची आकारणी करण्यास संबंधित जिल्हयाचे सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय हे सक्षम राहतील. तलाव ठेका रक्कम (रू.) = तलावाचे क्षेत्र (हेक्टर) x अपेक्षित मत्स्योपादन प्रति हेक्टर (किलो) x प्रतिकिलो मासळीचा बाजारभाव (रू.३०/-) x १/१००.

१२. मच्छिमार संस्था/ मच्छिमार संघ/खाजगी उद्योजक यांना रू.२००/- व शासन वेळोवेळी ठरविल त्या मुद्रांक शुलकाच्या स्टॅम्प पेपरवर करारपत्र करणे आवश्यक राहील.

१३. जलाशय/ तलावठेका अनामत रक्कम ही निर्धारीत केलेल्या जलाशय/ तलाव ठेका रक्कमेच्या अथवा निविदेद्वारे निश्चित केलेल्या ठेका रकमेच्या ५०% किंवा कमीत कमी पंधरा हजार यापैकी जी अधिक असेल ती राहील. सुरक्षा अनामत रकमेचा भरणा रोख दर्शनी हुंडी अथवा बॅक गॅरंटीद्वारे अदा करता येईल.

१४. संबंधित प्रादेशिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय तसेच सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांचेकडे मच्छिमार संस्था/मच्छिमार संघ/खाजगी उद्योजक यांनी केलेल्या करारपत्रातील अटी शर्ती मच्छिमार संस्था/मच्छिमार संघ/खाजगी उद्योजक यांना बंधनकारक राहील.

१५. मच्छिमार संस्था/मच्छिमार संघ/खाजगी उद्योजक यांनी तलावावर नोंदणी केलेल्या सहकारी संस्था व त्या परिसरात राहत असलेल्या मच्छिमारांना तलावात मासेमारी करण्याकरिता प्राधान्य देण्यात यावे. याबाबत प्रश्न उदभवल्यास त्याचे निराकरण संबंधित प्रादेशिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय यांनी करावे. आयुक्त मत्स्यव्यवसाय यांच्या पूर्व परवानगी शिवाय बाहेरचे (विशेषत: अन्य राज्यातील) मच्छिमार आणु नयेत. मात्र अपवादात्मक परिस्थितीत परप्रांतीय मच्छिमार आणणेस आयुक्त मत्स्यव्यवसाय यांची पूर्व परवानगी आवश्यक राहील.

१६. जलाशय प्रकरणी ठेका प्रक्रीया पार पाडण्यास संस्था/निविदाधारक यांनी काही अडथळा निर्माण केल्यास अथवा निविदेच्या/तसेच तलाव ठेका करारपत्राच्या अटी शर्तीचे भंग केल्यास सदर संस्था/खाजगी ठेकेधारक यांना पुढील सहा वर्षाकरिता काळया यादीत टाकण्यात येईल.

१७. मच्छिमार संस्थेने/ ठेकेदाराने त्यांचेकडील तलाव/जलाशय अन्य कोणासही उपठेक्याने दिला तर सदर तलावाचा/जलाशयाचा ठेका मुदतीपुर्व रद्द करण्यात येईल व त्यांना पुढील सहा वर्षाकरिता काळया यादीत टाकण्यात येईल.

| | |
|---|---|
| ७. सचिव (जलसंपदा) | सदस्य |
| ८. सचिव (पदुम) | सदस्य |
| ९. आयुक्त मत्स्यव्यवसाय | सदस्य सचिव |

२०.२. जिल्हास्तरीय तलाव ठेका समिती (२०० हेक्टर पेक्षा कमी जलक्षेत्रासाठी)

| | |
|---|---|
| १. सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय | अध्यक्ष |
| २. सहाय्यक मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी | सदस्य |
| ३. अध्यक्ष, संबंधित जिल्हा मत्स्य.सह.संघ | सदस्य |
| ४. सहा.निबंधक (दुग्ध) (संबंधित जिल्हयाचे) | सदस्य |
| ५. मत्स्यव्यवसाय विकासअधिकारी | सदस्य सचिव |

सदर समिती २०० हेक्टर पर्यत सरासरी जलक्षेत्राचे तलाव संस्थांना कार्यक्षेत्रानुसार व जाहीर निविदेद्वारे द्यावयाचे ठेके निश्चित करील.

२०.३.प्रादेशिक स्तरीय तलाव ठेका समिती (२००.०१ हेक्टर ते१००० हेक्टर जलक्षेत्रासाठी)

| | |
|---|---|
| १. संबंधित प्रादेशिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय | अध्यक्ष |
| २. सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय (संबंधित जिल्हयाचे) | सदस्य |
| ३. मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी (प्रा.कार्या) | सदस्य |
| ४. सहा.निबंधक (दुग्ध) (संबंधित जिल्हयाचे) | सदस्य |
| ५. मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी (संबधित जिल्हयाचे) | सदस्य सचिव |

सदर समिती २०० हेक्टर पेक्षा जास्त व १००० हेक्टरपर्यंत जलक्षेत्राचे जलाशय संस्थांना कार्यक्षेत्रानुसार व जाहीर निविदेद्वारे द्यावयाचे ठेके निश्चित करील.

२०.४. आयुक्तालय स्तरावरील तलाव ठेका समिती (१०००.०१ हेक्टर वरील सर्व)

| | |
|---|---|
| १.आयुक्त मत्स्यव्यवसाय, मुंबई | अध्यक्ष |
| २.उपसचिव (मत्स्यव्यवसाय), (पदुम) मुंबई | सदस्य |
| ३.उपसचिव (जलसंपदा) मुंबई | सदस्य |
| ४.उपसचिव (वित्त) मुंबई | सदस्य |
| ५. सहआयुक्त मत्स्यव्यवसाय (भुजल), मुंबई | सदस्य |
| ६.संबंधित प्रादेशिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय | सदस्य |
| ७.उपनिबंधक (मत्स्य) सहकारी संस्था,मुंबई | सदस्य |
| ८.सहाय्यक संचालक (लेखा व वित्त) आयुक्त मत्स्यव्यवसायकार्यालय,मुंबई | सदस्य |

९.सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय (भुजल) सदस्य सचिव
आयुक्तमत्स्यव्यवसाय कार्यालय, मुंबई

सदर समिती १००० हेक्टरवरील जलाशयासाठी ठेका निश्चितीबाबत कार्यवाही करील.

२०.५ सर्व तलाव ठेका समित्यांनी तलाव ठेका देण्याची कार्यवाही १ जुनै पूर्वी पूर्ण होईल याची दक्षता घ्यावी.

२०.६ जलाशय/तलाव ठेका करारनामा करण्यापुर्वी संबंधित मच्छिमार संस्था/मच्छिमार संघ/खाजगी उद्योजक यांनी स्थानिक मच्छिमारांना/ सभासदांना रोजगार मिळेल याची खात्री करणे याची जबाबदारी संबंधित जिल्हयाचे सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांची राहील.

२०.७. मत्स्यबोटुकली/ कोळंबी बीज संचयनासाठी जलाशय/तलावांमध्ये योग्य प्रकारे संचयन करण्यात येत असल्याची खात्री करण्याची जबाबदारी संबंधित सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांची राहील.

२०.८. मासेमारी ठेका कालावधीत हा १ जूलै ते ३० जून असा गणण्यात यावा व त्यास मत्स्यव्यवसाय वर्ष असे यापुढे संबोधण्यात यावे.

२०.९. पुढील ठेका वर्षातील ठेका रक्कम भरण्यासाठी ३० एप्रिल हा अंतिम दिनांक राहील. या अंतिम दिनांकापर्यंत पुढील वर्षाची ठेका रक्कम न भरल्यास संबंधित सक्षम तलाव ठेका समिती ठेका रद्द करण्याची कार्यवाही करेल.

२१. **निविदा प्रक्रीयामध्ये अनुज्ञेय प्राधान्य व सवलती खालीलप्रमाणे राहतील.**

जलाशयाच्या निविदे प्रक्रियेत स्थानिक मच्छिमार संस्था, प्रकल्पग्रस्त पारंपारिक मच्छिमार व इतर मच्छिमार संस्था तसेच मत्स्यविज्ञान पदवीधारक यांना खालीलप्रमाणे प्राधान्यक्रम व सवलत राहील. निविदा प्रक्रीयेत जी उच्चतम निविदा रक्कम येईल त्यामध्ये खालीलप्रमाणे प्राधान्य व सवलत राहील.

२१.१. पारंपारिक स्थानिक मच्छिमार संस्था/मच्छिमार संघ/ प्रकल्पग्रस्तांची संस्था/स्थानिक अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती यांची मच्छिमार संस्था यांनी खुल्या निविदेप्रक्रियेमध्ये भाग घेतल्यास निविदेप्रक्रियेमध्ये जर खाजगी उद्योगाची निविदा रक्कम उच्चतम ठरल्यास वर नमूद संस्था अशा उच्चतम निविदा रक्कमेच्या ३०% सवलत राहील व त्यांना निविदा प्रक्रीयामध्ये प्रथम प्राधान्य राहील.

२१.२. वैयक्तिक स्थानिक मच्छिमार /स्थानिक प्रकल्पग्रस्त / स्थानिक मत्स्यविज्ञान पदवीधर यांनी खुल्या निविदा प्रक्रीयेमध्ये भाग घेतल्यास निविदा प्रक्रीयेमध्ये जी उच्चतम निविदेची ठेका रक्कम

येईल, त्या ठेका रक्कमेच्या २०% सवलत राहील त्यांना निविदा प्रक्रीयेमध्ये द्वितीय प्राधान्य राहील.

२१.३. स्थानिक व्यतिरीक्त राज्यातील इतर भुजलाशयीन मच्छिमार सहकारी संस्था यांनी खुल्या निविदा प्रक्रीयेमध्ये भाग घेतल्यास निविदा प्रक्रीयेमध्ये जी उच्चतम निविदेची ठेका रक्कम येईल, त्या ठेका रक्कमेच्या १०% सवलत राहील व त्यांना निविदा प्रक्रियेमध्ये तृतीय प्राधान्य राहील.

**२२. जलाशय/तलाव ठेक्यामध्ये अनुज्ञेय असलेल्या सवलती.**

संस्थाकडे असलेल्या एकूणच भुजलाशयीन जलाशय विकासाबरोबरच मत्स्योत्पादन वाढीसाठी प्रोत्साहानात्मक धोरण अंगिकरणे आवश्यक आहे.

२२.१. २०० हेक्टर वरील जलक्षेत्र असलेला जलाशय ठेक्याने घेतलेल्या जलाशयाच्या अपेक्षित मत्स्य उत्पादनापेक्षा एका वर्षात २५% जास्त वाढ झाली तर पुढील वर्षाच्या ठेका रक्कमेत ५ % सुट देण्यात येईल. अशी सवलत ५ वर्षाच्या कालावधीत फक्त एकाच वर्षासाठी देय राहील. सदर सवलत खाजगी ठेकेदारासही लागु राहील. अशाप्रकारचे सवलत देण्याकरिता संबंधित तलाव ठेका समिती आवश्यक कागदपत्रांसह प्रस्तावांची छाननी करून प्रस्तावास मंजुरी देईल.

**२२.२ अ. क्र २२.१ नुसार सवलत घेण्यासाठी खालील अटी बंधनकारक राहतील.**

अ) मत्स्यव्यवसाय सहकारी मच्छिमार संस्था /मच्छिमार संघ/खाजगी उद्योजक यांनी इष्टतम मत्स्यबोटुकलीचे संचयन हे करणे बंधनकारक राहील.

ब) सदर इष्टतम मत्स्यबोटुकलीचे संचयन हे मानकानुसार संबंधित जिल्हयाचे सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय अथवा त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष करावे. सदर संचयनाचा पंचनामा करणे बंधनकारक राहील.

क) मत्स्यव्यवसाय सहकारी मच्छिमार संस्था /मच्छिमार संघ/ खाजगी उद्योजक यांनी तलावात दररोज होणाऱ्या मासेमारीची नोंद नोंदवहीत ठेवणे बंधनकारक राहील.

ड) सदर नोंदी करून दर महिन्याला पाच तारखेच्या आत मत्स्योत्पादनाचा मासिक अहवाल संबंधित सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांना सादर करणे बंधनकारक राहील.

ई) सदर सवलत मच्छिमार संस्था /मच्छिमार संघ/खाजगी उद्योजक यांना देतांना तलावातील संचयन,मत्स्योत्पादन इ. नोंदी मच्छिमार संस्था /मच्छिमार संघ/खाजगी उद्योजक यांच्या अभिलेखी/ आर्थिक व्यवहारात निर्देशित असणे बंधनकारक आहे.

फ) मत्स्यव्यवसाय विभागामार्फत सर्व तलाव क्षेत्रातील मत्स्यव्यवसाय सहकारी मच्छिमार संस्था /मच्छिमार संघ/खाजगी उद्योजक यांना त्यांनी ठेक्याने घेतलेल्या तलाव/जलाशयामध्ये केलेले इष्टतम मत्स्यबोटुकली संचयन व मत्स्योत्पादनाबाबतची

माहिती मत्स्यव्यवसाय विभागामार्फत स्थानिक सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांच्या कार्यालयास उपलब्ध करून दिलेल्या संगणक संकेतस्थळावरील किंवा लघुसंदेशाद्वारे माहिती देणे आवश्यक राहील.

**२३. ठेका कालावधीमध्ये मुदतवाढ देण्यासाठी संस्था /संघ/खाजगी उद्योजक यांना अनुज्ञेय असलेल्या सवलती-**

२३.१. शासन निर्णयानुसार मत्स्यव्यवसाय सहकारी मच्छिमार संस्था/मच्छिमार संघ/खाजगी उद्योजक यांना ठेका मिळाल्यापासून मासेमारी करण्यासाठी पाच वर्षाचा कालावधी मिळणे आवश्यक आहे. परंतु प्रथम वर्षीचा ठेका मिळण्यास तीन महिने किंवा त्यापेक्षा जास्त उशिर झाल्यास किंवा अपवादात्मक परिस्थितीत शासनाची किंवा न्यायालयीन स्थगिती तलावाची दुरुस्ती इत्यादी यामुळे तीन महिने किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीसाठी मासेमारी बंद राहील्यामुळे ठेका कालावधी पाच वर्षपेक्षा कमी होत असल्यास तेवढा कालावधी वाढवुन देण्यात यावा व पाच वर्षाचाकालावधी,ज्या तारखेस पुर्ण होईल, त्या तारखेपासुन दिनांक ३० जुनपर्यंतच्या उर्वरित कालावधीसाठी त्या प्रमाणात वार्षिक ठेका रक्कम आकारुन मच्छिमार संस्था /मच्छिमार संघ/खाजगी उद्योजक यांना मासेमारी करण्यास परवानगी देण्यात येईल.

२३.२. प्रथम वर्षीचा ठेका मिळाण्यास उशीर होऊन तीन महिने किंवा त्यापेक्षा कमी कालावधी वाया गेल्यास, तेवढया कालावधीची रक्कम पाचव्या वर्षीच्या ठेका रकमेतुन कमी करण्यात यावी व पाच वर्षाचा कालावधी पुर्ण होऊन, त्या तारखेस ठेका संपुष्टात येईल.

२३.३. महसुल व वन विभागाच्या नैसर्गिक आपत्ती संदर्भात असलेला शासन निर्णय क्र. सीएलएस-५९७६/३००३००-म ३, दि.१९/०४/१९७६ नुसार अतिवृष्टी अथवा अवर्षण प्रकरणी एक वर्षाची विना मुल्य ठेका मुदतवाढ/ठेका माफी देण्याची तरतुद आहे यापुढे ज्या वर्षी अवर्षण/अतिवृष्टी झाली आहे त्याचे पुढील वर्षी अवर्षण / अतिवृष्टीची सुट देण्यात यावी व मागील वर्षीची ठेका रक्कम त्या वर्षासाठी ग्राहय धरण्यात यावी. अशा प्रकारची ठेका कालावधीत सुट ही एकादाच अनुज्ञेय राहील तसेच ठेका मुदत ही सहा वर्षे राहील. सहा वर्षापैकी पाच वर्षे ठेका रक्कम भरणे जलाशय ठेक्याने घेणाऱ्यास बंधनकारक राहील.

२३.४. अतिवृष्टी/अवर्षन प्रकरणी एका वर्षाची रक्कम संबधितांना माफ करावी लागते. त्यामुळे सदर प्रकरणी विमा काढल्यास शासनाचे महसुलाचे नुकसान होणार नाही. त्यामुळे ठेका रक्कमेच्या मर्यादेत विमा काढण्याच्या दृष्टीने स्वतंत्रपणे आदेश पारित करण्यात येतील.

२३.५. काही अपरिहार्य कारणाने अथवा प्रशासकीय कारणाने ठेका देण्यास विलंब होत असल्यास यासाठी प्रचलीत पध्दतीनुसार तात्पुरते मासेमारी परवाने देऊन अशा तलावात मत्स्योत्पादन घेण्यात यावे.

२४. जलाशय/तलाव यांच्या ठेका रक्कमेव्दारे प्राप्त होणाऱ्या महसुलामध्ये खालीलप्रमाणे विभागांतर्गत विभागणी करण्यात यावी.

२४.१. जलसंपदा विभागाने ५०%, मत्स्यव्यवसाय विभाग ३०%, अशी विभागणी करुन महसुल एकत्रित निधीमध्ये त्या-त्या विभागाच्या जमा लेखा शिर्षाखली जमा करण्यात यावा व उर्वरित २०% निधी हा मत्स्यव्यवसाय विभागाकडे असलेल्या जलाशय / तलावाच्या विकासासाठी निधी वापरण्यात येईल.

२४.२. जलाशय/तलाव ठेका रक्कमेतुन एकुण प्राप्त होणाऱ्या महसुलामधुन मत्स्यव्यवसाय विभागाकडे राखीव ठेवण्यात - येणाऱ्या २०% निधीमधुन जलाशयाच्या ठिकाणी मुलभुत सुविधा जसे, जलाशय पोहोच रस्ता तयार करणे पकडलेली मासळी उतरविण्यासाठी पकटी बांधणे,शासकीय मत्स्यबीज केंद्राची दुरुस्ती करणे, मत्स्यबीज उत्पादन, तलावातील मासेमारीचे सर्वेक्षण,सांख्यिकी माहिती गोळा करणे,तलाव ठेक्याने गेला नसल्यास चोरीने होणाऱ्या मासेमारीस प्रतिबंध करणे यासाठी कंत्राटी पध्दतीने कर्मचाऱ्यांची नेमणुक करणे इ. बाबींसाठी मत्स्यव्यवसाय विभागांमार्फत खर्च करण्यात येईल.याप्रमाणे प्राप्त होणारा २०% निधी हा संबंधित सहाय्यक आयुक्त यांच्या नावे असलेल्या राष्ट्रीयकृत बँकेच्या खात्यामध्ये जमा करण्यात येईल. असा जमा होणारा निधी शासनाने विहित केलेल्या पध्दतीनुसार खर्च करण्याकरीता आयुक्त मत्स्यव्यवसाय,महाराष्ट्र राज्य या संबंधी स्वतंत्र निकष निश्चित करतील. जलाशय/तलाव विकासासाठी राखीव ठेवण्यात येणाऱ्या निधीची आकडेवारी शासनास आयुक्त मत्स्यव्यवसाय वेळोवेळी सादर करतील. सदर निधीमधून केलेल्या कामांचा तपशिल हा शासनास सादर करतील.

२५. तलाव / जलाशय ठेक्याच्या अनुषंगाने उद्भणाऱ्या वादा संदर्भात दाद मागण्यासाठी संबंधीतास खालील प्रमाणे सक्षम प्राधिकाऱ्याकडे अपील तसेच पुर्नरिक्षण दाखल करण्याची संधी उपलब्ध राहील. मात्र अपील / पुर्नरिक्षण अर्जावर एकदा घेतलेला निर्णय अंतिम राहील.

अ) १००० हेक्टर पर्यंत चे तलाव / जलाशय संदर्भात आयुक्त मत्स्यव्यवसाय हे अपीलीय प्राधिकारी राहतील व सचिव (पदुम) हे पुर्नविलोकन प्राधिकारी राहतील

ब) १००० हेक्टर वरील जलाशय संदर्भात सचिव (पदुम) हे अपीलीय प्राधिकारी राहतील व मा. मंत्री मत्स्यव्यवसाय हे पुर्नविलोकन प्राधिकारी राहतील.

हे आदेश जलसंपदा विभागाच्या सहमतीने व वित्त विभागाचे अनौपचारीक संदर्भ क्र. ३४८/१३/व्यय-२, दि.२३/०७/२०१३ रोजी दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०६३०१७१२३११८०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Shahabuddin Parvez A

Digitally signed by Shahabuddin Parvez A
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=AGRI and ADF, postalCode=400032, st=Maharashtr cn=Shahabuddin Parvez A
Date: 2014.06.30 17:12:31 +05'30'

(प.श.अहमद)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव

२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव

३. मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव

४. सर्व. मा. मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव

५. मा. मुख्यसचिव , महाराष्ट्र राज्य

६. अप्पर मुख्य सचिव (महसूल) मंत्रालय मुंबई ३२

७. प्रधान सचिव (वित्त) मंत्रालय मुंबई ३२

८. प्रधान सचिव (वने) मंत्रालय मुंबई ३२

९. प्रधान सचिव (ग्रामविकास) मंत्रालय मुंबई ३२

१०.सचिव (सहकार) मंत्रालय मुंबई ३२

११.प्रधान सचिव (आदिवासी विकास ) मंत्रालय मुंबई ३२

१२.प्रधान सचिव (सामाजिक न्याय) मंत्रालय मुंबई ३२

१३.सचिव (जलसंपदा ) मंत्रालय मुंबई ३२

१४.सचिव (लक्षेवि) मंत्रालय मुंबई ३२

१५.आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य मुंबई.

१६. आयुक्त सहकार पुणे.

१७.सर्व विभागीय आयुक्त.

१८. सर्व जिल्हाधिकारी

१९. सर्व मुख्य कार्याकारी अधिकारी, जिल्हा परिषद

२०.व्यवस्थापकीय संचालक, महारष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळ, मुंबई

२१. सर्व आयुक्त, महानगरपालीका.

२२. कार्यकारी संचालक महाराष्ट्र कृष्णाखोरे विकास महामंडळ सिंचन भवन पुणे

२३.कार्यकारी संचालक, महाराष्ट्र गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद

२४. कार्यकारी संचालक महाराष्ट्र विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर.

२५. कार्यकारी संचालक माहाराष्ट्र तापी पाटबंधारे विकास महामंडळ जळगांव

२६. कार्यकारी संचालक, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ ठाणे.

२७.सर्व उपायुक्त, मत्स्यव्यवसाय

२८. सर्व विभगीय सहआयुक्त निबंधक सहकारी संस्था

२९. उपनिबधक सहाकारी संस्था (मत्स्य) आयुक्त मत्स्यव्यवसाय यांचे कार्यालय मुंबई.

३०.सर्व जिल्हा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (दुग्ध)

३१. सर्व जिल्हामत्स्यव्यवसाय विकास अधिकारी.

३२. महालेखापाल (लेखापरिक्षक/ लेखा अनुज्ञेयता) मुंबई/ नागपूर ह्

३३. वित्त विभाग (व्यय २) मंत्रालय मुंबई ३२

३४. सर्व कृषि व पदुम विभागातील कार्यासने / निवड नस्ती.

**परिशिष्ट क्र. २.१**

मत्स्य व्यवसायाकरीता जलाशय/तलाव ठेक्याने देण्यासाठी सुधारीत धोरण.........

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांकः मत्स्यवि २०१६/प्र.क्र.१७१/पदुम १३
मंत्रालय, मुंबई ४०००३२
दिनांक : ३० जून, २०१७

**वाचा:-** १)शासन निर्णय क्रमांक : कृषि व पदुम विभाग क्र .मत्स्यवि २०१४/प्र.क्र.९/पदुम १३, दि.२६ जून,२०१४

२) शासन पत्र क्र.मत्स्यवि-१२१४/प्र.क्र.१०१/पदुम १३, दिनांक १६ मे, २०१६

३) शासन परिपत्रक क्र.मत्स्यवि-२०१४/प्र.क्र.९/भाग १/पदुम १३,दिनांक १७ मे, २०१६.

**प्रस्तावना -**

प्रथिनेयुक्त खादयपदार्थात मासे हा अतिशय महत्वाचा घटक आहे त्यादृष्टीने राज्यातील मत्स्यउत्पादन वाढीस लागून प्रथिने उपलब्धतेत वाढ व्हावी यासाठी मत्स्यव्यवसाय विभाग सतत प्रयत्नशील आहे. राज्यामध्ये उपलब्ध असलेला जलसाठा व भूजलाशयीन क्षेत्रामध्ये मासेमारीसाठी मोठया प्रमाणावर असलेला वाव लक्षात घेऊन सहकारी संस्थां व खाजगी उदयोगांच्या सहकार्याने पारंपारिक मच्छिमारांच्या हितासाठी ग्रामीण रोजगार निर्मितीतून वाढीव मत्स्योत्पादन घेण्यासाठी संदर्भाधिन शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. सदर शासन निर्णयातील काही मुद्दयांना अनुलक्षून काही लोकप्रतिनिधी / मच्छिमार संघटना यांनी सदर धोरणामध्ये सुधारणा करण्याबाबत विविध स्तरावर निवेदने दिली. सदर प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने दिनांक २६.६.२०१४ च्या शासन निर्णयास शासन पत्र क्र. मत्स्यवि १२१४/ प्र.क्र. १०१/ पदुम १३, दि. १६.०५.२०१६ अन्वये स्थगिती देण्यात आली. तसेच रिट याचिका क्रमांक ५२२८/२०१५ प्रकरणी मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर यांनी स्वयंस्पष्ट पारदर्शक धोरण निश्चित करण्याचे निर्देश दिले होते, शासनाकडे प्राप्त झालेली निवेदने या अनुषंगाने तलाव ठेका धोरणात सुधारणा करण्यासाठी शासनाने दिनांक १७.०५.२०१६ च्या आदेशान्वये डॉ. चंद्रप्रकाश मुख्यशास्त्रज्ञ केंद्रीय मत्स्यकी शिक्षण संस्था मुंबई यांचे अध्यक्षतेखाली, समिती नेमली होती. सदर समितीने दिनांक २१ डिसेंबर २०१६ रोजी आपला अहवाल शासनास सादर केला असून, सदर समितीने शासनास एकूण १९ शिफारसी केल्या आहेत. चंद्रप्रकाश समितीच्या शिफारसी तसेच लोकप्रतिनीधी / मच्छिमार संघटना यांची मागणी व रिट याचिका क्र.५२२८/२०१५ मधील निर्देश तसेच मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल रिट याचिका क्र. १२५१८/२०१६ प्रकरणी दि. ३०.०६.२०१७ पर्यंत धोरण निश्चित करण्याबाबत दिलेले निर्देश विचारात घेऊन संदर्भाधिन तसेच तलाव ठेक्याशी संबंधित सर्व शासन निर्णय अधिक्रमित करुन तसेच संदर्भ क्रमांक २ अन्वये दिलेली स्थगिती उठविण्यात येऊन राज्यात नविन तलाव ठेका धोरण लागू करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय : -**

शासन या निर्णयाव्दारे पूर्वीचे तलाव ठेका विषयक शासन निर्णय अधिक्रमित करुन खालीलप्रमाणे सुधारित तलाव ठेका धोरण निश्चित करण्यास मान्यता देत आहे. तसेच संदर्भ क्रमांक २ अन्वये दिलेली स्थगिती उठविण्यात येत आहे. मत्स्यव्यवसाय विभागातंर्गत येणाऱ्या जलाशयाचे त्यांच्या जलक्षेत्रानुसार म्हणजे २०० हेक्टर पर्यंत, २००.०१ ते १००० हेक्टरपर्यंत व १०००.०१ [illegible] प्रमाणे तीन गट करण्यात आले आहेत. या जलक्षेत्रानुसार जलसंपदा विभागाने

निर्मित केलेल्या व मत्स्यव्यवसाय विभागाकडे मासेमारी हक्क हस्तांतरीत केलेल्या जलाशयामध्ये खालीलप्रमाणे जलाशय/तलावात मासेमारी करण्याकरिता ठेका देण्याबाबत या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय हा आदिवासी क्षेत्रातील अनुसूचित केलेल्या गावांमधील ग्रामपंचायती अंतर्गत येणाऱ्या १०० हेक्टर खालील जलाशय/गांव तलावांमध्ये मासेमारी करण्यासाठी लागू होणार नाही.

३. यापुढे तलाव ठेकेदार म्हणजे तलाव ठेक्याने घेणारी मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था/मत्स्यव्यवसाय सहकारी संघ/मच्छिमार /मत्स्यसंवर्धक/ खाजगी उद्योजक असे समजण्यात यावे.

४. मासेमारी ठेका कालावधी हा १ जुलै ते ३० जून असा गणण्यात यावा व त्यास मत्स्यव्यवसाय वर्ष असे यापुढे संबोधण्यात यावे.

५. तलावाचा/जलाशयाचा ठेका कालावधी हा ५ वर्ष इतका राहील.

६. मासेमारीचे कार्यक्षेत्र हे संबंधित संस्था ज्या तलावावर/जलाशयावर नोंदणी झालेली आहे त्या तलाव/जलाशयापुरते मर्यादित राहिल.

७. ठेका घेण्यापूर्वी संबंधित ठेकेदाराने आपले अद्ययावत लेखा परिक्षण अहवाल (उदाहरणार्थ:- जून २०१७ पर्यंत ठेके निश्चित करताना सन २०१६-१७ चा लेखापरिक्षण अहवाल प्राप्त झाला नसल्यास लगतच्या वर्षाचा म्हणजे सन २०१५-१६ चा लेखापरिक्षण अहवाल) तलाव ठेका समितीस सादर करणे बंधनकारक राहिल. या सर्वाची पडताळणी करुनच तलाव ठेका समितीने पुढील कार्यवाही करणे बंधनकारक राहील.

८. मच्छिमार संस्था/मच्छिमार संघ/खाजगी उद्योजक यांनी प्रतिवर्षी लेखापरिक्षण करुन संबंधित जिल्हयाचे सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांना दरवर्षी ३० जूनपर्यंत लेखापरिक्षण अहवाल सादर करणे बंधनकारक राहील.

९. जलाशय/तलाव ठेका करारनामा करताना संबंधित मच्छिमार संस्था/मच्छिमार संघ/खाजगी उद्योजक यांनी स्थानिक मच्छिमारांना/सभासदांना रोजगार मिळेल अशी अट नमूद आहे याची खात्री करण्याची जबाबदारी संबंधित जिल्हयाचे सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांची राहिल.

१०. संबंधित ठेकेदाराने मासेमारीबाबत दैनंदिन तपशिल ठेवणे बंधनकारक राहील तसेच मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था/मत्स्यव्यवसाय सहकारी संघ यांनी सभासदांमार्फत केलेल्या मासेमारीबाबत आवश्यक ते सर्व अभिलेख ठेवणे बंधनकारक राहील.

११. जलाशय/तलाव ठेका धोरणातील तरतुदी या महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळाकडे हस्तांतरीत केलेल्या जलाशयासाठी सुध्दा लागु राहतील. तथापि, सदर महामंडळ हे स्वायत्त संस्था असल्याने जलाशय / तलाव यांच्या विकासासाठी आकारण्यात येणारी फक्त ठेका रक्कम त्याच्या धोरणानुसार राबविण्यासाठी मुभा देण्यात येत आहे. महामंडळास खाजगी, सार्वजनिक सहभागातून प्रकल्प राबवयाचा झाल्यास अशा प्रकल्पांना शासनाची पुर्व परवानगी घेणे बंधनकारक राहील.

१२. जलक्षेत्रनिहाय तलाव/जलाशय मासेमारी करण्याकरिता ठेक्याने देणे.

जलक्षेत्राची खालीलप्रमाणे तीन गटात विभागणी करण्यात येत आहे. त्या गटानुसारच तलाव/जलाशय ठेक्याने देण्यात येतील.

(अ) २०० हेक्टर पर्यंत

(ब) २००.०१ हेक्टर ते १००० हेक्टर

(क) १०००.०१ हेक्टर वरील

| अ. क्र. | बाब | जलक्षेत्र २०० हेक्टर पर्यंतचे तलाव | जलक्षेत्र २००.०१ हेक्टर ते १००० हेक्टर पर्यंतचे जलाशय | जलक्षेत्र १०००.०१ हेक्टर वरील जलाशय |
|---|---|---|---|---|
| १ | संस्था नोंदणी मर्यादा | प्रथम १०० हेक्टर जलक्षेत्रापर्यंत १ संस्था २०० हेक्टरपर्यंत जास्तीत जास्त २ संस्था नोंदणी करता येतील.<br>यापुर्वी २ पेक्षा जास्त संस्था नोंदणी झाल्या असल्यास त्यांचे अस्तित्व ग्राहय धरले जाईल. | २०० हेक्टर पर्यंत २ व तदनंतर उर्वरित जलक्षेत्राकरिता प्रत्येकी ४०० हेक्टर जलक्षेत्राकरीता १ असे एकक निश्चित करुन जास्तीत जास्त ४ प्राथमिक मच्छिमार संस्था नोंदणी करता येतील.<br>यापुर्वी ४ पेक्षा जास्त मच्छिमार सहकारी संस्था नोंदणी झालेल्या असल्यास अशा सर्व संस्थांचे अस्तित्व ग्राहय धरण्यात येईल. | प्रथम १०० हेक्टर जलक्षेत्रापर्यंत १ संस्था व २०० हेक्टर पर्यंत २ व तदनंतर प्रत्येक ४०० हेक्टर जलक्षेत्राकरीता १ असे एकक निश्चित करुन १००० हेक्टरपर्यंत जास्तीत जास्त ४ प्राथमिक मच्छिमार संस्था नोंदता येतील व अशाप्रमाणे ४ संस्था स्थापनेनंतर पुढील सर्व १०००.०१ वरील जलाशयां करीता १००० हेक्टर एकक धरुन पुढील प्राथमिक मच्छिमार संस्था नोंदणी करता येतील.<br>सदर एककानुसार निर्माण होणाऱ्या संस्थेच्या संख्येपेक्षा जास्त संस्था यापुर्वी नोंदणी झालेल्या असल्यास अशा सर्व संस्थांचे अस्तित्व ग्राहय धरण्यात येईल.<br>२००० हेक्टर वरील जलाशया करिता एक भूजलाशयीन संघ स्थापन करता येईल.<br>या प्रकारे नोंदणी झालेला मच्छिमार सहकारी संघ हा सर्व सभासद मच्छिमार सहकारी संस्थामध्ये समन्वय विषयक कार्य करेल. नोंदणी झालेल्या संघाला मासळी सुरक्षण, वाहतूक व पणन तसेच इतर अनुषंगीक बाबींचे कार्य करणे आवश्यक राहील. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | तलाव ठेका देण्याची कार्यपध्दती | (अ) तलावावर केवळ एक संस्था नोंदणी झालेली असल्यास सदर संस्थेस पात्रतेच्या निकषानुसार न्युनतम ठेका रक्कमेने सदर तलावाचा ठेका देण्यात येईल.<br>(ब) मात्र एकापेक्षा अधिक संस्था नोंदणी झाल्या असल्यास त्या संस्थांमध्ये न्यूनतम ठेकापेक्षा अधिकतम बोली रक्कम बोलणा-या मच्छिमार सहकारी संस्थेस लिलाव पध्दतीने (जाहिर बोलीव्दारे) मासेमारी ठेका देण्यात येईल.<br>(क) २०० हेक्टर पर्यंतच्या तलावावर नोंदणी झालेल्या संस्थांनी तलावाचा ठेका न घेतल्यास सदर तलाव जाहिर लिलावाव्दारे संबंधित जिल्हयातील नोंदणीकृत संस्थाना मासेमारीसाठी ठेक्याने देण्यात येईल.<br>ड. सदर तलाव जिल्हयातील कोणत्याही संस्थेने जाहिर लिलावाद्वारे ठेक्याने न घेतल्यास सदर तलाव ठेका जाहिर निविदेने ठेक्याने देण्यात येईल. | (अ) जलाशयावर केवळ एक संस्था नोंदणी झालेली असल्यास सदर जलाशय जाहिर लिलावाव्दारे संबंधित जिल्हयातील नोंदणीकृत संस्थाना मासेमारीसाठी ठेक्याने देण्यात येईल.<br>(ब) मात्र एकापेक्षा अधिक संस्था नोंदणी झाल्या असल्यास त्या संस्थांमध्ये न्यूनतम ठेकापेक्षा अधिकतम बोली रक्कम बोलणा-या मच्छिमार सहकारी संस्थेस लिलाव पध्दतीने (जाहिर बोलीव्दारे) मासेमारी ठेका देण्यात येईल.<br>(क) जलाशयावर नोंदणी झालेल्या संस्थांनी तलावाचा ठेका न घेतल्यास सदर जलाशय जाहिर लिलावाव्दारे संबंधित जिल्हयातील नोंदणीकृत संस्थाना मासेमारीसाठी ठेक्याने देण्यात येईल.<br>ड. सदर जलाशय जिल्हयातील कोणत्याही संस्थेने जाहिर लिलावाद्वारे ठेक्याने न घेतल्यास सदर जलाशय ठेका जाहिर निविदेने ठेक्याने देण्यात येईल. | जलाशयांमध्ये अ मत्स्योत्पादनासाठी प्रमाणात आर्थिक गुंतवणू मुलभूत सोईसुविधांची नि करणे आवश्यक आहे. १०००.०१ हेक्टरवरील जलाशय शासनाने वे विहित केलेल्या ई-निवि कार्यपध्दतीनुसार मच्छि सहकारी संस्था/मच्छिमार खाजगी व्यक्ती यांना ठे देण्यात येतील.<br>शास्त्रोक्त पध्दतीने मत्स्यो घेण्याकरिता १००० हेक्ट त्यावरील जलाशयामध्ये प्र राबविताना मत्स्यव्यवसाय (BFSc) अथवा पद पदवीधारक(MSc Fish /MFSc) तसेच प्राण पदवीधारक/पदव्युत्तर अर्हताधारकास सदर प्रक व्यवस्थापक म्हणून बंधनकारक राहील. |
| ३ | सक्षम कार्यान्वयन तलाव ठेका समिती | जिल्हास्तरीय तलाव ठेका समिती | प्रादेशिकस्तरीय तलाव ठेका समिती | आयुक्त स्तरीय तलाव समिती |

१३. जलाशय /तलाव ठेका निर्धारीत रक्कम प्रती वर्ष आकारण्याची पध्दत खालील नमुद केल्या प्रमाणे परिगणना करुन आकारण्यात येईल.

| अ. क्र. | तलावाचे सरासरी जलक्षेत्र (हेक्टर) | अपेक्षित इष्टतम बोटुकली साठवणुक | अपेक्षित मत्स्योत्पादन (कि.ग्रा.) | आकारवयाची तलावठेका रक्कम (प्रती वर्ष) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | ० ते २० | ५००० प्रति हेक्टर | १५०० प्रति हेक्टर | रु.१८०० प्रति हेक्टर |
| २ | २०.०१ ते ६० | १००००+२० हेक्टर पुढील प्रत्येक हेक्टरसाठी २००० | ३००००+२० हेक्टर पुढील प्रत्येक हेक्टरसाठी ६०० | ३६०००+२० हेक्टर पुढील प्रत्येक हेक्टरसाठी ३६० |
| ३ | ६०.०१ ते २०० | १८००००+६०हेक्टर पुढील प्रत्येक हेक्टरसाठी १००० | ५४०००+६०हेक्टर पुढील प्रत्येक हेक्टरसाठी ३०० | ५०४००+६०हेक्टर पुढील प्रत्येक हेक्टरसाठी १८० |
| ४ | २००.०१ ते १००० | ३२००००+२००हेक्टर पुढील प्रत्येक हेक्टरसाठी ५०० | ९६०००+२००हेक्टर पुढील प्रत्येक हेक्टरसाठी १५० | ७५६००+२००हेक्टर पुढील प्रत्येक हेक्टरसाठी ९० |
| ५ | १०००.०१ ते २००० | ७२००००+१०००हेक्टर पुढील प्रत्येक हेक्टरसाठी ५०० | २१६०००+१०००हेक्टर पुढील प्रत्येक हेक्टरसाठी ७५ | १४७६००+१०००हेक्टर पुढील प्रत्येक हेक्टरसाठी ४५ |
| ६ | २००० वरील | १२००००००+२०००हेक्टर पुढील प्रत्येक हेक्टरसाठी ५०० | २९१०००+२०००हेक्टर पुढील प्रत्येक हेक्टरसाठी ७५ | १९२६००+२०००हेक्टर पुढील प्रत्येक हेक्टरसाठी ४५ |

वरील तक्त्यात नमुद केलेली जलाशय/तलावाच्या ठेका रक्कमेची गणना करण्याकरिता अपेक्षित मत्स्योत्पादनाच्या आधारावर प्रतिकिलो मासळीचा दर सरासरी रु.६०/- ग्राहय धरुन पुढील सुत्रानुसार येणाऱ्या ठेका रक्कम आकारणी करण्यात येईल. सदर ठेका रक्कम आकारणी करण्याकरिता संबंधित जिल्हयाचे सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय हे सक्षम प्राधिकारी राहतील.

सूत्र -

तलाव ठेका रक्कम (रु).=तलावाचे क्षेत्र(हेक्टर)Xअपेक्षित मत्स्योत्पादन प्रति हेक्टर (किलो) X प्रतिकिलो मासळीचा बाजारभाव (रु.६०/-) X २/१००.

उपरोक्त ठेका रक्कम निश्चित करताना केवळ मत्स्योत्पादनाच्या अनुषंगाने न्यूनतम रक्कमेस तलाव ठेका देण्यात येईल. तथापि, ठेकेदाराने कोळंबी संवर्धन केल्यास त्यास वाढीव उत्पादन मिळत असल्याने ठेकेदारास कोळंबी संवर्धन करावयाचे असल्यास उपरोक्त तक्त्यानुसार येणाऱ्या ठेका रक्कमेत २० टक्के वाढीव रक्कम कोळंबीपोटी ठेका रक्कम म्हणून भरणा करावी लागेल.

## १४. तलाव ठेका समिती

समिती व समितीची कार्यकक्षा

### १४.१ राज्यस्तरीय समिती

| | | |
|---|---|---|
| १. अप्पर मुख्य सचिव (महसूल) | अध्यक्ष | तलाव/जलाशयाच्या निर्मितीनंतर मासेमारी ह मत्स्यव्यवसाय विभागाकडे हस्तांतरीत केल्यानंतरही ब वेळा स्थानिक प्रशासनामार्फत मासेमारी करण्यास प्रि करण्यात येतो. यापुढे असे प्रतिबंध होऊ नये यार राज्यस्तरीय समितीच्या पुर्वपरवानगी शिवाय अशी कार्य करता येणार नाही. |
| २. प्रधान सचिव (वित्त) | सदस्य | |
| ३. प्रधान सचिव (वने)सदस्य | सदस्य | |
| ४. प्रधान सचिव (ग्राम विकास) | सदस्य | |
| ५. प्रधान सचिव (आदिवासी विकास) | सदस्य | |
| ६. प्रधान सचिव (सामाजिक न्याय) | सदस्य | |
| ७. सचिव (जलसंपदा) | सदस्य | |
| ८. सचिव (पदुम) | सदस्य | |
| ९. आयुक्त मत्स्यव्यवसाय | सदस्य सचिव | |

### १४.२ आयुक्तस्तरीय तलाव ठेका समिती

| | | |
|---|---|---|
| १. आयुक्त मत्स्यव्यवसाय, मुंबई | अध्यक्ष | १) १००० हेक्टरवरील जलाशयं ई-निवदा प्रक्रिये ठेक्याने देणे.<br>२)१००० हेक्टरवरील जलाशयात अपवाद परिस्थितीत परप्रांतीय मच्छिमारांना मासेम प्रवानगी देणे व परप्रांतीय मच्छिमारांच्या सं निश्चिती करणे.<br>३) १००० हेक्टरवरील जलाशयाच्या मुदतवाढ त सवलतीबाबत निर्णय घेणे.<br>४) १००० हेक्टरवरील जलाशयाचे ठेके करणेबाबत निर्णय घेणे. तसेच, काळ्या यादी निर्णय घेणे.<br>मत्स्योद्योग विकास महामंडळास हस्तां करण्यात आलेले १००० हेक्टरवरील जलाशया ई-निविदेद्वारे देणेबाबतची कार्यवाही महामंडळ व |
| २. उपसचिव/सहसचिव (मत्स्यव्यवसाय), (पदुम) मुंबई | सदस्य | |
| ३.उपसचिव/सहसचिव (जलसंपदा) मुंबई | सदस्य | |
| ४. उपसचिव/सहसचिव (वित्त) मुंबई | सदस्य | |
| ५. क्षेत्रिय मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग. | सदस्य | |
| ६.संबंधित प्रादेशिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय | सदस्य | |
| ७. उपनिबंधक (मत्स्य) सहकारी संस्था, मुंबई | सदस्य | |
| ८. सहाय्यक संचालक (लेखा व वित्त) आयुक्त मत्स्यव्यवसाय कार्यालय, | सदस्य | |
| ९. सहआयुक्त मत्स्यव्यवसाय (भूजल), मुंबई | सदस्य | |
| १०. सहाय्यक आयुक्त, मत्स्य (भूजल), आयुक्त कार्यालय, मुंबई. | सदस्य सचिव | |

### १४.३ प्रादेशिक स्तरीय तलाव ठेका समिती

| | | |
|---|---|---|
| १. संबंधित प्रादेशिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय | अध्यक्ष | १) २००.०१ ते १००० हेक्टर पर्यंतचे जला कार्यक्षेत्रानुसार लिलाव पध्दतीने अथवा जा निवदा प्रक्रियेद्वारे ठेक्याने देणे.<br>२) २००.०१ ते १००० हेक्टरपर्यंतचे जलाश अपवादात्मक परिस्थितीत परप्रांतीय मच्छिमार |
| २. क्षेत्रिय अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग | सदस्य | |
| ३. सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय (संबंधित जिल्हयाचे) | सदस्य | |

| | | |
|---|---|---|
| ४. मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी (प्रादेशिक उपायुक्त मत्स्यव्यवसाय कार्यालय) | सदस्य | मासेमारीस परवानगी देणे व परप्रांतीय मच्छिमारांच्या संख्येची निश्चिती करणे.<br>३) २००.०१ ते १००० हेक्टरपर्यंतचे जलाशयाच्या मुदतवाढ तसेच सवलतीबाबत निर्णय घेणे.<br>४) २००.०१ ते १००० हेक्टरपर्यंतचे जलाशयाचे ठेके रद्द करणेबाबत निर्णय घेणे. तसेच, काळ्या यादीबाबत निर्णय घेणे. |
| ५. सहाय्यक निबंधक (दुग्ध) (संबंधित जिल्हयाचे) | सदस्य | |
| ६. मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी (संबंधित जिल्हयाचे) | सदस्य सचिव | |

**१४.४ जिल्हा स्तरीयतलाव ठेका समिती**

| | | |
|---|---|---|
| १. सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय (संबंधित जिल्हयाचे) | अध्यक्ष | १) २०० हेक्टरपर्यंतचे तलाव कार्यक्षेत्रानुसार अथवा लिलाव पध्दतीने अथवा जाहिर निवदा प्रक्रियेद्वारे ठेक्याने देणे.<br>२) २०० हेक्टरपर्यंतचे तलावात अपवादात्मक परिस्थितीत परप्रांतीय मच्छिमारांना मासेमारीस परवानगी देणे व परप्रांतीय मच्छिमारांच्या संख्येची निश्चिती करणे.<br>३) २०० हेक्टरपर्यंतचे तलावाच्यामुदतवाढ तसेच सवलतीबाबत निर्णय घेणे.<br>४) २०० हेक्टरपर्यंतचे तलावाचे तलाव ठेके रद्द करणेबाबत निर्णय घेणे. तसेच, काळ्या यादीबाबत निर्णय घेणे. |
| २. क्षेत्रिय कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग | सदस्य | |
| ३. सहाय्यक निबंधक (दुग्ध) | सदस्य | |
| ४. मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी | सदस्य | |
| ५. अध्यक्ष, संबंधित जिल्हा मत्स्य संघ | सदस्य | |
| ६. सहाय्यक मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी | सदस्य सचिव | |

सर्व तलाव ठेका समित्यांनी तलाव ठेका देण्याची कार्यवाही १ जुलै पुर्वी पुर्ण होईल याची दक्षता घ्यावी. काही परिहार्य कारणाने अथवा प्रशासकीय कारणाने ठेका देण्यास विलंब होत असल्यास यासाठी प्रचलीत पध्दती नुसार तात्पुरते मासेमारी परवाने देऊन अशा तलावात मत्स्योत्पादन घेण्यात यावे.

**१५ तलाव/जलाशय जाहिर निविदेने ठेकयाने देण्याची प्रक्रिया.**

**१५.१ जलाशय/तलाव ठेका देताना, ठेकेदार/संस्था/संघ/खाजगी व्यक्ती यांच्या पात्रतेचे निकष खालीलप्रमाणे राहतील.**

अ) संस्था ही भुजलाशयीन मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था म्हणून नोंदणी झालेली असावी.

ब) संस्था/संघ तलाव ठेक्याने देण्याच्या वेळी बंद अथवा अवसायनात नसावे.

क) संस्था/संघ/खाजगी ठेकेदार मत्स्यव्यवसाय विभागाचे कसल्याही प्रकारचे थकबाकीदार नसावे.

ड) मच्छिमार संस्था/मच्छिमार संघ यांनी अद्ययावत लेखापरिक्षण अहवाल सादर करणे बंधनकारक आहे.तसेच खाजगी व्यक्ती/ठेकेदार यांनी गत तीन वर्षाचे आयकर विवरणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

इ) तलाव ठेका रक्कम व तलाव ठेका अनामत रक्कम अशी मिळून होणारी एकत्रित रक्कम ही संस्थेच्या/संघ/ठेकेदाराच्या बँक खात्यात जमा असावी व असे बॅकेचे दस्तऐवज सादर करणे बंधनकारक राहिल.

फ) एखादी नियोजित संस्था अर्जदार असेल तर अशा संस्थांची मागणी विचारात घेण्यांत येणार नाही.

१५.२. १०००.०१ वरील जलाशयात मुद्दा क्र.१५.१ ची कागदपत्रे ही ई-निविदेतील कागदपत्रांचा भाग राहतील मात्र प्रथम तांत्रिक ई-निविदा पात्र ठरल्याशिवाय वाणिज्यिक ई-निविदा उघडण्यात येणार नाही. ई-निविदा प्रक्रियेस खालील मुद्दा क्र. १५.२.१ ते १५.२.३ च्या अटी शर्ती तसेच खालील सर्व अटीशर्ती बंधनकारक राहतील. १००० हेक्टर जलाशयापर्यंत तलाव/जलाशय याची निविदा भरण्याची पध्दत खालीलप्रमाणे असेल,

### १५.२.१ निविदाधारक संस्था असल्यास

(अ) संस्था नोंदणी प्रमाणपत्र
(ब) गत तीन वर्षाचे लेखापरिक्षण व ताळेबंद (सनदी अथवा प्रमाणित लेखापालाकडून प्रमाणित).
(क) संस्थेचे लेखापरिक्षण वर्ग "अ" अथवा "ब"असणे आवश्यक आहे मात्र २०० हेक्टर पर्यंतच्या तलावांच्या निविदाप्रकरणी लेखापरिक्षण वर्ग हा किमान "क" वर्ग असावा.
(ड) संस्था अवसायनात अथवा बंद करणेबाबत कोणतीही कार्यवाही सुरु नसावी.
(ई) संस्था मत्स्यव्यवसाय विभागाची थकबाकीदार नसावी.
(फ) तलाव/जलाशयाची ठेका रक्कम व अनामत रक्कम संस्थेच्या बँक खात्यावर जमा असणे बंधनकारक आहे.

### १५.२.२ निविदाधारक खाजगी व्यक्ती असल्यास

(अ) गत तीन वर्षाचे आयकर भरणाबाबत विवरणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.
(ब) जलाशयाची ठेका रक्कम व अनामत रक्कम बँक खात्यावर जमा असणे बंधनकारक आहे.
(क) महाराष्ट्रात किमान १० वर्ष वास्तव्य असणे बंधनकारक आहे.
(ड) अनुभव असल्यास अनुभव प्रमाणपत्र

### १५.२.३ निविदाधारक कंपनी/फर्म असल्यास

(अ) नोंदणी प्रमाणपत्र
(ब) गत तीन वर्षाचे लेखापरिक्षण व ताळेबंध (सनदी अथवा प्रमाणित लेखापालाकडून प्रमाणित).
(क) जलाशयाची ठेका रक्कम व अनामत रक्कम बँक खात्यावर जमा असणे बंधनकारक आहे.
(ड) अनुभव असल्यास त्याबाबतचे प्रमाणपत्र.
(इ) आयकर भरणाबाबत विवरणपत्र/प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

१५.३ संस्थेच्या प्रत्येक सभासदाने त्याचे बँकेत खाते उघडलेले असणे बंधनकारक आहे अशा खात्यास आधारकार्ड जोडणी आवश्यक आहे व याची यादी संबंधित सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांना दरवर्षी सादर करणे बंधनकारक आहे.

खाजगी ठेकेदाराने तलाव ठेका घेतल्यानंतर मासेमारी करणाऱ्या सर्व सभासदांची यादी आधारकार्ड जोडणी केलेल्या बँक खात्याच्या तपशीलासह सादर करावी.

तलावात/जलाशयात मासेमारी करणारे मच्छिमार/ सभासद/ व्यक्ती यांना देय असलेला मोबदला (मराई इ.) हा रोखीने न देता थेट बँक खात्यात (संयुक्त खाते-मच्छिमार व त्याची पत्नी) डी.बी.टी. व्दारे वर्ग करण्यात यावा.

१५.४ जाहिर निविदा **"टु बीड"** पध्दतीने म्हणजेदोन लिफाफा पध्दतीची राहील.

१५.५ लिफाफा **"अ"** हा तांत्रिक व लिफाफा **"ब"** हा वाणिज्यिक लिफाफा राहील व सदर दोन्ही लिफाफे सिलबंद करुन एका मोठया लिफाफ्यात भरुन हा मोठा लिफाफा सिलबंद करुन निविदा म्हणून सादर केले जातील.

१५.६ वरील सर्व कागदपत्रे ही लिफाफा "अ" म्हणजेच तांत्रिक निविदेचा भाग राहतील

१५.७ संबंधित तलाव ठेका समिती समोर लिफाफा "अ" हा प्रथम उघडण्यात येईल व तांत्रिकदृष्टया निविदा पात्र ठरल्यानंतरच वाणिज्यिक लिफाफा "ब" उघडण्यात येईल.

१५.८ प्रथम उच्चतम देकार सादर करणाऱ्या निविदाधारकास तलावाचा ठेका देण्यात यावा.

१५.९ सदर उच्चतम निविदा धारकाने निविदा मंजुर झाल्याचे आदेश प्राप्त झाल्यापासुन आठ दिवसाच्या आत ठेका रक्कम व अनामत रक्कम भरणा करणे बंधनकारक राहील.

१५.१० सदर ठेका व अनामत रक्कम उच्चतम निविदाधारकाने विहित मुदतीत भरणा न केल्यास त्याची निविदा रद्द करुन त्याची बयाना रक्कम शासन जमा करण्यात येईल व त्यांना ६ वर्षाकरीता काळया यादीत टाकण्यात येईल.

१५.११ तदनंतर द्वितीय उच्चतम निविदाधारक जर प्रथम उच्चतम निविदा देकाराऐवढी रक्कम भरणा करण्यास तयार असल्यास त्याला जलाशयाचा ठेका देण्यात येईल व त्यांनी ठेका रक्कम व अनामत रक्कम निविदा मंजुर झाल्याचे आदेश प्राप्त झाल्यापासुन आठ दिवसाच्या आत भरणा करणे बंधनकारक राहील.

१५.१२ उच्चतम निविदाधारक अथवा द्वितीय उच्चतम निविदाधारक यांनी उपरोक्त नुसार ठेका रक्कम व अनामत रक्कम भरणा न केल्यास नव्याने निविदा काढण्यात येतील.

१५.१३ तलाव/जलाशय जाहिर निविदेद्वारे ठेक्याने देण्यासाठी किमान तीन पात्र निविदा असणे बंधनकारक आहे.

१५.१४ तलाव/जलाशयाकरीता एका वर्षात कमाल तीन वेळा निविदा मागविण्यात येतील तरीही प्रतिसाद न मिळाल्यास सदर तलाव/जलाशयावर इच्छूक मच्छिमारांना मासेमारीकरिता मत्स्यव्यवसाय विभागामार्फत विहित पध्दतीने व शासकीय दराने मासेमारी परवाना अदा करण्यात येतील.

१५.१५ पुढील वर्षी ठेका रक्कम भरण्यासाठी ३० एप्रिल हा अंतिम दिनांक राहिल. या अंतिम दिनांकापर्यंत पुढील वर्षाची ठेका रक्कम न भरल्यास तलाव ठेका रक्कम ३० जून पर्यंत सरासरी १५% व्याज व ५% दंड याप्रमाणे दंड व व्याज भरणा करुन घेण्यात येईल. त्यानंतर आलेली तलाव ठेका रक्कम कोणत्याही परिस्थितीत स्विकारली जाणार नाही व संबंधित तलाव ठेका समिती सक्षम प्राधिकाऱ्याच्या मंजूरीने ठेका रद्द करण्याची कार्यवाही करेल.

१६. संबंधित तलाव/जलाशय ठेकेदाराने त्या जलाशयावर नोंदणी झालेल्या इतर अन्य संस्थेच्या सभासदांना, व स्थानिक मच्छिमारांना मासेमारी करु देणे बंधनकारक राहिल. याबाबत प्रश्न उद्भवल्यास त्याचे निराकरण संबंधित सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांनी करावे. तलाव/ जलाशयातील मत्स्योत्पादनाची मालकी ही संबंधित तलाव ठेकेदाराची असेल. यासाठी मच्छिमाराने पकडलेली मासळी (मासे,कोळंबी ई.) हे ठेकेदारास देणे बंधनकारक राहील. स्थानिक मच्छिमारांना / सभासदांना रोजगार मिळेल याची खात्री करणे याची जबाबदारी संबंधित जिल्हयाचे सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांची राहील. तसेच, ठेकेदाराने २०० हे. जलक्षेत्रापर्यंत १०० किलो व तद्नंतरचे क्षेत्रासाठी प्रति जलाशय २०० किलो जीवंत प्रजनक साठा विभागास विनामुल्य उपलब्ध करून द्यावा.

१७. मत्स्यबोटुकली/कोळंबी बीज संचयनासाठी जलाशय/तलावांमध्ये योग्य प्रकारे संचयन करण्यात येत असल्याची खात्री करण्याची जबाबदारी संबंधित सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांची राहील. ठेका कालावधी संबंधित ठेकेदार मत्स्यबोटुकली संचयन आवश्यक प्रमाणात करीत नसेल किंवा मत्स्योत्पादनाचे अहवाल नियमितपणे संबंधित जिल्हयाचे सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय कार्यालयास सादर करत नसतील तसेच तलाव ठेका करारपत्राचा भंग केल्याचे आढळून आल्यास असा ठेका रद्द करण्याचे अधिकार संबंधित तलाव ठेका समितीस राहतील व अशा संबंधित ठेकेदारास पुढील ६ वर्षाकरीता काळया यादीत टाकण्यात येईल.

१८. विहित करारपत्र करुन देणे संबंधित ठेकेदार यांना बंधनकारक राहील. असा करारनाम्याचा मसुदा आयुक्त कार्यालयाने शासनाच्या धोरणानुसार निश्चित करुन जिल्हा कार्यालयास दयावा. मच्छिमार संस्था/मच्छिमार संघ/खाजगी ठेकेदार यांना रु.२००/- व शासन वेळोवेळी ठरविल त्या मुद्रांक शुल्काच्या स्टॅम्प पेपरवर करारपत्र करणे बंधनकारक राहिल. तसेच मच्छिमारसंस्था /मच्छिमार संघ/खाजगी ठेकेदार यांनी प्रतिवर्षी लेखापरिक्षण करून संबंधित जिल्हयाचे सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांना दरवर्षी ३० जून पर्यंत लेखापरिक्षण अहवाल सादर करणे बंधनकारक राहील. (उदाहरणार्थ:- जून २०१७ पर्यंत ठेके निश्चित करताना सन २०१६-१७ चा लेखापरिक्षण अहवाल प्राप्त झाला नसल्यास लगतच्या वर्षाचा म्हणजे सन २०१५-१६ चा लेखापरिक्षण अहवाल)

१९. जलाशय/तलावठेका अनामत रक्कम ही निर्धारित केलेल्या जलाशय/तलाव ठेका रक्कमेच्या अथवा निविदेद्वारे निश्चित केलेल्या ठेका रक्कमेच्या ५०% किंवा कमीत कमी पंधरा हजार यापैकी जी अधिक असेल ती राहील. सुरक्षा अनामत रकमेचा भरणा रोख दर्शनी हुंडीद्वारेकरावा.

२०. तलाव ठेकेदार मच्छिमार संस्था/मच्छिमार संघ/खाजगी ठेकेदार यांनी केलेल्या तलाव ठेका करारपत्रातील अटी शर्ती त्यांना बंधनकारक राहतील.

२१. मच्छिमार संस्थेने/ठेकेदाराने त्यांचेकडील तलाव/जलाशय अन्य कोणासही उपठेक्याने दिला तर सदर तलावाचा/जलाशयाचा ठेका मुदतीपुर्व रद्द करण्यात येईल व त्यांना पुढील सहा वर्षाकरिता काळया यादीत टाकण्यात येईल असे अधिकार संबंधित तलाव ठेका समितीस राहतील.

२२. तलाव/जलाशय प्रकरणी ठेका प्रक्रिया पार पाडण्यास संस्था/निविदाधारक यांनी काही अडथळा निर्माण केल्यास अथवा निविदेच्या/तसेच तलाव ठेका करारपत्राच्या अटी शर्तीचे भंग केल्यास सदर संस्था/खाजगी ठेकेधारक यांना पुढील सहा वर्षाकरिता काळया यादीत टाकण्यात येईल.

२३. ठेका कालावधी मध्ये जलाशय/तलावामध्ये इष्टतम मत्स्यबोटुकली संचयन करणे बंधनकारक राहील. इष्टतम मत्स्यबोटुकली संचयन न केल्यास सक्षम तलाव ठेका समिती असा ठेका रद्द करेल. संचयन केलेली मत्स्यबोटुकलीची आकडेवारी व त्यापासून निर्धारित केलेल्या अपेक्षित मत्स्य उत्पादन व उत्पादीत मासळीची विक्री व्यवहार याचा ताळमेळ असणे आवश्यक आहे. मत्स्य बोटुकली/कोळंबी बीज संचयनासाठी जलाशय/तलावामध्ये योग्य प्रकारे संचयन करण्यात येत असल्याची खात्री करण्याची जबाबदारी संबंधित सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांची राहिल.

**२४. निविदा प्रक्रीयामध्ये अनुज्ञेय प्राधान्य खालील प्रमाणे राहतील.-**

जलाशयाच्या निविदे प्रक्रियेत स्थानिक मच्छिमार संस्था,प्रकल्पग्रस्त पारंपारिक मच्छिमार व इतर मच्छिमार संस्था तसेच मत्स्यविज्ञान पदवीधारक यांना खालील प्रमाणे प्राधान्यक्रम व सवलत राहील.स्थानिक आंदिवासी मच्छिमार संस्था/प्रकल्पग्रस्ताची संस्था यांनी खुल्या निविदे प्रक्रियेमध्ये भाग घेतल्यास निविदेप्रक्रियेमध्ये जर खाजगी ठेकेदाराची निविदा रक्कम उच्चतम ठरल्यास सदर संस्थेस अशा उच्चतम निविदा रक्कमेच्या ५% सवलत राहील व त्यांना निविदा प्रक्रियेमध्ये अनुक्रमे प्रथम प्राधान्य राहील.

**२५. जलाशय/तलाव ठेक्यामध्ये अनुज्ञेय असलेल्या सवलती.**

२५.१ २०० हेक्टर वरील जलक्षेत्र असलेला जलाशय ठेक्याने घेतलेल्या अपेक्षित मत्स्य उत्पादनापेक्षा एका वर्षात २५% जास्त वाढ झाली तर पुढील वर्षाच्या ठेका रक्कमेत ५% सुट देण्यात येईल. अशी सवलत ५ वर्षाच्या कालावधीत फक्त एकाच वर्षासाठी देय राहील. सदर सवलत खाजगी ठेकेदारासही लागू राहील. अशा प्रकारे सवलत देण्याकरिता संबंधित तलाव ठेका समिती आवश्यक कागदपत्रांसह प्रस्तावाची छाननी करुन प्रस्तावास मंजुरी देईल.

२५.२ अनुक्रमांक २५.१ नुसार सवलत घेण्यासाठी खालील अटी बंधनकारक राहतील.

(अ) मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था/मच्छिमार संघ/खाजगी उद्योजक यांनी इष्टतम बोटुकलीचे संचयन हे करणे बंधनकारक राहील.

(ब) सदर इष्टतम बोटुकलीचे संचयन हे संबंधित ठेकेदाराने मानकानुसार संबंधित जिल्हयाचे सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय अथवा त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष करावे. विभागाचा प्रतिनिधी उपलब्ध नसल्यास संबंधित तलाव / जलाशयच्या परिसरातील सरपंच / उप सरपंच/ पोलिस पाटील अथवा शासकीय / निमशासकीय कार्यालयातील प्रतिनिधी यांचे समक्ष सदर संचयनाचा संबंधित ठेकेदाराने पंचनामा करणे बंधनकारक राहील.

(क) मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था/मच्छिमार संघ/खाजगी उद्योजक यांनी तलावात दररोज होणाऱ्या मासेमारीची नोंद नोंदवहीत ठेवणे बंधनकारक राहील.

(ड) सदर नोंदी करुन दर महिन्याला ५ तारखेच्या आत मत्स्योत्पादनाचा मासि अहवाल संबंधित सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांना सादर करणे बंधनकारक राहिल.

(इ) सदर सवलत मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था/मच्छिमार संघ/खाजगी उद्योजक यां देताना तलावातील संचयन, मत्स्योत्पादन इत्यादी नोंदी मत्स्यव्यवसाय सहकार संस्था/मच्छिमार संघ/खाजगी उद्योजक यांच्या अभिलेखी/आर्थिक व्यवहारात निर्देशित अस बंधनकारक आहे.

(फ) मत्स्यव्यवसाय विभागामार्फत सर्व तलाव क्षेत्रातील मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था/मच्छिमार संघ/खाजगी उद्योजक यांना त्यांनी ठेक्याने घेतलेल्या तलाव/जलाशयामध्ये केलेले इष्टतम बोटुकली संचयन व मत्स्योत्पादनाबाबतची माहिती मत्स्यव्यवसाय विभागामार्फत स्थानिक सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांच्या कार्यालयास उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील.

## २६. तलाव ठेका मुदतवाढ:-

मत्स्यव्यवसायाकरिता तलाव ठेक्याने दिलेल्या कालावधीत खालीलप्रमाणे विविध कारणास्तव मुदतवाढ देण्यात येईल.

### २६.१ अवर्षणामुळे मुदतवाढ:-

तलाव / जलाशय तलावात कॅनलच्या खाली पाणी अडीच मिटरपेक्षा खाली खोल गेले तर आवर्षण मानले जाते. कॅनलच्या खाली पाणी तलावात शिल्लक असते. त्यात मृत पाणी साठा (Dead water stock) असतो. ते मासे जिवंत राहण्यास प्रभावी असते. जर पाण्याची पातळी कॅनल लेवलच्या खाली अडीच मिटरपेक्षा खाली खोल गेली असेल तेव्हा तलाव सुकला आहे असे गृहित धरुन तलाव आवर्षणग्रस्त ठरविण्यात येईल. सध्यस्थितीत तलाव/जलाशयातील पाण्याची पातळी मृतसाठयापेक्षा अवर्षण झाल्यास तलाव ठेकेदारास विहित तलाव ठेका मुदत पाच वर्षानंतर एक वर्षाची मुदतवाढ देण्यात येते. तथापि बदलत्या व अनिश्चित हवामानामुळे अशी अवर्षणाची परिस्थिती वारंवार उद्भवते. यामुळे प्रदिर्घ परिस्थितीत तलाव ठेकेदाराचे अतिरिक्त नुकसान टाळण्याकरिता आवर्षणाच्या मुदतीत सलग जास्तीत जास्त ३ वर्ष मुदतवाढ देण्यात येईल. अशी मुदतवाढ देण्याकरिता संबंधित तलाव ठेका समिती सक्षम राहिल.

### अटी शर्ती व कार्यपध्दती-

(अ) ज्यावर्षी १ जानेवारी पुर्वी तलावाची पातळी तलावाच्या कॅनलच्या पाणी पातळीपेक्षा म्हणजेच मृत साठयापेक्षा २.५ मीटर खाली खोल जाईल असा तलाव/जलाशय मत्स्योत्पादनाच्या दृष्टीकोनातून अवर्षणग्रस्त असेल.

(ब) पाणी पातळीचे प्रमाणपात्र ज्या विभागाचा तलाव/जलाशयाची मालकी आहे अशा संबंधित विभाग जसे पाठबंधारे विभाग/जलसंपदा/जलसंधारण इत्यादि विभागाचे कार्यकारी अभियंता यांचे प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी संबंधित ठेकेदाराची असेल.

(क) आवर्षणग्रस्त तलावाचे/जलाशयाचे सर्वेक्षण सहाय्यक आयुक्त कार्यालयामार्फत करण्यात येऊन पाणी पातळी प्रमाणपत्र, सर्वेक्षण अहवाल यासह प्रस्ताव संबंधित तलाव ठेका समितीस सादर करण्याची जबाबदारी जिल्हयाचे सहाय्यक आयुक्त कार्यालयाची असेल. सदर कार्यवाही १ जानेवारी पुर्वी पुर्ण करावी.

(ड) जर मुदतवाढीच्या पुढील वर्षात पुन्हा अवर्षण झाल्यास पुनश्च वरीलप्रमाणे कार्यवाही करावी अशी मुदतवाढ जास्तीत जास्त सलग तीन वर्षे देण्यात यावी.

(इ) ठेका मुदतवाढ मागणी करणारे तलाव ठेकेदार/संस्था मत्स्य विभागाची थकबाकीदार नसावी.

## २६.२ अतिवृष्टीमुळे मुदतवाढ

तलावाच्या सांडव्यावरुन सलग १२ तास करीता ६० से.मी. पाणी वाहल्यास अतिवृष्टीग्रस्त म्हणून १ वर्षाची ठेका माफी तलाव ठेका मुदतीच्या ५ वर्षा नंतर देण्यात येते. तथापी बदलत्या हवामानामुळे अतिवृष्टीची परिस्थिती वारंवार उदभवू शकते. याकरिता वस्तूनिष्ठ तलाव ठेका मुदतवाढ देण्याकरीता अतिवृष्टीच्या परिस्थितीनुसार जेवढे वर्ष अतिवृष्टी होईल तेवढी वर्ष अतिवृष्टीच्या लगतच्या वर्षात जास्तीत जास्त ३ वर्ष मुदतवाढ देण्यात येईल. अशी मुदतवाढ देण्याकरिता संबंधित तलाव ठेका समिती सक्षम राहिल.

### अटी शर्ती व कार्यपध्दती

(अ) तलावाच्या/जलाशयाच्या सांडव्यावरुन/भिंतीवरुन सलग बारा तासांकरिता ६० से.मि.पाणी वाहिल्यास असा तलाव/जलाशय मत्स्यव्यवसायाच्या दृष्टीकोणातून अतिवृष्टीग्रस्त असेल.

(ब) पाणी पातळीचे प्रमाणपात्र ज्या विभागाचा तलाव/जलाशयाची मालकी आहे अशा संबंधित विभाग जसे पाठबंधारे विभाग/जलसंपदा/जलसंधारण इत्यादि विभागामार्फत प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी संबंधित ठेकेदाराची असेल.

(क) अतिवृष्टीग्रस्त तलावाचे/जलाशयाचे सर्वेक्षण सहाय्यक आयुक्त कार्यालयामार्फत करण्यात येऊन पाणी पातळी प्रमाणपत्र, सर्वेक्षण अहवाल यासह प्रस्ताव संबंधित तलाव ठेका समितीस सादर करण्याची जबाबदारी जिल्हयाचे सहाय्यक आयुक्त कार्यालयाची असेल. सदर कार्यवाही १ जानेवारी पुर्वी पुर्ण करावी.

(ड) जर मुदतवाढीच्या वर्षात पुन्हा अतिवृष्टी उदभवल्यास पुनश्च वरीलप्रमाणे कार्यवाही करावी. अशी मुदतवाढ जास्तीत जास्त सलग ३ वर्ष देण्यात यावी.

(इ) ठेका मुदतवाढ मागणी करणारे तलाव ठेकेदार/संस्था मत्स्य विभागाची थकबाकीदार नसावेत.

## २६.३ भांडवली गुंतवणूक केल्यास मुदतवाढ

तलावाचा/जलाशयाचा ठेका कालावधी हा ५ वर्ष राहिल परंतू ठेका कालावधी, तलाव ठेकेदार/संस्थेने स्वखर्चाने भांडवली गुंतवणूक केल्यास त्यांना पुढील ५ वर्षाकरिता ठेका मुदतवाढ देण्यात येईल. अशी मुदतवाढ जास्तीत जास्त १५ वर्ष देय राहिल. तलावाच्या/जलाशयाच्या मुदतवाढीकरिता खालील बाबींवर बाबनिहाय भांडवली गुंतवणूकीची टक्केवारी असेल.

<u>प्रथम मुदतवाढ</u>

| अ.क्र. | बाब | बाबनिहाय गुंतवणूकी टक्केवारी |
|---|---|---|
| १ | स्थानिक परिस्थितीनुसार मत्स्यबीज केंद्र/ लघू मत्स्यबीज उत्पादन केंद्र (mini hatchery)/मत्स्यबीज संगोपन तलाव खोदकाम/मत्स्यबीज संगोपन निविष्ठा खर्च/बंदिस्त पिंजरा संवर्धन | ६०% |
| २ | मासे संकलन केंद्र (Shade) व मासेमारीसाठी निवासी शेड | १०% |
| ३. | जाळे खरेदी/शितपेटया/आईस क्रशर/डिप फ्रिजर/नौका खरेदी/ मत्स्यबीज | ३०% |

<u>द्वितीय मुदतवाढ</u>

| अ.क्र. | बाब | मुदतवाढ कालावधी | बाबनिहाय गुंतवणूकीची टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | जाळे खरेदी/शितपेटया/आईस क्रशर/<br>डिप फ्रिजर/नौका खरेदी/ मत्स्यबीज संगोपन निविष्ठा खर्च | तलाव ठेका मुदत संपल्यानंतर प्रथम मुदतवाढीकरिता तसेच प्रथम मुदतवाढ संपल्यानंतर दुसऱ्या मुदतवाढीकरिता. | ३०% |
| २. | मासळी वाहतूकीसाठी फिरते मासळी विक्रीकरीता वाहन खरेदी, किरकोळ मासळी विक्रीच्या केंद्राचे आधुनिकीकरण,बर्फकारखाना, शितगृह/ बंदिस्त पिंजरा संवर्धन | तलाव ठेका मुदत संपल्यानंतर व त्यानंतर मिळालेली प्रथम मुदतवाढ संपल्यानंतर दुसऱ्या मुदतवाढी करिता. | ७०% |

२६.३.१ जलसंपदा विभागाने जलक्षेत्राकरीता भुसंपादीत केलेल्या जमिनी पैकी जी जमीन जलग्रहण क्षेत्राच्या बाहेर राहते, अशा संपादीत केलेल्या जमिनीवर बर्फ कारखाना, शितगृह, मासळी खरेदी-विक्री केंद्र, मत्स्यबीज केंद्र, मत्स्यसंवर्धन तळी इ. मुलभुत सुविधा उभारण्यासाठी अशी जमीन आवश्यक असल्यास ती जलसंपदा विभागाने संबधित जिल्हाधिकारी यांचेकडे वर्ग करावी. जलाशय मासेमारी करीता ठेक्याने देण्यात आलेल्या मच्छिमार संस्था/ मच्छीमारसंघ /खाजगी उद्योजक यांनी मुलभुत सुविधा उभारण्यासाठी अशा जमिनीची मागणी केल्यास सदरची जमीन संबंधित जिल्हाधिकारी यांच्याकडून मत्स्यव्यवसाय विभागाकडे भाडेपट्टी करारावर उपलब्ध करुन घ्यावी. जलाशय ठेकेदाराने मुलभुत सुविधा उभारण्यासाठी बिगर शेती परवाना मिळण्याबाबत मत्स्यव्यवसाय विभागाकडे विनंती केल्यास संबधित जिल्हाधिकारी यांच्याकडुन मत्स्यव्यवसाय विभागाच्या नावे बिगर शेती परवाना उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करावी व याप्रमाणे उपलब्ध झालेल्या जमिनीबाबत मत्स्यव्यवसाय विभाग व संबधित जलाशया वरिल ठेकेधारक यांच्यामध्ये करार करुन जमिन मुलभुत सुविधा उभारण्यासाठी उपलब्ध करुन घ्यावी.

२६.३.२ मच्छीमारसंस्था/मच्छीमार संघ/खाजगी ठेकेदार यांनी जलाशयाच्या ठेका कालावधीमध्ये शासकीय अनुदानातून उभारलेल्या मुलभुत सुविधांची मालकी, ठेका कालावधी समाप्ती नंतर मत्स्यव्यवसाय विभागाची राहील व अशा उभारण्यात आलेल्या मुलभुत सुविधा या चांगल्या व कार्यान्वीत स्थितीत मत्स्यव्यवसाय विभागाकडे हस्तांतरीत करणे बंधनकारक राहील. तथापि, निर्माणाधिन जलक्षेत्रामध्ये किनाऱ्यावर मासळी उतरविण्यासाठी, बंदिस्त पिंजऱ्यातील मत्स्यसंवर्धन इ. मुलभुत सुविधा निर्माण करावयाच्या झाल्यास त्याकरिता आवश्यक असलेले ना-हरकत प्रमाणपत्र किंवा परवानगी संबंधित कार्यालयाकडून प्राप्त करून घेण्याची जबाबदारीही संबंधित मच्छीमार संस्था / मच्छीमार संघ / खाजगी ठेकेदार यांची राहील.

२६.३.३ भांडवली गुंतवणूकीसह ठेकेदार यांना जलाशयात क्षमतेनुसार मत्स्य बोटुकली संचयन करणे व अपेक्षित मत्स्योत्पादन साध्य करणे आवश्यक राहील. ठेकेदार हे मुलभूत सुविधा निर्माण करण्याकरिता शासनाच्या विविध योजनांचा लाभ नियमानुसार घेण्यास पात्र असतील. अशा निर्मित मुलभूत सुविधांचा लाभ प्राधान्याने मत्स्योत्पादनासाठी करुन घेणे बंधनकारक राहील. ठेकेदाराने भांडवली गुंतवणूक वार्षिक संचयन, मत्स्योत्पादन उपलब्ध करुन दिलेला रोजगार याचा स्वतंत्र तपशिल ठेवणे बंधनकारक राहिल.

२६.३.४ सदर गुंतवणूकीची टक्केवारी सर्व तलाव/जलाशयांकरिता लागू राहिल. भांडवली गुंतवणूकीचे प्रमाण तलाव/जलाशयाच्या जलक्षेत्रनिहाय खालीलप्रमाणे राहिल.

| अ.क्र. | जलक्षेत्र | तलाव ठेका मुदतीत किमान गुंतवणूकीचे प्रमाण |
|---|---|---|
| १ | २०० हेक्टर पर्यंत | रु.१५.०० लाख |
| २ | २०० ते १००० हेक्टर | रु.३०.०० लाख |
| ३ | १००० ते २००० हेक्टर | रु.५०.०० लाख |
| ४ | २००० हेक्टरवरील | रु.७५.०० लाख |

२६.३.५ ठेका मुदतवाढ ही प्रत्यक्ष झालेल्या खर्चानुसार देण्यात येईल. खर्चाच्यातपशिलासह तलाव ठेका मुदतवाढ प्रस्ताव संबंधित तलाव ठेका समितीस सादर करण्याचीजबाबदारी जिल्हयाचे सहाय्यक आयुक्त कार्यालयाची असेल. सदर कार्यवाही तलाव ठेका मुदतीच्या अंतिम वर्षातील १ एप्रिल पुर्वी पुर्ण करणे आवश्यक राहिल. अशी मुदतवाढ मागणी संबंधित ठेकेदाराने किमान चार महिने अगोदर देणे आवश्यक राहील.

२६.३.६ सदरहु तलाव ठेका धोरण लागू होण्यापुर्वी जे जलाशय तलाव ठेक्याने देण्यात आलेले आहेत वत्यांच्या कालावधी या शासन निर्णयाच्या तारखेपासून २ वर्ष अधिक शिल्लक अशा तलाव ठेकेदार यांनी उपरोक्त निश्चित केलेल्या बाबींवर भांडवली गुंतवणूक केल्याचे सिध्द केल्यास असे ठेकेदार नव्या धोरणाप्रमाणे लाभ घेण्यास पात्र राहतील. अशी मुदतवाढ जास्तीत जास्त १५ वर्ष देय राहील. ज्या तलाव/जलाशयाचा ठेका आजपासून २ वर्षापेक्षा कमी कालावधी शिल्लक आहे अशा सर्व तलावांचा ठेका कालावधी संपुष्ठात आल्यानंतर सुधारीतधोरणाप्रमाणे ठेका प्रक्रियेची कार्यवाही करण्यात येईल.

२६.३.७ तलाव/जलाशयाचा ठेका कालावधी पुढील मुदतवाढ देताना मागील ५ वर्षाकरीता निश्चित केलेल्या ठेका रकमेमध्ये २०% वाढ करुन देण्यात येईल.

२६.४ तलाव ठेकेदारास ठेका देण्यास अपरिहार्य कारणास्तव विलंब झाल्यास देण्याची ठेका मुदतवाढ

शासन निर्णयानुसार तलाव ठेकेदारास मासेमारी करण्याकरिता ५ वर्षाचा कालावधी मिळणे आवश्यक आहे. तलाव ठेक्याने देण्याची कार्यवाही दिनांक १ जुलैपुर्वी पुर्ण होणे अपेक्षित आहे. परंतू अपरिहार्य कारणास्तव प्रथम वर्षाचा ठेका मिळण्यास तीन महिने किंवा त्यापेक्षा जास्त उशिर झाल्यास ठेका कालावधी ५ वर्षापेक्षा कमी होत असल्यास तेवढा कालावधी वाढवून देण्यात यावा व पाच वर्षाचा कालावधी ज्या तारखेस पुर्ण होईल त्या तारखेपासून दिनांक ३० जून पर्यंतच्या उर्वरित कालावधीसाठी त्या प्रमाणात वार्षिक ठेका आकारण्यात येईल. प्रथम वर्षीचा ठेका मिळण्यास उशिर होऊन ३ महिने किंवा त्यापेक्षा कमी कालावधी वाया गेल्यास तेवढया कालावधीची रक्कम पाचव्या वर्षाच्या ठेका रक्कमेतून कमी करण्यात यावी व तलाव ठेक्याची विहित मुदतीत कालावधी पुर्ण होऊन त्या तारखेस ठेका संपुष्टात येईल.

**२७. जलाशय/तलाव यांच्या ठेका रक्कमेद्वारे प्राप्त होणाऱ्या महसुलामध्ये खालीलप्रमाणे विभागातंर्गत विभागणी करण्यात यावी.**

२७.१ जलसंपदा विभागाने ५०%, मत्स्यव्यवसाय विभाग ३०% अशी विभागणी करुन महसूल एकत्रित निधीमध्ये त्या त्या विभागाच्या जमा लेखाशिर्षाखाली जमा करण्यात यावा व उर्वरित २०% निधी हा मत्स्यव्यवसाय विभागाकडे असलेल्या जलाशय/तलावाच्या विकासासाठी वापरण्यात येईल.

२७.२ जलाशय/तलाव ठेका रक्कमेतून एकुण प्राप्त होणाऱ्या महसुलामधून मत्स्यव्यवसाय विभागाकडे राखीव ठेवण्यात येणाऱ्या २०% निधीमधुन जलाशयाच्या ठिकाणी मुलभूत सुविधा जसे जलाशय पोहोच रस्ता तयार करणे, पकडलेली मासळी उतरविण्यासाठी पकटी बांधणे, शासकीय मत्स्यबीज केंद्रातील दुरुस्ती करणे, मत्स्यबीज उत्पादन, तलावाचे मासेमारीचे सर्वेक्षण, सांख्यिकी माहिती गोळा करणे, तलाव ठेक्याने गेला नसल्यास चोरीने होणाऱ्या मासेमारीस प्रतिबंध करणे यासाठी कंत्राटी पध्दतीने कर्मचाऱ्यांची नेमणूक करणे इ.बाबींसाठी मत्स्यव्यवसाय विभागामार्फत खर्च करण्यात येईल. याप्रमाणे प्राप्त होणाऱ्या २०% निधी हा संबंधित सहाय्यक आयुक्त यांच्या नावे असलेल्या राष्ट्रीयकृत बँकेच्या खात्यामध्ये जमा करण्यात येईल. असा जमा होणारा निधी शासनाने विहित केलेल्या पध्दतीनुसार खर्च करण्याकरिता आयुक्त मत्स्यव्यवसाय महाराष्ट्र राज्य स्वतंत्र निकष निश्चित करतील. जलाशय/तलाव विकासासाठी राखीव ठेवण्यात येणाऱ्या निधीची आकडेवारी शासनास आयुक्त मत्स्यव्यवसाय वेळोवेळी सादर करतील. सदर निधीमधुन केलेल्या कामांचा तपशिल हा शासनास सादर करतील.

२८. सदर शासन निर्णयान्वये ज्या तलाव / जलाशयाचा ठेका देण्यात येईल त्यास सर्व तलाव / जलाशयास शासन निर्णय क्र. मत्स्यवि २०१६/प्र.क्र.९८/पदुम १३ दि. १७ ऑक्टोबर २०१६ अन्वये जाहिर केलेले "पिंजरा पध्दतीने मत्स्यसंवर्धन" करण्याबाबतचे धोरण लागू राहील.

२९. तलाव/जलाशय ठेक्याच्या अनुषंगाने उद्भवणाऱ्या वादासंदर्भात दाद मागण्याकरिता संबंधितास खालीलप्रमाणे सक्षम प्राधिकाऱ्याकडे अपिल तसेच पुर्नरिक्षण दाखल करण्याची संधी उपलब्ध राहील. मात्र अपील/पुर्नरिक्षण अर्जावर एकदा घेतलेला निर्णय अंतिम राहील.

(अ) १००० हेक्टरपर्यंतचे तलाव/जलाशय संदर्भात आयुक्त मत्स्यव्यवसाय हे अपिलीय प्राधिकारी राहतील व सचिव (पदुम) हे पुर्नविलोकन प्राधिकारी राहतील.

(ब) १००० हेक्टरवरील जलाशय संदर्भात सचिव (पदुम) हे अपिलीय प्राधिकारी राहतील व मा.मंत्री मत्स्यव्यवसाय हे पुर्नविलोकन प्राधिकारी राहतील.

हे आदेश जलसंपदा विभागाच्या सहमतीने व अनौपचारिक संदर्भ क्र.४४/सिं.व्य (म)/१७, दिनांक २६.०५.२०१७ रोजी दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०७०११३५६०५२९०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Shri Ravindra Gurav

Digitally signed by Shri Ravindra Gurav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And Adf Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=0030b22364370f4d96[illegible]61c3f9cd6fd67e55000ce92, cn=Shri Ravindra Gurav
Date: 2017.07.01 13:53:25 +05'30'

(रविन्द्र गुरव)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
४. सर्व मा. मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
५. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
६. अप्पर मुख्य सचिव (महसूल) मंत्रालय, मुंबई ३२
७. प्रधान सचिव (वित्त) मंत्रालय मुंबई ३२
८. प्रधान सचिव (वने) मंत्रालय मुंबई ३२
९. प्रधान सचिव (ग्रामविकास) मंत्रालय मुंबई ३२
१०. सचिव (सहकार) मंत्रालय मुंबई ३२
११. प्रधान सचिव (आदिवासी विकास) मंत्रालय मुंबई ३२
१२. प्रधान सचिव (सामाजिक न्याय) मंत्रालय मुंबई ३२
१३. सचिव (जलसंपदा) मंत्रालय मुंबई ३२
१४. सचिव (लक्षेवि) मंत्रालय मुंबई ३२
१५. आयुक्त मत्स्यव्यवसाय महाराष्ट्र राज्य, मुंबई
१६. आयुक्त सहकार पुणे
१७. सर्व विभागीय आयुक्त
१८. सर्व जिल्हाधिकारी
१९. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद
२०. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र मत्स्योदयोग विकास महामंडळ, मुंबई
२१. सर्व आयुक्त महानगरपालिका

२२. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णाखोरे विकास महामंडळ सिंचन भवन पुणे
२३. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद
२४. कार्यकारी संचालक महाराष्ट्र विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर
२५. कार्यकारी संचालक महाराष्ट्र तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव
२६. कार्यकारी संचालक , कोकण पाटबंधारे विकास महामंडळ ठाणे
२७. सर्व उपायुक्त, मत्स्यव्यवसाय
२८. सर्व विभागीय सहआयुक्त निबंधक सहकारी संस्था
२९. उपनिबंधक सहकारी संस्था (मत्स्य) आयुक्त मत्स्यव्यवसाय यांचे कार्यालय, मुंबई.
३०. सर्व जिल्हा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (दुग्ध)
३१. सर्व जिल्हा मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी
३२. महालेखापाल (लेखापरिक्षक / लेखा अनुज्ञेयता) मुंबई / नागपूर
३३. वित्त विभाग (व्यय २) मंत्रालय मुंबई ३२. / निवड नस्ती.

**परिशिष्ट क्र. ४.१**

**महिला व बाल विकास विभागाच्या योजनेशी अभिसरण करून महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत अंगणवाडी केंद्र इमारतीचे बांधकाम करणे बाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नियोजन विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः मग्रारोहयो-२०१३/प्र.क्र.०१/रोहयो-१**
नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई-४०० ०३२,
तारीख: २१ सप्टेंबर, २०१५

वाचा -

१) केंद्र शासनाची अधिसूचना क्र.२२७४, दिनांक २२ नोव्हेंबर, २०१२
२) केंद्र शासनाचे ग्रामीण विकास मंत्रालय व महिला व बाल विकास मंत्रालय यांचे संयुक्त आदेश क्र. १९-४/२००८-सीडी।
३) केंद्र शासनाचे महिला व बाल विकास मंत्रालय यांचे आदेश क्र. १९-३/०४-सीडी।(VOl.V), दिनांक १६ सप्टेंबर, २०१३
४) आयुक्त, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना आयुक्तालय, नागपुर यांचे पत्र क्र. आयुक्तालय/तां.स/१५१८/२०१३, दिनांक ०४ डिसेंबर, २०१३
५) महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम १९७७ (दिनांक ०६ ऑगस्ट, २०१४ पर्यंत सुधारित)
६) केंद्र शासनाच्या क्र.j-११०१६/११/२०१२- MGNREGA,IV, दिनांक १३ ऑगस्ट,२०१५ च्या मार्गदर्शक सूचना

प्रस्तावना -

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत केंद्र शासनाने उपरोक्त संदर्भ क्रमांक १ येथील दिनांक २२ नोव्हेंबर, २०१२ च्या अधिसुचनेन्वये अंगणवाडी केंद्र इमारतीचे बांधकाम करण्याच्या कामाचा समावेश महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना कायदा २००५ मधील अनुसूची १ मध्ये १५ अ म्हणून केला आहे. केंद्र शासनाने उपरोक्त संदर्भ क्रमांक २ व ३ येथील आदेशान्वये अंगणवाडी केंद्र इमारतीचे बांधकाम महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, एकात्मिक बाल विकास सेवा योजना (ICDS) व राज्य निधी ईत्यादी योजनांच्या अभिसरणातून करण्याबाबतच्या मार्गदर्शक सुचना दिलेल्या आहेत. तसेच अंगणवाडी केंद इमारतीचे बांधकाम करण्याचा विषय महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम १९७७ (दिनांक ०६ ऑगस्ट, २०१४ पर्यंत सुधारित) मधील अनुसूचि २ मध्ये ३ (१) IV (v) मध्ये करण्यात आलेला आहे. तसेच आयुक्त, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना आयुक्तालय, नागपुर यांनी त्यांच्या उपरोक्त संदर्भ क्रमांक ४ येथील दिनांक ०४ डिसेंबर, २०१३ च्या पत्रान्वये अंगणवाडी केंद्र इमारतीचे अंदाजपत्रक शासनास सादर केले आहे. उपरोक्त बाबींच्या अनुषंगाने व महिला व बाल विकास विभागाच्या शिफारशीने अंगणवाडी केंद्र इमारतीचे बांधकाम महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना व महिला व बाल विकास विभागाच्या योजना यांचे अभिसरण करून करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. या बाबतचा शासन निर्णय खालील प्रमाणे आहे.

## शासन निर्णय-

अंगणवाडी केंद्र इमारतीचे बांधकाम महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना व महिला व बाल विकास विभागाच्या योजना यांचे अभिसरण करून करण्यास सदर शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. अंगणवाडी केंद्र इमारतीच्या बांधकामाचा नकाशा नमुना सोबत जोडण्यात आला आहे. त्यानुसार अंदाजपत्रकीय किंमतीचा तपशील खालील प्रमाणे राहील.

| क्षेत्रफळ | एकूण किंमत (रूपयामध्ये) | किंमत प्रति चौरस मीटर | कुशल | अकुशल |
|---|---|---|---|---|
| ५० चौ.मी. | रू. ५९७८००/- | रू.११,९५६/- | रू. ५,३८,०२०/- ९०.% | रू. ६३३५०/- (जवळपास ३५० मनुष्य दिवस)१० % |

३. उपरोक्त तक्त्यात नमुद केलेली अंदाजपत्रकीय किंमत ही सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २०१३-१४ या वर्षाच्या दरसूची व मजुरी दर रू. १८१/- प्रतिदिन वर आधारित आहे. त्यामुळे दरसूची प्रमाणे व अद्यावत मजुरी दराप्रमाणे अंदाजपत्रकीय किंमतीत बदल करण्याची मुभा संबंधित तांत्रिक विभागाला राहील. अंगणवाडी केंद्र इमारतीच्या बांधकामातील अकुशल खर्च संपुर्णपणे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत भागविण्यात यावा. साहित्यावरील खर्च ज्यामध्ये कुशल कामगार मजुरी समाविष्ट आहे हा खर्च महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत अनुज्ञेय (४० टक्के) खर्चामधून व उर्वरित ६० टक्के खर्च महिला व बाल विकास विभागाच्या नियमित निधीमधून / एकात्मिक बाल विकास सेवा योजना निधीमधून भागविण्यात यावा.

अंगणवाडी केंद्राचे आवारात किचन गार्डनसाठी प्रयोजन करण्यात यावे. साधारणत: ज्या अंगणवाडी केंद्राकरिता किचन गार्डनसाठी (परसबागसाठी) पुरेशी जागा उपलब्ध असेल अशा केंद्राकरिता स्वतंत्र तरतूद अंगणवाडी केंद्र इमारतीचे बांधकामाचे अंदाजपत्रकात दर्शविण्यात यावी. प्रत्येक अंगणवाडी केंद्रात सोलर पॅनेल बसविण्यात येतील यावर किमान एक पंखा व एक टयूब लाईट चालेल एवढी क्षमता त्यामध्ये असावी. किचन गार्डन व सोलर पॅनेल यावरील संपूर्ण खर्च महिला व बाल विकास विभागाकडून भागविण्यात येईल. प्रत्येक अंगणवाडी केंद्राकरिता पाणी पुरवठा व स्वच्छता (Water and Sanitation) ची सुविधा ग्रामविकास विभागाकडून "ग्रामपंचायत विकास आराखडा" अंतर्गत पुरविण्यात यावी.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत देय असलेल्या अनुदानाव्यतिरिक्त आवश्यक असलेला निधी महिला व बाल विकास विभागाकडून इतर निधी उदा.जिल्हा नियोजन विकास परिषद, आदिवासी उपयोजना, विशेष घटक योजना, १४ वा वित्त आयोग, इत्यादी अंतर्गत उपलब्ध तरतूदीतून भागवावयाचा आहे.

४. अंगणवाडी केंद्र इमारतीचे बांधकाम हे इतर योजनांशी अभिसरण करून करावायाचे असल्याने सदर कामासाठी कार्यान्वयीत यंत्रणा पंचायत समिती स्तरावरील बांधकाम विभागाची राहील. तथापि खालील बाबींचे पालन करणे अनिवार्य राहील.

१) ग्राम पंचायत/ग्रामसभा यांचा ठराव व शिफारस आवश्यक,

२) प्रत्येक अंगणवाडी केंद्राचे बांधकाम हे स्वतंत्र काम समजण्यात यावे.

३) सर्व प्रकारच्या अकुशल कामासाठी जॉबकार्ड आवश्यक आहे.

४) दर १५ दिवसांनी मस्टरप्रमाणे मजुरी प्रदान करावी.

५) ग्राम रोजगार नोंदवहीत व ग्राम मालमत्ता नोंदवहीत सर्व प्रकारच्या नोंदी घेणे आवश्यक राहील.

६) एमआयएस वरील सर्व प्रकारच्या नोंदी घेणे आवश्यक आहे.

७) सदर कामाचे सामाजिक अंकेक्षण अनिवार्य आहे त्यामुळे अकुशल व अर्धकुशल कामावरील खर्चाची सर्व प्रमाणके/पावत्या सामाजिक अंकेक्षणासाठी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

८) महात्मा गांधी नरेगाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार हजेरीपत्रक ठेवणे, बँक किंवा पोस्टामार्फत इएफएमएस द्वारे मजुरीचे प्रदान करणे आवश्यक आहे.

९) मजुरी साहित्याचे प्रमाण ६०:४० जिल्हा स्तरावर ठेवण्यात यावे.

१०) ईमस्टर चा वापर करणे बंधनकारक आहे.

११) महात्मा गांधी नरेगाशी संबंधित कामासाठी कंत्राटदार व मजुर विस्थापित करणाऱ्या यंत्राना बंदी राहील.

१२) काम सुरू करण्यापूर्वी, प्रगतीपथावर असतांना व काम पूर्ण झाल्यानंतरचे फोटो घेण्यात यावेत व सदर फोटो संकेतस्थळावर अपलोड करावीत.

१३) अंगणवाडी केंद्राच्या प्रत्येक बांधकामाला प्रशासकीय मान्यता तहसिलदार प्रदान करतील व तांत्रिक मान्यता जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी देतील.

१४) अंगणवाडी केंद्राच्या बांधकाम करण्याचे कामासाठी कार्यान्वयीन यंत्रणा ही महिला व बाल विकास विभाग राहील.

१५) सामुग्रीचे प्रदान चेकद्वारे/EFMS द्वारे करण्यात यावे.

१६) सदर कामाचा समावेश लेबर बजेट मध्ये करण्यात यावा.

१७) सर्व अकुशल स्वरूपाची कामे नोंदणीकृत जॉबकार्डधारक मजुरांकडून करून घेण्यात यावीत.

१८) महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम १९७७ (दिनांक ०६ ऑगस्ट, २०१४ पर्यंत सुधारित) मधील अनुसूचि २ मधील १२(अ) मध्ये असलेल्या तरतुदीप्रमाणे अंगणवाडी केंद्र इमारतीचे बांधकाम करताना मितव्ययी, मजुर आधारित तंत्रज्ञान आणि स्थानिक उपलब्ध साधन सामग्रीचा वापर करावा.

५. अंगणवाडी केंद्र इमारतीच्या बांधकामाचे अंदाजपत्रक जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाच्या सक्षम अधिकारी यांनी करुन त्यावर सक्षम अधिकारी (मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद) यांची स्वाक्षरी घ्यावी. अंदाजपत्रकात वेगवेगळ्या योजनेतून कशा पद्धतीने खर्च होणार आहे याचा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा. तद्नंतर सदर कामास प्रशासकीय मान्यता तहसिलदार यांनी प्रदान

करावी. तहसिलदार यांनी सदर काम लेबर बजेटमध्ये समाविष्ट असल्याचे व सदर कामास ग्रामसभेची मान्यता प्राप्त असल्याची/ग्रामपंचायतीचा ठराव प्राप्त असल्याची खात्री करावी.

६. तहसिलदार यांनी कार्यारंभ आदेश दिल्यांनतर कामास प्रत्यक्ष सुरूवात करण्यात यावी. ग्रामरोजगार सेवकाने मजुरांनी केलेल्या कामाची नोंद हजेरीपत्रकात घेवून त्यावर स्वाक्षरी करावी व हजेरीपत्रकावर प्रतिस्वाक्षरी बांधकाम विभागाचे अधिकारी यांनी करावी. तसेच कंत्राटी तांत्रिक अधिकारी यांनी झालेल्या कामाची नोंद मोजमाप पुस्तकात घ्यावी व पंचायत समितीचे उपअभियंता, बांधकाम विभाग त्याची पडताळणी करतील. एकूण कामाच्या २५ टक्के पडताळणी (Check Measurement) पंचायत समितीचे उपअभियंता, बांधकाम विभाग करतील. हजेरीपत्रकाची पडताळणी झाल्यानंतर मजुरांना त्यांची मजुरी बँक/पोस्ट खात्यातून तहसिलदार यांच्या मार्फत प्रदान करण्यात येईल. साहित्यावरील होणाऱ्या खर्चाच्या पावत्या पंचायत समितीचे उपअभियंता, बांधकाम विभाग यांनी तहसिलदार यांना सादर केल्यांनतर तहसिलदार जिल्हा स्तरावरील मजुरी साहित्याचे ६० : ४० प्रमाण विचारात घेतील व मजुरी साहित्याच्या ६० : ४० प्रमाणात साहित्यावरील खर्च संबंधित विभागास ईएफएमएस द्वारे किंवा चेकद्वारे अदा करतील.

७. अंगणवाडी केंद इमारतीचे बांधकाम करतांना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना कायदा २००५, महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम १९७७ (दिनांक ०६ ऑगस्ट, २०१४ पर्यंत सुधारित) मधील तरतूदी यांचे तसेच केंद्र व राज्य शासनाने वेळोवेळी दिलेले निदेश यांचे पालन करणे बंधनकारक राहील.

८. सदर कार्यक्रमाचे देखरेख व संनियंत्रण उपजिल्हाधिकारी (रोहयो) व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बाल कल्याण), जिल्हा परिषद यांनी संयुक्तपणे करावे. तसेच योजनेचा दर तीन महिन्यांनी आढावा घ्यावा व त्याचा अर्थीक व भौतिक प्रगती अहवाल आयुक्त, महात्मा गांधी नरेगा आयुक्तालय नागपुर, नियोजन (रोहयो) विभाग व आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांना न चुकता सादर करावा.

९. साहित्यावरील होणाऱ्या खर्चाच्या पावत्या बांधकाम विभागाकडून तहसिलदार यांचेकडे सादर करण्यात येतील. एकूण खर्चापैकी महिला व बाल विकास विभागाने भरावयाच्या खर्चाचे देयक बांधकाम विभागाकडून उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बाल कल्याण), जिल्हा परिषद यांचेकडे सादर करावे व त्याप्रमाणे या खर्चाची रक्कम त्यांच्याकडून तहसिलदार यांना देण्यात येईल.

१०. सदर योजनेबाबत केंद्र शासनाकडून वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या मार्गदर्शक सूचना लागू राहतील.

११. सदर आदेश हे केंद्र शासनाचे उपरोक्त संदर्भीय आदेशाच्या अनुषंगाने व महिला व बाल विकास विभागाच्या अनौचारिक संदर्भ क्र. ३५०/२०१३, दिनांक १६ सप्टेंबर, २०१५ अन्वये मिळालेल्या सहमतीच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०९२३१२४२४१८८१६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.**

**(प्रभाकर देशमुख)**
सचिव (रोहयो व जलसंधारण)

**(संजय कुमार)**
प्रधान सचिव (महिला व बाल विकास विभाग)

**प्रत,**

१. मा. राज्यपालांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मुख्य सचिवांचे स्वीय सहाय्यक,
५. सर्व अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई,
६. संचालक, अर्थ व सांख्यिकी संचानालय,
७. महासंचालक, माहिती व जनसपर्क मंत्रालय, मुंबई (प्रसिध्दीकरिता),
८. आयुक्त, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना आयुक्तालय, नागपुर
९. आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, पुणे
१०. आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे
११. सर्व विभागीय आयुक्त
१२. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१३. सर्व विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास विभाग
१४. सर्व जिल्हा कार्यक्रम समन्वयक तथा जिल्हाधिकारी (मुंबई व मुंबई उपनगर वगळून),
१५. सर्व उपजिल्हा कार्यक्रम समन्वयक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,(मुंबई व मुंबई उपनगर वगळून),
१६. सर्व उपमुख्य कार्यकारी अधिकारी, (बाल कल्याण), जिल्हा परिषद
१७. सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी

१८. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर,

१९. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर,

२०. उप सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ रोजगार हमी समिती, महाराष्ट्र विधानमंडळसचिवालय, मुंबई,

२१. सर्व विशेषकार्य अधिकारी व पदसिध्द उपविकास आयुक्त(रोहयो),विभागीयआयुक्त कार्यालय,

२२. सर्व कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग,

२३. सर्व कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद सिंचन विभाग,

२४. सर्व गट विकास अधिकारी,

२५. सर्व तहसीलदार,

२६. सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी (ग्रामीण/आदिवासी/नागरी)

२७. सर्व उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, नियोजन विभाग (रोहयो) विभाग, मंत्रालय, मुंबई

२८. उप सचिव (कार्यासन ६) महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

२९. निवडनस्ती- रोहयो-१

# # PLAN OF ANGANWADI #

*Name of Work :-*

*Type Estimate for Construction of Aanganwadi Building.*




(NOT TO SCALE)

**परिशिष्ट क्र. ५.१**

शालेय पोषण आहार योजने अंतर्गत शिजवलेले
अन्न देण्यासाठी नवीन सूत्रानुसार अनुदान उपलब्ध
करुन देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शासन निर्णय, क्रमांक :- शापोआ-२००४/(२४६/०४)/प्राशि-४.
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०००३२.
दिनांक :- ३१ मार्च, २००५.

पहा :-
१) शासन निर्णय, क्रमांक-पुप्राशा-१०९५/२१३४/प्राशि-२, दिनांक २२ नोव्हेंबर, १९९५.
२) शासन निर्णय, क्रमांक-शापोआ-१००२/(१२७५/०२)/प्राशि-४, दिनांक १६ मे, २००२.
३) शासन निर्णय, क्रमांक-शापोआ-२००२/(१३४१/०२)/प्राशि-४, दिनांक २१ डिसेंबर, २००२.
४) शासन निर्णय, क्रमांक-शापोआ-२००२/(१४१०/०२)/प्राशि-४, दिनांक २८ जानेवारी, २००३.
५) शासन निर्णय, क्रमांक-शापोआ-२००३/(३४/०३)/प्राशि-४, दिनांक ०३ मार्च, २००३.
६) शासन परिपत्रक क्रमांक-शापोआ-२००३/(१११/(०३)/प्राशि-४, दिनांक १८ जून २००३.
७) सचिव, मानव संसाधन विकास मंत्रालय, प्राथमिक शिक्षण आणि साक्षरता विभाग, नवी दिल्ली यांचे अर्थ शासकीय पत्र क्रमांक - ११-१/२००४/ईई-५/(एमडीएम), दि. ०६ ऑक्टोबर, २००४ व अर्धशासकीय पत्र क्र. १(२)/२००४-डेस्क (एमडीएम) दि. ३/१२/२००४
८) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक - शाएेआ-२००४-०५/पुमाअ/प्राशिसं-३०२/५९०७, दिनांक २८ ऑक्टोबर, २००४

प्रस्तावना :-

प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरण करण्याच्या दृष्टीने तसेच प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांचे पट नोंदणी व उपस्थितीचे प्रमाण वाढविण्यासाठी आणि गळती थांबविण्याकरिता, राज्यामध्ये सन १९९५-१९९६ पासून अनुदानित, अंशत अनुदानित शाळा, वस्ती शाळा, महात्मा फुले शिक्षण हमी योजनेअंतर्गत शैक्षणिक केंद्रे, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व शाळा, अनुदानित अपंग शाळा यातील इयत्ता १ ली ते ५ वीतील विद्यार्थ्यांची मासिक उपस्थिती किमान ८० टक्के असल्यास, त्यांना प्रति विद्यार्थी प्रतिमहा ३ किलो तांदूळ देण्याची केंद्र पुरस्कृत शालेय पोषण आहार योजना कार्यान्वित होती.

जिल्हास्तरीय/महानगरपालिका/नगरपालिका स्तरावरील संनियंत्रण व मार्गदर्शन समिती –

जिल्हास्तरीय समिती

जिल्हास्तरावर जिल्हा शिक्षण सल्लागार समिती व गट पातळीवर गट शिक्षण सल्लागार समिती, या योजनेचे संनियंत्रण व मार्गदर्शन समिती म्हणून काम पाहील.

महानगरपालिका/नगरपालिका स्तरावरील समिती

| | |
|---|---|
| अध्यक्ष, शिक्षणमंडळ/ शिक्षण समिती | अध्यक्ष |
| शिक्षण समितीमधील दोन सदस्य | सदस्य |
| दोन नगरसेवक | सदस्य |
| शिक्षणाधिकारी / प्रशासन अधिकारी शिक्षण मंडळ / शिक्षण समिती | सदस्य सचिव |

शिक्षण समितीमधील दोन सदस्य व नगरसेवक यांची नियुक्ती अध्यक्ष करतील.

५. वित्तीय भार :-

या योजनेअंतर्गत प्रत्येक विद्यार्थ्यांमागे दरमहा ३ किलो तांदूळ केंद्रशासनाकडून उपलब्ध होणार आहे. भाताबरोबरील इतर पदार्थ देणग्या व निधी इत्यादिद्वारे उपलब्ध करुन घ्यावयाचे आहेत. मात्र आदिवासी भागाकरिता संबंधित अंमलबजावणी समितीस रु. ०.२५ प्रतिदिन प्रतिउपस्थित विद्यार्थी एवढे अनुदान शासनामार्फत देण्यात येईल. बिगरआदिवासी क्षेत्रासाठी कोणतेही शासकीय अनुदान देय असणार नाही. परंतु सर्वतोपरी प्रयत्न करुनही ज्या अंमलबजावणी यंत्रणांना स्थानिक सहभागातून शिजवलेले अन्न देणे शक्य होणार नाही. त्यांनी पूर्वीप्रमाणे ८० टक्के उपस्थिती असणाऱ्या विद्यार्थ्यांना महिनाअखेर ३ किलो तांदूळ अंमलबजावणी यंत्रणेमार्फत देण्याची व्यवस्था करावी.

६. वरील योजनेची अंमलबजावणी जून २००२ पासून करावयाची असल्यामुळे शिक्षण संचालक (प्राथमिक) यांनी आवश्यक ती कार्यवाही त्वरित सुरु करावी व विहित कालावधीत योजनेची अंमलबजावणी सुरु होईल याची दक्षता घ्यावी.

७. शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना दुपारचे भोजन देण्याची योजना राबविण्या संदर्भात तांदूळाची वाहतुक/ अस्थापना शिधापत्रिकांद्वारे तांदळाचे वाटप इत्यादी नवीन कार्यपध्दतीबाबतची कार्यवाही अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाशी संबंधित असल्यामुळे या कार्यपध्दतीचे आदेश त्या विभागाकडून स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

८. सदर आदेश नियोजन विभाग व वित्त विभागाच्या सहमतीने वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ५८१/२००२, व्यय-६, दि. २६.४.२००२ अन्वये निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(माधुरी कोकणे)
सहसचिव, महाराष्ट्र शासन

टीप : तक्रार निवारण केंद्र टोल फ्री क्रमांक 18002339988

[illegible], त्यात आवश्यक ते बदल करुन घेणे मुदतवाढ मिळविणे ही सर्व कार्यवाही शिक्षण संचालक (प्राथमिक) यांनी जिल्हास्तरावरील नियंत्रक अधिकाऱ्यांच्या मदतीने पार पाडावी.

१२) आस्थापना शिधापत्रिका देण्यासाठी सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषदा, प्रशासन अधिकारी/शिक्षणाधिकारी, महानगरपालिका/नगरपालिका/कटकमंडळे यांनी त्यांच्या कार्यक्षेत्राखालील सर्व पात्र शाळांची यादी अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने विहित केलेल्या पुढील प्रपत्रात एका आठवडयात तहसिलदार/अन्नधान्य नियंत्रण अधिकारी/ शिधावाटप अधिकारी, मुंबई यांना द्यावी व त्याची प्रत जिल्हा पुरवठा अधिकारी/ नियंत्रक शिधावाटप यांना द्यावी.

| तालुका/वॉर्ड.......... | | | जिल्हा........... | | |
|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | शाळेचे नाव | गाव/वॉर्ड | योजनेस पात्र विद्यार्थीसंख्या | मासिक अनुज्ञेय तांदूळ (किलोमध्ये) | ज्यांना तांदूळ द्यावयाचा त्या अंमलबजावणी यंत्रणेचे नाव |
| १ | | | | | |
| २ | | | | | |
| | | | | | गट/वॉर्ड/पालिका शिक्षण अधिकाऱ्यांची सही |

१३) या योजनेअंतर्गत दरमहा रास्त भाव दुकानदारांकडून किती तांदूळ आणला व किती वापरला याचा हिशोब अंमलबजावणी यंत्रणेने ठेवावा. शाळेच्या मुख्याध्यापकाने पुढील महिन्याच्या एक तारखेस हा हिशोब गटशिक्षणअधिकाऱ्यास सादर करावा.

४. संनियंत्रण समित्या :-

या योजनेची अंमलबजावणी सुयोग्य पध्दतीने होण्यासाठी पुढीलप्रमाणे संनियंत्रण समित्या राहतील :-

राज्यस्तरीय संनियंत्रण व मार्गदर्शन समिती

| | |
|---|---|
| १) प्रधान सचिव/सचिव, शालेय शिक्षण | अध्यक्ष |
| २)प्रधान सचिव/सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग | सदस्य |
| ३)प्रधान सचिव/सचिव, महिला व बालविकास विभाग | सदस्य |
| ४)प्रधान सचिव/सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग | सदस्य |
| ५)सहसचिव/उप सचिव (प्राथमिक) शालेय शिक्षण | सदस्य-सचिव |

४) भारतीय अन्न महामंडळाच्या गोदामापासून रास्त भाव दुकानापर्यंत तांदूळ वाहतूक करण्याची व्यवस्था अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागामार्फत करण्यात येईल.

५) शाळेसाठी असलेल्या अंमलबजावणी यंत्रणेने प्राधिकृत केलेल्या व्यक्तीस व प्राधिकृत केलेल्या मर्यादेपर्यंत (किलोग्रॅम) रास्त भाव दुकानातून धान्याची उचल करता येईल.

६) दुपारच्या जेवणातील भाताचा तांदूळ केंद्रशासनाकडून उपलब्ध होणार आहे. मात्र भाताबरोबर द्यावयाचे अन्य पदार्थ ( वरण/ पालेभाजी/ भाजी/ दही/ दुध इ.) संबंधित समित्या, शाळा व्यवस्थापने, लोकांच्या सहभागाने, देणगी / वर्गणी स्वीकारुन विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन देतील. यामध्ये लोकप्रतिनिधी, शिक्षक, शैक्षणिक संस्था, सामाजिक संस्था, प्रशासकीय यंत्रणेतील अधिकारी/ कर्मचारी इत्यादिंचा सक्रीय सहभाग अपेक्षित आहे.

७) प्रस्तुत योजनेअंतर्गत देण्यात येणाऱ्या जेवणासाठी विद्यार्थ्यांनी स्वतःची थाळी आणणे आवश्यक आहे.

८) उपरोक्त माध्यमातून प्राप्त होणारा निधी जमा करण्यासाठी शिक्षणमंडळ/ शिक्षण समिती ग्रामशिक्षण समिती यांचे वेगळे खाते, समितीचे अध्यक्ष व सदस्य सचिव यांच्या नावाने संयुक्तरित्या उघडावे. खाजगी अनुदानित शाळांसाठी व्यवस्थापनाचे अध्यक्ष व शाळेचे मुख्याध्यापक यांच्या नावाने संयुक्त खाते उघडावे.

९) अंमलबजावणी यंत्रणा, विद्यार्थ्यांची स्थानिक आवड लक्षात घेऊन जेवणातील पदार्थ निश्चित करेल. (वरण-भात/सांबार-भात/खिचडी/ भाजी-भात, दुधभात, दहीभात, पेज इ.) जेवणातील पदार्थ आवश्यक त्या बदलासह ठरविण्यात यावेत.

१०) सदर योजनेकरिता जिल्हास्तरावर (नगरपालिकांसह), शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हापरिषद हे ''नियंत्रक अधिकारी'' म्हणून काम पाहतील व राज्यस्तरावर शिक्षण संचालक (प्राथमिक शिक्षण), नियंत्रक अधिकारी म्हणून काम पाहतील. महानगरपालिकांसाठी संबंधित शिक्षणाधिकारी, प्रशासन अधिकारी (शिक्षण मंडळ) हे नियंत्रक अधिकारी म्हणून काम पाहतील.

११) प्रस्तुत योजनेमध्ये दुपारचे भोजन शिजवून द्यावयाचे असल्यामुळे तांदूळ वेळेवर उपलब्ध करुन घेणे आवश्यक आहे. त्याकरिता गतवर्षीची विद्यार्थीसंख्या, चालू वर्षीची संभाव्य विद्यार्थीसंख्या याआधारे केंद्रशासनाकडून जिल्हानिहाय व गटनिहाय तांदूळ नियतन मंजूर करुन घेणे ते सर्व जिल्हयांना/तालुक्यांना व अन्न महामंडळास

शालेय न्यायालयाने दिलेल्या निकालाच्या अनुषंगाने, अनुरुप शाळांमधील इयत्ता १ ली ते ५ वीच्या विद्यार्थ्यांना दररोज ३०० कॅलरीज आणि ८ ते १२ ग्रॅम प्रोटीनयुक्त शिजवलेले अन्न द्यावयाचे आहे. त्यानुसार राज्य शासनामार्फत डिसेंबर, २००२ पासून प्रति विद्यार्थी प्रतिदिन रुपये ०.५० इतके अनुदान, अन्न शिजविण्यासाठी संबंधित अंमलबजावणी यंत्रणांना देण्यात येते. यातून संबंधित अंमलबजावणी यंत्रणा विद्यार्थ्यांची स्थानिक आवड लक्षात घेवून जेवणातील पदार्थ निश्चित करतात. उदा. - वरण भात/सांभार भात/ खिचडी/भाजी भात/दूध भात/दही भात/ पेज इत्यादी. या जेवणातील पदार्थांमध्ये आवश्यक ते बदल ठरविता येतात. तथापि, सदर अनुदान शिजवलेले अन्न देण्यासाठी पुरेसे होत नसल्यामुळे, केंद्र शासनाकडे अतिरिक्त अनुदानांची मागणी वेळोवेळी करण्यात येत होती. तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाने नियुक्त केलेल्या विशेष आयुक्तांनी विद्यार्थ्यांच्या जेवणात प्रथिने असलेले अन्न शिजवून देण्यासाठी प्रति विद्यार्थी प्रतिदिन किमान रुपये २.०० एवढे अनुदान आवश्यक असल्याचे सुचविले होते. केंद्र शासनाने त्यांच्या दिनांक ०६ ऑक्टोबर, २००४ च्या पत्रान्वये शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत प्रति विद्यार्थी प्रतिदिन रुपये १.०० या प्रमाणे दिनांक ०१ सप्टेंबर, २००४ पासून अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय

शालेय पोषण आहार योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना अन्न शिजवून देण्यासाठी राज्य शासनाचे प्रति विद्यार्थी प्रतिदिन रुपये ०.५० व केंद्रशासनाकडून मिळणारे प्रति विद्यार्थी प्रतिदिन रुपये १.०० अशी एकूण प्रति विद्यार्थी प्रतिदिन रुपये १.५० इतके अनुदान उपलब्ध होत आहे. अन्न शिजवून देण्यासाठी कमी विद्यार्थी संख्या असलेल्या शाळांना दरडोई जास्त खर्च येतो व जास्त विद्यार्थी संख्या असलेल्या शाळांना दरडोई कमी खर्च येतो, हे विचारात घेवून केंद्र शासनाकडून मिळणारे अनुदान व राज्य शासनाकडून देण्यात येणारे अनुदान शाळांना वितरित करण्यासाठी अनुदान सूत्राचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. शासन आता या आदेशाद्वारे सन २००४-२००५ या शैक्षणिक वर्षाच्या दुसऱ्या सत्रापासून पुढीलप्रमाणे अनुदान सत्र मंजूर करीत आहे :-

| अ.क्र. | विद्यार्थी/शाळांची संख्या | अनुदान |
|---|---|---|
| १ | १ ते ७५ पटसंख्या (१३,६२,२२३ विद्यार्थी) | रुपये १.७५ प्रति विद्यार्थी प्रतिदिन |
| २ | ७६ ते २५० पटसंख्या (४२,०३,९६८ विद्यार्थी) | रुपये १.५० प्रति विद्यार्थी प्रतिदिन परंतु किमान रुपये १३०/- प्रतिशाळा. |
| ३ | २५१ ते पुढील पटसंख्या (४१,३३,८०९ विद्यार्थी) | रुपये १.२५ प्रति विद्यार्थी प्रतिदिन परंतु किमान रुपये ३७५/- प्रतिशाळा. |

तसेच शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत येणाऱ्या लाभार्थी विद्यार्थ्यांना कॅलशियम व आयर्नच्या गोळया देण्यासाठी या योजनेअंतर्गत खर्च करण्यास शासन मंजुरी देत आहे.

२. या आदेशाची अंमलबजावणी वेळोवेळी देण्यात आलेल्या आदेशानुसार तसेच खालील कार्यपध्दतीनुसार करण्यात यावी.

दुपारच्या जेवणातील तांदूळ केंद्र शासनाकडून उपलब्ध होणार आहे. वरील सूत्रानुसार उपलब्ध होणाऱ्या तरतूदीतून खिचडीसाठी प्रति विद्यार्थी प्रति दिन आवश्यक असलेले पूरक पदार्थ (डाळ, भाजी, तेल, तिखट, हळद, मसाला, इत्यादी) तसेच इंधन व मजूरी सादर खर्च

करण्यात यावा या तरतुदीमधूनच विद्यार्थ्यांना आठवड्यातून किमान एकदा इतर पोषक (केळी, अंडी, बिस्किटे इ.) आहारही देण्यात यावा.

या योजनेसाठी केंद्र शासनाकडून मिळालेले अनुदान रुपये १३९.९५४४ कोटी इतकी रक्कम पुरवणी मागणीद्वारे उपलब्ध झालेली आहे. सदरहू रक्कम ''२२०२-सर्वसाधारण शिक्षण-०१ प्राथमिक शिक्षण, १०३ - प्राथमिक शिक्षणासाठी स्थानिक संस्थांना सहाय्य-(०१)(०१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम १८२ अन्वये जिल्हापरिषदांना सप्रयोजन अनुदाने - (२२०२०१७३)'' या लेखाशिर्षातून फक्त जिल्हा परिषदांना वितरित करण्यास खालीलप्रमाणे शासनाची मान्यता देण्यात येत आहे :-

(अ) वर नमूद केलेल्या अनुदान सूत्रानुसार प्रत्यक्ष अनुदान, दिनांक ३१ मार्च, २००५ पासून सर्व जिल्हा परिषदांना वितरित करण्यात यावे. जिल्हा परिषदांनी शासनाच्या मान्यतेशिवाय सदर अनुदानाचे वितरण ग्राम शिक्षण समित्यांना करु नये. या पैशाचा विनियोग विहित कारणासाठीच करण्यात येईल याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यावर राहील.

(ब) १) सदर अनुदान केंद्र शासनाकडून दिनांक ०१ सप्टेंबर, २००४ पासुन प्राप्त झाले असल्याने व सुधारित अनुदान सूत्रानुसार खर्च झालेला नसल्याने, या रकमेतून शाळेसाठी स्वयंपाक खोली तथा भांडारगृह वापरण्यात यावे.

२) अन्न शिजविण्यासाठी गॅस कनेक्शन, संबंधित शाळेच्या नावावर विकत घ्यावे. मात्र सिलेंडरमधील गॅस भरण्याची जबाबदारी संबंधित ठेकेदाराची राहिल. गॅस कनेक्शनची मालकी शाळेच्या नावावर असेल.

३) अन्न शिजविण्यासाठी लागणारी स्वयंपाकाची सर्व भांडी या अनुदानातून खरेदी करण्यात यावीत व ती संबंधित अंमलबजावणी यंत्रणेकडे सुपूर्द करण्यात यावीत. खरेदी केलेल्या भांडयाची मालकी संबंधित शाळेची राहील.

क) उपरोक्त ''ब'' येथील कार्यवाहीमध्ये बांधकाम व खरेदी होणार असल्याने, संपूर्ण राज्यात त्यात एकसूत्रीपणा व समानीकरण असणे आणि गैरव्यवहार टाळणे आवश्यक आहे. ही बाब लक्षात घेता जिल्हा परिषदांमार्फत हा निधी ग्राम शिक्षण समित्यांकडे मुक्त करतांना, प्रत्येक ग्राम शिक्षण समितीकडून स्वयंपाकगृह व भांडारगृहाचा आराखडा, गॅस शेगडी दर करारानुसार खर्च आणि जूनपासून अन्न शिजविण्यास लागणारा खर्च याबाबतचा, संपूर्ण कामकाजनिहाय निश्चित आराखडा (प्रस्तावित किंमतीसह) तयार करुन त्यास शासनाची मंजूरी घ्यावी व नंतरच पुढील प्रक्रिया सुरु करावी.

४. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या सूचनानुसार शालेय पोषण आहार योजनेसंबंधी केंद्रशासनाने नवीन मार्गदर्शक सूचना २००४ संपूर्ण देशाकरिता निगिमित केल्या आहेत. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार केंद्रशासनाने शालेय पोषण आहार योजनेच्या स्वरुपात बदल केलेला आहे.

राज्यस्तर, जिल्हास्तर व तालुकास्तरावर तसेच शिक्षण संचालनालयाने प्रस्तावित केल्यानुसार ग्रामीण स्तर व महानगरपालिका स्तरावर खालीलप्रमाणे समित्या गठीत करण्यास शासनाची मंजूरी देण्यात येत आहे :-

१) राज्यस्तर समिती

| अ.क्र . | सदस्यत्वाचा प्रकार | पदनाम |
|---|---|---|
| १ | अध्यक्ष | मुख्यसचिव/ अतिरिक्त मुख्य सचिव |
| २ | सदस्य | सचिव, शालेय शिक्षण (राज्य नोडल अधिकारी) |
| ३ | सदस्य | सचिव, वित्त |
| ४ | सदस्य | सचिव, सार्वजनिक आरोग्य |
| ५ | सदस्य | सचिव, अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण |
| ६ | सदस्य | १) सचिव, ग्रामविकास विभाग<br>२) सचिव नगरविकास विभाग |
| ७ | सदस्य | अन्न महामंडळाचे राज्यस्तरीय अधिकारी |
| मा. अध्यक्षांच्या सहमतीने नियुक्त करावयाचे इतर सदस्य | | |
| ८. | सदस्य | आहारासंबंधी २ तज्ञ सदस्य (एक महिला सदस्य) |
| ९ | सदस्य | पोषण आहारात सहभागी असलेले शिक्षण व आरोग्य संबंधित ४ तज्ञ सदस्य (पैकी २ महिला सदस्य) |
| १० | सदस्य | ३ ते ५ जिल्हयांचे अधिकारी किंवा मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षण संचालक |
| ११ | सदस्य सचिव | उपसचिव, शालेय शिक्षण (प्राथमिक) |

राज्यस्तरीय समितीची कार्यकक्षा व कामे :-

१) समितीच्या वर्षातून किमान दोन बैठका घेण्यात याव्यात.

२) तांदूळ नियतन/उचल/वाटपाचा आढावा घेण्यात यावा.

३) जिल्हा व संचालनालय स्तरावरील समितीस मार्गदर्शन करावे.

४) केंद्र शासनाकडून मागविण्यात आलेल्या धोरणात्मक मुद्द्यांबाबत निर्णय घ्यावा.

५) योजना राबविण्यासंबंधी कार्यरत असलेल्या प्रशासकीय विभागांशी समन्वय साधावा.

६) सामाजिक सहभाग घेऊन योजना राबविण्याबाबत धोरण निश्चित करावे.

२) जिल्हास्तर समिती

| अ.क्र. | सदस्यत्वाचा प्रकार | पदनाम |
|---|---|---|
| १ | अध्यक्ष | जिल्हाधिकारी |
| २ | सहअध्यक्ष | मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा नोडल अधिकारी) |
| ३ | सदस्य | जिल्हा शल्यचिकित्सक / जिल्हा आरोग्य अधिकारी |
| ४ | सदस्य | जिल्हा पुरवठा अधिकारी |
| ५ | सदस्य | अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. व प्रशासन अधिकारी, न. पा. १ प्रतिनिधी |
| ६ | सदस्य | अन्न महामंडळाचे जिल्हास्तरीय अधिकारी |
| मा. अध्यक्षांच्या सहमतीने नियुक्त करावयाचे इतर सदस्य | | |
| ७ | सदस्य | आहारासंबंधी १ तज्ञ सदस्य |
| ८ | सदस्य | पोषण आहारात सहभागी असलेले शिक्षण व आरोग्य संबंधित ४ तज्ञ सदस्य (पैकी २ महिला सदस्य व १ माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक) |
| ९ | सदस्य | ३ ते ५ जिल्हयांचे गटशिक्षणाधिकारी किंवा प्रशासन अधिकारी, नगरपालिका शिक्षणाधिकारी (माध्यमिक) |
| १० | सदस्य | सचिव शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद |

जिल्हास्तर समितींची कार्यकक्षा व कामे :-

१) समितीच्या वर्षातून किमान तीन बैठका घेण्यात याव्यात.

२) तांदूळ नियतन/उचल/वाटपाचा आढावा घेण्यात यावा.

३) लाभार्थी संख्येचा तालुकावार आढावा घेणे, लाभार्थी वाढविण्यासाठी प्रयत्न करावा.

४) धोरणात्मक निर्णयाचे ठराव राज्यस्तरीय समितीस सादर करावे.

५) योजना राबविण्यासंबंधी कार्यरत असलेल्या प्रशासकीय विभागांशी समन्वय साधावा.

३) तालुकास्तर समिती

| अ.क्र. | सदस्यत्वाचा प्रकार | पदनाम |
|---|---|---|
| १ | अध्यक्ष | उपविभागीय अधिकारी |
| २ | सहअध्यक्ष | तहसिलदार |
| ३ | सदस्य | वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र |
| ४ | सदस्य | अधिकारी पंचायत समिती व प्रशासन अधिकारी नगरपालिका |

टीप : तक्रार निवारण केंद्र टोल फ्री क्रमांक १८००२३३९९८८

| | | |
|---|---|---|
| ५ | सदस्य | अन्न महामंडळाचे तालूकास्तरीय अधिकारी |
| मा. अध्यक्षांच्या सहमतीने नियुक्त करावयाचे इतर सदस्य | | |
| ६ | सदस्य | आहारासंबंधी १ तज्ञ सदस्य |
| ७ | सदस्य | पोषण आहारात सहभागी असलेले शिक्षण व आरोग्य संबंधित ४ तज्ञ सदस्य (पैकी २ महिला सदस्य) |
| ८ | सदस्य | ३ ते ५ गावांचे आहारतज्ञ पंचायत समितीचे सदस्य |
| ९ | सदस्य | सचिव गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती |

तालूका समितीची कार्यकक्षा व कामे :-

१) समितीच्या प्रत्येक महिन्यात बैठका घेण्यात याव्यात.

२) तांदूळ उचल / वाटपाचा आढावा घेण्यात यावा.

३) मागील महिन्याची उचल निश्चित करुन पुढील महिन्याच्या नियतनाची मागणी करावी.

४) तांदूळ उचल/वापटपातील अडचणी दूर कराव्यात.

५) योजना राबविण्यासंबंधी कार्यरत असलेल्या तालूक्यातील कार्यालयांशी समन्वय साधावा.

शिक्षण संचालनालय स्तरावर प्रस्तावित करण्यात आलेल्या समित्या :-

१) संचालनालयस्तर समिती

| अ. क्र. | सदस्यत्वाचा प्रकार | पदनाम |
|---|---|---|
| १) | अध्यक्ष | शिक्षक संचालक (प्राथमिक) |
| २) | सहअध्यक्ष | शिक्षक संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) |
| ३) | सदस्य | सहसंचालक (प्राथमिक शिक्षण) |
| ४) | सदस्य | शिक्षणाधिकारी (माध्यमिक) |
| ५) | सदस्य | जिल्हा आरोग्य अधिकारी, पुणे |
| ६) | सदस्य | जिल्हा पुरवठा अधिकारी, पुणे |
| ७) | सदस्य | सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक |
| ८) | सदस्य | शिक्षणाधिकारी - ८ जिल्हे |
| मा. अध्यक्षांच्या सहमतीने नियुक्त करावयाचे इतर सदस्य | | |
| ९) | सदस्य | आहारासंबंधी १ तज्ञ सदस्य |
| १०) | सदस्य | पोषण आहारात सहभागी झालेले शिक्षण व आरोग्य संबंधित तज्ञ सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ११ | सदस्य सचिव | शिक्षण उपसंचालक |

संचालयनालयस्तर समितीची कार्यकक्षा व कामे :-

१) समितीच्या वर्षातून किमान तीन बैठका घेण्यात याव्यात.

२) तांदूळ नियतन/उचल/वाटपाचा आढावा घेण्यात यावा.

३) जिल्हावार लाभार्थ्यांचा आढावा (अन्न शिजवून देणे) घ्यावा.

४) योजना राबविणे व गुणवत्ता उंचावणेबाबत मार्गदर्शन करावे.

५) योजना राबविण्यासंबंधी कार्यरत असलेल्या जिल्हयातील कार्यालयांशी समन्वय साधावा.

२) महानगरपालिका स्तर समिती :-

| अ.क्र. | सदस्यत्वाचा प्रकार | पदनाम |
|---|---|---|
| १ | अध्यक्ष | आयुक्त |
| २ | सहअध्यक्ष | अतिरिक्त आयुक्त |
| ४ | सदस्य | आरोग्य अधिकारी, महानगरपालिका |
| ५ | सदस्य | अन्नधान्य पुरवठा निरीक्षक |
| मा. अध्यक्षांच्या सहमतीने नियुक्त करावयाचे इतर सदस्य | | |
| ६ | सदस्य | आहारासंबंधी २ तज्ञ सदस्य खाजगी व महानगरपालिका शाळेतील प्रत्येकी एक (एक महिला) |
| ७ | सदस्य | पोषण आहारात सहभागी असलेले शिक्षण व आरोग्य संबंधित २ तज्ञ सदस्य |
| ८ | सदस्य सचिव | शिक्षणाधिकारी अथवा तत्सम अधिकारी, महानगरपालिका |

महानगरपालिका स्तर समितीची कार्यकक्षा व कामे :-

१) समितीच्या वर्षातून किमान २ बैठका घेण्यात याव्यात.

२) महानगरपालिका कार्यक्षेत्रातील अनुज्ञेय शाळांच्या (खाजगीसह) तांदूळउचल व अन्न शिजवून देण्याचा आढावा घ्यावा.

३) महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्व खाजगी शाळांचा समावेश करण्याबाबत प्रयत्न करावेत.

४) पुरविण्यात येणाऱ्या अन्नाच्या दर्जाची पाहणी/तपासणी करावी.

५) योजना राबविण्यासंबंधी कार्यरत असलेल्या खाजगी शाळांशी समन्वय साधावा.

३) ग्रामस्तर समिती :-

| अ.क्र. | सदस्यत्वाचा प्रकार | पदनाम |
|---|---|---|
| १ | अध्यक्ष | सरपंच/ग्राम शिक्षण समितीचे अध्यक्ष |
| २ | सदस्य | आरोग्य सेविका/सेवक |
| ३ | सदस्य | विस्तार अधिकारी |
| ४ | सदस्य | केंद्र मुख्याध्यापक |
| ५ | सदस्य | गाव कामगार, तलाठी व ग्रामसेवक |
| मा. अध्यक्षांच्या सहमतीने नियुक्त करावयाचे इतर सदस्य | | |
| ६ | सदस्य | ग्रामशिक्षण समितीच्या सदस्य (महिला) |
| ७ | सदस्य सचिव | मुख्याध्यापक, सचिव, ग्राम शिक्षण समिती |

ग्रामस्तर समितीची कार्यकक्षा व कामे :-

१) समितीची आठवडयातून एक बैठक घेण्यात यावी.

२) मुलांना जेवण देण्यापूर्वी किमान अर्धातास अगोदर समितीच्या सदस्याने जेवणाची प्रत तपासल्याची खात्री करावी.

३) रास्त भाव दुकानातून प्राप्त झालेल्या तांदळाची प्रत तपासावी.

४) शासनाच्या सूचनांनुसार कार्यक्रम राबविला जातो किंवा नाही हे पहावे.

शालेय पोषण आहार योजनेसंबंधी, शासन निर्णय दिनांक २२ नोव्हेंबर १९९५ व १६ मे २००२ अन्वये सनियंत्रणासाठी नेमलेल्या समित्या या आदेशामुळे बरखास्त करण्यात येत आहेत.

५. वरील योजनेची अंमलबजावणी दिनांक ३१ मार्च २००५ पासून करावयाची असल्याने शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी आवश्यक ती कार्यवाही त्वरित सुरु करावी व विहित कालावधीत योजनेची अंमलबजावणी सुरु होईल याची दक्षता घ्यावी.

६. सदर आदेश वित्त विभागाच्या सहमतीने व त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक-८८४/अर्थोपाय दिनांक ३१/०३/२००५ अन्वये निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

संगणक सांकेताक क्र. : २००९०२१३१७४८१३०१

माधुरी कोकणे

(माधुरी कोकणे)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

शिक्षण संचालक, (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे

शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे

**परिशिष्ट क्र. ५.२**

**शालेय पोषण आहार योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी भरारी पथके आणि दक्षता पथके स्थापन करणेबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,**
**शासन निर्णय क्र.**शापोआ-२००९/प्र.क्र. २०७/प्राशि-४,
**मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक : १** जून, २००९

**प्रस्तावना :** शालेय पोषण आहार ही केंद्र पुरस्कृत योजना राज्यामध्ये इ.१ ली ते ५ वी च्या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येत होती. मागील आर्थिक वर्षापासून ही योजना इ.६ वी ते ८ वीच्या वर्गातील विद्यार्थ्यांसाठीही राबविण्यास सुरुवात झालेली आहे. राज्यामधील शाळांमधून ही योजना राबवित असताना विद्यार्थ्यांना आहाराचे वाटप कमी करणे, निकृष्ट प्रतीचा आहार मुलांना देणे, आहाराचे वाटपच न करणे, अशा स्वरुपाच्या तक्रारी शासनास वारंवार येत आहेत. त्यामुळे या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी भरारी आणि दक्षता पथकांमार्फत शाळांमध्ये अचानक तपासण्या करणे आवश्यक आहे. यासंदर्भात शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे:-

**शासन निर्णय :** शालेय पोषण आहार योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी प्रत्येक जिल्हयाच्या स्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या नियंत्रणाखाली भरारी पथक स्थापन करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. जिल्हा स्तरावरील भरारी पथक कार्यान्वित करण्यासाठी जिल्हापरिषदेमधील किंवा जिल्हयातील कोणत्याही विभागातील एक अधिकारी आणि दोन कर्मचारी यांची भरारी पथकामध्ये

टीप : तक्रार निवारण केंद्र टोल फ्री क्रमांक १८००२३३९९८८

नियुक्ती करुन या पथकामार्फत जिल्हयातील शाळांमध्ये शालेय पोषण आहार योजनेची अंमलबजावणी व्यवस्थित होत आहे किंवा कसे, याबाबत तपासणी करण्यात यावी.

३. या भरारी पथकामार्फत त्या जिल्हयामधील ग्रामीण तसेच नागरी भागातील(महानगरपालिका- नगरपालिका) शाळांची त्याचप्रमाणे खाजगी संस्थांच्या शाळांचीही तपासणी करण्यात यावी.

४. शिक्षणाधिकारी(प्राथमिक),जिल्हापरिषद यांनी मुख्य कार्यकारी अधिका-यांची मान्यता घेऊन वेळोवेळी भरारी पथकांमध्ये पाठविण्यासाठी जिल्हयातील कोणत्याही अधिकारी/कर्मचा-यांची नांवे निश्चित करावीत. त्यानंतर संबंधित पथकास शाळा तपासणीचा कार्यक्रम निश्चित करुन द्यावा. भरारी पथकाचा शाळा तपासणीचा कार्यक्रम गोपनीय ठेवण्यात यावा, जेणेकरुन अचानक शाळा तपासणी होऊन वस्तुस्थिती निदर्शनास येईल. भरारी पथक कार्यान्वित होण्यासाठी एक अधिकारी आणि किमान दोन कर्मचारी यांची वेळोवेळी नियुक्ती करण्यात यावी.

५. प्रत्येक जिल्हयामध्ये दरमहा किमान १० शाळांची भरारी पथकामार्फत तपासणी करण्यात यावी. भरारी पथकास शाळा तपासणी करताना आढळून आलेल्या बाबी, भरारी पथकाच्या प्रमुखाने तीन दिवसांच्या आत अहवाल सादर करुन मुख्य कार्यकारी अधिकारी आणि शिक्षणाधिकारी(प्राथमिक) यांच्या निदर्शनास आणाव्यात. सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर ज्या शाळांमध्ये योजनेच्या अंमलबजावणीमध्ये त्रुटी आहेत त्या शाळांमध्ये योजनेच्या अंमलबजावणीत सुधारणा करण्यात यावी. मात्र ही योजना राबवित असताना गैरव्यवहार होत असल्याचे आढळून आल्यास संबंधितांवर योग्य ती कारवाई करण्यात यावी.

६. शालेय पोषण आहार योजनेची अंमलबजावणी क्षेत्रीय यंत्रणेकडून व्यवस्थितरित्या करवून घेण्यात येत आहे, हे तपासण्यासाठी शिक्षण संचालक(प्राथमिक) यांचे नियंत्रणाखाली त्यांच्या कार्यालयात तसेच शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई येथे उपसचिव (प्राथमिक) यांच्या नियंत्रणाखाली दक्षता पथक गठीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

७. सदरच्या दक्षता पथकासाठी वेळोवेळी एक अधिकारी व किमान एक कर्मचारी यांची नियुक्ती करुन ती कार्यान्वित करण्यात यावीत. शिक्षण संचालनालय स्तरावरील तसेच शासन स्तरावरील दक्षता पथकांनी दरमहा प्रत्येकी किमान २ दौरे करुन शाळांना भेटी देणे आवश्यक आहे.

८. बृहन्मुंबई महानगरपालिकेअंतर्गत असलेल्या शाळांमध्ये शालेय पोषण आहार कार्यक्रमाची अंमलबजावणी तपासण्यासाठी शिक्षण उपसंचालक, मुंबई यांच्या नियंत्रणाखाली त्यांच्या कार्यालयात भरारी पथक गठीत करुन शाळा तपासण्यात याव्यात.

९. शालेय पोषण आहार योजनेची अंमलबजावणी करुन घेण्यासाठी भरारी पथकांनी/दक्षता पथकांनी तपासणी करण्याच्या बाबी संदर्भात सोबत जोडलेल्या परिशिष्ट ''अ'' मध्ये माहिती नमूद करण्यात आलेल्या आहेत.

१०. प्रत्येक जिल्हयाच्या भरारी पथकांनी केलेल्या शाळा भेटी कार्यक्रमाची माहिती संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथ.) तसेच शिक्षण उपसंचालक, मुंबई यांनी e-mail द्वारे परिशिष्ट ''ब'' मधील तक्त्यात सचिव, शालेय शिक्षण यांच्या अवलोकनसाठी maha.mdm.@rediffmail.com या e.mail address वर दरमहा दहा तारखेच्या आत पाठविण्याची दक्षता घ्यावी.

११. शालेय पोषण आहार योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी वरीलप्रमाणे भरारी पथकांमार्फत अचानक तपासण्या करण्यात येणार असल्या तरी संबंधित यंत्रणांनी नियमित तपासण्याही करणे आवश्यक आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर २००९०६०१२०५५१८००१ या क्रमांकान्वये प्रसिध्द करण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

1/6/09

**(प्रकाश साबळे)**
**अवर सचिव,महाराष्ट्र शासन**

टीप : तक्रार निवारण केंद्र टोल फ्री क्रमांक १८००२३३९९८८

## परिशिष्ट "अ"

**भरारी पथकाने शालेय पोषण आहार योजनेसंदर्भात शाळा तपासणी करण्यासंदर्भातील नमूना--**

१) जिल्हयाचे नांव :

२) तालुका :

३) शाळेचे नांव व पत्ता :

४) भरारी पथक प्रमुखाचे नाव :

५) भरारी पथकातील इतर सदस्य :

६) शाळा तपासणीचा दिनांक व वेळ :

**तपासणी अहवाल**

| तपशील | शाळेची पटसंख्या | उपस्थित विद्यार्थी | आहार वाटप केलेली विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|
| **इ.१ ली ते ५ वी** | | | |
| **इ.६ वी ते ८ वी** | | | |

**शाळेमध्ये वाटप केलेल्या आहाराची माहिती**

| | | |
|---|---|---|
| १) | नियमाप्रमाणे पुरेसा आहार दिला जातो काय? | होय/नाही |
| २) | विद्यार्थ्यांना वाटप केलेला आहार खाण्यास बेचव होता काय? | होय/नाही |
| ३) | आहाराबाबत विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रिया कशा आहेत? | चांगल्या/ब-या/ वाईट |
| ४) | प्राथमिक वर्गासाठी प्रती विद्यार्थी १०० ग्रॅम आणि उच्च प्राथमिक वर्गासाठी १५० ग्रॅम याप्रमाणे तांदुळ वापरण्यात आला काय? | होय/नाही |
| ५) | आहाराचे वाटप विद्यार्थिनीकडून करण्यात येते काय? | होय/नाही |

६) शालेय पोषण आहार योजना राबविण्यासाठी स्थानिक जनतेचे सहकार्य मिळते काय? होय/नाही

७) प्रत्यक्ष आहार वाटप केलेल्या विद्यार्थी संख्येपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना आहार वाटप करण्यात येते, असे दाखविण्यात येते काय? होय/नाही

८) आहार वाटपात मागील महिन्यामध्ये खंड पडला होता काय? होय/नाही

**सर्वसाधारण मूल्यमापन**

१) शालेय पोषण आहार योजना खालीलप्रमाणे राबवित असल्याचे आढळून आले:-

| उत्कृष्ट | चांगली | बरी | वाईट | गैरव्यवहार |
|---|---|---|---|---|

गैरव्यवहार असल्यास सविस्तर तपशील नमूद करावा______________________________

______________________________________________________________

______________________________________________________________

## परिशिष्ट "ब"

जिल्हयाचे नांव :-

महिना :-

[Only in MS.excel format]

| भरारी पथकांनी तपासलेल्या शाळांची संख्या | शालेय पोषण आहार वाटप व्यवस्थित असलेल्या शाळांची संख्या | आहार वाटप व्यवस्थित नसलेल्या शाळांची संख्या | "क" स्तभातील शाळांपैकी गैरव्यवहार होत असल्याचे आढळून आलेल्या शाळांची संख्या | "ड" स्तभापैकी किती शाळांसंदर्भात संबंधितांवर कारवाई करण्यात आली/सुरु करण्यात आली | "क" स्तंभातील शाळांपैकी किती शाळांमध्ये आहार वाटपात सुधारणा करण्याबाबत कार्यवाही करण्यात आली |
|---|---|---|---|---|---|
| (अ) | (ब) | (क) | (ड) | (इ) | (फ) |
| | | | | | |

परिशिष्ट क्र. ५.३

शालेय पोषण आहार योजनेमध्ये
सुधारणा करणेबाबत .....

# महाराष्ट्र शासन

**शासन निर्णय क्रमांक -शापोआ २००९ / प्रक्र १३६/प्राशि ४**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**मंत्रालय मुंबई ४०० ०३२**
**दिनांक १८ जून, २००९**

संदर्भ -१) शासन निर्णय क्र. पूप्राशा १०९५ / २१३४ / प्राशि २ दि. २२.११.१९९५
२) शासन निर्णय क्र. शापोआ १००२ / १२७५ / प्राशि ४ दि. १६.५.२००२
३) शासन निर्णय क्र. शापोआ २००२ /१३४१/०२/ प्राशि ४ दि. २१.१२.२००२
४)शासन निर्णय क्र. शापोआ १००२ /(१४१०/०२)/ प्राशि ४ दि. २८.१.२००३
५)शासन निर्णय क्र. शापोआ २००३ /(३४/०३)/ प्राशि ४ दि. ३.३.२००३
६)शासन निर्णय क्र. शापोआ २००४ /(२४६/०४)/ प्राशि ४ दि. ३१.३.२००५
७)शासन निर्णय क्र. शापोआ २००६ /(२०१/०६)/ प्राशि ४ दि. ३१.८.२००६
८)शासन निर्णय क्र. शापोआ २००७ /(२२१/०७)/ प्राशि ४ दि. २९.१२.२००७
९)शासन निर्णय क्र. शापोआ २००८ /प्रक्र २६४/ प्राशि ४ दि. ८.८.२००८

**प्रस्तावना -** प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्याच्या दृष्टीने तसेच प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांच्या पट नोंदणी व उपस्थितीचे प्रमाण वाढविण्यासाठी आणि शाळेतील विद्यार्थ्यांची गळती थांबविण्याकरिता दिनांक २२ नोव्हेंबर, १९९५ पासून केंद्र पुरस्कृत शालेय पोषण आहार योजना सुरु करण्यात आली आहे. केंद्र व राज्य शासनाच्या, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या, खाजगी संस्थांच्या अनुदानित व अंशत: अनुदानित शाळा, वस्तीशाळा, महात्मा फुले शिक्षण हमी योजना केंद्रे या ठिकाणी इयत्ता १ ली ते ८ वी पर्यतचे शिक्षण घेणारे विद्यार्थी शालेय पोषण आहार योजनेचे लाभार्थी आहेत.

शालेय पोषण आहार ही योजना केंद्र शासनाने सन १९९५-९६ मध्ये सुरु केली त्यावेळी या योजनेचे स्वरुप हे विद्यार्थ्यांना प्रतिमाह ३ किलो मोफत तांदूळ देणे (Take Home Supplement) अशा स्वरुपाचे होते. त्यानंतर सन २००१ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने शालेय पोषण आहार योजनेमध्ये विद्यार्थ्यांना तांदूळ घरी न देता शिजवलेले अन्न (Cooked Food) द्यावे, अशा स्वरुपाचे आदेश दिले. त्यानुसार सन २००२ पासून या

टीप : तक्रार निवारण केंद्र टोल फ्री क्रमांक १८००२३३९९८८

योजनेचं स्वरुप बदलून घरी तांदूळ देण्याऐवजी विद्यार्थ्यांना शाळेतच शिजवलेले अन्न देण्यात येत आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार या योजनेअंतर्गत इयत्ता १ ली ते ५ वी च्या विद्यार्थ्यांना ४५० उष्मांक (Calories) आणि १२ ग्रॅम प्रथिने (proteins) युक्त दुपारचे भोजन (Mid-Day Meal) लाभार्थ्यांना देण्यात येते. तसेच इयत्ता ६ वी ते ८ वी च्या विद्यार्थ्यांना ७०० उष्मांक (Calories) आणि २० ग्रॅम प्रथिने (proteins) युक्त दुपारचे भोजन (Mid-Day Meal) देण्यात येत आहे.

शालेय पोषण आहार योजनेची ग्रामस्तरावर अंमलबजावणी करण्यासाठी ग्राम शिक्षण समितीवर जबाबदारी सोपविण्यात आली असून, खाजगी शाळांबाबत संबंधीत शाळा व्यवस्थापनावर योजनेची अंमलबजावणी करण्याची (अन्न शिजवून देण्याची) जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे. या योजनेची अंमलबजावणी व्यवस्थित होत नाही. ब-याच ठिकाणी विद्यार्थ्यांना आहार शिजवून दिला जात नाही किंवा कमी आहाराचे वाटप विद्यार्थ्यांना करण्यात येते, अशा स्वरुपाच्या तक्रारी प्राप्त होत असतात. त्याचप्रमाणे काही ठिकाणी शालेय पोषण आहारापासून विद्यार्थ्यांना विषबाधा झाल्याच्या घटनाही घडलेल्या आहेत. त्यामुळे शालेय पोषण आहार योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यासाठी या योजनेमध्ये सुधारणा करण्यासंदर्भात उपाययोजना सुचविण्यासाठी शासनाने एक अभ्यास गट समिती गठीत केली होती. या अभ्यास गट समितीने राज्यातील विविध शाळांमध्ये पहाणी करुन तसेच इतर राज्यामध्ये योजनेची अंमलबजावणी कशा पध्दतीने करण्यात येत आहे याची पहाणी करुन या योजनेत अमुलाग्र सुधारणा करण्याच्या शिफारशी शासनास केलेल्या आहेत. त्यानुसार या योजनेमध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती. यासंदर्भात शासनाने खालील प्रमाणे निर्णय घेतलेले आहेत.

**शासन निर्णय -** शालेय पोषण आहार योजनेंतर्गत इयत्ता १ ली ते ५ वी या प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांना ४५० उष्मांक (Calories) आणि १२ ग्रॅम प्रथिने (proteins) युक्त

दुपारचे भोजन (Mid-Day Meal) तसेच इयत्ता ६ वी ते ८ वी च्या विद्यार्थ्यांना ७०० उष्मांक (Calories) आणि २० ग्रॅम प्रथिने (proteins) युक्त दुपारचे भोजन (Mid-Day Meal) देण्यासाठी सोबत जोडलेल्या <u>**परिशिष्ट-अ**</u> मध्ये नमूद केल्याप्रमाणे आहाराच्या पाककृतीमधून लाभार्थ्यांना आहार वाटप करण्यात यावे.

२. <u>**नागरी भागातील शाळांमध्ये आहार पुरवठयाची व्यवस्था**</u> - नागरी भागामध्ये असणा-या शाळांमध्ये (विशेषत: महानगरामध्ये) जागेची कमतरता असल्यामुळे अन्न शिजवून देण्यास अडचणी निर्माण होतात. त्यामुळे नागरी भागातील शाळांसाठी शालेय पोषण आहाराचा पुरवठा करण्यासाठी महिला मंडळे/ बचतगट/कंत्राटदार यांची नियुक्ती करण्यात येऊन त्यामार्फत आहार पुरवठा करण्यात येतो. त्याचप्रमाणे काही ठिकाणी नामांकित स्वयंसेवी संस्थांमार्फत चांगल्या प्रतीचा आहार पुरवठा होत असल्याचे आढळून आले आहे. नागरी भागातील शाळांमध्ये केंद्रीय स्वयंपाकघर कार्यप्रणाली (Central Kitchen System) अवलंबिण्यात येवून एकाच ठिकाणी आहार शिजविण्याची आणि सदर आहार हवाबंद डब्यातून संबंधित शाळांना पुरविण्याची आवश्यकता आहे. केंद्रीय स्वयंपाकघर पध्दतीमध्ये आहाराचा दर्जा चांगला ठेवण्यासाठी अत्याधुनिक मशिनरीचा वापर करण्यात येतो. <u>त्यामुळे नागरी भागातील शाळांमध्ये शालेय पोषण आहार शिजविण्यासाठी नामांकित संस्थांकडून अर्ज मागवून त्यामधून पात्र संस्थांची निवड करुन त्यांच्याकडे आहार वाटपाची योजना सोपवावी असा शासनाने निर्णय घेतलेला आहे.</u> त्यासाठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन Expression of Intrest मागविण्यात यावेत. नागरी भागातील शाळांसाठी ज्या नामांकित संस्था नियुक्त होतील त्या संस्थांच्या मागणीप्रमाणे सदर तांदूळ त्या संस्थांकडे पुरविण्यात यावा. नागरी भागामध्ये नामांकित स्वयंसेवी संस्थांनी आहाराच्या पाककृतीप्रमाणे (मेनूप्रमाणे) आवश्यक असणारे इतर अन्न घटक (उदा. कडधान्य, डाळी, मिठ, मिरची, तेल इ.) खरेदी करुन आहार पुरवठा करण्यात यावा.

३. या योजनेची अंमलबजावणी करीत असताना नागरी भागातील शाळा म्हणजे महानगरपालिका, नगरपालिका क्षेत्रातील शासकीय आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या तसेच खाजगी संस्थांच्या शाळा राहतील. नागरी भागामध्ये स्वयंसेवी संस्थेमार्फत केंद्रीय स्वयंपाक पध्दतीने आहार पुरविण्याचे काम करीत असतांना या स्वयंसेवी संस्थांना अत्याधुनिक मशिनरी तसेच आणि मोठ्या प्रमाणावर भांडी खरेदी करण्यासाठी भांडवली खर्चाची शक्यता असल्याने, शालेय पोषण आहारासाठी स्वयंसेवी संस्थेची निवड झाल्यानंतर त्या संस्थेचे काम विना तक्रार राहिल्यास त्या संस्थेस किमान ३ वर्षे कामाची शाश्वती देण्यात यावी. तथापि, एखाद्या संस्थेचे काम योग्य प्रकारे नसल्यास त्या संस्थेचे काम बंद करुन योग्य अशा दुसऱ्या संस्थेस देता येईल.

४. शालेय पोषण आहार योजनेमध्ये नागरी विभागात म्हणजे महानगरपालिका क्षेत्र, नगरपालिका क्षेत्र या ठिकाणी केंद्रीय स्वयंपाक घर पध्दतीचा अंमलबजावणी करुन शाळांना त्यामार्फत आहार पुरवठा करण्यासाठी नामवंत व इच्छुक स्वयंसेवी संस्थांची निवड करण्यासाठी वर्तमानपत्रात प्रसिध्दी देवून Expression of Interest मागविण्यात यावेत. महानगरपालिका क्षेत्रामध्ये स्वंयसेवी संस्थांकडून Expression of Interest मागविण्याची कार्यवाही दिनांक ३१ मार्च,२००५ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या आयुक्त, मनपा यांच्या समितीमार्फत करण्यात यावी. नगरपालिका आणि नगरपरिषदा क्षेत्रासाठी स्वंयसेवी संस्थांकडून Expression of Interest मागविण्याची कार्यवाही शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी करावी. महानगरपालिका क्षेत्रासाठी आयुक्त, महानगरपालिका यांच्या संमितीबरोबर शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे यांनीही स्वंयसेवी संस्थांकडून Expression of Interest मागविण्याची कार्यवाही करावी. सदर प्रस्तावाची छाननी करुन त्यानंतर शासनाच्या मान्यतेने संस्थांची निवड करण्यात यावी. सदर निवड करत असताना त्या संस्थेच्या कामाचा अनुभव व भांडवल इत्यादी बाबींचा विचार करुन निवड करण्यात यावी.

५. नागरी भागातील शाळांमध्ये शालेय पोषण आहाराचा पुरवठा करण्यासाठी ज्या संस्थाची निवड होईल, त्या संस्थाना केंद्र शासनाकडून मिळणारा तांदूळ निविदेमार्फत निश्चित केलेल्या कंत्राटदारांमार्फत उपलब्ध करुन देण्यात येईल. या संस्थांना केंद्र शासनाने निश्चित केलेल्या दराने अन्न शिजविण्यासाठीचे अनुदान (Cooking Cost) वेळोवेळी देण्यात येईल. या संस्थांनी आठवड्याच्या प्रत्येक दिवसाच्या पाककृतीप्रमाणे (मेनूप्रमाणे) त्यांना वाटप करण्यात येणा-या शाळांमध्ये ताजा आहार पुरविण्यात यावा.

६. सद्य:स्थितीत शालेय पोषण आहार योजनेसाठी केंद्र शासनामार्फत भारतीय अन्न महामंडळाच्या (FCI) गोडाऊनमधून मिळणा-या तांदूळाची वाहतूक, अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत करण्यात येत आहे. अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या यंत्रणेमार्फत भारतीय अन्न महामंडळाच्या (FCI) गोडाऊनमधून तांदूळाची उचल करण्यात येऊन तहसिलदाराच्या अखत्यारितील तालुकास्तरीय गोडाऊनमध्ये आणण्यात येतो. त्यानंतर तालुका गोडाऊनमधून सदर तांदूळ उचलण्यात येऊन तो स्वस्त धान्य दुकानामधून शाळांना उपलब्ध करुन दिला जातो. केंद्र शासनाच्या नियमाप्रमाणे सदरचा तांदूळ शाळेमध्ये उपलब्ध करुन द्यावयाचा असला तरी प्रत्यक्षात शाळांना स्वस्त धान्य दुकानामधून तांदूळ घेऊन जावा लागतो. त्यामुळे स्वस्त धान्य दुकानापासून शाळेपर्यंत तांदूळ पोहचविण्यासाठी संबंधीत मुख्याध्यापक किंवा अन्न शिजविणा-या यंत्रणेस तांदूळ वाहतूकीची व्यवस्था / खर्च करावा लागतो. त्याचप्रमाणे केंद्र शासनाच्या भारतीय अन्न महामंडळाच्या (FCI) गोडाऊनमधून उचल केलेला व त्यापैकी शाळेस उपलब्ध झालेला आणि त्यामधून शाळेने खर्च केलेल्या तांदूळाची माहिती सध्याच्या प्रचलित पध्दतीनुसार केंद्र शासनास वेळोवेळी उपलब्ध करुन देण्यास अडचणी निर्माण होत आहेत. सदर माहिती केंद्र शासनास वेळेवर न पाठविली गेल्याने पुढील तिमाहीसाठी केंद्र शासनामार्फत तांदूळ उपलब्ध होण्यास अडचणी येतात. परिणामी योजनेच्या अंमलबजावणीमध्येही अडचण निर्माण होते. त्यामुळे <u>शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत तांदळाची वाहतूक करण्यासाठी शालेय शिक्षण</u>

<u>विभागामार्फत निविदा मागवून कंत्राटदार निश्चित करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. या निविदा शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या कार्यालयामार्फत मागविण्यात याव्यात. तसेच दर वाजवी राहतील याची दक्षता घेण्यासाठी शासनाच्या मान्यतेने निविदाचे दर अंतिम करण्यात यावेत.</u>

७. शासनाने काही महानगरपालिकांना तांदळाची वाहतूक करण्यासाठी यापूर्वी परवानगी दिलेली होती. आता शासनामार्फत तांदूळाची वाहतूक करण्यासाठी निविदा मागवून कंत्राटदार निश्चित करण्यात येणार असल्याने, महानगरपालिकांना तांदूळ वाहतूकीसाठी दिलेली परवानगी रद्द करण्यात येत आहे.

**८. ग्रामीण भागामधील शाळांमध्ये शालेय पोषण आहारासाठी इतर खाद्यवस्तुंचा पुरवठा :-**

या योजनेसाठी केंद्र शासनाकडून मिळणा-या मोफत तांदुळापासून आहार तयार करण्यासाठी जे इतर अन्न घटक आवश्यक आहेत, त्यासाठी अन्न शिजविण्याचा खर्च म्हणून अनुदान देण्यात येते. सदर अनुदान देण्यात येत असले तरी कमी उष्मांकाचा आहार खावू घातल्याच्या तक्रारी येतात. त्यामुळे <u>ग्रामीण भागातील शाळांमध्ये शालेय पोषण आहार देण्यासाठी पाककृतीनुसार आवश्यक लागणारा इतर धान्यादी माल (उदा. कडधान्य, डाळी, मिठ, मिरची, तेल इ.) निविदा मागवून पुरवठादारांमार्फत थेट शाळेस पुरविण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे.</u> शालेय पोषण आहार योजनेंतर्गत ग्रामीण भागातील शाळांमध्ये पाककृतीनुसार आवश्यक लागणारा इतर धान्यादी माल (उदा. कडधान्य, डाळी, मिठ, मिरची, तेल इ.) शाळेस पुरविण्यासाठी, तांदूळ वाहतूकसाठी कंत्राटदार निश्चित करतांना इतर धान्यादी मालाचा पुरवठा करण्यासाठी निविदा मागवून पुरवठेदार निश्चित करण्यात यावेत. शिक्षण संचालक (प्राथमिक),महाराष्ट्र राज्य,पुणे यांच्या कार्यालयामार्फत तांदुळाच्या वाहतुकीसाठी आणि इतर धान्यादी मालाच्या (उदा. कडधान्य, डाळी, मिठ, मिरची, तेल इ.) पुरवठ्यासाठी राज्यस्तरावरुन एकत्रीत निविदा मागवून, पुरवठादार निश्चित करण्याची

[illegible] करण्यात यावी. या निविदाप्रक्रीयेव्दारा पुरवठेदार नियुक्त करुन ग्रामीण आणि नागरी भागातील शाळांमध्ये तांदूळ वाहतूकीचे त्याचप्रमाणे ग्रामीण भागातील शाळांमध्ये इतर धान्यादी मालाचा (उदा. कडधान्य, डाळी, मिठ, मिरची, तेल इ.) पुरवठा करण्यात यावा.

९. ग्रामीण भागामध्ये ग्राम शिक्षण समितीने शाळेस उपलब्ध होणा-या तांदूळ आणि इतर खाद्यवस्तूंपासून विहित केलेल्या पाककृतीप्रमाणे स्वयंपाक्यामार्फत आहार बनवून घ्यावा. या योजनेंतर्गत स्वयंपाकाचे काम स्थानिक स्वयंपाकी, महिला बचत गट, महिला मंडळ यांच्याकडून करुन घ्यावे मात्र व्यैयक्तिक स्वंयपाकी नियुक्त करताना त्या गावातील विधवा, परितक्ता अथवा गरजू महिलांना तसेच मागासवर्गीय उमेदवारांना प्राधान्य देण्यात यावे.

१०. ग्रामीण भागामधील शाळेसाठी ग्राम शिक्षण समितीमध्ये शालेय पोषण आहार योजनेसंदर्भात पाच (५) विद्यार्थ्यांच्या पालकांना निमंत्रीत सदस्य म्हणून घेण्यात यावेत. अशा प्रकारे ग्राम शिक्षण समितीमध्ये विद्यार्थ्यांच्या पालकांना आंमत्रित सदस्य घेऊन त्याव्दारे ग्राम शिक्षण समितीने शाळेमध्ये उपलब्ध होणा-या अन्न-धान्यादी मालापासून विद्यार्थ्यांना आहार देण्याची व्यवस्था करावी. ग्रामीण भागातील शाळांमध्ये तांदूळाबरोबरच पाककृतीनुसार आवश्यक लागणारा इतर धान्यादी माल (उदा. कडधान्य, डाळी, मिठ, मिरची, तेल इ.) निविदेमार्फत कंत्राटदार निश्चित करुन त्याव्दारे पुरविण्यात येणार असल्याने फक्त अन्न शिजवून देण्यासाठी म्हणजे इंधन व मजूरी यासाठी प्रति दिन प्रति विद्यार्थी रु. ०.५०/- म्हणजे ५० पैसे या प्रमाणे ग्राम शिक्षण समित्यांना अनुदान देण्यात यावे. या योजनेसाठी अन्न शिजविण्याचा खर्च म्हणून प्रति विद्यार्थी दर प्राथमिक वर्गासाठी रु. २.०८ आणि उच्च प्राथमिक वर्गासाठी रु. २.६० एवढा आहे. त्यामुळे प्राथमिक व उच्च प्राथमिक वर्गासाठी इंधन व मजूरीचा खर्च वजा जाता प्राथमिक वर्गासाठी रु. १.५८/- या मर्यादेत आणि उच्च प्राथमिक वर्गासाठी रु.२.१० /- या मर्यादेत निविदा मागवून इतर खाद्यवस्तु ( डाळ, तेल मिठ इ.) पुरविण्यात याव्यात.

११. **प्रकल्प स्तरावरुन योजनेचे संनियंत्रण** :- या योजनेच्या प्रकल्प स्तरावर अधीक्षक, शालेय पोषण आहार हे पद निर्माण करण्यात आलेले आहे. तसेच प्रकल्प स्तरावर लिपिकाचे काम कंत्राटी पध्दतीने करण्यासाठी दरमहा रुपये ५००/- एवढे मानधन देण्यात येते. या योजनेचे काम करण्यासाठी प्रकल्प स्तरावर अधीक्षक, शालेय पोषण आहार यांच्या हाताखाली डाटा एंट्री ऑपरेटर हे पद कंत्राटी पध्दतीने भरण्याबाबत स्वतंत्रपणे आदेश निर्गमित करण्यात येतील. प्रकल्प स्तरावर डाटा एंट्री ऑपरेटर हे पद कंत्राटी पध्दतीने भरण्याबाबत आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून प्रकल्प स्तरावर लिपिकाचे काम कंत्राटी पध्दतीने करण्यासाठी देण्यात येणारे दरमहा रुपये ५००/- एवढे मानधन बंद करण्यात यावे. सर्व शिक्षा अभियान या योजनेंतर्गत प्रकल्प स्तरावर साधन व्यक्तीची (विषय तज्ञ)पदे निर्माण करण्यात आली आहेत. शालेय पोषण आहार योजनेच्या कामकाजासाठी प्रत्येक तालुक्यातील २ साधन व्यक्तींच्या सेवा तालुक्यातील अधिक्षक, शालेय पोषण आहार योजना यांच्याकडे उपलब्ध करुन देण्यात याव्यात. तालुकास्तरीय अधीक्षक आणि साधन व्यक्ती यांनी तालुक्यातील शाळांमध्ये वेळोवेळी तपासणी करणे, आहाराचा दर्जा व गुणवत्ता यावर नियंत्रण ठेवणे इत्यादी कामे करावीत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संगणकीय संकेतस्थळावर (www.maharashtra.gov.in) २००९०६१८१८५११६००१ या क्रमांकान्वये प्रसिध्द करण्यात आले आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

(ना.ऊ. रौराळे)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
मा. मुख्यमंत्री / उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय,मुंबई
मा. मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व)

## परिशिष्ट अ

(शासन निर्णय क्रमांक-शापोआ २००९ /प्रक्र १३६/प्राशि ४ दिनांक १८.६.२००९ चे परिशिष्ट )

## शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत द्यावयाच्या पाककृतींचा तपशिल

### (१) डाळ तांदळाची खिचडी(सोयाबीन युक्त) (सोमवार)

### इ. १ ली ते ५ वीसाठी

| खाद्य पदार्थ | वजन ( ग्रॅम) | उष्मांक | प्रथिने |
|---|---|---|---|
| तांदूळ | १०० | ३४५ | ६.७ |
| मुग/ मसूर डाळ | २० | ६८ | ५ |
| सोयाबीन | १० | ४३ | ४.३ |
| सोयाबीन तेल | ५ | ४५ | - |
| मीठ /हळद/तिखट चवीनुसार | २ | - | - |
| एकूण | १३७ | ५०१ | १६.०० |
| (शिजवलेल्या अन्नाचे वजन साधारणत: ३०० ते ३२५ ग्रॅम एवढे राहील) | | | |

### इ. ६ वी ते ८ वीसाठी

| खाद्य पदार्थ | वजन ( ग्रॅम) | उष्मांक | प्रथिने |
|---|---|---|---|
| तांदूळ | १५० | ५१७ | १०.०५ |
| मुगडाळ | ३० | १०२ | ७.५ |
| सोयाबीन | १५ | ६४ | ६.४ |
| सोयाबीन तेल | ७ | ६३ | - |
| मीठ /हळद/तिखट चवीनुसार | २ | | |
| एकूण | २०४ | ७४६ | २३.९५ |
| (शिजवलेल्या अन्नाचे वजन साधारणत: ४५० ते ४७५ ग्रॅम एवढे राहील) | | | |

टीप : तक्रार निवारण केंद्र टोल फ्री क्रमांक १८००२३३९९८८

## (२) गोड भात (मंगळवार आणि शुक्रवार)

### इ. १ ली ते ५ वीसाठी

| खाद्य पदार्थ | वजन ( ग्रॅम) | उष्मांक | प्रथिने |
|---|---|---|---|
| तांदूळ | १०० | ३४५ | ६.७ |
| मूगडाळ | ३० | १०२ | ७.३ |
| साखर/गुळ | २० | ८० | - |
| तेल | ५ | ४५ | - |
| एकूण | १४५ | ५७२ | १४.०० |

(शिजवलेल्या अन्नाचे वजन साधारणत: ३०० ते ३२५ ग्रॅम एवढे राहील)

### इ. ६ वी ते ८ वीसाठी

| खाद्य पदार्थ | वजन ( ग्रॅम) | उष्मांक | प्रथिने |
|---|---|---|---|
| तांदूळ | १५० | ५१७ | १०.०५ |
| मूगडाळ | ४५ | १५३ | १०.९५ |
| साखर/गुळ | ३० | १२० | - |
| तेल | ७ | ६३ | - |
| एकूण | २३२ | ८५३ | २१ |

(शिजवलेल्या अन्नाचे वजन साधारणत: ४५० ते ४७५ ग्रॅम एवढे राहील)

## (३) पिठले किंवा बेसन आणि भात (बुधवार)

### इ. १ ली ते ५ वीसाठी

| खाद्य पदार्थ | वजन ( ग्रॅम) | उष्मांक | प्रथिने |
|---|---|---|---|
| तांदूळ | १०० | ३४५ | ६.७ |
| पिठले किंवा बेसन खालील प्रमाणे | | | |
| बेसनपीठ | ३० | ९९ | ६.७ |
| तेल | ३ | २७ | - |
| मीठ /हळद/तिखट/जिरे-मोहरी चवीनुसार | २ | | |
| एकूण | १३५ | ४७१ | १३.४० |
| (शिजवलेल्या अन्नाचे वजन साधारणत: ३०० ते ३२५ ग्रॅम एवढे राहील) | | | |

### इ. ६वी ते ८ वीसाठी

| खाद्य पदार्थ | वजन ( ग्रॅम) | उष्मांक | प्रथिने |
|---|---|---|---|
| तांदूळ | १५० | ५१७ | १०.०५ |
| पिठले किंवा बेसन खालील प्रमाणे | | | |
| बेसनपीठ | ४५ | १४८ | १०.०५ |
| तेल | ५ | ४५ | - |
| मीठ /हळद/तिखट/जिरे-मोहरी चवीनुसार | ३ | | |
| एकूण | २०३ | ७१० | २०.१० |
| (शिजवलेल्या अन्नाचे वजन साधारणत: ४५० ते ४७५ ग्रॅम एवढे राहील) | | | |

## (४) कडधान्याची उसळ आणि भात(सोयाबीन युक्त) (गुरुवार)

### इ. १ ली ते ५ वीसाठी

| खाद्य पदार्थ | वजन ( ग्रॅम) | उष्मांक | प्रथिने |
|---|---|---|---|
| तांदूळ | १०० | ३४५ | ६.७ |
| कडधान्याची उसळ खालीलप्रमाणे | | | |
| मोड आलेली कडधान्ये (हरभरा, चवळी, मटकी, मूग,वटाणा यापैकी एक आलटून पालटून) | ३० | १०२ | ६ |
| सोयाबीन तेल | ३ | २७ | - |
| सोयाबीन (प्रक्रीया केलेले) | १० | ४३ | ४.३ |
| मीठ /हळद/तिखट/जिरे-मोहरी चवीनुसार | २ | | |
| एकूण | १४५ | ५१७ | १७.०० |
| (शिजवलेल्या अन्नाचे वजन साधारणतः ३०० ते ३२५ ग्रॅम एवढे राहील) | | | |

### इ. ६वी ते ८ वीसाठी

| खाद्य पदार्थ | वजन ( ग्रॅम) | उष्मांक | प्रथिने |
|---|---|---|---|
| तांदूळ | १५० | ५१७ | १०.०५ |
| कडधान्याची उसळ खालीलप्रमाणे | | | |
| मोड आलेली कडधान्ये (हरभरा, चवळी, मटकी, मूग,वटाणा यापैकी एक आलटून पालटून) | ४५ | १५३ | ९ |
| सोयाबीन तेल | ५ | ४५ | - |
| सोयाबीन (प्रक्रीया केलेले) | १५ | ६४ | ६.४ |
| मीठ /हळद/तिखट/जिरे-मोहरी चवीनुसार | ३ | | |
| एकूण | २१८ | ७७९ | २५.४५ |
| (शिजवलेल्या अन्नाचे वजन साधारणतः ४५० ते ४७५ ग्रॅम एवढे राहील) | | | |

## (५) वरण किंवा आमटी आणि भात (शनीवार)

### इ. १ ली ते ५ वीसाठी

| खाद्य पदार्थ | वजन ( ग्रॅम) | उष्मांक | प्रथिने |
|---|---|---|---|
| तांदूळ | १०० | ३४५ | ६.७ |
| **वरण किंवा आमटी** | | | |
| तुरडाळ | ३० | १०२ | ६ |
| तेल | ३ | २७ | - |
| मीठ /हळद/तिखट/जिरे-मोहरी चवीनुसार | २ | | |
| एकूण | १३५ | ४७४ | १२.७० |
| (शिजवलेल्या अन्नाचे वजन साधारणत: २०० ते २२५ ग्रॅम एवढे राहील) | | | |

### इ. ६वी ते ८ वीसाठी

| खाद्य पदार्थ | वजन ( ग्रॅम) | उष्मांक | प्रथिने |
|---|---|---|---|
| तांदूळ | १५० | ५१७ | १०.०५ |
| **वरण किंवा आमटी** | | | |
| तुरडाळ | ४५ | १५३ | ९ |
| तेल | ५ | ४५ | - |
| मीठ /हळद/तिखट/जिरे-मोहरी चवीनुसार | ३ | | |
| एकूण | २०३ | ७१५ | १९.०५ |
| (शिजवलेल्या अन्नाचे वजन साधारणत: ४५० ते ४७५ ग्रॅम एवढे राहील) | | | |

**परिशिष्ट क्र. ५.४**

शालेय पोषण आहार योजनेंतर्गत
तांदुळाची वाहतूक आणि धान्यादी
मालाचा पुरवठा सुरु करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**शासन परिपत्रक क्र.शापोआ २००९/प्र.क्र.३८३/प्राशि-४**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-३२**
**दिनांक - २६ फेब्रुवारी, २०१०.**

**संदर्भ:-** शासन निर्णय क्र.शापोआ २००९/प्र.क्र.१३६/प्राशि-४ दि. १८ जुन, २००९.

**शासन परिपत्रक -** शासन निर्णय क्र.शापोआ-२००९/प्र.क्र.१३६/प्राशि-४,दि. १८.६.२००९ अन्वये तांदुळाची वाहतुक करणे व ग्रामीण भागातील शाळांमध्ये शालेय पोषण आहार बनविण्यासाठी धान्यादी (उदा. कडधान्य, तेल, मीठ, मिरची पावडर, मसाला इ.) पुरवठा निविदा मागवून करण्यात यावा, असे आदेश देण्यात आलेले आहेत. या शासन निर्णयानुसार शिक्षण संचालनालयामार्फत निविदा प्रक्रिया राबवून पुरवठाधारकाची निवड करण्यात आलेली असुन निविदा प्रक्रीयेनुसार आलेल्या दरास शासनाने मान्यता दिलेली आहे. शासन निर्णयान्वये निर्गमित केलेल्या शालेय पोषण आहार योजनेच्या सुधारणेबाबत अंतिम करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेप्रमाणे शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत, तांदुळाची वाहतूक करणे तसेच ग्रामीण भागामध्ये धान्यादी मालाचा पुरवठा करणे याबाबत मागविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेसंदर्भात मा. उच्च न्यायालयामध्ये आव्हान देण्यात आले होते. मा. उच्च न्यायालयाने सदर रिट याचिका क्रमांक ९४६६/२००९ वर दिनांक १७.१२.२००९ रोजी शासनाच्या बाजूने निर्णय दिलेला आहे. त्यानुसार शालेय पोषण आहार योजने अंतर्गत तांदुळाची वाहतूक करण्यासाठी तसेच ग्रामीण भागातील शाळांमध्ये इतर धान्यादी मालाचा पुरवठा करण्यासाठी क्षेत्रीय यंत्रणेला खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेत.

अ) तांदूळ वाहतूक करण्याची कार्यपध्दती :-

**(अ-१)** शालेय पोषण आहार योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून मिळणारा तांदूळ भारतीय अन्न महामंडळाच्या गोदामामधून प्राप्त होतो. निविदा प्रक्रियेनूसार अंतिम करण्यात आलेले पुरवठाधारक दि महाराष्ट्र स्टेट को.-ऑप. मार्केटिंग फेडरेशन लि. मुंबई हे भारतीय अन्न महामंडळाच्या जिल्हानिहाय गोदामातून शालेय पोषण आहार योजनेसाठीचा तांदूळ उचल करतील. पुरवठाधारक यांनी उचल केलेला शालेय पोषण आहार योजनेचा हा तांदूळ ज्या दर्जाचा व ज्या स्थितीत उचलला आहे, त्या स्थितीत जसाच्या तसा शाळेपर्यंत पोहोच करावयाचा आहे. त्याबाबत कोणतीही तक्रार येणार नाही याची जबाबदारी पुरवठाधारकाची असेल. भारतीय अन्न महामंडळाच्या गोदामामधून उचल केलेल्या तांदुळाची माहिती पुरवठाधारकांनी दरमहा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) व शिक्षण संचालक (प्राथमिक) यांना सादर करावी.

**(अ-२)** पुढील आर्थिक वर्षापासून (२०१०-११) केंद्र शासनामार्फत मोफत देण्यात येणाऱ्या तांदुळाची किंमत राज्य शासनांस अनुदान स्वरुपात वितरीत करण्यात येणार आहे. राज्य शासनाने सदर अनुदान म्हणजे तांदुळाची बीपीएल दराने येणारी किंमत भारतीय अन्न महामंडळाकडे जमा करुन तांदूळ प्राप्त करून घ्यावयाचा आहे. चालू आर्थिक वर्षाच्या (२००९-१०) अखेर पर्यंत मात्र भारतीय अन्न महामंडळच्या तांदुळाची किंमत केंद्र शासनामार्फत परस्पर देण्यात येणार आहे.

**(अ-३)** पुढील आर्थिक वर्षापासून केंद्र शासनाने शालेय पोषण आहार योजनेचे वार्षिक कार्य अंदाजपत्रक मंजूर केल्यानुसार संपूर्ण राज्यासाठी जिल्हा निहाय तांदुळाचे नियतन प्राथमिक शिक्षण संचालनालयामार्फत वितरीत करण्यात येईल. शिक्षण संचालनालय (प्राथमिक) ३-३ महिन्याचे (Quarterly) तांदुळाचे नियतन जिल्हानिहाय आगाऊ स्वरूपात वितरीत करतील.

**(अ-४)** केंद्र शासनाकडून पुढील आर्थिक वर्षापासुन (सन २०१०-११) तांदुळाची किंमत राज्यास अनुदान स्वरूपात प्राप्त होणार आहे. त्यानुसार प्राथमिक शिक्षण संचालनालयाने भारतीय अन्न महामंडळाकडे संपूर्ण राज्यासाठी आवश्यक असणाऱ्या तांदुळाची किंमत (३-३

महिन्यासाठीची) भारतीय अन्न महामंडळाकडे भरण्याची कार्यवाही करावी. सदर निधी भारतीय अन्न महामंडळाला देत असतांना जिल्हा निहाय तांदुळाचे नियतन भारतीय अन्न महामंडळास आगाऊ कळवावे, जेणेकरुन भारतीय अन्न महामंडळास आगाऊ स्वरुपात माहिती प्राप्त झाल्याने त्यांना त्यांच्या जिल्ह्याच्या गोदामामध्ये साठा करणे सोयीचे होऊन, संबंधित जिल्ह्यांना तांदुळ वेळेवर उपलब्ध करुन देणे भारतीय अन्न महामंडळास शक्य होईल.

**(अ-५)** प्राथमिक शिक्षण संचालनालय स्तरावरुन तांदुळाचे नियतन व तांदुळाची किंमत भारतीय अन्न महामंडळास अदा केल्याची माहिती सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद तसेच शिक्षण प्रमुख / प्रशासन अधिकारी / शिक्षणाधिकारी (महानगरपालिका) यांना कळवली जाईल. त्यानंतर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) हे जिल्हा स्तरावरून त्या जिल्ह्यामधील ग्रामीण भागातून तसेच नागरी भागातून (महानगरपालिका, नगरपालिका यामधील शाळांसह) सर्व शाळांसाठी लागणाऱ्या तांदुळाची मागणी मंजूर नियतनाप्रमाणे नियुक्त केलेल्या पुरवठादार दि महाराष्ट्र स्टेट को.ऑ. मार्केटिंग फेडरेशन लि. मुंबई यांना कळवतील. सदर मागणी करीत असतांना २ महिन्यासाठी आवश्यक असणाऱ्या तांदुळाची मागणी करण्यात येईल. तांदुळाचे नियतन जरी ३ महिन्यासाठी मंजूर करण्यात आले असले तरी सुरुवातीला २ महिन्याचे पुरवठा आदेश देण्यात येतील व त्यानंतर शाळेमध्ये २० दिवस पुरेल इतका साठा शिल्लक असताना पुढील महिन्याचे पुरवठा आदेश देण्यात येतील.

**(अ-६)** जिल्हयामध्ये विविध पंचायत समिती गट अस्तित्वात आहेत. त्याप्रमाणे जिल्ह्यामध्ये नगरपालिका/नगर पंचायती/नगर परिषद / कटकमंडळे अस्तित्वात आहेत. त्या शिवाय काही जिल्ह्यामध्ये महानगरपालिका कार्यरत आहेत. जिल्हा स्तरावरून पुरवठा आदेश देत असताना ज्या पंचायत समिती क्षेत्रामध्ये नगरपालिका क्षेत्र येईल त्या नगरपालिका क्षेत्रामधील नागरी भागातील शाळांसाठी आवश्यक असणाऱ्या तांदुळाची मागणी संबंधित पंचायत समिती क्षेत्रात समाविष्ट करण्यात यावी. ज्या जिल्ह्यामध्ये महानगरपालिका कार्यरत आहेत त्या महानगरपालिकेमधील सर्व शालेय पोषण आहार पात्र शाळांसाठी लागणाऱ्या तांदुळासाठी एक पंचायत समिती गट असल्याचे गृहीत धरण्यात यावे, तसेच कटक मंडळासाठी सुध्दा एक पंचायत समिती गट गृहीत धरावे. म्हणजे उदाहरण स्वरुपाने, एखाद्या जिल्ह्यामध्ये

७ पंचायत समिती, २ कटकमंडळे व २ महागरपालिका कार्यरत असल्यास त्या जिल्ह्यामध शालेय पोषण आहार योजनेच्या मागणीसाठी ७+२+२ =११ गट गृहित धरण्यात यावे जिल्ह्यातील गटासाठी गटनिहाय तांदुळाच्या नियतनाची विभागणी शिक्षणाधिकारी (प्राथमिक जिल्हा परिषद यांनी करावी.

**(अ-७)** तालुकास्तर म्हणजे गटस्तरावर गटशिक्षणाधिकारी / अधीक्षक, शालेय पोष आहार हे तांदूळ वाहतुकीसाठी निश्चित केलेल्या 'दि महाराष्ट्र स्टेट को. ऑपरेटिव्ह मार्केटि फेडरेशन लिमिटेड, मुंबई या पुरवठाधारकास तांदूळ वाहतुकीचे पुरवठा आदेश देतील.

**(अ-८)** या पुरवठा आदेशासोबत गटशिक्षणाधिकारी / अधीक्षक, शालेय पोषण आहार शालेय पोषण आहार योजनेच्या पात्र शाळानिहाय तांदुळाचे मागणीपत्र प्रमाणानुसार प्राधान्य ५० किलोच्या गोणीप्रमाणे किंवा गरजेनुसार ५, १० किलोच्या पटीत पुरवठाधारकास पुरव आदेश देतील. सदरील पुरवठा आदेश देण्याअगोदर गटशिक्षणाधिकारी / अधीक्षक, शाले पोषण आहार हे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांची पूर्वपरवानगी घेतील.

**(अ-९)** महानगरपालिका व कटकमंडळ या कार्यक्षेत्रामध्ये शिक्षण प्रमुख शिक्षणाधिकारी / प्रशासनअधिकारी व कटक मंडळाचे बाबतीत कटक मंडळाचे मुख्य कार्यक अधिकारी हे पुरवठाधारकास तांदूळ वाहतुकीचे पुरवठा आदेश देतील.

**(अ-१०)** या पुरवठा आदेशासोबत महानगरपालिकेचे शिक्षण प्रमुख / शिक्षणाधिकार प्रशासन अधिकारी व कटक मंडळाचे बाबतीत कटक मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी शालेय पोषण आहार योजनेच्या पात्र शाळानिहाय तांदुळाचे मागणीपत्र प्रमाणानुसार प्राधान ५० किलोच्या गोणीप्रमाणे किंवा गरजेनुसार ५, १० किलोच्या पटीत पुरवठाधारकास पुर आदेश देतील. सदरील पुरवठा आदेश देण्यापूर्वी महानगरपालिकांच्या बाबतीत शिक्षण प्रमु शिक्षणाधिकारी / प्रशासन अधिकारी व कटक मंडळाचे बाबतीत कटक मंडळाचे कार्यकारी अधिकारी हे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांची पूर्वपरवानगी घेतील.

**(अ-११)** मुंबई व मुंबई उपनगर जिल्ह्यासाठी जिल्हा परिषद अस्तित्वात नसून संपूर्ण क्षेत्रासाठी बृहन्मुंबई म.न.पा. कार्यरत आहे. त्यामुळे मुंबई व मुंबई उपनगर जिल्ह्य महानगरपालिकेच्या शाळांसाठी तसेच म.न.पा. क्षेत्रातील खाजगी संस्थांच्या शाळां

लागणाऱ्या तांदुळाच्या तांदूळ वाहतुकीचे पुरवठा आदेश शिक्षणाधिकारी बृहन्मुंबई महानगरपालिका हे निश्चित केलेल्या पुरवठाधारकास देतील. पुरवठा आदेशासोबत शालेय पोषण आहारासाठी पात्र शाळांचे मागणीपत्र असावे. शिक्षणाधिकारी बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी पुरवठा आदेशाची प्रत्येक प्रत प्राथमिक शिक्षण संचालनालय, पुणे यांना पाठवावी.

**(अ-१२)** प्रत्येक शाळेसाठी लाभार्थींच्या गणनेनुसार आवश्यक असणाऱ्या तांदुळाची माहिती सर्व शाळांकडून त्या त्या गटामार्फत गट स्तरावर एकत्रित करण्यात यावी. कोणत्याही शाळेस तांदुळाचे नियतन कमी किंवा अधिक होणार नाही या संदर्भात गट स्तरावरील यंत्रणा जबाबदार राहील. पंचायत समिती गट स्तरावरुन मागणी देणे व त्याप्रमाणे पुरवठा प्राप्त करुन घेणे यासाठी गट शिक्षणाधिकारी हे संनियंत्रण करतील तसेच महानगरपालिका क्षेत्रात मागणी देणे व पुरवठा प्राप्त करुन घेणे यासाठी शिक्षण प्रमुख / शिक्षणाधिकारी / प्रशासन अधिकारी हे संनियंत्रण करतील.

**ब) <u>तांदूळ वाहतुकीच्या खर्चाचे देयक अदा करण्याची कार्यपध्दती :-</u>**

**(ब-१)** भारतीय अन्न महामंडळाच्या गोदामामधून शाळेपर्यंत तांदुळाची वाहतूक करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या पुरवठाधारकास प्रत्यक्ष तांदुळ वाहतुक केल्यानुसार वाहतूक खर्चाचे देयक शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या स्तरावरून देण्यात येईल. वाहतूक खर्चाचे देयकात भारतीय अन्न महामंडळाचे गोडावूनमधून राज्यातील शालेय पोषण आहार योजनेच्या प्रत्येक पात्र शाळेपर्यंत तांदूळ पोहोच करण्यापर्यंत येणारा सर्व खर्च समाविष्ट राहील.

i) भारतीय अन्न महामंडळाचे गोडावूनमधून तांदूळ उचल केल्यानंतर भारतीय अन्न महामंडळाच गोडावून ते शाळास्तरापर्यंत वाहतूक, साठवणूक, धुरीकरण, प्रमाणीकरण इ. बाबींची जबाबदारी पुरवठाधारकाची असेल.

ii) भारतीय अन्न महामंडळाचे गोडावूनमधून तांदुळाची उचल केल्यानंतर शाळेपर्यंत पोहोच करण्यापर्यंत संपूर्ण जबाबदारी पुरवठाधारकाची असेल. त्यामध्ये गोडावून ते शाळा

दरम्यान वाहतूक करणा-या वाहनांचे विमा, वाहनांच्या अपघाताने होणारे तांदुळाचे नुकसान, तांदूळ साठवणूक करणा-या गोडावूनचा विमा, आग, चोरी, इ. बाबींचा समावेश असेल.

**(ब-२)** सदर देयके अदा करण्यासाठी संबंधित पुरवठाधारक त्या जिल्हयाअंतर्गत गटातील गटशिक्षणाधिकारी / अधीक्षक, शालेय पोषण आहार, महानगरपालिका क्षेत्रातील शिक्षण प्रमुख / शिक्षणाधिकारी / प्रशासन अधिकारी व कटक मंडळाचे बाबतीत कटक मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे देयक सादर करतील. गटशिक्षणाधिकारी / अधीक्षक, शालेय पोषण आहार, महानगरपालिका क्षेत्रातील शिक्षण प्रमुख / शिक्षणाधिकारी / प्रशासन अधिकारी व कटक मंडळाचे बाबतीत कटक मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी हे मुख्याध्यापकाने दिलेल्या पोहोच पावतीनुसार देयक तपासून प्रमाणीत करुन शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचेकडे पाठवतील. सदर देयक शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्याकडून प्रमाणित करण्यात येईल व प्रमाणित करण्यात आलेले देयक शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे पाठवले जाईल. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्याकडून प्रमाणित करुन आलेले तांदुळाचे देयक शासनाकडून उपलब्ध होणा-या अनुदानाप्रमाणे संबंधित पुरवठाधारकास प्राथमिक शिक्षण संचालनालय यांचे स्तरावरुन जिल्हानिहाय देयकानुसार अदा करण्यात येईल.

**(ब-३)** मुंबई व मुंबई उपनगर जिल्ह्यातील महानगरपालिकेच्या शाळांसाठी तसेच मनपा क्षेत्रातील खाजगी संस्थांच्या शाळांसाठी लागणाऱ्या तांदुळाच्या वाहतूक खर्चाची देयके बृहन्मुंबई महानगरपालिकेचे शिक्षणाधिकारी सदर देयकाची तपासणी करुन तसेच गोषवारा प्रमाणित करुन देयकाच्या अदायगीसाठी शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे पाठवतील. वाहतूक खर्चाचे देयक शिक्षण संचालनालयास सादर करताना पुरवठा करण्यात आलेला तांदूळ योग्य दर्जाचा व वजनाचा असल्याचे शिक्षणाधिकारी बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या स्वाक्षरीचे प्रमाणपत्र सोबत सादर करावे.

**(ब-४)** संबंधित पुरवठादारांनी त्यांना प्राप्त झालेल्या शाळानिहाय मागणीनुसार तांदुळ पुरवठा शाळेपर्यंत करावयाचा आहे. नागरी भागातील शाळांसाठी केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणालीचा अवलंब केला असल्यास त्या शाळांसाठी द्यावयाचा तांदुळ त्या शाळांच्या मागणीप्रमाणे सदर केंद्रीय स्वयंपाकगृह असणाऱ्या ठिकाणी पुरवठा करणे आवश्यक राहील.

## क) ग्रामीण भागामध्ये धान्यादी मालाचा पुरवठा करण्याची कार्यपध्दती -

**(क-१)** शासन निर्णय क्र.शापोआ-२००९/प्र.क्र. १३६/प्राशि-४, दि.१८.६.२००९ अन्वये ग्रामीण भागातील शाळांमध्ये शालेय पोषण आहार बनविण्यासाठी धान्यादी (उदा.कडधान्य, तेल, मीठ, मिरची पावडर, मसाला इ.) पुरवठा निविदा मागवून करण्यात यावा, असे आदेश देण्यात आलेले आहेत. या शासन निर्णयानुसार शिक्षण संचालनालयामार्फत निविदा प्रक्रिया राबवून पुरवठादाराची निवड करण्यात आलेली आहे. त्यानंतर शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे १ व दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटीव्ह मार्केटिंग फेडरेशन लिमिटेड, मुंबई यांचेमध्ये दिनांक २३ ऑक्टोबर २००९ रोजी करारनामा करण्यात आलेला आहे. दिनांक १८/६/२००९ चा वर नमूद केलेल्या क्रमांकाचा शासन निर्णय, निविदा प्रक्रियेत निश्चित केलेल्या अटी व शर्ती व करारनामा यास अधिन राहून पुरवठाधारकामार्फत ग्रामीण भागातील शाळांमध्ये धान्यादी मालाचा पुरवठा करण्यात येईल.

**(क-२) <u>तालुका स्तर</u>:-** तालुकास्तर म्हणजे गटस्तरावर गटशिक्षणाधिकारी / अधीक्षक, शालेय पोषण आहार निश्चित केलेल्या पाककृतीनुसार ठरवून दिलेल्या धान्यादी मालाची प्रमाणानुसार परिगणना करतील व प्राधान्याने एक, दोन व पाच किलोच्या पॅकींगमध्ये किंवा आवश्यकतेनुसार शाळेतील एकूण विद्यार्थ्यांसाठी लागणा-या धान्यादी मालाचे शाळानिहाय मागणी पत्रासह पुरवठाधारकास पुरवठा आदेश देतील. गटशिक्षणाधिकारी / अधीक्षक हे संबंधित पुरवठादारास पुरवठा आदेश देण्यापूर्वी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांची पूर्वपरवानगी घेतील. सदर पुरवठा आदेशाची प्रत शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना देण्यात यावी.

**(क-३)** गटस्तरावरुन पुरवठा आदेश ज्या दिनांकास काढला जाईल त्या दिनांकापासून पुरवठा करण्यासाठीचा कालावधी गृहीत धरण्यात येईल. तसेच संबंधितांनी पुरवठाधारकास तांदुळाची वाहतूक तसेच इतर धान्यादी मालाचा पुरवठा, याबाबतचे पुरवठा आदेश एकाच वेळी द्यावेत.

**(क-४)** शालेय पोषण आहार योजनेचा तांदूळ व धान्यादी माल हा दैनंदिन आहार ब-नविण्यासाठी वापरावयाचा असतो. त्यामुळे त्याचा पुरवठा वेळेवर होणे आवश्यक आहे.

...साठी गटशिक्षणाधिकारी / अधीक्षक, शालेय पोषण आहार यांनी वेळेत मागणी करणे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी वेळेत पुरवठा आदेश काढणे व पुरवठा आदेशानंतर पुरवठाधारकाने १५ दिवसाच्या आत मालाचा पुरवठा प्रत्येक शाळेत करणे आवश्यक आहे. त्यामुळे संबंधितांनी वेळेत पुरवठा होणेसाठी कालमर्यादेत कार्यवाही करावी.

**(क-५) धान्यादी मालाचा प्रत्यक्ष पुरवठा** :- ग्रामीण भागातील शाळांमध्ये संबंधित पुरवठाधारकामार्फत तांदूळ व इतर वस्तूंचा पुरवठा एकत्रित करण्यात येईल. मात्र तांदूळ पुरवठयाच्या व धान्यादी माल पुरवठयाच्या पावत्या वेगवेगळया ठेवण्यात येतील. संबंधित पुरवठादार सदर मालाच्या पुरवठयासंदर्भातील शासन विहित करील त्या नमुन्यातील पावत्या स्वतःच्या खर्चाने छापून घेईल व त्याच पावत्यांचा वापर पुरवठादार करेल. त्यासाठी गुलाबी, पिवळया व पांढ-या अशा तीन रंगाच्या पावत्या बनविण्यात येतील. गुलाबी रंगाची पावती आहार घेणा-या शाळेकडे राहील. पिवळया रंगाची पावती पुरवठाधारक देयकासोबत जोडून गट स्तरावर सादर करतील. पांढ-या रंगाची पावती पुरवठाधारकाकडे त्याची स्वतःची प्रत म्हणून ठेवण्यात येईल. सदर पावतीवर गटाचे व जिल्हयाचे नांव, पुरवठयाचा दिनांक, वाहन क्रमांक, माल वाहतूक करणा-याचे नांव इ. तपशील असेल. तीनही पावत्यावर माल योग्य वजनाचा व दर्जाचा व सुस्थितीत प्राप्त झाल्याची पोहोच मुख्याध्यापक देतील.

**(क-६)** प्रारंभिक पुरवठा २ महिन्यांसाठी करण्यात येईल, त्यानंतर १ महिन्यासाठी पुरेल एवढे अन्नधान्य पुरवठा करण्यात यावा. शाळेनध्ये २० दिवस पुरेल इतका धान्य साठा शिल्लक असताना नवीन पुरवठा आदेश देण्यात येतील. शाळांकडून मागणी वेळेत प्राप्त करुन घेणे व पुरवठा आदेश वेळेत पुरवठाधारकास देण्याची जबाबदारी गटशिक्षणाधिकारी / अधीक्षक शालेय पोषण आहार यांची असेल.

**ड) धान्यादी मालाची तपासणी :-**

**(ड-१)** पुरवठाधारकाने धान्यादी मालाचा पुरवठा केल्यानंतर त्याचे नमुने प्रत्येकी २५० ग्रॅम प्रमाणे गटशिक्षणाधिकारी / अधीक्षक, शालेय पोषण आहार यांनी त्यांचे पत्रासोबत शासकीय प्रयोगशाळेत पाठवावेत. शासकीय प्रयोगशाळेतील तपासणीचा संपूर्ण खर्च पुरवठाधारकाने अदा करणे आवश्यक राहील. प्रयोगशाळेचा समाधानकारक अहवाल प्राप्त

झाल्यानंतर मालाच्या देयकासोबत सदरचा तपासणी अहवाल गटशिक्षणाधिकारी व अधीक्षक, शालेय पोषण आहार यांच्याकडे पुरवठाधारक सादर करतील. सदरचा तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतरच देयके अदा केली जातील. धान्यादी मालाच्या दर्जाबाबत काही तक्रारी आल्यास सदरील धान्यादी वस्तू पुरवठाधारकाकडून बदलून घेण्यात याव्यात.

(ड-२) पुरवठाधारकाने सादर केलेल्या पोहोच पावत्या, प्रयोगशाळा तपासणी अहवाल व गटाचा एकत्रित गोषवारा याची तपासणी अधिक्षक, शालेय पोषण आहार यांनी करावी. गटास प्राप्त झालेला माल योग्य दर्जाचा व वजनाचा असल्याचे प्रमाणपत्र नोंदवून पुरवठाधारकाकडून सादर झालेले देयक शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हापरिषद यांना १० दिवसाच्या आत सादर करण्याची जबाबदारी व गटशिक्षणाधिकारी / अधीक्षक, शालेय पोषण आहार यांची असेल. सर्व गट स्तरावरुन धान्यादी मालाच्या पुरवठयाची देयके प्राप्त झाल्यानंतर शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हापरिषद यांनी त्यांचेकडे प्राप्त झालेल्या मंजूर अनुदानातून/ निधीमधून सदर देयके संबंधित पुरवठाधारकास देयक दाखल झाल्यापासून १० दिवसाच्या आत अनुदान उपलब्धतेच्या अधिन राहून अदा करावीत. तांदुळाच्या वाहतूकीची देयके शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हापरिषद यांचे स्तरावर अदा न करता त्या त्या जिल्हयामधील गट स्तरावरुन तांदूळ वाहतूकीची आलेली देयके यांचा गोषवारा बनवून शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हापरिषद यांनी सदर देयके शिक्षण संचालक (प्राथमिक),महाराष्ट्र राज्य,पुणे यांचेकडे अदायगीसाठी सादर करावीत. प्राथमिक शिक्षण संचालनालयाकडे तांदूळ वाहतुकीची देयके सादर करताना लेखाधिकारी, शालेय पोषण आहार व शिक्षणाधिकारी यांनी योग्य दर्जाचा व वजनाचा माल प्राप्त झाल्याचे प्रमाणपत्र सादर करावे व त्यानंतर वाहतूक खर्चाची देयके प्राथमिक शिक्षण संचालनालय, पुणे यांचेकडून अदा करण्यात यावीत.

(ड-३) संबंधित पुरवठाधारक त्यांनी पुरवठा केलेल्या धान्यादी मालाची देयके ४ प्रतीत बनवून सादर करतील, त्यापैकी १ प्रत पुरवठाधारक स्वत:कडे ठेवतील व देयकाच्या ३ प्रती गट स्तरावर सादर करतील. अधिक्षक, शालेय पोषण आहार यांनी सदर देयकाची तपासणी करुन त्याचा गोषवारा बनवून देयकाच्या ३ प्रतींपैकी २ देयके शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हापरिषद यांचेकडे सादर करण्यात यावीत. सदर देयकाची अदायगी करताना

एक प्रत शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हापरिषद व देयकाची दुसरी प्रत मुख्य लेखा व वित्त अधिकारी,जिल्हापरिषद यांचे कार्यालयात राहील.

**(ड-४)** दि.१८.६.२००९ च्या शासन निर्णयाप्रमाणे अन्न शिजविण्याच्या अनुदानात विभागणी करण्यात आलेली आहे. ग्रामीण भागातील शाळांमध्ये पाककृतीनुसार आवश्यक लागणारा इतर धान्यादी माल (उदा. कडधान्य, डाळ, तेल, मिठ, मिरची पावडर इ.) निश्चित केलेल्या पुरवठाधारकामार्फत करण्यात येणार आहे. फक्त अन्न शिजवून देण्यासाठी म्हणजे इंधन व मजूरी यासाठी प्रतिदिन प्रतिविद्यार्थी रु. ०.५० म्हणजे ५० पैसे याप्रमाणे ग्रामशिक्षण समित्यांना अनुदान देण्यात येणार आहे. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी फक्त इंधन व मजूरीचे अनुदान तालुक्यांना / गटांना वर्ग करावे. व गटांनी ग्रामशिक्षण समित्यांना वर्ग करावेत. इंधन व मजूरीचा खर्च वजा जाता प्राथमिक (इ. १ ली ते ५ वी) साठी उर्वरित रु. १.५८ प्रतिदिन प्रतिविद्यार्थी व उच्च प्राथमिक (इ. ६ वी ते ८ वी) साठी उर्वरित रु. २.१० प्रतिदिन प्रतिविद्यार्थी हा खर्च शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी पुरवठाधारकाचे धान्यादी मालाची देयके देण्यासाठी उपयोग करावा. गटस्तरावर वर्ग करावयाचा निधी व पुरवठाधारकास अदा करावयाची रक्कम याची एकत्रित मागणी शिक्षण संचालक (प्राथमिक) यांचेकडे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी पाठवावी. तसेच मासिक खर्चाचा अहवाल व मासिक प्रगती अहवाल शिक्षण संचालनालयाकडे मुदतीत सादर करावेत. नवीन कार्यपध्दतीप्रमाणे संबंधित शाळेस पुरवठाधारकामार्फत तांदूळ व धान्यादी वस्तूं ज्या दिवसापासून प्राप्त होतील त्या दिवसापासून नवीन पध्दतीप्रमाणे अनुदानाची विभागणी लागू करण्यात येईल. संबंधित शाळेकडे यापूर्वी सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत वाहतूक होवून आलेला तांदूळ उपलब्ध असल्यास सदर तांदुळाचा साठा नोंदवहीमध्ये तशी नोंद करुन त्या तांदुळाचा वापर करण्यात यावा. पुढील मागणी नोंदविताना शाळेकडील शिल्लक विचारात घ्यावी.

**(ड-५)** शालेय पोषण आहार योजनेंतर्गत नवीन पध्दतीप्रमाणे पुरवठाधारकामार्फत तांदुळाची वाहतूक ग्रामीण व नागरी भागासाठी करण्यात येणार आहे. त्याशिवाय ग्रामीण भागामध्ये पाककृतीप्रमाणे इतर वस्तूंचा पुरवठा करण्यात येणार आहे. सदर पुरवठा साधारणपणे एकाच वेळी होईल अशा पध्दतीने पुरवठा आदेश देण्यात यावेत. प्रारंभिक पुरवठा

२ महिन्यांसाठी असेल. यानंतर एक महिन्यासाठी पुरेल एवढया धान्यादी मालाचे तसेच तांदूळाचे पुरवठा आदेश देण्यात यावेत.

**(ड-६)** शालेय पोषण आहार योजनेमध्ये वरील सुधारणा अंमलात आणताना यापूर्वी अन्न शिजविण्यासाठी नियुक्त केलेल्या यंत्रणांना आगाऊ कल्पना देण्यात यावी जेणेकरुन त्यांचेकडून आवश्यक वस्तूंची खरेदी होणार नाही.

**फ).** संबंधित शाळेकडून गटशिक्षणाधिकारी व अधिक्षक,शालेय पोषण आहार यांनी खालील माहिती प्राप्त करुन घ्यावी:-

१ नवीन पध्दतीप्रमाणे कोणत्या तारखेस मालाचा पुरवठा करण्यात आला.

२ जुन्या पध्दतीप्रमाणे शाळेमध्ये शिल्लक असलेला तांदूळ किती.

३ १ एप्रिल २००९ ते जुन्या पध्दतीप्रमाणे अन्न शिजवून देण्याचा शेवटचा दिनांक.

४ वरील मुद्दा क्र. ड-४ च्या आधारे इंधन व मजूरीचे अनुदान त्याचप्रमाणे धान्यादी मालाची किंमत याची विभागणी गट स्तरावर करण्यात यावी.

**इ) <u>अन्न शिजविण्याची कार्यपध्दती :-</u>**

**(इ-१)** ग्रामीण भागामध्ये ग्राम शिक्षण समितीने शाळेस उपलब्ध होणारा तांदूळ आणि इतर खाद्य वस्तूंपासून विहित केलेल्या पाककृतीप्रमाणे स्वयंपाक्यामार्फत आहार बनवून घ्यावा. या योजनेंतर्गत स्वयंपाकाचे काम महिला बचत गट, महिला मंडळ यांच्याकडून करुन घ्यावे. मात्र वैयक्तिक स्थानिक स्वयंपाकी नियुक्त करताना त्या गावातील विधवा, परितक्त्या अथवा गरजू महिलांना तसेच मागासवर्गीय उमेदवारांना प्राधान्य देण्यात यावे.

i)अन्न शिजवून देणा-या व्यक्तींनी सक्षम वैद्यकीय अधिका-याकडून आरोग्य विषयक तपासणी करुन घ्यावी व वैद्यकीय प्रमाणपत्र शाळेमध्ये ठेवण्यात यावे.

ii)अन्न शिजवून देणा-या प्रत्येक व्यक्तीकडे कायम स्वरुपाचे संबंधित मुख्याध्यापक यांनी दिलेले ओळखपत्र असणे आवश्यक आहे.

iii) विद्यार्थ्यांना दर्जेदार आहार देण्याच्या दृष्टीकोनातून ग्रामशिक्षण समितीने स्थानिक पातळीवर लोकसहभागातून सहभाग घ्यावा. तसेच अन्न धान्य व आहाराच्या दर्जाबाबत वेळोवेळी तपासणी करावी.

iv) सर्व क्षेत्रिय अधिकारी, जिल्हा स्तरावरील भरारी पथके, राज्यस्तरावरील दक्षता पथके यांचे मार्फत आहाराचा दर्जा वेळोवेळी तपासण्यात येईल.

**(इ-२)** ग्रामीण भागामधील शाळेसाठी ग्राम शिक्षण समितीमध्ये शालेय पोषण आहार योजनेसंदर्भात पाच (५) लाभार्थी विद्यार्थ्यांच्या पालकांना निमंत्रित सदस्य म्हणून घेण्यात यावेत. अशा प्रकारे ग्राम शिक्षण समितीमध्ये विद्यार्थ्यांच्या पालकांना आमंत्रित सदस्य म्हणून घेऊन त्याद्वारे ग्राम शिक्षण समितीने शाळेमध्ये उपलब्ध होणा-या अन्न-धान्यादी मालापासून विद्यार्थ्यांना आहार देण्याची व्यवस्था करावी.

**ग).** **<u>साठा नोंदवही व अभिप्राय पुस्तिका</u> -** प्रत्येक शाळेमध्ये (ग्रामीण भागातील तसेच नागरी भागातील शाळांमध्ये) प्राथमिक शिक्षण संचालनालयाने विहित केलेली एक साठा नोंदवही व अभिप्राय पुस्तिका ठेवण्यात यावी. सदर साठा नोंदवही मध्ये शाळेमध्ये प्राप्त होणा-या तांदुळाची नोंद करण्यात यावी. साठा नोंदवहीमध्ये शिल्लक असलेला तांदूळ, पुरवठेदाराकडून/ वाहतूकदाराकडून पुरवठा आदेशानुसार प्राप्त झालेला तांदूळ, शाळेमध्ये आहार देण्यासाठी प्रत्येक दिवशी लागलेला तांदूळ व त्याप्रमाणे प्रत्येक दिवसाच्या तांदळाची नोंद करण्यात यावी. ग्रामीण भागातील शाळांमध्ये तांदूळाबरोबर इतर धान्यादि मालाचा पुरवठा करण्यात येणार असल्याने या धान्यादी मालासाठी स्वतंत्र साठा नोंदवही ठेवण्यात यावी व तांदुळाच्या साठा - नोंदवही प्रमाणे यामध्ये धान्यादी वस्तुंची नोंद करण्यात यावी. साठा नोंद वही अद्यावत ठेवण्यात यावी. अभिप्राय पुस्तिकेत आहाराच्या दर्जाबाबत वेळोवेळी ग्रामशिक्षण समिती सदस्य, माता, पालक व अधिका-यांचे अभिप्राय घेण्यात यावेत.

**<u>ह). सर्वसाधारण सुचना :-</u>**

**(ह-१)** पुरवठाधारकाने भारतीय अन्न महामंडळाच्या गोडावूनमधून उचल केलेल्या तांदुळाचे हिशेब प्राथमिक (इ. १ ली ते ५ वी) व उच्च प्राथमिक (इ. ६ वी ते ८ वी) साठी स्वतंत्रपणे ठेवावेत व दरमहा तांदूळ उचल वाटप अहवाल प्राथमिक शिक्षण संचालनालयास सादर करावा.

**(ह-२)** तांदूळ व इतर धान्यादी मालाच्या पुरवठयासंदर्भात सर्व यंत्रणांमध्ये समन्वय राखण्यासाठी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी दरमहा जिल्हयातील गटशिक्षणाधिकारी,

अधीक्षक, शालेय पोषण आहार, कटक मंडळे व महानगरपालिकेतील संबंधित अधिकारी यांची एकत्रित बैठक घ्यावी. या बैठकीस पुरवठाधारकाचा जिल्हा व्यवस्थापक हजर असणे बंधनकारक असेल.

**(ह-३)** शासन निर्णय क्र. शापोआ २००९/प्र.क्र.१३६/प्राशि ४, दि. १८/६/२००९, या संदर्भात मागविण्यात आलेल्या निविदेतील व करारनाम्यातील अटी व शर्ती तसेच संचालनालयामार्फत वरील संदर्भात यापुढील काळात वेळोवेळी निर्गमित होणारे सर्व आदेश यांचे पालन करणे पुरवठाधारकास बंधनकारक असेल.

सदर आदेश महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर (www.maharashtra.gov.in) २०१००२२६१४२६४६००१ क्रमांकाने प्रसिद्द करण्यात आले आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

(ना.ऊ.रौराळे)
उपसचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
मुख्यमंत्र्याचे /उपमुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
मंत्री / राज्यमंत्री , शालेय शिक्षण यांचे खाजगी सचिव
शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक), सर्व जिल्हे
गट शिक्षणाधिकारी, सर्व
शिक्षणाधिकारी/प्रशासन अधिकारी/शिक्षण प्रमुख सर्व (म.न.पा./न.पा.)
ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई



टीप : तक्रार निवारण केंद्र टोल फ्री क्रमांक १८००२३३९९८८

**परिशिष्ट क्र. ५.५**

शालेय पोषण आहार योजनेतंर्गत
खर्चाचे सुधारीत दर लागू करणेबाब

**महाराष्ट्र शासन**
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक- शापोआ २०१०/प्र.क्र.१८/प्राशि ४
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक- २ फेब्रुवारी, २०११.

**वाचा-** १) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना २००६
२) केंद्र शासनाचे आदेश क्र. F.No.1-1/2009-Desk (MDM) दि. २४/११/२००९.
३) केंद्र शासनाचे आदेश क्र. F.No.3-5/2010-Desk (MDM) दि. २९/४/२०१०.
४) शिक्षण संचालक (प्राथ.) यांचे पत्र क्र.शापोआ/सु.यो/२०१०-११/प्राशिसं ३०३/३४०९ दि.१९/१०/२०१०.

**प्रस्तावना-** राज्यामध्ये शालेय पोषण आहार (Mid Day Meal) ही योजना इ. १ ली ते ८ वी च्या विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येते. या योजनेतंर्गत इ. १ ली ते ५ वी या प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांसाठी ४५० उष्मांक आणि १२ ग्रॅम प्रथिने युक्त तसेच इ. ६ वी ते ८ वी या उच्च प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांसाठी ७०० उष्मांक आणि २० ग्रॅम प्रथिने युक्त आहार देण्यात येतो. या योजनेतंर्गत केंद्र शासनाकडून प्रतिदिन प्रतिविद्यार्थी प्राथमिक वर्गासाठी १०० ग्रॅम आणि उच्च प्राथमिक वर्गासाठी १५० ग्रॅम तांदूळ पुरविण्यात येतो. या तांदूळापासून शालेय पोषण आहार तयार करण्यासाठी Cooking Cost या शिर्षाखाली केंद्र शासनाकडून आणि राज्य शासनाकडून खर्च करण्यात येत आहे. सध्या प्राथमिक वर्गासाठी प्रति दिन प्रति विद्यार्थी रु. २.०८ आणि उच्च प्राथमिक वर्गासाठी रु. २.६० असा खर्च करण्यात येतो. सदर खर्चापैकी प्राथमिक आणि उच्च प्राथमिक या दोन्ही गटामध्ये प्रति दिन प्रति विद्यार्थी ५० पैसे राज्य शासनाचा हिस्सा आहे. केंद्र शासनाने या योजनेमध्ये अन्न शिजविण्याच्या खर्चामध्ये वाढ करण्याचे आदेश दिलेले आहे. तसेच या योजनेमध्ये केंद्र आणि राज्य यांच्या खर्चाचे प्रमाण ७५:२५ राहील असे आदेश दिलेले आहे. या योजनेमध्ये केंद्र शासानाने आणखी सुधारणा केलेली असून स्वंयपाकी तथा मदतनीस या कामासाठी अनुदान देण्यात यावे असे केंद्र

शासनाने आदेश दिलेले आहेत. या योजनेमध्ये केंद्र शासनाने केलेल्या वरील सुधारणा विचारात घेऊन योजनेची अंमलबजावणी करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

त्याचप्रमाणे शालेय पोषण आहार योजनेच्या अंमलबजावणी मध्ये दि. १८/६/२००९ च्या शासन निर्णयान्वये सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. त्यानुसार ग्रामीण भागामध्ये तसेच नागरी भागामध्ये तांदुळाची वाहतूक करण्यासाठी निविदा मागवून पुरवठेदार निश्चित करण्यात यावेत, ग्रामीण भागामध्ये तांदुळाबरोबर आहारासाठी लागणाऱ्या इतर धान्यादी मालाचा पुरवठा करण्यात यावा, नागरी भागामध्ये स्वयंसेवी संस्थाकडून Expression of Interest मागवून त्याद्वारे संस्था निवड करुन केंद्रीय स्वंयपाकगृह प्रणालीचा वापर करुन तयार आहाराचा पुरवठा शाळेमध्ये विद्यार्थ्यांना करण्यात यावा, असे निर्णय घेण्यात आलेले आहेत. त्यानुसार ग्रामीण - नागरी भागामध्ये तांदुळाची वाहतूक आणि ग्रामीण भागामध्ये धान्यादी मालाचा पुरवठा निविदा मागवून त्याद्वारे पुरवठादार नियुक्त करुन सुरु करण्यात आलेला आहे. सदर अंमलबजावणी मध्ये येत असलेल्या अडचणी तसेच केंद्र शासनाने संदर्भाधिन दि. २४/११/२००९ च्या आदेशान्वये निर्गमित केलेल्या सुचना विचारात घेऊन शालेय पोषण आहार योजनेच्या अंमलबजावणी मध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतलेले आहेत.

**शासन निर्णय-** शालेय पोषण आहार योजनेंतर्गत केंद्र शासनाचा हिस्सा आणि राज्य शासनाचा हिस्सा यामधील खर्चाचे प्रमाण ७५:२५ असे राहील. शालेय पोषण आहार योजनेंतर्गत प्राथमिक आणि उच्च प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे आहाराचा पुरवठा करण्यास तसेच त्यासाठी सुधारित दरास मान्यता देण्यात येत आहे.

| लाभार्थी गट | आहाराचे प्रमाण | प्रति दिन प्रति लाभार्थी आहार खर्च मर्यादा | प्रति दिन प्रति लाभार्थी आहारासाठी दर |
|---|---|---|---|
| प्राथमिक (१ ली ते ५ वी) | ४५० उष्मांक आणि १२ ग्रॅम प्रथिनेयुक्त आहार (मध्यान्ह भोजन) | २.६९/- | २.६०/- |
| उच्च प्राथमिक (६ वी ते ८ वी) | ७०० उष्मांक आणि २० ग्रॅम प्रथिनेयुक्त आहार (मध्यान्ह भोजन) | ४.०३/- | ३.८५/- |

२. शालेय पोषण आहाराच्या प्रति दिन प्रति लाभार्थी खर्च मर्यादेमधून प्राथमिक गटामधून ९ पैसे आणि उच्च प्राथमिक गटामधुन १८ पैसे प्रति दिन प्रति लाभार्थी असा निधी शालेय पोषण आहार योजनेसाठी लागणारे विविध साहित्य आणि साधन सामग्री, सुक्ष्मपोषण इत्यादी बाबींसाठी खर्च करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

३. शालेय पोषण आहार योजनेंतर्गत ग्रामीण भागामध्ये शाळेमध्ये आहार शिजवुन विद्यार्थ्यांना वाटप केले जाते. नागरी भागामध्ये मात्र शाळेमध्ये जागेची कमतरता असल्याने स्वयंसेवी संस्था, बचत गट इत्यादी मार्फत त्यांच्या स्वयंपाकगृहामध्ये आहार शिजवुन त्यानंतर शाळेमध्ये शिजवलेल्या अन्नाचे वाटप केले जाते. शासनाने या योजनेमध्ये सुधारणा करुन नागरी भागामध्ये स्वयंसेवी संस्थाकडून Expression of Interest मागवुन त्याद्वारे संस्था निवड करुन केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणालीचा वापर करुन तयार आहाराचा पुरवठा करण्याचा निर्णय घेतलेला आहे. सदर बाब विचारात घेता या योजनेंतर्गत ग्रामीण भागासाठी तसेच शहरी भागासाठी विद्यार्थ्यांना द्यावयाच्या पाककृती सोबत जोडलेल्या परिशिष्ट 'अ' प्रमाणे विहीत करण्यात येत आहेत.

४. शालेय पोषण आहार योजनेंतर्गत ग्रामीण भागामध्ये तांदुळाबरोबरच इतर धान्यादी मालाचा पुरवठा शाळेमध्ये करण्यात येतो. या धान्यादी मालापासुन आहार बनविण्यासाठी लागणाऱ्या इंधन व मजुरी या खर्चासाठी अन्न शिजवणाऱ्या यंत्रणेस प्रति दिन प्रति लाभार्थी ५० पैसे एवढा निधी देण्यात येत होता. त्यामध्ये सुधारणा करण्यात येत असुन प्राथमिक आणि उच्च प्राथमिक लाभार्थ्यांसाठी निश्चित करण्यात आलेल्या आहार खर्चाची विभागणी खालीलप्रमाणे करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**<u>ग्रामीण भागातील आहार खर्चाची विभागणी</u>**

| लाभार्थी प्रकार | अनुज्ञेय आहार खर्च | धान्यादी माल पुरविण्यासाठी खर्च | इंधन आणि भाजीपाला यासाठी लागणारा खर्च |
|---|---|---|---|
| प्राथमिक | रु. २.६०/- | रु. १.७०/- | रु. ०.९०/- (९० पैसे) |
| उच्च प्राथमिक | रु. ३.८५/- | रु. २.६५/- | रु. १.२०/- (एक रुपया वीस पैसे) |

५. या योजनेमध्ये विहीत करण्यात आलेल्या पाककृतीनुसार आहार शिजविण्यासाठी लागणाऱ्या घटकांमधील भाजीपाला, कांदा, लसूण या वस्तु ग्रामीण भागामध्ये ज्या यंत्रणेमार्फत प्रत्यक्ष आहार शिजविण्याचे काम केले जाते, त्यांनी म्हणजे सेवा भावी संस्था किंवा महिला बचत गट इ. यांनी खरेदी करुन त्याचा आहारात समावेश करावा. सदर खर्चासाठी तसेच इंधन खर्चासाठी आहार शिजवण्याचे काम करणाऱ्या संस्थेस (उदा. सेवाभावी संस्था / महिला बचत गट इ. ) प्राथमिक वर्गासाठी रु. ०.९०/- (नव्वद पैसे) आणि उच्च प्राथमिक वर्गासाठी रु. १.२०/- (एक रुपया वीस पैसे) एवढा खर्च प्रति दिन प्रति विद्यार्थी याप्रमाणे अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे. ग्रामीण भागामध्ये अन्न शिजवणाऱ्या यंत्रणांना वरील निधी देण्यात यावा. अन्न शिजवणाऱ्या यंत्रणांनी आठवड्यातून किमान एक दिवस विद्यार्थ्यांना पुरक आहार (उदा. फळे, सोयाबिस्कीट, दूध, चिक्की, राजगीरा लाडू, गुळ, शेंगदाणे, बेदाने, चुरमुरे इ.) पुरक आहार द्यावा. शालेय पोषण आहार योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना द्यावयाच्या नियमित आहाराव्यतिरिक्त सदरचा पूरक आहार हा अतिरिक्त राहील. तसेच त्यासाठी वेगळा निधी देण्यात येणार नाही.

६. या योजनेमध्ये ग्रामीण भागामध्ये पुवठेधारकामार्फत शाळेमध्ये पुरविण्यात आलेल्या वस्तुंचा वापर करुन शालेय पोषण आहार तयार करण्यात यावा. सदर आहार बनविण्यासाठी लागणाऱ्या इतर वस्तु उदा. भाजीपाला (पालक, मेथी, टोमॅटो, कोथिंबीर, बटाटे, राजगीरा, फ्लावर, कोबी, वटाणा, शेवगाशेंगा, वांगी, दुधी, भोपळा, वाल, तोंडले, गाजर इत्यादी तसेच स्थानिक पातळीवर उपलब्ध होणाऱ्या इतर भाज्या), कांदा-लसूण, लिंबू-कडीपत्ता इत्यादी पाककृतीनुसार आहार शिजवण्याचे काम करणाऱ्या स्थानिक यंत्रणेने खरेदी कराव्यात आणि त्याचा आहारात समावेश करावा. स्थानिक यंणत्रेने चविष्ठ आहार बनविण्याचे काम करावे. तसेच त्यामध्ये भाजीपाल्याचा समावेश न चुकता करावा. संबंधित मुख्याध्यापकाने प्रत्येक महिन्याला आहारामध्ये आवश्यक भाजीपाल्याचा समावेश केला असल्याचे तसेच आहार चविष्ठ असल्याचे खात्री करुन आहार शिजवणाऱ्या यंत्रणेस प्रमाणपत्र द्यावे. सदर प्रमाणपत्राच्या आधारे संबंधित यंत्रणेस खर्च अदा करण्याची कार्यवाही करावी. वापरलेल्या भाजीपाल्याची

नोंदवहीवर नियमित नोंद अन्न शिजवणाऱ्या यंत्रणेने करावी व संबंधित मुख्याध्यापकाने नोंदवही नियमितरित्या प्रमाणीत करावी.

**शहरी भागासाठी आहार खर्चाचे अनुदान-**

७. या योजनेमध्ये शहरी भागामध्ये म्हणजे महानगरपालिका, नगरपालिका क्षेत्रामध्ये स्वयंसेवी संस्था / बचत गट यांचेमार्फत शिजवलेल्या तयार आहाराचा पुरवठा शाळांमध्ये विद्यार्थ्यांना करतो. सदर तयार आहार पुरवठयासाठी स्वारस्याची अभिव्यक्तीसाठी (Expression Of Interest) स्वयंसेवी संस्था / सेवाभावी संस्था / महिला मंडळे / बचत गट यांचेकडून अर्ज मागवून केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणालीचा वापर करुन तयार आहाराचा पुरवठा करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. त्यामुळे शहरी भागामध्ये ग्रामीण भागासारखी आहार खर्चाची (Cooking Cost) विभागणी करण्याची आवश्यकता नाही. शहरी भागामध्ये शालेय पोषण आहार पुरवठा करणाऱ्या यंत्रणेस खालीलप्रमाणे आहार खर्चाचे अनुदान अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| लाभार्थी प्रकार | अनुज्ञय आहार खर्च | तयार आहाराचा पुरवठा करणाऱ्या यंत्रणेस अदा करावयाचे अनुदान |
|---|---|---|
| प्राथमिक | २.६० | २.६० |
| उच्च प्राथमिक | ३.८५ | ३.८५ |

**शालेय पोषण आहार योजनेंतर्गत स्वयंपाकी तथा मदतनीस या खर्चासाठी अनुदान -**

८. केंद्र शासनाने शालेय पोषण आहार योजनेमध्ये अन्न शिजविण्याचे काम करण्यासाठी स्वंयपाकी तथा मदतनीस या कामासाठी स्वतंत्रपणे मानधन अदा करण्यास मान्यता दिलेली आहे. राज्यामध्ये या योजनेमध्ये महिला बचत गट / स्वयंसेवी संस्था यांचेकडून ग्रामीण भागामध्ये आहार शिजवून घेण्याचे काम करुन घेण्यात येते तर नागरी भागामध्ये महिला बचत गट / स्वयंसेवी संस्था यांचेकडून त्यांच्या स्वंयपाकगृहामध्ये शिजविलेल्या अन्नाचे वाटप शाळेमध्ये विद्यार्थ्यांना करण्यात येते. ग्रामीण भागामध्ये या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी

खालीलप्रमाणे स्वयंपाकी तथा मदतनीस ही कामे करण्यासाठी अनुदान देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाळेमधील लाभार्थी संख्या (प्राथमिक अधिक उच्च प्राथमिक मिळुन) (१ ली ते ८ वी मिळुन) | स्वयंपाकाचे तसेच मदतनीसाचे कामासाठी अनुदान प्रतिमहीना वर्षातील १० महिन्यासाठी. |
|---|---|---|
| १. | २५ विद्यार्थ्यांपर्यंत | रु. १०००/- |
| २. | २६ ते १९९ विद्यार्थी | रु. २०००/- |
| ३. | २०० ते २९९ विद्यार्थी | रु. ३०००/- |
| ४. | ३०० ते ३९९ विद्यार्थी | रु. ४०००/- |
| ५. | ४०० ते ४९९ विद्यार्थी | रु. ५०००/- |
| ६. | ५०० ते ५९९ विद्यार्थी | रु. ६०००/- |
| ७. | ६०० ते ६९९ विद्यार्थी | रु. ७०००/- |
| ८. | ७०० ते ७९९ विद्यार्थी | रु. ८०००/- |
| ९. | ८०० ते ८९९ विद्यार्थी | रु. ९०००/- |
| १०. | ९०० पेक्षा अधिक विद्यार्थी | रु. १०,०००/- |

**९.** शालेय पोषण आहार योजनेमध्ये ग्रामीण भागातील शाळांमध्ये महिला बचत गट स्वंयसेवी संस्था यांचेमार्फत अन्न शिजविण्याचे काम करण्यात येत असल्याने वरील निकषानुसार ग्रामीण भागातील शाळांमध्ये अन्न शिजविण्याचे काम करणाऱ्या यंत्रणेस वरीलप्रमाणे अनुदान अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे. स्वंयपाकी तथा मदतनीस या कामासाठी ग्रामीण भागामध्ये महिला बचत गट किंवा स्वयंसेवी संस्था किंवा मानधनी तत्वावरील पदासाठी स्वंतत्रपणे अनुदान देण्यात येणार असल्याने त्यांनी खालीलप्रमाणे कामे करणे आवश्यक राहील.

अ) अन्न शिजविण्याचे काम करणे

ब) तांदूळ व धान्यादी मालाची साफसफाई करणे

क) शाळेमध्ये विद्यार्थ्यांना आहाराचे वाटप जेवणाच्या जागेवर करणे

ड) शाळेमध्ये विद्यार्थ्यांनी आहाराचे सेवन केल्यानंतर साफसफाई करणे (स्वंयपाकगृहासह) तसेच सांडलेल्या अन्नाची योग्य विल्हेवाट लावणे.

इ) भांडयाची साफसफाई करणे व जेवल्यानंतर ताटांची स्वच्छता करणे

ई) पिण्याचे पाणी भरणे व जेवताना विद्यार्थ्यांना पाणी पुरविणे

उ) शाळा व शाळेचा परिसर स्वच्छ ठेवणे

ऊ) अन्न शिजविणा-या यंत्रणेच्या आहारविषयक नोंदी ठेवणे

**१०.** या योजनेंतर्गत शहरी भागामध्ये स्वंयसेवी संस्था आणि बचत गट यांचेकडून तयार आहाराचा पुरवठा करण्यात येत असल्याने स्वंयपाकी तथा मदतनीस या खर्चासाठी शहरी भागासाठी (महानगरपालिका आणि नगरपालिका क्षेत्र) खालीलप्रमाणे निकष विहीत करण्यात येत आहेत.

| अ.क्र | स्वंयसेवी संस्था / बचत गट यांचेमार्फत शिजविलेल्या अन्नाचा पुरवठा होत असलेली लाभार्थी संख्या | स्वयंपाकाचे तसेच मदतनीसाचे कामासाठी अनुदान प्रतिमहिना वर्षातील १० महिन्यासाठी |
|---|---|---|
| १ | ५०० विद्यार्थ्यांपर्यंत | रु. २०००/- |
| २ | १००० विद्यार्थ्यांपर्यंत | रु. ४०००/- |
| ३ | ५,००० विद्यार्थ्यांपर्यंत | रु. ६०००/- |
| ४ | १०,००० विद्यार्थ्यांपर्यंत | रु. ८०००/- |
| ५ | १०००० पेक्षा जास्त विद्यार्थी संख्या | रु. १०,०००/- |

नागरी भागामध्ये स्वयंपाकी तथा मदतनीस या खर्चासाठी स्वयंसेवी संस्थेमार्फत त्यांच्या स्वयंपाकगृहातून आहार पुरवठा होणाऱ्या सर्व शाळांमधील मिळुन विद्यार्थी संख्या एकत्रितरित्या विचारात घेण्यात यावी व त्यानुसार वरीलप्रमाणे अनुदान देण्यात यावे. नागरी भागामध्ये तयार आहाराचा पुरवठा करणाऱ्या संस्थेने त्यांच्या स्वयंपाकगृहात अन्न शिजवुन त्याचे वाटप शाळेमध्ये विद्यार्थ्यांना करणे तसेच शाळेमध्ये विद्यार्थ्यांनी आहाराचे सेवन केल्यानंतर जागेची, विद्यार्थ्यांच्या ताटांची साफसफाई करणे ही कामे करणे आवश्यक राहील.

सदरचा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने त्यांचा अनौपचारीक संदर्भ क्रमांक ६९२/१०/व्यय-५ दिनांक २३/११/२०१० अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदरचे शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर (www.maharashtra.gov.in) २०११०२०२१९३३५०००१ क्रमांन्वये प्रसिध्द करण्यात आले आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावांने.

( ना.उ.रौराळे )

उपसचिव, महाराष्ट्र शासन

टीप : तक्रार निवारण केंद्र टोल फ्री क्रमांक १८००२३३९९८८

## परिशिष्ट- अ

### शालेय पोषण आहार योजनेंतर्गत द्यावयाच्या पाककृतीचा तपशिल
### ग्रामीण भागासाठी द्यावयाच्या पाककृती

पाककृती क्रमांक-१ **डाळ तांदूळाची खिचडी / मसाले भात / पुलाव**

इ. १ ली ते ५ वी साठी

| खाद्य पदार्थाचे नाव | वजन (ग्रॅम) |
|---|---|
| तांदूळ | १०० ग्रॅम |
| मुगडाळ | २० ग्रॅम |
| तेल (सोयाबीन) (अॅगमार्क) | ५ ग्रॅम |
| हळद, मीठ, तिखट, मसाला, जिरे, मोहरी, खोबरे, शेंगदाणा, कांदा लसूण इ. | आवश्यकतेनुसार चवीप्रमाणे (सर्वसाधारणपणे २ ते ५ ग्रॅम एकूण) |
| भाजीपाला<br>पालक, मेथी, टोमॅटो, बटाटे, हिरवा वटाणा, गेवडा, तोंडले, गाजर, ,फ्लावर इ. पैकी तसेच स्थानिक उपलब्धतेनुसार योग्य त्या भाजीपाल्याचा समावेश करण्यात यावा. | ५० ग्रॅम |
| (शिजविलेल्या अन्नाचे वजन साधारणत: २५० ते २७५ ग्रॅम एवढे राहील. तसेच त्यामध्ये ४५० उष्मांक आणि १२ ग्रॅम प्रथिने यापेक्षा जास्त पोषण मुल्ये राहतील.) | |

**डाळ तांदूळाची खिचडी / मसाले भात / पुलाव**

इ. ६ वी ते ८ वीसाठी

| खाद्य पदार्थाचे नाव | वजन (ग्रॅम) |
|---|---|
| तांदूळ | १५० ग्रॅम |
| मुगडाळ | ३० ग्रॅम |
| तेल (सोयाबीन) (अॅगमार्क) | ७.५ ग्रॅम |
| हळद, मीठ, तिखट, मसाला, जिरे, मोहरी, खोबरे, शेंगदाणा, कांदा लसूण इ. | आवश्यकतेनुसार चवीप्रमाणे (सर्वसाधारणपणे ३ ते ७ ग्रॅम एकूण) |
| भाजीपाला<br>पालक, मेथी, टोमॅटो, बटाटे, हिरवा वटाणा, गेवडा, तोंडले, गाजर, फ्लावर इ. पैकी तसेच स्थानिक उपलब्धतेनुसार योग्य त्या भाजीपाल्याचा समावेश करण्यात यावा. | ७५ ग्रॅम |
| (शिजविलेल्या अन्नाचे वजन साधारणत: ३७५ ते ४०० ग्रॅम एवढे राहील. तसेच त्यामध्ये ७०० उष्मांक आणि २० ग्रॅम प्रथिने यापेक्षा जास्त पोषण मुल्ये राहतील.) | |

पाककृती क्रमांक-२ **भात आणि कडधान्याची उसळ भाजी - आमटी**

इ. १ ली ते ५ वी साठी

| **खाद्य पदार्थांचे नाव** | **वजन (ग्रॅम)** |
|---|---|
| तांदूळ | १०० ग्रॅम |
| मोड आलेले कडधान्य<br>हरभरा / चवळी / मटकी / मुग / वटाणा (यापैकी कोणत्याही कडधान्याचा वापर करण्यात यावा ) | २० ग्रॅम |
| तेल (सोयाबीन) (ॲगमार्क) | ५ ग्रॅम |
| हळद, मीठ, तिखट, मसाला, जिरे, मोहरी, खोबरे, शेंगदाणा, कांदा लसूण इ. | आवश्यकतेनुसार चवीप्रमाणे (सर्वसाधारणपणे २ ते ५ ग्रॅम एकूण) |
| भाजीपाला<br>पालक, मेथी, टोमॅटो, बटाटे, हिरवा वटाणा, गेवडा, तोंडले, गाजर, फ्लावर इ. पैकी तसेच स्थानिक उपलब्धतेनुसार योग्य त्या भाजीपाल्याचा समावेश करण्यात यावा. | ५० ग्रॅम |
| (शिजविलेल्या अन्नाचे वजन साधारणत: २५० ते २७५ ग्रॅम एवढे राहील. तसेच त्यामध्ये ४५० उष्मांक आणि १२ ग्रॅम प्रथिने यापेक्षा जास्त पोषण मुल्ये राहतील.) | |

**भात आणि कडधान्याची उसळ भाजी - आमटी**

इ. ६ वी ते ८ वीसाठी

| **खाद्य पदार्थांचे नाव** | **वजन (ग्रॅम)** |
|---|---|
| तांदूळ | १५० ग्रॅम |
| मोड आलेले कडधान्य<br>हरभरा / चवळी / मटकी / मुग / वटाणा (यापैकी कोणत्याही कडधान्याचा वापर करण्यात यावा ) | ३० ग्रॅम |
| तेल (सोयाबीन) (ॲगमार्क) | ७.५ ग्रॅम |
| हळद, मीठ, तिखट, मसाला, जिरे, मोहरी, खोबरे, शेंगदाणा, कांदा, लसूण इ. | आवश्यकतेनुसार चवीप्रमाणे (सर्वसाधारणपणे ३ ते ७ ग्रॅम एकूण) |
| भाजीपाला<br>पालक, मेथी, टोमॅटो, बटाटे, हिरवा वटाणा, गेवडा, तोंडले, गाजर, फ्लावर इ. पैकी तसेच स्थानिक उपलब्धतेनुसार योग्य त्या भाजीपाल्याचा समावेश करण्यात यावा. | ७५ ग्रॅम |
| (शिजविलेल्या अन्नाचे वजन साधारणत: ३७५ ते ४०० ग्रॅम एवढे राहील. तसेच त्यामध्ये ७०० उष्मांक आणि २० ग्रॅम प्रथिने यापेक्षा जास्त पोषण मुल्ये राहतील.) | |

पाककृती क्रमांक-३ **वरण भात / सांबर भात / आमटी भात**

इ. १ ली ते ५ वी साठी

| खाद्य पदार्थांचे नाव | वजन (ग्रॅम) |
|---|---|
| तांदूळ | १०० ग्रॅम |
| तुरडाळ | २० ग्रॅम |
| तेल (सोयाबीन) (ॲगमार्क) | ५ ग्रॅम |
| हळद, मीठ, तिखट, मसाला, जिरे, मोहरी, खोबरे, शेंगदाणा, कांदा लसूण इ. | आवश्यकतेनुसार चवीप्रमाणे (सर्वसाधारणपणे २ ते ५ ग्रॅम एकूण) |
| भाजीपाला<br>पालक, मेथी, टोमॅटो, बटाटे, हिरवा वटाणा, गेवडा, तोंडले, गाजर, फ्लावर इ. पैकी तसेच स्थानिक उपलब्धतेनुसार योग्य त्या भाजीपाल्याचा समावेश करण्यात यावा. | ५० ग्रॅम |
| (शिजविलेल्या अन्नाचे वजन साधारणत: २५० ते २७५ ग्रॅम एवढे राहील. तसेच त्यामध्ये ४५० उष्मांक आणि १२ ग्रॅम प्रथिने यापेक्षा जास्त पोषण मुल्ये राहतील.) | |

**वरण भात / सांबर भात / आमटी भात**

इ. ६ वी ते ८ वीसाठी

| खाद्य पदार्थांचे नाव | वजन (ग्रॅम) |
|---|---|
| तांदूळ | १५० ग्रॅम |
| तुरडाळ | ३० ग्रॅम |
| तेल (सोयाबीन) (ॲगमार्क) | ७.५ ग्रॅम |
| हळद, मीठ, तिखट, मसाला, जिरे, मोहरी, खोबरे, शेंगदाणा, कांदा लसूण इ. | आवश्यकतेनुसार चवीप्रमाणे (सर्वसाधारणपणे ३ ते ७ ग्रॅम एकूण) |
| भाजीपाला<br>पालक, मेथी, टोमॅटो, बटाटे, हिरवा वटाणा, गेवडा, तोंडले, गाजर, फ्लावर इ. पैकी तसेच स्थानिक उपलब्धतेनुसार योग्य त्या भाजीपाल्याचा समावेश करण्यात यावा. | ७५ ग्रॅम |
| (शिजविलेल्या अन्नाचे वजन साधारणत: ३७५ ते ४०० ग्रॅम एवढे राहील. तसेच त्यामध्ये ७०० उष्मांक आणि २० ग्रॅम प्रथिने यापेक्षा जास्त पोषण मुल्ये राहतील.) | |

पाककृती क्रमांक-१

## गोड भात

इ. १ ली ते ५ वी साठी

| खाद्य पदार्थांचे नाव | वजन (ग्रॅम) |
|---|---|
| तांदूळ | १०० ग्रॅम |
| मुगडाळ / मसूरडाळ | २० ग्रॅम |
| तेल (सोयाबीन) (ॲगमार्क) | ५ ग्रॅम |
| साखर / गुळ | २० ग्रॅन |
| (शिजविलेल्या अन्नाचे वजन साधारणत: २५० ते २७५ ग्रॅम एवढे राहील. तसेच त्यामध्ये ४५० उष्मांक आणि १२ ग्रॅम प्रथिने यापेक्षा जास्त पोषण मुल्ये राहतील.) | |

## गोड भात

इ. ६ वी ते ८ वीसाठी

| खाद्य पदार्थांचे नाव | वजन (ग्रॅम) |
|---|---|
| तांदूळ | १५० ग्रॅम |
| मुगडाळ / मसूरडाळ | ३० ग्रॅम |
| तेल (सोयाबीन) (ॲगमार्क) | ७.५ ग्रॅम |
| साखर / गुळ | २० ग्रॅम |
| (शिजविलेल्या अन्नाचे वजन साधारणत: ३७५ ते ४०० ग्रॅम एवढे राहील. तसेच त्यामध्ये ७०० उष्मांक आणि २० ग्रॅम प्रथिने यापेक्षा जास्त पोषण मुल्ये राहतील.) | |

## (१) नागरी भागातील पाककृती -

शहरी भागामध्ये स्वयंसेवी संस्था, सेवाभावी संस्था, महिला मंडळे / बचत गट यांचेकडून त्यांच्या स्वंयपाकगृहामध्ये आहार बनवून त्याचा पुरवठा शहरी / नागरी भागामध्ये करण्यात येतो. त्यामुळे शहरी भागात वरीलप्रमाणे डाळ तांदूळाची खिचडी / मसाले भात / पुलाव, भात आणि कडधान्याची उसळ भाजी - आमटी, वरण भात / सांबर भात / आमटी भात, गोड भात या चार पाककृतीमधून आहार देण्यात यावा. सदर आहारामध्ये पाककृतीमध्ये नमूद केल्याप्रमाणे आवश्यक भाजीपाल्याचा समावेश करण्यात-यावा. नागरी भागामध्ये वरील आहाराबरोबर इडली सांबर, मसाला इडली सांबर (सर्व डाळी वापरुन) या

पाककृती देता येतील. मात्र इडली सांबर आणि मसाला इडली सांबर यामध्ये प्राथमिक गटासाठी ४५० उष्मांक आणि १२ ग्रॅम प्रथिने तसेच उच्च प्राथमिक गटासाठी ७०० उष्मांक आणि २० ग्रॅम प्रथिने एवढी पोषण मुल्ये असणे आवश्यक राहील. त्याचप्रमाणे सांबर या पदार्थामध्ये आवश्यक भाजीपाल्याचा समावेश करणे आवश्यक राहील.

## (२) पाककृतीची निवड करण्याबाबत मार्गदर्शक सुचना -

शालेय पोषण आहार योजनेंतर्गत लाभार्थ्यांना द्यावयाच्या पाककृती साधारणपणे वरीलप्रमाणे राहतील. प्रत्येक जिल्ह्यामध्ये त्या त्या जिल्ह्याच्या आवश्यकतेप्रमाणे योग्य त्या पाककृतींची निवड आठवडयातील प्रत्येक दिवसासाठी जिल्हास्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या अध्यक्षतेखालील समितीमार्फत करण्यात येईल. ग्रामीण भागामध्ये या योजनेची अंमलबजावणी करीत असताना एखादी पाककृती विद्यार्थ्यांना आवडत नसल्यास किंवा विद्यार्थी चवीने ती खात नसल्यास त्या ऐवजी अन्य पाककृतीची निवड करण्यात यावी. प्रत्येक जिल्ह्यामध्ये आठवडयातील दिवसानुसार प्रत्येक दिवशी कोणती पाककृती द्यावयाची याची अगोदर निश्चिती करण्यात यावी आणि त्या जिल्ह्यामध्ये प्रत्येक दिवशी त्या निश्चित केलेल्या पाककृतीप्रमाणे सर्व विद्यार्थ्यांना आहार देण्यात यावा.

नागरी भागामध्ये म्हणजे महानगरपालिका आणि नगरपालिका क्षेत्रात या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी पाककृतीची निवड मनपा / नपा स्तरावर करण्यात यावी. मनपा / नपा क्षेत्रामध्ये आठवडयातील दिवसानुसार प्रत्येक दिवशी कोणती पाककृती द्यावयाची याची अगोदर निश्चिती करण्यात यावी आणि त्यानुसार प्रत्येक दिवशी निश्चित केलेल्या पाककृतीप्रमाणे सर्व विद्यार्थ्यांना आहार देण्यात यावा. नागरी भागामध्ये तयार आहाराचा पुरवठा करणाऱ्या संस्थेने नियमित आहारा व्यतिरिक्त आठवडयातून किमान एक दिवस पुरक आहार देणे आवश्यक राहील. सदरचा पुरक आहार हा अतिरिक्त आहार राहील. म्हणजे नियमित आहार अधिक आठवडयातून किमान एक दिवस पुरक आहार देणे

आवश्यक राहील. नागरी भागामध्ये नियमित आहार पुरवठयासाठी देण्यात येणाऱ्या अनुदानामधूनच पुरक आहाराचा खर्च भागविणे आवश्यक राहील. त्यासाठी कोणताही अतिरिक्त निधी देण्यात येणार नाही.

(३) **पाककृतीमधील खादय पदार्थासंदर्भात मार्गदर्शक सुचना -**

**(अ) तांदूळ ग्रामीण तसेच नागरी भागामध्ये -** शालेय पोषण आहार योजनेमध्ये विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन देण्यासाठी केंद्र शासनामार्फत प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांसाठी प्रतिदिन प्रति लाभार्थी प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांसाठी १०० ग्रॅम तांदूळ आणि उच्च प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांसाठी १५० ग्रॅम तांदूळ पुरविण्यात येतो. सदर तांदळाची उचल भारतीय अन्न महामंडळाच्या गोदामातून करुन त्यांनतर वाहतूक नियुक्त करण्यात आलेल्या कंत्राटदारांमार्फत करण्यात येऊन ग्रामीण तसेच नागरी भागातील शाळेमध्ये तांदुळ पुरविण्यात येईल.

**(ब) ग्रामीण भागातील शाळांसाठी धान्यादि मालाचा पुरवठा -** ग्रामीण भागातील शाळांमध्ये पाककृतीनुसार धान्यादि मालाचा पुरवठा करण्यात येईल. सदर वस्तू ग्रामीण भागामध्ये नियुक्त केलेल्या पुरवठादारामार्फत करण्यात येईल.

**(क) ग्रामीण भागातील शाळांमधील आहारात लागणाऱ्या इतर वस्तू -** ग्रामीण भागातील शाळांमध्ये लाभार्थ्यांना आहार पुरवण्यासाठी पाककृतीनुसार लागणाऱ्या कांदा, लसूण, कडीपत्ता, कोथबींर या वस्तू अन्न शिजवणाऱ्या यंत्रणेने स्थानिकरित्या खरेदी करुन त्याचा आहारामध्ये समावेश करुन चवीष्ट आहार बनविण्याची कार्यवाही करावी.

**(ड) आहारामध्ये पालेभाजांचा समावेश -** ग्रामीण भागातील शाळांमध्ये अन्न शिजविणाऱ्या यंत्रणेने पालेभाजांचा समावेश आहारामध्ये प्रति दिन प्रति लाभार्थी प्राथमिक वर्गासाठी ५० ग्रॅम आणि उच्च प्राथमिक वर्गासाठी ७५ ग्रॅम याप्रमाणे करावा. सदर पालेभाजा अन्न शिजविणाऱ्या यंत्रणेने स्थानिक बाजारातून खरेदी कराव्यात.

**(इ) अन्न शिजवणा-या यंत्रणेस द्यावयाच्या अनुदानाबाबत सुचना-** अन्न शिजविणाऱ्या यंत्रणेस इंधन आणि भाजीपाला यासाठी प्राथमिक वर्गासाठी रु. ०.९०/- (नव्वद पैसे) आणि उच्च प्राथमिक वर्गासाठी रु. १.२०/- (एक रुपया वीस पैसे) याप्रमाणे प्रति दिन प्रति लाभार्थी अनुदान देण्यात येईल. सदर अनुदानामधून वरील बाबींचा तसेच आठवडयातून किमान एक दिवस अतिरिक्त परक आहार देण्यासाठीचाही खर्च भागविण्यात यावा.

*********

टीप : तक्रार निवारण केंद्र टोल फ्री क्रमांक १८००२३३९९८८

**परिशिष्ट क्र. ५.६**

# महाराष्ट्र शासन

क्रमांक :- शापोआ-२०१३/प्र.क्र.३३९/प्राशि-४.
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
मादाम कामा रोड, हुतात्मा राजाराम चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०००३२.
दिनांक :- २२ जुलै, २०१३

प्रति,

१) शिक्षणाधिकारी (प्राथ.), जिल्हा परिषद, सर्व

२) शिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद, सर्व

३) शिक्षणप्रमुख / शिक्षणाधिकारी / प्रशासन अधिकारी महानगरपालिका / नगरपालिका सर्व

विषय - शालेय पोषण आहार योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना चांगले अन्न मिळावे याबाबत दक्षता घेणेबाबत...

शालेय पोषण आहार योजनेंतर्गत इयत्ता १ ली ते ८ वी च्या विद्यार्थ्यांना दुपारचे जेवण देण्यात येते. या योजनेमध्ये बिहार मध्ये घडलेली दुर्घटना विचारात घेऊन खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याच्या सुचना देण्यात येत आहेत.

१) ग्रामीण भागातील शाळांमध्ये नियुक्त केलेल्या पुरवठेदारांमार्फत शासकीय तांदळाची वाहतूक करुन तांदूळ पुरविण्यात येतो. तसेच इतर धान्यादी माल शाळेमध्ये पुरविण्यात येतो. सदर पुरविण्यात येणारा माल चांगल्या प्रतिचा असणे आवश्यक आहे. त्यासाठी शाळेत माल प्राप्त झाल्यानंतर मुख्याध्यापकांनी संबंधित शाळेमध्ये अन्न शिजविणाऱ्या बचत गटाच्या समक्ष तपासुन घ्यावा. माल खराब असल्याचे आढळल्यास सदर माल ताब्यात घेऊ नये. या योजनेमध्ये पुरवठेदाराने चांगला माल पुरविणे आणि शाळेच्या मुख्याध्यापकांनी चांगला माल ताब्यात घेणे अशी संयुक्त जबाबदारी आहे.

२) शाळेमध्ये यापूर्वी पुरविलेला धान्यादि मालापैकी वापरात आलेला माल वजा जाता काही धान्यादि माल शिल्लक राहण्याची शक्यता असते. सदर शिल्लक माल जास्त दिवस राहिल्यास खराब होण्याची किंवा मुदत बाह्य होण्याची शक्यता असते. त्यामुळे शाळा मुख्याध्यापकांनी पुरवठेदाराकडून आवश्यक तेवढाच माल ताब्यात घ्यावा आणि तेवढाच मालाची पोहोच पावती पुरवठेदारास द्यावी. कोणत्याही परिस्थितीमध्ये शाळेमध्ये एक महिन्यापेक्षा अधिक कालावधीसाठी लागणाऱ्या मालाचा साठा राहणार नाही. एवढाच माल शाळेच्या मुख्याध्यापकांनी ताब्यात घ्यावा.

३) शाळेमध्ये धान्यादि माल आल्यानंतर तो व्यवस्थित ठेवण्याची कार्यवाही करावी. अन्न शिजविण्यासाठी नियुक्त केलेल्या यंत्रणेने अन्न शिजविण्यापूर्वी मालाची काळजीपूर्वक साफसफाई करावी. तसेच अन्न शिजविण्यापूर्वी सदर माल चांगला आहे याची खात्री करावी.

४) अन्न शिजविण्यासाठी वापरात येणारी भांडी अन्न शिजविण्यापूर्वी व्यवस्थित स्वच्छ करुन घ्यावीत तसेच मुलांनी जेवण घेतल्यानंतर सदर भांडी व्यवस्थित स्वच्छ करुन ठेवावीत. भांडी स्वच्छ करण्याची कार्यवाही अन्न शिजविणाऱ्या यंत्रणेने करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे स्वयंपाकगृहाची स्वच्छता याकडे नियमित लक्ष द्यावे.

५) मुलांना शालेय पोषण आहार देण्यापूर्वी अर्धा तास अगोदर संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांनी (किंवा वरिष्ठ शिक्षकांनी) अन्नाची चव घ्यावी आणि चव नोंदवहीमध्ये नोंद करावी अशा सुचना यापूर्वी देण्यात आल्या आहेत. त्याचे काटेकोर पालन करण्यात यावे. त्याशिवाय अन्न शिजविणाऱ्या यंत्रणेच्या व्यक्तींनीही मुख्याध्यापक / शिक्षक यांचे समक्ष अन्नाची चव घेऊन अर्धा तासानंतर मुलांना अन्न खाण्यास दयावे. सदर सुचनेचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

६) नागरी भागामध्ये जागेची कमतरता असल्याने शाळेमध्ये अन्न न शिजविता या कामासाठी बचत गट / महिला गट / महिला संस्था / स्वयंसेवी संस्था यांची तयार आहाराचा पुरवठा करण्यासाठी नेमणूक करण्यात येते. सदर यंत्रणेने त्यांच्या स्वयंपाकगृहात अन्न शिजवून शिजविलेले अन्न शाळेत पाठवून ते विद्यार्थ्यांना दिले जाते. त्यामुळे नागरी भागामध्ये संबंधित शाळा मुख्याध्यापकांनी तसेच अन्न पुरवठा करणाऱ्या यंत्रणांनी अधिक दक्षता घ्यावी.

७) नागरी भागामध्ये ज्या संस्थेच्या स्वयंपाकगृहातुन अन्न शिजविले जाते त्या स्वंयपाकगृहास महिन्यातुन किमान एकदा संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांनी किंवा वरिष्ठ शिक्षकांनी स्वत: भेट देवून स्वयंपाकगृह आरोग्यदायी आहे याची खात्री करावी.

८) संबंधित महानगरपालिका / नगरपालिकांच्या आरोग्य अधिकाऱ्यांनी अशा स्वयंपाकगृहांना नियमित भेटी देऊन तपासणी करावी.

९) शाळेमध्ये शिजविलेले अन्न आल्यानंतर संबंधित अन्न शिजवून पुरवठा करणाऱ्या संस्थेच्या व्यक्तीस प्रथम सदर अन्न खाण्यास द्यावे. त्यानंतर मुख्याध्यापक / वरीष्ठ शिक्षक यांनी अन्नाची चव घेऊन त्यानंतर अर्धा तासांनी मुलांना अन्न खाण्यास देण्यात यावे.

१०) ग्रामीण तसेच नागरी भागामध्ये मुलांना अन्न खाण्यास देण्यापूर्वी सदर अन्नाचा नमूना बाजूला काढून ठेवावा आणि तो एक दिवस जतन करावा.

११) अन्न शिजविणाऱ्या यंत्रणांच्या स्वयंपाकी/मदतनीस यांची सहा महिन्यातून एकदा वैदयकीय तपासणी करण्याची कार्यवाही करावी.

१२) RTE कायदा २००९ मधील तरतूदीनुसार प्रत्येक शाळेमध्ये शाळा व्यवस्थापन समितीची नियुक्ती करण्यात आली आहे. शाळा व्यवस्थापन समितीमधील अध्यक्ष आणि सदस्यांनी वेळोवेळी शालेय पोषण आहाराची तपासणी करणे आवश्यक आहे.

१३) खाजगी शाळांसाठी संबंधित शाळा व्यवस्थापनाने त्यांच्या शाळेमध्ये पुरविणाऱ्या शालेय पोषण आहाराचा दर्जा तपासण्याची आणि दर्जावर नियंत्रण ठेवण्याची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

१४) या योजनेच्या अंमलबजावणीबाबत यापूर्वी वेळोवेळी सुचना दिलेल्या आहेत त्या सुचनांचे आणि प्रस्तुत पत्रान्वये दिलेल्या सुचनांचे काटेकोर पालन करावे.

(ना. ऊ. रराळे)
सहसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत -

१) शिक्षण संचालक (प्राथ.) महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांनी सदर सुचना सर्व शाळांना द्याव्यात.

२) महानगरपालिका आयुक्त (सर्व)

३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)

४) नगरपालिका, मुख्याधिकारी (सर्व)

५) विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व)

## परिशिष्ट क्र. ५.७

क्रमांक :- प्राशिसं/शापोआ/अंमल/२०११-१२/३०३/१२९३
दिनांक : २२/०३/२०१२

प्रति,

१. शिक्षणाधिकारी
बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई
२. शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद (सर्व)

विषय : शालेय पोषण आहार योजना
स्वच्छता व आरोग्यासंदर्भात दक्षता घेणेबाबत.

संदर्भ : केंद्र शासनाचे क्र. D.O. NO. २-९/२०१० एए ५(MDM-१-२)
दिनांक ३ नोव्हेंबर २०११ चे अर्धशासकीय पत्र

उपरोक्त विषयांकित प्रकरणी शालेय पोषण आहार योजना अंमलबजावणी करताना अनेक ठिकाणी आहार शिजवताना स्वच्छता व आरोग्या विषयक काळजी घेतली जात नसल्याने विषबाधा व इतर अनुषंगीक प्रकार घडण्याचे प्रमाण वाढतात. असे प्रकार घडू नयेत याबाबत खालील प्रमाणे स्वच्छता व आरोग्यविषयक बाबींची कटाक्षाने दक्षता घ्यावी.

१. आहार शिजविण्यासाठी वापरण्यात येणारी भांडी दररोज वापरण्यापूर्वी व वापरल्यानंतर स्वच्छ केली असल्याची खात्री करावी.

२. स्वयंपाकी व मदतनीस यांना स्वच्छतेविषयी काळजी घेणेबाबत सूचना द्याव्यात उदा. नियमितपणे नखे कापणे, स्वयंपाक सुरु करण्यापुर्वीची / वाटप करण्यापूर्वी हात व पाय स्वच्छ साबणाने धुण्याच्या सूचना द्याव्यात.

३. आहारासाठी वापरण्यात येणारे साहित्य उदा. कडधान्य, डाळी, भाज्या, तेल आणि इतर वस्तूंची वापरण्यापूर्वी स्वच्छ झाली असल्याची खात्री करावी तसेच धान्य व्यवस्थित निवडून घ्यावे. तसेच वापरण्यात येणारे धान्य खराब नसल्याची खात्री करावी.

४. मीठ दमट वातावरणापासून सुरक्षित असल्याची खात्री करावी.

५. समुदायाचा (समाजाचा) तसेच मातांपालकांचे सहकार्य व सहभाग घेऊन शाळेत जेवणापूर्वी मुलं हात स्वच्छ धुत असलेची खात्री करावी. स्वच्छ ताट व ग्लास यांचा वापर होत असल्याची खात्री करावी. जेवणानंतर स्वतःचे ताट, हात व तोंड स्वच्छ धुण्याबाबत तसेच आरोग्याच्या चांगल्या सवयी मुलांमध्ये निर्माण होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत. तसेच समाजाच्या सहभागातून ताज्या भाज्या उपलब्ध करुन घेणेबाबत प्रयत्नशिल राहावे व त्याचा लाभ विद्यार्थ्यांना द्यावा.

६. जेवताना अन्न सांडून त्याचा अपव्यय होणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचना द्याव्यात तसेच सांडलेल्या अन्नामुळे परिसर अस्वच्छ होणार नाही याची दक्षता घ्यावी.

टीप : तक्रार निवारण केंद्र टोल फ्री क्रमांक १८००२३३९९८८

७) शासनाने ठरवून दिलेल्या मेनू नुसार आहार शिजवला जात असल्याची तसेच शिजवण्याची जागा शाळेपासून अंतरावर असलेची क्षेत्रिय अधिकारी यांनी शाळा भेटी च्यावेळी खात्री करावी.

८) धुरविरहीत शेगडयांचा वापर करण्यावर भर द्यावा वातावरण चांगलं राहण्यास मदत होईल.

९) भारतीय अन्न महामंडळ येथून तांदळाची उचल करताना उचलण्यात येणारा तांदूळ हा दर्जाचा व सुस्थितीत असलेची खात्री करावी. उचलण्यात येणारा तांदळाच्या साठवणूकीची जागा सुरक्षित असलेची खात्री करावी.

१०) जिल्हयाने प्रत्येक त्रैमासिकात प्रभावी सनियंत्रणासाठी किमान २५ टक्के शाळांची तपासणी करणे आवश्यक आहे.

११) अनेक शाळांमध्ये समाजाचा सहभाग, शाळाव्यवस्थापन समितीचा सहभाग व मातांपालकांचा सहभाग घेण्याबाबत उदासिनता दिसून येते. समाजाचा सहभाग घेणेबाबत शाळा व्यवस्थापन समिती यांना प्रवृत्त करावे जेणेकरुन अंमलबजावणीतील अडीअडचणी सुलभतेने सोडविण्यास मदत होईल व योजनेची प्रभावी अंमलबजावणी करणे सुकर होईल.

१२) स्वयंपाकी व मदतनीस हे प्रतिकुल परिस्थितीतील असल्याने त्यांना सदर कामाबाबत प्रोत्साहित व प्रेरित करणे स्वयंपाकी व मदतनीस यांना वेळेत मानधन अदा होईल याची दक्षता घ्यावी.

१३) दक्षता पथके कार्यरत नसल्याने क्षेत्रीय स्तरावरील प्रत्यक्ष स्थिती कळू शकत नाही व तक्रारीचा बोध न झाल्याने त्या वेळेत निराकार होत नाही त्यामुळ दक्षता पथके कार्यरत करावी व त्यांनी केलेल्या शाळा तपासणीचा प्राथमिक अहवाल संचालनालयास सादर करावा.

वरील प्रमाणे स्वास्थपुर्वक व पौष्टिक आहार मिळण्याच्या दृष्टीने आपले स्तरावरुन प्रयत्न होणे आवश्यक असल्यामुळ आपल्या अखत्यारितील सर्व क्षेत्रिय यंत्रनांना सदर सूचना त्वरित निर्गमित कराव्यात व केलेल्या कार्यवाही चा अहवाल संचालनालयास सादर करावा.

शिक्षक संचालक (प्राथमिक)
महाराष्ट्र राज्य पुणे-१

प्रत : माहितीस्तव सविनय सादर :

मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

प्रत : कार्यवाहीस्तव सादर :

१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).

२) विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व)

क्रमांक :- प्राशिसं/शापोआ/अंमल/२०१२-१३/३०३/९६
दिनांक : २०/०१/२०१३

प्रति,

१. शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

जिल्हा परिषद (सर्व)

२. शिक्षणाधिकारी

बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई

विषय : शालेय पोषण आहार योजना

विषबाधा झाल्यास तात्काळ उपचार उपलब्ध होतील याची दक्षता घेणे

आणि त्यासंबंधिचा चौकशी अहवाल सात तासात सादर करणे.

शालेय पोषण आहार ही केंद्र पुरस्कृत योजना आहे. राज्यामध्ये ही योजना १ ली ते ५ वी व इ. ६ वी ते ८ वी च्या विद्यार्थ्यांसाठी लागू आहे. केंद्र शासनाच्या निकषानुसार २ सदरची योजना केंद्र व राज्य शासनाच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा, खाजगी संस्थांच्या अनुदानित व अंशत: अनुदानित शाळा मदरसा / मक्तबा व राष्ट्रीय बाल कामगार शाळेतील विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येत आहे.

वरील शाळांमध्ये शालेय पोषण आहार योजनेची प्रभावी अमंलबजावणी होणे आवश्यक आहे. सदर योजनेची अमंलबजावणी होत असताना जिल्हा स्तरावरुन लोकप्रतिनिधी सघंटना, प्रसारमाध्यमे, पालक वर्ग, इत्यादी कडून शालेय पोषण आहाराबाबत वारंवार तक्रारी संचालनालयाकडे येत असतात.

सदर तक्रारी कमी करण्यासाठी :-

१. आहाराचा दर्जा व गुणवत्ता यावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

२. शाळांमध्ये भरारी पथकांद्वारे आकस्मीक भेट देणे आवश्यक आहे.

३. प्रत्येक विद्यार्थ्यांची सुरक्षितता व आरोग्याच्या दृष्टीने काळजी घेणे आवश्यक आहे.

नागरी व ग्रामीण भागामध्ये शालेय पोषण आहार योजनेची अंमलबजावणी होत आहे याबाबत शाळा व्यवस्थापन समितीवर जबाबदारी सोपविण्यात आली आहे. बचत गट व स्वंयसेवी संस्थामार्फत आहार शिजवून दिला जात असताना बऱ्याच ठिकाणी स्वच्छता व इतर बाबींची दक्षता न घेतल्याने काही ठिकाणी शालेय पोषण आहारामुळे विद्यार्थ्यांना विषबाधा झाल्याच्या घटना घडतात.

शालेय पोषण आहार शिजवून देताना विद्यार्थ्यांस कोणतीही बाधा होणार नाही याची दक्षता घेण्याबाबत सर्व संबधिताना आपल्या स्तरातून तात्काळ सूचना द्याव्यात

विनाविलंब विद्यार्थ्यांना रुग्णालयात उपचारांसाठी दाखल करावे आणि घटनेची तात्काळ पाहणी करावी व सात तासात वस्तुस्थितीदर्शक चौकशी अहवाल शासनास व संचालनालयास सादर करावा.

महावीर माने
शिक्षण संचालक (प्राथमिक)

टीप : तक्रार निवारण केंद्र टोल फ्री क्रमांक १८००२३३९९८८

**परिशिष्ट क्र. ५.८**

**प्राथमिक शिक्षण संचालनालय**
**महाराष्ट्र राज्य,**
विभागीय शिक्षण उपसंचालक पुणे कार्यालयाचे आवार,
17 डॉ आंबेडकर मार्ग, लाल देवळाजवळ, पुणे -1
दुरध्वनी : (020) 2612 4572/2612 8157
ई-मेल: mdmdep@gmail.com

क्र.प्राशिसं/शापोआ/सूचना/2016/303/4595
दि. 31/08/2016

7 SEP 2016

प्रति,
1. विभागीय शिक्षण उपसंचालक, सर्व
2. शिक्षणाधिकारी ,
   बृहन्मुंबई म.न.पा
   बृहन्मुंबई
3. शिक्षणाधिकारी (प्राथमिक )
   जिल्हा परिषद सर्व

**विषय:- शालेय पोषण आहार योजना**
**गुणवत्ता, सुरक्षितता व स्वच्छता संदर्भात**
**दक्षता घेणेबाबत.**

शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत पोषण आहारातून लाभार्थी विदयार्थ्यांना विषबाधा किंवा इतर अनुचित प्रकार घडू नयेत याकरिता खालील बाबींची दक्षता घेण्याच्या सूचना शाळा स्तरावर देण्यात याव्यात.

**I ) नागरी भागात केंद्रिय स्वयंपाकगृह प्रणालीव्दारे आहार शिजविणा-या संस्थांनी तेल, डाळी व मसाले खरेदी करताना घ्यावयाची काळजी:-**

i) योजने अंतर्गत सीलबंद असलेले मीठ, मसाले, तेल (ॲगमार्क असलेले) खरेदी करण्यात यावे. खुले साहित्य खरेदी करु नये. सीलबंद वस्तुवरील उत्पादनाचा दिनांक (Manufacturing date) व समाप्तीचा दिनांक (Expiry date) तपासण्यात यावा.

ii) डबल फोर्टीफाईड आयोडाईड मिठाचा वापर करण्यात यावा. धान्य कोठयांमध्येच साठविण्यात यावे. डाळ, मसाले व इतर पदार्थ प्लास्टीकच्या डब्यामध्ये साठविल्यास उत्तम

**II )ग्रामीण भागात अन्न शिजविणा-या यंत्रणांनी पुरवठेदाराकडून धान्यादी माल ताब्यात घेत असताना घ्यावयाची काळजी.**

i. पुरवठेदाराकडून प्राप्त झालेला माल मुख्याध्यापकाच्या उपस्थितीत वजन करुन ताब्यात घ्यावा.

ii. माल ताब्यात घेत असताना तेल, मीठ, मसाले इ. ची Expiry date तपासून घेण्यात यावी.

iii. तांदुळ व धान्यादी मालाचा दर्जा खराब असल्याचे जाणवल्यास माल ताब्यात घेवू नये. मुख्याध्यापकांमार्फत पुरवठेदारास माल बदलून देण्यास सांगावे.

प्राथमिक शिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य,
विभागीय शिक्षण उपसंचालक पुणे कार्यालयाचे आवार,
17 डॉ आंबेडकर मार्ग, लाल देवळाजवळ, पुणे -1
दुरध्वनी : (020) 2612 4572/2612 8157
ई-मेल: mdmdep@gmail.com

सत्यमेव जयते

मध्याह्न भोजन योजना
Mid Day Meal Scheme

**III) नाशवंत पदार्थ खरेदी करताना व साठविलांना घ्यावयाची काळजी-**

i) पालेभाज्या/फळभाज्या, नाशवंत पदार्थ मसाले हे ताजे खरेदी करावेत. सदरचे पदार्थ नाशवंत असल्याने साठवून ठेवू नयेत.

ii) नाशवंत पदार्थ प्लॅस्टीकच्या पिशवीत साठवून ठेवू नयेत. तसेच सुर्यप्रकाशापासून दुर थंड ठिकाणी ठेवावे.

iii) फळे, पालेभाज्या/फळेभाज्या इत्यादी Zero Energy Cool चेंबरर्स मध्ये साठविण्यात यावे. फळे पालेभाज्या/फळभाज्या यामध्ये जास्त आर्द्रता असल्याने सदरचे पदार्थ लवकर खराब होतात. Zero Energy Cool चेंबरर्स विटा, वाळु, बांबु, खास,धान्याच्या गोण्यांपासून सहज करता येवू शकते. उन्हाळयाच्या दिवसात नाशवंत पदार्थ ठेवण्याकरिता Zero Energy Cool चेंबरर्स फार उपयोगी ठरते.

iv) योजने अंतर्गत धान्य इतर पदार्थ काळजीपूर्वक स्विकारण्यात/खरेदी करण्यात यावेत. धान्य, सुक्ष्मजीव, कीटकनाशके व औषधी, इतर विषारी घटक विरहीत असल्याची खात्री करावी.

v) योजनेअंतर्गत धान्य, तेल मसाले इत्यादी आवश्यकते नुसार व साठवणुक क्षमतेनुसार खरेदी करण्यात यावेत.

**IV) धान्य व धान्यादी मालाची साठवणूक**

i) शाळेमध्ये पुरविण्यात आलेले/ खरेदी करण्यात आलेले धान्य तीन महिन्याच्या कालावधीमध्ये वापरण्यात यावे. धान्य हवा बंद (Air Tight) कोठया, गोण्यामध्ये ठेवावे. धान्य किडे, उंदीर, घूस यापासून सुरक्षित राहील याची दक्षता घ्यावी. धान्य जमिनीवर ठेवू नये. लाकडाच्या फळीवर जमिनीपासून उंचीवर ठेवावे.

ii) धान्य साठविण्यात येणा-या कोठया/डबे ठराविक कालावधी नंतर स्वच्छ करण्यात यावेत. आहार शिजविण्याकरिता वापरण्यात येणारे धान्य व इतर घटक भेसळ, किटक व घाण यामुळे बाधीत झालेले नसावे.

iii) खाद्यपदार्थ कोरडया व थंड ठिकाणी ठेवावे.

iv) खाद्यपदार्थ सुरक्षित ठेवण्यात यावे. इंधन, जंतुनाशके, कपडे धुण्याची पावडर इ. वस्तु खादय पदार्थापासून दुर ठेवाव्यात.

v) शाळेमध्ये धान्यादी माल आल्यानंतर तो व्यवस्थित ठेवण्याची कार्यवाही करावी. अन्न शिजविण्यासाठी नियुक्त केलेल्या यंत्रणेने अन्न शिजविण्यापूर्वी मालाची काळजीपूर्वक साफसफाई करावी. तसेच अन्न, शिजविण्यापूर्वी सदर माल चांगला आहे याची खात्री करावी.

**V) आहार शिजविण्यास सुरुवात करण्यापूर्वी घ्यावयाची काळजी :-**

i) आहार शिजविण्यास सुरुवात करण्यापूर्वी स्वयंपाकगृहाच्या भिंती, दरवाजे व छत इ. ची

प्राथमिक शिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य,
विभागीय शिक्षण उपसंचालक पुणे कार्यालयाचे आवार,
17 डॉ आंबेडकर मार्ग, लाल देवळाजवळ, पुणे - 1
दुरध्वनी : (020) 2612 4572/2612 8157
ई-मेल: mdmdep@gmail.com

काळजीपूर्वक पाहणी करावी. यावर पाल, झुरळ इ. नसल्याचे खात्री करुन घ्यावी.

ii) यानंतर स्वयंपाकगृह स्वच्छ करुन घ्यावे.

**VI) आहार शिजविताना घ्यावयाची काळजी:-**

i) आहार तयार करण्याकरिता वापरण्यात येणारे धान्य तसेच भाजीपाला स्वच्छ करुन धुवून नंतर वापरण्यात यावा.
ii) पोषण आहार स्वच्छ ठिकाणी शिजविण्यात यावा व आजुबाजुचा परिसर स्वच्छ ठेवण्यात यावा.
iii) अन्न शिजवितांना भांडयावर झाकण ठेवावे जेणे करुन अन्नातील जीवनसत्व नष्ट होणार नाही. तसेच, बाहेरुन काही भांडयात पडणार नाही.
iv) तृणधान्य व कडधान्ये यामध्ये खुप प्रमाणात प्रथिने असतात. तृणधान्य व कडधान्याचे प्रमाण 3:1 ते 5:1 या प्रमाणात असते. मोड आलेल्या धान्यांमध्ये अधिक पोषणतत्वे असतात. त्यामुळे आहारात यांचा समावेश करावा.
v) पालेभाज्या/फळभाज्या कापण्यापूर्वी स्वच्छ धुवाव्यात.
vi) पालेभाज्या/फळभाज्या कापण्याकरिता स्वच्छ सुरीचा वापर करावा.
vii) स्वयंपाकाकरिता वापरण्यात येणारी भांडी स्वच्छ असल्याची खात्री करावी.
viii) आहार शिजल्यावर अर्ध्या तासानंतर लगेच त्याचे वाटप विद्यार्थ्यांना करण्यात यावे.
ix) पावसाळयाच्या दिवसांत अन्न शिजवितांना स्वच्छतेबाबत विशेष काळजी घेणे आवश्यक आहे.

**VII) आहाराची चव घेण्याबाबत -**

i) मुलांना शालेय पोषण आहार देण्यापूर्वी अर्धा तास अगोदर संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांनी (किंवा वरिष्ठ शिक्षकांनी) अन्नाची चव घ्यावी व तशी नोंद चव नोंदवहीमध्ये करावी. त्याशिवाय अन्न शिजविणा-या यंत्रणेच्या व्यक्तींनीही मुख्याध्यापक/ शिक्षक यांचे समक्ष अन्नाची चव घेऊन अर्ध्या तासानंतर मुलांना अन्न खाण्यास दयावे. सदर सूचनेचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

ii) रोज दोन पालकांनी शाळेत उपस्थित राहून शालेय पोषण आहाराच्या दर्जाबाबत पाहणी करुन चव घ्यावी व त्याची नोंद चव रजिस्टरवर घेण्यात यावी. तसेच पुरवठया संदर्भात अथवा आहाराच्या दर्जाबाबत काही तक्रार असल्यास सदर पालकांनी त्याबाबत गटशिक्षणाधिकारी यांना SMS व्दारे माहिती देण्याबाबत पालकांना अवगत करावे. त्यासाठी प्रत्येक शाळेने तालुक्यातील गटशिक्षणाधिकारी यांचा मोबाईल नंबर स्पष्ट दिसू शकेल अशा रितीने शाळेच्या दर्शनी भागात लिहावा.

प्राथमिक शिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य,
विभागीय शिक्षण उपसंचालक पुणे कार्यालयाचे आवार,
17 डॉ आंबेडकर मार्ग, लाल देवळाजवळ, पुणे -1
दुरध्वनी : (020) 2612 4572/2612 8157
ई-मेल: mdmdep@gmail.com

तसेच शालेय पोषण आहाराबाबत शाळा व्यवस्थापन समितीच्या बैठकीमध्ये सदर विषय घेण्यात यावा व सदर बाब त्यांच्या निदर्शनास आणून दयावी.

iii) शालेय पोषण आहार योजने अंतर्गत पुरविण्यात येणा-या अन्नाचा दर्जा वेळोवेळी शासकीय NABL अथवा शासन मान्य प्रयोगशाळेतून तपासून घेण्यात यावा.

## VIII) भांडी व इतर साहित्यांची स्वच्छता -

i) आहार तयार करताना वापरण्यात येणारी भांडी दररोज स्वच्छ करण्यात यावी.
ii) स्वयंपाकगृह, स्वयंपाकगृहातील कपाटे, टेबल नियमित स्वच्छ करण्यात यावीत.
iii) भांडी स्वच्छ करण्याकरिता साबणाचा वापर करावा. भांडी धुतल्यानंतर स्वच्छ कापडाने पुसण्यात यावीत.
iv) हात पुसण्याकरिता स्वच्छ कपडा वापरावा.
v) खोली पुसण्याकरिता वापरण्यात येणा-या कापडाने भांडी किंवा टेबल पुसू नये.
vi) स्वयंपाकाकरिता वापरण्यात येणारी भांडी व इतर साहित्य इतर ठिकाणी वापरु नये.
vii) शिजविलेले अन्न/ अन्न पदार्थ नेहमी झाकून ठेवावे.

## IX) स्वयंपाकी व मदतनीस यांची वैयक्तिक स्वच्छता व आरोग्य तपासणी

a) स्वयंपाकी व मदतनीस यांनी व्यक्तिशः स्वतःच्या आरोग्याबद्दल जागृत असणे व वैयक्तिक स्वच्छता कायम बाळगणे आवश्यक आहे.
b) तसेच संसर्गजन्य आजार असणा-या व्यक्ती कामावर घेण्यास अपात्र असतील.
c) दर सहा महिन्यांनी स्वयंपाकी व मदतनीस यांची आरोग्य तपासणी करुन काम करण्यात शारिरीक दृष्टया पात्र असल्याची खात्री करण्यात यावी. (वैद्यकिय प्रमाणपत्र देण्यात यावे.)
d) जर स्वयंपाकी व मदतनीस याला एखादया साथीच्या आजाराची लागण झाल्याचे निदर्शनास आले तर त्याने स्वतः पर्यवेक्षकास त्याबाबत सांगावे. (साथीचे आजार उदा. डायरिया, त्वचारोग, काविळ इ.)
e) भोजन हाताळणा-या सर्वांनीच स्वच्छ कपडे परिधान करावे, नखे कापलेली असावीत आणि प्रत्येक वेळी हात साबणाने धुवून स्वच्छ करुनच अन्न शिजविण्याच्या प्रक्रियेत सहभागी व्हावे.
f) सर्व स्वयंपाकी व मदतनीस यांना अन्न सुरक्षा व आरोग्यदायी असण्यासाठी विविध बाबींबाबत सुचना व प्रशिक्षण देण्यात यावे.

सत्यमेव जयते

प्राथमिक शिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य,
विभागीय शिक्षण उपसंचालक पुणे कार्यालयाचे आवार,
17 डॉ आंबेडकर मार्ग, लाल देवळाजवळ, पुणे -1
दुरध्वनी : (020) 2612 4572/2612 8157
ई-मेल: mdmdep@gmail.com

मध्यान्ह भोजन योजना
Mid Day Meal Scheme

i) त्यांना त्यांच्या कामाचे स्वरुप, विविध प्रकारचे अन्न धान्य हाताळणे, तयार करणे, वाटप करणे याबाबत अवगत करणे आवश्यक आहे. देण्यात येणा-या प्रशिक्षणाबाबत नियमितपणे आढावा घेऊन आवश्यक सुधारणा करण्यात याव्यात.

ii) नेल पॉलीश किंवा कृत्रिम नखे यांचा वापर तसेच अन्न दुषित करणारे कोणतेही दागिने त्यांनी वापरु नये.

iii) अन्न शिजविताना दात कोरणे, धुम्रपान करणे, थुंकणे, नाक पुसणे, खोकणे अशा सारखे प्रकार करु नयेत.

iv) स्वयंपाकी व मदतनीस यांनी योग्य प्रकारचे कपडे परिधान केले असल्याबाबतची खात्री करण्यात यावी.

v) स्वयंपाकी व मदतनीस यांनी प्रत्येक वेळी काम पुन्हा सुरु करण्यापूर्वी हात स्वच्छ धुवावेत. जसे सर्दी / कफ बाहेर पडतेवेळी, स्वच्छतागृहातून बाहेर आल्यानंतर दूरध्वनी घेतल्यानंतर इ. तसेच काही व्यक्तींना नाक खाजविणे, केसात हात फिरविणे, डोळे चोळणे, कान, चेहरा, दाढी, शरिर खजविणे अशा सवयी असतात. अशा गोष्टींमुळे सुध्दा अन्न दुषित होते. त्याकरिता प्रत्येकवेळी काम पुन्हा सुरु करतांना हात स्वच्छ करणे आवश्यक आहे.

**X) किटक नियंत्रण**
**(किटकांचा उपद्रव / प्रादुर्भाव टाळणेसाठी उपाय योजना)**

i) किटक नियंत्रण करण्यासाठी स्वच्छता ही अत्यंत आवश्यक आहे. खिडक्या, व्हेन्टिलेटरर्स व दारे यांना वायरची जाळी बसविणे यामुळे किटक आत येण्यास मज्जाव होईल.

ii) सर्वसाधारणपणे कोणत्याच प्रकारचे किटक नाशक अन्न शिजविण्याच्या ठिकाणी वापरण्यात येऊ नये. जर किटक नाशकांचा वापर करावयाचा असेल तर ते वापरण्यापूर्वी व्यक्तींना भांडी, अन्न यांना त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी. किटकनाशके त्यांच्या मूळ पॅकिंग मध्येच ठेवावीत. खादय पदार्थापासून स्वतंत्र कुलपात ठेवावे. त्याच्यावर स्पष्टपणे किटकनाशक असल्याचे Label लावावे. किटकनाशकांच्या वापराबाबत दिनांक निहाय स्वतंत्र नोंदी घेण्यात याव्यात.

iii) स्वयंपाकगृह व अन्न धान्य साठवणुकीची जागा निटनेटकी व स्वच्छ ठेवणे आवश्यक आहे. सदर ठिकाणी हवा खेळती राहणे सुध्दा आवश्यक आहे. कोठेही छिद्र, बिळ असेल तर ते बंद करावे. सांडपाण्याच्या जागीसुध्दा जाळी असावी. ज्या जागेतून किटक आत येऊ शकतील अशा ठिकाणी जाळी, ग्रील आवश्यकतेनुसार बसवून किटकांचा निर्बंध करण्यात यावा.

iv) सर्व शिक्षा अभियानांतर्गत शाळा दुरुस्ती करता अनुदानातून ही कामे करता येतात. शाळेतील स्वयंपाकगृहात आगी सारख्या संभाव्य घटना घडल्यास त्याकरिता आवश्यक अग्नीशामक यंत्र व पुरेशी व्यवस्था शाळेत असणे आवश्यक आहे.

प्राथमिक शिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य,
विभागीय शिक्षण उपसंचालक पुणे कार्यालयाचे आवार,
17 डॉ आंबेडकर मार्ग, लाल देवळाजवळ, पुणे -1
दुरध्वनी : (020) 2612 4572/2612 8157
ई-मेल: mdmdep@gmail.com

सत्यमेव जयते

मध्यान्ह भोजन योजना
Mid Day Meal Scheme

## XI) मुलांच्या स्व्च्छतेबाबत (मुलांच्या हातांची स्वच्छता)

शाळेच्या दैनंदिन वेळापत्रकांत विद्यार्थी, स्वयंपाकी व मदतनीस, शिक्षक यांना साबण लावून हात स्वच्छ धुण्याकरिता विशेष लक्ष व वेळ प्रदान करण्यात यावा.

i) या प्रक्रियेत मुलांच्या हात धुण्याकडे विशेष लक्ष देण्यात यावे.

ii) मुलांनी जेवण्यापूर्वी आणि जेवणानंतर साबण लावून हात धुणे यावर प्रामुख्याने भर देणे आवश्यक आहे. शाळांनी हात धुण्याकरिता एक स्वतंत्र जागा ठरवून जास्तीत जास्त मुलांना एकाच वेळी हात धुता येतील अशी व्यवस्था करावी. 20-30 प्लॅस्टीकच्या बाटल्यांमध्ये Liquid Hand Soap जर पातळ करुन भरुन ठेवला तर एकाच वेळी 20-30 मुले सहजच सदर साबणाचा वापर करु शकतील.

iii) ज्या शाळांमध्ये हात धुण्याची व्यवस्था पुरेशी नसेल तर अशा ठिकाणी स्वतंत्र बादली व मग ची व्यवस्था करुन मुलांना हात धुण्याची व्यवस्था उपलब्ध करुन दयावी.

## XII) सुरक्षित व आरोग्यदायी आहाराकरिता आवश्यक पायाभूत सुविधा

i) स्वयंपाकगृह स्वच्छ व मोकळया जागी असावे. आजुबाजुचा परिसर स्वच्छ व सुरक्षित असुन हवा खेळती असावी.

ii) स्वयंपाकगृहाचे छत, भिंती व जमिन चांगल्या व सुव्यवस्थित असणे गरजेचे आहे. त्यांचीही देखरेख वरचेवर होणे आवश्यक आहे. भिंती, छत व जमिन यांचे पोपडे वगैरे निघालेले नसावेत, जमिन, भिंती उखडलेल्या नसाव्यात. भिंतींना व छताला मुलामा दिलेला असावा. जमिनीला फरश्या बसविलेल्या असाव्यात. स्वच्छ करण्याकरिता सोयीच्या असाव्यात.

iii) स्वयंपाकगृहाची जागा आवश्यकतेनुसार परिणामकारक जंतुनाशकांनी स्वच्छ करावी. परिसर किटकांच्या प्रादुर्भावापासून मुक्त ठेवावा. शालेय पोषण आहार शिजवत असताना व तयार झाल्यानंतरही कोणत्याच प्रकारचे जंतुनाशक फवारे वापरु नयेत. माश्यांसारखे किटकांना उडविण्याकरिता पुठ्ठयाचा वगैरे वापर करावा. स्वयंपाक गृहाची दारे खिडक्या व्यवस्थित बंद करता येणारी असावी. खिडक्यांना बारिक जाळया बसविण्यात याव्यात. सांडपाणी वाहुन जाण्याकरिता असलेली जागा सुध्दा जाळी किंवा पत्र्याने अच्छादित करण्यात यावीत. ज्यामुळे परिसर हा किटक व जंतुपासून मुक्त राहील. स्वयंपाकाकरिता वापरण्यात येणारे पाणी पिण्यास योग्य असावे.

**परिसरामध्ये नियमित पिण्याच्या पाण्याची व्यवस्था असणे आवश्यक आहे.** पिण्याच्या पाण्याचा पुरवठा जर खंडित झाला **किंवा** पुरेसा उपलब्ध झाला नाही तर पिण्याचे पाणी पुरेशा प्रमाणात साठविण्याची व्यवस्था असावी. त्यामुळे नियमित पाणी पुरवठा खंडित झाल्यावर सदर साठविलेले पाणी अन्न शिजविणे व हात धुणेकरिता

प्राथमिक शिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य,
विभागीय शिक्षण उपसंचालक पुणे कार्यालयाचे आवार,
17 डॉ आंबेडकर मार्ग, लाल देवळाजवळ, पुणे -1
दुरध्वनी : (020) 2612 4572/2612 8157
ई-मेल: mdmdep@gmail.com

वापरता येईल. अन्न शिजविण्याची भांडी स्वच्छ धुण्याकरिता स्वतंत्र व्यवस्था करण्यात यावी. सर्व प्रकारची ताट/भांडी वापरुन झाल्यानंतर धुवून स्वच्छ करुन वाळवुन स्वयंपाकगृह वा साठवणुकीच्या जागी ठेवावीत. सदर जागेत ठेवल्यानंतर भांडयांना बुरशीचा प्रादुर्भाव होणार नाही याची दक्षता घ्यावी. त्यासाठी भांडी ठेवण्याच्या जागी हवा खेळती असावी.

iv) सर्व भांडी भिंतीपासुन लांब ठेवावीत. ज्यामुळे भांडयाच्या स्वच्छतेकडे लक्ष देणे सोयीचे होईल.

v) चांगल्या प्रकारची सांडपाणी व्यवस्था असावी. सांडपाणी व्यवस्था कायम कार्यरत असल्याची खात्री करावी. त्याचप्रमाणे उरलेल्या अन्नाची, वापरण्यात योग्य नसलेल्या वस्तुंची योग्य विल्हेवाट लावण्याची व्यवस्था असावी.

vi) स्वयंपाकगृह हे वाया जाणारे पाणी, स्वच्छतागृह, उघडी सांडपाणी व्यवस्था आणि भटकेप्राणी यांचे पासून लांब असावे. घाणीचे साम्राज्य तयार होईल अशा बाबी स्वयंपाकगृहापासुन काळजीपुर्वक लांब ठेवाव्यात.

vii) स्वयंपाकगह वर्गखोल्यापासून लांब परंतु सुरक्षित व सहजासहजी ने-आण करता येईल अशा ठिकाणी असावे.

viii) स्वयंपाकगृहाची रचना/मांडणी अशी असावी की अन्न शिजवितांना किंवा शिजविण्याच्या प्रक्रिये वेळी भाज्या /डाळी / कडधान्य धुताना यांची एकमेकांपासुन अस्वच्छता / घाण निर्माण होणार नाही यांची दक्षता घ्यावी. स्वयंपाकगृहांच्या भिंती/छत जमिन अतिशय चांगल्या व स्वच्छ असाव्यात. स्वच्छता कायम ठेवावी. स्वयंपाकगृहात जाळी, जळमटे, घाण व कोंदटपणा/दमटपणा नसावा.

ix) स्वयंपाकगृहातील जमिनीचा उत्तार व्यवस्थित असावा. जेणेकरुन सांडपाण्याचा प्रवाह अन्न शिजविण्याच्या जागेपासून लांब असावा किंवा विरुध्द दिशेला असावा. सांडपाण्याच्या जागेतुन झुरळ, मुंग्या इ. सारखे किटक अन्न शिजविण्याच्या जागी येणार नाहीत याची पुरेशी व्यवस्था केलेली असावी. स्वयंपाकगृहाच्या दारे-खिडक्यांना व्यवस्थित लावदाने असावीत. खिडक्यांना जाळया बसविलेल्या असाव्यात जेणे करुन माशांचा, चिलटे, पाखरे अशांचा प्रादुर्भाव होणार नाही व खिडक्या उघडया ठेवून सदर खोलीत हवा खेळती राहील. पाली आणि झुरळ सुध्दा बाहेरुन खोलीत येऊ शकणार नाहीत. अन्न धान्याची साठवणुकीची पोती, कोरडया जमिनीपासून थोडया उंचीवर म्हणजे पाट किंवा फळया किंवा स्टॅंडवर ठेवण्याची व्यवस्था करावी.

x) स्वयंपाकगृहात हवा खेळती राहण्याकरिता ठेवण्यात येणारे दारे व खिडक्या अशा असाव्यात की जेणेकरुन आहार शिजविण्याच्या ठिकाणी शुध्द हवा व भरपुर उजेड येईल. जर अगदीच अशा प्रकारची व्यवस्था होऊ शकत नसेल तर Exhaust Fan सारखी कृत्रिम व्यवस्था करण्यात यावी. स्वयंपाकगृहाला झरोका सुध्दा ठेवता येऊ शकतो.

| | | |
|---|---|---|
| सत्यमेव जयते | **प्राथमिक शिक्षण संचालनालय**<br>**महाराष्ट्र राज्य,**<br>विभागीय शिक्षण उपसंचालक पुणे कार्यालयाचे आवार,<br>17 डॉ आंबेडकर मार्ग, लाल देवळाजवळ, पुणे -1<br>दुरध्वनी : (020) 2612 4572/2612 8157<br>ई-मेल: mdmdep@gmail.com | मध्याह्न भोजन योजना<br>Mid Day Meal Scheme |

xi) स्वयंपाकी मदतनीस यांच्याकरिता स्वयंपाकगृहात सकृतदर्शनी स्थानिक भाषेमध्ये आहार शिजवितांना व स्वयंपाकगृह साठवणुकीची जागा याबाबत कोणत्या गोष्टी कराव्यात आणि कोणत्या गोष्टी करु नयेत याचा फलक लावलेला असावा.

xii) स्वयंपाकगृहाकरिता योग्य ठिकाणी चिमण्या/ धुराडे/ झरोका असावा. जेणे करुन फोडणी, धुर याला बाहेर जाणेसाठी जागा मिळेल आणि स्वयंपाकगृह तेलकट, चिकट, धुरकट होणार नाहीत. धुराडयातुन पाली/सरपटणारे प्राणी आत येऊ शकणार नाहीत याची दक्षता घ्यावी. अन्न शिजविण्याकरिता वापरण्यात येणारे इंधन (रॉकेल/जळावु लाकुड/ LPG गॅस/कोळसा) सुरक्षित जागी साठवुन ठेवावे. हे ज्वलनशिल वस्तु असल्यामुळे काळजीपूर्वक ठेवण्यात यावे. शक्यतो धुरविरहीत चुलींचा वापर करण्यात यावा. स्वयंपाकगृहात कायम भरपुर सुर्यप्रकाश किंवा कृत्रिम उजेड असावा.

xiii) स्वयंपाकाकरिता रॉकेल/गॅस वापरत असतील तर स्वयंपाकी मदतनीस यांना स्टोव्ह/गॅस सिलेंडर हाताळणीबाबत प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. स्वयंपाक शिजविण्याकरिता ओटा बांधलेला असावा. ओटा असा बांधावा की त्याजागी भरपुर उजेड खेळती हवा व सांडपाणीचा निचरा होण्याची व्यवस्था असावी. कचरा व भाजीपाल्याचा कचरा साठविण्याची झाकण असलेली कचराकुंडी असावी.

xiv) शिक्षण हक्क कायदा (2009) नुसार भारतामध्ये उत्तम शिक्षणाकरिता काही नियमावली तयार करण्यात आलेली आहे. शाळेकरिता किमान 10 पायाभुत सुविधा असणे आवश्यक आहे. त्या पायाभूत सुविधाअंतर्गत स्वयंपाकगृह व साठवणुकीच्या जागेबद्दल मानके व नियम घोषित करण्यात आलेले आहेत. त्यानुसारच सदर अंमलबजावणी होणे अपेक्षित आहे.

## XIII) पाणी पुरवठा -

i) स्वयंपाकाकरिता वापरण्यात येणारे पाणी पिण्यास योग्य असावे. परिसरामध्ये नियमित पिण्याच्या पाण्याची व्यवस्था असणे आवश्यक आहे. पिण्याच्या पाण्याचा पुरवठा जर खंडित झाला किंवा पुरेसा उपलब्ध झाला नाही तर पिण्याचे पाणी पुरेशा प्रमाणात साठविण्याची व्यवस्था असावी. त्यामुळे नियमित पाणी पुरवठा खंडित झाल्यावर सदर साठविलेले पाणी अन्न शिजविणे व हात धुणेकरिता वापरता येईल. अन्न शिजविण्याची भांडी स्व्छ व धुण्याकरिता स्वतंत्र व्यवस्था करण्यात यावी.

ii) पिण्याच्या पाण्याची टाकी नियमित स्वच्छता करुन त्या बाबत नियमित नोंद ठेवण्यात यावी. जे पाणी पिण्यासाठी योग्य नसेल असे पाणी फक्त भांडी व इतर स्वच्छतेसाठी वापरण्यात यावे. असे पाणी अन्न शिजविण्याच्या प्रक्रियेसाठी कोठेही वापरण्यात येऊ नये.

iii) पिण्याच्या पाण्याचे नळ हे स्वतंत्र असावेत आणि तेथे तसा फलक लावण्यात यावा.

प्राथमिक शिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य,
विभागीय शिक्षण उपसंचालक पुणे कार्यालयाचे आवार,
17 डॉ आंबेडकर मार्ग, लाल देवळाजवळ, पुणे -1
दुरध्वनी : (020) 2612 4572/2612 8157
ई-मेल: mdmdep@gmail.com

iv) पाण्याची चाचणी (परिक्षण)

शालेय पोषण आहार योजनेतील स्वयंपाकगृहात बोअरवेल /हात /पंप / नळाचे पाणी यांचा वापर अन्न शिजवितांना, भांडी धुणे करिता किंवा पिण्याकरिता करण्यात येतो. वापरात असणा-या पाण्याची रासायनिक आणि सुक्ष्म जैविक तपासणी होणे आवश्यक आहे. पाण्याच्या अशा प्रकारची चाचणी संबंधित पाणी पुरवठा /आरोग्य विभागाच्या राज्य /केंद्र शासनाच्या तांत्रिक विभागाकडून करण्यात यावी.

**XIV) सांडपाणी आणि कच-याची विल्हेवाट**

सांडपाणी व कच-याची विल्हेवाट लावण्याची सोय सुविधा अशा प्रकारच्या पुरेश्या प्रमाणात पुरविणे आवश्यक आहे. सदर सांडपाण्याची /कच-याची व्यवस्था अशा प्रकारे करण्यात यावी जेणे करुन त्याच्यामुळे अन्न किंवा पिण्याचे पाणी प्रदुषित होणार नाही. कचरा साठवणुकीची जागा अशा ठिकाणी असावी की ज्याच्यामुळे अन्न शिजविण्याची प्रक्रिया अन्न धान्य साठवणुकीची जागा स्वयंपाकगृहाच्या आतील किंवा बाहेरील परिसर प्रदुषित होणार नाही. कचराकुंडीला झाकण असावे. कचराकुंडीतील कच-याची नियमित विल्हेवाट लावावी.

i) पोषण आहार तयार करण्याच्या प्रक्रियेत निर्माण होणारा कचरा स्वयंपाकगृहात एखादया कच-याच्या टोपलीत साठवावा. त्याला व्यवस्थित झाकण लावावे. सदर झाकण हात न लावता उघडण्याची व्यवस्था असावी. अशा प्रकारच्या कच-याच्या टोपल्या / बादल्या धुवून व उन्हात वाळवुन नियमित स्वच्छ करण्यात याव्यात. दररोज ती कच-याची बादली वापरण्यापुर्वी स्वच्छ केलेली असावी.

**XV) अन्न वाढण्याची जागा**

शालेय पोषण आहार हा शाळांमध्ये जेवण्याच्या खोलीत/शाळेच्या व्हरांडयात/वर्गात/सभागृहात मुलांना वाटण्यात येतो. आहाराचे वाटप करण्यात येणारी जागा प्रशस्त भरपुर खेळती हवा व पुरेशा खिडक्या असणारी असावी. खिडक्यांना जाळया असाव्यात. या खोल्या दररोज शाळा सुरु होण्यापुर्वीच स्वच्छ करण्यात याव्यात. मुलांना स्वच्छ ठिकाणी आहाराचे वाटप करण्यात यावे.

**XVI) तांदूळ व धान्यादी मालाचा पुरवठा वेळेत न झाल्यास करावयाची कार्यवाही**

i) तांदळाचे नियतन आदेश प्राप्त झाल्यापासून विहित मुदतीत तांदळाचा पुरवठा न

प्राथमिक शिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य,
विभागीय शिक्षण उपसंचालक पुणे कार्यालयाचे आवार,
17 डॉ आंबेडकर मार्ग, लाल देवळाजवळ, पुणे -1
दुरध्वनी : (020) 2612 4572/2612 8157
ई-मेल: mdmdep@gmail.com

झाल्यास विद्यार्थी पोषण आहारापासून वंचित राहू नयेत यासाठी पर्यायी व्यवस्था म्हणून तांदूळ खुल्या बाजारातून वाजवी दराने खरेदी करण्यात यावा. असा तांदूळ खरेदी केल्यास त्याची देयके शिक्षण संचालक (प्राथमिक) यांचेकडे सादर करावीत. यासाठी येणारा अतिरिक्त खर्च पुरवठादाराच्या देयकातून/सुरक्षा अनामत रक्कमेतून वसूल करण्यात येईल. करारनाम्यातील मुद्दा क्र. 17 नुसार दंडाच्या कार्यवाहीस पुरवठादार पात्र राहील.

ii) धान्यादी माल व इतर साहित्याचा पुरवठा आदेश पुरवठादारास प्राप्त झाल्यानंतर विहित मुदतीत पुरवठा न झाल्यास विदयार्थी शालेय पोषण आहारापासून वंचित राहू नये यासाठी शासन निर्णय क्र. शापोआ-2015/प्र.क्र 177/एस.डी.3 दिनांक-09/03/2016 नुसार शासन मान्य दर प्रति दिन प्रति विद्यार्थी इयत्ता 1 ली ते 5 वी व इयत्ता 6 वी ते 8 वी करिता नमूद केलेल्या खर्चाच्या अधीन राहून धान्यादी माल व इतर साहित्य खरेदी करावे. जास्तीत जास्त एक आठवडा पुरेल एवढे साहित्य खरेदी करावे. एक आठवडयानंतरही पुरवठादाराकडून पुरवठा न झाल्यास पुढील आठवडयाचे साहित्य खरेदी करण्यात यावे. असे साहित्य खरेदी करीत असताना गटशिक्षणाधिकारी/अधीक्षक (शापोआ) यांना तीन दिवसाच्या आत लेखी कळविणे मुख्याध्यापकांवर बंधनकारक राहील. अशा शाळांची यादी गटशिक्षणाधिकारी/अधीक्षक (शापोआ) यांनी प्राधान्याने पाच दिवसांच्या आत पुरवठादारास देऊन त्याची प्रत शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि.प. यांचेकडे सादर करावी. पुरवठादाराने तात्काळ अशा शाळांना प्राधान्याने माल पुरविण्याची व्यवस्था करावी.

iii) खुल्या बाजारातून खरेदी केलेल्या धान्यादी मालाचे व इतर साहित्याचे देयक अदा करणेकरिता अनुदान प्रचलित पध्दतीनुसार शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जि.प. यांनी मुख्याध्यापकांना सदरची रक्कम वर्ग करावी. करारनाम्यातील मुद्दा क्र.20 नुसार पुरवठादारावर दंडात्मक कार्यवाही करण्यात यावी व पुरवठादाराचे सदर पुरवठा कालावधीतील अन्य देयकातून सदर रक्कम वजा करणेत यावी.

**XVII) अन्न सुरक्षा भत्ता:-**

i) जर इंधन भाजीपाला उपलब्ध न झाल्यास, स्वयंपाकी/मदतनीस अनुपस्थित असल्यास अथवा अन्य कोणत्याही कारणास्तव शाळेच्या दिवशी शाळेमध्ये मध्यान्ह भोजन न दिल्यास नियम 3 नुसार प्रत्येक विद्यार्थ्यास नियम 2 मधील (ग) नुसार खादय सुरक्षाभत्ता खालीलप्रमाणे नमूद केलेल्या पध्दतीनुसार पुढील महिन्याच्या 15 तारखेपर्यंत देण्यात यावा.

(क) विद्यार्थ्याच्या आवश्यकतेनुसार/ पात्रतेनुसार आहार

(ड) त्यावेळचा अन्न शिजविण्याचा खर्च

प्राथमिक शिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य,
विभागीय शिक्षण उपसंचालक पुणे कार्यालयाचे आवार,
17 डॉ आंबेडकर मार्ग, लाल देवळाजवळ, पुणे -1
दुरध्वनी : (020) 2612 4572/2612 8157
ई-मेल: mdmdep@gmail.com

सत्यमेव जयते

मध्याह्न भोजन योजना
Mid Day Meal Scheme

(ड) त्यावेळचा अन्न शिजविण्याचा खर्च

ii) केंद्रीय स्वयंपाकगृह पध्दतीने आहार न पुरविल्यास केंद्रीय स्वयंपाकगृहाकडून उपनियम (1) नुसार अन्न सुरक्षा भत्ता वसूल करण्यात येईल. परंतू कोणत्याही विद्यार्थ्याने आहार स्विकारण्यास नकार दिल्यास अन्न सुरक्षा भत्ता देय होणार नाही.

iii) शाळांमध्ये जर सलग तीन दिवस अथवा एक महिन्यामध्ये पाच दिवसापर्यंत मध्यान्ह भोजन उपलब्ध न केल्यास संबंधित व्यक्ती अथवा संस्थेवर जबाबदारी निश्चित करुन कारवाई करावी.

उपरोक्त सूचना आपल्या अधिनस्त सर्व शाळांना त्वरित निर्गमित करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयास सादर करण्यात यावा.

(गोविंद नांदेडे)
शिक्षण संचालक (प्राथमिक)
महाराष्ट्र राज्य, पुणे-1

प्रत:- मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-32 यांना माहितीस्तव सविनय सादर.

प्रत:- मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व यांनी माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव.

# HEIGHT / WEIGHT CHART

## Average Height and Weight of <u>Boys</u> at Different Ages

| AGE | WEIGHT (kg) | HEIGHT (cm) |
|---|---|---|
| Birth | 3.3 | 50.5 |
| 3 Months | 6.0 | 61.1 |
| 6 Months | 7.8 | 67.8 |
| 9 Months | 9.2 | 72.3 |
| 1 Year | 10.2 | 76.1 |
| 2 Years | 12.3 | 85.6 |
| 3 Years | 14.6 | 94.9 |
| 4 Years | 16.7 | 102.9 |
| 5 Years | 18.7 | 109.9 |
| 6 Years | 20.7 | 116.1 |
| 7 Years | 22.9 | 121.7 |
| 8 Years | 25.3 | 127.0 |
| 9 Years | 28.1 | 132.2 |
| 10 Years | 31.4 | 137.5 |
| 11 Years | 32.2 | 140.0 |
| 12 Years | 37.0 | 147.0 |
| 13 Years | 40.9 | 153.0 |
| 14 Years | 47.0 | 160.0 |
| 15 Years | 52.6 | 166.0 |
| 16 Years | 58.0 | 171.0 |
| 17 Years | 62.7 | 175.0 |
| 18 Years | 65.0 | 177.0 |

## Average Height and Weight of <u>Girls</u> at Different Ages

| AGE | WEIGHT (kg) | HEIGHT (cm) |
|---|---|---|
| Birth | 3.2 | 49.9 |
| 3 Months | 5.4 | 60.2 |
| 6 Months | 7.2 | 66.6 |
| 9 Months | 8.6 | 71.1 |
| 1 Year | 9.5 | 75.0 |
| 2 Years | 11.8 | 84.5 |
| 3 Years | 14.1 | 93.9 |
| 4 Years | 16.0 | 101.6 |
| 5 Years | 17.7 | 108.4 |
| 6 Years | 19.5 | 114.6 |
| 7 Years | 21.8 | 120.6 |
| 8 Years | 24.8 | 126.4 |
| 9 Years | 28.5 | 132.2 |
| 10 Years | 32.5 | 138.3 |
| 11 Years | 33.7 | 142.0 |
| 12 Years | 38.7 | 148.0 |
| 13 Years | 44.0 | 150.0 |
| 14 Years | 48.0 | 155.0 |
| 15 Years | 51.5 | 161.0 |
| 16 Years | 53.0 | 162.0 |
| 17 Years | 54.0 | 163.0 |
| 18 Years | 54.4 | 164.0 |

**(Source : Nutrient Requirement and Recommended Dietary Allowances for Indians, I.C.M.R. 1990)**

**Height & Weight Pattern in the Growing Baby Expected weight gain**

टीप : तक्रार निवारण केंद्र टोल फ्री क्रमांक १८००२३३९९८८

## परिशिष्ट क्र. ५.९

# करारनाम्यातील अटी व शर्ती खालीलप्रमाणे

मध्यान्ह भोजन योजना
Mid Day Meal Scheme

१. शालेय पोषण आहार योजनेची अंमलबजावणी करण्यासंदर्भात शासन निर्णय क्रमांक - शापोआ २००९/प्र.क्र.१३६/प्राशि-४/दिनांक १५/०७/२००९ अन्वये नियुक्त केलेल्या समितीमार्फत शालेय पोषण आहार योजनेंतर्गत राज्यातील सर्व शाळांना तांदळाची वाहतूक शाळा स्तरापर्यंत/केंद्रीय स्वयंपाकगृहापर्यंत करणे तसेच ग्रामीण भागातील शाळांमध्ये धान्यादी मालाचा पुरवठा करणे यासाठी दिनांक २८ डिसेंबर २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये तसेच शासनाच्या दिनांक २८ डिसेंबर २०१५ रोजीच्या पत्रान्वये शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत जिल्हानिहाय ई - निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती. जिल्हयानिहाय मागविण्यात आलेल्या जाहिर ई-निविदेमधून, मागील तत्क्यात दर्शविल्याप्रमाणे निविदाधारकांची न्यूनतम दराचा निविदाधारक म्हणून निवड झालेली आहे.

२. सदर पुरवठादाराची नियुक्ती ही प्रथम पुरवठा ओदश दिल्या पासून पुढे एक वर्षासाठी अथवा शासनाचे पुढील आदेशापर्यंत करण्यात येत आहे. पुरवठ्याचे दर मागील तत्क्यात दर्शविल्याप्रमाणे आहेत.

३. शालेय पोषण आहार योजनेंतर्गत तांदळाची वाहतूक करणे तसेच इतर धान्यादी मालाचा पुरवठा करणे यासंदर्भात खालीलप्रमाणे दिलेल्या अटी व शर्ती नुसार पुरवठा करणे पुरवठादारास बंधनकारक असून ते पुरवठादारास मान्य आहे.

(अ) ग्रामीण भागातील शाळांसाठी आवश्यक लागणा-या पाककृतीप्रमाणे तांदूळ व धान्यादी माल (उदा. डाळी, कडधान्य, तेल, मीठ, कांदा लसुन मसाला इ.) याची शाळानिहाय मागणी केंद्रप्रमुख अधिक्षक (शापोआ) यांचेकडे करतील. तालुक्याची शाळानिहाय मागणी गटशिक्षणाधिकारी / अधिक्षक (शापोआ) हे पुरवठेदाराकडे देतील व त्याची एक प्रत शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद यांचेकडे सादर करतील. किंवा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) तालुकास्तरावरुा मागण्या घेवुण पुरवठेदाराकडे मागणी नोंदवतील.

(ब) नागरी भागातील शाळांसाठी लागणारा तांदूळ भारतीय अन्न महामंडळाचे गोदामामधून तांदळाची उचल करुन शाळा स्तरापर्यंत किंवा शाळांसाठी शिजविलेल्या अन्नाचा पुरवठा करण्यासाठी नेमलेल्या एजन्सीपर्यंत (केंद्रीय स्वयंपाकगृहापर्यंत) पुरवठा करण्यासाठी संबधित शिक्षणाधिकारी / प्रशासन अधिकारी महानगरपालिका यांचेमार्फत पुरवठा आदेश देण्यात येतील.

(क) नागरी भागातील नगरपालिका क्षेत्रातील शाळांसाठी तांदळाची वाहतूक करुन पुरवठा करण्यासाठी त्या तालुक्यातील गटशिक्षणाधिकारी / अधिक्षक (शापोआ) किंवा शिक्षणाधिकारी स्तरावरुन (शासन निश्चित करेल त्याप्रमाणे) पुरवठा आदेश देण्यात येतील.

(ड) पुरवठाधारक पुरवठा आदेश प्राप्त होताच जिल्हयातील तालुक्याचे तांदूळ व धान्यादी माल वाटपाचे सुक्ष्म नियोजन तसेच वाहन चालकाचे नाव व फोन नंबर इ. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) व गटशिक्षणाधिकारी / अधिक्षक शालेय पोषण आहार यांना दर वाटपाच्यावेळी सादर करतील.

४. पुरवठा आदेशानुसार निविदा सूचनेतील अटी व शर्तीस अधीन राहून मालाची पॅकेजिंग, गोदाम ते शाळांमध्ये मालाची चढ/उतार, वाहतूक व सुरक्षित वितरण याची संपूर्ण जबाबदारी पुरवठेदाराची राहील. योजनेअंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या धान्यादी मालाच्या पोत्यावर

**" शालेय पोषण आहार योजना, महाराष्ट्र शासन "** असा मजकूर असावा.

५. पुरवठा आदेशानुसार जिल्हयाअंतर्गत सर्व पात्र शाळांना स्वखर्चाने व स्वजबाबदारीवर माल पोहचविणे पुरवठेदारास बंधनकारक आहे.

६. शासनाने वेळोवळी दिलेल्या आदेशानुसार त्याचप्रमाणे जिल्हयाने ठरवून दिलेल्या पाककृतीनुसार धान्यादी मालाचा पुरवठा करणे पुरवठादारास बंधनकारक राहील. त्याचप्रमाणे अपवादात्मक परिस्थितीत एखादे वेळी भौगोलिक, नैसर्गिक व आपत्तीजनक परिस्थितीत एखादे धान्य उपलब्ध झाले नाही तर पुरवठयात खंड पडू नये यासाठी संबंधित जिल्हयाचे मुख्य कार्यकारी अधिकारी / शिक्षण संचालक (प्राथमिक) आदेश देतील त्याप्रमाणे दुस-या पाककृतीनुसार पुरवठा करणे बंधनकारक राहील. मात्र पाककृती ही विहित सरासरी खर्च मर्यादेत बसेल याची दक्षता घेवून माल पुरविणे बंधनकारक राहील.

७. पुरवठाधारक हा शाळेने मागणी केलेल्या मालाचा पुरवठा शाळेपर्यंत करील तसेच मालाचा पुरवठा प्रत्येक शाळेमध्ये मागणीपत्रकानुसार आवश्यक तेवढयाच प्रमाणात करील. पुरवठेदार मालाचा पुरवठा शाळेमध्ये शाळेच्या वेळेतच करील. इतर कालावधीत पुरवठा केल्यास, तो कोणत्याही परिस्थितीत शाळांकडून स्विकारण्यात येणार नाही हे पुरवठादारास बंधनकारक राहील. पुरवठेदार मालाची वाहतूक करणा-या वाहनात प्रमाणित वजन काटा ठेवील व प्रत्यक्ष माल गावातील शालेय व्यवस्थापन समिती / सुजान व्यक्ती / पालक / आहार शिजविणारी यंत्रणा / बचतगट यांच्या समोर वजन करुन देतील व तसे केल्याबद्दल मुख्याध्यापकाची / बचतगटाची पोहोच घेतील.

८. तांदूळ व धान्यादी मालाचा पुरवठा करणा-या वाहनावर पुरवठादाराने शालेय पोषण आहार योजनेचा बोर्ड लावणे आवश्यक राहील.

९. पुरवठादार धान्यादी माल ५/१० किलो, तेल १ लिटर, कांदा लसुन मसाला १ किलो/अर्धा किलो, मसाल्याचे पदार्थ १०० ग्रॅम तर तांदूळाचा ५० किलोच्या पटीत पुरवठा करतील. तांदळाचा पुरवठा हा भारतीय अन्न महामंडळाकडून तांदूळ उचल केल्यानंतर त्याचे सिल न तोडता जसाच्या तसा पोहोच करणे पुरवठेदारास बंधनकारक आहे.

१०. भारतीय अन्न महामंडळाच्या गोडावून मधून तांदूळाची उचल करताना भारतीय अन्न महामंडळाचे अधिकारी, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचे प्रतिनिधी व पुरवठादाराचे प्रतिनिधी यांनी संयुक्तपणे घेतलेल्या तांदूळाचे नमूने शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचेकडे व गटशिक्षणाधिकारी यांच्याकडे ठेवण्यात येतील. तांदूळाच्या दर्जाबाबत काही तक्रार आल्यास सदरचे नमुने पडताळणीसाठी वापरण्यात येतील.

११. पुरवठेदाराने तांदूळ व धान्यादी मालाचा पुरवठा करण्याआधी संबंधित मुख्याध्यापक / शिक्षक / मुख्यशिक्षक / केंद्रप्रमुख/ विस्तार अधिकारी / गटशिक्षणाधिकारी यांना SMS द्वारे कळविण्यात यावे.

१२. तांदूळ व धान्यादी मालाचा पुरवठा सुरळीत होईल याचे सनियंत्रण व समन्वयन तालुकास्तरावर गटशिक्षणाधिकारी / अधिक्षक शालेय पोषण आहार योजना हे करतील व शाळांकडील तांदूळ व धान्यादी मालाच्या साठयात वेळोवेळी आढावा घेऊन शाळांच्या आवश्यकतेनुसार तांदूळ व धान्यादी माल उपलब्ध करुन देण्याचा प्राधान्यक्रम ठरवतील. त्यानुसार पुरवठा करणे पुरवठादारास बंधनकारक राहील.

१३. पुरवठयाचे काम करणा-या पुरवठेदाराच्या कर्मचा-यांकडे त्यांचा पुरवठेदारांशी / संस्थेशी संबंध दर्शविणारे अधिकृत ओळखपत्र ठेवील व अशी प्रतिनिधी म्हणून काम करणा-या व्यक्तींची खुलासेवार माहिती पुरवठेदार शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद यांच्या कार्यालयाकडून प्रमाणित करुन घेईल व असे ओळखपत्र नसणारी व्यक्ती आढळून आल्यास पुरवठेदार दंडात्मक कार्यवाहीस पात्र राहील, हे पुरवठादारास मान्य आहे.

१४. पुरवठादार शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद यांच्या कार्यालयात, पुरवठा करण्यात आलेल्या आहारासंबधी पावत्या प्राप्त करुन देईल. त्याकरिता अनुक्रमांक असलेल्या चार रंगाच्या

पावत्या पुरवठेदार छापून घेईल - १) गुलाबी २) पिवळी ३) पांढरी व ४) निळी या चार रंगाच्या पावत्यापैकी गुलाबी रंगाची पावती आहार घेणा-या शाळेच्या प्रमुखाकडे राहील. पिवळया रंगाची पावती पुरवठादार देयकासोबत जोडून गटशिक्षणाधिकारी / अधिक्षक (शापोआ) यांचेकडून तपासणी करुन देयके शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद यांच्याकडे सादर करील. निळया व पांढ-या रंगाची पावती पुरवठादाराकडे त्यांची स्वत:ची प्रत म्हणून ठेवील. पावतीवर तालुक्याचे आणि जिल्हयाचे नाव, पुरवठयाचा दिनांक, वाहन क्रमांक मालाची वाहतूक करणा-याचे नाव इत्यादी तपशील असेल. पोहोच पावती पुस्तक पुरवठादार स्वत:चे खर्चाने छापून घेईल. इ. १ ली ते ५ वी व ६ वी ते ८ वी साठी स्वतंत्र पावत्या राहतील तसेच तांदूळ व धान्यादी मालाच्या स्वतंत्र पावत्या राहतील.

१५. प्रारंभिक पुरवठा दोन महिन्यासाठी असेल, त्यानंतर तांदळाचे व इतर धान्यादी मालाचे दोन महिन्याचे पुरवठा आदेश देण्यात येतील. शाळेमध्ये २० दिवस पुरेल इतका साठा शिल्लक असताना नवीन पुरवठा आदेश देण्यात येतील, हे पुरवठादारास मान्य आहे.

१६. तांदळाचे नियतन आदेश प्राप्त झाल्यानंतर कार्यालयीन कामाच्या १५ दिवसामध्ये संपूर्ण तांदूळ FCI गोडावून मधून उचलणे आवश्यक आहे. FCI गोडावूनमधुन तांदूळ उचलल्यानंतर जास्तीत जास्त ५ दिवसाच्या आत शाळेवर पोहोचता करणे आवश्यक राहील. तथापि तांदळाची उचल व शाळेवर तांदूळ पोहचविणे या काळात कोणतेही विद्यार्थी पोषण आहारापासून वंचित राहणार नाहीत याची जबाबदारी पुरवठादाराची राहील.

१७. तांदळाचे नियतन आदेश प्राप्त झाल्यापासून विहित मुदतीत तांदळाचा पुरवठा न झाल्यास विद्यार्थी पोषण आहारापासून वंचित राहू नयेत यासाठी पर्यायी व्यवस्था म्हणून तांदूळ खुल्या बाजारातून वाजवी दराने खरेदी करण्यात येईल. यासाठी येणारा अतिरिक्त खर्च पुरवठेदाराच्या देयकातून वसूल करण्यात येईल. तसेच तांदळाच्या पुरवठयापासून वंचित असणा-या संबंधित तालुक्याच्या त्या महिन्याच्या पुरवठा आदेशाच्या बिलाच्या किंमतीच्या १० टक्के दंड वसूल करण्यात येईल. तसेच राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ मध्ये मध्यान्ह भोजन योजनेचा समावेश करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने केंद्र शासनाने (मध्यान्ह भोजन योजना) नियमावली प्रसिध्द केली आहे. सदर नियमावलीतील तरतुदी विचारात घेवून राज्य शासनाच्या परिपत्रक क्रमांक शापोआ-२०१५/प्र.क्र.२२२/एस.डी.३ दिनांक ०२/०२/२०१६ मध्ये नमूद केलेल्या सुचनांनुसार पुरवठेदाराकडून पुरवठ्यामध्ये खंड पडल्यास व शाळेच्या दिवशी शाळांमध्ये मध्यान्ह भोजन न दिल्यास प्रत्येक विद्यार्थ्यांस "अन्न सुरक्षा भत्ता" देण्याबाबतची कार्यवाही पुरवठेदाराच्या देयकामधुन वसुल करण्यात येईल. तसेच तांदुळ व धान्यादी मालाच्या पुरवठ्यामध्ये खंड पडल्यास संबंधित व्यक्ती अथवा संस्थेवर जबाबदारी निश्चित करुन कारवाई करण्यात येईल.

१८. धान्यादी मालाचे पुरवठा आदेश मिळाल्यापासून जास्तीत जास्त ५ दिवसामध्ये पुरवठा सुरु करावा लागेल व जास्तीत जास्त २० दिवसामध्ये (शालेय कामकाजाचे दिवस गृहित धरुन) संपूर्ण पुरवठा करणे पुरवठादारावर बंधनकारक आहे.

१९. विहित मुदतीत तांदूळ व धान्यादी मालाचा पुरवठा एकाच वेळी शाळापर्यंत करणे बंधनकारक राहील. पुरवठ्याकरीता मुदतवाढ दिली जाणार नाही. तथापि अपवादात्मक परिस्थितीत FCI गोडावूनमधून तांदूळ न मिळण्याचे समर्थनिय कारण मान्य अथवा अमान्य करण्याचे अधिकार शिक्षण संचालक (प्राथमिक) यांच्याकडे राहतील, हे पुरवठादारास मान्य आहे.

२०. विहित मुदतीत पुरवठा न केल्यास उशिरा पुरवठा केलेल्या मालाच्या किंमतीवर ०.५% (अर्धा टक्का) प्रती आठवडयाप्रमाणे दंड आकारला जाईल व त्याची कमाल मर्यादा खालीलप्रमाणे असेल हे पुरवठादारास बंधनकाराक राहील.

(अ) विहित मुदतीत पुरवठा न केलेल्या मालाची किंमत एक लाखापेक्षा कमी असेल तर अशा किंमतीच्या १० % दंड.

(ब) विहित मुदतीत पुरवठा न केलेल्या मालाची किंमत एक लाखापेक्षा जास्त असेल तर अशा किंमतीच्या ५ % दंड. किंवा कमीत कमी रु. १०,०००/- दंड आकारण्यात येईल किंवा जो जास्त असेल तो आकारण्यात येईल.

२१. विहित कालावधीत पुरवठा न केलेल्या खंडीत पुरवठयापोटी खुल्या बाजारातून धान्यादी मालाची खरेदी करण्यात येईल व त्यासाठी येणारा खर्च पुरवठेदाराच्या देयकातून वसूल करण्यात येईल, हे पुरवठेदारास मान्य आहे.

२२. अ. पुरवठादाराने मालाचा पुरवठा केल्यानंतर त्याचे तालुकानिहाय नमुने प्रथम शासकीय प्रयोग शाळेत पाठविण्यात येतील. प्रयोगशाळेकडून समाधानकारक अहवाल प्राप्त झाल्यांनतरच मालाची देयके अदा करण्यात येतील, हे पुरवठेदारास बंधनकारक राहील.

ब. पुरवठेदाराने ग्रामीण भागात पुरवठा केलेल्या मालाची तपासणी जिल्हास्तरीय / तालुकास्तरीय अधिकाऱ्यांकडून करण्यात येईल. तसेच तपासणी करीता सदरचा माल धान्यादी मालाच्या तपासणीची सुविधा असणाऱ्या शासकिय प्रयोगशाळेत तपासणी करीता पाठविण्यात येईल. सदर प्रयोगशाळा तपासणी अहवाल हा Food Safty and Standard Act २००६ मधील तरतुदी नुसार असावा.

क. याव्यतिरिक्त संचालनालयामार्फत नियुक्त प्रयोगशाळा प्रतिनिधीकडून निर्धारित तपशिलानुसार धान्याची गुणवत्ता तपासणी करीता यादृच्छिक नमुने (random samples) तपासणी करीता घेतले जातील. तपासणी करीता येणारा सर्व खर्च पुरवठेदाराने करावयाचा आहे.

२३. पुरवठादार त्यांनी पुरवठा केलेल्या तांदूळ व धान्यादी मालाच्या पुरवठयाचा अहवाल दरमहा ५ तारखेपर्यंत गटशिक्षणाधिकारी / अधिक्षक (शापोआ) यांच्याकडे सादर करणे आवश्यक राहील. तसेच पुरवठा आदेशानुसार प्रत्यक्ष शाळांना किती पुरवठा केला याचा तालुका निहाय अहवाल शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना सादर करणे पुरवठाधारकास बंधनकारक राहील.

२४. पुरवठेदार देयकापोटी कोणत्याही आगावू रकमेची मागणी करणार नाही त्याचप्रमाणे शासनाकडून निधी प्राप्त झाल्यानंतर तसेच पुरवठेदाराचा पुरवठा व्यवस्थित झाल्यानंतर देयकाची रक्कम दिली जाईल हे पुरवठादारास मान्य आहे.

२५. तांदूळ वाहतुकीची देयके शिक्षण संचालनालयाच्यास्तरावरुन अदा केली जातील व धान्यादी मालाची देयके जिल्हास्तरावरुन अदा केली जातील. तांदूळ वाहतूक व धान्यादी मालाची तालुकास्तरावर गटशिक्षणाधिकारी / अधिक्षक (शापोआ) सदर देयकाची तपासणी करुन शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्याकडे सादर करतील. जिल्हास्तरावरील देयके मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मान्यतेने व मुख्य लेखा व वित्त अधिकारी हे सदर धान्यादी मालाच्या देयकातील प्रथम ९० टक्के रक्कम प्रयोग शाळेचा तपासणी अहवाल समाधानकारक असल्यानंतरच अदा करतील व जिल्हयातील शालेय पोषण आहाराच्या पुरवठयासंदर्भात काही तक्रारी असल्यास उर्वरित १० टक्के रक्कम मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मान्यतेने अदा करण्यात येईल. तसेच काही तक्रार नसल्यास संबंधीताची देयके पुर्णतः अदा करण्यात येतील.

२६. पुरवठा आदेशात शाळानिहाय मागणी केल्याप्रमाणे सर्व शाळांना तांदूळ व धान्यादी मालाचा पुरवठा करणे आवश्यक आहे. मागणी आदेशातील एखादया वस्तुचा पुरवठा न केल्यास संपूर्ण देयके अदा केली जाणार नाही हे पुरवठाधारकास मान्य आहे. तसेच, याबाबतची स्पष्टीकरण देणे पुरवठेदारावर बंधनकारक राहील.

२७. पुरवठेदार पुरवठा आदेशानुसार पुरवठा करण्यास असमर्थ ठरल्यास अपुऱ्या पुरवठा केल्याचे कारणास्तव पुरवठेदार व संचालनालय यांच्यातील करार रद्द करण्यात येईल. अशा परिस्थितीत संचालनालयाकडून दुसरी निविदासुद्धा मागविण्यात येवू शकते. तसेच यासाठी आपणा विरुध्द निविदेतील अटी व शर्तीनुसार दंडात्मक कारवाई करण्यात येईल. यामुळे होणाऱ्या नुकसानीस हे संचालनालय जबाबदार राहणार नाही.

२८. करारात नमुद केलेले दर हे सर्व करासहीत असून शासन नियमाप्रमाणे उद्गम कर कपात (Tax deduction at Source) करणे लागू असल्यास पुरवठेदाराच्या देयकातुन अदा करण्यात येईल. त्यामुळे पुरवठादाराने देयकावर पुरवठादाराचा TIN No. व Incometax PAN नंबर नमूद करावेत. कराविषयक शासनाचे नियमाचा भंग केल्यास त्याची जबाबदारी पुरवठादाराची असेल.

२९. पुरवठादारास धान्यादी मालाच्या रक्कमेच्या ३ टक्के आणि शासकीय तांदूळाच्या हाताळणूकीसाठी जिल्हयाकरीता सुरक्षा अनामत रक्कम राष्ट्रीयकृत बँकेच्या बँक गँरंटी स्वरुपात स्वतंत्रपणे जमा करणे बंधनकारक राहील. सुरक्षा अनामत रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही हे पुरवठादारास बंधनकारक राहील, सुरक्षा अनामत रक्कम राष्ट्रीयकृत / शेडयूल बँकेच्या बँक गँरंटीच्या स्वरुपात जमा करणार नाही तो पर्यंत पुरवठेदारास पुरवठा आदेश दिला जाणार नाही हे पुरवठेदारास मान्य आहे.

३०. सुरक्षा अनामत रक्कमेसाठी पुरवठादाराने जमा करावयाची बँक गँरंटी ही पुरवठा आदेशापासून १८ महिन्याच्या कालावधीसाठी ग्राहय असणारी आवश्यक आहे. तसेच सदरची बँक गँरंटी ही एकच, विहित मुदतीची व विहित नमुन्यातील असणे आवश्यक आहे. बँक गँरंटी ही विनाशर्त (Unconditional) व न बदलता येणारी (irrevocable) असणे आवश्यक आहे.

३१. पुरवठादाराकडून जमा करण्यात आलेली सुरक्षा अनामत रक्कम संपूर्ण पुरवठयाचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर म्हणजे प्रथम पुरवठा आदेश दिल्याच्या दिनांकापासून पुढील एक वर्ष एवढा कालावधी झाल्यापासून, पुरवठादाराबद्दल कोणतीही तक्रार नसली तर सहा महिन्याच्या कालावधीनंतर क्षतीपुर्ती बंधपत्र प्राप्त करुन घेतल्यानंतर परत करण्यात येईल.

३२. पुरवठादाराने पुरवठा केलेला माल निकृष्ठ दर्जाचा असल्यास त्याबाबत मुख्याध्यापकाने / संबंधित यंत्रणेने पुरवठाधारकास लेखी / दुरध्वनीद्वारे / इमेलद्वारे अवगत केल्यावर पाच दिवसांमध्ये तो स्वखर्चाने बदलून द्यावा. जर तो माल बदलून दिला नाही तर त्या मालाची देयके अदा केली जाणार नाहीत. तसेच बदलून न दिलेल्या मालाऐवजी खुल्या बाजारातून मालाची खरेदी करण्यात येईल व त्यासाठी येणारा अतिरिक्त खर्च पुरवठादाराच्या देयकातून वसूल करण्यात येईल हे पुरवठादारास मान्य आहे.

३३. पुरवठेदाराने पुरवठा केलेल्या मालाची तपासणी शासकीय प्रयोग शाळेतून करुन घेतली असता पुरवठा केलेला माल प्रयोगशाळेने खाण्यास अयोग्य ठरविल्यास अशा प्रकारचा पुरवठा केलेला माल पुरवठादारास स्वखर्चाने ५ दिवसाच्या मुदतीत बदली करुन द्यावा लागेल व अशा खाण्यास अयोग्य मालाचा पुरवठा केला म्हणून त्या मालाच्या किंमतीच्या ३ टक्के एवढा दंड आकारण्याचा अधिकार शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद यांना राहील. पुरवठादाराने पुरवठा केलेला खाण्यास अयोग्य माल बदलून दिला नाही तर, असा पुरवठा केलेल्या मालाची कुठल्याही प्रकारची देयके अदा करण्यात येणार नाहीत व त्या खाण्यास अयोग्य मालाऐवजी खुल्या बाजारातून खरेदी करण्यात आलेल्या मालाची किंमत पुरवठेदाराच्या देयकातून वसूल करण्यात येईल. अशा प्रकरणात पुरवठा करार रद्द करणे किंवा पुरवठेदारावर योग्य तो फौजदारी गुन्हा दाखल करणे किंवा अशा पुरवठादाराचे नाव काळया यादीत टाकणे, याबाबतचे सर्व अधिकार शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे यांना राहतील. वरील अटी पुरवठेदारास मान्य आहेत.

३४. पुरवठादाराकडे शासनाचा तांदूळ वाहतुकीसाठी सोपविण्यात येणार आहे. सदर तांदूळ संबंधित शाळांना वेळेत पोहचविणे आवश्यक राहील. सदर तांदूळ वाहतूकीमध्ये कोणतीही तक्रार येणार नाही याची पुरवठेदार दक्षता घेईल.

३५. अ. पुरवठेदाराने FCI चे गोदामामधून तांदूळ / गहू / भरडधान्य यांची उचल करताना मालाची खात्री करुन घ्यावी (वजन व प्रत). FCI गोदामामधून मालाची उचल केल्यानंतर वजनात घट आल्यास सदर नुकसानाची भरपाई पुरवठेदारास करावी लागेल.

ब. तांदूळ वाहतूक करताना तांदळाच्या वजनात घट येणार नाही याची जबाबदारी पुरवठादाराची राहील.

३६. निविदा प्रक्रियेमध्ये सादर करण्यात आलेले धान्यादी मालाचे नमुने ज्या दर्जाचे होते त्याच दर्जाच्या मालाचा पुरवठा करणे बंधनकारक राहील मीठ (आयोडाईज्ड), मसाला, जिरे व मोहरी इ. मालाचे जे नमुने सादर करण्यात आले होते त्याच्या दर्जानुसार मालाचा पुरवठा करणे बंधनकारक राहील. तसेच तेल, हळद व मिरची पावडर इ. ॲगमार्क दर्जाच्या मालाचा पुरवठा करणे बंधनकारक राहील.

३७. या करारनाम्यासंदर्भात उद्‌भवणा-या कोणत्याही विवादास्पद मुद्यावर अंतिम निर्णय देण्याचे अधिकार मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांना राहतील हे पुरवठेदारास मान्य आहे.

३८. पुरवठेदाराने जिल्हयात शालेय पोषण आहार योजनेचे धान्य जिल्हया अंतर्गत ज्या गोदामामध्ये ठेवण्यात येणार आहे त्या गोदामाचा धान्य साठवणूक परवाना असणे आवश्यक आहे. व जिल्हयातील सर्व गोदामांचे पत्ते व दुरध्वनी क्रमांक शिक्षणाधिकारी (प्राथमिक) तसेच शिक्षण संचालक (प्राथमिक) यांना नवीन करारनाम्यानुसार पुरवठा सुरु करण्यापूर्वी सादर करावेत. पुरवठेदाराने सुरुवातीस सादर केलेल्या गोदामांच्या यादी व्यतिरिक्त इतरत्र योजनेचे धान्य तसेच तांदुळ ठेवल्याचे आढळल्यास पुरवठेदारावर कारवाई करण्यात येईल हे पुरवठेधारकास मान्य आहे. तसेच शिक्षणाधिकारी हे किमान तीन महिन्यांतून एकदा पुरवठेदाराचे गोदामांना भेट देवून तपासणी करतील.

३९. पुरवठेदाराने गोदामामध्ये तांदुळ व धान्यादी मालाची स्वतंत्र साठानोंद वही व वितरण नोंद वही ठेवणे, तसेच गोदामास भेट देणाऱ्या अधिकाऱ्यांना सदर नोंद वही उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील.

४०. पुरवठेदाराने त्यांच्या गोदामध्ये धान्य साठवणुक प्रमाणपत्र व Food Safty and Standard Act २००६ चे प्रमाणपत्राची प्रमाणीप्रत ठेवावी.

४१. पुरवठादारास शालेय पोषण आहार योजनेची अंमलबजावणी करण्यासंदर्भात शासनाने वेळोवेळी घातलेल्या इतर अटी व शर्ती मान्य कराव्या लागतील हे पुरवठादारास मान्य आहे.

४२. पुरवठादारास सदर कराराची अंमलबजावणी करत असताना केंद्र शासन, महाराष्ट्र शासन व स्थानिक स्वराज्य संस्था यांचे जे नियम, कायदे आहेत त्याचे पालन करावे लागेल. कराराच्या अंमलबजावणीबाबत काही वाद निर्माण झाल्यास ते पुणे येथील न्यायालयाच्या कक्षेत येतील.

वरील सर्व अटी व शर्ती तसेच निविदा अर्जामध्ये उल्लेखित सर्व अटी व शर्ती मी / आम्ही काळजीपूर्वक वाचल्या असून त्या मला / आम्हाला/ आमच्या संस्थेला मान्य आहेत.



**टीप : तक्रार निवारण केंद्र टोल फ्री क्रमांक १८००२३३९९८८**

| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मुग डाळ | 109 | 108 | 109 | 99 | 108 | 109 | 108 | 108 | 108 | 108 | 108 | 108 | 109 | 108 | 98.5 | 98.5 | 109 | 109 | 98.75 | 108 | 108 | 108 | 108 | 108 | 109 | 108 | 109 | 104 | 99 | 99 | Not Required |
| मसुर डाळ | 95 | 94 | 95 | 91 | 94 | 95 | 94 | 94 | 94 | 94 | 94 | 94 | 94 | 94 | 89 | 89 | 94 | 94 | 88.75 | 94 | 94 | 94 | 94 | 94 | 95 | 94 | 95 | 86 | 91 | 91 | |
| तुर डाळ | 154 | 155 | 155 | 139 | 155 | 154 | 155 | 155 | 155 | 154 | 155 | 155 | 155 | 155 | 140.75 | 140.75 | 155 | 155 | 141 | 154 | 154 | 154 | 155 | 154 | 155 | 154 | 154 | 136 | 139 | 139 | |
| हरभरा | 67 | 67 | 67 | 62 | 67 | 67 | 67 | 67 | 67 | 66 | 67 | 67 | 66 | 67 | 66.5 | 66.5 | 65 | 65 | 66.75 | 67 | 67 | 67 | 67 | 67 | 67 | 66 | 67 | 60 | 62 | 62 | |
| चवळी | 65 | 63 | 65 | 63 | 65 | 65 | 65 | 65 | 65 | 65 | 65 | 65 | 65 | 65 | 65.75 | 65.75 | 65 | 65 | 66 | 65 | 65 | 65 | 65 | 65 | 65 | 65 | 65 | 64 | 63 | 63 | |
| मटकी | 94 | 94 | 93 | 87 | 94 | 94 | 94 | 94 | 94 | 94 | 94 | 94 | 94 | 94 | 90.5 | 90.5 | 94 | 94 | 90.25 | 94 | 94 | 94 | 94 | 94 | 93 | 94 | 94 | 84 | 87 | 87 | |
| मुग | 97 | 99 | 98 | 98 | 97 | 97 | 99 | 97 | 99 | 97 | 97 | 97 | 97 | 99 | 94 | 94 | 97 | 97 | 93.75 | 97 | 97 | 97 | 99 | 97 | 98 | 97 | 97 | 92 | 98 | 98 | |
| वाटाणा | 67 | 63 | 62 | 61 | 65 | 65 | 64 | 65 | 64 | 65 | 65 | 65 | 65 | 64 | 61.5 | 61.5 | 67 | 67 | 61.75 | 63 | 63 | 63 | 64 | 63 | 62 | 65 | 65 | 54 | 61 | 61 | |
| तेल (लिटर) | 99 | 99 | 99 | 99 | 99 | 99 | 99 | 99 | 99 | 99 | 99 | 99 | 99 | 99 | 99 | 99 | 99 | 99 | 98.75 | 99 | 99 | 99 | 99 | 99 | 99 | 9 | 99 | 92.3 | 99 | 99 | |
| मिरची पावडर | 193 | 192 | 180 | 174 | 192 | 193 | 193 | 190 | 193 | 190 | 193 | 193 | 193 | 192 | 181 | 181 | 193 | 193 | 181.5 | 193 | 193 | 185 | 193 | 191 | 180 | 193 | 193 | 163 | 174 | 174 | |
| हळद पावडर | 205 | 203 | 200 | 185 | 203 | 205 | 203 | 203 | 203 | 205 | 203 | 203 | 205 | 203 | 192 | 192 | 203 | 203 | 191.75 | 205 | 205 | 205 | 198 | 205 | 200 | 205 | 205 | 180 | 185 | 185 | |
| मीठ | 11 | 11 | 11 | 13 | 11 | 11 | 11 | 11 | 11 | 11 | 11 | 11 | 11 | 11 | 13.5 | 13.5 | 11 | 11 | 13.75 | 11 | 11 | 11 | 11 | 11 | 11 | 11 | 11 | 9.5 | 13 | 13 | |
| जिरे | 198 | 190 | 192 | 192 | 190 | 192 | 192 | 191 | 192 | 194 | 192 | 190 | 194 | 192 | 181 | 181 | 194 | 194 | 180.75 | 192 | 192 | 191 | 193 | 190 | 192 | 194 | 192 | 198.9 | 192 | 192 | |
| मोहरी | 71 | 71 | 73 | 72 | 71 | 72 | 71 | 71 | 71 | 71 | 71 | 71 | 71 | 71 | 65.5 | 65.5 | 70 | 70 | 65.75 | 74 | 74 | 73 | 71 | 74 | 73 | 71 | 72 | 60.3 | 72 | 72 | |
| लाल तिखट | 193 | 192 | 180 | 174 | 192 | 193 | 193 | 190 | 193 | 190 | 193 | 193 | 193 | 192 | 181 | 181 | 193 | 193 | 181.5 | 193 | 193 | 185 | 193 | 191 | 180 | 193 | 193 | 163 | 174 | 174 | |
| गरम मसाला | 193 | 192 | 180 | 174 | 192 | 193 | 193 | 190 | 193 | 190 | 193 | 193 | 193 | 192 | 181 | 181 | 193 | 193 | 181.5 | 193 | 193 | 185 | 193 | 191 | 180 | 193 | 193 | 163 | 174 | 174 | |
| तांदुळ वाहतुक खर्च (प्रति किलो) | 1.20 | 1.20 | 1.20 | 1.20 | 1.20 | 1.20 | 1.20 | 1.20 | 1.20 | 1.20 | 1.20 | 1.20 | 1.20 | 1.20 | 1.20 | 1.20 | 1.20 | 1.20 | 1.20 | 1.20 | 1.20 | 1.20 | 1.20 | 1.20 | 1.20 | 1.20 | 1.20 | 1.15 | 1.20 | 1.20 | 1.25 |

नोट : कोल्हापूर, पालघर, सोलापूर, सिंधुदुर्ग या चार जिल्हयांसाठी तात्पुरत्या स्वरुपात पुणे जिल्हयाच्या दराप्रमाणे दर निश्चिती केली आहे, सदर जिल्हयाकरिता संचलनालय स्तरावरुन फेर निविदा प्रक्रिया सुरु आहे. सदर निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर निवड करण्यात आलेल्या संस्थेचे दर ज्या त्या जिल्हयात कळविण्यात येतील.

# विषबाधा

## सदृश परिस्थितीत घ्यावयाची दक्षता आणि करावयाच्या उपाययोजना

१) केंद्रशासनाच्या अन्न महामंडळाकडून प्राप्त होणारा तांदूळ, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागामार्फत रास्त भाव दुकानांपर्यंत पोहोच केला जातो. सदरचा तांदूळ पोहोच होईपर्यंत वाहतूक, हाताळणूक, साठवणूक इत्यादी बाबी कराव्या लागतात. त्यामुळे तांदूळामध्ये कचरा, खडे जातात. तसेच जास्त दिवस तांदूळ साठवून ठेवल्यास अळया होतात. त्यामुळे तांदूळ स्वच्छ निवडून चांगल्या पाण्याने २ वेळा धुतल्यानंतरच शिजवला गेला आहे याची खात्री करावी.

२) अन्न शिजविताना भांडयावर झाकण ठेवून अन्न शिजवावे. खिचडी करण्यासाठी वापरण्यात येणारे इतर पदार्थ, डाळ, तेल, तिखट, मीठ, हळद, भाज्या इत्यादी चांगल्या प्रतीच्या वस्तू वापरण्याबाबत आणि स्वच्छ भांडयात खिचडी तयार करण्यासाठी अन्न शिजविणाऱ्या यंत्रणेला सूचना दयाव्यात.

३) खिचडी केल्यानंतर बराच कालावधी लोटल्यास त्यामध्ये ते खराब होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तेव्हा खिचडी शिजविल्यानंतर अल्प कालावधीतच त्याचे वितरण करण्यात यावे.

४) विद्यार्थ्यांना घरी खिचडी नेण्यास परवानगी देण्यात येऊ नये. मुलांना खिचडी देण्यापूर्वी प्रथम ग्रामशिक्षण समिती सदस्याने अथवा शिक्षकाने खाऊ न तपासणी करावी आणि त्यानंतरच विद्यार्थ्यांना वाटप करण्यात यावी.

५) खिचडी वाटप करण्यापूर्वी अथवा केल्यानंतर तयार खिचडीत अळ्या किंवा इतर दूषित पदार्थ निदर्शनास आल्यास विद्यार्थ्यांना खिचडीचे वाटप करण्यात येऊ नये.

६) खिचडी खाल्यानंतर मुलांच्या पोटात मळमळणे अथवा उलटया होण्यासारखी परिस्थिती निदर्शनास आल्यास बाधित विद्यार्थ्यांना तात्काळ जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात येऊन औषधोपचार सुरु करण्यात यावा. त्या दिवशी खिचडी तयार करण्यासाठी वापरण्यात आलेल्या शिल्लक पदार्थांचे / खिचडीचे आणि पाण्याचे नमुने शासनाच्या अन्न व भेसळ कार्यालयास तपासण्यासाठी सत्वर पाठविण्यात यावेत.

७) आपत्कालीन सदय:स्थिती गटशिक्षणाधिकारी आणि शिक्षणधिकारी यांना सत्वर कळवून मार्गदर्शन मागविण्यात यावे.

८) शिक्षणाधिकारी / गटशिक्षणाधिकारी यांनी जबाबदार अधिकाऱ्यांमार्फत अशा प्रकरणाची सविस्तर चौकशी करावी.

९) याबाबतची माहिती वरिष्ठ कार्यालयांना सत्वर पाठविण्यात यावी.

१०) शालेय पोषण आहारासंदर्भात वेळोवेळी स्थानिक वर्तमानपत्रांत आलेल्या माहिती बाबत चौकशी करुन त्याबाबतची सदय:स्थिती संचालनालयास कळवावी.

**टीप : तक्रार निवारण केंद्र टोल फ्री क्रमांक १८००२३३९९८८**

**परिशिष्ट क्र. ७.१**

जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांनी त्यांच्या स्वउत्पन्नाच्या ३% निधीतून घ्यावयाच्या अपंग कल्याणासाठी योजना.

## महाराष्ट्र शासन

### ग्राम विकास विभाग

### शासन निर्णय क्रमांकः अपंग २०१५/प्र.क्र.१३७/ वित्त-३

बांधकाम भवन,मर्झबान रोड,
फोर्ट-१,मुंबई-४००००१.
तारीख: २४ नोव्हेंबर,२०१५

वाचा -

१) **शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण २००७/प्र.क्र.४८७१/वित्त-३,दि.०५ ऑक्टोबर, २०१२.**
२) **शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण २००७/प्र.क्र.४८७१/वित्त-३, दि.२५ जून, २०१४.**
३) **शासन निर्णय क्रमांकः सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. अपंग २०१५/प्र.क्र.५५/अ.क्र.२,दि.१८/११/२०१५.**

प्रस्तावना -

महाराष्ट्र शासनाच्या सन २००१ मध्ये अस्तित्वात आलेल्या अपंग कल्याण कृति आराखडयामध्ये रोजगार व स्वयंरोजगार विषयक उपाययोजना या सदराखालील अनुक्रमांक ६ मध्ये स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय योजना, केंद्र शासनाच्या योजना, दारिद्र निर्मुलन योजना या अंतर्गत किमान ३% लाभार्थी अपंग असातील,याबाबत उपाययोजना करण्यात येईल तसेच या कृती आराखडयातील अनुक्रमांक ९ मधील सूचनेनुसार स्थानिक स्वराज्य संस्थाच्या एकूण निधीपैकी ३% निधी अपंग व्यक्तींच्या कल्याण व पुर्नवसनाकरीता राखून ठेवण्याबाबत कारवाई करण्यात येईल असे स्पष्ट केले आहे.

या अनुषंगाने दि. २९/७/२०१५ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांचे अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत मा.मुख्यमंत्री महोदयांनी " स्थानिक स्वराज्य संस्थानी अपंग व्यक्तींसाठी राखीव ठेवण्यात आलेल्या ३% निधीमधून अपंग हिताच्या कोणत्या योजना राबविण्यात याव्यात,याबाबत सामाजिक न्याय विभागाने संदर्भ करून नगर विकास व ग्राम विकास विभागास अवगत करावे " असे निर्देश दिलेले होते , त्यास अनुसरून सामाजिक न्याय विभागाने प्रस्तावित योजना कळविल्या आहेत. अपंगाकरीता राखून ठेवलेला ३% निधीमधून जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांनी सामुहिक तथा वैयक्तिक लाभाच्या कोणत्या योजना घ्याव्यात याबाबत शासनाने सर्व जिल्हा परिषदांना आदेश देणे आवश्यक आहे.

### शासन निर्णय -

जिल्हा परिषदांनी व पंचायत समित्यांनी सन २००१ च्या अपंग कल्याणकृती आराखडयातील अनुक्रमांक ९ मधील सूचनेनुसार स्थानिक स्वराज्य संस्थाच्या एकूण निधीपैकी ३% निधी अपंग व्यक्तींच्या कल्याण व पूर्नवसनाकरीता राखून ठेवून खर्च करावा. याबाबत ग्रामविकास विभागाने दि. २५ जून,२०१४ व दि. २५/१०/२०१५ च्या शासन निर्णयान्वये आदेश निर्गमित केले आहेत. सदर निधी अपंग व्यक्तींच्या कल्याण व पुर्नवसनाकरीता खालील बाबींवर खर्च करण्याबाबत प्रस्तावित करण्यांत येत आहे.

**अ) सामुहिक योजना:-**

१) अपंग पुनर्वसन केंद्र,थेरपी सेंटर्स सुरू करणे ( यामध्ये भौतिक उपचार तज्ञ,व्यवसाय उपचार तज्ञ,स्पीच थेरापीस्ट,बालविकास मानसशास्त्रज्ञ व वैद्यकीय अधिकारी यांचा समावेश असावा.)

२) सार्वजनिक इमारती व ठिकाणी अपंगांसाठी अडथळा विरहीत वातावरण निर्मिती करणे,जुन्या इमारतींचे ॲक्सेस ऑडीट करून जुन्या इमारतींमध्ये सुविधा निर्माण करणे. यामध्ये रॅम्स,रेलिंग,टॉयलेट-बाथरूम,पाण्याची व्यवस्था,लिफ्टस,लोकेशन बोर्ड इत्यादी सुविधा उपलब्ध करून देणे.

३) अपंग महिला बचत गटांना सहाय्यक अनुदान देणे.यामध्ये अपंग महिलांबरोबरच मतिमंदाचे पालक असणाऱ्या महिलांचा देखील समावेश असावा.

४) अपंगांच्या स्वयंसहाय्यता गटांना अनुदान देणे.

५) अपंग उद्योगजता व कौशल्य विकास प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करणे.

६) अपंग व्यक्तींकरीता क्रीडा प्रबोधिनी स्थापन करणे व क्रिडा संचालनायाच्या मान्येतेने क्रिडा स्पर्धांचे आयोजन करणे.

७) करमणुक केंद्रे,उद्याने ( सेन्सरी गार्डन ) यामध्ये अपंग व्यक्तींसाठी विशेष सुविधा उपलब्ध करून देणे.

८) सुलभ स्वच्छतागृहे व सुलभ स्नानगृहामध्ये अपंग व्यक्तींसाठी योग्य ते फेरबदल करणे अथवा अपंगांसाठी सोयीस्कर सुलभ शौचालय व स्नानगृहे बांधणे.

९) स्थानिक स्वराज्य संस्थाच्या रूग्णालयामध्ये तसेच जिल्हा परिषदेअंतर्गत येणाऱ्या सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये कर्णबधीरांसाठी OAE ( OTO ACOUSTIC EMISSION) / बेरा (BRAIN STEM EVOKED RESPONSE AUDIOMETRY )/PURE TONE AUDIOMETRY चिकित्सेची सुविधा निर्माण करणे.

१०) सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या रूग्णालयामार्फत तसेच जिल्हा परिषदेअंतर्गत येणाऱ्या प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत अपंगत्व प्रतिबंधाकरीता रुबेला लसीकरण करणे व जनजागृती करणे.

११) मतिमंदासाठी कायमस्वरूपी औषधोपचारांची गरज आहे त्यांना मोफत औषध पुरविणे.

१२) कुष्ठरुग्णांसाठी औषधे/ ड्रेसिंग तसेच सहाय्यभूत साधने व सर्जिकल अप्लायसेंस पुरविणे.

१३) सर्व प्रवर्गाच्या अतितीव्र अपंगत्व असेलल्या व्यक्तींसाठी तात्पुरत्या अथवा कायमस्वरूपाच्या निवारा गृहाला सहाय्यक अनुदान देणे.

१४) अपंग प्रतिबंधात्मक , लवकर निदान व उपचाराच्या दृष्टीने अंगणवाडी शिक्षिका व सेविकांस प्रशिक्षण देणे.

१५) लवकर निदान त्वरीत उपचाराच्या दृष्टीने अपंगांच्या पुर्व प्राथमिक शिक्षणाची ( अर्ली डिटेक्शन सेंटर ) सुविधा पुरविणाऱ्या संस्थांना अर्थसहाय्य उपलब्ध करून देणे.

१६) अपंग व्यक्तींना समुपदेशन तसेच सल्लामसलत करणाऱ्या केंद्रांना सहाय्यक अनुदान देणे.

१७) अपंग व्यक्तीने अथवा अपंगांच्या संस्थानी तयार केलेल्या वस्तुंची विक्री करण्याकरीता मध्यवर्ती विक्रीकेंद्राची स्थापना करणे. ( नवी मुंबई अथवा दिल्ली महानगरपालिकेच्या धर्तीवर सर्व महानगरपालिकांनी तसेच मोठया नगरपालिकांनी हब तयार करावेत )

१८) मतिमंद मुलांच्या पालक संघांना/संघटनांना सहाय्यक अनुदान देणे.

१९) मतिमंदासाठी तात्पुरते केअर सेंटर्स/डे केअर सेंटर्स यांची स्थापना करणे.

२०) अपंगासाठी रोजगार व स्वयंरोजगार मेळाव्याचे आयोजन करणे.

२१) महानगरपालिका/ नगरपालिकांच्या विकास आराखडयामध्ये अपंगांसाठी घरकुल व व्यवसायासाठीच्या जागांचा समावेश करून अपंगाच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेस अर्थसहाय्य देणे.

२२) अपंग मुले तसेच अपंग व्यक्तींच्या कला गुणांना प्रोत्साहान देण्यासाठी कला ॲकेडमी सुरू करणे.

२३) अपंगत्व प्रतिबंधात्मक पुवर्वसन व सोयी सुविधांबाबत प्रचार , प्रसिध्दी व जनजागृती करणे.

**ब) वैयक्तिक लाभाच्या योजना :-**

१) अपंग व्यक्तींना सहाय्यभूत साधने व तंत्रज्ञान याकरीता अर्थसहाय्य देणे.

**१ अ) अंध व्यक्तींसाठी :-** मोबाईल फोन,लॅपटॉप/संगणक ( जॉस सॉप्टवेअर ),बेल नोट वेअर,Communication equipment Braille attachement telephone,adapeted walkers, ब्रेल लेखन साहित्य,ब्रेल टाईपरायटर,टॉकींग टाईपरायटर,लार्ज प्रिंट बुक,अल्पदृष्टी अपंगत्वावर मात करणेसाठी digital magnifiers इत्यादी सहाय्यभूत साधने व उपकरणांकरीता अर्थसहाय्य करणे.

**१ ब) कर्णबधीर व्यक्तींसाठी:-** विविध प्रकारची वैयक्तिक श्रवणयंत्रे ( बीटीईसह ) शैक्षणिक संच,संवेदन उपकरणे,संगणकासाठीचे सहाय्यभूत उपकरणे.

**१ क) अस्थिव्यंग व्यक्तींसाठी :-** कॅलीपर्स,व्हीलचेअर,तीनचाकी सायकल, स्वयंचलित तीन चाकी सायकल,कुबडया,कृत्रीम अवयव, प्रोस्थोटिक ॲण्ड डिव्हायसेस,वॉकर,सर्जिकल फुटवेअर,स्प्लींटस,मोबालिटि एड्स, कमोड चेअर्स,कमोड स्टुल,स्पायनल ॲण्ड नील वॉकी ब्रेस,डिव्हायसेस फॉर डेली लिव्हींग इत्यादी.

**१ ड ) मतिमंद व्यक्तींसाठी :-** मतिमंदासाठी शैक्षणिक साहित्य संच ( MR kits ),बुध्दीमत्ता चाचणी संच,सहाय्यभूत उपकरणे व साधने तसेच तज्ञाने शिफारस केलली अन्य सहाय्यभूत साधने.

**१ इ) बहुविकलांग व्यक्तीसाठी :-** संबंधित क्षेत्रातील तज्ञाने शिफारस केलेली सुयोग्य सहाय्यभूत साधने व उपकरणे,सी.पी.चेअर,स्वयंचलित सायकल व खुर्ची,संगणक वापरण्यासाठीची सहाय्यभूत उपकरणे.

7. The Director of Education, Maharashtra State, Pune; the Director of Higher Education, Maharashtra State, Pune; the Director, Tribal Welfare, Maharashtra State, Nashik; the Director, Social Welfare, Maharashtra State, Pune; Tribal Development Commissioner, Nashik, are requested to bring these orders to the notice of the Local Bodies and Managements of all the Institutions concerned to whom the grant-in-aid is admissible and ensure that the employees are paid the House Rent Allowance in accordance with these orders. They should inform the Managements that the grant-in-aid on this account will be paid in accordance with the rules for grant-in-aid sanctioned by Government from time to time.

8. The additional expenditure on account of grant of House Rent Allowance to State Government servants in Rural Areas should be debited to the Contingency Fund Advance of Rupees One Crore sanctioned under Government Memorandum, Finance Department, No. CNF. 1184/99/BUD-7, dated 18th September 1984, " Demand No. 91, Major Head, 265-Other Administrative Services—Other Expenditure-(*xi*) House Rent Allowance to State Government Employees in Rural Areas." The Drawing and Disbursing Officers should claim House Rent Allowance through a separate bill, debiting this expenditure to the Contingency Fund Advance. This procedure should be followed till the drawal of monthly bills upto November 1984 (paid on or after 1st December 1984). Thereafter, the amount of House Rent Allowance should be included in the monthly pay bills and should be debited to the functional Major Head of Account.

Necessary Supplementary Demand to recoup the Contingency Fund Advance should be presented in the ensuing Session of the Legislature.

In respect of employees of aided institutions, and Zilla Parishads, the expenditure should be debited to the Sub-Heads of accounts under the respective Major Heads, to which the expenditure on grant-in-aid to them, is debitable.

9. The Heads of Departments including the Officers, mentioned in para. 7 should take into account the additional burden on this account, while framing their Eight/Nine Monthly Revised Estimates.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

ISSUED ON. 5 DEC 1984 Despatch Clerk.

V. D. PANSE,
Joint Secretary to Government.

No. A.B. - EST / 2751
Collector Office,
Ratnagiri. Dt. 4/12/84
Copy forwarded to all S. DO' S, Tahasildar's for information and Necessary action.

For Collector Ratnagiri.

## परिशिष्ट क्र. १३.३

**राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना व इतरांना सुधारित दराने स्थानिक पूरक भत्ता व घरभाडे भत्ता देण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**

**वित्त विभाग**

शासन निर्णय क्रमांक वेपुर-१२८७/६४३/सेवा-१०

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २५ एप्रिल १९८८.

**पहा**—(१) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक सीपीओ-१४७८/सीआर–२५१/एसईआर-५, दिनांक १७ एप्रिल १९७८.

(२) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक सीपीओ-१४८०/सीआर-३३३/एसईआर-५, दिनांक १५ मार्च १९८०.

**शासन निर्णय**

केंद्र शासनाच्या सुधारित वेतनश्रेणींच्या धर्तीवर व समानीकरण समितीच्या शिफारशींच्या आधारे, राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या व इतरांच्या वेतनश्रेणी सुधारणे, शासनाच्या स्वतंत्रपणे विचाराधीन आहे. ह्याबाबत निर्णय होईपर्यंत शासनाने ह्यापूर्वीच दिनांक १ ऑक्टोबर १९८६ पासून सर्व संवर्गातील कर्मचाऱ्यांना, मूळ वेतनाच्या २० टक्के, किमान रु. ७५, इतकी तदर्थ वाढ मंजूर केलेली आहे. अट अशी की, ही वाढ, सुधारित वेतनश्रेणी घोषित झाल्यावर वेतन निश्चित करताना होणाऱ्या वाढीमध्ये समायोजित केली जाईल. त्याचप्रमाणे शासनाने सर्व कर्मचाऱ्यांना दिनांक १ जुलै १९८६, १ जानेवारी १९८७ व १ जुलै १९८७ पासून, सुधारित सूत्रानुसार महागाईभत्तादेखील मंजूर केला आहे. उपरिनिर्दिष्ट शासन निर्णयात वेळोवेळी दुरुस्ती करून त्याअन्वये मंजूर केलेल्या स्थानिक पूरक भत्त्याच्या व घरभाडे भत्त्याच्या दरांत सुधारणा करण्याचा प्रश्न काही काळ शासनाच्या विचाराधीन होता.

२. शासन असा आदेश देत आहे की, राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेल्या **स्थानिक पूरक भत्त्याचे व घरभाडे भत्त्याचे दर दिनांक १ एप्रिल १९८८ पासून खाली दर्शविल्याप्रमाणे सुधारण्यात यावेत :—**

**तक्ता—एक**

**स्थानिक पूरक भत्ता**

| वेतन मर्यादा | स्थानिक पूरक भत्त्याची मासिक रक्कम व शहरांचे वर्गीकरण | | |
|---|---|---|---|
| | 'अ' मुंबई (नवी मुंबई व साष्टी बेटासह) पुणे (ना.स.) आणि ठाणे (ना.स.) | 'ब-१' नागपूर (ना.स.) | 'ब-२' वर्ग शहरे आणि अन्य विभागीय मुख्यालये व महानगरपालिकेची शहरे, अमरावती, औरंगाबाद (ना.स.), कल्याण, कोल्हापूर (ना.स.), नाशिक (ना.स.), सोलापूर (ना.स.) आणि उल्हासनगर (ना.स.) |
| **रुपये** | रुपये | रुपये | रुपये |
| **९५० पेक्षा कमी** .. .. | ३० | २५ | २० |
| **९५० ते १,४९९ पर्यंत** .. .. | ४५ | ३५ | २० |
| **१,५०० ते १,९९९ पर्यंत** .. .. | ७५ | ५० | २० |
| **२,००० व अधिक** .. .. | १०० | ७५ | २०* |

ना. स.—नागरी समूह घटक

***टीप-१**—ज्या कर्मचाऱ्यास दिनांक १ एप्रिल १९८८ रोजी सध्याच्या दराप्रमाणे दरमहा रु. २० पेक्षा अधिक स्थानिक पूरक भत्ता मिळत असेल, तो कर्मचारी जोपर्यंत ब-२ शहरी/विभागीय मुख्यालयात/महापालिकेच्या शहरी काम करीत आहे तोपर्यंत त्यास हा भत्ता तसाच मिळत राहील.

**टीप-२**—"अ", "ब-१", "ब-२" वर्गाची शहरे व विभागीय मुख्यालये आणि महापालिका शहरे, त्यांचे नागरी समूह व घटक क्षेत्रे यांची यादी, जोडपत्र-१-अ मध्ये दिली आहे.

**तक्ता—दोन**

**घरभाडे भत्ता**

| वेतन मर्यादा | घरभाडे भत्त्याची मासिक रक्कम व शहरांचे वर्गीकरण | | |
|---|---|---|---|
| | 'अ', 'ब-१' व 'ब-२' वर्गाची शहरे | अन्य जिल्हा मुख्यालये व "क" वर्गाची शहरे | इतर |
| रुपये | रुपये | रुपये | रुपये |
| ७५०-९४९ पर्यंत .. .. | १२५ | ६० | २७ |
| ९५०-१,४९९ पर्यंत .. .. | २१० | १०० | ४५ |
| १,५००-२,७९९ पर्यंत .. .. | ३७५ | १८० | ९० |
| २,८००-३,५९९ पर्यंत .. .. | ५०० | २५० | १३० |
| ३,६००-४,४९९ पर्यंत .. .. | ६५० | ३३० | १७५ |
| **४,५०० व अधिक** .. .. | ८०० | ४०० | २५० |

**टीप**.—"अ", "ब-१", "ब-२" व "क" वर्गाची शहरे व अन्य जिल्हा मुख्यालये, त्यांचे नागरी समूह व घटकक्षेत्रे यांची यादी जोडपत्र—१-ब मध्ये दिली आहे.

३. ह्या आदेशांच्या प्रयोजनासाठी "वेतन" म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ मधील नियम ९(३६) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे, दिनांक १ एप्रिल १९८८ रोजी व त्यानंतर अनुज्ञेय असलेले "वेतन" असेल व त्यात, त्या वेतनावर दिनांक १ जानेवारी १९८६ रोजी अनुज्ञेय असलेला महागाई भत्ता व तदर्थ महागाई भत्ता, पहिल्या व दुसऱ्या अंतरिम वाढीच्या रकमा व मूळ वेतनाच्या २० टक्के, किमान रु. ७५, इतक्या तदर्थ वाढीचा समावेश असेल.

४. सर्व कर्मचाऱ्यांना (शासनाच्या मालकीच्या/शासनाने भाड्याने घेतलेल्या निवासस्थानात राहाणाऱ्या व्यतिरिक्त) **भाडे पावती सादर न करता वरील दराने घरभाडे भत्ता देय असेल.** तथापि, ह्या कर्मचाऱ्यांना, ते घरभाड्यासाठी काही खर्च/घरभाड्यापोटी अंशदान करीत आहेत अशा आशयाचे प्रमाणपत्र (जोडपत्र-२ प्रमाणे) प्रस्तुत करावे लागेल. स्वतःच्या मालकीच्या घरात राहाणाऱ्या कर्मचाऱ्यांनादेखील, त्यांनी ह्या आदेशासोबतच्या जोडपत्र-२ प्रमाणे प्रमाणपत्र सादर केल्यास घरभाडे भत्ता दिला जाईल. कर्मचाऱ्यांना ही प्रमाणपत्रे **प्रत्येक वर्षी एप्रिल महिन्यात किंवा ज्या ज्यावेळी प्रमाणपत्रातील मजकुरात बदल झाला असेल** तेव्हा सादर करावी लागतील. ह्याशिवाय घरभाडे भत्ता देण्यासंबंधीच्या सध्याच्या इतर सर्व शर्ती तशाच लागू राहातील. ग्रामीण भागातील कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, कामाच्या ठिकाणी राहण्याच्या संबंधात, घरभाडे भत्त्याच्या पात्रतेसाठी विहित केलेली शर्त मात्र काढून टाकण्यात येत आहे.

५. जे कर्मचारी, त्यांच्या सेवाशर्तीनुसार, भाडेमाफ निवासस्थान मिळण्यास पात्र आहेत आणि ज्यांना निवासस्थाने पुरविण्यात आलेली नाहीत, असे कर्मचारी, वर उल्लेखिलेल्या क्रमांक (२) च्या आदेशानुसार भाडेमाफ निवासस्थानाऐवजी घरभाडे भत्त्याची मागणी करण्यास पात्र आहेत, असे कर्मचारी घरभाडे भत्त्याचे सुधारित दर **अधिक** त्यांच्या सध्याच्या वेतनाच्या व स्थानिक पूरक भत्त्याच्या १० टक्के, ह्या आधारे भाडेमाफ निवासस्थानाऐवजी घरभाडे भत्ता मिळण्यास पात्र असतील. परंतु भाडेमाफ निवासस्थानाऐवजी घरभाडे भत्त्याची मागणी करण्यासाठी विहित केलेल्या सर्व अटी पूर्ण कराव्या लागतील.

६. शासन असाही आदेश देत आहे की, सर्व अनुदानप्राप्त शैक्षणिक संस्थांच्या प्राथमिक, माध्यमिक शाळांतील पूर्णकालिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, तसेच कृषि व कृषीतर विद्यापीठातील व तत्संलग्न महाविद्यालयांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, त्याचप्रमाणे शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक मभवा-११८६/३९४/सेवा-१०, दिनांक १८ ऑगस्ट १९८६ मधील परिच्छेद

६ मध्ये उल्लेखिलेले इतर कर्मचारी ह्यांना सध्याची स्थानिक पूरक भत्त्याची व घरभाडे भत्त्याची योजना लागू असल्यास, त्यांना वरील परिच्छेद २ मधील स्थानिक पूरक भत्त्याचे व घरभाडे भत्त्याचे सुधारित दर, वरील परिच्छेद ४ मधील तरतुदींसह अनुज्ञेय असतील.

७. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (सन १९६२ चा अधिनियम, क्रमांक ५) च्या कलम २४८ च्या परंतुकान्वये प्रदान केलेले अधिकार व त्यासंबंधातील इतर सर्व अधिकार यांचा वापर करून शासन असाही आदेश देत आहे की, जिल्हा परिषदांच्या पूर्णकालिक कर्मचाऱ्यांनासुद्धा हे आदेश योग्य त्या फेरफारांसह लागू करण्यात यावेत.

८. शासन असाही आदेश देत आहे की, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनमानानुसार वेतन घेणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनाही, हे आदेश लागू करण्यात यावेत. ह्या कर्मचाऱ्यांना, मूळ वेतनाच्या २० टक्के तदर्थ वाढ देण्यात आलेली नसल्यामुळे, त्यांच्या स्थानिक पूरक भत्त्याची व घरभाडे भत्त्याची रक्कम संगणित करताना ही तदर्थ वाढ विचारात घेतली जाऊ नये.

९. दिनांक १ जानेवारी १९८६ रोजी किंवा त्यानंतर शासकीय सेवेत नियुक्त झालेले कर्मचारी, मूळ वेतनाच्या २० टक्के तदर्थ वाढ मिळण्यास पात्र नाहीत. त्यांच्या प्रकरणात, स्थानिक पूरक भत्ता व घरभाडे भत्ता, यांच्या रकमा, मूळ वेतन **अधिक** १ जानेवारी १९८६ रोजीचा महागाई भत्ता व दोन अंतरिम वाढी यांच्या आधारे संगणित केल्या जाव्यात.

१०. संबंधित विभागीय प्रमुखांनी, सदरहू आदेश, स्थानिक संस्थांच्या आणि सर्व संबंधित संस्थांच्या व्यवस्थापनांच्या निदर्शनास आणून द्यावेत आणि कर्मचाऱ्यांना सुधारित दराने स्थानिक पूरक भत्ता व घरभाडे दिला जाईल याची खात्री करून घ्यावी. शासनाने वेळोवेळी मंजूर केलेल्या सहायक अनुदान नियमांनुसार या भत्त्यांसाठी सहायक अनुदान अनुज्ञेय होईल असे त्यांनी व्यवस्थापनांना कळवावे.

११. शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत स्थानिक पूरक भत्त्याचे व घरभाडे भत्त्याचे सध्याचे दर व सुधारित दर यामधील फरकाचा खर्च, "मागणी क्रमांक : जी-८-२०७०, इतर प्रशासनिक सेवा-८००, इतर खर्च-(सहा) वेतन, घरभाडे भत्ता व स्थानिक पूरक भत्ता यांच्यात सुधारणा झाल्यामुळे, त्यासाठीची ठोक तरतूद" या शीर्षाखाली, शासकीय ज्ञापन, वित्त विभाग क्रमांक आकनि-११८८/३/-अर्थसंकल्प-७, दिनांक २५ एप्रिल १९८८ अन्वये मंजूर केलेल्या रु. १४ कोटींच्या आकस्मिकता निधी अग्रिमातून करण्यात यावा. **आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी, स्थानिक पूरक भत्त्याचे व घरभाडे भत्त्याचे सध्याचे दर व सुधारित दर यामधील फरकाच्या रकमेची स्वतंत्र देयके तयार करावीत व सदर खर्च आकस्मिकता निधी अग्रिमातून करावा आणि त्याचबरोबर, सदर खर्च, अग्रिमाच्या प्रतिपूर्तीनंतर, शेवटी कोणत्या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकावयाच्या हे सूचित करावे. ही पद्धती, जुलै १९८८ ची मासिक वेतन (दिनांक १ ऑगस्ट १९८८ रोजी अथवा त्यानंतर दिले जाणारे) देयके काढीपर्यंत अवलंबण्यात यावी.** त्यानंतर स्थानिक पूरक भत्त्याच्या व घरभाडे भत्त्याच्या सुधारित दरांचा समावेश नियमित मासिक वेतन देयकात करण्यात यावा आणि त्याचा खर्च संबंधित कार्यात्मक प्रमुख लेखाशीर्षाखाली खर्ची घालण्यात यावा. नियंत्रक अधिकाऱ्यांनी, नवीन बाबी विधानमंडळाने संमत करताच स्थानिक पूरक भत्त्याच्या व घरभाडे भत्त्याच्या फरकाच्या मागणीवरील एप्रिल १९८८ ते जुलै १९८८ पर्यंतचा खर्च संबंधित कार्यात्मक प्रमुख लेखाशीर्षाखाली खर्ची टाकावा.

अनुदानप्राप्त संस्था व जिल्हा परिषदा ह्यांच्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीतील खर्च, संबंधित प्रमुख लेखाशीर्षाखालील ज्या लेखाशीर्षाखाली त्यांच्या सहायक अनुदानाचा खर्च खर्ची घालण्यात येतो त्या उप लेखाशीर्षाखाली खर्ची घालण्यात यावा.

१२. विभाग प्रमुख, जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, कृषी व कृषीतर विद्यापीठाचे कुलसचिव ह्यांनी या कारणास्तव होणाऱ्या अतिरिक्त खर्चाचा बोजा आठ/नऊ माही सुधारित अंदाज तयार करताना विचारात घ्यावा.

१३. या आदेशाची इंग्रजी प्रत सोबत जोडली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**व्यं. दे. पानसे,**
शासनाचे सहसचिव.

प्रति—

महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई.
महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर.
महालेखापाल-१ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई.
महालेखापाल-२ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, नागपूर.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
राज्यपालांचे सचिव.
मुख्य मंत्र्यांचे सचिव.
सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक.
मंत्रालयीन सर्व विभाग.
सर्व विभागीय आयुक्त.
मंत्रालयाच्या सर्व विभागांखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख.
*प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई.
*प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
*सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
*प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
*सहसंचालक, ऑल इंडिया इन्स्टिटयूट ऑफ लोकल सेल्फ-गव्हर्नमेंट, मुंबई.
शिक्षण व सेवायोजन विभाग, मंत्रालय, मुंबई (२० प्रती).
ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई (२० प्रती).
नगर विकास विभाग, युडी-१०, मंत्रालय, मुंबई (२० प्रती).
कृषि व सहकार विभाग (२० प्रती).
आदिवासी विकास विभाग (२० प्रती).
सिनियर रिसर्च ऑफिसर, पे रिसर्च युनिट, भारत सरकार, वित्त मंत्रालय (व्यय विभाग), खोली क्र. २६१, नॉर्थ ब्लॉक, नवी दिल्ली.
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई.
उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती.
जिल्हा लेखापरीक्षा अधिकारी, स्थानिक निधी हिशेब, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जिल्हा अहमदनगर.
जिल्हा लेखापरीक्षा अधिकारी, स्थानिक निधी हिशेब, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी.
जनसंपर्क अधिकारी, मंत्रालय, मुंबई.
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी.
शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे (२५ प्रती).
उच्च शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे (२५ प्रती).
कला संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई (४० प्रती).
संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई (१०० प्रती).
संचालक, तांत्रिक प्रशिक्षण, द्वारा—तंत्र शिक्षण संचालक, मुंबई (२५० प्रती).
सर्व विभागीय शिक्षण उप संचालक (प्रत्येकी १० प्रती).
सर्व विभागीय तंत्र शिक्षण उप संचालक (प्रत्येकी १० प्रती).
सर्व जिल्हा परिषदांचे शिक्षणाधिकारी.
आयुक्त, महानगरपालिका, नागपूर.
प्रशासकीय अधिकारी, पश्चिम महाराष्ट्रातील नगरपालिका शिक्षण मंडळे (पुणे/कोल्हापूर/सोलापूर या महानगरपालिकांची शिक्षण मंडळे यांसह).
मुख्य अधिकारी, सर्व नगरपालिका.
कार्यकारी अधिकारी, कॅन्टोनमेंट बोर्ड, खडकी/देहू रोड/देवळाली/अहमदनगर.
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
संचालक, आदिवासी कल्याण, महाराष्ट्र राज्य, नाशिक (१० प्रती).
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे (१० प्रती).
संचालक, आदिवासी संशोधन व शिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
आदिवासी विकास आयुक्त, नाशिक.
सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी.
अपर आयुक्त, आदिवासी उपयोजना, नाशिक/नागपूर.
सर्व समाजकल्याण अधिकारी, वर्ग-१.
सर्व आदिवासी कल्याण अधिकारी.
सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिकृत आदिवासी विकास प्रकल्प.
कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जिल्हा अहमदनगर.
कुलसचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी.
कुलसचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला.
कुलसचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी.
कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई.
कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे.
कुलसचिव, नागपूर विद्यापीठ, नागपूर.
कुलसचिव, मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
कुलसचिव, अमरावती विद्यापीठ, अमरावती.
कुलसचिव श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई.
अधीक्षक, वेतन पथक, सर्व जिल्हे.
शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई (उत्तर, दक्षिण व पश्चिम विभाग).
सर्व कन्याशाळा निरीक्षिका.
सर्व जिल्ह्यांचे वरिष्ठ लेखा परीक्षक (शिक्षण विभाग).
शिक्षण अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका.
संचालक, नगरपालिका प्रशासन, मुंबई.
सर्व प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन.
वित्त विभागातील सर्व कार्यासने.
निवड फाईल, वित्त विभाग—सेवा १०.

*पत्राद्वारे

१९८८ चा क्रमांक
[illegible]

शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक वेपुर १२८७/६४३/सेवा-१०, दिनांक २५ एप्रिल १९८८ चे सहपत्र

## जोडपत्र—१-अ

### स्थानिक पूरक भत्ता देण्यासाठी वर्ग " अ ", " ब-१ ", " ब-२ ", विभागीय मुख्यालये व महानगरपालिका शहरे व त्यांच्या नागरी समूह घटक क्षेत्रांची यादी

| १९८१ च्या लोकसंख्येच्या आधारे शहराचे वर्गीकरण (१) | शहरांची/नागरी समूह घटकांची नावे (२) | नागरी समूह घटक व त्यात येणारे क्षेत्र (३) |
|---|---|---|
| " अ " (१६ लाखांवरील) .. | मुंबई (नवी मुंबई व साष्टी बेटासह) .. | बृहन्मुंबई आणि नवी मुंबई. |
| | पुणे (ना. स.) .. | (ए) देहू<br>(बी) देहू रोड छावणी<br>(सी) खडकवासला<br>(डी) खडकी छावणी<br>(इ) लोहगाव<br>(एफ) पिंपरी-चिंचवड नवीन वसाहत (महानगरपालिका).<br>(जी) पुणे छावणी<br>(एच) पुणे (महानगरपालिका)<br>(आय) हडपसर |
| | ठाणे (ना. स.) .. | (ए) कळवा<br>(बी) माजिवडे<br>(सी) ठाणे (महानगरपालिका) |
| " ब-१ " (८ लाखांपेक्षा अधिक परंतु १६ लाखांपेक्षा कमी) | नागपूर (ना. स.) .. | (ए) कामटी (एम)<br>(बी) कामटी छावणी<br>(सी) नागपूर (महानगरपालिका) |
| " ब-२ " (४ लाखांपेक्षा अधिक परंतु ८ लाखांपेक्षा कमी) | नाशिक (ना. स.) .. | (ए) भगूर<br>(बी) देवळाली छावणी<br>(सी) नाशिक (महानगरपालिका)<br>(डी) नाशिक रोड-देवळाली<br>(इ) सातपूर |
| | सोलापूर (ना. स.) .. | (ए) सोलापूर (महानगरपालिका)<br>(बी) सोलापूर (ओ. जी.) |
| | उल्हासनगर (ना. स.) .. | (ए) अंबरनाथ<br>(बी) डोंबिवली<br>(सी) कल्याण<br>(डी) काटेमानिवली<br>(इ) मोहने<br>(एफ) उल्हासनगर |
| विभागीय मुख्यालये .. | औरंगाबाद (ना. स.) .. | (ए) औरंगाबाद (महानगरपालिका)<br>(बी) औरंगाबाद छावणी |
| महापालिका शहरे .. | अमरावती<br>कल्याण-अंबरनाथ<br>कोल्हापूर (ना. स.) .. | (ए) गांधीनगर<br>(बी) कोल्हापूर (महानगरपालिका) |

ना.स.—नागरी समूह घटक

एम—नगरपरिषद क्षेत्र

ओ. जी.—आउट ग्रोथ

शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक वेपुर-१२८७/६४३/सेवा-१०, दिनांक २५ एप्रिल १९८८ चे सहपत्र

## जोडपत्र—१-ब

घरभाडे भत्ता देण्यासाठी, वर्ग "अ", "ब-१", "ब-२", "क" आणि जिल्हा मुख्यालये व त्यांच्या नागरी समूह घटक क्षेत्रांची यादी

| १९८१ च्या लोकसंख्येच्या आधारे शहराचे वर्गीकरण (१) | शहरांची/नागरी समूह घटकांची नांवे (२) | नागरी समूह घटक व त्यात येणारे क्षेत्र (३) |
|---|---|---|
| "अ" (१६ लाखावरील) .. | मुंबई (नवी मुंबई व साष्टी बेटासह) .. | बृहन्मुंबई आणि नवी मुंबई. |
| | पुणे (ना. स.) .. | (ए) देहू<br>(बी) देहू रोड छावणी<br>(सी) खडकवासला<br>(डी) खडकी छावणी<br>(इ) लोहगाव<br>(एफ) पिंपरी-चिंचवड नवीन वसाहत महानगरपालिका<br>(जी) पुणे छावणी<br>(एच) पुणे (महानगरपालिका)<br>(आय) हडपसर |
| | ठाणे (ना. स.) .. | (ए) कळवा<br>(बी) माजिवडे<br>(सी) ठाणे (महानगरपालिका) |
| "ब-१" (८ लाखापेक्षा अधिक परंतु १६ लाखांपेक्षा कमी) | नागपूर (ना. स.) .. | (ए) कामटी (एम्)<br>(बी) कामटी छावणी<br>(सी) नागपूर (महानगरपालिका) |
| "ब-२" (४ लाखांपेक्षा अधिक परंतु ८ लाखांपेक्षा कमी) | नाशिक (ना. स.) .. | (ए) भगूर<br>(बी) देवळाली छावणी<br>(सी) नाशिक (महानगरपालिका)<br>(डी) नाशिक रोड-देवळाली<br>(इ) सातपूर |
| | सोलापूर (ना. स.) .. | (ए) सोलापूर (महानगरपालिका)<br>(बी) सोलापूर (ओ. जी.) |
| | उल्हासनगर (ना. स.) .. | (ए) अंबरनाथ<br>(बी) डोंबिवली<br>(सी) कल्याण<br>(डी) काटेमानिवला<br>(इ) मोहने<br>(एफ) उल्हासनगर |
| जिल्हा मुख्यालये .. | अकोला, अमरावती, बीड, बुलढाणा, भंडारा, चंद्रपूर, धुळे, गडचिरोली, जालना, जळगाव, लातूर, नांदेड, परभणी, रत्नागिरी, रायगड (अलिबाग), सातारा, सिंधुदुर्ग (कुडाळ), वर्धा, यवतमाळ, उस्मानाबाद. | |
| | अहमदनगर (ना. स.) .. | (ए) अहमदनगर (एम्)<br>(बी) अहमदनगर छावणी |
| | औरंगाबाद (ना. स.) .. | (ए) औरंगाबाद (महानगरपालिका)<br>(बी) औरंगाबाद छावणी |
| | कोल्हापूर (ना. स.) .. | (ए) गांधीनगर<br>(बी) कोल्हापूर (महानगरपालिका) |

**जोडपत्र-१-ब—चालू**

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| | सांगली (ना. स.) .. | (ए) माधवनगर<br>(बी) मिरज<br>(सी) सांगली (एम्) |
| "क"<br>(५० हजारापेक्षा अधिक परंतु ४ लाखांपेक्षा कमी) | अकोट, अमळनेर, बल्लारपूर, बार्शी, भिवंडी, चाळीसगाव, गोंदीया, हिंगणघाट, इचलकरंजी कऱ्हाड, खामगाव, मालेगांव, नंदुरबार, पंढरपूर, श्रीरामपूर, उद्‌गीर | |
| | अचलपूर (ना. स.) .. | (ए) अचलपूर (एम्)<br>(बी) अचलपूर शिबीर |
| | भुसावळ (ना. स.) .. | (ए) भुसावळ (एम्)<br>(बी) कंदारी |
| | मनमाड (ना. स.) .. | (ए) मनमाड (एम्)<br>(बी) मनमाड (बिगर नगरपालिका क्षेत्र) |

ना.स.—नागरी समूह घटक

एम्—नगरपरिषद क्षेत्र.

ओ.जी—आउट ग्रोथ

**शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक वेपुर-१२८७/६४३/सेवा-१०, दिनांक २५ एप्रिल १९७८ चे सहपत्र**

## जोडपत्र–२

घरभाडे भत्त्यासाठी प्रत्येक वर्षी एप्रिल महिन्यामध्ये किंवा ज्या ज्या वेळी प्रमाणपत्राच्या मजकुरात बदल होत असेल, तेव्हा शासकीय कर्मचाऱ्यांनी सादर करावयाचे प्रमाणपत्र.

**मी असे प्रमाणित करतो की,**

(१) घरभाडे भत्त्याची मागणी करण्यात आलेल्या कालावधीत मला शासकीय निवासस्थान पुरविण्यात आलेले नाही.

(२) मी भाड्याच्या घरामध्ये भाडेकरू/पोटभाडेकरू म्हणून दिनांक..............पासून दिनांक............पर्यन्त रहात आहे आणि मी भाड्यापोटी काही रक्कम खर्च/अंशदान (Contributing) करीत आहे.

(३) माझी पत्नी/पती यास केंद्र शासन/सार्वजनिक उपक्रम/निम-शासकीय संस्था जसे., नगरपालिका, पोर्ट ट्रस्ट इत्यादी, यांच्यामार्फत मी काम करीत असलेल्या ठिकाणी (Headquarters) निवासस्थान देण्यात आलेले नाही.

(४) ज्या निवासस्थानासाठी मी घरभाडे भत्त्याची मागणी केली आहे, ते अधिकृत निवासाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही कारणासाठी वापरले जात नाही.

(५) मी, माझ्या/माझ्या पत्नीच्या/मुलीच्या/मुलाच्या/वडिलांच्या/आईच्या मालकीच्या घरात दिनांक................पासून दिनांक...............पर्यन्त राहात आहे आणि नगरपालिकेचे व अन्य कर भरत आहे/त्यासाठी अंशदान करीत आहे.

(६) मी................या सहकारी संस्थेतील सदनिकेत दिनांक..........पासून रहात आहे. आणि नगरपालिकेचे कर व अन्य कर भरत आहे/त्यासाठी अंशदान करीत आहे. त्या संस्थेच्या इमारतीतील कोणताही भाग भाडेपट्टयाने दिला नाही/ इमारतीतील काही भाग................यांस दिनांक............पासून भाडेपट्टयाने दिला आहे. त्यामुळे संस्थेला रु...........चे उत्पन्न मिळते. सदर उत्पन्नाची संस्थेच्या सभासदांत वाटणी केली जात नाही आणि सदर उत्पन्नाचा व सदस्यांचा कोणत्याही प्रकारचा परस्पर आर्थिक संबंध नाही./सदर उत्पन्न संस्थेच्या सदस्यांना वाटले जाते, परंतु त्यातील माझा वाटा, मी नगरपालिका व अन्य करांवर करीत असलेल्या खर्चापेक्षा अधिक नाही.

दिनांक

सही : ......................

नांव : ......................

पदनाम : ......................

विभाग : ......................

कार्यालय : ......................

**टीप :** नको असलेला मजकूर खोडावा.

**Grant of Compensatory Local Allowance and House Rent Allowance at revised rates to State Government employees and others.**

GOVERNMENT OF MAHARASHTRA

**FINANCE DEPARTMENT**

Resolution No. RPS. 1287/643/SER-10

Mantralaya, Bombay 400 032, dated 25th April 1988

*Read.*—(*i*) Government Resolution, Finance Department, No. CPA. 1478/CR-251/SER-5 dated 17th April 1978.

(*ii*) Government Resolution, Finance Department, No. CPA. 1480/CR-333/SER-5, dated 15th March 1980.

*RESOLUTION*

The revision of pay-scales of State Government employees and others on the lines of the Central Government revised pay-scales is separately under consideration of Government on the basis of the recommendations of the Equivalence Committee. Pending decision in this regard, Government has already sanctioned *ad-hoc* increase at 20 per cent of basic pay, subject to a minimum of Rs. 75, with effect from 1st October 1986 to all categories of employees, subject to the condition that the same will be adjusted against the increase in fixing the pay in the revised scales as and when they will be announced. Government has also sanctioned Dearness Allowance on the revised pattern with effect from 1st July 1986, 1st January 1987 and 1st July 1987 to all employees. The question of revising the rates of Compensatory Local Allowance and House Rent Allowance sanctioned under Government Resolution cited above, as amended from time to time, was under consideration of Government for some time past.

2. Government is pleased to direct that **the rates of Compensatory Local Allowance and House Rent Allowance admissible to State Government employees should be revised with effect from 1st April 1988 as shown below :—**

TABLE—I

**Compensatory Local Allowance**

| Pay Range | Amount of C.L.A. per month and class of cities | | |
|---|---|---|---|
| | 'A' Bombay (including New Bombay, Salsette Island), Pune (U.A.) and Thane (U.A.) | 'B-1' Nagpur (U.A.) | 'B-2' class cities and other Divisional Headquarters and Corporation cities. Amravati, Aurangabad (U.A.), Kalyan, Kolhapur (U,A,) Solapur (U.A.) Nashik (U.A.) and Ulhasnagar (U.A.) |
| Rs. | Rs. | Rs. | Rs. |
| **Below Rs. 950** .. .. .. | **30** | **25** | **20** |
| **950—1,499** .. .. .. | **45** | **35** | **20** |
| **1,500—1,999** .. .. .. | **75** | **50** | **20** |
| **2,000 and above** .. .. .. | **100** | **75** | **20*** |

U.A.—Urban Agglomeration Units

**Note.*—(1) An employee who is in receipt of C.L.A. of more than Rs. 20 per month as on 1st April 1988 at the existing rate shall continue to draw the same so long as he continues to work at B-2 Class cities/ Divisional Headquarters/Corporation cities.

(2) A list of 'A', 'B-1', 'B-2' Class cities and other Divisional Headquarters and Corporation cities with their Urban Agglomeration and their constituent units is given in Annexure I-A.

(G.C.P.) H 67—2 (20,000—4-88)

## TABLE—II

### House Rent Allowance

| Pay Range | Amount of House Rent Allowance per month and class of cities | | |
|---|---|---|---|
| | 'A' 'B-1' and 'B-2' Class cities. | Other District Headquarter and 'C' Class cities. | Others |
| Rs. | Rs. | Rs. | Rs. |
| 750—949 | 125 | 60 | 27 |
| 950—1,499 | 210 | 100 | 45 |
| 1,500—2,799 | 375 | 180 | 90 |
| 2,800—3.599 | 500 | 250 | 130 |
| 3,600—4,499 | 650 | 330 | 175 |
| 4,500 and above | 800 | 400 | 250 |

*Note*.—A list of 'A', 'B-1', 'B-2' and 'C' class cities and District Headquarters with their Urban Agglomeration and their constituent units is given in Annexure 'I-B'.

3. "Pay" for the purpose of these orders will be the pay as defined in Rule 9(36) of Maharashtra Civil Services (Pay) Rules, 1981 admissible as on 1st April 1988 and thereafter and will also include the dearness allowance and *ad hoc* dearness allowance admissible on that pay as on 1st January 1986, and the amounts of first and second interim relief and *ad hoc* increase of 20 per cent of basic pay, subject to a minimum of Rs. 75.

4. House Rent Allowance at the above rates shall be payable to all employees (other than those residing in Government owned/hired accommodation) **without requiring them to produce rent receipts.** These employees shall, however, be required to furnish a certificate (As in Annexure II) to the effect that they are incurring some expenditure on rent/contributing towards rent. House Rent Allowance shall also be paid to Government employees living in their own houses, subject to their furnishing a certificate as in Annexure II accompanying this resolution. These certificates shall be produced by the employees in the **month of April each year or whenever there is a change in the contents of the certificate.** All other conditions at present applicable for grant of House Rent Allowance shall continue to apply. The condition prescribed in respect of employees in the rural areas that of residing at the place of duty for eligibility of House Rent Allowance shall however, be dispensed with.

5. According to the order cited at (*ii*) above, Government servants, who are eligible for rent-free quarters as a condition of service and to whom quarters are not provided are eligible to claim House Rent Allowance in lieu of rent-free quarters. Such Government servants will be eligible to draw House Rent Allowance in lieu of rent-free quarters on the basis of revised rates of house rent allowance *plus* 10 per cent of their existing pay and compensatory local allowance, subject to fulfilment of conditions prescribed for claiming house rent allowance, in lieu of rent-free quarters.

6. Government is also pleased to direct that the revised rates of Compensatory Local Allowance and House Rent Allowance sanctioned in para. 2 above shall be admissible together with the provisions contained in para. 4 above, to full time teaching and non-teaching staff of primary, secondary schools of aided educational institutions and teaching and non-teaching staff of agricultural and non-agricultural universities and affiliated colleges and other employees mentioned in para. 6 of Government Resolution, Finance Department, No. मभवा. 1186/394/SER-10, dated 18th August 1986, if the present scheme of Compensatory Local Allowance and House Rent Allowance is applicable to them.

7. In exercise of the powers conferred by the proviso to Article 248 of the Maharashtra Zilla Parishad and Panchayat Samities Act, 1961 (Mah. V of 1962) and all other powers enabling it in that behalf, Government is also pleased to direct that these orders should also be made applicable *mutatis mutandis* to the full-time Zilla Parishad employees.

8. Government is also pleased to direct that these orders should also be made applicable to the teaching and non-teaching staff drawing pay in the U. G. C. scales of pay. Since these persons have not been granted *ad hoc* increase of 20 per cent of the basic pay, the same should not be taken into account while computing the amount of Compensatory Local Allowance and House Rent Allowance.

9. Persons who have been appointed in Government service on or after 1st January 1986 are not eligible for *ad hoc* increase of 20 per cent of their basic pay. In their case the amounts of Compensatory Local Allowance and House Rent Allowance should be computed on the basic pay *plus* dearness allowance as on 1st January 1986 and two interim reliefs.

10. The concerned Heads of Departments should bring these orders to the notice of local bodies and managements of institutions concerned and ensure that the employees are paid the Compensatory Local Allowance and House Rent Allowance at revised rates. They should inform the managements that the grant-in-aid for these allowances will be admissible in accordance with the rules for grant-in-aid sanctioned by Government from time to time.

11. The expenditure on account of difference between the existing and revised rates of Compensatory Local Allowance and House Rent Allowance in respect of Government servants should be debited to Contingency Fund Advance of Rs. 14 crores sanctioned under Government Memorandum, Finance Department, No. आकनि—११८८/३/अर्थसंकल्प—७, dated 25th April 1988, "Demand No. G-8—2070, Other Administrative Services—800, Other Expenditure—(*vi*) Lumpsum provision on account of revision of pay, house rent allowance and compensatory local allowance". **The Drawing and Disbursing Officers should prepare a separate bill in respect of the difference between the existing and new rates of house rent allowance and compensatory local allowance debiting the expenditure to the Contingency Fund advance, and at the same time indicate the final head of account to which the expenditure should be debited on recoupment of advance. This procedure should be followed till the drawal of monthly pay bills up to July 1988 (paid on or after 1st August 1988).** Thereafter revised rates of compensatory local allowance and house rent allowance should be included in the monthly pay bills and the same should be debited to the concerned functional major head of account. The Controlling Officers should transfer the debit on account of the difference of compensatory local allowance and house rent allowance claimed from April 1988 to July 1988 to the concerned functional major head of account, as soon as the New Items are passed by the Legislature.

In respect of employees of aided institutions and Zilla Parishads, the expenditure should be debited to the sub-heads of accounts under the respective major heads to which expenditure on grant-in-aid to them is debited.

12. The Heads of Departments, Chief Executive Officers of Zilla Parishads and Registrars of Agricultural and non-agricultural Universities should take into account the additional burden on this account while framing their eight/nine monthly revised estimates.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

V. D. PANSE,
Joint Secretary to Government.

**Accompaniment to Government Resolution, Finance Department, No. RPS. 1287/643/ SER-10, dated 25th April 1988.**

## ANNEXURE I-A

A list of 'A', 'B-1', 'B-2' class cities, Divisional Headquarters and Corporation cities with their Urban Agglomeration constituent units for purposes of drawal of **Compensatory Local Allowance.**

| Classification of cities on the basis of population 1981 census. (1) | Name of City/Urban Agglomeration. (2) | Agglomeration and their constituent units. (3) |
|---|---|---|
| "A" (over 16 lakhs) .. | Bombay (including New Bombay, Salsette island). | Greater Bombay and New Bombay. |
| | Pune (U.A.) .. | (a) Dehu<br>(b) Dehu Road Cantonment<br>(c) Khadkwasala<br>(d) Kirkee Cantonment<br>(e) Lohagaon<br>(f) Pimpri-Chinchwad New Township. (Municipal Corporation)<br>(g) Pune Cantonment<br>(h) Pune (Municipal Corporation).<br>(i) Hadapsar |
| | Thane (U. A.) .. | (a) Kalva<br>(b) Majiwade<br>(c) Thane (Municipal. Corporation). |
| "B-1" (Above 8 but not exceeding 16 lakhs) | Nagpur (U. A.). .. | (a) Kamptee (M)<br>(b) Kampttee (Cantonment)<br>(c) Nagpur (Municipal Corporation) |
| "B-2" (Above 4 but not exceeding 8 lakhs.) | Nashik (U. A.) .. | (a) Bhagur<br>(b) Deolali Cantonment.<br>(c) Nashik (Municipal Corporation).<br>(d) Nashik Road. Deolali.<br>(e) Satpur. |
| | Solapur (U. A.) .. | (a) Solapur (Municipal Corporation)<br>(b) Solapur (O.G.) |
| | Ulhasnagar (U. A.) .. | (a) Ambernath<br>(b) Dombivali<br>(c) Kalyan<br>(d) Katemanivali<br>(e) Mohone<br>(f) Ulhasnagar |
| Divisional Headquarters, .. | Aurangabad (U. A.), .. | (a) Aurangabad (Municipal Corporation).<br>(b) Aurangabad Cantonment. |
| | Amravati | |
| Corporation Cities .. .. | Kalyan-Ambernath, | |
| | Kolhapur (U.A.) .. | (a) Gandhinagar<br>(b) Kolhapur (Municipal Corporation). |

U. A. — Urban Agglomeration Unit.
M. — Municipal area.
O. G. — Out growth.

73



**Accompaniment to Government Resolution, Finance Department, No. RPS. 1287/643/ SER-10, dated 25th April 1988.**

## ANNEXURE I-B

A list of 'A', 'B-1', 'B-2' and 'C' class cities District Headquarters with their Urban Agglomeration constituent units for purpose of drawal of **House Rent Allowance.**

| Classification of cities on the basis of population 1981 census (1) | Name of city/Urban Agglomeration (2) | Agglomeration and their constituent units (3) |
|---|---|---|
| "A" (Over 16 lakhs) .. | Bombay (including New Bombay, Salsette island). | Greater Bombay and New Bombay. |
| | Pune (U. A.) .. .. | (a) Dehu<br>(b) Dehu Road Cantonment<br>(c) Khadakwasala<br>(d) Kirkee cantonment<br>(e) Lohagaon<br>(f) Pimpri Chinchwad New Township (Municipal Corporation).<br>(g) Pune Cantonment<br>(h) Pune (Municipal Corporation)<br>(i) Hadapsar |
| | Thane (U.A.) .. .. | (a) Kalva<br>(b) Majiwade<br>(c) Thane (Municipal Corporation) |
| "B-1" (Above 8 but not exceeding 16 lakhs).. | Nagpur (U.A.) .. .. | (a) Kamptee (M)<br>(b) Kamptee Cantonment<br>(c) Nagpur (Municipal Corporation) |
| "B-2" (Above 4 but not exceeding 8 lakhs)... | Nashik (U.A.) .. .. | (a) Bhagur<br>(b) Deolali Cantonment<br>(c) Nashik (Municipal Corporation)<br>(d) Nashik Road-Deolali<br>(e) Satpur |
| | Solapur (U.A.) .. .. | (a) Solapur (Municipal Corporation)<br>(b) Solapur (O. G.) |
| | Ulhasnagar (U.A.)<br>Kalyan—Ambernath (U.A.) | (a) Ambernath<br>(b) Dombivali<br>(c) Kalyan<br>(d) Katemanivali<br>(e) Mohone<br>(f) Ulhasnagar |
| District Headquarters .. | Akola, Amravati, Beed, Buldhana, Bhandara, Chandrapur, Dhule, Gadchiroli, Jalna, Jalgaon, Latur, Nanded, Parbhani, Ratnagiri, Raigad (Alibag), Satara, Sindhudurg (Kudal), Wardha, Yavatmal, Usmanabad. | |
| | Ahmednagar (U. A.) .. | (a) Ahmednagar (M)<br>(b) Ahmednagar Cantonment |
| | Aurangabad (U.A.) .. | (a) Aurangabad Municipal Corporation.<br>(b) Aurangabad Cantonment. |
| | Kolhapur (U.A.) .. | (a) Gandhinagar<br>(b) Kolhapur (Municipal Corporation.) |
| | Sangli (U. A.) .. | (a) Madhavnagar<br>(b) Miraj<br>(c) Sangli (M) |

## ANNEXURE I-B—*contd.*

| Classification of cities on the basis of population 1981 census (1) | Name of city/Urban Agglomeration (2) | Agglomeration and their constituent units (3) |
|---|---|---|
| "C" (Above 50,000 but not exceeding 4 lakhs). | Akot, Amalner, Ballarpur, Barshi, Bhiwandi, Chalisgaon, Gondia, Hinganghat, Ichalkaranji, Karad, Khamgaon, Malegaon, Nandurbar, Pandharpur, Shrirampur, Udgir. | |
| | Achalpur (U. A.) .. | (*a*) Achalpur (M)<br>(*b*) Achalpur Camp. |
| | Bhusaval (U. A.) .. | (*a*) Bhusaval (M)<br>(*b*) Kandari |
| | Manmad (U.A.) .. | (*a*) Manmad (M)<br>(*b*) Manmad (N. M.) |

U. A. — Urban Agglomeration Unit.
M. — Municipal area.
N. M. — Non-Municipal Area.
O. G. — Out Growth.

7B

**Accompaniment to Government Resolution, Finance Department, No. RPS. 1287/643/ SER-10, dated 25th April 1988**

## ANNEXURE II

**Certificate to be furnished by a Government servant for drawal of House Rent Allowance in the month of April each year or whenever there is a change in the contents of the certificate.**

**I certify that—**

1. I have not been provided with Government accommodation during the period in respect of which the allowance is claimed.

2. I am residing in a rental house as a tenant/sub-tenant in a house rented by.............. ......................from..................to..................and I am incurring some expenditure/contributing towards rent.

3. My wife/husband has not been allotted family accommodation at the same station by Central Government/Public Undertaking/Semi-Government Organisation such as Municipality, Port Trust, etc.

4. The accommodation for which house rent allowance has been claimed by me is not being used for other than *bonafide* residential purpose.

5. I am residing in a house owned by me/my wife/son/daughter/father/mother from........ ...........to ..................and paying/contributing towards the municipal and other taxes.

6. I am residing in a flat/house in the ........................... Co-operative Housing Society from ..................and paying/contributing towards the Municipal and other taxes. No portion has been leased/A portion has been leased to .................... with effect from..................for which an income of Rs. ............... per month is derived by the Society. The said income is not apportioned between the members and there is no direct pecuniary nexus between the member and the income/The said income is apportioned between the members but my share is not more than the expenditure which I incur on payment of municipal and other taxes.

Date:

Signature ...........................

Name ...........................

Designation ...........................

Department/Office ....................

*N.B.*—Strike out whichever is not applicable.

परिशिष्ट क्र. १३.४

राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना व इतरांना
सुधारित दराने घरभाडेभत्ता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
वित्त विभाग,
शासन निर्णय क्रमांक घभाभ-१०९०/प्र.क्र.१०/सेवा-५,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ५ फेब्रुवारी १९९०.

पहा :- [१] शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक सीपीजे १४७८/सीआर-२५१/एसईआर-५, दिनांक १७ एप्रिल १९७८.

[२] शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक सीपीजे १४८०/सीआर-२३३/एसईआर-५, दिनांक १५ मार्च १९८०.

[३] शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक वेपुर १२८७/६४३/सेवा-१०, दिनांक २५ एप्रिल १९८८.

## शासन निर्णय

शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक वेपुर-१२८७/६४३/सेवा-१०, दिनांक २५ एप्रिल १९८८ अन्वये राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना व इतरांना दिनांक १ एप्रिल १९८८ पासून घरभाडेभत्त्याचे दर निश्चित करण्यात आलेले आहेत. राज्य शासकीय कर्मचारी व इतर यांना घरभाडेभत्ता केंद्र शासनाच्या दराप्रमाणे देण्यात यावा ही मागणी शासनाच्या विचाराधीन होती. शासनाने असा निर्णय घेतला आहे की, राज्य शासनाचे, जिल्हा परिषदांचे व शासन अनुदान प्राप्त संस्थेचे जे कर्मचारी सध्याच्या शासकीय आदेशानुसार घरभाडेभत्ता मिळण्यास पात्र आहेत, त्यांना मिळणारा घरभाडेभत्ता केंद्र शासनाच्या तत्सम कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेल्या दराने खाली परिच्छेद २ मधील तक्त्यात नमूद केलेल्या दिनांकापासून मंजूर करण्यात यावा.

२. शासन असा आदेश देत आहे की, राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेल्या घरभाडेभत्त्याचे दर शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक वेपुर १२८७/६४३/सेवा-१०, दिनांक २५ एप्रिल १९८८ मधील जोडपत्र १-ब मध्ये नमूद केलेल्या शहरांच्या वर्गीकरणानुसार खालील दिलेल्या तक्त्याप्रमाणे व त्यात नमूद केलेल्या दिनांकापासून सुधारण्यात यावेत:-

## तक्ता

| वेतनमर्यादा | घरभाडेभत्त्याची मासिक रक्कम, शहराचे वर्गीकरण व अंमलबजावणीचा दिनांक | | |
|---|---|---|---|
| | "अ", "ब-१" व "ब-२" वर्गाची शहरे दिनांक १ ऑक्टोबर १९९० पासून | अन्य जिल्हा मुख्यालये व "क" वर्गाची शहरे दिनांक १ एप्रिल १९९० पासून | इतर ठिकाणे दिनांक १ जानेवारी १९९० पासून |
| [१] | [२] | [३] | [४] |
| रुपये | रुपये | रुपये | रुपये |
| ७५०-९४९ पर्यन्त | १५० | ७० | ३० |
| ९५०-१४९९ पर्यन्त | २५० | १२० | ५० |
| १५००-२७९९ पर्यन्त | ४५० | २२० | १०० |
| २८००-३५९९ पर्यन्त | ६०० | ३०० | १५० |
| ३६००-४४९९ पर्यन्त | ८०० | ४०० | २०० |

जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी

३. ह्या आदेशांच्या प्रयोजनासाठी 'वेतन' या [वेतन] नियम, १९८१ मधील नियम ९[३६][एक] मध्ये व्याख्या . वेतन असेल. जे कर्मचारी जर असुधारित वेतनश्रेणीमध्ये वेतन घेत असतील तर त्यांच्या बाबतीत घरभाडेभत्त्याची रक्कम परिगणित करताना त्यांचे दिनांक १ जानेवारी १९८६ चे असुधारित वेतनश्रेणीतील मूळ वेतन व त्यावर १ जानेवारी १९८६ रोजी अनुज्ञेय असलेला महागाई भत्ता व तदर्थ महागाई भत्ता [मिळत असल्यास] आणि अंतरिम वाढ १ व २ आणि २० टक्के तदर्थ वाढ [किमान रु. ७५/-][जर ते आजतागायत घेत असतील तर] मिळून होणारी एकूण रक्कम विचारात घेण्यात यावी.

"टीप. - सुधारित वेतनश्रेणीत, महाराष्ट्र नागरी सेवा [सुधारित वेतन] नियम, १९८८ अन्वये मंजूर करण्यात आलेल्या वेतनोत्तर वेतनवाढी [Stagnation Increments ] व तदर्थ वेतनवाढी [Ad-hoc-Increments ] घरभाडे भत्ता व स्थानिक पूरक भत्ता देण्याच्या प्रयोजनासाठी मूळ वेतनाचा भाग समजण्यात याव्यात."

४. सर्व कर्मचा-यांना [शासनाच्या मालकीच्या/शासनाने भाड्याने घेतलेल्या निवासस्थानात राहणा-या व्यतिरिक्त] भाडे पावती सादर न करता वरील दराने घरभाडेभत्ता देय असेल. तथापि, ह्या कर्मचा-यांना ते घरभाड्यासाठी काही खर्च/घरभाड्यापोटी अंशदान करीत आहेत अशा आशयाचे प्रमाणपत्र शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक वेपुर-१२८७/६४३/सेवा-१०, दिनांक २५ एप्रिल १९८८ अन्वये विहित केलेल्या जोडपत्र-२ प्रमाणे प्रस्तुत करावे लागेल. स्वतःच्या मालकीच्या घरात राहणा-या कर्मचा-यांना देखील, त्यांनी सदरहू आदेशासोबतच्या जोडपत्र-२ प्रमाणे प्रमाणपत्र सादर केल्यास घरभाडेभत्ता दिला जाईल. कर्मचा-यांना ही प्रमाणपत्रे प्रत्येक वर्षी एप्रिल महिन्यात किंवा ज्यावेळी प्रमाणपत्रातील मजकुरात बदल झाला असेल तेव्हा सादर करावी लागतील. ह्याशिवाय घरभाडेभत्ता देण्यासंबंधीच्या सध्याच्या इतर सर्व शर्ती तशाच लागू राहतील. ग्रामीण भागातील कर्मचा-यांच्या बाबतीत, कामाच्या ठिकाणी राहण्याच्या संबंधात, घरभाडेभत्त्याच्या पात्रतेसाठी विहित केलेली शर्त मात्र काढून टाकण्यात येत आहे.

५. जे कर्मचारी, त्यांच्या सेवाशर्तीनुसार, भाडेमाफ निवासस्थान मिळण्यास पात्र आहेत आणि ज्यांना निवासस्थाने पुरविण्यात आलेली नाहीत, असे कर्मचारी, वर उल्लेखिलेल्या क्र. [२] च्या आदेशानुसार भाडेमाफ निवासस्थानाऐवजी घरभाडेभत्त्याची मागणी करण्यास पात्र आहेत, असे कर्मचारी घरभाडेभत्त्याचे सुधारित दर अधिक त्यांच्या सध्याच्या वेतन / म्हणजेच असुधारित वेतनश्रेणीतील वेतनाच्या व स्थानिक पूरक भत्त्याच्या १० टक्के, ह्या आधारे भाडेमाफ निवासस्थानाऐवजी घरभाडेभत्ता मिळण्यास पात्र असतील. परंतु भाडेमाफ निवासस्थानाऐवजी घरभाडेभत्त्याची मागणी करण्यासाठी विहित केलेल्या सर्व अटी पूर्ण कराव्या लागतील.

६. शासन असाही आदेश देत आहे की, सर्व अनुदानप्राप्त शैक्षणिक संस्थांच्या प्राथमिक, माध्यमिक शाळांतील पूर्णकालिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, तसेच कृषि व कृषीतर विद्यापीठांतील व तत्संलग्न महाविद्यालयांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, त्याचप्रमाणे शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक भभवा-११८६/३९४/सेवा-१०, दिनांक १८ ऑगस्ट १९८६ मधील परिच्छेद ६ मध्ये उल्लेखिलेले इतर कर्मचारी ह्यांना सध्याची घरभाडेभत्त्याची योजना लागू असल्यास, त्यांना वरील परिच्छेद २ मधील घरभाडेभत्त्याचे सुधारित दर, वरील परिच्छेद ४ मधील तरतुदींसह अनुज्ञेय असतील.

७. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ [सन १९६२ चा अधिनियम, क्रमांक ५] च्या कलम २४८ च्या परंतुकान्वये प्रदान केलेले अधिकार व त्यासंबंधातील इतर सर्व अधिकार यांचा वापर करून शासन असाही आदेश देत आहे की, जिल्हा परिषदांच्या पूर्णकालिक कर्मचा-यांनासुध्दा हे आदेश योग्य त्या फेरफारांसह लागू करण्यात यावेत.

८. शासन असाही आदेश देत आहे की, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनमानानुसार वेतन घेणा-या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांनाही, हे आदेश लागू करण्यात यावेत.

९. संबंधित विभागीय प्रमुखांनी, सदरहू आदेश, स्थानिक संस्थांच्या आणि सर्व संबंधित संस्थांच्या व्यवस्थापनांच्या निदर्शनास आणून द्यावेत आणि कर्मचा-यांना सुधारित दराने घरभाडेभत्ता दिला जाईल याची खात्री करून घ्यावी. शासनाने वेळोवेळी मंजूर केलेल्या सहायक अनुदान नियमांनुसार या भत्त्यासाठी सहायक अनुदान अनुज्ञेय होईल असे त्यांनी व्यवस्थापनांना कळवावे.

१०. शासकीय कर्मचा-यांच्या बाबतीत घरभाडेभत्त्याचे सध्याचे दर व सुधारित दर यामधील फरकाचा खर्च, "मागणी क्रमांक: जी-८-२०७०, इतर प्रशासनिक सेवा-८००, इतर खर्च - [सहा] वेतन,घरभाडेभत्ता व स्थानिक पूरक भत्ता यांच्यात सुधारणा झाल्यामुळे त्यासाठीची ठोक तरतूद", या शीर्षाखाली, शासकीय ज्ञापन, वित्त विभाग, क्रमांक आकनि-११९०/२४६/अर्थसंकल्प-७, दिनांक ३ फेब्रुवारी १९९० अन्वये मंजूर केलेल्या रु.५४ लाख आकस्मिकता निधी अग्रिमातून करण्यात यावा. आहरण व संवितरण अधिका-यांनी, घरभाडेभत्त्याचे सध्याचे दर व सुधारित दर यामधील फरकाच्या रकमेची स्वतंत्र देयके तयार करावीत व सदर खर्च आकस्मिकता निधी अग्रिमातून करावा आणि त्याचबरोबर, सदर खर्च, अग्रिमाच्या प्रतिपूर्तीनंतर, शेवटी कोणत्या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकावयाचा हे सूचित करावे. ही पध्दती, फेब्रुवारी १९९० ची मासिक वेतन [दिनांक १ मार्च १९९० रोजी अथवा त्यानंतर दिले जाणारे] देयके काढीपर्यन्त अवलंबण्यात यावी. त्यानंतर घरभाडेभत्त्याच्या सुधारित दरांचा समावेश नियमित मासिक वेतन देयकात करण्यात यावा आणि त्याचा खर्च संबंधित कार्यात्मक प्रमुख लेखाशीर्षाखाली खर्ची घालण्यात यावा. नियंत्रक अधिका-यांनी पूरक मागण्या विधानमंडळाने संमत करताच घरभाडेभत्त्याच्या फरकाच्या मागणीवरील जानेवारी १९९० ते फेब्रुवारी १९९० पर्यन्तचा खर्च संबंधित कार्यात्मक प्रमुख लेखाशीर्षाखाली खर्ची टाकावा.

अनुदानप्राप्त संस्था व जिल्हा परिषदा ह्यांच्या कर्मचा-यांच्या बाबतीतील खर्च, संबंधित प्रमुख लेखाशीर्षाखालील ज्या लेखाशीर्षाखाली त्यांच्या सहायक अनुदानाचा खर्च खर्ची घालण्यात येतो त्या उप लेखाशीर्षाखाली खर्ची घालण्यात यावा.

११. सर्व विभाग प्रमुख, जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, कृषि व कृषीतर विद्यापीठांचे कुलसचिव यांनी या कारणास्तव होणारा अतिरिक्त खर्च मंजूर अनुदानातून भागवावा.

१२. या आदेशाची इंग्रजी प्रत सोबत जोडली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

आ.क. शेटे,
शासनाचे उप सचिव.

एच-११६९[२०,०००-१५-२-९०]-२

प्रति

महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई.
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.
महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
राज्यपालांचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक,
मंत्रालयीन सर्व विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
मंत्रालयाच्या सर्व विभागांखालील विभाग प्रमुख व
कार्यालय प्रमुख,
* प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई.
* प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई.
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
* प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे
कार्यालय, मुंबई.
* महासंचालक, ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल
सेल्फ-गव्हर्नमेंट, मुंबई.
